मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा

ठा.जि.वा. - द्वि.प्र.-223

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

फौजेचा जमाव दहा हजारपर्यंत असून पांडुरंगराव मुख्य सरदार होते. त्यांस लष्करी कामाचा अनुभव नव्हता म्हणून ते प्रायः कोन्हेरराव व शिवराव यांच्या सल्ल्याप्रमाणें वागत. या फौजेनें लक्ष्मेश्वर, बेटगिरी, मिश्रीकोट, कलघटगी, नवी व जुनी हुबळी हीं ठाणीं घेतली. ती फौज पुढें येत चाललीसें पाहून श्रीपतराव शिवमोघे मागें सरून बंकापुरास तळ देऊन राहिला. तेथून त्यानें कुमक पाठविण्याविषयीं हैदरास पत्रें लिहिलीं, त्यावरून त्यानें महमद अल्ली कुमदान यास सात आठ हजार कवाइती पायदळ व तोफा बरोबर देऊन श्रीपतरावाच्या कुमकेकरितां बंकापुरास पाठविलें. शिवाय दादासाहेबांचे सरदार बाजी गोविंद बर्वे व आबाजी महादेव हे दोन तीन हजार मराठी फौजेसह कुमदानास मिळाले होते. अशी ती मोठी फौज जमली तेव्हां तिशीं टक्कर देऊन आपला निभाव लागणार नाहींसें पाहून पांडुरंगरावांनीं हरिपंत तात्यांची त्वरेनें आपणाकडे रवानगी करण्याविषयीं पुण्यास कारभाऱ्यांकडे वारंवार निकडीचीं पत्रें पाठविलीं.

मुक्काम आहे.

धीराहून अनुवादित

शके १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

नं. १८५६ **श्रीव्यंकटेश.** (फाल्गुन. व. ३–८मार्च)

वडिलांचे सेवेशीं अपर्त्ये दादानें चरणावरी मस्तक ठेऊन सा-ष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १७ मोहोरम शनवार मुक्काम भादावळें येथें सुखरूप आहें यानंतर लढाईचें वर्तमानें काल लिहिलेंच आहे. राजश्री जिवाजी भोंसले व जिवाजी जाधव भोजकर व बाबूराव निकम आळतेकर जखमी पाडाव जाहले. आणखीही पाडाव लहानमोठे जाहले आहेत. हत्ती तीन सांपडले, घोडीं शंभर दीडशेंपर्यंत पेंढारी वगैरे यांणीं लुटून आणिलीं. येसाजी शिंदे याचे सगळे वडगांवांत प्यादे आहेत. आज प्रतिनिधीचे घरीं श्राद्ध याकरितां मुक्काम केला. उदईक वडगांव घेणार. आपणाकडे अळतेचें वगैरे सूत्र पेशजीं आलें होतें, त्यास भोमाण्णा कासार यास सांगोन सूत्र होत असेल तर लिहून पाठ-वावें, नाहीं तर अळतेकर खराब होतील, घरें जाळतील ! आणखी सूत्रें येतील ते आह्मांकडे पाठविणें. तेरदळकर व रुईकर व इचलकरं-जीकर नवे प्यादे ठेविले आहेत ते झाडून दूर करावे. विनाकारण शिबंदी ठेऊं नये. राजश्री पांडुरंगराव तात्या काल दुपारीं फौजसुद्धां सडे आले आहेत. बुनगें मागून येणार आहे. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. १८५७ **श्री.** (चैत्र शु. ९–२८ मार्च)

राजश्रिया विराजित रा. रा. विरूपाक्षपंत स्वामी गोसावी यांसी. सेवक व्यंकटराव नारायण. नमस्कार. विा उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. राजश्री येसाजी

[redacted]यंकटराव नारायण घोरपडे यांनीं आपली आजी अनुबाई यांस [redacted]ांत करवीरकरांकडील जखमी पाडाव सांपडल्याचा वगैरे मजकूर [redacted]या लढाईप्रकरणीं आहे. यासंबंधें नं. १८२३ चें पत्र पहा. [redacted]रंजीकर.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

शिंदे याच्या पारपत्याकरितां सरकारचे आज्ञेवरून फौज ठेविली आहे, त्याच्या खर्चाचा हिस्सा तुह्मांकडील तालुक्यावर[1] येणें, त्याचा फडशा व्हावा लागतो. तर तुह्मांकडील शहाणा माणूस कारकून पाठवून फडशा करून देणें. येविशीं तुह्मांस सरकारचें पत्र आलें आहे तेंच ऐन जिन्नस पाठविलें आहे; तर लवकर कारकून पाठवून ऐवजाचा फडशा करून देणें. दिवसगत लागल्यास फौजच तिकडे येईल ! लवकर जाबसाल केल्यानें उत्तम आहे. येविशीं सांगणें तें सांगोन कारकून पाठविले आहेत, सांगतील त्याप्रमाणें जाबसाल करून देणें. रवाना छ ७ माहे सफर. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. १८५८ **श्रीव्यंकटेश.** (चैत्र शु. १०–२९ मार्च.)

वडिलांचे सेवेशीं अपत्यें दादानें चरणावरी मस्तक ठेऊन सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ ८ सफर दशमी भृगुवार मध्यरात्रपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वो॥ राजश्री महादेवशास्त्री पन्हाळेस गेले होते. आज दुपारीं आले. करवीरचे क्षेत्राचे लक्ष रूपये देतात. " वरकड ठाणीं घेणें, क्षेत्राचे वाटेस न जाणें, " ह्मणोन बोलतात. लक्ष रूपयेची निशा सावकारी दिली तरी हे करवीरचा शह उठवून दुसरीकडे जातात. वरकड तह करणें तो शास्त्रीबावा पुरंदरीं जाऊन तेथून चिठी घेऊन यांनीं त्याप्रमाणें वर्तावें, याप्रमाणें करार होत आहे. वडिलांस कळावें, करितां लिहिलें असे. राजश्री कृष्णराव पानशे यांचे घरीं रामनवमीचे महोत्साहाचें शनिवारीं लळित आहे; त्यास मृदंगी चांगला पाहिजे. याकरितां त्यांनीं आह्मांस फार करून सांगितलें आहे. तरी भोमाण्णा मृदंगी यास पत्र पावतांच मृदंगसुद्धां वडिलीं पाठवून द्यावा. अगत्य पाठवावा. उदईक शनिवारीं येथें मुक्काम आहे.

---

१ चिकोडी तालुक्यावर. २ व्यंकटराव घोरपडे यांचें करवीराहून अनुबाईस पत्र इचलकरंजीस.

शके १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

भोसाण्णा नसला तरी दुसरा मृदंगी चांगला भीमा अगर तिसरा पाठ ऊन द्यावा. हे विज्ञापना.

नं. १८५९ श्री. (चैत्र वद्य एप्रिल प. पंधरवडा.)

येादी सरकारांत एकसाली ऐवज घ्यावयाचा.

५८००० एकसाली ऐन.

२००० नहरपट्टी.

६००००

पैकी वजा.

१५००० संक्राजी घोरपडे यांजकडे कर्जाऊ ऐवज येणें आहे, तें सरकारांत उगवणी करून घ्यावे ते.

८००० पथकाचे नालबंदींत मजुरा घ्यावे ते रुपये.

२३०००

बाकी ३७००० रुपये.

पैकीं वजा सरकारांत वजा करून घेतले ते.

३८७॥ मौजे वडगांव, ताॅ चाकण बाॅ पावती.

८६ मौजे शिरगांव बाा पावती.

२४७॥ श्रीनिवास नरसी कारकून शिलेदार यास आदा जाहले ते.

७२१॥

बाकी सरकारांत भरणा पोतेचाल रुपये ३६३७८॥.

याचा भरणा बित्तपसील.

३१७५० बाॅा वराता गुाा रुपये.

---

१ इचलकरंजी संस्थानाकडून पेशवे सरकारांत ऐवजाचा भरणा होण्यासंबंधाची ही याद आहे. हिजवर महिना आठी अजमासानें घातला आहे. २ तर्फ. ३ बमोजीब पावती = पावतीप्रमाणें.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स. १७७६

४५२८॥ जवाहीरखान्यांत रोख दिले.

२००० नरहरपट्टीबा.

२५२८॥ रोख दिले गु। केसोबा.

४५२८॥

३६२७८॥

संकराजी घोरपडे याजबा। ऐवज तहकूब ठेविला होता तो फिरोन घेतला १५००० रूपये.

१००० बाबूराव पाटणकर.

३००० हणमंतराव घाटगे.

१००० माधवराव गंगाधर गोळे.

१०००० नारायण दी।। व यज्ञेश्वर दीक्षित ठकार.

१५०००

नं. १८६० **श्रीव्यंकटेश.** (चैत्र शु. ५--५ एप्रिल.)

अपत्यें दादानें चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना तागायत छ ४ सफर इंदुवार संध्याकाळपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वाडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. रूकडीचा मजकूर लिहिला त्यास हरी देवाजी कुळकर्णी येथें येऊन तह जाहला. वतनदारासुद्धां एन हजार रूपये करार करून मोकदमाचे नांवें कतबा लिहून घेऊन सरकारांतून गांव आमचे निसबतीनें करून सरकारचें अभयपत्र गांवास दिलें आहे. सरकारांत कच्ची कमाविशी

—चमोजीच वरात गुदस्त = गुदस्तां झालेल्या वरातांप्रमाणें. [ही २६३६ पृष्ठावरील शेवटची टीप.]

१ बहल. २ व्यंकटराव घोरपडे यांचें इचलकरंजीस अनुषंगिक पत्र करवीराहून यासंबंधें नं. १८२३ वगैरे पहा.

समजावन द्यावी. याप्रमाणें करार करून घेतला आहे. हरी देवाजी कुळकर्णी लबाड आहे. त्याच लगामी रयत नाही, म्हणोन लिहिलें, तर अगोदर तो बोलावयास आला; याकरितां त्याचे विद्यमानें बोलणें प्राप्त झालें. ऐशास वडिलीं नरहर गोविंद यास तेथें नेहमीं ठेऊन रयतांची खातरजमा करून कुळकर्णी यास हाताखालीं घेऊन ऐवजाची उगवणी होय तें करावी. आपलें कार्य लबाडाचे हातून जाहलें तरी करून घ्यावें. कालचें वर्तमान शेटी खिजमतगारासमागमें रातोरात लिहून पाठविलेंच आहे, त पोंहचलेंच असेल. त्याप्रमाणें प्यादयांची तरतूद करून रवानगी करावी, आज भोजनोत्तर फौजा तयार होऊन करवीरास गेले, गांवांतील फौज व प्यादे बाहेर जयंतीचे वोढेपर्यंत आले होते, इकडून तोफांचा मार होतांच वोढा सोडून पळतांच या फौजेनें हल्ला करून गांवकुसवापर्यंत चालोन घेतलें. तिकडील दहा वीस घोडीं पेंढारी याणीं पाडून घेतलीं. गांवांतलें [illegible]सपर्यंत प्यादे मारले गेले, उत्तरेकडे रामचंद्र गणेश आदितवार पेठेकडे होते. प्रतिनिधि मंगळवार पेठेकडे होते. दोन्हीही पेठा जाळून फस्त केल्या. स्वामींच्या मठाकडे कोन्हेरराव होते, त्याणीं तिकडून हल्ला करतां स्वामींच्या मठांत गुळें होतें तें झाडून लुटून आणिलें, फार नाश जाहला. उदैक कूच करून स्वामीचे मठानजीक गंगातीरीं व रंकाळेवर उतरावें म्हणोन मनसबा होत आहे. प्रतिनिधीचे विचारें ठरेल तें खरें. सेवेशीं श्रुत होय, हे विज्ञापना.

नं. १८६१ श्री. (चैत्र व. १३–१४ एप्रिल)

सेवशीं हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. शिले-

---

१ भवानराव. २ हरिपंत फडके यांचें कारभारी सखारामबापु व नाना फडणवीस यांस पत्र.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

दार निसबत व्यंकटरा. नारायण घोरपडे यांचीं घोडीं सालगुदरत लढाईंत पडलीं, त्यांची किंमत नाण्याचा ऐवज रुपये.

२५०.० पथकांताल शिलेदार यांचीं घोडीं रास २ एकूण किंमत.

२००० रावजी पवार घोडा रास १

५०० चिलोजी इंगवाले याची घोडी रास १

२५०० एकूण रुपये.

१००० पदाजी काटकर. निमबतीचे शिलेदार, यांचा घोडा रास १

३५०० एकूण रुपये.

पैकीं येथें पावले रुपये

१२०० व्यंकटराव नारायण घोरपडे यांजकडे लिहून त्यांस पावले रुपये.

४०० बटा नाण्याचा ऐवज द्यावा तो नक्त दिला सबब बटा रुपये.

१६००

बाकी रुपये १९०० एक हजार नऊशें देविले आहेत, तरी नाण्याचा ऐवज पावता करावयासी आज्ञा जाहली पाहिजे. रवाना छ २४ सफर. सुा शीत सबैन मया व अलफ. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८६२ श्री. (चैत्र वद्य ११–१४ एप्रिल.)

सेवेशीं हरि बल्लाळ. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना शिलेदार निसबत व्यंकटराव नारायण घोरपडे यांस नालबंदी सालगुदरत सन खमस सबैनची. रुपये—

---

१ कारभारी सखारामबापू व नाना फडणवीस यांस हरिपंत फडक्यां यें पत्र



श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड. इ. स. १७७६

३४६८८ पथक दिा मजकूर सन आर्बा सबैन. स्वार ३०२
पैकीं सालगुदस्त चाकरीस स्वार २९३ एकूण रुपये.
२९३०० ऐन नालबंदी दर रावतीं रुपये शंभरप्रमाणें
रुपय.
२९३० कापडाबद्दल दर रावतीं रुपये १० प्रमाणें
१७५८ रवानगी दर रावतीं ६ रुपयेप्रमाणें.
२०० कारकुनाम रुपये.
५०० दोदाजी यशवंत यांस सालगुदस्त सन खं
मस सबैनमातून करार केले ते रुपये.

३४६८८

११७५९ नक्त रुपये.
१४९२९ नाण्याचा ऐवज.

३४६८८

२११४५ नाचे शिलेदार स्वार १०३ एकूण नालबंदी रुपये.
११२४५ कडलासकर मंडळी स्वार ४७ एकूण रुपये
१०७०० एकांडे असामी ५६

२११४५ एकूण.

१०९७२॥ नक्त रुपये.
१०९७२॥ नाण्याचा ऐवज.

२११४५

५६६३३

---

१ उर्फनाम सावंत, जात सारस्वत ब्राह्मण, वास्तव्य आजरें. २ निसबतीचे.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

तपशील.

३०७३१॥ नक्त रुपये.

२५९०१॥ नाण्याचा ऐवज.

पैकीं वजा येथें पावले ते वगैरे रुपये.

५१३३ येथें पावले रुपये.

२७२५ पेशजी पावले रुपये.

५,०० साल गुा छ २२ रबिलाखरीं नक्त पावले आहेत
ते दप्तरीं रुजू पाहून वजा करावे रुपये.

२२२५ पथकांत लिहून पावले रुपये.

१२२५ नक्त रुपये.

१००० नाण्याचा ऐवज.

२२२५

२७२५

७०००.... .....

२०००.....

५०००.....

७००० नाण्याचा ऐवज.

१०००० पथक मजकूरचे नालबंदीपैकीं नक्त रुपये

२२१३३

तपशील.

१६१३३ नक्त रुपये.

६००,० नाण्याचा ऐवज रुपये.

२२१३३

बाकी रुपये.

१४५९८॥

१९९०१॥

३४५००

एकूण चौतीस हजार पांचशें रुपये देविले आहेत. तरी नालबंदीच्या यादी मखलासीच्या नांवनिशिवार अलाहिदा पाठविल्या आहेत त्याप्रमाणें जमाखर्च करून सदरहू ऐवज पावता करावयासी आज्ञा जाहली पाहिजे. रा॥ छ २४ सफर सुा शीत सबैन मय्या व अल्फ. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. १८६३ **श्री.** (वैशाख शु. २–२० एप्रिल.)

तीर्थस्वरूपममान मातुश्री अनूबाई वडिलांचे सेवेशीं:—

अपत्यें माधवराव नारायण प्रधान, साष्टांग नमस्कार विनंति येथाल कुशल तागायत छ १ रबिलावल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. राजमंडळकरांकडे रस्त इचलकरंजी वैगेरे गांवांवरून जाते म्हणोन विदित जाहलें, त्याजवरून रस्त जाईल ती मारून बंद करण्याची आज्ञा बोरगांवकरांस केली आहे. ते स्वारी करून रस्त मारितील. तुम्हींही आपलेकडाल राऊत प्यादे त्यांस कुमकेस इचलकरंजीचे देऊन रस्त नेहमीं बंद होय ते गोष्ट करावी. बहुत काय लिहिणें लोभ करावा. पेशजी एक दोनवेळां लिहिलेंच आहे. बंदोबस्त केलाच असेल. हे विनंति.

नं. १८६४ **श्रीशंकर.** (ता. २३ एप्रिल.)

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमच्छंकराचार्यान्वय संजाताभिनव श्रीविद्यानरसिंह भारती स्वामि करकंजोद्भव श्रीविद्याशंकर भारती स्वामिकृत नारायण स्मरणानि:—

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

सकल गुणालंकरण हरिभक्तिपरायण मठाभिमानैकधुरंधर राजमान्य राजश्री व्यंकटराव नारायण परम भक्तोत्तम यांप्रती. विशेषस्तु. तुमचें कल्याण इच्छित मठसंकेश्वरीं श्रीनिकट असों. अत्रत्य कुशल वैशाख सित पंचमीपर्यंत वृत्त यथास्थित जाणून स्वकीयकुशलार्थ लेखन करीत असलें पाहिजे. तदनंतर सैन्यांतून कहीं येऊन संस्थान ग्राम मौजे कमतनूर येथील रानांतील वैरण भरून घेऊन गेले. येविशीं आपली आज्ञा तो व्हावयाची नाहीं, परभारें कहीवाले यांहीं उपसर्ग केला असेल. तर सैन्यांत ताकीद होऊन अतःपर हरएकविशीं उपद्रव न होय तो अर्थ केला पाहिजे. रखवालीस बाणदार देऊन संस्थान ग्रामास उपद्रव न होयसें करावें. वेा भीमभट बडगते (?) यासंबंधीं यांसीं पाठविलें आहे. तर रखवाली बाणदार देववून ग्रामाचें संरक्षण करणार सद्भक्त अमा. तेथें विशेष लिहिणें काय असे? आज्ञेयमुल्लसाति-

नं १८६५ **श्री.** (आषाढ शु० ९–२५ जून.)

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अंतोजीपंत दाजी स्वामीचे सेवेशीं–पोष्य काळो बहिरव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. उपरी येथील कुशल तागायत छ ८ जमादिलावल मंगळवार जाणोन कुशल स्वकीय लिहात असलें पाहिजे. विशेष. " उत्तरेकडील फौजा माघाऱ्या परतल्या. रा. हरिपंततात्या जेष्ठ वद्य त्रयोदशीस पुण्यास दाखल जाले. रा. परशुरामपंतभाऊ श्रीभीमापार होऊन अलीकडे आले. षष्ठीस मिरजेस येणार. तेथें आल्यावर पुढें मसलत ठरेल " म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें.....हदरखान बंकापुराहून कूच करून देवगिरीचे मुक्कामास भंगळवारीं निघोन गेला. आज आठ दिवस जाले. एक मुक्काम तेथें करून गलगनाथास गेला. नावा टोकरे

---

१ अंतोजीपंत हे तेरदाळचे फडणीस. पत्र पाठविणार पेठे हे नरगुंदकरांचे कारभारी.

नदीस जमा केले होते. निम्मे फौज तुंगभद्रापार जाली. बाकी राहिली ती एक दोन रोजांत पार होऊन नीट पट्टणास जाणार. इतकेउपर नदी पार होईल. गुंता नाहीं. आलें अरिष्ट ईश्वरें निवारण केलें. बंकापुरचे बंदोबस्तास दोन हजार स्वार व दोन तीन हजार बार व सरदार श्रीपतराव शिवमोग्यास ठेऊन खुद्द गलगनाथास गेला. आपणास कळावें. नदीपार जाहल्याचें वर्तमान येतांच लिहून पाठवितों...बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंति.

नं. १८६६ **श्री.** (आषाढ शु. १२--२८ जून.)

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेशीं:--

विनंति सेवक अंताजी शंकर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना तागायत छ ११ जमादिलावल भृगवारपावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें पावलें. " आम्ही काल इंदुवारीं कुरुंदवाडास आलों. तीा रा। भाऊ मिरजेस येऊन तासगांवास गेले. रा. हरिपंत फडके व साऱ्या फौजा देशास आल्या. " म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. स्वामींचे येणें जालें हें ऐकून बहुत संतोष जाहला. देशीं फौजा आल्यामुळें इकडील मुलखांत दबाब पडला. हैदरखान माघारा झाडून तुंगभद्रापार गेला. कित्तूरकरांस समागमें नेऊन गेला. कित्तूरकर कैदेंत आहे. चौदा लाख रुपये मागतात. पुढें काय घडतें पहावें. हैदरखान गुत्तीकडे गेला म्हणोन वर्तमान आहे. पट्टणाकडे जावें अशी मसलत होती व बिदनुराकडे जावें अशीही एक मसलत होती; परंतु तूर्त गुत्तीकडे गेला म्हणून वर्तमान आहे. धौशानें येऊन सुरापुरची साडेचार लाख रुपये खंडणी केली. काडलूर संगमास उतरून श्रीकृष्णापार व्हावें अशी आवई घातली आहे. परंतु अद्याप पार जाहले नाहींत. परंतु मोगलाची फौज तिकडे जावयाची आवई हैदर-

---

१ रघुनाथराव नीलकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

खानाचे लष्करांत आहे. हैदरखान चहूंकडील आवई ऐकून माघारा गेला. बंकापुरीं राजश्री श्रीपतराव दीड हजार फौज व चार हजार बारं ठेविले आहेत. तमाम देशकांच्या वोली खंडण्या केलेल्या ऐवजाकरितां बंकापुरास ठेविल्या आहेत. खंडणीचा ऐवज वसूल करितात. इकडून कांहीं फौज बारींपार जाल्यास वसूल बंद पडेल. नरगुंदाहून आतांच बातमीचें पत्र राजश्री काळोपंतांचें आलें. त्याची तालीख सेवेशीं पाठविली आहे त्याजवरून सविस्तर विदित होईल. त्यांत लिहिलें आहे जे, तुंगभद्रापार जाल्याचें वर्तमान मागाहून लिहितों. याप्रमाणें नरगुंदच्या पत्रांत आहे. परंतु चहूंकडील बातमी तुंगभद्रापार जाहल्याचीच आहे. हैदरास मोंगलांच्या फौजेचा पायबंद बसला व इकडील फौजाही देशास आल्या. करितां निकाल काढून गेला. याप्रमाणें वर्तमान आहे. आणखीही वर्तमान येईल तें मागाहून सेवेशीं लिहितों. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. १८६७ **श्री.** (आषाढ शु० १२–२८ जून.)

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री महादाजीपंत काका स्वामीचे सेवेशीं–पोष्य अंताजी शंकर कृतानेक साा नमस्कार विनंति. येथील कुशल तााा छ० ११ जमादिलावल जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे.....“ श्रीमंत राजश्री दादा काल इंदुवारीं कुरुंदवाडास आले. श्रीमंत राजश्री भाऊ मिरजेस येऊन तासगांवास गेले. राजश्री हरीपंत व साऱ्या फौजा देशास आल्या. आणि लौकरच फौजांची तयारी होणार ” म्हणून लिहिलेवरून सविस्तर कळलें. श्रीमंत राजश्री भाऊ व दादा स्वारी करून सुखरूप घरांस आले हें ऐकोन बहुत संतोष जाला. फौजा देशास आल्यापासून

---

१ कवायती पायदळ. २ मनोळीच्या वायव्येकडे धारवाड प्रांती. ३ हे कुरुंदवाडकराचे कारभारी.

इकडील मुलखांत दबाब पडला. हैदरखान झाडून गलगनाथाजवळ तुंगभद्रा उतरून पार जाहला.....तेरदाळ प्रांतीं तुपाचे व्यापाराची धारण काय आहे ती लिहून पाठवावी म्हणून लिहिलें, त्यास प्रस्तुत तूप दरमणीं रूपये साडेपांच प्रमाणें धारण आहे. गहूं पावणेतीन पायली चांगले मिळतात. निरस माल असेल, फार जुना, तर मापटें चिपटें अधिक याप्रमाणें धारण आहे...बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे हे विनंति.

नं. १८६८ (आषाढ शु० १५–१जुलई.)

शिवाजी बाबाजीचें पत्र १४ जमादिलावलचें पुरंदरनजीक भिवंडीहून पांडुरंगरावास मिरजेस.—

" हैदरखान गलगनाथाकडे माघारा गेल्याचा मजकूर लिहिला तो कळला. तोतया आपल्या निसबतीच्या कारकुनांस उपद्रव करितो, घरें लुटितो, धरून नेतो, रूपये घेतो, मनस्वी करितो, त्याचा मजकूर लिहिला तो कळला. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व रास्ते तिकडे फौजेसह रवाना जाहल्याची आवाई खाऊन परत गेला[1]. मागाहून फौजाही इकडून जाणार, त्यापक्षीं मेळविलें यश सांभाळावें याअर्थें परत गेला ! बाकी नद्या भरल्यानंतर तिकडील मातबर स्थलांचा इकडून उगराळा होण्याचें कळतच आहे ! तथापि एक भय दोन जागां, इतकाच प्रकार. तोतयाचा प्रकार तर त्यानें कांहीं बाकी ठेविली नाहीं. मनस्वी करूं लागला आहे. पहिले गाडदी (इकडून) रवाना जाले त्यांची एक लढाई जाल्याचें लिहिलेंच आहे. आणखी दोन हजार पाईचें माणूस रवाना होत आहे. काल वर्तमान आलें आहे कीं इकडून गाडदी गेले आहेत त्यांत कोंकणपट्टीचे गाडदी बरकंदाज महाडाकडील होते ते पांच सातशें त्याजकडे जाऊन मिळाले!

---

१ हैदरखान गेला.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

अरब वैगरे पागा गेल्या आहेत, ते सारें प्रतापगडापुढें तीन कोसांवर येऊन राहिले आहेत. आतां मातबर सामान रवाना करितात. तोतया-जवळ वशाकरणी काय विद्या आहे न कळे ! जें माणूस जातें तें मोहींत होतें ! पारिपत्य होईल तेव्हां खरें ! श्रीमंत राजश्री नानांनीं आम्हांस बोलावून नेऊन सांगितलें कीं, " ऐवजाची कोठें सोय न पडे, तेव्हां हक्क रूसुमाचा दहकाचा प्रकार योजून काढिला. कमा-विसीचे महालांपासून भरणा करून घेतला. सरंजामाच्या महालांपैकीं राजश्री सखारामपंत व पुरंदरे यांणीं ऐवज दिला. नारोशंकर वैगरे पांचसा असामी राहिले. रास्ते तुमची वाट पहातात. वरकड सरं-जामी तुम्हीं दिल्याखेरीज देत नाहींत. ऐवज ज्यांणीं दिला आहे तो मा-घारा द्यावा लागेल. मग होळकर व शिंदे यांजकडील विचार कळ-तच आहे. याकरितां करकंब, मंगळवेढें, मिरज वगैरे महालांचा फडशा करावा तों पलीकडील महालही सुटतात.

नं. १८६९ (आषाढ वद्य जुलई प. पंधरवडा.)

शिवाजी अप्पाजी (तोतयाचा कारभारी व रामचंद्र नाई-काचा भाऊ) याचें पुरूषोत्तमरावास पत्रः—

आपण जरूर येऊन श्रीमंतांचें (तोतयाचें) दर्शन घेतल्यानें सर्व आशय ध्यानांत येतील. इकडील तालुके विजयदुर्ग व देवगड व आरमार यांचा बंदोबस्त करून श्रीमंतांची खासा स्वारी दरमजल देवरूखाचे सुमारें आल्यानंतर उत्तरप्रांत कोंकण येथील बंदोबस्त करून सत्वरच करवीर प्रांतीं स्वारी होईल. त्याअगोदर आपण येऊन दर्शन घेतल्यास पूर्वलक्षानुरोधास उचित आहे. "

---

१. मनोळीच्या बारीपलीकडचे धारवाड प्रांतींचे महाल हैदरानें ग्रासलेले.

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

इ. १८७०

(आषाढ व० ५--६ जुलई.)

शिवाजी बाबाजीचें पत्र पांडुरंगराव यांस:

पुरंदराहून मिरजेस पै॥ छ १९ जमादिलावलचें.

" हरिपंतनाच्या आले त्यांजबरोबर पथकें आहेत त्यांचा नालबंदीचा गवगवा पडला आहे. त्यास रसदेचा ऐवज घेऊन एकसाला खमसची नालबंदी देऊन कर्नाटकांत रवानगी करावी असा येथील विचार आहे. तूर्तच निघतात असें नाहीं. श्रावणमास लागेल. कोंकणांत सामान गेलें त्या सामानाची व तोतयाकडील सामानाची लढाई झाली. त्याचें वर्तमान पूर्वी लिहिलेंच आहे. सामान पुढें अंजनवेलीस जातें. राजश्री बाबाजीपंत बर्वे, बचाजीपंत बर्वे यांचे चिरंजीव, या सामानास येऊन मिळाले. सारा भर अंजनवेलीसच पडणार. रास्त्यांस व सुरापूर देशांत धौशा खंडणी करीत आहे त्यास कर्नाटकांत जाण्याविशीं इकडून पत्रें जात असतात. परंतु धौशा पर्जन्यकालचे दोन महिने कोठें तरी कंठून इकडून कर्नाटकांत फौज जाईल तीस सामील होईल. " करवीरकरांजवळ जमाव विशेष नाहीं. हजार बाराशें स्वार व दीड हजार प्यादा आहे. त्यांनीं कागल प्रांतांतील एक खेडें घेतलें, हल्लीं कागलावर तोंड टाकणार; " म्हणोन लिहिलें, त्यास त्याचें पारिपत्य करणें कारभारी यांस जरूर आहे. कागलावर तोंड टाकणार त्यास कागल जागा चांगली आहे. त्यांच्यानें काय होणार ? " श्रीमंत भाऊ आषाढ शुद्ध ५ गुरुवारीं तासगांवास आले. दुसरे दिवशीं मिरजेस आले. भेटी जाल्या. एक दिवस राहून तासगांवास गेले. " म्हणोन लिहिलें तें कळलें. "

नं. १८७१

(आषाढ व० ९--९ जुलई.)

मिरजेस पांडुरंगराव गोविंद यांस शिवाजी बाबाजीचें २२ जमादिलावल इंदुवाग्गरचें पत्र भिवंडीहून:-

" गुदस्तां आमची फौज करवीर तालुक्यांत न गुंतती तर

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स. १७७६

हैदरखानाची स्वारी होऊन बंकापूर कां जातें ? करवीरकरांचें तोतयाकडे सूत आहे. ते पैकेकरी आहेत. पाहिजे तेव्हां फौज ठेवून आज तीन वर्षें घावडाव साधीतच आहेत. त्यांचें पारिपत्य आधीं जालें पाहिजे, " असें कारभारी आम्हाजवळ बोलतात. आपल्या एकनिष्ठतेची वृद्धांनीं फारच तारीफ केली. तोतयानें फारच लबाडी केली. अंजनेवली हल्ला करून घेतली. ज्या किल्ल्यावर जातात ते पालवावयास लागतात ! सुवर्णदुर्गकरही दम धरीत नाहींत. भेटतात. आज उद्यां वर्तमान येईल. येथून गाडदी व सामान घेऊन बापूजी हरि म्हणोन गेला होता. एक लढाई जाली होती. इभ्रत चांगलीच बसली होती. लढाई जाहल्यावर तिसरे दिवशीं कोंकणपट्टीचे गाडदी पांच सातशें होते त्याणीं तिकडे सूत्र करून गेले. आरब पांचशें व राऊत कांहीं पुढें गेले होते ते मारामार करून निघोन प्रतापगडच्या आसऱ्यास आले. आतां सामान वरचेवरी प्रतापगडाकडेच पाठवितात. आरबांचे दोन्ही जमादारांस दोन कडीं व गोविंदजी परभु होता त्यास मोत्यांची जोडी व पांच हजार रुपये खर्चास येणेंप्रमाणें पाठविलें. चहूंकडून पाईचें माणूस आणून जमा करितात. सरदार चांगला पाठविणार. सुवर्णदुर्गाकडील गुंता उरकून तोतया महाड रायरीकडे येणार. सारांश मोठें खूळ जालें. कोंकण गेलें. त्याचें पारिपत्य होईल तेव्हांच खरें ! नाहीं तरी ग्रासीत चालला आहे ! "

नं. १८७२ (आषाढ व. ११–११ जुलई)

शिवाजी बाबाजीचें २४ जमादिलावलचें भिवंडीहून पत्र. पांडुरंगरावास मिरजेस;—

" राजश्री हरिपंततात्याकडील लोकांनीं गवगवा फारच केला. एक दिवस येऊन किरकोळ बसले होते. शेवटीं डोईजड राजश्री खंडेराव दरेकर, पाटणकर वगैरे येऊन चौकी उठविली. आले तेव्हां

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

साऱ्यांच्या संमताखेरीज नमेलच ! शेवटीं काजी खोत बाळ (?) जाले. एक दिवस दरोबस्त उपास राजश्री हरिपंतास जाला. रसेदच्या ऐवजीं पंधरा लक्षांच्या वराता मशारनिल्हेकडे फौजेच्या समजाविशीस म्हणून दिल्या. वरातेच्या ऐवजीं फेरमुबदला करून मागील रोजमरे तटले आहेत ते द्यावे. पुढील ठराव देण्याघेण्याचा करून कोणास रोख, कोणास वराता, याप्रमाणें निकाल काढितात आणि निरोप देतात. मशारनिल्हे व त्यांच्या बरोबरचे लोकसुद्धां हिवऱ्याजवळ राहिले आहेत. कुटंब मशारनिल्हेनीं आणून बापूच्या वाडयांत[1] राहिले आहेत. येथून तोतयावर बापूजी हरीबरोबर सामान पाठविलें होतें त्यापैकीं पांच सहाशें गाडदी बापूजी हरीसुद्धां तोतयाकडे सूत्र लावून तिकडे गेले. बाकीचे मारामार करीत अरब वैगेरे प्रतापगडाकडे परत आले. ज्या दिवशीं गाडद्यांनीं लबाडी केली त्या दिवशीं सारे एकादिलपणें गेले होते. तेणेंप्रमाणें शेवटपावेतों जाते तरी तोतयाच धरून आणावा अशी संधि होती ! गाडदी जातांच कोंकणचें माणूस पळून गेलें होतें. ती गोष्ट गेली. आतां सामान पोक्तसुद्धां बजाबा किंवा भिवराव पानसे यांस पाठविणार. तरतूद होत आहे. "

नं. १८७३ (१८ जुलई.)

शिवाजी बाबाजीचें श्रावण शु॥ ३ गुरुवासरचें मुक्काम भिवंडीचें पत्र पांडुरंगरावांस:—

" होळकरांचे भेटीकरितां श्रीमंत व मातुश्रीबाई किल्ल्यावरीलीं आलीं होतीं. उभयतां कारभारी व मंडळी भिवंडीच्या माळावर आले होते. भेटी झाल्या. तसेंच डेऱ्यास जाऊन श्रीमंतांची भेटी घेतली. चार घटका बसावें तर पर्जन्य अतिशय यामुळें घटकाभर बसोन विडे घेऊन निरोप घेऊन गोटास गेले. आज पुन्हा किल्ल्यावर जा-

---

१ हिवरें येथें सखारामबापूच्या वाड्यांत.

णार. नजर करावयाची आहे, ती सावकाशपणें करणार, व बोलणें-चालणें खलबतही व्हावयाचें आहे. राजश्री हरिपंततात्याबरावरचे फौजेचा निकाल पडणें कठिण आहे. लोक ऐकत नाहींत. खमसची नालबंदी व राहिले रोजमुरे नक्त द्याल तर घेऊं. नाहीं तर गांठ पडत नाहीं; म्हणोन साफ बसले आहेत. तोतया चिपळोणाकडे गेला त्याचें कारण समजत नाहीं. रायरीकडे जावें तरी जाण्यास फार जवळ पडतें; दुसरा विचार, करवीराकडील मूत्र आलें आहे; याज-करितां तिकडे जाणार अशीही आवाई आहे. याजकरितां आंबाघाट बंद करावा, मातबर चौकी ठेवावी, ' म्हणोन आपणास (कारभारी येथून) लिहितात. "

नं. १८७४ (श्रावण शु० जुलई दु० पंधरवडा.)

शिवाजी बाबाजीचें पत्र पुरंदराहून पांडुरंगरावांस मिरजेस—

पै॥ छ० १४ जमादिलाखर.

" हैदरखान पट्टणास दाखल जाला. बंकापुरास कृष्णराव शिवमोघे राहिले आहेत. आप्पाजीराम कित्तूरकराकडील खंडणीच्या वसुलाकरितां सावनुरास आले आहेत. तोतयाकडील राजकारण कर-वीराकडे खेळतच आहे व घोरपडे यांजकडेही कारकून आल्याचा मजकूर लिहिला ती पुरवणी कारभारी यांस दाखविली. वाचून पा-हून उभयतांनीं उत्तर केलें कीं, पर्जन्याचे दिवस आहेत तों अशींच राजकारणें चालतील. आपली फौज तिकडे गेल्यानंतर राजकारणें जागच्या जागींच राहतील. साऱ्या सरदारांनीं श्रम, साहस करून या थरास गोष्ट आणिली. आतां सालमजकुरीं तिकडे फौजा जाऊन बंदोबस्त जाला म्हणजे सर्व ठीकच होईल. "

---

१. इचलकरंजीकर.

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

नं. १८७५ (श्रावण शु० जुलई दु० पंधरवडा)

पुरंदराहून शिवाजी बाबाजीचें पत्र पौ छ० १८ जमादिलाखर " श्रीमंत राजश्री नानांचे स्त्रीस बहुत दिवस बरें वाटत न-व्हतें. उपायही बहुतच जाले. परंतु आयुष्यमर्यादेपुढें उपाय नाहीं. दिवसेंदिवस क्षीण होऊन श्रावण शुद्ध १४ स इंदुवारीं आवशीस दे-वाज्ञा जाली. पुण्यांतच होतीं. काल प्रातःकाळच्या प्रहर दिवसास श्रीमंत राजश्री नानास वर्तमान कळलें; त्याजवरून बहुतच श्रमी आ-हेत. अनुचित गोष्ट जाहली. आधींच दौलतीस चहूंकडे हिसके बसोन जिकडील तिकडे पेंच बसले; तोतयाचें खूळ; राजश्री हरीपंत-तात्याकडील नालबंदीच्या ऐवजास ठिकाण नाहीं; हिसके भारी; एक दिवस सुख नाहीं; असें म्हणोन उदासच होते. त्यांत ही गोष्ट जाहली. आतां तर फारच उदास होतील. "

नं. १८७६ **श्रीगणराज.** (श्रावण शु० ४—१९ जुलई.)

श्रीमंत राजश्री व्यंकटराव दादा स्वामीचे सेवेशीं. पोष्य पर-शुराम रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल तागाईत छ० २ माहे जमादिलाखर जाणोन स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. मौजे समडोळी काा सांगली हा गांव राजश्री परशुराम भोंसले यांजकडे आहे. त्यास करवीरकरांची स्वारी वडगांवाकडे गेली होती. त्याचे पारिपत्यास आपण फौजेसुद्धां गेले ते समयीं मौजे मजकुरीं राहिले, तेव्हां आपलेकडील लोकांनीं मौजे मजकुरीं लुटालूट करून गुरेंढोरें वैगरे चीजवस्त नेली म्हणोन कळलें. ऐसियास भोंसले यांणीं आपलेकडील तालुक्याचे घांसदाण्याचा फडशा केला. अतःपर त्यांचे गांवास उपद्रव करण्याचा नाहीं. याजकरितां आपण आपलेकडील लोकांस ताकीद करून मौजे मजकूरचीं गुरें

---

१ पत्र परशुरामभाऊंचें व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यांस.

वगैरे चीजवस्त नेली असेल ती जराबाजरा देवावी. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

नं. १८७७. (श्रावण शु.७ २२ जुलई.)

शिवाजीबाबाजीचें पत्र पांडुरंगरावास पुरंदराहून मिरजेस—

पौ छ ५. जमादिलाखर.

" हैदरखान तुंगभद्रा उतरून चार मजली गेला. पट्टणास जाणार. पट्टणाचा राजा मृत्यु पावला याकरितां पट्टणांत कांहीं गडबड आहे. व महमदअल्ली व नायमार कांहीं राजकारणांत आहेत, व आमच्या फौजाही देशीं आल्या हें समजोन पट्टणास जातो " ह्मणोन लिहिलें तें कळलें. " कित्तूरकर हैदरखानाचे भेटीस गेला होता त्यास हैदरखानानें कैद केलें होतें. आतां खंडणीचा ठराव चार लक्षांवर करून त्यास बंकापुराम पाठविलें आहे. ऐवजाचा भरणा होईल तेव्हां सुटका होईल. येसाजी शिंदे याजकडील मजकूर तो करवीर क्षेत्रास उपद्रव देतो, ब्राह्मण नागविले व जिवाजी गोपाळ यांसी हाणमार करून मनम्ची रुपये मागतो " ह्मणोन आपण विस्तारें लिहिलें तीच पुरवणी उभयतांस दाखविली. पाहून फारच क्रोध आला. नाना तर मशारनिल्हेसाठीं फारच श्रमी जाले. ' ईश्वरकृपेंकरून येसाजी शिंदे याचें पारिपत्य मनोगताप्रमाणें होईल तेव्हां खरें ' ह्मणोन बोलिले. राजश्री जिवाजी भोंसले भवानरायाकडे सांपडले आहेत त्यांस इकडे पाठविण्याविषयीं पत्रें रवाना झालीं आहेत. जिवाजी गोपाळ याप्रमाणें त्यास करावें असें ह्मणतात. "

नं. १८७८. श्री. (२२ जुलई.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण शु॥ सप्तमी इंदुवासरे मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित

---

१ पत्र पांडुरंगरावास पुरंदराहून मिरजेस.

असे. विशेष. आपण राजश्री सुबरावआपाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. " रूजूच्या सनदा पाठविल्या त्या पावल्या. तूर्त घोडयांची मात्र सोय जाहली. पुढें बंदोबस्त करून देण्याविषयीं श्रीमंतांस अगत्य आहे. तुम्हींही साहित्य करावें " म्हणोन लिहिलें, त्यास मशारनिल्हे आले यांची व उभयतांची भेटी जाहली. सर्व भाव श्रवण केले. पुढें कर्तव्यार्थ किंचित् किंचित् बोलण्यांत आला आहे. दृढतर करून सविस्तर पाठवितों. राजश्री रामचंद्र नाईक व मदाशिवभट दात्ये आले. त्यांतील मुख्य भाव—पहिला अभाव नाइकास होता त्याजवरून पुण्यांतील वारासार करून कुटुंब देखील (रामचंद्र नाइकांनीं) तिकडे नेविलें. पुढें विचारें विचारें प्रघट करावें असें होतें. त्यास चिरंजिवानें व स्त्रीनें जलदी केली. वर्तमान कळल्यावर यांनीं रत्नागिरीकडे न जावयाचें कारण, भ्रांतीमुळें पुरंदरास येऊन कारभाऱ्यांच्या बोलण्यांतील आधार घेऊन जावें; तों तिकडील तोतयाचीं पत्रें कारभारी यांस आलीं तीं अनन्वित ! याजकारितां खालीं[2] जाऊन खातरजमा करून घ्यावी म्हणोन गेलों, तों त्यांनीं संगमेश्वरींच कैदेंत ठेविलें. कांहीं दिवसांनीं तोतयाजवळ गेले. स्त्रीचें व चिरंजिवाचें दर्शन दरोबस्त नाहीं. याणीं तेथील विचार पाहतां तोतयाचा खोटा प्रकार दिसोन आला. त्याजवरून चिरंजिवास भेद करावयास पाहत होते. त्याणीं स्पष्टवादें सांगितलें कीं, आम्ही तुम्हांस जाहलोंच नाहीं असें म्हणावें ! आम्ही म्हणतों कीं नाईक मेले ! स्त्रीचेंही भाषण तसेंच ! यांस कोठेंच थांग न लागे, महत्संकटांत पडले, उपाय नाहीं, यांसच अपाय करावा हें मानस चिरंजिवाचें यांस दिसोन आल्यावर हे युक्तीनें निकाल काढिला. राजश्री

---

१ हा तोतया नसून खरोखरीचा भाऊसाहेब आहे हें वर्तमान प्रसिद्ध करणार तों.
२ घांटखालीं—कोंकणांत.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

वासुदेवबावा वगैरे हशमी लोकांचे निदर्शनास लबाड असें आणून दिल्हें. त्याचें एक माणूस घेऊन आले आहेत, त्यांस येथून ल्याहावें, ह्याप्रमाणें बनल्या कैद करावा, नाहीं तरी जमेत फोडून मालाचा माल करावा, अशीं सूत्रें करून आले आहेत. या गोष्टी खऱ्या नच वाटाव्या, परंतु क्रिया नाईक करितात याजवरून व साक्षीस सदाशिव-भट होते त्याणीं शपथ वाहून सांगितलें त्याजवरून उभयतांस खरें भासलेंसें जाहलें आहे. नाईक स्त्रीचा घटस्फोट करणार असे तोंडानें म्हणतात, परिणामीं पहावें ! सारांश तेथील जे मिळाले आहेत त्यांस लबाड हें पुरतें समजलें. संशय राहिला नाहीं. नांवावरून सारे फसले. नाईक व भट वांईस आल्यावरी प्रायाश्चित घेऊन किल्ल्यास आले. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८७९. श्री. (२७ जुलई.)

पौ छ १ (?) जमादिलाखर. सुरूसन सब्बा मअैन मय्या व अलफ.

सेवशा शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ श्रावण शु० ११ मंदवासरे मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष आपण पत्रें छ ४ जमादिलाखरचीं पाठविलीं तीं काल प्रातःकाळीं पावोन लिहिला मजकूर समजला. व छ ५ जमादि-लाखरचीं पाठविलीं तीं काल संध्याकाळीं पावलीं व श्रीमंत राजश्री नानांच्या माणसाबरोबर पाठविलीं तीं काल दोनप्रहरीं किल्ल्यावर श्रीमंत राजश्री नानांनीं बोलावन आमचा लाखोटा दिल्हा व त्यांस आपण पत्रें पाठविलीं तीं आह्मांस वाचून पहावयासी दिल्हीं. आह्मीं

---

१ कारभाऱ्यांस. २ पत्र पांडुरंगरावास मिरजेस, यांत तिचें दिलीं आहेत. त्या ठिकाणीं मजकूर काढला आहे.

पाहिलीं. मनमळ्याचें प्रकार चांगलेच आपण लिहिले, त्यावरून नानास संतोष होऊन तारीफ केली कीं, ' शिपाईगिरीचें कसब जेथें, तेथें लिहिण्याचें कसब मनमळ्याचें उणें असतें. येथें सारीं कसबें पूर्ण आहेत ! ' आम्हीं उत्तर केलें, (आमचे यजमान) श्रीमंतांचे घरचे बारगीर. शिपायगिरीचें कसब दाली बांधल्यावर केल्याखेरीज परिणामच नाहीं ! सरदारीस लोकांचे पाठीवर असलेंच पाहिजे. मनमळा लिहिण्याचे प्रकार हे आपणापाशीं ! तत्राप सुचले प्रकार ते त्यांनीं लिहिले, ' म्हणोन परस्परें बोलणें जाहलें. लिहिण्यावरूनच फार संतोषी जाहले. श्रीमंतांचें पत्र मोघमच होतें तेंच राजश्री मखारामपंतबापूकडे पाठविलें, त्या पत्रांत हवाला आम्हावरच घालून आपण लिहिलें, त्याजवरून त्यांजकडे जाऊन आपण लिहिले प्रकार, व " निकडील तरतूद कोणें प्रकारची करतां, तोफा, फौज, खर्चाची बेजमी, समजोन घेऊन मिरजेस येणें, म्हणोन आज्ञा केली; ..... ममर्पक उभयतां बसोन बोलावें म्हणोन.....आम्हीं घेऊं. तेव्हां बोलिले कीं, राजश्री भिवराव तोफखान्याचे आणवितों. तोफांची तरतूद कशी करावयाची त्यांस सांगोन करवितों. फौजेचे वगैरे जाबसाल आहेत. आम्ही उभयतां एकत्र होऊन करून तुमची रवानगी पौर्णिमा जाहल्यावर द्वितीयेस करूं. म्हणोन मखाराम बापूनीं सांगितलें. तेणेंप्रमाणें श्रीमंत राजश्री नानास सांगोन खालीं आलों. पौर्णिमा ग्रहण मर्मापि आहे. ग्रहण कर जाहल्यी म्हणजे निघोन आपणाकडे येतों. पांच महा दिवस अवकाश आहे. तों जाबसालही करून घेतों. तोतयाकडील सामान महाडाकडून तळेघोंसाळ्याकडे आलें म्हणोन बातमी आली आहे. कोळ्यांस गांवखेडयांचे दांडगे मिळोन लुटावयासी मिळाले होते त्याप्रमाणें तोतयाजवळ मिळाले आहेत. पर्जन्याची उघड जाहल्याखेरीज यांची जरब त्यांजवर बसत नाहीं. कारण

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

पायींचें माणूस प्रतापगडाम जमा करितात, परंतु फौजेखेरीज पायींचें माणूस जाऊन झुंजेल ही गोष्ट अवघड. तत्राप पायींचें माणूस एकदम मिळणें काठिण. याजकरितां या वेळेपासून तरतूद करून जमाव करितात. त्या जमावांत फौज जावयाजोगा पर्जन्य उघडला ह्मणजे काट चालेल. तोंपावेतों तरतूद करितात. राजश्री रामचंद्र नाईक किल्येकांमी तेथें बोलोन चालोन आले होते, त्यांचीं माणसें बरोबर आणिलीं होतीं, त्यम येथील खुलासा त्याम लिहून पाठविला. अतःपर ते काय करितात किंवा कसें करितात पहावें ! नाईक आल्यापूर्वी भ्रम बहुतांस होता तो आतां गेला ! फारकरून भ्रांत गेली. आतां पारिपत्य होईल तेव्हां सर्वांची खातरजमा होईल. श्रीमंत सौ मातोश्री पार्वतीबाईस नाईकाचे स्त्रीनें निरोपीं शिरोपीं खातरजमा केली त्याजवरून किंचित् डावडोल तर जाहलींच; परंतु शहाणी बायको, याजकरितां फारसें लौकिकांत दाखविलें नाहीं. आतां नाईक आल्यावरी पुण्यास गेले. भ्रांति निवारण केली. त्याजवरून सर्वांची निर्भ्रांत जाहली. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेंतून अश्विनीकुमारास स्नानास येणार होते. स्वारी तयार असतां इंग्रजांनीं सांगोन पाठविलें कीं, बाहीर परिच्छिन्न जाऊं नये. दरवाज्याचा बंदोबस्त केला. बाहेर जाऊं दिलें नाहीं. त्याजवरून दादासाहेब फारच श्रमी होऊन आहेत. इंग्रजांस लिहून कलकत्त्याच्या वकिलांनीं पाठविलें कीं, कलकत्त्याचा हुकूम तुम्हांस आला कीं, श्रीमंतांस सुरतेस ठेवन घ्यावयास प्रयोजन नाहीं. काय समजोन पहिली जागा दिली ? असो. आतां त्यांस बाहीर करून देणें. त्याजवरून त्यांस लिहिलें. या वकिलांनीं येथें विनंति केली. यांणी सांगोन पत्रें लिहविलीं कीं, ज्याप्रों आहेत त्याप्रमाणें बंदोबस्तीनें सुरतेसच असों द्यावे. पुढें याविषयींची तरतूद करून लिहून पाठवूं त्याप्रमाणें करावें. येणेंप्रमाणें पत्रें पाठविलीं. श्रीमंतांनीं गंगा-

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

तीराम राहून इतलाख खर्चास घ्यावें येणेंप्रमाणें ठराव जाहला तरी उत्तम. नाहीं तरी फौजेची तरतूद होऊन गुजराथप्रांतीं फौज आपली गेली म्हणजे त्यांस मोडून द्यावें. आम्ही व ते समजोन घेऊं असें कारभारी म्हणतात. त्याम अवकाशही फार नाहीं. इंग्रजांनीं तह यांसी केला आहे तो अप्रामाणिक कधीं होणार नाहीं. असें श्रीमंत राजश्री रावमा हेबांच्या प्रतापावरून दिसतें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. १८८०. (२६ जुलई.)

शिवाजी बाबाजीचें पत्र पांडुरंगरावास मिरजेस...

पो छ २७ जमादिलावल मञ्चा सबैन.

" तोनयाच्या बंदोबस्तास राजश्री बजाबा पुरंदरे किंवा भिवराव पानशे यांस रवाना करणार. राजश्री हरबाअण्णास मिरज आदिकरून सरंजाम तोतयानें लिहून दिल्हा म्हणून सरकारांत वर्तमान आलें आहे. "

नं. १८८१. **श्री.** (श्रावण शु० ११-२७ जुलई.)

पो छ ३ जमादिलाखर सुरूसन सब्बा सबैन मय्या व अल्फ.

विज्ञापना. तोतयानें सुवर्णदुर्ग देखील घेतला. ज्या किल्लयाजवळ जातो ते हात जोडून उभे राहतात ! रायगडाकडे येणार होता तों राजश्री बळवंतराव कोलटकर भेटीकरितां पुढें जात होते. चार पांच कोस पुढें गेले तों तोतयाचें कूच होऊन चिपळोणाकडे गेला, याजकरितां मशारनिल्हे माघारें फिरोन आले. रायरी व प्रतापगड, त्या रोखें दोन किल्ले मात्र राहिले. वरकड त्यानें सारे किल्ले घेतले. परंतु आतां तोतया असा तेथील लोकांस भास होऊन गलबल जाहली आहे म्हणोन वर्तमान आहे. राजश्री रामचंद्र नाईक व राजश्री सदाशिवभट दाल्ये गेले होते त्यांची अवस्था आपण ऐकिलीच होती. प्रस्तुत त्याच

---

[1] पत्र पुरंदराहून शिवाजी बाबाजीचें मिरजेस पांडुरंगरावास.

रंगांत मिळाले, कामकाजांत होते, अशी बातमी येत होतीच. अलीकडे काय बहाणा केला न कळे. उभयतांही त्यांजपासून निरोप घेऊन प्रतापगडास आल्याचें पत्र आज मेणवलीस आलें. उदईक येथें येतील. आल्यावरी बारीक मोठे अर्थ समजण्यांत येतील. सविस्तर लिहून पाठवितों. पायींच्या माणसांची तरतूद होत आहे. राजश्री भिवराव पानसे रवाना होणार. तोतया चिपळोणाकडे गेला तो देवरुखाकडे जाऊन आंब्याघांटानें वर चढोन पन्हाळियास जाणार अशी बातमी आली आहे. याजकरितां राऊत व पायींचें माणूस तेथें पाठऊन चौकी चांगली बसवावी म्हणून आपणास सरकारांतून लिहून पाठविणार. नाईक आल्यावर अर्थ सर्व समजेल. राजश्री तुकोजी होळकर जेजुरीस आले. आज तिसरे प्रहरीं भेटी होणार. श्रीमंत स्वामी किल्ल्याखालीं येणार. राजश्री महादजी शिंदे नर्मदा उतरतात. ते श्रावणअखेरीस येऊन भेटी घेणार. आपण येणार त्यापक्षीं श्रावण मासींच येऊन निरोप श्रावण मासींच घ्यावा. पुढें अधिक मास येतो. शुद्ध भाद्रपदास म्हणावें तर दिवसगत लागते. याजकरितां श्रावण मासींच येऊन श्रावण मासींच निरोप घ्यावा हें युक्तच आहे. यांत आपली मर्जी. सुरतेकडील्ल कांहीं अधिकोत्तर वर्तमान नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

१८८२. **श्री.** (श्रावण शु० १३–२९ जुलई.)

पो छ १८ जमादिल्लाखर मन मबा सबैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंगराव स्वामी गोसावी यांसी—

सेवक आबाजीराव कृष्ण प्रतिनिधी. नमस्कार. विनंति उपरि येथील्ल कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. पेशजीं आपणाकडे पत्रें रवाना केलीं होतीं त्यांचीं उत्तरें आलीं त्या अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळोन येत नाहीं. असं

नसावें. सदैव पत्रीं संतोषावाप्ति करीत असावें. यानंतर कोंकणचें वर्तमान तरी रत्नागिरीस बंड होऊन विजयदुर्ग व अंजनवेली येथील मजकूर परस्पर ऐकण्यांत आलाच असेल. किल्ले खालीं जाहले. हल्लीं चिपळूण श्रीभार्गवराम येथें गोवलकोठांत मुकामास आहेत. बराबर जमाव पोक्तच आहे. पुढें सुवर्णदुर्गचे त्याचें राजकारणही जाहलें हेही बाजारआवाई आहे. राजश्री रामचंद्र नाईक व सदाशिवभट पुरंदराहून खालीं आले होते त्यांस चौकी देऊन तोतयानें अटकेंत राखिलें होतें. त्यांनीं युक्तीनें पुरंदरास जाणेचा निरोप घेऊन उभयतां निघोन गेले. मागें यांस कांहीं कृत्रिम आढळलें त्यावरून पाठलाग केला होता; परंतु झाडाझाड करून निघोन गेले. येणेंप्रमाणें निकडील मजकूर आहे. घांट आंबामाथा येथें त्यांकडील लोक चौकीस दीडशें आहेत व नळघाटीं साखरप्यांत हजार माणूस आहे. कोंकणचें वर्तमान पुरंदरास लिहून पाठविलें होतें. तेथून लिहून आलें जे, याविषयीं आपण उभयतांस लिहिलें[1] आहे. तरतूद बंदोबस्त ते करितील. त्यावरून आपणास लिहिलें आहे. त्यास दिवसेंदिवस त्याचा जेथ अधिक पडत चालला. सहजाची गोष्ट या अवस्थेस आली ! पुढें याचा विचार सत्वर व्हावा. दिनेमकावरी घालणें याचा अर्थ आपण सर्व जाणतात ! उत्तर सत्वर पाठविलें पाहिजे. राजश्री रामचंद्रपंत व कोन्हेरराव यांचा मुक्काम कोणे स्थळीं आहे हें लिहावें. रवाना छ १२ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें हें विनंति.

नं. १८८३.

(३१ जुलई.)

शिवाजी बाबाजीचें श्रावण वद्य १ बुधवासर मु.भिवंडीचें पत्र

" तोतयाकडील सामान तळें घोंसाळें इकडे आलें. माणकर त्यास जाऊन भेटले. मारांग किल्लेकरी वैगरे मागें जाऊन भेटतात. याचें

---

१ पांडुरंगराव व परशुरामभाऊ यांस. २ रामचंद्र गणेश व कोन्हेरराव त्रिचक.

कारण मातबर सामान नांवाचा माणूस घेऊन कोणी जात नाहीं. तोतया ज्याचें नांव कागदींपत्रीं लिहितो त्याच्या नांवाचा प्रताप याज-करितां हात जोडितात. आश्विनमासाखेरीज इकडून सामान जुळोन जाऊन तंबी पोंचणें होत नाहीं. आश्विनमासीं होईल तोंपावेतों कोठ-पावेतों किल्ले घेत येतो पहावें ! शिंदे ग्रहणाकरितां पेडगांवास येणार होते, आले असतील. सत्वरच भेटी होणार. होळकराकडील बोलणें चालणें ऐवजाविशीं होत आहे. राजश्री हरिपंततात्याकडील खमसची नालबंदी दोन महिन्यांत द्यावी. व रोजमरे तटले आहेत ते द्यावे. या-प्रमाणें ठराव होऊन रोजमऱ्याच्या वराता रसेदच्या ऐवजीं देऊन (शिलेदारांस) निरोप घरास जावयास देऊं लागले. तोड पडली. "

नं. १८८४. **श्री.** (श्रावण शु. १३–२९ जुलई.)

पौा छ १४ जमादिलाखर सुरूसन सबा सबैन मय्या व अलफ.

सेवेशीं विज्ञापना. राजश्री तुकोजी होळकर यांच्या भेटी जाह-ल्यानंतर तीन चार दिवस किल्लयावर गेलेच नव्हते. एक वेळ जाऊन जवाहीर वगैरे नजर करून आले होते. तदोत्तर दिवस चांगला पा-हून किल्यावर बोलावून उभयतां कारभारी व राजश्री हरिपंततात्या येणेंप्रमाणें खलबत करून खातरजमा करून इमान प्रमाण घेतलें. बोलण्याचालण्यांत कांहीं कसर राहिली नाहीं. भोजनाला किल्लयावर सरकारांत बोलाविलें. त्यांचे शें सवाशें खासे येणार, जागा पर्जन्य-काळची वाडयांत थोडी, यांजकरितां दोन दिवस सांगितले. एक दिवस पन्नास असामी घेऊन आले. दुसरे दिवशीं दुसरे राहिले खासे घेऊन आले. त्या वेळेस बोलणें चालणें जाहलें. त्यांजकडे सरकारचा ऐवज वाजवी येणें तो व अलीकडील कर्जपट्टीचा दहक वगैरे यावा येविषयींची यादी राजश्री नारो गणेश

---

१ पत्र शिवाजी बाबाजीचें पुरंदराहून पांडुरंगरावास मिरजेस.

व विष्णुपंतास समजाविली. बोलण्याचालण्यास प्रारंभ जाहला आहे. काय ठराव होतो पहावा. शिंदे नर्मदा उतरोन अहिल्याबाईची भेटी घेतली, तों वाफगांवाहून होळकर भेटीकरितां पुरंदरास आले ही बातमी जातांच लांब लांब मजली करून तापी उतरोन गंगेवर आले. श्रावण वद्यांत भेटी होतील. त्यांजबरोबर दोन हजार फौज आहे; परंतु निवडक माणूस आहे व कदम देशींच आहेत त्यांसही 'येणें' म्हणोन पत्रें आलीं आहेत. त्याचे ढंग जातीप्रमाणेंच आहेत ! तो आल्यापूर्वीच होळकरांचें नीट जाहलें, आतां गुंता नाहीं. समागमेंच आले असते तरी निखालसतेविषयीं चार दिवस हिसके देते. आतां पेंच पडावयाचा नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८८५. श्री. (अधिक भाद्र. शु. ७–२१ ऑग.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं:—

पोष्य येमाजीराम[1] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ छ ६ रजब सोमवार पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. हुंबळीस अमित्राची[2] फौज येऊन उतरली. धारवाडच्या किल्ल्यास शह बसला. उपराळा सरकारांतून न होय. नित्य त्यांची स्वारी चालून येऊन झुंजें होऊं लागलीं. किल्ल्यांतील लोकांस "उपराळा करितों. आज फौज येईल, उद्यां येती." याप्रमाणें लटिकें लिहितां सीमा जाहली. लोकांत धीर राहणार नाहीं. एखादा दगा होईल; ह्मणोन चिरंजीव त्रिंबकराव अण्णांस पाठविल्यानें लोकांस हिंमत होईल. ह्मणोन चिरंजीवास आणवून पंथकसुद्धां[3] धारवाडास जावयास रवाना केलें. तेथून हुबळीस गेले तों वर्तमान अमित्राचे

---

१ धारवाडचा सुभेदार. उपनाम जोशी हुपरीकर. २ हैदरअल्लीची. ३ धारवाडकरांचें पथक चारशें स्वारांचें होतें.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

कारभारी यांस कळोन ते फौजसुद्धां येऊन मार्गीं अमिनभावीजवळ उतरले. रेटून जावें तरी त्यांचें सामान भारी; यांचें सामान थोडकें. निभावणी होणार नाहीं. याजकरितां अमिनभावीवरून जायचें राहिलें. हुबळीसच रहावें तरी जागा परिणामाची नाहीं. फौजसुद्धां तेथें राहिल्यास ठीक नव्हे, ह्मणुन नरगुंदास गेले. अमिनभावीस त्याची फौज आली होती ती निघोन हुबळीस गेली. नरगुंदाहून धारवाडास जावयाकरितां अगोदर धारवाडकरांसच पत्र पाठऊन तेथील स्वार प्यादे यांस आणवून ते व आपण किल्ल्यास मिळोन जावें या सुमारांत हात. तंव सावनुराहून कितूरकर देसाई याची सुटका होऊन तो हुबळीस आला. अमित्राची फौज कांहीं शिरहट्टी लक्ष्मेश्वर प्रांतीं होती ते व बंकापुराजवळ होती ते ऐसी एकत्र हुबळीस दोन अडीच हजार जमा जाहली व प्यादे दोन तीन हजार व तीन तोफा बंकापुराहून आणविल्या. ही बातमी आली. ते भारी सामान करून धारवाडावर हालचाल करणार तेव्हां आपलें सामान थोडकें असतां जाऊन गुंतूं नये म्हणून नरगुंदाहून शनवारचे रात्रीस शंभरपावेतों निवडक स्वार करून धारवाडास पाठविगार, आपण दोन अडीचशेंनिशीं नरगुंदीं राहिले, तों अमित्राची फौज प्यादे जमावसुद्धां चिंरजीवांवर येऊन छापा घालावा याप्रमाणें सिद्धांत करून हुबळीहून रविवारीं रातवा खपून आले. पायींचे माणसाची निभावणी न होय, मजल लांब, याजकरितां थकून हेबाळाजवळ राहिले. स्वारांपैकीं हजार दीड हजार स्वार निवडक करून हेबाळाहून निघाले तों सूर्योदय जाहला. तास दिवसास इंदुवारीं नरगुंदाहून अर्धे कोसांवर आले. प्रातःकाळींच बातमीही आली, मागोमाग त्याची फौजही येऊन नजीक दाखल जाहली, तेव्हां दोन अडीचशांनिशीं चिरंजीव पुढें गेले. परस्पर झुंज जाहलें. वीस पंचवीस माणूस आह्माकडील जखमी जाहलें. अमित्राकडील फौजेनें नीट

चालून घेतलें. चिरंजीवाकडील सामान थोडकें, तेव्हां त्यांचा नेट न लोसतां गांवच्या आश्रयास हे जाऊन उभे राहिले. नरगुंदचे स्वार व ध्यादे त्यासमयीं येऊन मिळाले नाहींत ! हे गांवच्या आश्रयास येतांच ते जाऊन गोटावर पडले. गोट लुटून घेऊन फिरून हेबाळचे मुकामास गेले. मागाहून नरगुंदकर व हे जमोन पाठीवर गेले. परंतु गांठ पडली नाहीं. याप्रमाणें ते शेर जाहले. आतां धारवाडावर बेश कपणें जागार. गुंता दिमत नाहीं. यंदां पर्जन्य अतिशय होऊन धारवाड किल्ल्याचे दक्षिणेकडील तट शें दीडशें हात पडला व एक दोन बुरूज चिरले आहेत. उपराळा करावा म्हणोन आम्हीं सरकारांत व या प्रांतीं आपणास व सरकारचे मातबर सरदार आहेत त्यां सर्व-त्रांस पत्रें लिहित गेलों. उपराळा होत नाहीं ! प्रस्तुत राजश्री राम-चंद्रपंत[1] तात्या व कोन्हेरराव[2] व कृष्णराव[3] यांस तरी दोन तीन हजार फौजेनिशीं जलदीनें एकत्र करून पाठविल्यास लोकांत अवमान राहील. हें ज्या पक्षीं नाहीं, तेव्हां पुढील किल्ल्याचा परिणाम कळतच आहे ! आपणास सरकारचे कामाचें अगत्य जाणोन विनंति सविस्तर वर्तमान कळवावें म्हणोन लिहीत आहें. ध्यानांत आणून लौकर उपराळा जा. हल्याम परिणाम आहे. मर्जीस येईल तसें करावें. आमचे हातन धांवत होई तेवढी करीत आलों. अतःपर नाइलाजाची गोष्ट बनली आहे. ईश्वरइच्छेनें व श्रीमंतांचे पुण्यप्रतापानें करून होणें तें होईल. सारांश वरचेवर तरतूद पाहिजे तैसी करावयाची होती. अगाध नव्हतें. परंतु एक तत्वाचे पेंचांत आलों. कर्ज मिळत नाहीं याजमुळें नाइलाज जाहला आहे. लवकर उपराळा जाहलिया जागीं जतन होईल. नाहीं तरी होणेचें संकट आहे. कोंकणांतील तोतयाकडील कागदपत्र पाठ-विले तें कळलें. भरंवसा कोणाचा नाहींसा जाहला आहे यास्तव

---

१ रामचंद्र गणेश कानडे. २ पटवर्धन कुरुंदवाडकर. ३ पानशे. ४ पैक्याचे. ५ धारवाडचा किल्ला.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

जलदीस मोल आहे. उत्तराचा मार्ग पहात आहों. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंति.

श्री.

नं. १८८६. (अधिक भाद्रपद शु० १४-२८ ऑगस्ट.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री शिवाजीपंत स्वामीचे सेवेशीं. पोष्य बाळोजी[1] जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष तुह्मी पत्र छ ५ रजबचें पाठविलें तें पावलें. " आज्ञेप्रमाणें उभयतांस तरतुदेचे व मनसब्याचे प्रकार व बारीकमोठे भाव सविस्तर श्रवण केले. घराऊ विचार पाहतां सरकाराप्रमाणें येथील ही ओढ आहे त्याचा विस्तार कोठवर त्यांहावा ? येथें आल्यावर बोलणें जाहल्यानंतर पागेचे तयारीचें काम चालीस लागलें. लोकांस पत्रें पाठविलीं. मागील फडशा लोकांचा केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, याजकारितां मागील फडशा जाहला ह्मणजे पुढील बोलण्यास ठीक पडेल. राजश्री भाऊचे मातुश्रीस समाधान नाहीं ह्मणोन ते तासगांवास गेले. चार दिवसांत येणार. राजश्री कोन्हेरराव व कृष्णराव चिकोडीस आहेत. व रामचंद्र गणेश कुडचीवरून कूच करून चिकोडीचे समारें तीन कोश गेले. तफावत फारशी नाहीं. चिमणाजीपंतांचीं पत्रें आम्हांस येतात व आमचीं त्यांस जातात. त्रिवर्ग एकत्र होऊन एक विचारें जाहल्याशिवाय शत्रूवर दाब बसत नाहीं. याजकारितां आह्मी आजच निकडेस गेलों. त्रिवर्गास एकत्र करून मिरजेस येतों व भाऊही येतात. पुढील कर्तव्याचा विचार ठरवून सत्वरच पुरंदरास येतों. यजमानांचा प्रकार पहिल्यापासून वडील मनसबे करीत आले तेच करावे. मनसब्यास किंचितही उणें नाहीं. खर्चाची तरतूद सरकारांतून जाहली

---

१ नाना फडनवीस.

ह्मणजे तरतुदेस अनमान नाहीं. हैदरखानाची फौज धारवाडावर स्वाऱ्याशिकाऱ्या करीत असते. करवीराजवळ पांच सातशें राऊत आहेत. आमची फौज प्रांतांत आलियावर पन्हाळा किल्ल्यावर बसावें-हा त्यांचा मनसबा आहे ! जिवाजी[1] गोपाळ यांस निकड करून त्याज कडून लाख रूपये कबूल केले " म्हणोन लिहिलें तें कळलें, त्याम तुम्हीं गेल्यावर पत्र फारां दिवसांनीं पाठविलें तें असो. फौजेस पत्रें पाठविलीं म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. लौकर फौज जमा करावी म्हणजे मनसब्यास उपयोगी पडेल. राजश्री भाऊचे मातुश्रीचें वर्तमान आरोग्यतेचें लिहून पाठवावें. त्रिवर्गांत एकत्र केल्याखेरीज शत्रूवर दाब पडत नाहीं म्हणोन लिहिलें. त्याम त्रिवर्ग एकत्र जाहल्यास उत्तम. न होय तर राजश्री भाऊची व रामचंद्र गणेश यांची एकवाक्यता करून देऊन कोल्हापूरचा कारभार कळेल तैसा विल्हे लावावा यांतच बरें. चहूंकडे खुळे कामाचीं नाहींत ! मातबर मसलत होत नाहीं. याच अन्वयें राजश्री सखारामपंतांनीं व आम्हीं भाऊस व रामचंद्र-पंतास चिठ्या पाठविल्या आहेत. रामचंद्रपंतास भाऊचे लक्षाप्रों चिमणाजीपंत चालवितील. गुंता पडों देणार नाहींत. त्यांणीं त्यांचें महत्त्व राखोन हें काम करावें. कोल्हापूरकरांचींही दोन तीन पत्रें येथें आलीं होतीं त्यांचीं उत्तरें " भाऊस व रामचंद्रपंतांस आज्ञा करणें ती करावी " म्हणोन पाठविलीं; तेव्हां ते तह करितीलच. ऐवजाची ओढ लिहिली, तर येथीलही विचार तुम्हांस समजलाच आहे. त्यांणा[2] मनसबा करावा सवरावा या गोष्टीचा संतोष आम्हांस फार आहे. तेही करितीलच. इकडील सविस्तर वर्तमान खास दस्तुरें

---

१ लढाईंत जिवाजी गोपाळ करवीरकराकडे पाडाव सांपडला होता त्यास तसदी देऊन त्याजकडून त्यांनीं लाख रुपये देण्याचें कबूल करविलें. २ पांडुरंगराव गोविंद यांणीं कर्नाटकचे स्वारीचा.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

लिहून राजश्री भाऊस पाठविलें आहे त्यावरून त्यांस कळेल. रवाना छ १३ रजब. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

नं. १८८७. श्री. (१९ जानेवारी)

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामी वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें रामाजी नारायण गोखले, साष्टांग नमस्कार विज्ञापना ता पौष वद्य त्रयोदशी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आम्ही पंधरा दिवशीं दीड महिन्याचें मासिक जाहलें म्हणजे येतों. बावडा घाट व अणस्कुरेचा घाट पडला. गोपाळजी आंग्रे यानें धामधूम फार मांडिली आहे. समुद्रांतील धामधूम सांप्रत वारली. इंग्रजाचे चार पाल व चाळीस गलबतें देवगड विजयदुर्गचे नस्तावरी दोन कोसांचे तफावतीनें आठ दिवस होते. वारासुद्धां न लागे. उतराण वारा, मुंबईकडे जाणें न होय. यास्तव दुर्गानजीक आठ दिवस होते. त्यामुळें सर्व कोंकणपट्टी गडबडली. दाणादुणा मातीआड केला. समुद्रतीरचे लोक कोणी कोणी पळोन वैलाटीस आले. इतक्यांत वारा चांगला टोपीकरांस लागतांच तो मुंबईस गेला. धुळप सारे आरमारसुद्धां सवंनदुर्गचे बारेवरी नांगरवाडीस आहेत. आठ पंधरा दिवशीं सामान पोटगीचें न्यावयासी विजयदुर्गास एक गुराबी पाठवितात. टोपकिर अंगावरून मुंबईस वलावा घेऊन गेला. त्याचें धुळपांनीं कांहीं केलें नाहीं. पळोन खाडींत गेले ! सवंदुर्गकरी यांणीं चारपांच गलबतें नेऊन त्याचा खटारा एक धरून आणिला. याप्रमाणें वर्तमान. सावंत जमाव करून कोंकणपट्टी मारणार म्हणोन आवाई तें सर्व लटकें ! तो कांहीं येत नाहीं, व जमावही सावंत यांणें केला नाहीं. आम्ही सत्वरच येतों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विज्ञापना.

---

१ हें श० १६९७ मधलें पत्र चुकून राहिलें तें येथें घातलें आहे. २ सवनदुर्ग हा कोणता किल्ला ? सुवर्णदुर्ग तर खचित नव्हे, कारण तेथें आरमार लपून बसण्याजोगी खाडी नाहीं.

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

नं. १८८८. श्री. (श्रावण शु. ८–२४ जुलई.)

पोतापैकीं सुमा शीत सबैन मय्या व अल्लफ इमारतखर्च मजुरी देणें. घिसाडयास दिवाणखान्याचे कामास लोखंडकाम करविलें. लोखंड वजन पक्कें ८१८८॥ दरमणीं २ रूपये प्रमाणें रूपये २८६ दोन रूपये सहा आणे देणें. छ० ७ जमादिलाखर.

न. १८८९ (भाद्र० शु० ६–१९ सप्टेंबर.)

शिवाजी बाबाजीचें ५ मावान भृगुवासरचें भिवंडाहून पत्र–

" राजश्री महादजी शिंदे यांच्या व श्रीमंतांच्या भेटी भाद्रपद शुद्ध ३ स जाहल्या. श्रीमंत राजश्री नाना पंचमीस पुण्याहून निघोन आले. कोडिनानजीक शिंदेही आले. उभयतांच्या भेटी जाहल्या. ते कुंभारवळणाजवळ मुक्कामास गेले. नाना किल्ल्यावर गेले. आमची व उभयतांची भेट जाली. बोलणेंचालणें जालें. आम्हांसी बोलले व लिहावयासी सांगितलें कीं, " पंचमीचा मुहूर्त (तुम्हीं) पाहिला होता तो राहिला. आतां भाद्रपद शुद्ध ११ पासून १३ पर्यंत मुहूर्त सांपडेल त्यांत बाहेर निघावें. आपण कृष्णा दक्षिणतीरास गेलां म्हणजे इभ्रत चांगलीच पडेल. " तोतयाकडील मजकूर तर खामा (तोतया) हरिहरेश्वराजवळ आहे. दौलतगीर व घाटगा जमावसुद्धां कल्याण प्रांताकडे आले आहेत. राजश्री विसाजी केशव कल्याणाकडे होते ते निघोन राजश्री भिवराव पानशे याजवळ येऊन पावल. भिवराव यांजवळ जमाव पाईचे दोन हजार माणूस व राऊत सात आठशें आहेत. राजश्री होळकर व शिंदे यांची फौज (पानशे यांच्या कुमकेस) नेमिली आहे. त्यांजकडील सरदार बाहेर राहून जमा होऊन जातां आठां दिवसांत त्यांस जाऊन सामील व्हावें येणेंप्रमाणें आहे. वरकड पागा व पथकें नेमिले आहेंत त्यांस निकड करितात. चार हजार फौज जमा झाली म्हणजे पानशांनीं घांटाखालीं उतरावें म्हणून

येथील आज्ञा आहे. तोतयाच्या चौक्या बोरघांटापर्यंत आल्या आहेत. फौज खालीं उतरली म्हणजे जिकडील तिकडे विघरतील ! श्रीमंत राजश्री दादासाहेब तोतयास भेटणार म्हणोन बोलवा आहे, परंतु भेटत नाहींत. " श्री.

नं. १८९०. (अधिक भाद्र० वद्य–सप्तंबर प० पंधरवडा.)

सेवेशीं विज्ञापना. श्रीमंत राजेश्री दादासाहेब स्नानाचें निमित्त करून सुरतेंतून बाहेर निघाले. तोफखाना व हत्ती सलतनत फार करून सुरतेंत राहिली. तोतयाच्या सूत्रावर व फिरंगी यांच्या राजकारणावर निघाले; त्यास फिरंगी यांजकडील वकील येथें आहेच. यासी बोलून चालून नीट करून पत्रें फिरंगी यांकडे पाठविलीं त्यांचीं उत्तरें आलीं. " आसरा देऊं नये व तरांडयांत जलमार्गें हैदरखान अथवा हर कोठें पोंहचवूं नये; " येणेंप्रमाणें ठराव जाहला. दादासाहेबांस तोतयाकडील तर विश्वास पुरणार नाहीं. बारीक बारीक शोधही त्यांणीं केला. त्यास त्यानें गड कोट किल्ले घेतले तेव्हां बिंब खरें असेल, पहिला आलेला तो पाहिलाच, परंतु त्याम पुढें करून खरा दुसरा असेल, असा भास होत होता. तो त्यांचा संशय निवारण जाहल्यावर त्यास भेटूं नये येणेंप्रमाणें ठरलें आहे. दंवणें अलीकडे सरकार तालुक्याचे सरदेस हल्लीं श्रीमंत आहेत. एक दुसरें ठाणें सरकारचें त्यांनीं घेतलें. राजश्री गणेशपंत व अंताजी नागेश त्यांच्या पाठीवर गेले आहेत. गांठ पडल्याचें वर्तमान आलें नाहीं. मागाहून वर्तमान येईल तें लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नंबर १८९१. **श्रीगणराज.** (भाद्र० शु० ४-१७ सप्टंबर.)

तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव वडिलांचे सेवेशीं:—

अपत्यें पांडुरंगराव गोविंद सां नमस्कार विनंती तागायत छ ३

---

१ शिवाजी बाबाजीचें पत्र पांडुरंगरावांस. २ पोर्च्युगीज लोकांचें ठाणें दमण यासच पुर्वी दवणें हें नांव होतें. ३ बेहरे.

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

साबान जाणोन सदैव आशीर्वाद पत्र पाठवीत जावें. विशेष... रा. येसाजीपंत आपास पुरंदराहून पत्र आलें, त्याची नक्कल पावली. मजकूरही समजला. रा. येसाजीपंत आपाचीं निकडीचीं पत्रें येतात व गोकाक परगणेची खराबी होत आहे म्हणोन लिहिला भाव सर्व कळला. कूच करून जाऊन घटप्रभा उत्तरतीरास राहतों, आपण सत्वर कृष्णा दक्षिणतीरास यावें म्हणोन लिहिलें तें कळलें. आम्ही उदईक बुधवारीं डेरे दाखल होऊन सत्वरच येतों. याउपरी विलंब लागावयाचा नाहीं. रा. कृष्णराव पानशे यांचेंही पत्र पावलें. उत्तर पाठविलें आहे. फौज मिळाली पाहिजे. ती॥ रा॥ भाऊही उदईकच निघणार. तोतया व इचलकरंजीकर व करवीरकर सर्वांचें मानस इकडेच मिरजेनजीक मसलत पाडावी असें आहे. बाबूराव त्यांत पूर्णपणें आहेत. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. १८९२. श्री. (२१ सप्टंबर.)

पौां छ ११ साबान सुरूसन सबा सबैन मय्या व अल्फ.

सेवेशीं शिवाजी बाबाजी विज्ञापना तागायत भाद्रपद शु० ८ मंदवासरे मुक्काम भिंवडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. राजश्री भिवराव पानशे यांजजवळ फौजेचा जथ बराच जाहला. भाद्रपद शुद्ध त्रयोदशीस घांट उतरोन खालीं जातात. तोतयाकडील बातमी–फौज खालीं उतरतांच एक वेळ आमच्यानें खटपट करून पहावी. नाहीं तरी रत्नागिरीकडे जावें असा एक विचार. दुसरा, आंबाघांट चढोन पन्हाळ्याकडे जावें, असा आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस दवणेकर फिरंगी यांणीं सांगितलें कीं, खामा वीस पंचवीस माणसें व नाटकशाळासुद्धां किल्ल्यांत रहाल तरी जागा करून देऊं. वरकड बाहेर रहावें. जल-

---

१ बाबूराव दादाजी बागवाडीचा ठाणेदार. २ पत्र पांडुरंगरावास मिरजेस.

मार्गें पोहोंचविणें आपल्या हातून होत नाहीं. स्पष्ट जाबसाल जाहल्यावर आसपास होते. काल बातमी आली जे माघारे फिरोन सुरतेचा रोख धरोन एक कूच केलें. धारेस राजश्री खंडेराव त्रिंबक यांणीं मोर्चे लाविले आहेत. एक वेळ मोर्चांवर भिल्लांनीं गडबड फारच केली. श्रीमंत माघारे फिरोन तिकडे जातील तर न कळे ! तिकडे गणेशपंत व चांगोजी कदम, अंताजी नागेश मिळोन चार हजार आहेत. गांठ घालावयासी चुकणार नाहींत. राजश्री भिवराव यांस होळकर व शिंदे यांजकडील फौज तीन हजार मिळाली. राजश्री माधवराव नीलकंठ यांचें पथक मिळोन पागा एक दुसरी मिळाली. पांच हजार जमा जाहले. शिवाय पायींचे माणूस विसाजी केशव व अंताजीपंत फणसे व बापूजी शिंदे पाडाव गेले नाहींत. त्यांसुद्धां पांच हजार पायींचे माणूस. येणेंप्रमाणें दहा हजार जमेत जाहली. आपणाकडील हजार फौज तिकडे नेमिली आहे ती गेली नाहीं याजकरितां मोठे रागें भरोन मरंजामाची जप्ती करितों म्हणोन वृद्ध अत्याग्रहास प्रवर्तले आहेत, इतकियांत फौज गेली तरी उत्तमच आहे. आपणास सरकारचें पत्र पंतप्रधानांचें गेलेंच आहे, व काल आम्हांस बोलावून सांगितलें कीं, " प्रस्तुत दोन शह धारवाडाकडील व आंब्या घाटाचा. त्यास हजार फौज आंब्या घाटास पाठवावी. शिराळेंकर[2] व थोरात फौज जाईल त्यांस सामील होतील. तें तोंड जरूर राखिलें पाहिजे. इकडून फौज खालीं उतरतांच तिकडे तोतयाचे लोक तोंड करितील याजकारितां मलकापुरास सामान जयलें आहे त्याचें पारिपत्य करावें. आणि घांटावर चौकी बसवावी म्हणजे बंदोबस्त जाहला. तिकडील भार सर्व आपणांवर. तिकडे तिघे सरदार आहेत व आपण ज्यास जें काम सांगाल तें मान्य

---

१ भोंसले. २ वाळवेकर.

करितील. त्यांसही पत्रें गेलींच आहेत. राजश्री पांडुरंगराव व राजश्री परशुरामपंत सांगतील त्याप्रमाणें करावें, अमान्य केल्यास परिच्छिन्न कामास येणार नाहीं, याप्रमाणें पत्रें गेलीं आहेत. तोतयाचें पारिपत्य होतांच कर्नाटकची रवानगी मातबर करावी. तोंपावेतो हुजुरातीची समजावीस होत आहे. तूर्त मनोळीच्या सुमारें कांहीं फौज जावी. आंब्या घाटाचा बंदोबस्त करावा. आपण गोकाकच्या आसपास रहावें. येणेंप्रमाणें जरूर जाहलें पाहिजे. ज्यास आपण सांगाल ते मान्य करितील. आपण त्रयोदशीस खामखां निघावें. अतःपर आळस जाहल्यानें मनसबा नासतो. सर्वांनीं सांगितल्याअन्वयें थोडें थोडें केलें असें होतें. आपण न केलें असें होऊं नये. सर्व मनसबे कर्तव्य त्यांस समजतच आहेत. उपयोगी तोच प्रकार करितील. तुम्ही आम्ही बोलिल्याप्रमाणें लिहून पाठवावें." येणेंप्रमाणें सांगितलें आहे. समय प्रसंग संभाळावयाचा हाच आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८९३. श्री. (२४ सप्टंबर.)

पै॥ छ १३ साबान सुरुसन सब्बां सबैन मय्या व अल्फ.

सेवेशीं शिवोजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापनां ता॥ भाद्रपद शुद्ध एकादशी इंदुवासरे मुकाम भिंवडी वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष तोतयाचें बंड फार बळावलें. सूत्रें बहुतांचीं तिकडे लागलीं आहेत. करवीरकरांचें सूत्र तिकडे आहे. हैदरखानाचें सूत्र करवीरकरांकडे आहे, तिकडूनच तोतयाकडे आहे. राजश्री व्यंकटराव घोरपडे त्यांजकडे कोंकणांत गेले. वरकडही किरकोळी शिलेदार गेले असतील. तिकडील बंदोबस्त जाहला पाहिजे. राजश्री भिवराव खालीं

---

१ पत्र पुरंदराहून मिरजेस पांडुरंगरावांस.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

उतरतांच तोतयाचा रोख आंब्याघाटाकडे होऊन करवीरकर व ते एक होणार. याजकारितां घांटाचा बंदोबस्त व धारवाडाकडील तूर्त उपराळा जाहला पाहिजे. कर्नाटकची मोठी मसलत करणें त्यास नबाबाकडील मातबर सामान अथवा खाशानें यावें, येणेंप्रमाणें ठराव कागदपत्रीं जाहला. नबाब आल्यास मोठीच मसलत, त्यापक्षीं राजश्री हरीपंततात्याची रवानगी कर्नाटकांत करावी असा मनसबा बोलण्यांत आला आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेकडे गेल्याची बातमी आली आहे. त्यांपुरती तिकडे फौजही आहे. व आणखी रवानगी करणार. आंब्या घांटाकडील तोंड राखोन तोतया तिकडे येतोसा जाहल्यास आपली फौज इकडून व तिकडून राजश्री भिवराव ह्मणजे त्यास जाण्यास वाट नाहीं. आपण कर्नाटकचे बंदोबस्तास जाणें त्यापक्षीं सामान भारी पाहिजे. येथील पथकें पाठवावयाचीं त्यांस आजच रवाना करावें तेव्हां पैका दिला पाहिजे. सरकारांत पैक्याची ओढ. होळकर येऊन फार दिवस जाहले. शिंदे अलीकडे आले. दोघांकडील अद्यापि कांहीं ठराव नाहीं. इंग्रजांस सहा लक्ष रूपये श्रावणमासीं द्यावे त्यास ठिकाण नाहीं. याजकरितां राजश्री हरिपंततात्या बाहेर निघाल्यावर साऱ्यांची तोड पडेल तेव्हां रवानगीस सोय पडेल. आजच ज्यास रवाना करावें त्यास मागील फडशा केला पाहिजे. पुढें पोटाची बेगमी पाहिजे. याजकरितां राजश्री हरिपंततात्या बाहेर निघाल्याखेरीज पथक्यांची तोड पडत नाहीं. आपण लिहिल्याअन्वयें कुमार तितके तिकडे नेमावेसें ठरलें. राजश्री हरिपंततात्याचें निघणें नव्याण्णव वांटयांनीं कर्नाटकांत होत आहे. न जाहल्यास पथकें भारी सामान आपणाकडे रवाना करावें असें ठरलें आहे. राजश्री रामचंद्र गणेश यांसी माघारें आणवावें. प्रस्तुत राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री कृष्णराव व को-

---

१ चक्केडेखोर.

न्हेरराव यांसी आंब्याघाटाकडे पाठवावें तरी त्यांत बारीक पाहतां ठीक नाहीं. याजकरितां त्रिवर्ग व राजश्री शिवराम घोरपडे व नरगुंदे[1] व राजश्री दौलतराव[2] यांचें पथक व धारवाडकरांचे येणेंप्रमाणें मिळोन धारवाडाकडील वगैरे बंदोवस्त कालानुसार होईल तसाही करावा. इतक्यांत तोतयाचें पारिपत्य जाहलें म्हणजे करवीरकरही कसाही सल्ला करितात, म्हणजे कर्नाटकांत जावयास ठीक, तोंपावेतों कुरुंदवाडच्या आसपास अथवा आपल्या विचारें होईल तेथें हजार राऊत करवीरच्या शहावर म्हणोन ठेवावे. वरकड आपली फौज झाडून घेऊन मलकापुरास जावें. तिकडे जातील त्यांचें पारिपत्य व गेले असतील त्यांचें ठिकाणें लाऊन घरेंदारें लुटावीं. पायींचे माणूस हजार दोन हजार झाडीच्या कामास पाहिजेत, त्यास गाडदी व कानडे माणस दोन हजार ठेवावे, त्यास ऐवज पाहिजे त्यासी सोय अलाहिदा पत्रीं लिहिली आहे त्याअन्वयें करून घ्यावी. आणि शिराळें याचे सुमारें कृष्णा उतरावयाची सोय चांगली दिसते. याप्रमाणें उभयतांनीं व राजश्री हरिपंततात्यांनीं मनसबा ठरवून सांगोन पत्रें लिहिलीं आहेत. विशाळगडकर यांचा कारकून येथें आला होता त्यास आपणाकडे हुजरे समागमें देऊन पाठविले आहेत. पांच सहा दिवसांत आपणाकडे येऊन पावतील. त्यांजकडील पांचशें पायींचे माणूस आपणाजवळ यावें, येणेंप्रमाणें कारकून मान्य करून आपणाकडे रवाना केले आहेत. सांडणीस्वार त्वरेनें पावेल. कारकून एक दोन दिवसांत मागाहून येऊन पावेल. आपण त्रयोदशीस बाहेर निघालांच असाल. अतःपर एक घडी वर्षाप्रमाणें असें चित्तांत आणून फार फार जलदी करून मलकापूरच्या सुमारें जाऊन पोहोंचलों अशीं पत्रें यावींतच यावीं. यांस चांगलें वाटेल. आजपावेतों आळस न होता तर घोरपडे[3] वगैरे तिकडे न जाते.

---

१ भावे, नरगुंदकर. २ घोरपडे गजेंद्रगडकर. ३ इचलकरंजीकर, तोतयाकडे.

असो. अतःपर तरी फार फार त्वरा करावी. आपण आंब्या घाटाकडे गेल्यास फारच उपयोग पडतो असा सिद्धांत त्रिवर्गांनीं करून याप्रमाणें मनसबा केला. राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री कोन्हेरराव्जी यांजकडील वगैरे पत्रें तेथें पावतांच आपण त्वरेनें त्यांजकडे पावतीं करावीं आणि आपण कूच करून मलकापुराकडे गेलों म्हणोन पत्रांचीं उत्तरें द्यावीं आणि सांडणीस्वार रवाना इकडे करावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८९४. श्री. (भाद्रपद शु. १५–२७ सप्टंबर.)

विज्ञापना.[1] आम्ही काल पुण्याहून आलों. परवां संध्याकाळीं जाहलें वर्तमान शिंदे दोन प्रहरीं भोजनास किल्ल्यावरी आले ते चार घटका रात्रपावेतों किल्ल्यावरच होते. बोलून चालून खालीं गेले. सखाराम हरीस श्रीमंतांचीं पत्रें आलीं होतीं त्यांचीं उत्तरें लेहून दिल्हीं. त्यांत फितवा फौजेंत केल्याचा व फौज नवी ठेवितों असे व कित्येक प्रकार लिहिले तें पत्र सांपडलें. त्याजवरून मशारनिल्हेस किल्ल्यावरी बोलावून आणिलें. 'श्रीमंताचें पत्र आलें होतें कीं काय' म्हणून पुसिलें. त्यांनीं 'पत्र आलें' म्हणून सांगितलें. 'उत्तर काय दिलेंत ?' 'उत्तर दिलें नाहीं' म्हणून सांगितलें. तेव्हां पत्र त्यांच्या हातचें दाखविलें. हें कोणीं लिहिलें ? तेव्हां जाब काय करितात ! तेच समयीं बेडी घातली. गोट त्याचा खालीं होता तेथें चौक्या पाठविल्या. पुतण्या खालीं होता तो धरून आणून कैद केला. बाबूराव हरीकडील माणसें धरावयासी जनार्दन राम वगैरे सात आठशें राऊत मावळांत गेले आहेत. आणखी कोण कोण फितव्यांत आहेत नकळे. शोध करितात. ठिकाण लागल्यास पारिपत्य करितील. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. किल्ल्यावरी बोलावूं आलें आहे याजकरितां तांत-

---

१ शिवाजीपंतांचें पांडुरंगरावास पत्र भिरजेस.

डींनें किल्ल्यावरी गेलों. आपण सहस्र पत्रांच्या जागां हें पत्र मानून त्वरा करून आंब्या घांटास जावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८९५ श्री. (२७ सप्टंबर.)

सेवेशीं[1] शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत भाद्रपद शु॥ पौर्णिमा भृगुवासरे मुकाम भिंवडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आम्ही पुण्याहून काल आलों. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. आम्ही पुण्यास गेल्यावरी श्रीमंत राजश्री नानास सविस्तर सांगितलें. श्रीमंत रा० नाना पुरंदरास आल्यानंतर सविस्तर मजकूर आपणास लिहून पाठविला, व आंब्या-घाटाकडे फार त्वरा होऊन गेलें पाहिजे, येविषयीं सांडणीस्वार रवाना जाहला तो पावलाच असेल. आपण निघोन गेलां असल्यास उत्तमच जाहलें. नसल्यास पितृपक्षही न म्हणतां बाहेर निघोन लांब मजली करून जावें. सांडणीस्वाराबरोबरच्या पत्रांच्या उत्तरांत आपण न गेल्याचा प्रकार लिहून आला तर उभयतांस[2] फारच विषाद येईल. आम्हाजवळ एक दोन वेळां रागें भरले कीं, " आह्मी श्रावण मासा-पासून आंब्याघांटास हजार फौज व पायींचे माणूस पाठवावें म्हणून लिहीत आलों. दर पत्रीं असें लिहीत असतां वर्षाचा कार्तिकमास आला असतां कांहींच घडत नाहीं. तुम्ही मातबर सरदार दौलतेचे खांब असतां अलक्ष करतां. हिंदुस्थानांत त्रिंबकराव शिवदेव यांचे पुत्र दोन हजारांनिशीं, त्यांणीं फार केली. धारेस मोर्चे लाविले आहेत! अशा प्रसंगास केल्यास साराच मनसबा नीट होईल. " येणेंप्रमाणें उदाहरणें फारच देत होते. आह्मीं विनंती केली, " पंचमीस निघाव-याचा सिद्धांत असतां कधीं गुंता पडला ? एरवीं ठीक जाहलें होतें.

---

१ पत्र पांडुरंगरावास. २ उभयतां कारभाऱ्यांस.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

आतां त्रयोदशीस निघाले असतील. कदाचित् नसल्यास सांडणी स्वार गेल्यावर मुहूर्तही पाहणार नाहींत. गेलों असेंच पत्र येईल." म्हणून बहुतच खातरजमा करून सांगितलें. आतां गेलों असेंच पत्र यावें. आह्मी पुण्यास गेलों होतों. श्रीमंत बळवंतराव[1] यांस घेऊन येणें म्हणून यांचें पत्र आलें त्याजवरून त्यांसुद्धां काल आलों. वरकड सारीं पुण्यांतच आहेत. हे जाबसाल समर्पक कसकसा करितात तो कळतो, त्यासारखा पुढें विचार सविस्तर लिहून पाठवितों. राजश्री भिवराव पानशे यांजकडे होळकर व शिंदे यांची फौज जाऊन पावली. आनंदराव गोपाळही पावले. वरकडही किरकोळ नेमिल्याप्रमाणें गेले. रास्ते यांजकडील मात्र गेल्याची बातमी आली नाहीं. घाटमाथांहून काल खालीं उतरावयाचा प्रकार होता, तोतया हरेश्वराच्या आसपास आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब दवणेच्या आसपास आहेत. पुण्यांतील खबरी श्रीमंतांच्या व तोतयाच्या भेटी जाहल्या म्हणोन मनस्वी वर्तमानें उठवितात. धारवाडाकडील व करवीराकडील हैदरखानाच्या सूत्राचा मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. उभयतांस श्रवण केला. राजश्री शंकराजी येईल तर आणावा असें उभयतांचें मानस आहे, परंतु पैका द्यावयास नाहीं. हत्तीचा मजकूर लिहिला तो कळला. विनंति करून लिहून पाठवितों. राजश्री व्यंकटराव घोरपडे[2] कोंकणांत गेले त्यांचा सरंजाम देशमुखी जप्त करून शिबंदीस द्यावा म्हणोन सनद आम्हांकडे पुण्यास पाठविली ती हल्लीं आपणाकडे पाठविली आहे. ऐवज घेऊन शिबंदीचें दोन हजार माणूस जरूर ठेवावें. जप्तीच्या निमित्यास सरकारचा कारकून असावा हें युक्त दिसतें. आपल्या विचारास आल्यास विनंति करून कारकून पाठवून देऊं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ बळवंतराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर. २ घोरपडे मुधोळकर.

श. १६९८. तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

नं. १८९६. श्री. (आक्टो. प. पंधर.)

राजश्री नारोपंत दामले व पद्माकरपंत स्वामीगोसावी यांस. विनंति[1] उपरी. राजश्री रामचंद्रपंतांचे लष्करांत शंकराजीपंत आहेत त्यांजजवळ रामचंद्रपंतांचें बोलणें जाहलें तें तपशिलवार मशारनिल्हेनीं लिहिलें आहे. तीं पत्रें तुम्हांकडे पाठविलीं आहेत. राजश्री तात्या[2] व भाऊ[3] व शिवाजीपंतास[4] वाचून दाखविणें. कागद माघारा घेऊन पाठविणें. या कागदाचें उत्तर शिवाजीपंतांच्या व नागोरायाच्या[5] विद्यमानें समर्पक करून घेऊन पाठविणें. रामचंद्रपंत चिकोडीस येतात असा प्रकार आहे. राजश्री कोन्हेरराव यांणीं शिवाजीपंत व रामचंद्रभटबाबा यांस पत्र लिहिलें आहे तें त्यांस पावतें करून उत्तर पाठविणें. रामचंद्रपंतांस उत्तर काय द्यावें, ते येथें येणार, आले तर समक्ष गांठ पडल्या काय बोलावें, हें सविस्तर पक्का विचार करून पुसून लिहिणें. शिवाजीपंतांनीं येथें लौकर यावें. बहुत काय लिहिणें हे विनंति. शिवाजीपंत सत्वर आले तर बरें. नाहीं तर उत्तर तरी लौकर पाठविणें. त्याप्रमाणें करावें लागेल. हे विनंति.

नं. १८९७. श्री. (भाद्र० व० १२–९ आक्टो०)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुराम रामचंद्र व रघुनाथराव नीळकंठ स्वामी गोसावी यांस.

पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष तुम्हीं आंबेघाटास गेलां म्हणून राजश्री पांडुरंगराव[6] गोविंद यांणीं मिरजेहून

---

१ कृष्णराव पानशांचें पत्र चिकोडीजवळ लष्कर होतें तेथून मिरजेस. २ रामचंद्र गणेश कानडे यांचें. ३ पांडुरंगराव गोविंद. ४ परशुरामभाऊ. ५ ह्मैसकर वकील पुणें दरबारांतले. ६ नागोराव श्रीनिवास हे मुरारराव घोरपडे सेनापति यांचे माजी दिवाण हल्लीं मिरजेस होते. ७ वाटवे उपाध्ये कुरुंदवाडकरांचे.

लिहून पाठविलें, ऐशास तुम्ही त्या घाटास गेलां, उत्तम केलें. कुरोडा व बोरघाटाकडे राजश्री भिवराव यशवंत गेले. ते कोंकणांत उतरणार, व राजश्री महादजी शिंदे सिंहगडाकडून देवघाट वगैरे त्या रोखें गेले. तुम्ही तिकडे गेलां. चहूंकडून सलाबत कोंकणांत तोतयावर पडली. याउपरी त्याच्या लोकांच्यानें दम धरवतो असें नाहीं. इकडून उभयतां सरदार खालीं जाऊन त्याचे लोक जागां जागां आहेत त्यांचें पारिपत्य करतील. तुम्ही घाट उतरून त्याचे लोक घाटाखालीं असतील त्यांचें पारिपत्य करून जेथें जेथें त्याचे लोक असतील त्यांचा काड़ा काढून बेमुरवत पारिपत्य करणें. तिकडे मिळाले असतील ते परिछिन्न धरून तिळाइतकी क्षमा न करितां बेमुलाहिजा पारिपत्य करणें. जाणिजे. छ २५ साबान. सुा सबां सबैन मय्या व अल्फ.

नं. १८९८. श्री. (भाद्रपद व. १२–९ आक्टोबर.)

पुरवणी[1] राजश्री परशुराम रामचंद्र व रघुनाथराव नीलकंठ स्वामी गोसावी यांसी.

विनंती उपरी. राजश्री भिवराव यशवंत कुरोडा व बोरघाट या दो घाटांचे नजीक आहेत. तोतयाकडील पायींचे लोक घाटमाथा आले होते त्यांची व यांची लढाई होऊन यांनीं त्यांचे दहा वीस लोक मारिले. त्यांचा कर्णा व निशाणें आणिलीं. त्यांस धुडावून घाटाखालीं घालविलें. पळोन गेले. रा. महादजी शिंदे यांस सिंहगडाकडे रवाना केलें. त्यांणीं आपलीं पथकें छ २५ साबान बुधवारीं स्वारीस पाठविलीं. सिंहगडाखालीं जाऊन तोतयाची चौकी गडाखालीं होती तेथें झुंज होऊन आरब वगैरे दोनशें माणूस कापून काढिले, व कांहीं

[1] हें पुरवणीपत्र सवाई माधवराव यांचें. मुख्य पत्र मागच्या नंबरचें. त्याचीच ही पुरवणी.

धरून आणिलें त्यांसही मारावयास आज्ञा केली. ते मारून टाकितील. हें वर्तमान तुह्मांस कळावें यास्तव लिहिलें असे. त्यास भिवराव कुरोडयाकडून व शिंदे देवघाटाकडून व तुह्मी आंब्याघाटाकडून, म्हणजे तोतया व सर्व त्याचे लोक मध्यें सांपडतील. याकारितां तुम्ही घाटाखालीं उतरून त्यांचे लोकांचा काडा काढीत तोतयाचे रोखें काय जे लोक सांपडतील त्यांचें पारिपत्य बेमुलाहिजा करणें. मारून टाकणें. काकुळूत सर्वथा न करणें. बातमी वरचेवर लिहून पाठवीत जाणें. हे विनंती.

नं. १८९९. **श्री.** (भाद्र० व० १२–९ आक्टो०)

तीर्थस्वरूप मातुश्री बाई[1] वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें पांडुरंगराव गोविंद कृतानेक नमस्कार विज्ञापना तागायत छ २५ साबानपर्यंत वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. तोतया प्रकरण तो अशा रीतीचें घडलें. अखेर दौलतीस धक्का देऊन आपल्या योग्यतेस हानी जाहली. आपण सर्वत्रांस वडील. त्यांत आम्हांस तो अतिशय, याजमुळें मनास खेद जाहला तो किती लिहूं ! तरी चरें. निभावलें ! आम्हांवरही या प्रकरणीं वडिलांचे आज्ञेप्रमाणें वागतों तरी प्रसंग गुजरून आपलाच दुर्लौकिक ! आमचें झाड मुळीं आपण लावून आपलेच हातें नाश केला असा होत होता तो न जाहला हे आपलीच कृपा ! असो. आतां आपले दिवस थोडे राहिले. इतःपर श्रीमहायात्रेस जावें हेंच योग्य. या देशीं राहणेंत कांहीं अर्थ नाहीं. आज्ञा जाहलेस जाण्याची तरतूद करून देईन. याहून विशेष काय लिहूं ! श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९००. **श्री.** (भाद्र. व. १३–१० ऑ.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेरराव त्रिंबक स्वामी गोसावी यांस.

पोष्य माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंति उपरी

---

[1] अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुम्ही छ १९ साबानचें पत्र पाठविलें तें छ २५ मिनहूस प्रविष्ट जाहलें. " आज्ञेप्रमाणें धारवाडाकडे जातों, येविशीं राजश्री शिवाजी बाबाजी यांस लिहिलें आहे ते विनंति करितील" म्हणून लिहिलें व मशारनिल्हेनींही निवेदन केलें तें कळलें. ऐशास कोल्हापूरच्या शिंवेवर फौज असावी याजकरितां राजश्री रामचंद्र गणेश यांस आज्ञा केली आहे ते तेथें राहतील. तुम्ही व राजश्री कृष्णाजी माधवराव व शिवराव घोरपडे मिळोन धारवाडाकडे जाऊन शत्रूचा पराभव करून साहेबचाकरी करणें. जाणिजे. छ २६ साबान. सुरुमन सबां सबैन. मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. १९०१. **श्रीगणराज.** (आश्वि. शु. ३--१५ आक्टो.)

आँशीर्वाद. उपरी राजश्री जयवंतराव याचें पत्र छ २८ साबानचें आलें त्यांत लिहिलें आहे कीं, " सिंहगडावर लढाई शिंद्याची व तोतयाच्या लोकांची जाहली. त्यास त्याजकडील रामचंद्र नाइकाचा लेक ठार जाला. हें वर्तमान पेशजी लिहिलेंच आहे. हल्लीं सिंहगडच्या बंदोबस्तास राजश्री हरिपंत राहतील. शिंदे एके घाटें व तीर्थस्वरूप राजश्री आंबा एके घाटें उतरतील. निकड करतील. पारिपत्य होईल." होळकरही मागाहून जातील. येथें दोन हजार फौज जमली म्हणजे होळकर जातील. इकडील चिंता न करावी. सर्वार्थ निवारण होतील. तुम्ही सोबत तुटल्याविशीं लिहिलें, त्यांस कालच सांडणीस्वाराबरोबर मिरजेस पत्रें पाठविलीं आहेत. तिकडून आपणाकडे येतील. राजश्री कोन्हेरराव व तुम्हीं व शिवराव घोरपडे व दौलतराव घोरपडे असे पुढें धारवाडच्या शहास जावें. आंबेघाटाकडे राजश्री परशुरामभाऊ व रघुनाथ-

---

१ पानशे. २ गुत्तिकर. ३ हें पत्र बळवंतराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर यांनीं पुरंदराहून पडुरंगरावास लिहिलें आहे. ४ पानशे. ५ भिवराव पानशे.

राव यांणीं जावें, कोल्हापूरच्या शहास रामचंद्रपंत राहतील अथवा माघारे येतील, याप्रमाणें मनसबा ठरून पत्रें सांडणीस्वाराबरोबर गेलीं आहेत. तुह्मांस कळावें ह्मणून लिहिलें आहे हे आशीर्वाद.

नं. १९०२. **श्रीगणराज.** (पौष व० १०–१६ जानेवारी.)

चिरंजीव तात्या यांसी प्रती कोन्हेरराव त्रिंबक आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ २४ जिल्काद मुक्काम गडहिंग्लजनजीक मामानगड जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष तुह्मी पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. इकडील सर्व मजकूर महागांवचे मुक्कामाहून लिहून पाठविलाच आहे. महागांवचें ठाणें घेऊन मुक्काम मजकुरास काल आलों. येथील ठाणें घेऊन आज पुढें कूच करून जावयाचा बेत होता. इतक्यांत शिवराव सुरनीस राजमंडळकरांकडून राजकारण घेऊन आले आहेत. त्यांचें बोलणे चालणें जाहलें. आह्मांकडील कार्यभाग जो आहे तो मशारीनल्हे यांनीं समजून घेऊन राजमंडळास लिहून पाठविलें आहे. तिकडून जाबसाल येई तोंपर्यंत कूच न करावें म्हणोन आग्रह, यास्तव आज मुक्काम केला. संध्याकाळ पावेतों त्यांजकडून काय उत्तर येतें तें पाहोन त्याजसारिखें करावयास येईल. हे आशीर्वाद.

नं. १९०३. **श्रीगणपति.** (आश्विन शु. १–१३ आक्टोबर.)

तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेररावजी वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें परशुरामानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विनंतीं येथील कुशल तागायत छ २९ साबानपावेतों सुखरूप

---

१ रामचंद्र गणेश. २ हें कोन्हेररावानें मिरजेस पांडुरंगरावास स्वारींतून पत्र लिहिलें आहे. हें कालानुक्रमाप्रमाणें नं. १७६७ स घालावयास पाहिजे होतें पण चुकून राहिलें तें येथें घातलें आहे.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

असों विशेष. वडिलीं छ. २५ साबानचें पत्र पाठविलें तेथें लिहिलें कीं, " तुम्ही निघालांच आहां. चिरंजीव राजश्री तात्याही नवमीस वद्यपक्षीं निघाले. त्यास कोणते मार्गें जाणार, तुमची भेट कोणे ठिकाणीं होईल, काय मनसबा योजिला, तो सविस्तर लिहिणें." त्यास आम्हीं घरीं आलियावरी आपल्याकडून व राजश्री कृष्णरावजींकडून राजश्री आनंदराव व रा. बचाजीपंत आले होते तेव्हां मनसब्याची जलदी होती. आपलें उभयतांचें व रामचंद्रपंत यांचें पटत नाहीं. त्यापक्षीं आपण त्यांतून निघावें. आम्हांकडून तीन चारशें स्वार.....डोन यावे ते न आले, त्याजवरून आपण राजश्री भिकाजीपंत पाठविले. पत्रेंही येतच होतीं. परंतु चिरंजीव राजश्री तात्यांनीं सालमजकुरीं नवीन दिक्कत काढिली जे, हिस्सेरशी व पैका मसल्हतसंबंधें जो लागेल तो द्यावा. याशिवाय पथकें आहेत त्याचे खर्च जिकडील तिकडे आहेतच. आम्हीं सांगितलें जे, पथकें सरंजामाप्रमाणें येतीलच. मसल्हतसंबंधें हिस्सेरशीद द्यावी, त्यास कैलासवासी वडिलीं जैसें चालविलें त्याप्रमाणें चालविणें. आम्हांस हिस्सेरशीची गांठ पडत नाहीं. त्यानंतर राजश्री शिवाजीपंत आले, तें सविस्तर वर्तमान शिवाजीपंत यांणीं आपणास विदित केलें आहे. त्या अलीकडे आपल्याकडून शिवाजीपंत आल्यावर ठराव झाला. हिस्सेरशीद चिरंजीव राजश्री तात्यांनीं व चिरंजीव राजश्री रघुनाथराव यांणीं द्यावी. भाद्रपद शुद्ध पंचमीस निघावें याप्रमाणें ठराव होऊन शिवाजीपंत गेले. तों तीर्थस्वरूप दाजी कैलासवासी झाले म्हणून पत्र आलें. तेव्हां तो मुहूर्त राहिला. पुण्यांतून शिवाजीपंत यांचीं पत्रें येत गेलीं जे, आपण लौकर बाहेर निघावें. लौकर आपण

---

१ पानशे. २ रामचंद्र गणेश कानडे. ३ टिंबें दिलेल्या ठिकाणीं मूळपत्र फाटलें आहे.

आम्ही एक व्हावें. हजार स्वार, दोन हजार पायदळ, आपणाकडे रवाना करावें. ज्यास जे मसलत चि. रा. तात्या सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक रामचंद्रपंतसुद्धां करावी. याअन्वयें आपणासही पत्रें सरकारचीं गेलींच आहेत, असें लिहिलें आहे. तों चिरंजीवांनीं शिवाजीपंत गेल्यापासून आह्मांकडे बोलणें लावलें जे, " आपलें येणें होत नाहीं. बहूकडे गडबड. किल्ल्याची बंदोबस्ती जाली पाहिजे. त्यास पक्का विचार करावा. चिरंजीव राजश्री बळवंतराव यास घेऊन जावें. " आह्मीं सांगितलें जे " मसलतीचें काम आहे, व वडिलांचा लौकिकही राहिला पाहिजे. तुह्मीच यावें, " असे निरोप दोन तीन वेळ चि. रा. केसोपंत आले गेले. पत्रेंही चिरंजिवांचीं आलीं. तों सरकारचें पत्र व शिवाजीपंत यांचें आह्मीं बाहेर निघाल्यावर आलें जे, " कोंकणचें बंड फारच माजलें आहे, त्यास तुह्मी फौजसुद्धां आंब्याकडे जाणें. पायदळ ठेवावयाविशीं ऐवज पाहिजे, त्यास तीर्थस्वरूप मातोश्री अनुबाईची जप्ती करणें व दोन हजार माणूस ठेऊन लौकर जाणें. " म्हणून सूतर स्वारच आला. तीं पत्रें केसोपंत यांजबरोबर चिरंजीवांनीं पाठविलीं. त्यास आह्मीं मसुदा[3] करून पाठविला जे, आह्मीं घरास आल्या तागायत मसलतच कबूल करीत नव्हतों. बहुत आग्रह आपण केला, याजकरितां मसलत कबूल केली. आतां तिकडे न जाणें, आंबेघाटाकडे जाणें, म्हणून लिहिलें, त्यास कोन्हेरराव व कृष्णरावजींचें व रामचंद्रपंत यांचें पटत नाहीं. व " रामचंद्रपंत व बाबूराव दादाजी व इचलकरंजीकर यांचें मन एकच आहे. हुजरातीशींही बोलतात. शंकाजी घोरपडेही आणिले आहेत. येसाजी शिंदे यांचेंही अनुमत त्यांत आहे. आह्मांस खर्चास देखील देत नाहींत. त्यापक्षीं आह्मी येथें राहत नाहीं. "

---

१ गंगाधरराव गोविंद. २ उपनाम काळे. ३ नानाफडनविसांस कसें पत्र पाठवावें याचा मसुदा.

म्हणून रावजींचीं पतें आलीं आहेत. त्यास आह्मीं आंब्याकडे गेलों असतां उभयतां रावजी उठोन येतात. रामचंद्रपंत तोतयाचें नादीं बाबूराव याचे अनुमतेंकडून आहेत. आह्मी आज चार महिने उभयतांस वचन दिलें आहे तेंही नासतें व सरकारची मसलतही नासती. रामचंद्रपंत सरकाराशीं ठाक नाहीं, त्यापक्षीं आम्हीं आंब्याकडे गेलों तरी उभयतां तेथें राहात नाहींत. उठोन येतात. तेव्हां मग रामचंद्रपंत काय करितील नकळे. धारवाड कोपाळ राहिलें तेंही जाईल. आम्हीं हजार दोन हजार फौज सरंजामाहून जाजती ठेवणार होतों ते महाल आम्हीं गेलों असतां (शत्रु) लुटतील त्या ऐवजावरी ठेवणार. ते आंब्याकडे गेल्यावरी कशाची ठेवावी ? तरी आम्ही आंब्याकडे जात नाहीं आम्ही कर्नाटकचे रोखें जात आहों. एक हजार स्वार व दोन हजार पायदळ याप्रमाणें ठेऊन आंब्याकडे रवाना करितों. हुजुरून आणखी फौजेची तरतूद होऊन आंब्याकडे रवाना करावी. याअन्वयें शिवाजीपंतास लिहावें म्हणून पाठविला. तो मसुदा चिरंजीवाचे विचारें न आला. त्यांतील अर्थ. रामचंद्रपंत कांहीं तोतयाचे राजकारणांत नाहींत. उभयतां अदावतीनें लिहितात. आह्मीं दरबारीं लिहून लटके होत नाहीं. कोंकणची मसलत कबूल करून जावें. परंतु हिस्सेरशीद खर्च लागेल तो द्यावा, ह्मणून रा. नागोजीराव नाना आले. आह्मीं त्यांजबरोबर सांगून पाठविलें जे, पत्र तुमच्या विचारें न ये तरी न पाठवावें. परंतु उभयतां रायांनीं लिहिलें आहे, कदाचित् आह्मीं आंब्याकडे गेल्यानें उभयतांस दगा जाला, अथवा ते उठोन येऊन रामचंद्रपंत यांणीं भलतेंच केलें; तरी दरबारीं शब्द लागेल. उभयतांनीं शिवाजीपंत यांस सुचवा म्हणून लिहिलें, सूचना करावी हें चांगलें. नये विचारास तरी कोंकणांतच चालावें. परंतु आम्हीं हिस्सेरसीद देणार नाहीं, व सरकारची मसलतही नासत आहे, त्यापक्षीं तुम्हीं अथवा आम्हांस आज्ञा कराल तरी आम्हीं व चिरंजीव राजश्री रघुनाथ-

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

राव दादा कोंकणांत जाऊं. अथवा तुम्हीं कोंकणांत जावें, आम्ही कर्नाटकांत जाऊं. जसें आपले विचारें येईल तसें. परंतु दोघांनीं दोहोंकडे जावें. तेणेंकरून हिस्सेरशीद ही नाहीं आणि उभयतांस चार महिने वचन दिलें तें पार पडतें. कर्नाटकचा थोडासा बंदोबस्त होईल. रामचंद्रपंत भलतेंच कैरू पावणार नाहीं, असें आहे. त्यावरून नागोजीराव जाऊन लिहिलेप्रमाणें सांगितलें. परंतु चिरंजीवांचे विचा. रास न आलें. तेव्हां चिरंजीवांनीं मागती रा. नागोजीराव नाना व गोविंदपंत मामा व ती० रा० तात्या यादवाडकर पाठविले जे, हिस्से रसीद कबूल करून चि. रा. बळवंतराव यांसीं समागमें घेऊन जावें. तुम्हांस हिस्सेरसीद कबूल होत नाहीं तरी मसलतीस आम्हीं जातों. चार माणूस (ठेवावे) अथवा हुजुरून फौज आणावी. कांहीं मसलतसंबंधें खर्चाची जाजती गोष्ट बोलूं नये. आम्ही चित्तास येईल तैसें करूं. तुम्हीं कांहीं बोललां तरी हिस्सेरसीद द्यावी. आम्ही कबूल न करावें. (?) कां जे, संगतीस अगतां चाकर असतो त्यास हिताची गोष्ट आढळल्यास बोलावी लागते. ते आम्हीं कशी न बोलावी, परंतु चिरंजीवांचे मर्जीकरितां कबूल केलें कीं, आम्ही कांहीं बोलणार नाहीं. तुम्हांस जैसें कळेल तैसें करावें. याप्रमाणें बोलून नागोजीराव व मामा गेले. त्यानंतर उभयतांचें पत्र आलें जे, मसलतसंबंधीं खर्चास लाख रुपये शिरस्तेचे द्यावे, व जप्तीचा ऐवज येईल तो देऊन जाजती खर्च करूं नये. चि. रा. बळवंतराव यांस समागमें घेऊन जावें. नाहीं तरी आम्ही हजार स्वार ठेऊन घेतों. वरकड फौज तुम्हांकडे देतों. तुम्हीं कोंकणांत जाणें. आम्ही उभयतांस उत्तर दिलें जे, बोलून गेलां काय (व) जाब काय पाठवितां ? चित्तास येईल तसें करणें. त्याजवरी चि. रा. तात्याचें पत्र आलें, " आम्ही कर्नाटकांत जातों. तुम्हीं व चि. रा. रघुनाथराव कोंकणांत जाणें. जप्तीच्या चिठ्या आम्हांकडे पाठवाव्या. " आम्हीं उत्तर दिलें जे, आपण लिहिलेप्रमाणें आम्हीं

कोंकणांत जातों. आम्हीं कोंकणचे मसलतीचे उद्योगास लागलों. चिरंजीवही रविवारीं बाहेर निघाले. आम्हीं रविवारीं कूच करोन निंबणीस आलों. तदोत्तर सिंहगड तोतयाकडे फितला म्हणोन वर्तमान आलें. शिंदे, होळकर व राजश्री हरीपंत यांच्ही रवानगी तोतयावर केली, म्हणोन शिवाजीपंत यांचें पत्र चिरंजीवांस आलें. तें पत्र घेऊन चिरंजीव राजश्री तात्या व गोविंदपंत मामा व नागोजीराव असे आले. भोजन जाहलियानंतर चिरंजीवांनीं (बोलणें) काढिलें जे, उभयतांचीं पत्रें आलीं आहेत जे, आह्मी रामचंद्रपंत याजपाशीं राहात नाहीं. परिच्छिन्न उठोन येतों. याचें उत्तर काय द्यावें ? आह्मीं सांगितलें जे, त्यांस 'या' म्हणोन ल्याहावें तरी तूर्तच धारवाड जातें. यास्तव तांतड करूं नये म्हणून लिहावें; व पुरंदरास स्पष्ट लिहावें जे, ते उठोन येतात याचा विचार करावा. तेव्हां नागोजीराव बोलिले जे, किल्लयाचे बंदोबस्ताचें कसें करावें ? आह्मीं चिरंजीवांचे रूबरू काय बोलावें ? उत्तर केलेंच नाहीं. तेव्हां चिरंजीव शौचास गेले, मागें मामा नाना होते व ती. रा. तात्याही होते, आह्मीं त्यांस सांगितलें जे, किल्याचे बंदोबस्तीचें विशेष अगाध आहे असें नाहीं. चिरंजीवांनीं बाळास ठेऊन आपण चलावें. परंतु आम्हीं हिस्सेरशी देत नाहीं. अथवा चिरंजीवांचे विचारें आपण नच यावें, चिरंजीव बाळासच पाठवावें, असें असलिया मक्ता लाखाचा असें ह्मणों नये. आह्मांस तुमचे घरांत कर्ज असावें अशी बुद्धि नाहीं. युक्तीचे वाटेनें खर्च होईल तोच करूं, परंतु जसा समय पडेल तसी वर्तणूक करूं. याजमुळें पन्नास पंचवीस (हजार) लागोत अथवा दोन चार (लाख) लागोत. चिरंजीव तात्याच खासे आले असतां आह्मीं कांहींच म्हणत नाहीं. त्यांचे चित्तास येईल तसें करूत. परंतु कोंकणचे कामास लागलों असतां हजार पांचशें माणूस

---

१ कृष्णराव पानशे व कोन्हेरराव यांचीं. २ अंताजीपंततात्या यादवाडकर.

आगविलें आहे व तीनशें स्वार नेमणुकीशिवाय ठेविले आहेत; एवढ्यांचा खर्च द्यावा. चिरंजीवांनीं सांगून पाठविलें जे, उत्तम आहे. प्यादे आणवूं नयेत. आगविल्यामुळें शें दोनशें खर्च पडला (असेल) तर आह्मीं देऊं. स्वारांचा पैका आह्मीं देऊं. आह्मीं उत्तर केलें, उत्तम आहे. मागती जांबसाल जाहला जे, स्वार तुम्हीं ठेविले असतील ते आम्हांकडे देणें. निराळा पैका द्यावयास ठीक पडणार नाहीं. आम्हीं सांगितलें जे, आतां देतों म्हणालां, आतां नाहीं म्हणतां? आह्मांस गांठ पडत नाहीं. तेव्हां चिरंजिवांचा निरोप खट्टे होऊन आला जे, आह्मी कर्नाटकांत जातों. तुह्मीं कोंकणांत जाणें. आह्मीं "उत्तम" म्हणालों. ते आवशीचे दीड प्रहर रात्रीस निघून गेले. आम्हीं गुरुवारीं कूच करून भिलवडीनजीक आलों. चिरंजीवही वाडीवरी भृगुवारीं कुच करून गेले. याप्रमाणें वर्तमान जालें. येविशीं पहिल्यापासोन बोलण्याचालण्यांत नागोजीराव नाना आहेत, व मामाही आहेत. चिरंजिवांची व आपली भेट जाहलियावरी सविस्तर उभयतां सांगतील. आंतील आंतील बारीक बोलणीं किती आहेत, नाना सांगतां कळतील. सारांश, अन्नोदकाचा ऋणानुबंध तुटला! श्रीइच्छेस इलाज काय! आह्मीं दोन चार दिवसांत भिलवडीजवळ कृष्णापार होतों. हुजूरचा सरंजाम यावा म्हणून रा. शिवाजीपंत यांस लिहिलें आह. पायदळही आणविलें आहे. वडिलांचे आशीर्वादेंकरून जसें होईल तसें पाहातच आहों. जसा ऋणानुबंध असेल तसें घडेल. काळजी करून काय होतें? श्रीइच्छेनुरूप घडावयाचें तसें घडतच आहे. चिरंजीवांची व आपली भेटी लौकरच होईल कीं काय पाहावें. चि. रा. रघुनाथरावदादाचा निघावयाचा अनमानच दिसतो. चिरंजीवांस लिहिलें होतें. ते लिहितात जे, चिरंजीव निघतील. त्यास निघतात न निघतात पाहावें. आम्ही जितकी तरतूद होईल तितकी करून शिराळ्यास जातों. मागाहून हुजूरून सरंजाम येईल तदन्वयें करूं. आपणास विस्तारें कळावें

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

याअर्थें लिहिलें आहे. सदैव पत्रीं सांभाळ करावा. चिरंजीव व आपण एकत्र जाहालियावरी बारीपलीकडे जाणें होईलच. तिकडे आमचे सरंजामाचे महाल आहेत, त्यास राजश्री लक्ष्मण हरी यांसमागमें शंभर स्वार देऊन रवानगी करितों. आपणाजवळ येतील. जसा प्रसंग पडेल तसें आपण करितीलच. येविशीं आपणास लिहावें ऐसें नाहीं. कोंकणचे अधिक आगळें वर्तमान होईल तें मागाहून लिहून पाठवितों. रा. कृष्णरावजींस साष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा. आनंरावजींस नमस्कार पावता करावा. पुण्याहून दोन तोफा आल्या आहेत. आपल्याकडे येत आहेत. परवां आमचे गांवीं होत्या. आपणास कळावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. आम्हीं घरास आल्यावर आपल्याकडे नेहमीं पत्रें पाठवूं. बनल्याप्रमाणें तरतूद करून आपणास सामील व्हावें, परंतु येथील प्रकार या रीतीचा घडला ! भवितव्यास इलाज काय ? सेवेशीं विदित होय हे विनंती.

नं. १९०४. · **श्री.** (अश्विन शु०—आक्टो०दु० पंधरवडा.)

सेवेशीं विष्णु कृष्ण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. आमच्या शरीरीं व्यथा जाहली होती ती ईश्वरीकृपनें आरोग्य होत आली. वळ भारी जाहला होता. नाना उपाय केले. काल फुटोन थोडेसें हलकें वाटलें आहे. आठा दिवशीं बरा होईलसा दिसतें. या रोगाचें मोठें संकट होतें, परंतु आपल्या कृपेंकरून कांहींसें आरोग्य जाहलें. आपणाकडील वर्तमान ऐकिलें कीं, आपण व भाऊ यांणीं निराळे स्वारीस जावें, एकत्र राहून चाकरी करूं नये, असा राजश्री भाऊकडूनच उपक्रम निघाला; ह्मणोन ऐकिल्यापासून परम चिंता लागली. काळानें बुद्धीचा भ्रंश केला कीं काय न कळे ! मागें थोरले

---

१ लागू मामलेदार. २ उपनांव तोफखाने. ३ पोतनीस. उपनांव जोशी यांचें हें पांडुरंगरावास पत्र.

श्रीमंत होते तेव्हां तिन्हीं पथकें निराळीं फोडून चाकरी घ्यावी म्हणजे भारी पटवर्धन जाहले आहेत ते हलके करावे, असें घाटत होतें. परंतु रावे कैलासवासी यांणीं हें ऐकिलें नाहीं. त्यांचे वक्रामुळें श्रीमंतांचें कांहींच चाललें नाहीं. एकत्र होते म्हणून मातबर स्वामिकार्यें जाहलीं. नांवलौकिक पृथ्वींत जाहला. आजतागाइत असेंच चालिलें. आतां आपले आपण सरकारआज्ञा नसतां अशी बुद्धु व्हावयास मूळ काय, हें समजत नाहीं ! मिरजेंत करारमदार शिवाजीपंत व आम्ही बोलत असतां तेथें कांहीं हा पर्याय नव्हता. " सरकारची फौज आली तर आपण व राजश्री राघोबादादांनीं मिळोन भाऊस कर्ज न मिळे यास्तव रोजमरियास चार लक्ष कर्ज मेळवून द्यावें, सरंजामाप्रमाणें ज्याची त्यांनीं फौज ठेवावी, " याप्रमाणें निखालसपणें ठरलें असतां आतां कशामुळें इतकें जाहलें ? आपण राजश्री भाऊंकडे गेलां होतां तेव्हां मध्यस्तांचे तोंडें बोलोन निराळे जावें असें भाऊंचे मनसब्यावरून करार करून आलां हेंच वाईट केलें ! भाऊंस एकीकडे काढून उभयतांनींच बोलावें होतें कीं तुम्हीं आम्हांस वडील. बुद्धिवाद, स्वारी शिकारी, मनसब्याच्या गोष्टी सांगोन आमचा सांभाळ करून वडिलांनीं कसा लौकिक मिळविला आहे हा रक्षावा. असें न केलें तर तुम्हांस सर्वजण शब्द ठेवितील. आपण निराळी चाकरी करणार नाहीं. जिकडे तुम्ही जाल तिकडे तुम्हाबरोबरच फिरोन जी चाकरी सांगाल ती करून दाखऊं. शिलेदारी वळणांत अगर अंगेजणीची चाकरी करावयासी आपण अज्ञान. आपण तुम्हांस सोडून जात नाहीं. असें म्हणोन पागा, डेरे, शिलेदार सर्व भाऊ होते तेथें जावयाचें होतें. तें आपण न केलें. मध्यस्तांचे सांगणीवर समक्ष न बोलतां उठोन आलां. याउपरी तरी एक दोन दिवसांत आपण सडे उठोन राजश्री भाऊंकडे जावें. आणि लिहिल्या सर्व गोष्टी अशाच बोलोन

१ गोपाळराव. २ पराक्रमाची.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

आपण तेथें राहून लष्कर कूच करून तेथें न्यावें. यांत लघुत्व आलें तर येऊं द्यावें. परंतु पुढें मान्यत्व पावाल यांत संशय नाहीं. येवढी माझी गोष्ट आयिकावी. रुबरू मध्यस्थ नसतां बोलावें. यंदां फौज थोडी[1].

नं. १९०५. **श्री.** (आश्विन शु० ३–१५ आक्टो०)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं. पो बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता॥ छ १ रमजान जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्हीं फौज जमा करून कृष्णातीरास गेलां. तेथून आंब्याघाटास लौकरच्च जाणार, म्हणोन राजश्री शिवाजीपंत यांणीं सांगितलें. फार उत्तम आहे. त्यास लौकर घाटावर जाऊन खालीं उतरावें. दोन हजार पायींचें माणूस ठेवावयाविशीं पेशजी लिहिलें आहे, त्याप्रमाणें ठेविलेंच असेल. लौकर ठेवावें. शिराळेकर यांचें हजार माणूस आहे. तुमचें दोन हजार, एकूण तीन हजार पायींचें व तीन हजार फौज, इतक्यानिशीं खालीं उतरून महाडाकडे लौकर यावें. तोतया राजमाचीकडे आला तेव्हां खाशीं (?) पासून मध्यें कोणी मातबर नाहीं. पायींच्या लोकांच्या चवक्या मात्र आहेत. त्यास तुम्हीं खालीं उतरलियावर त्या दबोन पळून जातील. राहतील ते मारून काढून टाकावे. मारावयाविशीं आळस करूं नये. एक दोन चौक्या कापून काढिल्यानें पुढें दबाव चांगला पडेल. कामही होईल. यास्तव खालें जावयाची त्वरा करून जावें. रा. हरिपंत व शिंदे सिंहगडाकडून खालीं उतरणार. भिवराव बोरघाटानें उतरणार. चहूं पांचा दिवशीं उतरावयाचा बेत केला आहे. याजकारितां आपण जलदी करून उतरून पारिपत्य करीत महाडाकडे यावें. भिवराव यांनीं बोरघाटांत तीन चार लढाया चांगल्या मारिल्या. हजार दीड

---

1 हें पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

हजार माणूस तोतयाकडील ठार व जखमी केलें व शिद्यांनींही सिंहगडाखालीं पांच सातशांनिशीं चौकी होती ते दीडशें ठार व कांहीं जखमी केले. याजमुळें दहशत त्यांजवर वरीच पडली आहे. हे खालीं उतरलियावर तर काम सहजांत होईल. आपणाकडे उशीर लागल्यास शब्द राहील, यास्तव लिहिलें आहे. केवळ रयत मात्र खेरीजकरून बाकी तोतयाकडे चाकरीस माणूस गेलें त्यांचीं रांडापोरें लुटून जप्त करावीं. देखील ब्राह्मण व लढाईंतील सांपडतील त्यांचे शिरच्छेदच करावे. भूतदया सात्विकपणा धरूं नये. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति. वरचेवर पत्र पाठवीत जावें हे विनंति.

नं. १९०६. **श्री.** (आश्विन शु० १५–२० अक्टो०)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

पो बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्हीं राजश्री नरसिंगराव धायगुडे व नारो आनंदराव यांस आम्हांकडे पाठवावें म्हणून लिहिलें, त्यास नरसिंगराव राजश्री हरीपंतांजवळ पाहिजेत. नारो आनंदराव यांस बरें वाटत नाहीं. ते आपले घरीं आहेत. त्यास त्यांची वाट तुम्हीं न पाहावी. घाटाची बंदोबस्ती करून खालीं लौकर उतरावें. घाटावरी शिराळेकरांस ठेवून तुम्ही लौकर उतरावें. दोन हजार माणूस तुम्हांस ठेवण्याविशीं पेशजी लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें ठेविलेंच असेल. ठेवावीं. दोन हजार पाईंचें माणूस व तुमचीं दोन पथकें मिळोन खालीं उतरावयाजोगें आहे. उतरोन महाडच्या सुमारें यावें. आंबेघाटावर लोक ठेवावयाचें कारण असलियास शिराळेकरांस ठेवावें. खालीं उतरलियावरी कदाचित् अवघड पडलेंच तरी प्रतापगडाखालीं पारघाट आहे. फौज चढावयाजोगा आहे. त्याणें

आलें तरी कार्यास येईल. तोतयाचा शह राजमाचीकडेच आहे. त्यापक्षीं तिकडे तुम्हांस फारसा गुंता पडणार नाहीं. त्वरा मात्र जाली पाहिजे. कोल्हापुराकडील घाटांनीं माणूस व राऊत तोतयाकडे जातात. त्यांची बातमी राखून कांहीं धरून डोकीं मारावीं म्हणजे दहशत पडेल. जाऊं पावणार नाहींत. आपण लौकर उतरोन तुडवीत महाडाकडे यावें. तोतयाकडे चाकरीस गेलेले मराठे यांचीं रांडापोरें जमातदार जमातदार असे पाहून त्यांचीं धरावीं. बाकीच्यांचीं लुटून घरें जाळून टाकावीं. आम्हीं शास्त्रार्थ मात्र लिहितों, परंतु सर्वेच आम्हांकडील सरदारांची जात चालली यास उपाय काय! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. १९०७. **श्री** (२९ आक्टो०)

पै॥ छ २० रमजान. सुरूसन सबा सबैन मय्या व अल्फ.

सेवेशीं[1] शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता. आश्विन वद्य ३ भौमवासरे मुकाम पुणें वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आलिकडे आपणाकडून पत्रें येऊन मुक्काम कोठें आहे, कोठपर्यंत जाणें जाहलें, फौज किती जमा जाहली, हें कांहीं कळत नाहीं. राजश्री शिवराव व आपण व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव रा० कृष्णराव मिळोन किती फौज जमविली, सविस्तर ल्याहावें. आपण बारीच्या पलीकडे गेल्याखेरीज आपण गेल्याची आवाई पडत नाहीं, याजकारितां जाण्याची त्वरा जाहली पाहिजे. तोतयाकडील लोकांची लढाई व राजश्री भिवराव यांची दसऱ्याचे दुसरे दिवशीं जाहली येविशींचें सविस्तर नाईकजी जासूद यासमागमें लिहून पाठविलें आहे. तीं पत्रें पावलींच असतील. अलीकडील वर्तमान तर शिंदे फौजसुद्धां गेले ते

---

[1] पत्र पांडुरंगरावास.

राजश्री भिवराव यांचे पुढें कोसावर राहिले. तेथून परवां रविवारीं तयार होऊन तोतयावर गेले. त्याचा खालीं गोट होता त्याजवर चालोन घेऊन गोट लुटिला. आणि तोतयाचे लोक पुढें, पाठीमागें यांजकडील, याप्रमाणें रेवणीपावेतों गेले. शिंद्याकडील चाळीस पन्नास माणूस ठार व साठ घोडीं ठार, पाऊणशेंभर माणूस जखमी म्हणून लिहिलें आहे. परवां रात्रौ तेथेंच राहोन काल मागतीं निकड करितांच अवसान गेलें ! तोतया दोन तीनशें माणसांनिशीं घाटा-खालीं उतरोन पळून गेला. रत्नागिरीकडे जाणार. एक बातमी सुवर्ण दुर्गास जाणार अशी आहे. त्याचे पाठीवर शिंद्याकडील बाळाराव गेले. राजश्री भिवराव व शिंदे बोरघाटानें खालीं उतरोन जाणार. राजश्री नारो गणेश व नरसिंगराव घायगुडे चार हजार फौजेनिशीं कुरडूच्या घाटानें उतरावयासी गेले. राजश्री बाजीपंत अण्णा दोन हजार फौजेनिशीं प्रतापगडच्या खालीं उतरावयास गेले. किल्लयांचीं राजकारणें फार लागलीं आहेत. राजश्री गोविंदराव माणकर व सुर्वे वगैरे सरदार हशमी येऊन भेटले. आतां फार दिवस या मसलतीस लागत नाहीं. राजश्री मोरोपंत फडके, राजश्री हरीपंत ताम्याचे पुतण्ये व राजश्री बच्याजीपंत सर्वे यांचे पुत्र तोतयाचे अटकेंत होते ते पळून आले. राजश्री भिवराव याजवळ आले. तोतयाकडील भरणा जिक-डील तिकडे गेला. राजमाचीस तोफखान्याकडील पांचशें गाडदी किल्लयावर गेले. किल्ला सरकारांत आला. शिंदे व राजश्री भिवराव यांणीं फार केली. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९०८. **श्री.** (आश्विन वद्य ६—१ नोव्हेंबर.)

सेवेशीं[1] शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ १८ रमजान भृगुवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणून

---

[1] पत्र पांडुरंगरावास.

स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. तो-तयाचें व सरकारचे फौजेचें युद्ध जाहलें. तोतया राजामाचीहून पळून गेला. त्याचे पाठीवर फौज गेल्याचें सविस्तर लिहून पाठविलें आहे. शिंदे व पानशे घाटाखालीं उतरोन गेले. राजमाची किल्ला व कुरडूचा किल्ला सरकारांत आला. सिंहगडचेंही राजकारण आलें. वरकडही कित्येक किल्लयांचीं राजकारणें लागलीं आहेत. होळकर खास विठ्ठलवाडीवर आहेत. त्यांजकडील राजश्री नारो गणेश दोन हजार फौज व राजश्री नरसिंगराव धायगुडे, येणेंप्रमाणें कुर्डूच्या घाटानें खालीं गेले. राजश्री बाजीपंत अण्णा दोन हजार फौज व पायदळ घेऊन प्रतापगडच्या घाटानें खालीं उतरोन गेले. मळ्याघाटासही फौज पाठविली. आंब्याघाटास श्रीमंत राजश्री भाऊसाहेब गेले असतीला. राजश्री भवानराव यांजकडील दोन हजार फौज खानापुराहून आंब्या घाटाकडे पाठवावी म्हणोन पत्रें गेलीं आहेत. रवाना करितों म्हणोन उत्तरें आलीं. पाठवितील कीं काय पाहावें. हजार फौज पाठवितील. घाटाखालीं फौजा उतरल्या येणेंकरून कोंकणपट्टीची जुमाधर (?) लुटारी यांणीं केली. कांहीं बाकी राहात नाहींत ! श्रीमंत राजश्री दादासाहेब अर्जुनगडाजवळ आहेत. राजश्री गणेश[1] विश्वनाथ यांणीं लढाई करून त्यांच्या तोफा घेतल्या. सरदार धरून आणल्याचें वगैरे सविस्तर लिहून पाठविलें आहे. तिकडे आणखी फौज पाठविली पाहिजे याजकरितां राजश्री रघुनाथराव नारायण रवाना जाहलेच होते. हल्लीं शिवाजी[2] विठ्ठल रवाना जाहले. राजश्री आनंदराव दादा रास्तेही रवाना होणार. राजश्री बाबूजी[3] नाईक यांसी गडबडीचे दिवस याजकरितां जवळ असावें म्हणून पुरंधरास पत्रें पाठऊन आणविलें. तेही येऊन आठ दिवस जाहले. पांच सातशें राऊतांनिशीं आले आहेत. आपण कृष्णा उतरोन दक्षिणतीरास गेलां,

---

१ बेहरे. २ राजेबहादूर मालेगांवकर. ३ विंचूर र. ४ बारामतीकर.

उत्तम गोष्ट जाहली. तोतयाचा प्रबलतेकरितां तिकडील लहानमोठे व सरकार निसबतीचे आदी करून खुळांत मिळावयाचीं राजकारणें जाहलीं, येविशींचें सविस्तर श्रीमंत राजश्री कोन्हेरावजींनीं लिहून पाठविल्यावर कळलें. उभयतां कारभारी यांस वर्तमान सांगितलें. त्यास श्रीमंताकडील बंदोबस्त व तोतयाकडील बंदोबस्ती फौजेची जाहलीच आहे. रा. हरीपंततात्यांस कर्नाटकांत रवाना करावें येणें. प्रमाणें बोलण्यांत आलें आहे. कांहीं ऐवजाची तरतूद जाहली पाहिजे, तरतूद करितात. परंतु तिकडे यावयास मासपक्ष लागेल. परंतु रवानगी खासखा होणार. लढा नाहीं. तोतयाचें पारिपत्य जाहलें येणेंकरून लबाड अहेत ते नरम येतील. पुरतें पारिपत्यही श्रीकृपेंकरून सत्वरच होईल. चिंता नाहीं. आपण बहुत सावधपणें आब राखोन कर्तव्य तें करावें. गडबडीचे दिवस आहेत तों जडभारी फारसें लष्करांत नसावें. मातबर फौज तिकडे येईतों आब राखोन सरकार काम होयसें जाहलें पाहिजे. सर्वांविशीं श्रीमंत राजश्री कोन्हेरराव माहीत आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९०९. श्री. (२ नोवेंबर.)

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक बाबूराव जगजीवन कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती ताा आश्विन वद्य ७ मुकाम अलास जाणोन स्वामीचे कृपें-करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजमंडळकरांचा मुक्काम सावडेंवरी आहे. फौज राऊत पांच सातशें व प्यादा अडीच हजार अजमासें आहे. वरचेवरी जमाव आगवी करणार. लोकांमी बोलावूं पाठविलें आहे. अकीवाटांत पांच सातशेंपर्यंत प्यादा आहे. शिरोळकर व अकीवाटकर मिळोन कृष्णे अलीकडे स्वारी करावी अशी

---

१ पत्र पांडुरंगरावास.

योजना आहे; असें तेथील बातमीचें वर्तमान ऐकण्यांत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९१०. **श्री.** (आश्विन व० ८--३ नोवेंबर.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २० रमजान मंदवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जा. णोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष आपण पत्रें छ १४ रमजानचीं पाठविलीं तीं काल संध्याकाळीं पावोन सविस्तर मजकूर कळला, याचीं उत्तरें मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. तोतयाकडील वर्तमान युद्धप्रसंग राजमाचीस जाह ल्याचें व तोतया पळोन घाटावाली गेल्याचें व राजमाची किल्ला सरकारांत आल्याचें व फौजा घाटावाली गेल्याचें सविस्तर लिहून पाठविलेंच होतें तीं पत्रें पावलींच असतील. आलीकडील वर्तमान तर तोतयाचे पाठीवर शिंद्याकडील राजश्री बाळाराव फौज सडी घेऊन गेले ते पाठीमागून माग लावीतच गेले. अगोदर तालुकेदार व राघोजी आंग्रे यांसही पत्रें गेलींच होतीं. त्यांणीं आरमार तयार करून होते. तोतया बेलापुराकडे जाऊन तरांडयावर बसोन मुंबईस जात होता किंवा कोणीकडे हें न कळे; तरांडयांत बसोन जातात हें वर्तमान राजश्री राघोजी आंग्रे यांस कळतांच आरमार घेऊन आले. आरमारांतील लोकांनीं तोतयाकडील आरमारकरांस निकड करून शिकस्त करून वर लोक चढले. तोतया व त्याजकडील व इकडील मातबर व लहानसान गेले होते ते फार करून सांपडले. नांवनिशी परांजप्याकडील व घोरपडे वगैरे सांपडले. कांहीं ऐवजही सांपडला. किती त्याची यादही यावयाची आहे. ऐवज फारसा नसेलच. तत्राप

---

१ पत्र पांडुरंगरावास. २ इचलकरंजीकर.

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

नकळे ! परवां गुरुवारीं तोतया हस्तगत जाहला. हें संतोषाचें वर्तमान आपणास कळावें याजकारितां लिहिलें आहे. राजश्री बाळाराव यांजकडून पत्रें सांपडल्याचीं आलीं. मागाहून वर्तमान सविस्तर लिहून पाठवितों म्हणोन लिहिलें आहे. तीं पत्रें आलीं म्हणजे तपासिलवार लिहोन पाठवितों. खालीं फौजा गेल्या आहेत त्या फारकरून आणवितील, किल्लचापुरत्या ठेवून वरकड आणवितील. आतां किल्ले कोणतेही दम धरीत नाहींत. श्रीमंताचें दैव विचित्र आहे ! दुष्टांचीं पारपत्यें याप्रमाणें होतील. आतां फौजा करवीरकरांचे पारपत्यास व कर्नाटकांत जावयाची तरतूद अविलंबें होईल. आपण बारीच्या सुमारें जावें. आतां तोतयाचे राजकारणांतील सर्वत्रांच्या नाडचा आंवळल्याप्रमाणें होतील ! अद्यापि सिंहगड हस्तगत जाहला नाहीं. रा. दिनकरपंत परांजपे किल्लयावरच आहेत. किल्लयाचें बोलणें होळकराकडे आहे. याजकरितां राजश्री रामचंद्र नाईक होळकराजवळ चौकींत आहेत. किल्लयाखालीं एक वेळ पाठविले होते, परंतु कांहीं जाहलें नाहीं. बेडी मशारानिल्हेस घालणार आहेत. चाप लाविले. बाकी राहिली नाहीं. तोतयाचे राजकारणांत होते त्यांची अवस्था याजप्रमाणें होणार. जासूद जलदीनें पावतीलच. या दोघांस दोन तिवटें द्यावीं. सांडणीस्वार सरकारांत आला त्यास कडीं सोन्याचीं व वस्त्रें दिलीं. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों व शिक्केकटारही पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९११. श्री. (४ नोवेंबर.)

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंति सेवक अंताजी शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत आश्विन वद्य नवमी इंदुवार प्रातःकाळ-

---

१ पागोटीं. २ रघुनाथराव नीलकंठ कुरुंदवाडकर. ३ तेरदाळचे फडणीस.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

पावेतों यथास्थित असे. विशेष. करवीरकरांकडील व पुरंदरचें व तोतयाचा मोड जाहल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें.....इकडील वर्तमान तरी श्री. रा. तात्या[1] व रावसाहेब[2] फौजसुद्धां कुडचीहून कुच करून मारेहाळच्या मुक्कामास आले. तेथून रायबागेस गेले. तेथून एकाएकींच कूच करून मौजे इटगीनहाळ परगणे तेरदाळ येथें काल आले. पर्जन्य पडला. डेरे भिजले आहेत. वाळल्यावरी कूच करून मौजे मुडगीनहाळापाशीं नदी उतरून हुणशीहाळ परगणे यादवाड येथें मुक्कामास जाणार.....कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. १९१२. **श्री.** (आश्विन व०–नोव्हेंबर प० पंधरवडा.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री शिवाजीपंत म्हैसकर स्वामी गोसावी यांसी.

सेवक पांडुरंगराव गोविंद. नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत जावें. विशेष. ती॥ मातोश्री अनूबाई यांजकडील तालुकियास राजश्री येसाजी शिंदे उपद्रव करितात. त्यांचा त्यांचा हर्षामर्ष कांहींच नसतां शिर्दवाडची वाडी दंगा करून घेतली व आणखी क्षुल्लक उपसर्ग मनस्वी करितात. हल्लीं जागां जागां जमाव मिळवून आणखी कोठें तोंड टाकितात कळेना ! याजकरितां हा मजकूर सरकारांत विदित करून पन्हाळेकडून वकील तेथें आहेत त्यांस उत्तम प्रकारें ताकीद करून येथें हे स्वस्थ राहात तें करावें. मौजे लाट व रांगोळी दोनी गांव पुरातन राजश्री राणोजी घोरपडे सेनापतीचे. त्यास कैलासवासी व्यंकटराव गोमांतकाचे स्वारीस जातेसमयीं सेनापतींनीं दोनी गांव यांसी दिले आहेत. पूर्वी हे गांव पिसाळास चाकरींत होते. हा मजकूर ती॥ कै॥ त्रिंबकपंत आपांचे

---

१ पांडुरंगराव गोविंद. २ कोन्हेरराव त्रिंबक.

समक्ष जाला आहे. सर्वांस दाखल आहे. ऐसें असतां सांप्रत सरकारांतून गांवांची पंचाईत होणार म्हणून ऐकिलें, यास्तव अपूर्व आहे ! हा कांहीं वतनसंबंधीं कारभार नव्हे. राजकारभार. याची पंचाईत कशास पाहिजे ? तुम्ही तेथें प्रसंगीं आहां. तरी सरकारांत हा मजकूर विदित करून मातुश्रीचे गांव मातुश्रीकडे चालत तें करावें. जाब साल खरा आहे. खाटा पडावयाचा नाहीं. ज्या गोष्टीनें मातुश्रीचें उत्तम दिसेल तें करावें. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. १९१३. (कार्तिक शु० ६–१७ नोवेंबर)

शिवाजी बाबाजीचें ९ सवाल रविवार मुक्काम पुणेंचें पत्र पांडुरंगरावास—

" तोतयास घेऊन राजश्री रघोजी आंगरे खालापुरास छ० १ सफरीं शिंद्याजवळ आले. आंगरे व शिंदे यांच्या भेटी जाल्या. दोन तीन दिवसांत पुण्यास येतील. कर्नाटकांत फौजा कोण कोणत्या येणार म्हणोन लिहिलें, त्यास तूर्त करवीरकरांच्या पारिपत्यास श्रीमंत राजश्री भाऊ थोडके आहेत; याजकारितां रास्ते एक दोन दिवसांत कूच करून तिकडे येतात. कार्तिकअखेर हरीपंत तात्या हुजरातेसुद्धां येतील. "

नं. १९१४. श्री. (कार्तिक शु० १–१२ नोवें०)

श्रीमंत राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ २९ रमजान भौमवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ २० रमजानचें व छ २१ रमजानचें येणेंप्रमाणें पत्रें पाठविलीं तीं छ २८ मिनहूस पावून लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राजश्री हरिहरराव सासवडास आले. त्यांजकडून पत्र सुरक्षितपणें

आल्याचें आलें. त्यांजकडे पत्र पाठविलें होतें कीं " आम्ही येतों. श्रीमंतांची भेटी करून मग पुण्यास श्रीमंत राजश्री नानाचे भेटीस आपण आम्ही मिळोनच येऊं; " येणेंप्रमाणें लिहिलें होतें. त्यांणीं पत्रीं लिहिलें कीं आम्ही बुधवारीं पुण्यास येतों. जासुदाजवळ तोंडजबानी सांगितलें कीं " श्रीमंत राजश्री बळवंतराव किल्ल्यावर आहेत. आम्ही श्रीमंतांकडे त्यांसच नेऊन जाऊन भेटी घेऊन येतों. " त्याजवरून जावयाचे राहिलों. ते उदईक पुण्यास येणार. कळावें. श्रीमंत राजश्री तात्यांचें कूच जाहलें, पुढें गेल्याचा मजकूर लिहिला तो कळला. तिकडूनही पत्रें आलीं आहेत. तोतया व त्या समागमींचे शिवाजीपंत परांजपे व धोंडोपंत व दौलतगीर व राजश्री लक्ष्मणराव कोलटकर येणेंप्रमाणें राजश्री राघोजी आंग्रे घेऊन छ २५ रमजानीं कुलाब्याहून निघाले ते तीन मजलींनीं आज शिंद्याजवळ येणार. आज शिंद्यांच्या व राजश्री राघोजी आंग्रे यांच्या भेटी होणार. उदईक शिंदेसह कूच करून तीन चार दिवसांत पुण्यास येणार. तोतयाची चौकशी उत्तम प्रकारें करून मग श्रीमंत सौ मातुश्रीबाईच्या नजरेस घालून पुनः संशय कोणास पडूं नये असें करून पिंजऱ्यांत घालून ठेवावा येणेंप्रमाणें ठरलें आहे. किल्ले सुवर्णदुर्ग अंजनवेलीपावेतों ठाणीं बसलीं. रत्नागिरीपासून पलीकडे किल्ले राहिले त्यांस ठाणीं बसवावयासी गेले आहेत. कोणताही किल्ला दम धरीत नाहीं. श्रीमंत राजश्री दादासाहेब तारापुराजवळ अहिते. राजश्री गणेश विश्वनाथ त्यांच्या पाठीवर आहेत. इकडून राजश्री भिवराव पानशे वसईकडून गेले. राजश्री शिवाजी विठ्ठल व हुजुरातपैकीं कांहीं फौज येणेंप्रमाणें त्रिंबकाकडून जाणार. वसई आरमार जल. मार्गानें त्यांजवळच समुद्रांत आहे. चहूंकडून जखडबंदी जाहली आहे. चोरून पळोन गेले तरी न कळे ! परंतु सावधतेविशीं सर्वत्रांस पत्रें गेलीं आहेत. श्रीमंतांचा प्रताप थोर आहे ! धरले जातील. तोत-

यार्चे पारपत्य जाहलें. आतां करवीरकर व हैदरखान आदीकरून पादाक्रांत होतील. शिंद्यानें प्रस्तुत लबाडी फार केली. श्रीमंत राजश्री भाऊचें सामान थोडकें, याजकरितां रास्ते भाऊंकडे रवाना करावयाचा मनसबा काल ठरविला आहे. राजश्री हरीपंततात्या कर्नाटकांत जाणार. ऐवजाचे...वासी (?) करितां तरतुदेस मासपक्ष लागेल. तरतद होत आहे. धारेस श्रीमंत सौ॥ आनंदीबाई आहेत. ठाण्यास खंडेराव त्रिंबक यांणीं मोर्चे लाविले आहेत. दिवसगत लागली आहे. मोर्चे आहेत. तोतया सांपडल्याचें कळतांच तोफा मारिल्या, उत्तम गोष्ट केली. तोतयासमागमें सांपडलेल्यांची नांवनिशी पेशजी लिहिली आहे. त्याजकरून कळलें असेल. समागमें आणल्यांची नांवनिशी हल्लीं पत्रीं लिहिली आहे. वरकड कुलाब्यास असतील. राजश्री व्यंकटराव घोरपडे व वासुदेव[2] बाबा मुंबईस गेले म्हणोन बातमी आली आहे. महीपत भुजंग लष्करांहून येथें आला आहे म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. आपण किल्ल्याची फार बंदोबस्ती केली आहे म्हणोन वर्तमान कळलें, उत्तम गोष्ट. सारें जीवन तेंच आहे. महिपतीस पत्र लिहिलें आहे. तेथें तो असल्यास पावतें होईलच. शिक्के कटार उदईक लष्करास रवाना होतयासी आपणांकडे (सरकारचे) हुजरे यांजबरोबर पाठवितों. आपण पुढें रवाना करावी. कागल शिंद्यानें घेतलें म्हणोन वर्तमान आहे. सत्य मिथ्या न कळे. लिहावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९१५. श्री. (आश्विन वद्य–नोवेंबर प.पंधरवडा.)

राजश्री सदाशिवपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं—

विनंती उपरि. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. लिहिला भाव

---

१ येसाजी शिंदे. २ वासुदेव अनंत मुतालीक निा प्रतिनिधि. पूर्वी पेशव्यांनीं किल्ल्यावर कैदेंत टाकिलें होतें ते पळून प्रथम चाणकोटास इंग्रजांकडे व नंतर तोतयाकडे गेले होते.

सविस्तर कळला. येविशीं आपलें आमचें बोलणें कोंकणांतच जाहलें होतें, व तेथें आल्यावर होतें त्याजप्रमाणें भींड न धरितां सांगितलें. त्यास मी लबाड जाहलों, वरकड सर्व भले शहाणे कार्यकर्ते जाहले, आमची अनास्था जाणून आम्ही निकाल काढून निघालों. मुख्य अर्थ होणारें भवितव्य सोडीत नाहीं ! आतां मातुश्री यांसी अवसान देऊन पुढील यत्न करावा. उतावीळी करून पुरंधरास जातील तरी जाऊं न द्यावें. अबरू राहणार नाहीं. परिछिन्न जाऊं देऊं नये. कागदीं पत्रीं यत्न करावा. मातुश्री यांसी पत्रें लिहिलीं आहेत. पुरतेपणीं श्रवण करवन उत्तर सत्वर पाठवावें. आमचे जांवई तोतयाबरोबर होते त्यांची अवस्था काय जाहली कळत नाहीं. आम्हांस मोठी काळजी लागली आहे. तरी कोणी कोंकणचा माहीत मनुष्य मिळवून त्यास पैका पडेल तो देऊन जांवई कोठें आहेत तें मनास आणून आम्हास कळविणें. तत्राप लष्कर दूर गेलें तरी मिरजेस पत्र पाठविणें, तेथून जासूद येतात त्याजबरोबर आम्हांस पत्र पावेल. येवढें कार्य आमचें केलें म्हणजे सर्व गोष्टी आम्हांस दिल्या अशा होतील. आपण मातुश्री यांस अवसान देऊन यत्न करणें तो करावा. आम्ही भेटून येणार होतों, परंतु त्यांस कैसें भासेल नकळे, आणि लष्कर पुढें चाललें, मग पेंच पडेल, याअर्थें न आलों. आणि आम्हांस त्यांचें पत्र नाहीं. मग यावयाचें कारण काय ? आम्ही होईल ते चाकरीस अंतर. करणार नाहीं. श्रीमंत राजश्री तात्यासाहेबही यत्नास चुकले नाहींत. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

---

[1] इचलकरंजीचे फडणीस महादाजीपंत दातार यांचें पांडुरंगराव तात्या पटवर्धन यांचे लष्करांतून इचलकर्जीस पत्र व्यंकटराव घोरपडे तोतयाकडे गेले होतें त्यासंबंधें.

इ.कें १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १९७६

नं. १९१६. श्री. (अश्विन वद्य-नोव्हेंबर प० पंधरवडा.)

विनंति सेवक महादाजी विठ्ठल दातार. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. वडिलीं श्रीमंत राजश्री तात्यां यांसी पत्र पाठविलें तें प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविलें आहे. तोतयाचा मोड जाहला-जहाजातन -ळून जात होता तो धरिला. तेथें जहाजांतच श्रीमंत राजश्री दादा[1] व शिवाजीपंत[2] वगैरे ब्राह्मणमंडळी तिकडील सूत्रांतील सांपडली याजप्रमाणें पुरंदरचीं व राजश्री हरीपंततात्या यांचीं पत्रें आलीं. श्रीमंत राजश्री दादा सुखरूप आहेत, यांजकडे सांपडले आहेत, याजप्रमाणें आलीं. तेच दिवशीं श्रीमंतांनीं राजश्री शिंवाजीपंत यांसी 'दादा व हरबादादा[3] यांच्या साहित्यास अंतर न करणें.' याजप्रमाणें बहुतच अगत्य वादें दोन पत्रें लिहिलीं आहेत. हे आपणाकडून साहित्यास अंतर करीत नाहींत. 'समयास आपण मिरजेस[4] असतों तरी पुरंदरास जाऊन खामखां दोघांसही हातीं घेऊन येतों; परंतु मसलतीस जाणें प्राप्त जाहलें. बरें ! कागदीं पत्रीं साहित्यास अंतर करीत नाहीं.' याजप्रमाणें पुरतेपणीं वचन दिलें आहे. आपण उताविळी करून पुरंदरास जावयाचें न करावें. श्रीमंत राजश्री नाना यांसच पत्र लिहावें, " मूळ आपणास नकळत गेला. तत्रापि त्याणें जाऊन कांहीं दहा पांच हजार फौज गेली नाहीं. त्यांनीं जाऊन आपला नाश करून घेतला. होणार सोडीत नाहीं. आह्मांस वृद्धापकाळीं दुःखांत घातलें. हे समयीं आपण अनास्था केली तरी आमची बाकी रहात नाहीं. शेवटास शरण आपणाखेरीज आम्हांस दुसरा नाथ नाहीं. गुदस्तां आपण व मिरजकर[5] याणीं सर्व प्रकारें साहित्य केलें. मिरजकर

---

१ पत्र पांडुरंगरावांच्या लष्करांतून इचलकरंजीस अनूबाईस. २ पांडुरंगराव गोविंद. ३ व्यंकटराव घोरपडे अनूबाईचा नातु. ४ परांजपे. ५ म्हैसकर पुणें दरबारचे वकील. ६ हरी भास्कर पटवर्धन मिरजकर (हरबाअण्णा). ७ करवीरप्रकरणीं.

यांच्या कर्जांत बुडालों आहों. आह्मी आतां बहुत दिवसांची सोबती नाहीं. मिरजकर यांच्या कर्जांतून बाहेर पडावें इतका हेत आहे. ऐसीयासीं आपण कृपाळू होऊन मुलाचे सर्व अपराध क्षमा करून आम्हावर नजर देऊन कर्जांतून मुक्त होऊन माझा परिणाम शुद्ध होय तें करावें. आपणाखेरीज दुसरे कोणास शरण जावें ? " याजप्रमाणें वारंवार नानाफडनवीस यांस लिहावें व राजश्री हरीपंततात्या व सर्व कार्यभागी यांसी पत्रें लिहावीं आणि राजश्री सदाशिवपंत अगर महादाजीपंत या उभयतांतून एकजण अगर कोणी शहाणा माणूस पाठवून यत्न करावा. याजप्रमाणें राजश्री तात्या यांणीं सांगितलें आहे. तरी वडिलीं पत्रें लिहून कोणी शहाणा माणूस पाठवावा. मीच येणार होतों, परंतु तूर्त निरोप होत नाहीं. हे कांहीं आपणाकडून साहित्यास अंतर करीत नाहींत. मीही वरचेवरी विनंति करितों. वडिलीं फार घाबरें न व्हावें. दादा जिवानिशीं सांपडले तेव्हां सर्व गोष्टी विचारें विचारें होतील. आपण अवसान सोडल्यास आपला जीव जगत नाहीं; त्यापक्षीं कांहींच होत नाहीं. आपण स्वस्तिक्षेम असल्यास आपले पुण्येंकरून सर्व गोष्टी निभावतील. होऊं नये तें जाहलें. तत्रापि अवसान धरून यत्न होईल तो करावा. आपणांकडील सरंजामाची जप्ती सरकारांतून करविली तत्रापि याणीं आपण ज्या हातें बरें केलें त्या हातें वाईट करूं नये या अर्थें जप्ती केली नाहीं. परंतु याउपरी हुजुरून जप्ती झाडून होणार. ऐसीयासी यांचे स्वाधीन खेडीं कांहीं केलीं तरी यांसी हे आपल्या कर्जांत दिलीं आहेत म्हणतील व आपगही त्यांचे कर्जांत दिलीं म्हणावें; म्हणजे कांहीं हे कर्जांत ऐवज घेतील व कांहीं सावकारांचे उपयोगी पडेल. येविषयींचा अर्थ ध्यानांत आणून सर्व कार्यभागीयांचे विचारें करावयासें जाहलें तरी सत्वर उत्तर रातोरात पाठवावें. म्हणजे यांचे कानावर घालूं. वरकड

शके १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

आपल्या साहित्याविषयीं माणसें जातात त्यागणिक पत्रें हे लिहितात. वडिलींही वरचेवर यांस पत्रें लिहीत जावीं. या पत्राचा जाब लवकर पाठवावा. जप्ती आल्यावर मग उपाय चालणार नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९१७. **श्री.** (आश्विन व०-नोव्हेंबर प०पंधरवडा.)

पुरवणी वडिलांचे सेवेशी.

विनंति विज्ञापना. चिरंजीव राजश्री दादा मुंबईस सुखरूप आहेत. हल्लीं राजश्री गोविंदपंत यांस दरबारची परवानगी घेऊन तेथें पाठविलें आहे. कां म्हणाल तर भलतेकडे जातील, भलतेंच करितील. याजकरितां पाठविले आहेत. खर्चाचा मजकूर कोणाच्या नांवें चिठ्ठी न लिहावी. ऐवज पाठऊन द्यावा. पहिली आह्मीं तरतूद करावया अंतर केलें नाहीं. सारांश गोष्ट धीर असावा. वडिलीं चिंता न करावी. महिना पंधरा रोज इचलकरंजीचें ठाणें मात्र त्यांच्या हातास न द्यावें. राजश्री महादाजी शिंदे यांसही मीं भीड घेंचिली आहे. वडिलांचें नांव समर्थ आहे. चोहोंकडून पुरावा करविला आहे. कां म्हणून तर केवळ उघडें न व्हावें, आब रक्षावा. सर्व घडून येणें श्री-व्यंकोबा समर्थ ! वडिलांचें पुण्य समर्थ ! सर्व मजकूर चिमणाजीपंत सांगतील तो ध्यानीं आणावा. आपण व सदाशिवपंत व कृष्णाप्पा व चिमणाजीपंत वेगळे वाटेनें बसोन सर्व पुढील अंदेश ध्यानीं आणून उत्तर खचित उभयतां बरोबर पाठवावें. आणि या गोष्टी बाहेर स्पष्ट करूं नयेत. चित्तांत ठेवाव्या. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. १९१८. **श्री.** (२१ नोव्हेंबर.)

शिवाजीबाबाजीचें कार्तिक शु॥ ११ गुरुवासर मु० पुणेंचें पत्र.

" तोतया काल मुक्कामास तळेगांवाजवळ शिंदे आंग्रेसुद्धां

---

१ त्रिंबकरावमामा पेठे यांची स्त्री वेणूबाई हिचें अनुबाईस पुण्याहून इचलकरंजीस पत्र. वेणूबाई ही अनबाईची कन्या.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

आले. समागमें खासा तोतया व दौलतगीर व शिवाजी आप्पाजी व धोंडोपंत व लक्ष्मणराव कोलटकर येणेंप्रमाणें आहेत. वरकड घोरपडे व हरबाअण्णा रघुनाथराव कोलटकर वगैरे मंडळीकडे आंग्रयानें कानाडोळा केला यामुळें ते सांपडलेले सुटून मुंबईस गेले. श्रीमंत राजश्री दादासाहेब तारापुराजवळ होते. त्यास चहूंकडून फौजा गेल्या, अडचणींत होते, पळावयास वाट नाहीं, हें चित्तांत आणून मुंबईस गेले. पांचसातशें पाईंचें माणूस व तीनचारशें राऊत यांसह तारापुरास अमृतराव मुक्काम करून आहेत. दादासाहेबांनीं पत्रें इकडे पाठविलीं कीं, " सलुख करावा. अतिशयास न पडावें. आमची सोय करून द्यावी. रेवातीरीं राहूं. " येणेंप्रमाणें फारच पायउतारा होऊन लिहिलें आहे. कारभारी यांच्या अटकळेस आलें तर सलुख होईल. नाहीं तरी ते हैदरखानाकडे जाणार म्हणोन वर्तमान आहे. तोतया पुण्यास आला म्हणजे चौकशी होईल. "

नं. १९१९. (कार्तिक शु० १३–२३ नोवेंबर.)

शिवाजी बाबाजीचें ११ सवाल मंदवासर मु० पुणेंचें पत्र—

" तोतया वगैरे पांच असामीसुद्धां शिंदे आंगरे घेऊन आले. आज पुण्याजवळ येणार. कारभारी पुण्यांत मातबर गृहस्थ व सावकार यांजपाशीं कर्ज मागतात. कर्जाचा ऐवज जमा करून राजश्री हरिपंततात्या निघणार. कार्तिकअखेर निघतील. तूर्त रास्ते व घायगुडे करवीरकरांच्या पारिपत्यास भाऊंकडे जावयास रवाना करितात. रामचंद्र गणेश गोकाकेजवळ होते ते हल्लीं कोठें आहेत ? भाऊ व रघुनाथरावदादा यांचा मुक्काम कोणीकडे आहे ? कापशीचें ठाणें घेतल्याचा मजकूर लिहिला तो कळला. आंगरे व शिंदे यांस पुण्यास येण्यास दिवसगत लागली, यास्तव ' तोतयास घेऊन आंगरे येत नाहींत. ' म्हणून पुण्यांत नानाप्रकारचीं मनस्वी वर्तमानें उठूं लागलीं होतीं ! "

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

नं. १९२०. श्री. (२६ नोवेंबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री महादजीपंत दातार दाजी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य कृष्णाजी महादेव काळे साष्टांग नमस्कार विनंति येथील वर्तमान तागा कार्तिक वद्य १ पावेतों मिरज येथें सुखरूप असों. विशेष. आम्ही घराहून निघोन आजी दहा दिवस जाहले. येते समयीं बावडयाचे घांटें आलों. तुमचे चिरंजीव भेटले होते. सर्व सुखरूप आहेत. लौकरच घरीं जातील. विजयदुर्गास सरकारचें निशाण चढलें. आतां कोंकणचा उपसर्ग चुकला.....तुमचे जांवई राजश्री वीस महाजन यांचे पुत्र तोतया समागमें होते, ते मोड जाहला त्यासमयीं कुलाब्यास तोतया समागमें होते. राजश्री राघोजी आंग्रे यांणीं लहान मूल पाहोन अंगावरील वस्तभाव घेऊन सोडून दिले. तो घरीं धालवलीस सुखरूप आला. चिंता न करावी. बहुत काय लिहिणें कृपालोभ असों दीजे हे विनंति.

नं. १९२१. **श्रीगणराज.** (कार्तिक व० २–२७ नोवेंबर.)

पैा छ १९ सवाल सन सब्बा सबैन. मुक्काम बेटगिरें.

अपत्यें रघुनाथरायानें[1] साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १५ सवालपावेतों यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वाद–पत्र येऊन सविस्तर कळत नाहीं, ऐशास सविस्तर लिहावया आज्ञा केली पाहिजे. यानंतर तीर्थस्वरूप राजश्री भाऊ येडुरावर आहेत. आम्ही एका दो दिवशीं जाऊन मिळतों. उदईक गुरूवारीं मुहूर्तें निघोन औरवाडचे मुक्कामास जातों. तेथून लवकरच जाऊन तीर्थस्वरूपांस सामील होतों. करवीरकर येसाजी शिंदा वगैरे करवीरींच आहेत. जमाव हजार दीड हजार स्वार

---

१ रघुनाथराव नीलकंठ यांचें कुंदवाडाहून पांडुरंगराव गोविंद यांस पत्र.

व तीन चार हजार प्यादा आहे. आणखी जमाव ठेवितात. चिरंजीव राजश्री हरिहरराव बाबा सासुरवाडीस गेले होते ते आले. तोतया मंडळीसुद्धां तळेगांवास येऊन दाखल जाहला म्हणून तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेबांनीं लिहिलें होत. वडिलांस कळावें याजकरितां लिहिलें असे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. १९२२. श्री. (कार्तिक व० २–२७ नोवेंबर.)

राजश्री दौलतराव हिंदुराव घोरपडे गोसावी यांस.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा॥ पांडुरंगराव गोविंद. आशीर्वाद. विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. इकडून राजश्री बहिरजी बाबा निरोप घेऊन पंधरा दिवसांत फौजसुद्धां यावें असा करार करून गेले ते येऊन पावलेच असतील. त्यांनीं सविस्तर मजकूर सांगितल्यावरून कळलें असेल. आम्ही मुरगोडची बारी पार होऊन दोडवाडानजीक आलों. सुतकट्टें ठाणें कितूरकराचें जबरदस्त होतें. तें काल येतांच घेतलें. आज छ १५ सवालीं बेटगिऱ्याच्या मुक्कामास गेलों. अमित्राकडील फौज हुबळीहून बेटगिऱ्यास आली होती.[1]

नं. १९२३. (२८ नोवेंबर.)

परशुरामभाऊचे कान्हेरराव व पांडुरगराव यास पत्र.

१६ सवालचें येडूरच्या मुक्कामचें.

" तोतया पुण्यानजीक आला. येसाजी शिंदे करवीरींच आहे. रामचंद्र गणेश गोकाक प्रांतींच आहेत. चिरंजीव राजश्री सुभेदार काल बाहेर निघाले. चिरंजीव रघुनाथराव आज निघणार. श्रीधर-

---

१ गजेंद्रगडकर. २ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें. ३ शिवराव नीलकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर हे सुभेदार, कीं गणपतराव कोन्हेरराव सुभेदार ? दोघांसही सुभेदार म्हणत असत.

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

पंताचें साखरप्याहून पत्र आलें त्यांत लिहिलें आहे कीं, रत्नागिरी, विजयदुर्ग वगैरे किल्ले कोंकणपट्टीचे सारे येऊन बाजीपंत अण्णास भेटले. सरकारचीं निशाणें चढलीं. दादाशास्त्री लिमये हेही सांपडले. कृष्णेस उतार जाहल्यावर आम्ही दोन चार दिवसांत पार होऊन चिकोडीस जातों. "

नं. १९२४. (कार्तिक व० ५–३० नोवेंबर.)

शिवाजी बाबाजीचें १८ सवालचें मुक्काम पुणेंचें पत्र पांडुरंगराव यास.

" तोतयास घेऊन शिंदे आले. संगमावर मुक्काम आहे. शिंद्याच्या व आंगऱ्याच्या भेटीस श्रीमंत राजश्री नाना गेले होते. काल भेटी जाल्या. आंगऱ्यास सामोरें जावयाची चाल पहिल्यापासून आहे. त्याप्रमाणें गेले होते. तोतयाची चौकशी मातबर मातबर मिळून करणार. श्रीमंत सौभाग्यवती बाईचे नजरेस घालून संदेह सर्वांचे फेडून उपरांतिक पारिपत्य करणार. ब्राह्मण ठरल्यास डोळ्यास अपाय करावा. कनुज्या ठरल्यास थोरलेंच पारिपत्य करावें असा ठराव आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईस गेले आहेत. परंतु इंग्रजांच्या तहांत गुंता दिसत नाहीं. धारेच्या किल्ल्यास अद्यापि मोर्चे आहेत. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई हस्तगत जाहल्याचें वर्तमान ऐकतों म्हणून लिहिलें, त्यास वर्तमान असें. (धारेचा) किल्ला अद्यापि झुंजत आहे. दादासाहेबांकडील सरदारांचें बोलणें सुरू आहे. तें न ठरल्यास तारापुरास थोडक्याशा लोकांनिशीं अमृतराव आहेत त्यांस भिवराव पानशे लुटून हस्तगत करणार. पानशे अमृतरावासमीपच उतरले आहेत. किल्ले सिंहगडाखेरीज झाडून आले. आपाभट परांजपे व रामचंद्र नाईक यांची स्त्री रत्नागिरीहून आणविलीं आहेत. त्यांचें चांगलेंच पारिपत्य करणार. "

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

श्रीगणराज.

नं. १९२५. (कार्तिक वद्य -दिसेंबर प० पंधरवडा.)

चिरंजीव राजश्री रामाजी नारायण गोखले यांसी पांडुरंगराव गोविंद. आशीर्वाद. उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें विशेष. तुम्हीं दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं वं तबकीरही पावलें. याच अन्वयें घराऊ चांगलें तबकीर करवून पाठवीत जाणें. तोतया मोडला आणि जिवंत धरला हें वर्तमान तुह्मी तीर्थस्वरूप राजश्री भाऊस लिहिलें म्हणून लिहिलें, उत्तम केलें. वडिलांनीं पत्रांत पूजा यथासांग तुमची केलीच असेल ! तोतया धरला याजमुळें कोंकणांतील खाद-दळवी[1] वांचले. तोतया धरल्याचें वर्तमान ऐकून तुह्मीं नग्न श्रीविष्णूच्या देवालयांत भक्तिपुरस्सर प्रेमयुक्त नृत्य केला ह्मणोन परस्परें एका गृहस्थांनीं लिहिलेवरून कळलें ! अमा नवस हरएक अन्यत्र स्थळीं केलयास कोणी नको म्हणत नव्हतें. देवाच्या सन्निधानींच केलेंत, त्यावरून तीर्थस्वरूप राजश्री अंताजीपंततात्या[2] व भाऊ[3] तुम्हांस सहस्रनामें वाहतात तीं साजत ! वडिलांचे लिहिणेच्या पद्धतीप्रमाणेंच लिहिलें आहे. खाददळवी तुमचे वांचले ! सदैव वर्तमान लिहीत जाणें. चिरंजीवांसही तुह्माविशीं लिहितों. हे आशीर्वाद.

नं. १९२६. (दिसेंबर—प० पंधरवडा.)

पांडुरंगरावाचें गंगाधररावास पत्र लष्करांतून मिरजेस—पैा॥ छ १३ सब्बा सबैन—

" आह्मी त्रिवर्ग व शिवरामबाबा मिळोन फौज सहा हजार आहे. बहिरजी घोरपडेही आपला जमाव घेऊन पंधरा दिवसांत इकडे येणार आहेत. "

---

१ या इसमासंबंधें हरिवंशाची बखर पृ० ७३ मधील मजकूर व त्याखालची टीप पहा. २ खाददळवी म्हणजे खाण्याच्या कामांतले सेनापति ! भोजनभाऊ. ३ यादवाडकर. ४ परशुरामभाऊ. ५ गंगाधरराव गोविंद यांस.

श. १६९८ तोतयाच्या बंडाचा बीमोड इ. स. १७७६

नं. १९२७. (क़ार्तिक व० ६–१ दिसेंबर.)

शिवाजी बाबाजीचें १९ सवाल मुक्काम पुणेंचें पत्र गंगाधररावांस–

" आजपासून तोतयाची चौकशी होणार. वे॥ राजश्री रामशास्त्री यांचें बोलणें जाहलें. बाबूजी नाईक यांसही बोलावूं पाठविलें आहे. भास्करपंतआपांसही बोलाविलें आहे. तोतयाचे चौकशीसाठीं बुदरुख जमा करितात. "

नं. १९२८. श्री. (५ दिसेंबर.)

पौ छ २६ सवाल मुरुमन मवा सबैन मय्या व अल्फ.

तीर्थस्वरूप राजश्री तात्यासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामाजी नारायण गोखले साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ कार्तिक वद्य दशमी वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलांकडून अलीकडे पत्रें येऊन कांहीं कळत नाहीं, तरी मोठी चिंता लागली आहे. वडिलीं पत्र ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. श्रीमंत भाऊसाहेबांस पुरंधरची आज्ञा कीं, येसाजी शिंदे याचें पारिपत्य तुम्हीं व रा. राघो नीलकंठ व रास्ते व धायगुडे मिळोन करवीरचें पारिपत्य करावें. त्यास हजार बाराशेंनिशीं आमचे सरदार. तोफा नाहींत. रास्ते व धायगुडे येणार तेव्हां दिवसगत आहे. येसाजी शिंदे यांणीं करवीरास ताकीद केली कीं, सर्वजणांनीं पळोन जाणें. मग नागवले जाल गुदस्ताप्रमाणें, तर आह्मांस बोल नाहीं. अशी दोन तीन वेळां ताकीद जाहली त्यावरून शहर आज आठ दिवस पळत आहे. आपण स्वतः करवीरींच आहे. गल्ला खरेदी जोरी वगैरे दाणा वर्षाची बेगमी करितो. खरेदी गल्लयाचें काम प्रस्तुत लाविलें आहे. तीन हजार स्वार व पायदळ चार पांच हजार आहे व महादजी शिंदे यांजकडेही त्याचे

---

१ भास्कर हरि पटवर्धन मिरजकर. २ लष्करांत पांडुरंगराव गोविंद यांस मिरजेहून पत्र. ३ कुरुंदवाडकर. ४ आनंदराव. ५ नरसिंगराव.

कारकून गेले आहेत. बनल्यास तिकडून सरकारांतून बंदोबस्त करून ध्यावा याप्रमाणें आहे. राजश्री श्रीधरपंत भिलवडीचे मुक्कामाहून पांचशें प्यादे व शंभर स्वार घेऊन खालीं रत्नागिरीकडे आंब्याचे घांटें जावें, एखादें स्थल गडबडेंत संधान लाऊन घ्यावें, म्हणोन गेले होते, ते मलकापुरावरी मुक्काम करून होते. तों पुण्याहून राजश्री गंगाधरपंत व गोविंदपंत अभ्यंकर हजार स्वार व हशम हजार असे मलकापूरच्या मुक्कामीं आले. श्रीधरपंतांची भेट जाहली. मग ते हे मिळोन विजयदुर्गाकडे अणस्कुरेच्या घांटें खारेपाटणास गेले. तों रत्नागिरी जयरामपंत बापट यांणीं घेतली. विजयदुर्गावरी निशाण चढलें. जानोजी धुळप व शिवाजीपंत हाँलीमान्याचे भाऊ तोतयाकडून सुभेदार होते ते असे उभयतां येऊन राजापुरच्या मुक्कामीं गंगाधरपंत व गोविंदपंत यांसी भेटले. किल्ले हस्तगत जाहले. श्रीमंतांचें पुण्य विचित्र ! तोतयाचे प्रकरणांत खाददळवी व दस्तैवजी गृहस्थ फार सांपडले. निखालस म्हणावें तरी आपण व (उभयतां) कारभारी मिळोन त्रिवर्ग दस्ताऐवजीं व बोलणें चालणेंत नाहीं. लोकांची निखालसता बोलण्याची. वरकडानीं ++ गमन केलें ! ! ! वडिलांचें पुण्य विचित्र, मग ईश्वर बुद्धु अशी आपणास देणारच नाहीं. आणि कैलासवासी तीर्थरूप नानाचा आशीर्वादही पूर्ण आहे. दिवसेंदिवस आपली फत्तेच आहे. आह्मांस काल दृष्टांत श्रीनें चांगलाच दिला. पुराणिकबावांस श्रवण केला. त्याणीं सांगितलें कीं, यजमानाचें दिवसेंदिवस यश व लौकिक आणि फलश्रुत चांगलीं असें सांगितलें. वडिलांस कळावें. वरकड श्रीमंत बाळासाहेब याणीं लिहिलें त्यावरून कळेल. किल्ल्याचा बंदोबस्त आपण असतां होता तसाच चांगला आहे. वेशी तीन बंद.

---

१ उपनांव भानु. हेच पुढें विजयदुर्गचे मामलेदार होते. यांचे वंशज मिरज व वांई येथें राहतात. २ बंडखोर रामचंद्र नाईक यांचा.

परकी जाणारा येणारास कुपवडें वेस व विजापूर वेस. या दोन वेशींनीं परक्यांनीं यावें जावें. विजापूर वेशीवर कृष्णाजीपंत पटवर्धन व बाळाजीपंत लेले. कुपवडें वेशीवर गोविंदपंत कोंतेकोडं (?) हशमांतील, व बापू शामराव यांचा भाऊ. किल्लेचे दरवाजेवरी शंकराजीपंत व गिरमाजी कान्हो. याप्रमाणें कारकून. चिठीनें जावें, चिठीनें यावें. परवानगीशीं संबंध नाहीं. याप्रमाणें बंदोबस्त. कळावें. गुरूवारपेठेंत वाणी बसाप्पा ह्मणोन होता. त्याचा उदीम ह्मणावा तरी बंदुखा गाडद्यांस खरेदी करून व बंदुखा भाड्यानें देऊन शिरोळांस[1] चाकर ठेवावे. बंदुखांचें भाडें दर महिन्यास जाऊन आणावें, व प्यादे करवीरास ठेऊन द्यावे, इचलकरंजीस प्यादे ठेऊन द्यावे, इकडील बातमी तिकडे पोहोंचवावी, हा उदीम ! मला बातमी कळतांच श्रीमंतांम जाऊन याप्रमाणें आहे म्हणोन सांगितलें. धरून किल्ल्यांत नेला. विचारिलें, त्यास तो मान्य झाला. त्याप्रमाणें कैदेंत आहे. याप्रमाणें वर्तमान. प्रस्तुत बाजारांत करडी तांदूळ तीन[2] पायली निठवें. बाजरी नऊ पायली. हरबरे साडेतीन. मूग सहा सात पायली. याप्रमाणें गल्यास भाव आहे. धातूचा जिन्नस मोहरकस सोनें सव्वा पंधरा. येकेरी होन चार रूपये. दुवळ धारवाडी जुने सवातीन. दुवळ नवे धारवाडी तीन रूपये नऊ आंणे. याप्रमाणें धातूस भाव आहे. कापड तो पहिल्याप्रमाणें आहे. आमचीं नारायणपेठचीं ओझीं सहापावेतों आलीं. चार पांच मागाहून येतात. लग्नाचे कापडाचा सरंजाम दोन लग्नाचें कापड जें मागतील तें तयार करून श्रीमंताची मर्जी रक्षून आहों. नित्य सायंकाळीं वैराटपर्व चार घटका आयकोन आहों. वेा जिवभट पुराणिक यांचे लग्नाचा करार जाहला.

---

१ शिरोळ हें ठाणें कोल्हापूरकरांचें. २ हें मिरजेचें जुनें माप. ६४ भार मापटें.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

तासगांवचे गृहस्थाची मूल दहा वर्षांची चांगली. नऊशें रुपये नक्त द्यावे. पांचशांच्या वस्ता घालाव्या. व शंभर रुपयेचें कापड व अन्न-खर्च पन्नास रुपये. सोळाशेंपावेतों लागतात. करारमदार श्रीमंताचें गुजारत्तीनें जाहला. मार्गशीर्ष मासीं लग्न. दोनींकडील मध्यस्थ कवठे-कर आराध्ये व भास्कर तानदेव. याप्रमाणें वर्तमान. राजश्री बाळाजी-पंत यांचे लग्नाचा मजकूर पूर्वील पत्रीं लिहिला आहे. पुराणिकबावां-जवळ ऐवज ह्मणावा तरी सातशेंपावेतों नक्त ऐवज आहे. त्यांत आठशें कर्ज काढावें लागेल. मी इतकी बातमी वडिलांस लिहितों पण कोपाचा मजकूर असल्या सूचना जाहालिया लिहिणार नाहीं ! ! ! पुण्यांत प्रस्तुत कर्जपट्टीचा कडाखा जाहला आहे. चौसष्ट लक्षांची पट्टी सराफ वदंता; परंतु तीस चाळीसपावेतों असेल. वल्लभ सुंदर यांची तीन लक्षांची निशा जाहली. बाळोबा नाईक लक्ष देतो. मात-श्री अम्माजवळ लाख मागतात. पंचवीसपावेतों कबूल जाहली, परंतु ऐकत नाहींत. चौकी बसली आहे. याप्रमाणें जोग, गद्रे, तासक्ये (ताटके ?), थत्ते, भाव्ये, रामाजी नाईक दातार, त्रिंबक विनायक चाबूकस्वार, तापीदास काशीदास, राघोजी बगाडे, भुतकर, कानदास यांच्या घरीं चौक्या आहेत. याप्रमाणें कर्जाचा मजकूर. कारभारी यांच्या आपले द्रव्यास धक्का नाहीं ! दुसऱ्यावरी तंबी बसवावी ! तमाम सावकारी मंडळीवरी कर्जपट्टीचा कडाखा जाहला आहे. पुण्याजवळ व सभोंवार पन्नास हजार फौज मिळाली. रोजगारशीर व बेकार मिळून. कर्जपट्टीचा वसूल चालीस लागला. राजश्री हरिपंत-तात्या यांचा सरंजाम करून कार्तिकअखेर करवीरास येणार. मग कितुरावरून आपणाकडे येणार. तोतयास पुण्यास आणलें; त्याकडील ग्रहस्त मिळालेले यांसी तंबी पोंहोचविली. इतकें असोन गांवांत कोणाकोणास अजून खरें वाटत नाहीं ! आणि आपले वाड्यांतच

बातमी उठवून ते व त्यांचे खाददळवी तांडव करितात ! मात्रागमनी फजीत पावतील ! फार लिहिलें म्हणोन रागास न यावें. अंग प्रकृत ! बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. १९२९. (कार्तिक व० ११–६ दिसेंबर.)

गंगाधरराव गोविंद यांस शिवाजी बाबाजीचें २४ सवाल भृगुवासर मु० पुणेंचें पत्र—

" तोतयाकडील मजकूर तरी ज्यांस ज्यांस संशय आहेत त्यांस त्याजकडे पाठवितात. मुख्यत्वें राजश्री त्र्यंबकपंत वर्तक जात असतात. बाबूजी नाईकही बारामतीहून आले. दोन तीन दिवसांत चौकशी होणें ती होईल. नवी चौकशी काय होणें आहे ? पहिलीच जाहली आहे. परंतु मूर्ख जन जे आहेत त्यांचे संशय मेल्याखेरीज जावयाचे नाहींत ! स्थूलमानानें चौकशी करून पारिपत्य करणार. श्रीमंत दादासाहेब मुंबईस आहेत. सलुखाचें बोलणें लागलें आहे. इंग्रजाकडील सरकारचा सलुख पक्काच आहे. त्यांत गुंता नाहीं. धारेस अद्यापि मोर्चे आहेत."

नं. १९३०. (दिसें. प. पंधरवडा.)

शिवाजी बाबाजीचें नारोपंत दामले यांस पत्र पुरंधराहून मिरजेस—

" राजकी वर्तमान तर तोतयाची चौकशी जाहली. त्याणें स्पष्ट आपण कनुजा म्हणोन सांगितलें. याउपर त्यास शहरांत आणून अप्रतिष्ठा करून पारिपत्यें करणार. "

नं. १९३१. **श्रीसुबराज.** (कार्तिक शु० १२–७दिसेंबर.)

विनंति उपरी. आपण चिठी पाठविली ती पावली. नव्या हुबळीस तोफा सुरू करणार, आपण राजश्री नागोरावसह यावें,

---

१ पत्र शिवराव घोरपडे गुत्तीकर यांचें पांडुरंगरावांस.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

ह्मणून लिहिलें, त्याप्रमाणें मशारनिल्हेसुद्धां स्वार होऊन येत आहों. रवाना छ० २५ माहे सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. १९३२. श्री. (कार्तिक व. १३–८ दिसें.)

पौ छ ३० सवाल सुरूसन सब्बा सबैन मय्या व अल्फ.

श्रीमंत राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं––

पोष्य शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता छ २६ सवाल मुक्काम पुणें यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लष्करचीं पत्रें श्रीमंतांकडून[1] आलेलीं पाठविलीं तीं पावलीं. तोतयाचा मजकूर लिहून पाठवावा म्हणोन लिहिलें, त्यास तोतया पुण्याजवळ आल्यावर चौकशी होत होती. राजश्री बापोजी नाईक बारामतीहून अद्यापि आले नाहींत. राजश्री धोंडोबा अप्पा पुरंधरे आले आहेत ते व वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री व गोपीनाथ दीक्षित व आपल्या मातबर आसाम्या जुने जुने पाहून नांवनिशी लिहून त्यांत राजश्री हरिपंत तात्या व महादजीपंत गुरुजी वगैरे सत्तावीस असामी नेमणूक होती व शिवाय बहुतच होते. बेलभंडार घेऊन गेले होते. त्यास इमानप्रमाण दिलें. "तुह्मी सत्य असेल तें सांगणें. भाऊसाहेब असल्यास सवास पाहिजेत. आह्मी इमान देतों. तिळमात्र वांकडी गोष्ट होणार नाहीं." येणेंप्रमाणें बोलून चालून इमानप्रमाण दिलें. आणि त्याच्या डोईवर बेलभंडार घातला कीं, सत्य असेल तें सांगणें. त्यानें स्पष्ट सांगितलें व लिहून दिलें जे, छत्रपुराजवळ कनोल गांव आहे. तेथील आपण. आपलें नांव सुकलाल. बापाचें नांव रामानन्दा, आईचें नांव अन्नपूर्णा. आजीचें नांव मन्मथा. जात कनुजा. येणेंप्रमाणें लिहून दिलें व खातरजमा जाहली. आतां कांहीं संशय राहिला नाहीं. आज अथवा उद्यां शहरांत फिरवून अप्रतिष्ठा करून पारपत्य करणार.

---

१ पांडुरंगराव गोविंद यांजकडून.

मागाहून होईल तें लिहून पाठवूं. समागमींचे अद्यापि तसेच आहेत पारिपत्य होणार. राजश्री हरिपंततात्या ऐवजाची तरतूद करीत आहेत. तरतूद करून निघणार. रास्ते करवीराकडे गेले. बाजीपंतही घांटाखालून करवीराकडे येणार. श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईसच आहेत. सलूखाचें बोलणें होत आहे. धारेस मोर्चे अद्यापि आहेत. तोतयाचा गुंता उरकला म्हणजे श्रीमंत राजश्री नाना पुरंदरास होळकर शिंदे यांच्या कार्यभागासाठीं जाणार. सिंहगड अद्यापि सरकारच्या हातीं आला नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९३३. **श्रीसुब्रह्मण्य.** (मार्ग. शु. १–११ दिसेंबर.)

पौ छ २९ सवाल. सन सबा सबैन मुा हुबळी.

राजश्री पांडुरंगरावतात्य[1] गोसावी यांस:—

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बहिरजी हिंदूराव [2]घोरपडे. दंडवत. विनंति येथील कुशल जाणून स्वानंद लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें निडगुंदेचे मुकामीं पावोन लिहिला भावार्थ कळला. 'बेटगिरें घेतलें, पुढें येणार, फौजेनिशीं सत्वर यावें,' म्हणोन लिहिलें, ऐसीयास आपणाकडील सर्व भाव तीर्थरूप वडिलांस निवेदन केला. याउपरि सत्वरीच आठ दहा रोजांत फौजसुद्धां आम्हींच येत असों. मागोन उरल्या लोकांची समजाविशी करून राजश्री देवजीपंत सुभेदार येतील. आपणांसीं बोलून आल्यास यावयास आळस नाहीं. बहुत काय लिहिणें. येतों. सर्व भार आपणास मिळाला असे. हे विनंती.

नं. १९३४. (मार्ग० शु० २–१२ दिसेंबर.)

शिवाजी बाबाजीचें ३० सवाल मुक्काम पुणेचें पत्र—गंगाधररावांस मिरजेस—

---

१ गजेंद्रगडकर. २ आल्याप्रमाणें.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स. १७७६

" फौजा कर्नाटकांत अशा समयास रवाना जाहल्यास मोठाच उपयोग आहे म्हणून लिहिलें तें खरें; परंतु येथें सावकारांवर वैगरे पट्टी केली आहे तो ऐवज जमा जाल्याखेरीज फौजेचें निघणें होत नाहीं. राजश्री मानाजी शिंदे सात आठशें राऊतांनिशीं कर्नाटकांत रवाना जांले. मागाहून थोडे थोडे आणखी रवाना होतील. हरिपंततात्या मास पक्षांत निघतील. श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईस आहेत. त्यांजकडील सलुखाच बोलणें लागलें आहे; परंतु ठरेल असें दिसत नाहीं. अर्जुनगड व पारनेरा किल्ला श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं घेतला होता, त्या किल्ल्यास राजश्री गणेशपंत बेहरे यांणीं मोर्चे लावून किल्ले घेतले. तारापुराप्त सलतनत श्रीमंतांची आहे, तेथें भिवराव आबा पानशे यांनीं मोर्चे लाविले आहेत. तारापुर घेतल्याचें पत्र आज उद्यां येईल. मानसपुत्र अमृतराव तारापुराहून मुंबईस गेले व तेथून सुरतेस गेले. श्रीमंत मनसब्याचे खटपटीस चुकत नाहींत, इंग्रज ऐकत नाहींत! इंग्रजाकडील इकडील पक्केंच आहे. धारेस मोर्चे होते त्यास आंतील सामान सरलें तेव्हां बोलण लागलें आहे कीं, 'अहल्याबाईजवळ पोंचवजें अथवा पुण्यास पोंचवणें' म्हणून श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई म्हणतात, म्हणोन पत्रें आलीं आहेत. श्रीमंतांचें दैव विचित्र आहे. "

नं. १९३५. (मार्ग० शु० २–१२ दिसेंबर.)

पुण्याहून केसो वल्लाळ गोरे यांचें पांडुरंगरावास पत्र ३० सवालचें —

" मिश्रीकोट घेतलें. गोपनकोपेंत ठाणें पडलें. सेरवाड, बुधेहाळ व धारवाड तालुका सुटला. शत्रूची फौज पळोन झाडींत गेली. हुबळी, कुंदगोळ वगैरे बहुतेक सूत्रें आलीं आहेत. झाडून अम्मल लौकरच बसेल. " म्हणोन लिहिलें, तेणेंकरून संतोष जाला. तोतया संगमास होता. चौकशीस वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री, महा-

दर्जापंत गुरूजी, मोठे मोठे ब्राह्मण व ज्यांस ज्यांस संशय होते त्यांस असें सत्तावीस असामी पाठविले; तेव्हां त्यांणें खरें होतें तें सांगितलें. कार्तिक वद्य १४ रविवारीं पुण्यांत खटेवर घालून मग पारिपत्य करणार. दौलतगिरीस तोफेचे तोंडीं देणार. शिवाजीपंत परांजपे यांणीं सांगितलें कीं, सारें रामचंद्रनाईकांनीं केलें! पुण्यांत सावकारांकडे कर्जाचा ऐवज सरकारांतून करार केला. तो वसूल होईल तेव्हां हुजरातीस नालबंदीस देऊन मग हरीपंत आपणाकडे यावयास निघणार, लांबीचें काम आहे! परशुरामभाऊ व रघुनाथरावदादा चिकोडीनजीक आहेत. (त्यांजवळ) दोन हजार फौज आहे म्हणून सांगतात.'

नं. १९३६. **श्री.** (मार्ग० शु० २–१२ दिसेंबर.)

चिरंजीव राजश्री तात्या व दादा यांसी.

प्रति नारो त्रिंबक आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ छ ३० सवाल मुकाम हुबळी जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. पेशजी जासुदाबराबर पत्रें पाठविलीं आहेत. पावलींच असतील. अलीकडील वर्तमान तर बेटगिरें घेऊन उणकलच्या मुकामीं श्रीमंत पांडुरंगराव तात्या आले तों मिश्रीकोटावर अमित्राकडील फौज आहे म्हणोन पेंढारी यांनीं बातमी आणिली, व त्याच्या कहीचीं चाळीस पन्नास तट्टें पाडून आणिलीं. उणकलास व मिश्रीकोटयास चार कोस अंतर. बातमी येतांच सडया फौजा तयार होऊन अघाडीस जलद फौजा व मागाहून खासे बरोबर लहान बाराच्या तोफा घेऊन संध्याकाळच्या प्रहर दिवसास छ २३ सवालीं निघाले. अघाडीचे फौजेची व त्यांची गोळागोळी जाहली व इकडील बाणांनीं त्यांचीं घोडींही जायां जालीं. ते सरकोन मिश्रीकोटयाच्या आसऱ्यानें गांवाजवळ जाऊन राहिले. तों मागाहून खासेही जाऊन पोंचले. तों पांच घटका रात्र जाहली. काळोखी रात्र. वोढेखोडे अडचण फार याजमुळें कांहींच

सुमार समजेना. तेव्हां सुमारानेंच गोळे त्यांजवर टाकिले. तेव्हां ते रातोरात पळून झाडींत सोंद्याकडे गेले. उजाडेपर्यंत फौजा आम्हां-कडील दशमीस उभ्याच होत्या, उजाडलेनंतर मिश्रिकोटें व कल-घटगी घेऊन माघारे हुबळीस आले. नवी हुबळी एक दिवस लढली. दुसरे दिवशीं घेतली. हल्लीं जुने हुबळीस तोफा लाविल्या आहेत. दोन दिवस लागतील. कुंदगोळ, तडस, गोपनकोप, बेहट्टी वगैरे येथें ठाणीं बसलीं. लक्ष्मेश्वर व मुळगुंद दोन तालुके मात्र राहिले आहेत. येथील फडशा झाल्यावर तिकडे जाणार. तोतया पुण्यास आणिला. चौकशी होत आहे. मग शिक्षा होईल. श्रीमंत राजश्री दादासाहेब एकटा मुंब-ईस आहे. त्यांचे मानस पुत्र अमृतराव जमावसुद्धां तारापुराजवळ आहेत. त्यांस जाऊन भिवराव पानशे यांणीं घेरलें आहे. हस्तगत होतीलसें दिसतें. श्रीमंत राजश्री परशुरामभाऊ व रास्ते चिकोडी प्रांतीं आले. मागाहून राजश्री हरीपंततात्या तीस पस्तीस हजार फौजेनिशीं लवकरच येत आहेत. निघाल्याच दाखल आहेत. हेंच पत्र राजश्री नरसिंगराव यांस दाखवावें. श्रीमंत राजश्री बाबासाहेबांकडे कधीं निघोन येणार, तयारी झाली किंवा नाहीं, हें लिहावें. हे आशीर्वाद.

नं. १९३७. श्री. (मार्ग. शु. ३–१३ दिसें.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं—

पोप्य बाजी गोविंद साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल तागायत छ १ माहे जिल्कादपावेतों मुक्काम पेगांव वर्तमान यथास्थित असे. विशेष. आम्ही कोंकणांतील बंदोबस्त करून आंबेघाट चढोन चरणास आलों. वारणाउत्तरतीरीं राजश्री अंताजी कृष्ण प्रति-निधीकडील लोक होते त्यांचे गोटापासून अर्ध कोसावर मुक्काम केला.

---

१ कारवार जिल्हा.

इतक्यांत पुण्याचें पत्र आपणाकडे जावयाविशीं आलें; त्यावरून मुक्काम केला. राजश्री येसाजी शिंदे यांनीं आमची बातमी राखोन दोन हजार फौज व दोन हजार प्यादा सडे स्वारीनिशीं कोल्हापुराहून कूच करून आम्हांवरी छापा घालावयास आला. त्याची आमची लढाई गुरूवारीं प्रातःकाळीं गांठ पडली. आम्हांस चार घटका अगोदर बातमी लागली होती. त्याजवरून तयारच होतों. चार घटका लढाई झाली. शिंदा हटवून माघारा घातला. वीस पंचवीस घोडे पाडाव आणिले. दहा पंधरा असामी त्याजकडील ठार पडली. घाटगा ठार पडला. चाळीस पन्नास माणूस जखमी जाहले. आपल्याकडील लोकांनीं व प्रतिनिधीकडील लोकांनीं व राजश्री नाईकजी निंबाळकर यांनीं कामकाज चांगलें केलें. आम्हांपाशीं सामान थोडें, नाहीं तर अगदींच येसाजी शिंदा बुडविला असता. बरें ! श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे. आम्ही जागा काइम राहिलों. तो आठ कोस दम न घेतां माघारा गेला. याजउपरी जेर जखमी आहेत त्यास एखादे जागां ठेवून मिरजेचे सुमारें येतों. प्रतिनिधींची फौज हजार व आमची हजार आहे. पायचें सामान नाहीं प्रस्तुत आपला मुक्काम कोठें आहे, फौज किती, शिंद्यास जरब देणेंचा विचार काय योजिला, आम्ही कोठें यावें, हें तपशीलवार लिहिलें. पाहिजे. खर्चास आम्हाजवळ नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. १९३८. (१३ दिसेंबर.)

कृष्णराव बळवंत[1] यांचें पांडुरंगरावास पत्र १ जिल्कादचें.

" धारवाड तालुका घेऊन मिश्रीकोटावर अमित्राची फौज होती त्यांसीं गांठ घालावी म्हणून आलों तों अमित्राची फौज पळून गेली म्हणून व मिश्रीकोटयाचें व आणखी पांच सात ठाणीं घेतलीं, व हुबळीस मोर्चे लाविल्याचें लिहिलें तें कळून संतोष जाहला. श्रीमंत

---

१ आपा बळवंत मेहेंदळे.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स. १७७६

राजश्री दादासाहेब मुंबईस आहेत. होळकरांचे मार्फतीनें बोलणें लागलें आहे. सलुखाचा ठराव होईलसा वाटतो. सलुखाच्या बोलण्यांत शिंदेही आहेत. होळकरांचे गळां सिंहगडचें काम लाविलें आहे. तेही किल्ला[1] घेतल्यावर निरोप घेतील. "

नं. १९३९. (मार्ग० शु०—दिसें० दु० पंधरवडा.)

बाळाजी केशव यांचें करकंबेहून मिरजेस नारोपंत दामले यांस पत्र.

" कोंकणचे मार्ग सुदामत चालूं लागले. सुभेदार कोंकणचा पेशजीचा करार जाहला. तोतयाची चौकशी होऊन खोटा जाहला आणि गोसावी वगैरे यांचें शिष्टकृत्य जाहल्याचें वृत्त लिहिलें तें कळलें. " ईश्वरें अरिष्ट निरसन केलें. किल्ले गेले होते ते सर्व सरकारांत आले. सिंहगड मात्र अद्यापि आला नाहीं ह्मणोन लिहिलें; त्यास तोही येईल. श्रीमंतांचा पुण्यप्रताप विशेष आहे. कांहीं चिंता नाहीं. " श्रीमंत राजश्री तात्यासाहेब मिश्रीकोट वगैरे हुबळी देखील घेऊन लक्ष्मेश्वराकडे फौजसुद्धां गेले. इभ्रत चांगलीच पडली, " ह्मणोन लिहिलें तें कळलें.

नं. १९४०. श्री. (१७ दिसेंबर.)

श्रीमंत राजश्री कोन्हेरराव स्वामी यांस—

आश्रित रामचंद्रभट वाटवे. अनेक आशीर्वाद उपरि येथील क्षेम ताा मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीपर्यंत क्षेम असों विशेष. आपणाकडून तीन पत्रें कार्तिक वद्य पक्षीं आलीं तीं पावलीं. विस्तारें वर्तमान कळलें. " बेटगिरी वगैरे ठाणीं घेतलीं. मिश्रीकोटाजवळ गनीमाची फौज राहिली होती. तेथील बातमी आणून सडी स्वारी आमची गेली. गोळागोळी जाहली. घोडें माणूस एक दुसरें जायां जाहलें. अवघी

---

१ पांडुरंगराव गोविंद.

रात्र तसेंच उभे राहिलों. मिश्रीकोट कलघटगीस ठाणीं घालून माघारे आलों " म्हणोन लिहिलें तें कळलें. हल्लीं आपण हुबळी नवी ठाणें घातलें. जुन्या हुबळीस मोर्चे लाविले आहेत, म्हणून वर्तमान ऐकिलें; श्रीकृपेंकरून यश प्राप्त होईल. आम्ही येडूरचे मुक्कामीं श्री रा. भाऊंचे भेटीस आलों होतों..... श्री. रा. भाऊ आम्हांसही बोलिले आहेत जे, सालमजकूर हजार राऊत ठेवावे हें बरें आहे. स्वार ठेवणेंविशीं अनमान करूं नये.....आम्ही घरास कर्नाळचे मुक्कामावरून गेलों होतों. मागती यजमानांची चिठ्ठी आली जे 'भेटीस येणें,' त्याजवरून चिकोडीचे मुकामास आलों. रविवारीं सायंकाळीं मुक्काम मजकुरास आलों. दुसरे दिवशीं कूच होऊन बागेवाडीवर आले. राा बाबूराव गांवांत होते. अगोदर संधान श्रीमंत राजश्री दादांचे विद्यमानें होतें. बाबूराव केरूरास आले. हे मध्यस्तीचे रीतीनें केरूरास गेले. तेथें गोष्टीचा बनाव बसला नाहीं. उपरांतीक प्रहर रात्रीं रााा दादा गोटास आले. नंतर सोमवारीं सूर्योदयापूर्वी प्रहर रात्रीं कूच केलें. दोन घटका दिवसास बागेवाडीस येऊन पोंचले. गोटांमध्यें पांचशें स्वार होते. गोटासन्निध युद्ध जालें. आंतील घोडें माणूस जायां जाहलें. उपरांतीक राजश्री सदाशिवभट साठे यांचे विद्यमानें बाहेर निघाले. बागेवाडीवर निशाण चढवून उपरांतीक भोजनें झालीं. रा० बाबूराव निसबत तालुकेचीं ठाणीं बसलीं. एक मनमुर्दी तालुका रा० विरूपाक्ष अण्णाजी यांचें बोलणें अगोदर होतें. संधानें करून विल्हेस लागलें. आपण वरचेवर तालुक्यापेक्षां खेडीं. साधतील तीं हाताखालीं घालावीं म्हणून लिहिलें त्यावरून यजमानास वरचेवर स्मरण केलें. रा० शिवाजीपंताकडे पुरंदरास याद लिहून पाठविली आहे. रा. दादांनीं जीं खेडीं मागितलीं त्या चिठ्ठया दिल्या. तीन खेडीं आपले निसबतीस लावून घेतलीं आहेत. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स.१७७६

नं. १९४१. श्री. (१७ दिसेंबर.)

पौ छ १० जिल्काद सन सब्बा सबैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना व तथा वासुदेवपंत स्वामीचे सेवेशीं—

पोप्य वासुदेव[1] धोंडदेव, साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शु।। ७ पावेतों मुकाम हुबळी यथास्थित असे. विशेष. आपण कृपापत्र पाठविलें तेथें लिहिलें, उत्तम आहे. जाग्याविशींचा मजकूर लिहिला. तो कळला. आपण भिंताड घातलेंच असेल, वासुदेव पंतो! आपलें आमचें भाषण श्रीमंतांसमक्ष होत होतें त्याविशीं लिहिलें, उत्तम आहे. चौकी पहारेविशीं आपण लिहिलेअन्वयें फार सावध आहों. प्रथम हुबळीस आलों तेच दिवशीं मिश्रीकोटयास धांवोन गेलों. अमित्राची फौज तीन हजार व दीडहजार गाडदी यांची गांठ पडली. ईश्वर कृपा करणार! सूर्यास्त असतां तेथें राहून सहा घटका रात्रीस तोफा लागू केल्या. फौज अमित्राची पळून गेली. दुसरे दिवशीं मिश्रीकोटेचें ठाणें म्हणजे निमे धारवाड, खंदकांत पाणी पुरुष प्रमाण, तें ठाणें इभ्रतीनें घेतलें! तेथून माघारे आले. नंतर नवी हुबळी दोन दिवसांत घेतली. कुंदगोळ घेतलें. सांवशीचे प्यादे पळून गेले, परंतु आम्हांस कळलें नाहीं. इतक्यांत शिरटीचा देसाई याणें ठाणें घेतलें. जुनी हुबळीस आज सहा दिवस मोर्चे आहेत. पुढें जावें असें आहे. परंतु अमित्राची सारी फौज बंकापुरास जमा जाली. आणखी सामान हैदरखानाचें येत आहे म्हणोन वर्तमान आहे. याकरितां एखादें झूज होईल म्हणोन आम्ही तूर्त यावयाचें न केलें. पौषमासीं येतों. माघमासीं लग्न करावया येईल. कोंकणांत पाठवावयास पत्रें पाठविलीं आहेत हीं आपण दोन प्यादे चांगले माणूस देऊन

---

१ पटवर्धन शिळकर.

जलद पाठवून द्यावीं; म्हणजे त्याचा[1] निश्चय समजेल. आपणही एक पत्र वडिलांस पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

नं. १९४२. (मार्ग. शु०—दिसें. दु०पंधर.)

जिल्काद सन सब्बा सबैन मधलें पत्र गंगाधरराव गोविंद यांस—

" येसाजी शिंदे व काळोपंत नि॥ (भवानराव) प्रतिनिधि यांमध्यें लढाई जाहली. काळोपंताचा मोड जाहला. काळोपंत वारणे-अलीकडे कापशीवर आहेत. शिंद्यापाशीं राऊत दोन अडीच हजार व प्यादे दीड हजार आहेत. काळोपंताजवळ राऊत पांचशें व प्यादे पांच सातशें असा जमाव आहे. "

नं. १९४३. (६ दिसेंबर.)

रघुनाथराव नीलकंठ यांचें पत्र कार्तिक वद्य ११ चें मुक्काम येडूर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—पै॥ छ २९ सवाल सन सब्बा सबैन.

" आह्मी कुरुंदवाडाहून येथें आलों. ती॥ भाऊसाहेबांची भेटी जाली. रामचंद्र गणेश आज हिरेकोडीस चिकोडीजवळ आले. भेटी-विशीं त्यांनीं बोलणें लाविलें आहे. निखालसता दृष्टीस पडल्यास भेटी होईल. बाबूराव दादाजी बागेवाडीसच आहे. त्यानेंही सूत्र लाविलें आहे. "

नं. १९४४. (११ दिसेंबर.)

परशुरामभाऊचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस छ २९ सवालचें—

" बाबुराव दादाजी हा तोतयाकडील, त्याच्या सरंजामाची जप्ती करण्याविशीं आम्हांस सरकारांतून पत्रें आलीं त्याजवरून आह्मी चिकोडीकडे आलों आहों. "

---

१ लग्नाचा अथवा मुलगी देणाराचा. २ वडील बंधु महादेवभट यांस.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स. १७७६

नं. १९४५. **श्रीगणराज.** (मार्ग० शु० ८–१८ दिसें०)

पैा छ ९ जिल्काद. मुकाम नर्ती परगणे कुंदगोळ. सुरुसन सब्बा सबैन मैय्या व अल्लफ.

अंपत्यें रघुनाथरायानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील कुशल तागायत छ ६ जिल्काद मुक्काम बागेवाडी येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन साकल्य वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहावया आज्ञा जाहली पाहिजे. यानंतरी इकडील वर्तमान तरी तीाा राजश्री भाऊ व आह्मी चिकोडीवर होतों. रास्त्यांकडील राजश्री आनंदराव निंबाजी दोन हजार फौज समेत तेथेंच येऊन मिळाले. राजश्री बाबूराव[2] दादाजीचें अत्र लागलेंच होतें. त्याजवरी खासाच भेटीस केरूर चिकोडीपासून दोन कोस आहे तेथें आले. आह्मीही तीााची आज्ञा घेऊन भेटीस गेलों. बोलण्यांत विपर्यास आला, बनेनासें जाहलें. तेव्हां ते माघारे बागेवाडीस गेले. आह्मी माघारे लष्करास आलों. मध्यरात्रीस छ ४ रोजीं कूच करून येऊन दोन घटिका दिवस येतांच बागेवाडीस दाखल जालों. बाबूराव जमावासह पश्चिम दरवाजावर होते तेथें एक लढाई चांगला केली. तेथून पर्वेच्या दरवाजावर आलों. तेथें एक लढाई चांगली जाली. त्यांजकडील दहा वीस जखमी जाले. बर्गे म्हणून शिलेदार दोघे चांगले होते ते ठार जाहले. नारो शंकर श्रीमंत मातोश्री गंगाबाईचे सख्खे मामा होते ते ठार

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें कोन्हेररावास पत्र. २ चिकोडी व मनोळी हे तालुके पेशव्यांकडून रामचंद्र नाईक परांजपे यांजकडे गहाण होते व त्यांपैकीं कांहीं ठाणीं बाबुराव दादाजीपासून कांहीं पेका घेऊन रामचंद्र नाइकानें त्याजकडे वहिवाटीस दिलीं होतीं. तोतयाच्या बंडांत रामचंद्र नाईक सामील झाल्यामुळें त्याच्या तालुक्यांचा जप्ती करण्याविषयीं पुण्याहून परशुरामभाऊस हुकूम आला होता. पण बाबुराव निमूटपणें आपलीं ठाणीं भाऊंच्या हवालीं करीना, सबब त्याशीं थोडा युद्धप्रसंग करावा लागला त्याचें वर्णन या पत्रांत आहे.

जाहले. आह्मांकडील दोघे चवघे भले माणूस जखमी जाले. एक दोन घोडीं पडलीं याप्रमाणें जाहलें. शेवट संध्याकाळीं बाबूराव टीस आले. ठाणें आह्मीं आजी घातलें. वडिलांस कळावें. उदईक कूच करून नूल प्रांतांत जातों. राजश्री रामचंद्र गणेश याच मुक्कामीं येऊन भेटले. फौज सात आठ हजार सारी मिळोन आहे. कळावें. शिंद्याकडील वर्तमान तरी राजश्री बाजीपंत आण्णा यांस आम्हांस येऊन मिळावयास सरकारची आज्ञा होती, सबब ते कोंकणांतून आम्हांकडे येत होते. ते गोडास आले. श्रीमंत राजश्री भवानराव प्रतिनिधीची फौजही समीप होती. हे बातमी येसाजी शिंदे यांस कळतांच त्यांजवरी छापा घालावा या उद्देशें गेले. तों त्यांणीं गांठ घातली. त्यांची यांची लढाई मातबर जाली. शिंदे याची नासाडी फारच जाहली. शिंद्याचा मोड झाला. पंचवीस घोडे पाडाव केले. राजश्री आनंदराव घाटगे यांस गोळी लागली १ मानाजी घाटगे यांचा डावा हात अगदीं उडाला. लग मात्र राहिली आहे, व आनंदराव घाटगे यांचे भाऊ भिवाजी घाटगे ठार जाहले. याप्रमाणें वर्तमान आलें. शिंदे माघारे करवीरास आले. सांप्रत पन्हाळ्याचे पार्ळीवर आहेत. हजार एक स्वार व तीन हजार प्यादे ऐसे आहेत. याजउपरी आह्मीही उदईक कूच करून त्यांच्या तालुकेंत जातों. कळलें पाहिजे. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. वडिलीं रातबिरात सावधपणें राहावें. आह्मीं येथें सावध आहों. वरचेवर तीर्थस्वरूपांस विनंती करीत असतों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. १९४६. **श्रीगणराज.** (मार्ग. शु. ८--१८ दिसें.)

पौ छ ९ जिल्काद. मुक्काम नर्ती.

पुरवणी. सेवेशी विज्ञापना ऐसीजे, वडिलीं रायर हुबळीचे

---

१ येसाजी शिंद्याकडील. २ परशुरामभाऊस सावधपणाविषयीं. ३ ही माग-च्याच पत्राची पुरवणी.

मुकामचीं पतें पाठविलीं तीं आजीच पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. " हुबळीस तोफा लाविल्या अहेत, एका दोरोजीं हस्तगत होईल " म्हणून लिहिलें तें कळलें. येथील सविस्तर अलाहिदा पतीं लिहिलें आहे त्यावरून कळल. सदैव पत्रीं सांभाळिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. १९४७. श्री. (मार्ग. शु. ८–१८ दिसें.)

पौ छ १० जिल्काद. सुरूसन सब्बा सबैन मय्या व अल्फ. सेवशी शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा ६ जिल्काद भोमवासरे मुक्काम पुणें यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ २८ सवालचीं पत्रें पाठविलीं तीं काली दोनप्रहरीं पावोन लिहिला मजकूर कळला. श्रीमंती राजश्री तात्याकडून पतें आलेलीं पाठविलीं तीं पावलीं. श्रीमंतांचें पत्र व उभयतां कारभारी यांचीं पतें पावतीं केलीं व सविस्तर मजकूर सांगितला. पत्रें पुरंधरास पाठविलीं आहेत. उत्तर आलें म्हणजे तें व श्रीमंत राजश्री नानाचे पत्राचें उत्तर येणेंप्रमाणें पाठवितों. श्रीमंत राजश्री तात्या प्रथम स्वारीस गेल्यासारिखे चांगलेंच केलें. श्रीमंत राजश्री नाना फार संतोषी जाहले. आणखी फौजा लवकर आल्यास बंकापूर देखील यावयाचा समय आहे म्हणोन लिहिलें तें खरेंच आहे. राजश्री मानाजी शिंदे यांची रवानगी दोन चार दिवसांत होणार. तोतयाची चौकशी जाहल्याचें लिहिलेंच होतें. राजश्री बाबूजी नाईकही[1] आले. त्याणें पहिला नाईकाचा संशय निवारण जाहला. हरिपंत फडके याचे बंधु म्हणोन तोतया जाहला होता तो कांयत येणेंप्रमाणें ठरला. त्यास काल हत्तीच्या पायांस बांधोन बाजारांतून फिरविला. शेवटीं हत्तीनें पाय देऊन मारिला. तोतयास आज

---

१ मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र.

गाडयावर घालून बाजारांतून फिरविला. ज्यास ज्यास संशय राहिले होते त्यास त्यास दाखविलें. शेवटीं उंटावर बसवून फिरविला आणि चार घटका दिवसास मेखसूनें डोकें फोडून मारिला. दौलतगीर गोसावी यास तोफेच्या तोंडीं देणार. राजश्री रामचंद्र नाईक रुजुवातीसाठीं पुण्यांत आणिले होते. शिवाजीपंत व धोंडोपंत यांची रुजुवात जाहली. नाइकापासूनच सारा ग्रंथ जाहला ! शिवाजीपंत व धोंडोपंत यांस बेडया घालून फरासखान्यांत ठेविले आहेत. रामचंद्र नाईक पुनः होळकराजवळ पाठविले. आपाभट व नाइकाची स्त्री नाइकाच्या घरांतच ठेविलीं आहेत. चौकी घरांत आहे. तारापुरांतील सलतनत हस्तगत जाहल्याचें लिहिलेंच आहे व धारेकडीलहीं लिहिलेंच आहे. श्रीमंत राजश्री नाना उदईक पुरंदरास जाणार. श्रीमंतांकडील पत्रांचीं उत्तरें मागाहून लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री तात्याकडील पत्रांचीं उत्तरें पाठविलीं आहेत. रवाना करावीं. सेवशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९४८. **श्री.** (मार्ग. शु. ९–१९ दिसेंबर.)

विनंती[3] सेवक येसाजी गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ७ माहे जिल्काद रोज गुरुवार तास ११ पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं आज्ञा कीं, " फौजसुद्धां बरुरानजीक येऊन उभे राहिलों. तुमची बातमी काल आली. अलिकडे तिसरे प्रहर कालपासोन वर्तमान कळत नाहीं. बातमी तहकीक लेहून पाठवणें " म्हणोन लिहिलें त्यास काल सायंकाळपर्यंत त्याची फौज उभी राहिली होती. अस्तमान जाहले उपरी प्रहर रात्रीं निघोन गेले ते भंडगीरचे तळ्यांत उभे राहिले होते. तेथून आज प्रातःकाळीं वर्तमान आणविलें. तेथें नव्हते.

---

१ अमृतराव पेशव्याची हत्ती घोडे वगैरे दौलत भिवराव पानशांनां काबाज केलेली. २ आनंदीबाई स्वाधीन झाल्याचें. ३ पत्र पांडुरंगरावास.

कोणीकडे झाडींत गेले किंवा बंकापुरासच गेले हें कांहीं कळलें नाहीं. बाजारी वर्तमात सांवशीकडे गेले म्हणून बोलतात, परंतु खरें दिसत नाहीं. तिकडे बातमीस माणसें पाठविलिया त्याचे स्वार दोन अडीचशं नेहमीं फिरतात याजमुळें माणसें जावयास धजत नाहींत. तशामध्येंही येईल ते बातमी आणवीत असों. आज प्रातःकाळींच तीर्थस्वरूप राजश्री गोविंदपंत मामा यांजकडे पत्र लेहून पाठविलें आहे. बातमीचें वर्तमान आज प्रातःकाळींच लिहिलें होतें. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९४९. **श्रीगजानन.** (२० दिसेंबर.)

पौ छ १४ जिल्काद. सन सब्बा सबैन. मुक्काम नजीक भुळगुंद.

चिरंजीव राजश्री तात्या यांसीं प्रती भास्कर हरी आशीर्वाद उपरी. येथील क्षेम तागायत मार्गशीर्ष शु।। १० पावेतों यथास्थित असे. यानंतर आपण पत्र पाठविलें तें पावलें. इकडील राजकी व स्वकीय वृत्त चिरंजीव राजश्री बाळांनीं लिहिलें असेल. मुंबईस मुजरद माणूस गेलें होतें. सुखरूप आहेत. वरकड नवीन विशेष लिहिणेंसें नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १९५०. **श्रीगणराज.** (मार्ग० शु० १२–२२दिसें०)

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशीं.

विनंति सेवक पांडुरंगराव गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता।। छ १० जिल्कादपर्यंत मुक्काम हुबळी येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं

---

१ पत्र पांडुरंगरावास त्याचा चुलता भास्कर हरी याजकडून मिरजेहून.
२ तोतयाकडे फितूर झालेला व पत्र लिहिणाराचा मुलगा हरचा अण्णा मुंबईस खुशाल आहे.

छ १३ सवालचें पत्र राजश्री गोविंद अनंत याजबरोबर पाठविलें तें काल छ ९ जिल्कादीं पावलें. तेथें आज्ञा कीं, " तुह्मांकडील व राजश्री परशुराम रामचंद्र व राजश्री रघुनाथराव निलकंठ यांजकडील सरंजामाचा दाहिंजा व पट्टीचा व पाटील कुलकर्णी वगैरे व जातीचा एक साल ऐवज सरकारांत यावा. त्यापैकीं एक लक्ष रुपये तूर्त यावेत ते अद्याप पाठविले नाहींत. याउपर सदरील ऐवजाच्या हुंडया करून लवकर पाठवाव्या. " म्हणोन आज्ञा, ऐशियास येविशींचा मजकूर तपसिलवार राजश्री शिवाजीपंत यांस लिहिला आहे. ते विनंति करितील त्याजवरून विदित होईल. आह्मांकडील भरणा सरकारांत जालाच आहे. ती० रा० परशुरामपंतांकडील व चिरंजिवांकडील भरणा आज तागायत जाहलाच असेल. विदित होय हे विज्ञापना.

नं. १९५१. श्री. (मार्ग. शु. ११—२१ डिसें.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसीं—

पोष्य माधवराव नारायण प्रधान. नमस्कार, विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जावें. विशेष. सुखनिधान तोतया पतित जंजिरे रत्नागिरीस अटकेंत होता. त्यास तेथील कमाविसदारा-कडील कारकून शिवाजी आपाजी वगैरे ब्राह्मण मिळून तोतयाची बेडी तोडून कोंकणांत दंगा मांडिला. त्याजवरून हुजरून फौज पाठ-ऊन तोतयास व त्याचे मिलाफी शिवाजी आपाजी वगैरे होते ते धरून आणून त्यांचें पारिपत्य केलें. परंतु तोतयाकडे कोंकणांतील व देशांतील जागा जागांचे ब्राह्मण गेले होते त्यांचा शोध लावून ज्यांणीं तोतयाचे पंक्तीस प्रत्यक्ष अन्नव्यवहार केले असतील त्यांजला व तोतयाची श्रावणी ज्या ब्राह्मणांनीं केली ते व श्राद्धपक्षाचा क्षण ज्यांनीं घेतला असेल त्या ब्राह्मणांस तूर्त प्रायःश्चित्त द्यावयाचें नाहीं त्यांणीं कोणाचे पंक्तीस व

त्याचे पंक्तीस कोणी अन्नव्यवहार करूं नये. त्याचे पंक्तीस ज्यांणीं अन्नव्यवहार केले असतील त्यांस व त्यांचे संसर्गी यांस यथोक्त प्रायश्चित्त मार्गशीर्ष कृ. १४ स देऊन शुद्ध करावें. याप्रमाणें निश्चय करून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे. तरी येविशींचा शोध लष्करांत करून ज्यांनीं पतित तोतयाचे पंक्तीस प्रत्यक्ष अन्नव्यवहार केले असतील त्यांणीं व तोतयाची श्रावणी ज्या ब्राह्मणानें केली व श्राद्धपक्षाचा क्षपा ज्यांणीं घेतला त्या ब्राह्मणांनीं कोणाचे पंक्तीस व कोणी त्यांचे पंक्तीस ते शुद्ध होत तोंपर्यंत अन्नव्यवहार करूं नये, याप्रमाणें ताकीद करून वरकड संसर्गी यांसी मार्गशीर्ष वा १४ स प्रायश्चित्त द्यावयाचीं कलमें. बी तपशील—

पतितपंक्तीस प्रत्यक्ष जेविले त्यांचे पंक्तीस ज्यांणीं अन्नव्यवहार केले असतील त्यांस.

एक वेळ केला असेल त्यांस अर्ध प्राजापत्य व बहुत वेळां केला असेल त्यांस प्राजापत्य प्रायश्चित. मुंडणपूर्वक प्राजापत्य प्रायश्चित. कलम १.

पतितपंक्तीस जेविले त्यांचे पंक्तीस ज्यांणीं अन्नव्यवहार केला त्यांची पंगत ज्यांस जाहली असेल त्यांस.

एक वेळ पंगत जाहली त्यांची पंक्ती ज्यांस एकच वेळ जाली असेल त्यांजला उपोषणपूर्वक पंचगव्य व बहुत वेळ जाहली असेल त्यांस पाद प्राजापत्य प्रायश्चित्त कलम १.	बहुत वेळ पंक्ती जाहली त्यांची पंक्ती एक वेळ ज्यांस जाली असेल त्यांस पाद प्राजापत्य प्रायश्चित. बहुत वेळ जाहली असेल त्यांस अर्ध प्राजापत्य प्रायश्चित्त कलम १

सदरहुचे संसर्गी असतील त्यांस पंचगव्य. कलम १

येणेंप्रमाणें यथाशक्ति प्रायश्चित्त देऊन शुद्ध करणें आणि शुद्ध केल्याचें वर्तमान व याखेरीज ज्यांकडे दोष बहुत असोन थोडका असें मिथ्या बोलून पंचगव्य घेतलें असें ह्मणेल अगर याप्रमाणें बोलून घेईल त्याजपासोन गुन्हेगारी घेऊन त्याची नांवनिशी हुजूर लिहून पाठविणें. सर्वत्र प्रायश्चित एकच दिवशीं सदरहु तिथीस द्यावयाचा निश्चय केला असे. तरी सदरहु लिहिल्या तिथीसच प्रायश्चित्त देवविणें. जाणिजे. छ० ९ जिलकाद सुरूसन सब्बा सबैन. मय्या व अल्लफ बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. १९५२. (२१ दिसेंबर.)

शिवाजी बाबाजीचें ९ जिल्काद मंदवासर मु. पुणेचें पत्र—

" राजश्री बाजीपंत अण्णा कोंकणांतून ती० भाऊंस मिळावयाकरितां येत असतां घाट चढून आल्यावर करवीरकरांचा छापा ःाला. परंतु बाजीपंतांनीं लढाई करून येसाजी शिंद्याचा मोड केला ह्मणून लिहिलें तें कळलें व सरकारांतही बाजीपंताचें पत्र आलें आहे. बाजीपंत जाऊन भाऊंस सामील जाहलेच असतील. भाऊंचा मुक्काम चिकोडीवर आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. "

न. १९५३. (मार्ग. व. २—२६ दिसें.)

शिवाजी बाबाजीचें १४ ज़िल्काद बुधवासर मुक्काम पुणेंच पत्र.

" श्रीमंत राजश्री नाना पुरंधरास गेले. शिंदे आंगरेही गेले. राजश्री महादजी शिंदे यांचें लग्न मार्गशीर्ष वद्य ९ स आहे. संगमनेरचे देशमुखाची मुलगी नवरी पाहिली आहे. लग्नास दोन चार दिवसांत येणार. सिंहगडावर राऊत होते ते पळून गेले. किल्लेकरी यांणीं बोलणें लाविलें आहे. भिवराव पानशे तारापरचा बंदोबस्त करून सलतनतसुद्धां कल्याणास आले. त्यांस बेलापुराजवळ फौजसुद्धां राहणें म्हणोन येथून पत्र गेलीं आहेत. "

श. १६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ. स. १७७६

नं. १९५४. श्री. (मार्ग. व. ४–२८ डिसें.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसी—

पो माधवराव नारायण प्रधान. नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ज्ञाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. व्यंकटराव नारायण घोरपडे मुंबईस होते तेथून गलबतांत बसून वेंगुर्ल्यास गेले. तेथून कोल्हापुराकडे जाऊन तीर्थरूपांकडील राजकारण करावें, याप्रमाणें येथें बातमी आली त्यास ते कोल्हापुराकडे येऊं लागतील तरी तुम्ही बातमी राखोन गांठ घालून धरणें. तुमचा जमाव बराच जाहला. याउपरी तिकडील बंदोबस्त लवकर होईल ऐसे करणें. जाणिजे छ १६ जिल्काद. सुरुमन सब्बा सबैन मय्या व अल्फ. हे विनंति.

श्रीगणराज.

नं. १९५५. (मार्ग. व. ५–२९ दिसेंबर.)

तीर्थस्वरूप मातोश्रीबाई वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें पांडुरगराव गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील वर्तमान तागायत छ १२ जिल्काद मुक्काम नजीक मुळगुंद यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. त्यांतील सारांश प्रकार हाच कीं, " सरकारचे कारकून जप्तीस आलेली कोणाचें ऐकत नाहींत. पर्लाकडील जप्ती झाली. अलाकडे आल्यानंतर इचलकरंजीशिवाय आम्ही कोणते गांवचें याउपर बोलत नाहीं. ही ठीक बसावयाची टाकून कोणीकडे जावें ? यास्तव आपण राजश्री आजफाडणास व शिवाजीपंतास लिहावयाचे रीतीनें लिहून आपणाकडे हणोन करून घ्यावी. आतां आपणाशिवाय वाली दुसरा कोणी नाना जा-

---

१ अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर यांस पत्र. २ मिरज प्रांतः प्रतिनिधीवसनाची चिंता नाहीं.

म्हणून सविस्तर लिहिलें तें कळलें. ऐसीयासीं आह्मी जें लिहावयाचें तें राजश्री नानास लिहिलें. त्याचें उत्तर आलें तें चिरंजीव राजश्री गंगाधरराव यांजकडे मिरजेस पाठविलें. त्यांनीं तें पत्र आपणांकडे पाठविलें असेल. त्याजवरून सर्व अर्थ समजला असेल. फिरोन राजश्री नानास लिहावयाची बाकी राहिली नाहीं. तोतयाबराबरच श्रीमंत राजश्री दादा पुरंदरास आले असते तर भलता प्रकार कांहीं तरी होता. तेंही न घडलें. अद्यापही दादा पुरंदरास आले तरच बरें आहे. पुरंदरास आल्यानंतर कारभारी यांस करुणा आली तर न कळे ! एरवीं उपाय नाहीं. सरकारचें पत्र नेऊन दादांनीं श्रीमंतांस शरण यावें यापरतें दुसरें दिसत नाहीं. तथापि आम्हीं आणखीही पत्रें दिलीं आहेत. इचलकरंजी घेणार नाहींत. वरकड जप्ती करितील. सुटकाही होईल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री. (मार्ग० व० ६–३० दिसें०)

नं. १९५६.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री शिवाजीपंत स्वामी गोसावी यांसीं—

सेवक पांडुरंगराव गोविंद. नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष सांप्रत आमचा मुक्काम गुंदानजीक आहे. याच मुकामावरून परवां पत्रें तुम्हांकडे पाठविलीच आहेत तीं पावोन त्यावरून सविस्तर अर्थ कळलाच असेल. सदील वर्तमान तर काल तृतीय प्रहरीं लक्ष्मेश्वराहून बातमी कीं, "बंकापूरची फौज सर्दी दोन हजार व बरोबर एक दुसरा आहे. × × याजवळ तळ्यांत उभे लक्ष्मेश्वरापासून दोन

ब घोरपडे.

कोसांवर आहेत " ह्मणोन वर्तमान येतांच तयारी करून तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव व कृष्णराव व शिवरामबावा व आमची फौज बरोबर दोन जंबुरे बाण वगैरे सरंजाम घेऊन गेले. उजाडेपर्यंत तेथें गेले तों ते निघोन गेले. अघाडीस पेंढारी आमचे होते त्यांनीं दोन घोडीं अमित्राच्या फौजेंतून पाडाव करून आणिलीं. गांठ पडती तर त्यांच्या पारिपत्यापुतें सामान होतें. रटिगेरीपलीकडेही दोन तीन कोस जाऊन तलावा मारून तृतीय प्रहरीं आजच माघारे आलों. रटेहल्ली ताा सावनूर येथें महंमद अल्ली कुमदान वगैरे दोन तीन सरदार दोन हजार फौज व सहा हजार बार व नऊ तोफा याप्रमाणें पट्टणाहून सामान आलें. दोहोंती दिवसांत बंकापुरास येणार. याप्रमाणें रटेहल्ली येथील कमाविसदाराचें पत्र सावनूरकरांस आलें तेंच पत्र सावनूरकरांनीं आम्हांकडे पहावयास पाठविलें व कोन्हेर नारायण नेहमीं बातमींकरितां सावनुरास ठेविले आहेत त्यांचें पत्र व माधवराव राजोपंत व अण्णाजीराव येणेंप्रमाणें तीन पत्रें बजिनस बातमींचीं पाठविलीं आहेत त्यांवरून सविस्तर कळेल. सारांश, नवें सामान आलें खरें यांत संशय नाहीं. याच अन्वयें आणखी दोहोंकडून बातम्या आल्या. अमित्राचा जथ पडत चालला. कांहीं जमाव कलघटगी बेमिकट्टयाकडे आहे. नित्य उठोन स्वारी-शिकारी तिकडे करितात. कलघटगीची पेठ थोडीसी झाडून नेली. वरचेवर फौजेचा भरणा आह्मांकडे येऊं लागल्यास कांहीं जमाव बंकापूरच्या तोंडावर ठेऊन शिरहट्टी वगैरे ठाण्यास मोर्चे द्यावयास ठीक पडतें, आह्मी तर वरचेवर फौज पाठवावयासी लिहिलें, परंतु आजपर्यंत फौज न आली. राजश्री हरीपंत मास पक्षांत येणार ह्मणोन लिहितां, त्यास त्यांचीं पत्रें याप्रमाणें येऊं लागोन दीड महिना जाहला तों निघणें होत नाहीं! पुढें रास्ते, बाजीपंत अण्णा व प्रतिनिधीकडील फौज व मानाजी फांकडे इतके तरी आल्यास चिंता नाहीं.

बळ पडेल. साऱ्या फौजा करवीर तालुक्यांतच जातात ! या मसलतीपेक्षां करवीरकर भारी असें नाहीं. आह्मी आजवर पाऊल पुढेंच टाकीत आलों, आतां पुढें पाऊल टाकणें तें बहुत विचारें करून टाकावें लागतें. याजकारितां आठ मुक्काम येथें केले. मागील भरणा आल्याशिवाय पुढें पाऊल टाकून फलादेश नाहीं व मागेंही सरल्यास वाईटच. असा प्रकार आहे. त्यास सर्व पर्याय उभयतांस समजाऊन लौकर फौजा येत तें करणें. आतां जलदीस मोल आहे. रवाना छ १८ जिलकाद. हे विनंति.

नं. १९५७. (मार्ग. शु.–दिसें. दु. पंधरवडा.)

आशीर्वाद उपरि इकडील वर्तमान तरी गोपाळभट श्रोत्री करवीरकरांकडोन पत्रें हुजरे घेऊन येथें आले आहेत. पतें सर्वत्र मुत्सद्दी व सरदारांस घेऊन आले आहेत. अद्यापि नानांसीं भेटले नाहींत. त्यांच्या बोलण्यांतील अर्थ पुर्ता शोध लागला नाहीं. एक दोन रोजांत तहकीक ठिकाण लाऊन मागाहून लिहितों. सारांश पक्कें त्यांचें पारिपत्य जाहल्याशिवाय ताब्यावरी येत नाहींत ! कळावें. येथेंही येविशीं नानांसीं सुचवून देणें तें देतच आहों. होईल तें मागाहून लिहीन. राजश्री हरीपंततात्यांची स्वारी निघावयासी अद्याप एक महिना पाहिजे. रूपयांची तरतूद करीत आहेत. गांवांत पट्टीकडे वसूल होऊन हातास आल्यानंतर शिंदेहोळकरांसी निरोप देऊन उपरांत स्वारीस निघतील. शिंदेहोळकर फौजसुद्धां जात आहेत त्यापक्षीं फौज एकाएकीं कर्नाटकांत रवाना करीत नाहींत. कळावें. तोतया पुण्यास आल्यानंतर काय वर्तमान ऐसें लिहिलें, त्यास त्याची चौकशी खरोखर असेल तसी करावी ह्मणोन राघोजी आंगऱ्याचें वचनक्रिया त्याजपाशीं गुंतली होती त्यावरून येथें चौकशी आठ दिवस होत आहे. रामशास्त्री, काशीनाथशास्त्री, कृष्णराव बल्लाळ, धोंडोबा पुरंधरे, हरीपंत तात्या व

---

१ हें पत्र पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस लिहिलेलें असून तें बहुधा बळवंतराव कृष्ण मंगळवेढेकर यांनीं लिहिलेलें आहे.

श.१६९८ पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी इ.स. १७७६

गुरुजी वगैरे आणखी मातबर सरदार सहवासी बापूजी नाईक व मातबर पांच सात सावकार व वाणी ऐसे बसोन परवांचे दिवशीं चौकशी केली. त्यांत चौकशीस उतरला नाहीं. अवघा खोटा प्रकार ठरला. कनोजी ब्राह्मण आहे. त्यानें आपलें नांव, ठिकाण सांगितलें. 'छत्रपुराजवळ कर्नाळ ह्मणोन गांव आहे तेथें आपलें घर आहे.' बापाचे व आईचे व बहिणीचें सर्व नांवें सांगितलीं. याजउपरी आजी अगर उद्यां वाडयांत आणणार.' पार्वतीबाईचे दृष्टीस घालोन, त्यास संन्यास देऊन जलसमाधि द्यावी ऐसे निश्चय ठरले. त्याजबरोबर शिवाजीपंत व धोंडोपंत रत्नागिरीचे कारभारी आहेत त्यांची चौकशी केली. त्यांनीं करीना लिहोन दिल्हा जे. " आपण कांहीं हें कर्म केलें नाहीं. राजश्री रामचंद्र नाईकच करावें म्हणोन आम्हासी वरचेवर लिहीत गेले त्याप्रमाणें आम्ही केलें. याविशींचे दस्तऐवज आहेत ते पहावे. आपल्या स्वबुद्धीनें कांहीं केलें नाहीं. " ऐसा करीना चारी बंद लिहोन दिल्हा आहे. " जे समयीं करवीराकडे नाईक गेले त्यासमयीं आपणाशीं पत्र लिहिलें जे तोतयास बाहेर काढोन किल्लयाची मजबुदी करावी. आम्ही दहा पांच हजार फौजसुद्धां रामचंद्र गणेश सुद्धां निकडे येतों. याप्रमाणें करवीराहून लिहून पत्रें पाठविलीं त्याजवरोन आम्ही किल्ला सोडोन बाहेर आलों. " ऐसे कित्येक अर्थ लिहिले आहेत. येविशींचे दस्तऐवज राजश्री नानासही एक दोन सांपडले आहेत. सारांश, नाईक सर्वस्वें बुडाला ! सौ. अन्नपूर्णाबाई रत्नागिरीसच होती तीस कैद करून पुण्यास आणविली आहे. अर्ध वाटेस आली. पायानें चालवीत आणितात ! आप्पाभटास मार तेथें दिला. तीन लक्ष रूपये मागतात ! अन्नपूर्णाबाई येथें आल्यानंतर तिची अप्रातिष्ठा बहुतां प्रकारें करावी म्हणोन नाना स्वमुखें बोलतात ! तिनें कांहीं आपल्या स्वबुद्धीनें केलें नाहीं आणि ईश्वरानें तिजवर कहर केला आहे ! ती कांहीं याउपर जीव ठेवणार नाहीं. फार वाईट गोष्ट आहे ! ईश्वरी सत्ता कळत नाहीं. सर्वस्वें नाइकाचा घात

जाहला. होणारासीं उपाय नाहीं. तोतयाबरोबर कोलटकर, धोंडोपंत, शिवाजीपंत, दौलतगीर ऐसे येथें आहेत त्यांस कैद आहे. अद्याप पारिपत्य करावयाचें ठरलें नाहीं. मागाहून लिहीन. दादा घोरपडे आणखी एक कोलटकर व वासुदेवबावा व राजश्री भास्कर हरीचे पुत्र ऐसे मुंबईस आहेत, रत्नागिरी व विजयदुर्ग सरकारांत घेतले तेव्हां जकीरा व नक्त ऐवज दोनी स्थलें मिळोन चार पांच लक्षपर्यंत सांपडलें. श्रीमंतांचें दैव थोर ! पांडुरंगराव तात्यांस वर्तमान लिहावयाविशीं लिहिलें, त्यास हेंच पत्र त्यांजकडे पाठवावें. शिवाजीपंतांनीं तपसिलवार लिहिलें आहे. कळावें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १९५८. (३० दिसेंबर.)

गंगाधरराव गोविंद यांस शिवाजी बाबाजीचें १८ जिल्काद इंदुवासर मु. पुणेंचें पत्र.

" श्रीमंत राजश्री तात्यांनीं जुनी हुबळी घेतल्याचीं पत्रें आलीं. आतां तिकडे फौज त्वरित जावी. " म्हणून लिहिलें, त्यास नानास वारंवार विनंति करितों व तेही निकडीनें राजश्री हरीपंततात्यांस सांगावयास चुकत नाहींत. परंतु ऐवज दिल्याखेरीज लोक कूच करून जात नाहींत. मानाजी शिंदे यांचे तयारीस मागोन किती दिवस जाले ! तोडच निघेना ! भाऊंजवळ रास्ते व प्रतिनिधी यांचीं पथकें आहेत तीं तिकडे पाठविण्याविषयीं नानास सांगितलें आहे, व त्यांच्याही चित्तास आलें आहे. परंतु ते लग्नास वांईस गेले आहेत. परत आल्यावर दोन्ही पथकांची रवानगी तिकडे करवितों. अमृतराव सुरतेस गेले होते त्यांस सुरतवाल्यांनीं आंत येऊं दिलें नाहीं म्हणून परत मुंबईस आले. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई नर्मदेवर आलीं. पुण्यास येत आहेत. सिंहगडचें बोलणें चालणें होऊन लोक खालीं उतरून सरकारचें निशाण चढलें. मोठें काम जालें. महादजी शिंदे संगमनेरास लग्नाकरितां गेले आहेत. सिंहगडचा गुंता उरकला. आतां होळकरही पुरंधरास जातील. शिंदे लग्नाहून आल्यावर उभयतांचा ठराव होणें तो होईल. आंगऱ्यास किल्ला व पन्नास हजारांचा तालुका द्यावयाचा ठराव होत आहे. "

सावशीची लढाई.

सावशीची लढाई होण्यास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांचा उल्लेख आजपर्यंत यथानुक्रमें जागोजाग करण्यांत आलाच आहे. तथापि त्याचें वाचकांस नीट अनुसंधान करितां यावें म्हणून पुनः त्याच गोष्टींचा येथें थोडक्यांत निर्देश करून नंतर पुढील कथा वर्णन करूं.

पुणें दरबार सन १७७४ त भाऊबंदकीच्या भांडणांत गुंतलें तेव्हांपासून हैदराच्या मानेवर मराठ्यांचें नूं होतें तें आपोआप दूर होऊन त्या महत्वाकांक्षी व प्रतापी पुरुषाचा भाग्योदय पुन्हा झपाटयानें होत चालला. सन १७७४ च्या फेब्रुवारींत दादासाहेब कर्नाटकांत असतां पुण्यास बारभाईंचें कारस्थान सिद्ध झाल्याचें पक्कें वर्तमान त्यांस समजलें. त्यावेळीं त्यांची हैदरअल्लीवर मोहीम सुरू होती ती तहकूब करून त्यांस त्वरेनें परत पुण्यास जावयाचें होतें, हैदरअल्लीशीं कसा-बसा तह करून त्यास अनुकूल करून घ्यावयाचें होतें, आपणाविरुद्ध कट करणाऱ्यांतले प्रमुख फाजबंद सरदार पटवर्धन व रास्ते यांचा नाश करावयाचा होता; आणि रिकामी झालेली तिजोरी फौजेच्या खर्चाकरितां थोडीबहुत भरावयाची होती. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन त्यांनीं हैदरअल्लीशीं तह ठरविला. त्या तहास कल्यागदुर्गचा तह म्हणतात. माधवराव पेशव्यांनीं तीन स्वाऱ्या करून मोठ्या आयासानें पन्नास लक्ष रुपये उत्पन्नाचें कर्नाटकांत राज्य कमाविलें होतें तें कांहीं नजराणा म्हणून जुजबी रक्कम घेऊन या तहानें दादासाहेबांनीं हैदर अल्लीस देऊन टाकिलें. इतकेंच नव्हे, तर स्वराज्यापैकीं कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधला सुमारें पाऊणकोट रुपये उत्पन्नाचा मुलूख फक्त दरसाल सहा लक्ष खंडणी देण्याच्या करारावर

त्यांनीं शत्रूस कायमचा देऊन टाकिला ! या टापूंत पेशवे-सरकारचा खालसा मुलूख धारवाड व कोपळ हे सुभे वगैरे होता, व शिवाय सावनूरकर नवाबाचें राज्य, नरगुंदकर भावे, व गजेंद्रगडकर घोरपडे व मनोळीकर शिंदे यांच्या व मुख्यत्वें पटवर्धन व रास्ते यांच्या जाहगिरी होत्या. आणि या शेवटच्या दोन प्रबळ सरदारांचा नाश करण्यासाठींच हा स्वराज्यापैकीं मुलूख देण्याची दादासाहेबांनीं योजना केली होती ! पटवर्धन व रास्ते ज्या जहागिरींच्या उत्पन्नावर फौज ठेवन आपणाशीं विरोध करणार त्या जहागिरीच मुळीं शत्रूस देऊन टाकिल्यावर ते फौज कसची ठेवितात आणि आपणाशीं विरोध तरी कसचा करतात, असा हा या तहांत दादासाहेबांचा डाव होता !

याप्रमाणें इतकें हें मराठी राज्य मिळालें त्याचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची घाई हैदरानें केली नाहीं. तसें करण्यास अनुकूल अशी तो संधि पहात बसला. ती त्यास लवकरच मिळाली व तिजपासून त्यानें फायदाही यथास्थित करून घेतला. पुणें दरबार दादासाहेबांचा पाठ-लाग, गुजरायची मोहीम, इंग्रजांशीं युद्ध वगैरे मसलतींत गुंतलें आहेसें पाहून त्यानें प्रथम सन १७७४ च्या पावसाळ्यांत शिऱ्यांचा सुभा हस्तगत केला. त्या कामावर त्यानें टिपूची योजना केली होती. टिपूनें शिरें, मदगिरी, बाळापूर, होमकोटें, गुरमकोंडा हे किल्ले तीन महिन्यांत सर करून त्या प्रांतांतलीं तमाम ठाणीं घेऊन सर्वत्र अंमल बसविला. त्या सालच्या अखेरीपर्यंत एका गुत्ती संस्थानाखेरीज मराठ्यांचा अंमल तुंगभद्रेपलीकडे कोठेंही हैदरानें राहूं दिला नाहीं. यानंतर स. १७७५ चे नोवेंबरपर्यंत दहा महिने तो मराठ्यांच्या वाटेस फारसा गेला नाहीं. तो श्रीरंगपट्टणांत राहून आपल्या राज्याची बळकटी व बंदोबस्त करण्यांत गुंतला होता. त्या सालच्या नोवेंबरांत त्यानें श्रीरंगपट्टणास

मोठी फोज तयार केली व अकस्मात् पांच दिवसांची दौड करून येऊन बल्लारी, कडपें व कर्नूल हीं संस्थानें घेतलीं, अदवानीकरांवर छापा घालून त्याचा धुव्वा उडविला व त्या संस्थानापासून एक लाख होन खंडणी घेतली. नंतर डिसेंबर महिन्यांत त्याचें मुरारराव घोरपडयाशीं युद्ध सुरू झालें तें मार्चअखेरीपर्यंत चाललें होतें. त्या अवधींत त्यानें गुत्तीचा किल्ला घेऊन तें संस्थान काबीज केलें, मुराररावास कैद करून कपालदुर्गच्या किल्ल्यावर पाठविलें आणि त्याचा पुतण्या शिवराव घोरपडे याजवर छापा घालून त्याच्या फौजेची नासाडी करून त्यास तुंगभद्रेपलीकडे पिटून लाविलें. इतकें झाल्यावर त्यानें श्रीपतराव व कृष्णराव शिवभोवे यांजबरोबर थोडीशी फौज देऊन त्यांस तुंगभद्रेपलीकडच्या मराठी राज्यांत उपद्रव देण्यास पाठविलें. त्यांनीं येऊन एप्रिलांत हरिहर व हव्याळ हीं ठाणीं घेऊन पटवर्धनांच्या लक्ष्मेश्वर तालुक्यास शिरशिरा लाविला. मागून त्याच उद्योगावर हैदराचा मेहुणा मीरेजा सात आठ हजार फौज घेऊन आला. त्यानें बंकापूर घेतलें. नंतर खुद्द हैदरअलीही सर्व सैन्य घेऊन आला. त्यानें प्रांतांतील तमाम पाळेगारांपासून खंडण्या घेतल्या. आगखी पुढें मुलूख घेण्याचा उद्योग करावा तों मराठयांशीं पुरंदर मुक्कामीं इंग्रजांचा तह झाल्यामुळें मराठी फोजा गुजरायेतून देशीं परत येत असल्याची त्यास बातमी लागली. त्यांतच त्याचा धनी श्रीरंगपट्टणचा राजा मृत्यु पावल्याची व मलबारांत नायर लोकांनीं बंड केल्याची खबर आली. इंग्रजांचीही मद्रासच्या बाजूनें कांहीं हालचाल दिसूं लागली. अशा तिन्ही चारी कारणांमुळें तो जून महिन्यांतच परत गेला. मराठयांशीं लढण्याकरितां आपणास कुमक द्यावी अर्से समक्ष भेटून बोलणें करण्याकरितां त्या सुमारास कित्तूरकर देसाई हैदरअलीच्या भेटीस गेला होता. भयभीत झालेला उंदीर आश्रयासाठीं बीळ शोधतां शोधतां अचानक बोक्याच्या तोंडीं जाऊन पडल्याप्रमाणें त्या देसायाची दशा-

झाली ! हैदरानें त्यास कैद करून श्रीरंगपट्टणास परत जातांना कि त्येक मजली बरोबर नेलें; आणि चवदा लक्ष रूपये देशील तर तुला सोडीन, नाहीं तर जन्मभर कैदेंत ठेवीन असें त्याशीं सक्तीचें बोलणें लाविलें ! शेवटीं त्याच्या हातापायां पडून चार लक्ष रूपये देऊन कित्तूरकरानें मोठ्या मिनतवारीनें आपली सुटका करून घेतली !

हैदर परत गेल्यावर मागें सात आठ हजार फौजेसह मीर रेजा बंकापुरास राहिला होता, त्यानें धारवाडपर्यंत स्वारी करून लुटालूट व जाळपोळ मनस्वी केली. ही स्वारी केल्यावर मीर रेजा जरी बंकापुरा-हून पट्टणाकडे परत गेला तरी मागें श्रीपतराव शिवमोघे स्वार पाय-दळ मिळून पांच हजार जमाव व कांहीं तोफा घेऊन बंकापुरास राहिला होता त्यास रयतेच्या मनांत थरकांप उत्पन्न करणारा हा मीर रेजाचा पराक्रम फार उपयोगीं पडला ! त्यानें पाळेगारांकडे खंडण्यांचे हप्ते राहिले होते ते आयासाशिवाय वसूल केले व सन १७७६ च्या जूनपासून आक्टोबरपर्यंत धारवाडप्रांतीं तमाम ठाणीं बसवन तिक-डचा मराठ्यांचा अंमल उठविला. हैदरअल्ली आज दोन वर्षें इतकी आगळीक करीत असतां पुणें दरबाराकडून त्याचा कांहींच प्रतिकार होत नाहींसें दिसूं लागतांच रयतेचा त्या दरबारावर विश्वास होता तो अजीबाद उडाला व तिनें हैदराचें जूं मुकाट्यानें मानेवर घेतलें ! श्रीपतरावानें प्रांतांतील चांगलीं मजबूत अशीं दहा पांच ठाणीं पाहून तेथें आपली शिबंदी ठेऊन बंदोबस्त केला व बाकी भिकार ठाणीं होतीं त्यांतून मराठ्यांची जुनी शिबंदी होती तीच ठेऊन देऊन व त्यावर देखरेखीकरितां एखादा जमादार व वसुलाकरितां एखादा कारकून ठेऊन देऊन वसूल घेण्याचें काम जारीनें सुरू केलें ! अंमल बसविण्याचा इतका सुगम प्रकार कधींच कोणास साधला नसेल ! शेवटीं आपणास कोणी विचारणारें नाहींसें पाहून धीट झालेल्या श्रीपतरावानें सप्टंबरांत येऊन खुद्द धारवाडासच मोर्चे देऊन तोफा

लाविल्या. आणखी दोन महिने त्याची उपेक्षा होती तर तो मनोळीची बारी चढून बेळगांव शहापुराकडे येता व शेवटीं खुद्द मिरज प्रांतास सुद्धां उपद्रव करिता !

स. १७७६ च्या जूनजुलैमध्यें हरीपंततात्या गुजराथेतून लष्करसुद्धां परत आले. त्या संधि पावताच्यांत तोतयाचें खूळ कसें मोडावें याच विचारांत कारभारी निमग्न होते, तथापि हैदरअल्लीच्या पारिपत्याची योजना करण्याकडेही त्यांचें दुर्लक्ष नव्हतें. त्यासंबंधें त्यांनीं निजामअल्लीशीं राजकारण करून असें ठरविलें होतें कीं, मराठे व मोंगल उभयतांनीं मिळून दसरा झाल्याबरोबर हैदरावर स्वारी करून आपले मुलुख सोडवावे व शत्रूच्या मुलुखापैकीं जितका प्रांत व खंडणी मिळेल त्यांची निमेनीम वांटणी उभयतांनीं करून घ्यावी. त्या स्वारीत निजामअल्लीकडून इब्राहिमखान धौशा व पेशव्यांकडून हरीपंततात्या यांची योजना झाली होती. उभयतांबरोबर मोठमोठ्या फौजा जय्यत तयारीनिशीं जावयाच्या होत्या. त्या संकेताप्रमाणें धौशाची तयारी होऊन त्यानें व निजामअल्लीनेंही आपल्या लष्कराचा तळ हालविला. पण हरीपंततात्याच्या फौजेचें देणें तीन वर्षांचें तटलें होतें तें देण्याबद्दल फौजेनें हरीपंततात्यांस व कारभाऱ्यांस सक्तीचा तगादा लाविला होता. त्याचा उलगडा कारभाऱ्यांकडून होईना व व दसरा जवळ आला तरी हरीपंततात्याची स्वारीस निघण्याची वार्ताही निघेना !

अशा प्रसंगीं पांडुरंगरावतात्या पटवर्धन यांनीं कारभाऱ्यांस सुचविलें कीं, निजामअल्ली कराराप्रमाणें फौज घेऊन बाहेर निघाले आणि आपणाकडून कांहींच हालचाल नाहीं हें आमच्या राज्याच्या इज्जतीस शोभत नाहीं. त्यांतून करवीर प्रांतीं आमची दहा हजार फौज असतां धारवाडास श्रीपतराव शिवभोंवे यांनीं येऊन तोफा

लावाव्या हें तर आमच्या सरदारीस फारच कमीपणा आणणारें आहे. याकरितां ही फौज घेऊन आम्ही धारवाडाकडे जातों व शिवमोग्यास हुसकून लावून प्रांतांत अंमल बसवितों. इतक्यांत हरीपंत तात्याही थोरली फौज घेऊन येतील व नंतर मोंगलांस मिळवून घेऊन पुढील मोहिमेचा उद्योग करण्यास ठीक पडेल. ही मसलत कारभाऱ्यांस फार पसंत पडली.

नंतर या मसलतीस अनुसरून पांडुरंगरावांनीं फौजेसह बाहेर निघावें तों त्या आधींच त्यांचीं भाऊबंद सरदारांशीं तेढ आली होती. पांडुरंगरावांचें घराणें मुख्य असल्यानें पटवर्धनांच्या सरदारीस त्यांचें नांव लागलें होतें. परशुरामभाऊ तासगांवकर व रघुनाथराव कुरुंदवाडकर यांनीं त्यांच्या हाताखालीं वागून अनुक्रमें अडीच हजार व दीड हजार स्वारांनिशीं फक्त ते सांगतील ती चाकरी करावयाची. स्वारीच्या मसलतीसंबंधें नफा नुकसान अगर कर्जवाम होईल तें पांडुरंगरावाचें. परशुरामभाऊ व रघुनाथराव यांचा त्याशीं कांहींएक संबंध नाहीं. गोपाळराव व वामनराव यांच्या कारकीर्दीत याचप्रमाणें चाललें होतें. हल्लीं पांडुरंगरावांनीं परशुरामभाऊंशीं बोलणें काढिलें कीं, स्वारीसंबंधें नफानुकसान व कर्जवाम होईल त्याची वांटणी तुम्ही उभयतांनीं पतकरावी. वामनराव वारल्यावर गेल्या खेपेस तुम्ही आमच्या तर्फेनें मुख्य सरदारी चालवीत होतां; आम्ही घरीं बसून भिरजेचा किल्ला व आम्हां सर्वांचा सरंजामाचा मुलूख संभाळीत होतों, आणि स्वारींत तुम्हांस खर्चावेंचाचाही पुरवठा करीत होतों. असें असतां स्वारींत कर्ज झालें त्याची वांटणी तुम्ही कां कबूल करूं नये ? यावर भाऊंचें म्हणणें पडलें कीं, स्वारीसंबंधीं खर्चवेंच पडेल तो करणेंच प्राप्त. तुमच्या घरांत कर्ज शिरावें ही कांहीं आमची इच्छा नाहीं. खर्च करणें तो आम्ही अगदीं काटकसरीनें जपून करीत असतों व पुढेंही करूं. तुम्ही सांगाल ती चाकरी करून दाखविण्याचें आमचें काम. तुमच्या मुख्य सरदारीस

कर्जवाम होईल त्याशीं आमचा संबंध काय ? वडिलांतागायत याच-प्रमाणें चालत आलें आहे. त्याचप्रमाणें तुम्हीही पुढें चालवावें. तें बोलणें पांडुरंगरावांस पटलें नाहीं. त्यांनीं सांगितलें कीं, आजपासून आमची सरदारी आम्हीच करीत जाऊं. तुम्ही आम्ही निरनिराळी चाकरी करावी. आम्ही कर्नाटकांत जातों. तुम्ही तोतयाचे व करवीरकरांचे बंदोबस्तास करवीरप्रांतीं राहावें. आजपासून तुमच्या सरदारीस कर्ज होईल त्याचे मालक तुम्ही: आमच्या सरदारीस कर्ज होईल तें आम्ही पाहून घेऊं. तें बोलणें भाऊंनीं मान्य केलें.

ही स्थिति पांडुरंगरावांनीं पुण्यास कळविल्यावर कारभाऱ्यांनीं पांडुरंग-रावांबरोबर जाण्यास कोन्हेरराव पटवर्धन यांची नेमणूक करून सर. कारच्या मुताळिकीची शिक्के कटयार व फडणीस पोतनीस वगैरे सर-कारचे दरकदार कोन्हेररावांकडे पाठवून दिले व कृष्णराव पानशे करवीर प्रांतीं होते त्यांचीही तोफखान्यासह या स्वारीवर योजना केली; आणि परशुरामभाऊंस रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा यांसह करवीर प्रांतीं राहण्यास हुकूम केला. आणि शिवरामबाबा घोरपडे गुत्तीकर, दौलतराव गजेंद्रगडकर, नीळकंठराव शिंदे मनोळीकर, नरगुंदकर भावे व धारवाड प्रांतीं देसाई वगैरे इतर जमीदार यांस पत्रें पाठविलीं कीं तुम्हीं पांडुरंगरावांच्या फौजेस आपापल्या पथकानिशीं येऊन मिळावें.

ता. ६ अक्टोबर स. १७७६ इसवी रोजीं पांडुरंगराव मिरजेहून निघाले. कुडची येथें त्यांची व कोन्हेररावांची गांठ पडली. नंतर ते उभयतां तेरदाळ व यादवाड या परगण्यांतून पुढें कूच करून चालले तों कृष्णराव पानशे व शिवराव घोरपडेही येऊन मिळाले. आणखी जमीदार वगैरे येऊन मिळण्यास व फौजेची जमवाजमव होण्यास आणखी कांहीं मासपक्ष अवधि लागला. नंतर ता. १५ नवं-

बर रोजी ही फौज मुरगोडची बारी पार होऊन दोडवाडास आली. २७ तारखेस पांडुरंगरावाचा मुक्काम बेटगिऱ्यास होता. तेथें शत्रूची हजार दोन हजार फौज होती ती आधींच पळून गेली होती. पांडुरंगराव मिरजेहून निघाल्याचें वर्तमान येतांच श्रीपतराव शिवमोघे धारवाडचे मोर्चे उठवून बंकापुरास परत गेला. त्यानें दोन तीन हजार बैद मात्र धारवाडप्रांतीं झाडीच्या आसऱ्यानें ठेविले. ते बैद चोरून मारून झाडींतून येऊन प्रांतास उपसर्ग देत, परंतु त्यांस गांठण्याकरितां बेटगिरें व मिश्रीकोट येथें मराठी फौज धांवून गेली तिची त्यांनीं गांठ पडूं दिली नाहीं ! ही नवी मराठी फौज प्रांतांत आलीसें पाहतांच हैदर अल्लीचे लोक ठाण्या ठाण्यांतून होते ते तमाम पळून गेले. ते मुळीं ठाणीं झुंजविण्याकरितां राहिलेच नव्हते ! प्रांतांतन वसल उकळण्यासाठीं राहिलेले ते लोक लढाईच्या प्रसंगास कशाला तोंड देतील ! एका दिसेंबर महिन्यांत पांडुरंगरावांनीं धारवाड प्रांतांतलीं सर्व ठाणीं घेतलीं. त्यांत नवी हुबळी मात्र एक दिवस झुजली व जुन्या हुबळीस सात आठ दिवस मोर्चे लागले होते. बाकी मिश्रीकोट, तडस, कलघटगी, हीं व इतर बारीक सारीक ठाणीं न लढतांच पांडुरंगरावांच्या हातीं आलीं. आतां लक्ष्मेश्वर व मुळगुंद हे तालुके मात्र घ्यावयाचे राहिले; ते तेवढे घेतले म्हणजे बंकापुराखेरीज तुंगभद्रेअलीकडे शत्रूचा अंमल राहिला नाहीं; असा विचार करून पांडुरंगराव दिसेंबर अखेरीस मुळगुंदास आले. आल्याबरोबर त्यांनीं मुळगुंद व लक्ष्मेश्वर येथें ठाणीं बसविलीं. कुंदगोळांत ठाणें आधींच बसलें होतें. सावशीचें ठाणें टाकून शत्रूचे लोक पळून गेले ही बातमी मराठ्यांस समजण्या. आधींच शिरहट्टकिर देसायास कळल्यावरून त्यानें तें रिकामें ठाणें आपल्या ताब्यांत घेतलें. तो प्रबळ देसाई मराठ्यांचा पक्का द्वेषी असून हैदरअल्लीस पूर्णपणें अनकूल झाला होता.

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

पांडुरंगरावांची फौज येतांच श्रीपतरावानें बंकापुराहून हैदर अल्लीस लिहिलें कीं, या फौजेपुढें आपला टिकाव लागत नाहीं, याकरितां शत्रूच्या मुकाबल्यास आणखी फौज पोक्त सामानानिशीं पाठवावी. त्यावरून हैदरअल्लीनें सहा सात हजार कवाइती पायदळ, दोन तीन हजार स्वार व नऊ तोफा इतकें सामान देऊन महंमदअल्ली कुमदान याची रवानगी केली. दादासाहेबांकडून हैदराकडे बाजीराव बर्वे हे सरदार येऊन राहिले होते. त्यांचीही कांहीं मराठी फौज कुमदानाबरोबर आली होती. तो कुमदान रटेहळ्ळीच्या जंगलांत येऊन उतरला, तेव्हां पांडुरंगरावांच्या मनांत चिंता उत्पन्न झाली. आपली स्थिति किती बाईट आहे हें त्यांच्या लक्षांत आतां आलें होतें. श्रीपतरावानें घुळवीत घुलवीत पांडुरंगरावांस युक्तीनें पुढें ओढात कुमदानाच्या तावडींत आणून सोडिलें; कीं हेच चोहींकडे आपली फत्ते होत आहेमें पाहतांच हुरळून जाऊन आपण होऊन वाघाच्या गुहेच्या तोंडापर्यंत चालून गेले, हें सांगतां येणें कठीण आहे ! पटवर्धनांच्या जहागिरीचे तालुके तुंगभद्रेच्या तीरीं बंकापुरापासून पंधरा वीस कोसांच्या टापूंत होते. त्यांतून वसूल येईल त्यावर आपल्या फौजेचा चरितार्थ चालावयाचा, ते तालुके शत्रूनें ग्रासिले असतां आपण धारवाडाकडे फौज बरोबर बाळगून रहावें हें ठीक नाहीं, असें वाटल्यामुळें पांडुरंगराव पुढचा मागचा विचार न पाहतां पुढें सरकले असावे. एरवीं हरीपंततात्या थोरली फौज घेऊन येतपर्यंत त्यांनी धारवाड सोडून पुढें न जाण्यांतच सुरक्षितपणा होता. कांहीं बरा वाईट प्रसंग दिसला तर पाठीशीं सर्व त्यांचाच मुलूख असल्यामुळें मागें सरकण्यास जागा होती. आतांचें ठिकाण—त्यांस कुमक मिळण्याचें ठिकाण—मिरज अथवा पुणें येथून फार दूर होतें. सरदारांच्या बाजूनें पाहिलें तर पानशांचा अंमल तोफखान्यापुरता होता. शिवराव घोरपडे हा मुरारराव सेना-

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

पतीच्या तालमींत तयार झालेला शूर व कुशल सरदार होता, पण त्याची फौज थोडी असल्यामुळें त्याचें वजन फारसें पडत नसे. कोन्हेर राव हा काळाच्या जबडयांत देखील उडी टाकण्यास न भिणारा मर्द शिपाई होता. त्याची समशेर नेहमीं उपसलेली. 'हूं, हाणा, मारा, ठोका.' एवढाच मंत्र त्याम पाठ असल्यामुळें सरदारीचें कसब त्याचे अंगीं कमी होतें हें गतवर्षीं कित्तूरच्या व करवीरच्या मोहिमेंत दिसून आलें होतें. पांडुरंगरावाजवळ फौजेचा भरणा विशेष होता, पण लष्करी कामाचा अनुभव त्याम कांहींच नव्हता ! या कामांतलें सर्व कांहीं मला समजतें अशी घमेंड मात्र त्याम उत्पन्न झाली होती व तिनेंच त्याचा नाश केला ! उलटपक्षीं कुमदान हा हैदराचे उत्तम सरदार होते त्यांपैकीं शूर व कुशल म्हणून नांवाजलेला असून त्याची फौज स्वारांच्या बाजूनें कमी होती तरी पायदळाच्या व तोफांच्या बाजूनें मराठयांपेक्षां फारच श्रेष्ठ होती. त्यास बंकापूरच्या किल्ल्याचा व दाट जंगलाचा आश्रय होता. शिवाय कसाही प्रसंग पडला तरी त्याच्या पाठीमागें हैदराचेंच राज्य असल्यामुळें त्यास चौहोंकडून कुमक होण्याजोगी होती. त्याच्या लष्करची बातमी मराठयांस चांगलीशी कळत नव्हती. यांच्या लष्करच्या मात्र बारीकसारीक हालचालींसुद्धां शिरहट्टीकर देसायाच्या मार्फत कुमदानाच्या कानावर तत्काळ जात असत !

मराठी फौजेवर रात्रीं छापा घालून ती उधळून लावावी असा कुमदानानें बेत केला होता. त्या वेळीं मार्गशीर्ष महिन्याचा वद्य पक्ष सुरू होता म्हणन तो काळोख्या रात्रीं येण्याची वाट पहात बसला होता. वद्य अष्टमीस—ता. २ जानेवारी स. १७७७ रोजीं तो आपल्या फौजेसह बंकापुरास आला. त्याजवळ आतां एकंदर फौज सात हजार स्वार, दहा हजार पायदळ व अकरा तोफा अशी लढाईच्या तयारीनें सज्ज

होती. देशींहून पांडुरंगरावास व कोन्हेररावास वारंवार सूचना जात होत्या कीं, " इकडील फौज थोडी, आणि शत्रूची फौज समीप आली आहे. त्यांचीं ठाणींठुणी लगत आहेत. त्यास आसरा आहे. मुलूख पलीकडे सारा त्याचा लागला आहे. आमची फौज पुढें वाढून गेली आहे. फार फार सावधपणें वागावें ! " अशा सूचना होत होत्या तरी मराठे सरदारांस अलीकडे काय भूत बडवलें होतें न कळे, बंकापुरावर चालून जाऊन तेथील फौजेस कुमदान येऊन मिळण्यापूर्वीच तिची दाणादाण करण्याचा त्यांनीं मनसबा योजिला होता ! आणि त्यामुळेंच. कुमदानास वर सांगितल्याप्रमाणें बंकापुरास येणें भाग पडलें होतें. असो

कुमदान यानें मराठी फौजेची बातमी आगविर्ला तिजवरून त्या फौजेचा तळ सावशीपासून चार कोसांवर इंदिगोळच्या ओढ्यावर पडला आहे अशी त्यास बातमी लागली. त्यावरून तो मराठ्यांवर छापा घालण्याच्या उद्देशानें सिद्धता करून मार्ग. व.१४ श.१६९८— बुधवार ता. ८ जानेवारी स. १७७७ रोजीं बंकापुराहून निघून सायंकाळीं मुक्कामास सावशीस आला. तें ठाणें शिरहट्टीकर देसायाचें होतें व तो देसाईही आपल्या जमावानिशीं बरोबर होता. त्या रात्रीं मराठी फौजेवर छापा घालावा असा त्याचा बेत होता. परंतु त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं शिवराव घोरपडे, कृष्णराव पानशे, कोन्हेरराव पटवर्धन, व पांडुरंगरावांच्या पागेवरचे व पथकावरचे सरदार वासुदेवकाका पटवर्धन व गोविंद सखदेव असे फौज घेऊन तलावा करण्याकरितां बाहेर पडले होते. त्यांस कुमदानाचा उद्देश समजल्यावरून ते गोटास परत न जातां सावशीपासून दोन कोसांवर आवशीसच येऊन राहिले. कुमदान रात्रीं बाहेर पडेल तर त्याजवर गडबड करून त्यास घाबरवून मागें परतवावें अशी त्यांची मसलत होती. पण ती बातमी त्यासही समजल्यामुळें तो बाहेरच पडला नाहीं. रात्रीं आपणावर छापा येणार

ही बातमी पांडुरंगरावास समजल्यावरून ते हजार दोन हजार स्वारांसह गोटाच्या अघाडीस कोसावर नौबत वाजवीत रात्रभर छबिन्यास उभे होते. उजाडल्यावर त्यांच्या मनांत सावशीवर चालून जाऊन कुमदानाशीं लढाई द्यावी असें आलें. शत्रूची फौज फार व तोफांचें सामानही विपुल आहे, त्यावर चालून यावयाचें असल्यास भारी फौजेनिशीं मजबुतीनें व सावधपणानें आलें पाहिजे, असा त्यांस कोणीं सल्ला दिला. पण तिकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. ते लगेच निघून सावशीजवळ घोरपडे वगैरे सरदार उतरले होते त्यांजकडे आले. तों ते सरदारही प्रातःकाळींच स्नानसंध्या भोजनें उरकून फौज तयार करून उभे होते. मग सर्वांनीं मसलत करून त्याच वेळीं कुमदानावर चालून जावयाचें ठरवून सावशीकडे कूच केलें.

ती बातमी कुमदानास तत्काळ समजल्यावरून त्यानें सावशीच्या किल्ल्याबाहे तुरीचें शेत होतें त्यांत महा तोफा व पांचसहा हजार कवायती पायदळ तयार करून छपवून ठेविलें, किल्ल्याच्या दोहीं बाजूंस तीन साडेतीन हजार स्वारांची प्रत्येक अशा दोन टोळ्या उभ्या केल्या, आणि बाकीचें पायदळ व गिरहट्टीकर देसायाचे लोक यांसह आपण किल्ल्यांत राहिला. त्यानें अशी ताकीद देऊन ठेविली कीं, मराठी फौज तोफांचे माऱ्यांत पक्केपणें आली म्हणजे मी संकेत करीन; त्याबरोबर शेतांतून व किल्ल्यांतून एकदम शत्रूवर तोफांचा मारा करावा. त्या मारानें शत्रूची फौज विस्कळीत होतांच शेतांतून व किल्ल्यांतून पायदळानें व दोहीं बाजूंच्या स्वारांच्या टोळ्यांनीं शत्रूवर एकवेळीं हल्ला करावा.

मराठी फौज सावशीच्या किल्ल्याजवळ आली तेव्हां तिला शत्रूचे स्वार मात्र दिसले, परंतु छपवून ठेविलेलें पायदळ व तोफा कांहीं दिसल्या नाहींत. त्यामुळें ती बेसावधपणानें शत्रूच्या स्वारांवर

झपाटयानें चालून आली. ती तोफांचे माऱ्यांत पुरतेपणें आल्याबरोबर तिजवर शेतांतून व किल्ल्यांतून एकदम अकरा तोफांचा भडिमार सुरू झाला. त्या मारानें मराठी फौजेंत कालवाकालव होऊं लागली. तों शत्रूच्या स्वारांनीं व पायदळानें निकराचा हल्ला केला. तेव्हां शिव. राव घोरपडे मात्र शत्रूशीं धैर्यानें व शिस्तीनें लढत राहिले, पण बाकीची पटवर्धनांची वगैरे सारी फौज पळत सुटली ! ती आंवरण्या-साठीं पांडुरंगराव व कोन्हेरराव वगैरे सरदारांनीं फार खटपट केली. परंतु ती फौज आपापल्या सरदारांस न जुमानतां त्यांस भरलढाईंत टाकून देऊन पळून गेली ! असें झाल्यावर पुढली दुर्दशा लिहावयास पाहिजे असें नाहीं. त्या प्रसंगीं कोन्हेरराव लढाईंत मारले गेले व पांडुरंगराव व त्याबरोबरची वासुदेव धोंडदेव, रामचंद्र कृष्ण दातार, श्रीपतराव मोरेश्वर पटवर्धन, निळकंठराव शिंदे व बहिर्जी घोरपडे वगैरे मंडळी जखमी होऊन शत्रूकडे पाडाव सांपडली. शिवराव घोर-पडे अद्यापि मर्दुमीनें लढतच होते, पण साऱ्या फौजेनें पळ काढिला, तेव्हां त्यांचें शत्रूपुढें काय चालणार ! शत्रूनें त्यांच्याही टोळीचा फन्ना पाडून त्यांस जखमी करून कैद केलें. सरदारांपैकीं कृष्णराव पानशे व जनोबा सुभेदार (पटवर्धन यादवाडकर) हे मात्र जीव बचावून परत आले. साऱ्या फौजेंतले फार झालें तर तीन चार हजार स्वार शाबूत-पणें बचाऊन आले असतील. बाकीच्यांपैकीं कोणाचीं घोडीं गेलीं तर कोणाचीं भागमें मेलीं, कोणाचें सामान गेलें, कोणी मेले, कोणी घायाळ झाले, अशी सर्वत्र दुर्दशाच होती. एकदां पळ सुटल्यावर शत्रूनें लुट-ण्यांत व कत्तल करण्यांत कांहीं बाकी ठेविली नाहीं ! तोफा, नौबती, पालख्या, हत्ती व सुमारें दोन हजार घोडे शत्रूच्या हातीं लागले. इदिगोळास बुणगे होतें तेथें लढाईचें वर्तमान कळतांत तेथें शिवाजी-पंत पोतनीस म्हणून कारकून होता त्यानें हुशारी करून बुणग्याचें तत्काळ कूच करविलें. तो प्रहर रात्रीं नरगुंदास आला व दुसरे दि-

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

वर्शी रामदुर्गाच्या बारीनें पार होऊन कंकणवाडीस येऊन राहिला. लढाईंतून पळून आलेले शिलेदार तेथें त्याभोंवते गोळा झाले.

पांडुरंगराव वगैरे पाडाव सांपडलेल्या लोकांस कुमदानानें बंकापुरास पाठविलें. तेथें बाजीराव बर्वे होते त्यांनीं त्यांचा योग्य समाचार घेऊन त्यांच्या जखमांची निगा करविली. तेथून आठ दिवसांनीं त्यांस श्रीरंगपट्टणास पाठविण्यांत आलें. तेथें हैदरअल्लीनें पांडुरंगरावांस सन्मानानें ठेविलें होतें. ते पांडुरंगराव कैदेंत सांपडल्यापासून दहा महिने चार दिवसांनीं म्हणजे ता. ४ नोवेंबर सन १७७७ रोजीं श्रीरंगपट्टणास ज्वराच्या दुखण्यानें वारले. बाकीच्या बंदिवानांस हैदरअल्लीनें चार वर्षें कैदेंत ठेवून जबर खंड घेऊन सोडून दिलें. त्यानें शिवराव घोरपडयास मात्र न सोडतां कपालदुर्गावर मुरारराव घोरपडे कैदेंत होते तेथें पाठवून दिलें असो.

सावशीच्या लढाईचें थोडेंसें वर्तमान मिरजेस ता. १२ जानेवारीसच कळलें. तथापि कच्ची हकीकत समजण्यास आणखी आठ दिवस लागले. ती समजल्यावर तेथें व कुरुंदवाड, तासगांव व इतर ठिकाणीं पटवर्धनांचीं व त्यांच्या आश्रितांचीं व फौजेंतील हजारों शिलेदारांचीं घराणीं होतीं त्यांत हाहाकार झाला तो काय वर्णावा ! तथापि ती रडत बसण्याची वेळ नव्हती. लढाई झाल्यापासून पंधरा दिवसांत धारवाड प्रांतीं व पटवर्धनांच्या तिकडच्या जहागिरींत कुमदानानें पुनः अंमल बसविला व खुद्द धारवाडास मोर्चे लावून तोफांची मारगिरी सुरू केली. उपेक्षा केल्यास तो मनोळीची बारी ओलांडून बेळगांव शहापुराकडे किंवहुना मिरजेकडे मुद्दां येण्याचा संभव होता. हा अनर्थ टाळण्यासाठीं कंबर बांधण्याचें सामर्थ्य पटवर्धनांत परशुरामभाऊंखेरीज कोणांतही नव्हतें. सर्वांची भिस्त त्यांजवर होती व त्यांसच हा कुमदानास पुढें न येऊं देण्याचा उद्योग करावा लागला. तो उद्योग त्यांनीं कसा केला

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

हें सांगण्यापूर्वी गेल्या तीन महिन्यांत त्यांच्या व कोल्हापूरकरांच्या काय काय हालचाली चालल्या होत्या त्यांचें दिग्दर्शन करून पुढील कथाभाग वर्णन करूं.

सन १७७६ चा पावसाळा संपत आल्याबरोबर कोल्हापरकरांनीं स्वारींची जारीनें तयारी केली. त्या सालच्या मार्चएप्रिलांत पटवर्धन वगैरे पेशव्यांच्या सरदारांनीं कोल्हापूरच्या पेठा जाळिल्या, स्वामीचा मठ लुटला, प्रांतांतलीं कोडोली, कागल, आळतें, वगैरे ठागीं घेऊन चोहोंकडे लुटालूट व नासधूस केली. या गोष्टींची येसाजी शिंद्यास चुटपुट लागून राहिली होती व याचा वचपा काढण्यासाठीं तो तीन हजार स्वार व तितकेंच पायदळ तयार करून संधी पहात बसला होता. ती त्यास लवकरच मिळाली. पेशव्यांचे रामचंद्र गणेश हे सरदार करवीरप्रांतीं होते त्यांस येऊन मिळण्याकरितां प्रतिनिधीची पांचशें पायदळ व हजार स्वार अशी फौज येत होती तिचा मुक्काम वारणेच्या कांठीं होता. ती बातमी राबून येसाजी शिंद्यानें अकस्मात् करवीराहून लांब मजल करून येऊन त्या फौजेवर छापा घातला व तिची दाणादाण करून तो त्वरेनें करवीरास परत गेला. नंतर परशुरामभाऊस मिळण्याकरितां बाजीपंत अण्णा एक हजार स्वार घेऊन कोंकणांतून घाटमाथ्यास आला त्यावरही येसाजी शिंद्यानें अगाच अचानक येऊन छापा घातला. पण या खेपेस बाजीपंतानें प्रतिनिधीचे लोक मिळवून घेऊन शिंद्याचाच उलट मोड केला यामुळें त्याची पुष्कळ नामडी होऊन त्यास पळून जावें लागलें. या सुमारास कोल्हापरकरांनीं कागल पुनः घेतलें व घोरपडे सेनापतीपासून कापशीचें ठाणें घेतलें व इचलकरंजीकरांस पुनः उपद्रव देण्यास सुरुवात केली. त्यावेळीं करवीर प्रांतीं पेशव्यांचे सरदार रामचंद्र गणेश हे दोन तीन हजार फौजेसह गोकाकेजवळ होते त्यांच्यानें करवीरकरांचा कांहींच बंदोबस्त होण्याजोगा नव्हता. सबब पुणें दरबारानें असें

ठरविलें होतें कीं, परशुरामभाऊंनीं आपल्या व कुरुंदवाडकरांच्या पथकासह स्वारीस निघावें. त्यांच्या मदतीस हुजरातीचे आठशें व रास्त्यांचे दोन हजार स्वार पुण्याहून पाठवावे. शिवाय प्रतिनिधि, रामचंद्र गणेश, व बाजीपंत त्या प्रांतीं आहेतच. त्या सर्वांनीं भाऊस येऊन मिळावें म्हणजे एकंदर आठ नऊ हजार फौज जमा होईल. ती फौज घेऊन भाऊंनीं करवरिकरांवर स्वारी करून त्यांचें पारिपत्य करावें. या मसलतीस अनुसरून परशुरामभाऊ १७७६ च्या नोवेंबरांत तासगांवाहून निघाले तों त्यांस एक नवीच कामगिरी आली. तोतयाच्या बंडाचीं उत्पादक रामचंद्र नाईक परांजपे याजकडे चिकोडीचें ठाणें होतें. शिवाय तोतयास अनुकूल झालेल्या बाबूराव दादाजी नांवाच्या अंमलदाराच्या हातीं बागेवाडी व दुसरीं किरकोळ ठाणीं होतीं. हीं ठाणीं जप्त करण्याविषयीं पुण्याहून भाऊस हुकूम आला होता. ही कामगिरी बरीच नाजूक होती. कारण बाबूरावानें रामचंद्र गणेश यास अनुकूल करून घेतल्याचा बोभाटा झाला होता. परशुरामभाऊ नोवेंबरअखेरीस बाराशें स्वारांनिशीं कृष्णापार होऊन येडुरास आले. तेथें रघुनाथराव कुरुंदवाडकर त्यांस आपल्या पथकासह मिळाले. नंतर भाऊ चिकोडीकडे वळले तों त्यांस हुजरातीचे व रास्त्यांचे लोक येऊन मिळाले. शेवटीं बाबूरावाचा पक्ष सोडून रामचंद्र गणेश फौजेसह येऊन भेटले. नंतर भाऊ चिकोडींत ठाणें बसवून बागेवाडीस आले. तेथें थोडीशी लढाई झाल्यावर बाबूराव दादाजीनें शरण येऊन तें व दुसरीं आपल्या ताब्यांतील ठाणीं भाऊंच्या हवालीं केलीं. नंतर बाजीपंत व प्रतिनिधींचे लोक येऊन मिळाले. इतकें होई तों दिसेंबर अर्धा होऊन गेला.

नंतर ही एकत्र झालेली फौज घेऊन परशुरामभाऊ कोल्हापूरकरांच्या राज्यांत शिरले, ते भूधरगडाकडे गेले. ते त्या किल्ल्याच्या घेऱ्यांतलीं

खेडीं लुटून जाळून फस्त करीत व किरकोळ ठाणीं बसवीत एक महिन्यांत कोल्हापुरापासून पांच कोसांवर आले. त्यांशीं उघड्या मैदानांत लढून आपला निभाव लागणार नाहींसें पाहून येसाजी शिंद्यानें लोण्याचें बोलणें लाविलें. पण त्यावरच सर्वस्वी भिस्त न टाकितां इकडे कोल्हापूर निकरानें झुजाविण्याचीही त्यानें सिद्धता केली. तें शहर झाडून ओस करून धान्य व दारू गोळी वगैरे सामान तयार करून चार हजार स्वार व तीन हजार पायदळासह तो कोल्हापूर धरून बसला. अशी स्थिति असतां ता. १३ जानेवारी रोजीं सावशीच्या लढाईचें थोडेंसें वर्तमान परशुरामभाऊस कळलें. कोल्हापूरकर तह करितात कीं काय याचा त्यांनीं ठाव घेऊन पाहिला, पण त्यांसही त्या लढाईचें वर्तमान कळलेंच होतें. अर्थातच ते तह करण्यास कबूल नसल्यामुळें त्यांजवरची मोहीम सुरू ठेवणें प्राप्त होतें. त्या कामावर रामचंद्र गणेश यांस ठेवन बाजीपंत व प्रतिनिधि यांची फौज त्यांच्या हाताखालो नेमून परशुरामभाऊ बाकी फौजेसह मनोळीच्या बारीकडे चालले. त्या वेळी त्यांजवळ पांच हजार स्वार, तीनशें पायदळ व दोन तोफा इतकें मात्र सामान होतें.

सावशीच्या लढाईसारख्या शेंकडों लढाया झाल्याचे मराठी इतिहासांत उल्लेख आहेत. तथापि ही लढाई झाल्यापासून मिरज घराण्याच्या किंबहुना सर्व पटवर्धनांच्या सरदारीस उतरती कळा लागली. या दृष्टीनें या लढाईचें महत्व पटवर्धन घराण्याच्या इतिहासांत विशेष आहे. सबब कित्येक स्थलीं पुनरुक्ति झाली असली तरी हें सावशीच्या लढाईचें तपशीलवार वर्णन येथें जें दिलें आहे तें या प्रसंगाचें योग्य महत्व समजून घेण्यास वाचकांच्या उपयोगीं पडेल.

नं. १९५९. **श्री.** (१ जानेवारी.)

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें राघो सखदेव. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत मार्गशीर्ष वद्य अष्टमी बुधवार मुक्काम मुऱ्हगुंद ..... नवे हुबळीचें ठाणें घेतलें. जुने हुबळीची खंडणी घेतली. याउपरी कूच करून लक्ष्मेश्वराच्या सुमारें जाणार. लक्ष्मेश्वरचें ठाणें घातलें आहें. चिंता नाहीं. हैदरखानार्ची फौज पेशजीची बंकापुरीं आहे. पण नवी फौज पट्टणाहून सात हजार राऊत व दहा हजार बार व चार तोफा याप्रमाणें आल्याची बातमी आहे ..... हे विज्ञापना.

नं. १९६०. **श्री.** (१ जानेवारी.)

पैत्रस्ती छ २७ जिल्काद. सन सबा सब्बैन. मुकाम कोलवाड.

चिरंजीव राजश्री पांडुरंगरावतात्या यांसी प्रती अनूबाई. आशीर्वाद. उपरी. येथील क्षेम तागायत मार्गशीर्ष वद्य अष्टमी बुधवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रीं सांभाळ करावा. यानंतर चिरंजीव राजश्री दादा मुंबईस होते तेथें शरीरीं समाधान न होय, याजकरितां तेथून निघून म्हापणास आले. आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे. पुढें बुद्धिवाद काय सांगतां तो सांगावा. त्याप्रमाणें करूं. आम्ही सर्वप्रकारें आपले मांडीवर उसें ठेविलें आहे. येविशीं पेशजी आपण राजश्री महादाजी विठ्ठल व कृष्णाजी धोंडदेव यांजबराबर सांगोन पाठविलेंच आहे. पुढें आपलें पत्र येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. पत्र आपण वाचून विसर्जन करावें. पूर्वी ज्या गोष्टी

---

१ कुरुंदवाडकरांचे कारभारी महादजी बल्लाळ यांस हें पत्र पांडुरंगरावांच्या लष्करांतून लिहिलेलें आहे. २ टिंबें दिलेल्या ठिकाणीं मूळपत्र फाटलें आहे. ३ घोरपडे इचलकरंजीकर. ४ व्यंकटराव.

जाहल्या त्या आपण चित्तांत न आणाव्या. जें होणें तें होऊन गेलें. पुढें आपणाशिवाय दुसरा विचार नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं. १९६१. **श्री.** (२ जानेवारी.)

पै० छ २२ जिल्काद सन सब्बा सबैन. मुा! कोलवाड.

सेवेशीं विज्ञापना. येथील वर्तमान मार्गशीर्ष बहुल अष्टमी गुरुवार रात्र प्रहर एकपावेतों स्वामीच्या कृपाकटाक्षेंकडून यथास्थित असे. विशेष. इकडील राजकी अभिप्राय महमद अल्ली कुमदान व गाजीखान व ममदुखां वगैरे दोन हजार तर्वाक व एक हजार शिलेदार मिळोन तीन हजार व बार चार हजार व तोफखाना सुमार सहा येणेंप्रमाणें काल अळुरास मुक्काम. आजी तिसरे प्रहरचे सुमारास हनगलचा रोख धरून किल्लेस येणार होता तों वाटेस माघारा फिरून बंकापुरास तिसरे प्रहरास दाखल झाला. सवेंच त्रिवर्ग सरदार आदिकरून यांची गंगाराम किल्लेदार याणें बाहीर येऊन भेट घेतली. त्यांस उतरावयास जागा पेठेजवळ अयनहड्डी म्हणून थोर तळें आहे तेथें उतरविलें. त्या जागेस मागें अविंध[1] येऊन अहोरात्र त्याच स्थळास राहिला होता. तेंच करार होऊन डेरे दिले. तमाम पेठेंत त्रिवर्ग सरदारांची फौज तीन हजारपर्यंत व बार व प्यादे मिळोन पांच सहा हजार निवळ आहेत. तोफा पांच सजावून बाहेर जिभीजवळ ठेविले आहेत. याप्रमाणें वर्तमानपुढें मनसबा हरएकविशींचा कुमदानाचे मतें ठरलेप्रमाणें सर्वत्र सरदार गंगाराम आदिकरून याचे कहेंत चालावें ऐशी अविंधाची अखतीयारी आहे. याचप्रमाणें सर्वत्र सरदारांस परवानाही घेऊन आला आहे. सारांश ठिकाणांतून[2] इर्त बांधून आला आहे. म्हणजे एकदां मातबर लढाई देऊन तमाम तारपत्यार करून मग अर्जी लिहितों

---

१ हैदरअल्ली. २ श्रीरंगपट्टणाहून.

म्हणून बोलवून आला आहे. आजच्या मनसबीयाचा प्रकार आढळला. पुढें कच्चें वर्तमान आणवीन तसें तहकीक येतांच सेवेशीं लिहोन पाठवितों. मी स्वामींच्या पदरचा असें. साभिमानपूर्ण असलें पाहिजे. वरकड येथील कित्येक वर्तमान राजश्री रामचंद्रपंतदादांनीं चरणासीं निवेदन केलेंच असतील. वारंवार उं०

नं. १९६२. **श्रीगणपति.** (मार्ग. व.११–५जाने.)

अपत्यें परशुराम रामचंद्र. दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २१ जिल्काद नजीक भूदरगड येथें आपले आशीर्वादेंकरून सुखरूपें असों. विशेष. पुरंधराहून श्रीमंत रा. पंतप्रधान यांचें पत्र आलें, त्याची नक्कलच करून सेवेशीं पाठविली आहे. आह्मी पदरचे सेवक. आम्हावर शब्द न ये असें होय तें करणार वडील आहेत. फार काय लिहावें ! सविस्तर रा. महादाजीपंत विनंति लिहितील त्यावरून कळेल. आमची पत दरबारीं राहे तें करावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. १९६३. **श्री.** (५ जानेवारी.)

तीर्थस्वरूप राजश्री तात्यासाहेब वाडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामाजी नारायण गोखले. साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा मार्गशीर्ष वद्य एकादशीपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वाद–पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर मजकूर कळोन परम संतोष जाहला. वडीलें फौजसुद्धा बंकापुराचे रोखें दुष्टाची फौज आली आहे, त्यावरी चालोन जातात. म्हणोन ऐकिलेनें चिंता लागली आहे ती श्री जाणे ! त्रिकाल श्री....ल घरचे देवा-

---

१ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें. हें कोणी बातमीदारानें पांडुरंगरावास लिहिलें आहे. २ हें अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर यांस पत्र. ३ हें नं. १९५४ चें पत्र. ४ पांडुरंगराव गोविंद. ५ या मनुष्याविषयीं हरिवंशाची बखर पृ. ७३ येथील टीप पहा. ६ आपण.

जवळ व श्रीविष्णूजवळ त्रिकाल गाऱ्हाणें करितों तें येथें सर्व गृहस्थ पाहतात. दुसरा ध्यास नाहीं ! वडिलांचें कल्याण आणि शत्रूचा पराभव पौष शुद्धांत होऊन आपणास महद्यश येतें. माघ वद्य सप्तमीपासून पुढें आपले हातून महद्कार्य होऊन यश विकट असे योग आहेत. चिंता नाहीं, शत्रुपराभव वडील करतील. त्यांकडील घोडीं पाडाव व हत्ती होतील. माझे बेजमीचें घोडें चांगलें (राखून) ठेवावें. इकडील मजकूर मागाहून सविस्तर लिहितों. पत्रें तातडीनें निघालीं म्हणोन संकलित मजकूर लिहिला. श्रीमंत भाऊंचा मुक्काम टिपकुरलीवर नजीक राशिवडें येथें आहे. शेणगांव भुदरगडाखालील सर्व मुलूख जाळून फस्त केला. किरकोळ खेडीं बारिवडे व नागांव नंदगांव खेंबवडे किरकोळ ठाणीं घेतलीं. प्रस्तुत करवीरापासून पांच कोसांवरी आहेत. लुटालुटीशीं गांठ ! करवीर झाडून ओस जालें. राजा वगैरे व खाद दळवी राजाचे गडावरी गेले. येसाजी शिंदा करवीरांत चार पांच हजार फौज व तीन हजार प्यादा अमा लोकांस दीड लाख रूपये वांटणी वांटून धीर भरंवसा लोकांस देऊन आहे. सहा तोफा किमानपक्ष दहा बैलांच्या ओढीच्या ठेविल्या आहेत. एक लढाई मारणार व भाऊंकडे बोलणेंही लाविलें आहे. दगा करावयासी चुकणार नाहीं, या रोखें तो आहे. हमेशा त्याचे गडी लष्करांतून तासगांवास जातात येतात ! आम्हीही भाऊंकडे सावधपणाविशीं पत्र पाठवावयासी आळस करीत नाहीं. आम्हांस उत्तर गालिप्रदानाखेरीज नाहीं ! उपाय काय ! वरकड बंदोबस्त श्रीमंत बाळासाहेबांनीं चांगलाच केला आहे, लग्नाचेंही घाटत आहे. पत्रें नारायणभटास आजच गेलीं. बोरगांवकर कल्याणचा वर मथीस माघ शुद्धांत लग्न करणार असें निक्षन पत्र गेलें आहे. निरुत्तर काय येतें पहावें. रात्रीस अंधारांत हें पत्र लिहिलें आहे, काय मजकूर तो न कळे ! राग न करावा. तांतडी जाहली. मागा-

हून सविस्तर लिहितों. पुण्याकडील फौज दोन महिने येत नाहीं. शिवाजीपंत उगेच जगडंबर लिहितात ! वडिलीं ठाण्यांचे शहास कोठें न गुंतावें. शत्रूचे फौजेची बातमी राखण्याकरितां तीर्थस्वरूप कोंकांस रात्रीचें ठेवावें. त्यांचे पाठीमागें दुसरा छबीना. त्यामागें आपण फौजसुद्धां. रात्रीस शें पन्नास घोडयांवर जीन नेहमीं असावें. रात्रंदिवस दुसरा ध्यास नाहीं. फौज थोडी फार असती म्हणजे चिंता नव्ही. रागें मात्र कारभारी भरोन दगा मात्र दिसतो ! परंतु कर्नाटक वीस लक्षांचा मुलूख मुटळा, मागाहून फौजेची पुष्टी होऊन सरदारांस उमेद द्यावी हें लक्ष नाहीं ! अशीलें गाफील ! फार लिहिलें म्हणोन वडिलीं रागास न यावें. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विज्ञापना. १०००० हेच पत्रीं नारोपंतें दाजीस साष्टांग नमस्कार. आपण आमचे पत्राचे उत्तराविशीं विनंति करीत जाणें. हे विनंति.

नं. १९६४. **श्रीगणराज.** (मार्ग० व० १३–७ जाने०).

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री राघोपंत चुणेकर स्वामी गोसावी यांस.—

सेवक महादाजी बल्लाळ साा नमस्कार विनंती उपरि येथील कुशल ताा छ २६ जिलकाद जागून स्वकीय लिहिलें. विशेष. लक्ष्मेश्वर वगैरे ठाणीं घेतल्याचें वगैरे वर्तमान लिहिलें तें सर्व कळलें. अभित्राची फौज समीप आली आहे, यजमानांस वरचेवर सांगून सावधता करीत जाणें. इकडील फौज थोडी आणि शत्रूची फौज समीप आली आहे; त्याचीं ठाणींतुणीं लगत आहेत; त्यास आसरा आहे; मुलूख पलीकडे सारा त्याचा लागला आहे; आमची फौज वाटून गेली आहे; जमाव थोडा, यास्तव चिंता लागली आहे. बरें ! श्रीगजानन

---

१ वासुदेव धोंडदेव पटवर्धन शिळकर. २ नारो बाबाजी दामले.

समर्थ आहे. श्रीमंत राजश्री यजमानांचें लग्न मार्गशीर्ष वद्य पंचमीचें जालें. एक दो रोजांत लष्करास जाणार आहेत... हे विनंती.

नं. १९६५. श्री. (मार्ग. व. १३–७ जाने.)

यादी. तहनामा लग्नाचा केला. राजश्री त्रिंबकराव रामाजी कनमडेकर यांसी लिंगणभट जोशी देशिंगकर वास्तव्य मंगसुळी सुरुसन सबा सबन मय्या व अल्लफ. छ २६ जिल्काद. कलमें बीतपशील.

७५० रोख तुमच्या मुलाच्या लग्नास.

७५० दोन्ही मांडवांचा खर्च, वधूस अलंकार एकंदर बेरीज रूपये.

५७५ वधूस.

४०० सोनें वजन ८८२५.

१०० रूपें वजन ८८१००.

३० पाटाव एक किंमत रूपये.

३० साडया सुमार चार.

१५ सुमार राल (?) १

५७५

५ करोलीस लुगडें.

१० वरास वस्त्रे २.

८ खेंडीं[3] सुमार ८.

२ चोळखण.

१५० अन्नखर्च, दोन्ही मांडव व दक्षणा, देकार, वाजंत्री, पानसुपारी, हळदकुंकूं.

७५०

१५००

येणेंप्रमाणें करार. याखेरीज तुह्मी आम्ही कांहीं जाजती बोलावयासी मरज नाहीं. लिहिला तहनामा सही.

साक्ष
रामाजी तिमाजी.

सुबराज हणमंत,
पत्र प्रमाण.

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें. २ परशुरामभाऊच्या लष्करांत. ३ खेंडी म्हणजे हळदीच्या दाचीं बोटें.

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

नं. १९६६. (मार्ग. व.—जाने. प. पंधर.)

यादी नांवनिशी शत्रूच्या सैन्यांत सांपडलेले.

१ खासा श्रीमंत राा तात्या. पाठीवर जखम भाल्याची भारी आहे.

१ श्रीपतराव यांस दोन जखमा. एक कहरी, एक हलकी आहे.

१ कान्होपंत यास दोन जखमा.

१ वासुदेवकाका यांस जखमा आहेत.

१ रामचंद्र कृष्ण दातार. जखमा नाहींत.

१ बहिरजी घोरपडे खैर आहेत.

वरकड मंडळी सांपडलेली त्यांची नांवनिशी नाहीं ठाऊक म्हणतात.

बारा तेरा असामी ब्राह्मणांची ठार जाहली होती त्यांस अग्नि दिली.

याप्रमाणें वर्तमान. खाशांचा घोडा पाडाव त्यांकडे गेला. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांचें ठिकाण नाहीं. कोठें असतील ते असोत ! ईश्वरें घात बहुत केला. श्रीसत्तेस उपाय नाहीं. निशाणाचा हत्ती बारवण्णाकडे सांपडला आहे. कोण.कडील असोत. शत्रूस अस्मानी फत्ते ईश्वरें दिली ! शत्रु धारवाडास चौकीस गेले होते. फिरोन आले ते हुबळीस जाऊन मुक्काम केला. गोकाक, मनोळी हीं दोन ठाणीं घ्यावीं असें म्हणतात. नजर अस्मानास गेली ! कळावें. याप्रमाणें वर्तमान आहे.

---

१ कोणी बातमीदारानें हें पत्र कर्नाटकांतून परशुरामभाऊस लिहिलें आहे.

नं. १९६७. **श्रीगणपतिर्जयति.** (मार्ग० व. ९—जाने. प० पं.)

पैवस्ती छ २ जिल्हेज. पौषमास.

चिरंजीव राजश्री पांडुरंगराव तात्या यांसी प्रती अंताजी विठ्ठल. आशीर्वाद उपरी. आपलेकडील वर्तमान ऐकोन फार खेद झाला. तीन दिवस आपलें ठिकाण नव्हतें तेणेंकरून कांहीं आमची बाकी राहिली नव्हती. परंतु ईश्वरकृपेनें आज आपण मंडळीसह लष्करांत दाखल झालां, सूर्योदय झाला, हें वर्तमान कळोन संतोष झाला. यश-अपेश ईश्वराधीन. दौलत आणखी मिळेल. आपले प्राण वांचले येणें-करून सर्व गोष्टी घडतील. शत्रूचा पार नाश होईल. परंतु यासमयीं प्राण वांचले हा मोठा लाभ आहे. नाहीं तर या गर्दीमध्यें निभाऊन यावें हें नव्हतें. वडिलांचें पुण्यसामर्थ्य होतें ह्मणून जीव वांचले. चिरं-जीव जनोबा सुभेदार यांस तोफेच्या गोळ्याचा धबका बसला आहे, असें वर्तमान ऐकतों. त्यांनींही शर्त केली. दोन दोनदां कलथन्या केल्या असें सांगतात ! वरकड लोकांनींही शर्त केली. कोन्हेरराव व शिवराम घोरपडे यांनीं शर्त फार केली हें वर्तमान ऐकतों. ते तसेच आहेत ! आपण शर्त करून निघालां हेच लक्ष जोड झाली. आम्ही एका दे दिवशीं येतों. हे आशीर्वाद.

नं. १९६८.

श्रीमंत कैलासवासी चिंतामणराव पांडुरंग ऊर्फ आप्पासाहेब पटवर्धन सांगलीकर यांणीं सावशीच्या लढाईचा वाका लिहविला आहे त्यांतून उतारे—

---

१ यादवाडकर पटवर्धन. यांनीं पांडुरंगराव शत्रूकडे न सांपडतां परत निभा-वून आपल्या लष्करांत आले असें वर्तमान ऐकून हें पत्र लिहिलें आहे. पण पुढें हें वर्तमान खोटें ठरून पत्र लिहिणाराची निराशा झाली हें सांगणें नकोच. पैवस्ती परशुरामभाऊचे हातची. २ पुनः. ३ सूर्योदय झाला = कल्याणाची परमावधि झाली. नं. १३६७ मध्यें हेच शब्द आले आहेत ते पहा.

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

" घर खटल्यामुळें सरकारची फौज मोकळी नाहींशी संधी पाहून हैदरखान यानें दुर्मुखीनाम संवत्सरीं वैशाखमासीं फौजेनिशीं पट्टणाहून तुंगभद्रेअलीकडे बंकापुरास येऊन श्रीमंत पंतप्रधान यांजकडील अम्मल उठवून आपला अम्मल बसविला. गाजेखान व मखदुमखान बैद दोघे सरदार तीन हजार फौज घोडा पायदळसुद्धां ठेऊन हैदरखानमजकूर हा पट्टणास गेला. श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान सवाई माधवरावसाहेब यांचे कारकीर्दीस कर्नाटकचे बंदोबस्ताकरितां श्रीमंतांचे सरकारांतून श्रीमंत कैलासवासी पांडुरंगराव तात्यासाहब यांस फौजेसुद्धां जाण्याविषयीं आज्ञा जाहली. श्रीमंत तात्यासाहेब यांजकडे श्रीमंतांचे सरकारांतून आठ हजार फौजेची खावंदगिरी. सदरहूपैकीं श्रीमंत कैलासवासी परशुरामपंत भाऊसाहेब व रघुनाथराव दादासाहेब यांजकडील निसबती पेष्कराचीं पथकें तीं पेटयांतील. त्यांणीं पेटयांत चाकरी करावयाची; त्यांसुद्धां आज्ञेअन्वयें कर्नाटकामध्यें जावयाचें. त्यासमयीं ' मसलतीस तुमची सरकत असावी ' म्हणोन श्रीमंत तात्यासाहेब यांचें म्हणणें श्रीमंत परशुरामपंत भाऊसाहेब यांचे जवळ पडलें. तें त्यांनीं कबूल केलें नाहीं. पेटयांतील, त्यांणीं पेटयांत चाकरी करावयाची, सबब तुह्मी सांगाल ती चाकरी करूं ह्मणोन ह्मणाले. सर्कतीस कबूल झाले नाहींत. सबब वांकुडपणा. श्रीमंत परशुरामपंत भाऊसाहेब व रघुनाथराव दादासाहेब यांचा एक विचार. श्रीमंत कैलासवासी तात्यासाहेब हे हैदरखान याचे पारिपत्याबद्दल सब सब्बा सबैनांत दसऱ्याचे मुहूर्तानें डेर दाखल झाले. हत्ती मकणा व घोडा मेला. अपशकुन झाला. सबब आठ चार दिवशीं दुसरे मुहूर्तें डेर दाखल झाले. उभयतां पेटयांतील, त्यांस शिरस्तेअन्वयें आपले निसबतीचे स्वार घेऊन बरोबर येणेविशीं बोलाविलें नाहीं. सबब तेही गेले नाहींत.

---

१ परशुरामभाऊ व रघुनाथराव कुरुंदवाडकर.

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

श्रीमंत तात्यासाहेब फौजसुद्धां निघोन कर्नाटकांत गेले. त्यांजबरोबर कैलासवासी कृष्णराव माधव पानसे हे सरकारचा तोफखाना घेऊन बराबर होते. श्रीमंत कैलासवासी निलकंठराव दादासाहेब कुरुंदवाडकर यांचे धाकटे बंधु श्रीमंत कैलासवासी कोन्हेररावसाहेब यांजबरोबर सरकारांतून मुतालिकीची शिक्के कटार, सरकारचे दरखदार, वगैरे देऊन कर्नाटकांत पाठविले. ते व श्रीमंत तात्यासाहेब उभयतां एकविचारें मिळाले होते. श्रीमंत तात्यासाहेब यांणीं तिकडील कांहीं ठाणीं घेतलीं. श्रीमंत तात्यासाहेब यांजकडील फौजेची व हैदरखान यांजकडील बैद यांचे फौजेची लढाई झाली. खानमजकूर याचा मोड होऊन शंभर सुमारें घोडीं पाडाव झालीं. बैद हा बंकापुरास गेला. त्याणें जाहला मजकूर पट्टणास हैदरखान यांस लिहिला. श्रीमंत तात्यासाहेब यांणीं मिश्रीकोट व जुनी हुबळी वगैरे महाल तहबंदी करून कुंदगोळ मुक्कामीं येऊन उतरले. कैलासवासी रामचंद्रपंत हुपरीकर यांणीं कोपळाहून येऊन श्रीमंत कैलासवासी पांडुरंगराव तात्यासाहेब यांस सांगितलें कीं, इदीगोळास मुक्काम करून मोंगलांचे मुलखांत स्वारी करावी. नंतर श्रीमंत तात्यासाहेब यांणीं इदिगोळास जाऊन ओढ्यावर फौजसुद्धां मुक्काम केला. मोंगलांकडील मुलखांत कही होऊं लागली. सदरीं लिहिले अन्वयें लढाई झाल्याचें वर्तमान बैद यांजकडून हैदरखान यास समजलें. त्याजवरून महमदअल्ली कुमदान यास फौज देऊन बैद मजकूर याजकडे कुमकेस पाठविलें. कुमदान यांणीं फौजेसुद्धां बंकापूर येथें मुक्काम केला. सावशी हैदरखान याजकडून शिरटीकर देसाई याजकडे होती. श्रीमंत तात्यासाहेब यांची फौज इदिगोळचे ओढ्यावर उतरली होती तेथें रातोरात येऊन छापा घालावा ही मसलत करून महमदअल्ली कुमदान बंकापुराहून फौजेची तयारी करून तोफांसुद्धां रातोरात निघून आला. तों सावशीस उजाडलें तेव्हां तेथील लोकांस पांडुरंगराव तात्यासाहेब यांचा मुक्काम येथून किती कोसांवर

आहे ? ह्मणोन विचारलें, तेव्हां सात कोसांवर मुक्काम आहे याप्रमाणें सांगितलें. पल्ला दूर जाणोन तेथेंच मुक्काम केला. तो तपशीलवार:—

(१) कुंदगोळचे ओढ्यावर राजेखान व मुडीखान बैद यांचे स्वार एक हजार सुमारें.

(२) गांवचे दक्षिणेस श्रीपतराव शिवमोघे यांचे स्वार एक हजारपर्यंत.

(३) महमदअल्ली कुमदान खुद्द बार व शिरहट्टीकर देसाई तोफांसुद्धां गांवांत राहिले. श्रीमंत तात्यासाहेब यांणीं कुंदगोळास हैदरखान याजकडील फौजेची बातमी आणवून पाठविणेविशीं सांगून पाठविलें. त्याजवरून कुंदगोळकर याणीं बातमीदार सावशीस पाठविले. बातमीदार यांणीं घोडेफौज बाहेर उतरली होती ते पाहून इदिगोळास जाऊन फौजेचा अदमास सांगितला. तोफा वगैरे बरोबर आहेत असें बातमीदार यांस समजलें नाहीं. श्रीमंत तात्यासाहेब यांची स्वारी फौज व तोफा व बाणांसुद्धां तयार होऊन सावशीवर जावयास निघाली. सांवशीकर घोरपडे हे श्रीमंत तात्यासाहेब यांचे फौजेंत चाकरीस होते. त्यास घोरपडे यांच्या घरच्यांनीं लिहिलें कीं, " शत्रूची फौज भारी आहे व शिवाय तोफा आहेत. स्वारी यावयाची असल्यास सावधगिरीनें यावें. " म्हणून तो मजकूर घोरपडे यांणीं श्रीमंत तात्यासाहेब यांस कळविला. तेव्हां जवळचे मंडळीचे बोलण्यांत, " घोरपडे यांचें घर सावशींत आहे. तेथें कमतें व शेतें फार केलीं आहेत. आपले जितराबाची नासाडी होईल ह्मणून अशी बातमी सांगतात ! " ह्मणोन ह्मणाले. " घोरपडे यांचे शेताचे रखवालीस स्वार ठेऊन बंदोबस्त करावयास येईल " ह्मणोन श्रीमंत तात्यासाहेब फौजेसुद्धां चालते झाले. ही बातमी कुमदान यास समजोन फौजेची तयारी करून गांवचे पूर्वेस तुरचिें शेत होतें त्यांत तोफा व कवाइती लोक बसविले. बाकी घोडेफाजेच्या दोन टोळ्या करून उत्तरेकडे

एक व दाक्षिणेकडे एक अशा ओढयांत उभ्या करविल्या. त्या फौजेस कुमदान यांणीं " आह्मी किल्ले वरून रुमाल फिरवूं त्यावेळेस एकंदर फौज त्यांजवर चाल करावी " ह्मणोन सांगोन बंदोबस्त करून कुमदान आपण किल्यावर उभा राहिला. तेव्हां श्रीमंत तात्यासाहेब यांची स्वारी कोलवाडच्या कळंबी हासेहाळीच्या वाटेनें सावशीजवळ मुंगी. हाळपर्यंत आले. तेथें एक घटका स्वारी उभी राहिली. परंतु गांवाकडून कोणी बाहेर आलें नाहीं. बातमीही लागली नाहीं. फौजेचीही गडबड दिसली नाहीं ! श्रीमंत तात्यासाहेब याणीं आपल्या फौजेंत दोन टोळ्या केल्या. डावे बाजूस कैलासवासी शिवरामबाबा घोरपडे हिंदुराव गुत्तीकर दोन हजार स्वारांनिशीं. उजवे बाजूस श्रीमंत कैलासवासी कोन्हेररावसाहेब कुरुंदवाडकर दोन चार हजार स्वार घेऊन. मध्यें श्रीमंत तात्यासाहेब व कृष्णराव पानसे तोफखान्यासुद्धां. याप्रमाणें फौजेची तयारी करून चंद्र २८ जिलकाद सन सब्वा सब्वैन मार्गशीर्ष वद्य ३० गुरुवार शके १६९८ दुर्मुखी नाम संवत्सरे त्या दिवशीं चालून गेले. यांच्या फौजेंतून तोफा सांवशीचे ठाण्यावर व फौजेवर दोन चार डागल्या. ते गोळे गांवास पोंचले नाहींत व फौजेवरही पडले नाहींत. तुरीचे शेतालगत फौज आली हें कुमदान याणें पाहून किल्लेवरून रुमाल फिरविला. तेक्षणीं तोफांची सरबत्ती झाली. तोफांच्या मारगिरीनें श्रीमंत तात्यासाहेब यांच्या फौजेची बहुत खराबी झाली. ईश्वरइच्छें लढाई बिघडली. शिवरामबावा घोरपडे हिंदुराव यांस नाकावर जखम लागून पाडाव झाले. श्रीमंत कोन्हेररावसाहेब कुरुंदवाडकर हे लढाईंत ठार झाले. निळकंठराव शिंदेसाहेब सुभा मनोळीकर व जिउबा जाधव अघाडीस होते. शिंदे यांस मस्तकावर जखम लागोन पाडाव झाले. जाधव तोफेच्या गोळ्यानें ठार झाले. श्रीमंत तात्यासाहेब यांस डोचक्यांत आडवी तरवारीची जखम, दुसरी उजवे कानापासून गालापर्यंत तरवारीची, व पाठीस भाल्याची अशा तीन जखमा लागोन पाडाव झाले. सदरहू लढाई झाली. त्या मजकुराचें पत्र श्रीमंत कोन्हेररावसाहेब

कुरुंदवाडकर यांचे फौजेंतील कारकून सखो रंगनाथ म्हणोन होता त्याणें श्रीमंत कैलासवाशी रघुनाथरावदादासाहेब यांस लष्करांतून पाठविलें तें बार केलें जातें.

सदर लढाईंत एकंदर मंडळी पाडाव झाली त्यांची नांवनिशी बितपशील—

ब्राह्मणमंडळी.

१ तात्यासाहेब यांस जखमा तीन. सदरीं लिहिल्या आहेत.
१ श्रीपतरावभाऊ यांस डोचकींत गुरगुजाचा मार.
१ कान्होपंत सरनोबत यांस जखमा.
१ उजवे हातावर.
१ उजवे गालावर.
१ वासुदेवकाकास हातावर एक. पाठीस भाल्याची.
१ आनंदराव सबनीस तोफखानेवाले सातारकर यांचे डोचकीवर व पाठीवर पांच.
१ येसाजीपंत कुळकर्णी मंगळवेढेकर यांस उजवे खांद्यावर जखम भारी.
१ रामचंद्रपंत दातार यास उजव गालावर.

७

भले लोक वगैरे.

१ शिवरावबावा घोरपडे हिंदुराव यांस नाकावर जखम भारी.
१ नीलकंठराव शिंदे मनोळीकर यांस मस्तकावर जखम.
१ बहिरजी घोरपडे हिंदुराव गजेंद्रगडकर यांस डावे हातावर.
१ कुंदगोळकर घोरपडे भिकाजीराव व त्यांचे चिरंजीव सुबराव या दोघांस जखमा.
१ गंगाजी शिंदा याचे हातावर.
० म्हैसाळकरांकडील असामी दोन यांस जखमा नाहींत.
३ गडी असामी तीन.
१ यशवंतराव पवार बस्तवडेकर याचें राहणें म्हैसाळास. त्यांजकडील राणू शेऱ्या.
१ महिपतराव फराटे यांजकडील रज्जू बारड्या. राघोबा टकले यांजकडील भगवंता.

८

एकूण असामी १५.

[1] हें मूळ वाक्यांत बार केलेलें पत्र येथें न देतां निराळें १९८३ नंबरचें छापिलें आहे.

सदरहू असाम्या पाडाव गेल्या. फौज मोडली. त्यांजकडील बैद वगैरे यांणीं पिच्छा केला. तोडातोडी व लूट अनिवार झाली. ज्यांस जिकडे मार्ग सांपडला तिकडे निघोन गेले. कृष्णराव पानशे व भिकाजीपंत व त्रिंबकरावअण्णा हजार दोन हजार मनुष्यें अजमासें नागेवलेले व जखमी नरगुंदास आले. नरगुंदकर यांणीं ज्यांस वस्त्रें नाहींत त्यांस वस्त्रें (दिलीं.) जखमी लोकांच्या जखमा बांधविल्या व खर्चासही दिलें. मानकरी मंडळी यांस वस्त्रें वगैरे देऊन पुढें रवानगी करून दिली. सदरहू पंधरा असाम्या पाडाव जखमी झाल्या त्यांच्या जखमा बांधून श्रीरंगपट्टणास घेऊन गेले. "

" (देशीं) तोतयाचें खूळ झालें सबब त्याच्या बंदोबस्ताविशीं (परशुरामपंतभाऊ व रघुनाथराव कुरुंदवाडकर) या उभयतांस सरकारांतून आज्ञा झाली. सामानगडाकडे उभयतां होते. श्रीमंत कैलासवासी महाराज छत्रपति पन्हाळकर यांचे तहाचें बोलणें ठरलें. उभयतांचें कूच होऊन कोलनाण्या (?) वर गेले. तेथें श्रीमंत तात्यासाहेब पाडाव गेल्याचें वर्तमान कळलें. तो मजकूर त्यांणीं सरकारांत लिहून फौजसुद्धां बारीपार होऊन कर्नाटकांत गेले. उगरगोळास मुक्काम होता. ह्या मुक्कामीं छापा पडला. खराबी बहुत झाली. मनोळीच्या बारीनें पार झाले. श्रीमंत तात्यासाहेब वगैरे मंडळी पट्टणास गेली. तो प्रकार सदरीं लिहिला आहे. तेथें गेल्यावर कांहीं दिवसांनीं शिवरामबावा घोरपडे यांस मंडळींतून कपालदुर्ग किल्ला, त्या किल्ल्यावर पाठविलें. त्यांजबरोबर श्रीमंत तात्यासाहेब यांणीं चाकरीस भगवंताटकल्यांकडील–दिला. कुंदगोळकर घोरपडे यांचे भाऊ शिवराम घोरपडे हैदरखान यांजकडे चाकरीस होते त्यांणीं भिकाजी घोरपडे व चिरंजीव उभयतांसही घेऊन गेले. श्रीमंत तात्यासाहेब पाडाव सांपडल्यानंतर दहा महिने चार दिवसांनीं कार्तिक शु० ४ भौमवारीं सन

समान सबैन श० १६९९ हेमलंबी नाम संवत्सरे छ ३ सवालीं पट्टणांत काळ झाला. सर्व मंडळी तेथें साडेचार वर्षें श्रीरंगपट्टणास कैदेंत होती, त्यांचे सुटकेबद्दल श्रीमंतांचे सरकारांतून खंडणीपैकीं ऐवज दिला. सदरहूशिवाय मिरजेहून कैलासवासी दौलतराव घोरपडे वगैरे यांजकडून ऐवज द्यावयाचा ठरला. त्याचा उलगडा होईपर्यंत कैदी असामी यांस सावनुरास ठेविलें. तेथें पांच सहा महिने होते. मिरजेकडील व घोरपडे यांजकडील ऐवजाचा उलगडा झाल्यानंतर सोडून दिले. "

नं. १९६९. (पौष शु. ४--१३ जाने.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र—रवाना छ ३ जिल्हेज. मुक्काम कोडोली सावगांवनजीक करवीर येथून:—

" झुंज होऊन सहा दिवस जाले. अद्यापि चिरंजीवाचें पत्र येत नाहीं. परम चिंतार्णवीं पडलों आहों. आम्ही लौकर उद्यांच माघारें जावें अर्से योजिलें आहे. लौकरच जेथें चिरंजीव असतील तेथें दरमजल जातों. येथें दोन हजार फौज ठेवावी म्हणून लिहिलें, त्यास रामचंद्रपंत व बाजीपंत (आम्हांबरोबर) येतात न येतात नकळे ! आज त्यांशीं बोलतों. आज येथें मुक्कामास यावयाचें कारण हेंच. सर्व मंडळी आलिया उत्तम. नाहीं तर आम्ही व रास्ते असे दरमजल जातों. याउपरी येथें राहत नाहीं. हें वर्तमान आल्यावर चिरंजीव रघुनाथराव दादाकडे दोन पत्रें पाठविलीं आहेत कीं जलद येणें. त्याम ते अद्यापि येत नाहींत. आज येतो किंवा नाहीं नकळे. होणार होतच आहे. तुम्ही चिंता न करणें. आम्ही लवकर जाऊन पोंचलों असें समजणें. चिरंजीव आले तर उद्यां भोजेच्या सुमारें जातों. तेथून बागेवाडी. तेथन पुढें वर्तमान कळेल तसे जाऊं. रवाना मंगळवार प्रहर दिवस. "

नं. १९७०. **श्रीगणपतिर्जयति.** (पौष शु. ४–१३ जाने.)

पै. छ ३ जिल्हेज. पौष मास.

चिरंजीव राजश्री जिवाजीपंत यासी प्रती अंताजी विठ्ठल. अनेक आशीर्वाद. उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. लिहिले मजकूर कळले. जखमी बारगीर व मोतद्दार असे पाठविले ते सुखरूप पावले. जखमा शेकविण्याविषयीं लिहिलें, त्यास येथें जखमा शेकवितों. कांहीं चिंता नाहीं. पालखी व तट्टू माघारा पाठविला आहे. चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यांस तोफेच्या गोळ्याचा धबका लागला आहे. नरगुंदांत जखम शेकवीत आहेत म्हणून पत्र आलें होतें. चिरंजीव राजश्री तात्यांचें व कोन्हेरराव व श्रीपतराव काका यांचें ठिकाण अद्यापि नाहीं ! काय करावेंसें झालें आहे. मिरजेंत मोठा आक्रोश मांडिला आहे. घरकलह लागल्यामुळें लय जाले ! तें किल्ल्याचें[3] आसरेम. त्यांजवर चालोन गेलां ! तत्राप मोठमोठे बुद्धिवंत होतां, तात्यांस कसें नेलेंत ? ठेऊन जावें होतें. नेले ते मागें दोन हजार फौजेनिशीं दूर उभे करावयाचे होते. काय न ऐकावें तें ऐकण्यांत येतें ! ! ! होणार बलवत्तर ! भगवंतानें केलें ! कोणास काय बोलावें ? वांकडें जालेवर सर्वत्रांस आठवतें ! परंतु घरें बुडालीं ! पटवर्धन मंडळी बुडाली ! कोणेकडे तात्या गेले ? पांच सहा दिवस जाले. अद्यापि ठिकाण नाहीं. शत्रूच्या लष्करांत मोगें भिकाऱ्याचीं देऊन लोक पाठविणें. तेथें काय बोलतात, कोण सांपडले, हें तरी कळेल. चिरंजीव राजश्री तात्यासारिख्या माणसास दहा हजार फौज कसी टाकून आली ! त्या लोकांची धन्य अमो ! धारवाडाकडे पायउतारा चिरंजीव तात्या व कोन्हेरराव व शिवराव घोरपडे ऐसे गेले अहेत ऐसी वदंता आहे. तिकडे समाचारास माणसें गेलींच असतील. अगर त्यांचें तरी पत्र येतें. विपरीत प्रसंग जाला आहे. बाकी नाहीं. हे आशीर्वाद.

---

१ पटवर्धन यादवाडकर. २ कुमदान इत्यादि शत्रु. ३ सावशीचे किल्ल्याचे.

नं. १९७१. **श्री.** (पौष शु. ४–१३ नाने.)

चिरंजीव राजश्री जिउबा यासीं प्रती काशीबाई. आशीर्वाद उपरी येथील कुशल ताा छ २ जिल्हेज सायंकाळ प्रहर दिवसपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. लढाई जाली, मोड जाहला, म्हणून ऐकिलें, त्यासं चिरंजीव राजश्री तात्या व कोन्हेरराव व बोळ व गोविंदपंत मामा व आपा वगैरे सर्व मंडळी कोठें आहे हें सत्वर लिहोन पाठविणें; म्हणजे चित्तास समाधान होईल. तरी चिरंजीव कोठें आहेत हें लिहिणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १९७२. **श्री.** (पौष शु. ४–१३ जाने.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना पोक्षे[1] स्वामीचे सेवेशीं.

पोप्य अंतोजी शंकर. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम तागायत छ २ जिल्हेज इंदुवारपावेतों यथास्थित असे. विशेष. हैदराकडील फौजेत व सरकारचे फौजेत लढाई होऊन सरकारचे फौजेनें कच खादला म्हणून वर्तमान ऐकून आजी चार दिवस झाले. दिवसें दिवस जनवार्ता नाना प्रकारची बोलतात. याजकरितां परम चिंता लागोन मुजरद मनुष्यें पाठविलीं आहेत. तरी सविस्तर कुशलतेचें वर्तमान लिहून पाठविलें पाहिजे. इकडील अधिकोत्तर लिहिणेंसें नाहीं. आपल्या कडील सर्व मंडळी क्षेमरूप निभावून आल्याचें वृत्त कळल्याखेरीज रात्रंदिवस चैन पडत नाहीं. तरी सविस्तर कुशलवृत्त लिहोन पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

---

[1] पत्र लिहिणारणीचा नातू श्रीपतराव मोरेश्वर. [2] फडणीस तालुका तेरदाळ. उपनाम फणसाळकर.

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

नं. १९७३. **श्री.** (पौष शु.-जाने. प. पंधर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जिवाजीपंत पोतनीस स्वामीचे सेवेशीं.

पोष्य लक्ष्मण हरि साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत गेलें पाहिजे. विशेष तुमचें लष्कर कुच करून बनुरावर आलें. त्यास पहिले जातेसमयीं मुक्काम होता तेव्हां चिपलकट्टे व कुनाहाळ खराब जाहलें. आतां इकडे आलियासीं यादवाडची स्थिति कशी राहील ? याविशीं तुह्मांकडे राजश्री राघोपंत फडणीस व आपाजीपंत व जयरामपंत व मडवळपा आडकी ऐसे पाठविले आहेत. तरी आम्हांवर दृष्ट देऊन कबुराकडे रोख देऊन त्याच सोईनें जावें. सरकारच्या फौजा यावयासी महिनाभर पाहिजे. याजकारितां चार दिवस गुजराण करावी. पेंढारास निरोप द्यावा. आह्मांस पायाविना येववेना, पाय[1] फार दुखतो, दुखणें होतें त्याप्रमाणें जाहलें आहे. तुह्मी आमचे, आम्हां सर्वांस सांगोन आपला मुलूख रक्षावा. राजश्री भाऊंचे[2] दोन परगणे, त्यामध्यें जमखंडी देसाई याजमुळें बुडाली. यादवाड लहानसें आहे हें यासमयीं रक्षावें, विस्तारें आपणास स्याहावेसें नाहीं. रा. रामचंद्रपंत बिनी यांसी लिहिलें आहे. ते तुम्ही मिळोन लिहिलेप्रमाणें करावें. बहुत काय लिहिणें लोभ करीत जावे. तुमच्या लष्करापैकीं दोन तोफा येथें येऊन उतरल्या आहेत. हे विनंति.

नं. १९७४. **श्री.** (पौष शु० ५--१४ जाने०)

चिरंजीव राजश्री नारोपंत पोंक्षे यासी प्रती काशीबाई. आशिर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ४ माहे जिल्हेजपावेतों. वर्तमान

---

१ उपनाम लागू. तूर्त यांजकडे परशुरामभाऊंकडून. यादवाड परगण्याची मामलत होती. २ परशुरामभाऊंचे.

यथास्थित असे. विशेष. लष्करचें वर्तमान ऐकोन चिंता लागली आहे. तरी चिरंजीव राजश्री भाऊ[1] कोणीकडे आहेन हें सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. तुमचें पत्र चिरंजीव बाळास आलें त्यावरून परम चिंता लागली. कोणीकडे गेले, राऊत बरोबर किती आहेत, काय वर्तमान, सविस्तर लिहिणें. माणसें चिरंजीवांचीं तुह्माजवळ असतील त्यांजपैकीं एक दुसरें माणूस त्यांजकडे पाठवून देणें. चिरंजीवांचा रात्रंदिवस ध्यास लागला आहे. चोहींकडे माणसें पाठवून शोध आणवून आह्मांस लिहून पाठविणें. मुजरद माणूस पाठविला आहे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. १९७५. (पौष शु. ५–१४ जाने.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" आम्ही आज कूच करून बारवाडच्या मुक्कामास आलों. चिरंजिव रघुनाथराव आज रात्रौ मुहूर्तानें निघणार. याजकरितां आज हलकी मजल केली, उदईक ते येऊन मिळणार याजकरितां हलकीच मजल करितों. ते आलेवर लांब मजली करून जेथें चिरंजीव तात्या असेल तेथें जातों. आम्ही व रास्ते व हुजरातचे आठशें स्वार आम्हा-बरोबर आहेत ते व दोनतीनशें पाईचे माणूस प्यादे व तुम्हाकडून आलेल्या दोन तोफा यांसह पुढें जातों. "

नं. १९७६. (पौष शु.–जाने. प. पंधर.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र –

" तीर्थस्वरूप कोन्हेरपंतजींचें वर्तमान लिहिलें तें कळलें. होणार त्यास इलाज काय ? चिंता एकाची तर करावी ! घरच बुडालें तेथें कोणास काय म्हणावें ! कांहीं सुचत नाहीं. आम्ही काल घटप्रभे-

---

१ परशुरामभाऊ. २ सावशीच्या लढाईतून पळालेले सरदार पांडुरंगराव, कोन्हेरराव व पत्र लिहिणाराचा नातू श्रीपतराव वगैरे.

वर आलों. आज पुढें जावें; त्यास कालच पत्र आलें. त्यांत वेडिलांचें वर्तमान भिकाजीपंतांनीं लिहिलें होतें त्याजमुळें आज येथें मुक्काम केला. उदईक कूच करून सतीगिरेच्या सुमारें जातों. "

श्रीगणपतिर्जयति.

नं. १९७७. (पौष शु० ६–१५ जाने०)

पौा छ ४ जिल्हेज. पौष मास.

चिरंजीव राजश्री जिवाजीपंत यासी प्रती अंनाजी विठ्ठल. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ४ बुधवार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पालखीविशीं लिहिलें, त्यास पालखी नरगुंदास चिरंजीव राजश्री सुभेदारास आणावया पाठविली होती. त्यास काल चिरंजीव आले. त्यांस गोळ्याचा धक्का फार्‍यांत लागला आहे खराच. पायावर भार घेऊन चालवत नाहीं, दोघे उचलावयास लागतात, ऐसी अवस्था झाली आहे आणि पोटांत आग उठली आहे. पाणी फार मागतात. जखम शेकवीत आहों. परंतु चिरंजीव राजश्री तात्याचें अद्याप ठिकाण नाहीं. आठ दिवस व्हावयास आले. मोठी काळजी लागली आहे. आम्ही अद्याप मिरजेस कांहींच पत्र लिहिलें नाहीं. अनाहूत प्रसंग घडला! ईश्वरें गजब केला! तेवढा प्राणी जिवानिशीं यावा! चिरंजीव कोन्हेरराव व श्रीपतराव यांचें ठिकाणच नाहीं. माणसें तुम्ही शोधास पाठविलीं तीं फिरोन आलीं कीं नाहीं? कोन्हेरराव रणांत पाहून त्यांचा खिजमतगार आला म्हणतात. हेंही सत्य कळत नाहीं. त्या खिजमतगारामागमें दुसरा कोणी शहाणा माणूस पाठविलाच असेल. कांहीं पत्तेवार अद्यापि ठीक नाहीं. काय करावें! चिरंजीव तात्या दचून कोठें तरी राहिले आहेत म्हणतात. काय होईल पहावें! पालखी पाठविली आहे. तुम्हीही लष्करांत राहिलां, लोकांस जखमेस व

---

१ कोन्हेररावाच्या मृत्यूचें. २ पटवर्धन यादवाडकर.

खर्चास दिलें, हें बरेंच केलें. आतां लोकांस अवसान देऊन नीट राहावें. तोरगलकर लबाड आहेत. कलागत करितील. यास्तव यादवा-ड्च्या मर्दिस अमावें हें उत्तम दिसतें. हे आशीर्वाद.

नं. १९७८ **श्रीगणपति.** (पौष शु. ६–१५ जानें.)

अपत्यें परशुरामानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ जिल्हेज मुक्काम भोज वर्तमान कुशल असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें.[1] शेडसाळची जप्ती लक्ष्मण व्यंकाजी करितात, येविशीचें उत्तर चिरंजीव राजश्री बाळासाहेबांनीं केलें कीं शेडमाळ[2] सरंजामांतील, त्याची जप्ती करण्याचें प्रयोजन नाहीं, असें जालेंच आहे परंतु न जाणो, याजकरितां तुम्ही लक्ष्मणपंतास पत्र लिहिणें: ' म्हणोन आज्ञा, ऐशास येविशीं चिरंजीवासच लिहिलें आहे कीं, जप्ती परिछिन्न करूं न देणें. व येविशीं राजश्री शिवाजीपंतांसही लिहिलें आहे. आपण येविशींची चिंता न करावी. " चिरंजीव राजश्री पांडुरंगरावतात्याची लढाई बिघडली हें तथ्य वर्तमान आहे कीं नाहीं " म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास लष्करची नामाडी फारच जाली. सरदार धारवाडाकडे गेले. बुणगें रामदुर्गचे बारीवर आलें. राजश्री कृष्णराव पानशे मुदलावीम आले.' सारे सरदार खैर

---

१ हें पत्र परशुरामभाऊंनीं आपला चुलता भास्कर हरि यांस लिहिलें आहे. २ शेडमाळ हें गांव भास्कर हरीकडे होतें त्यांचा मुलगा हरचाअण्णा तोतयाकडे फितुर झाल्यामुळें तें गांव जप्त करावें म्हणून पेशव्यांचा हुकूम लक्ष्मण व्यंकाजी यास आला होता. मिरज प्रांतांतील फितुरी लोकांचे गांव व उत्पन्नें जप्त करून त्यांची वहिवाट करण्याच्या कामावर लक्ष्मण व्यंकाजी हा स्वतंत्र कारकून पुण्याहून नेमला गेला होता. गंगाधरराव गोविंद यांनीं लक्ष्मण व्यंकाजी यास सांगितलें कीं, तुम्ही शेडसाळ हें गांव जप्त करूं म्हणतां; परंतु हें खेडें कांहीं आमचे चुलते भास्कर हरि यांस इनाम दिलेलें नाहीं, तें सरंजामी खेडें आहे व त्याबद्दल चुलत्यास पश्चात स्वारींनिशीं चाकरी करावी लागते; सबब हें खेडें जप्तीस पात्र नाहीं. ३ वर्काल निा॥ पटवर्धन यांस पुण्यास. ४ पांडुरंगराव, कोन्हेरराव व शिवराव घोरपडे.

आहेत. आज उद्यां येऊन मिळोन जथ पाडतों. ' म्हणोन कृष्णरावांनीं लिहिलें होतें. सारांश, सरदार खुशाल आहेत म्हणोन लिहिलें, परंतु तात्यांचें अगर वेडिलांचे हातचें पत्र आलें नाहीं. येईल. लष्करानें फारच आवाई खाल्ली आहे. गाजकारितां राजश्री रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा व प्रतिनिधीकडील फौज अमे करवीरचे शहावर राहिले. आम्ही व रास्ते चिरंजीवाकडे दरमजल चाललों. ' चिरंजीव राजश्री आप्पांस नेऊं नये. माघारा घरीं लावून द्यावा. ' झणोन लिहिलें, उत्तम आहे. घरीं लावून देतों. हरिसत्तेम इलाज नाहीं. आम्ही लौकरच चिरंजीवाकडे जातों. आज आठ दिवस झाले. परंतु तहकीक वर्तमान लागत नाहीं, यास्तव परम चिंतार्णवीं आहों. तहकीक कळल्यावर लिहितों. बहुत काय लिहिणें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. १९७९. **श्रीगणपति.** (पौष शु. ७--१६ जाने.)

चिरंजीव राजश्री गंगाधरबाळ यांसीं आशीर्वाद. उपरी. गोकाकेहून पत्र रा. गोविंदपंतास येसाजीपंत आपाचें आलें तें तुम्हांकडे पहावयास पाठविलें आहे. सारांश सरदारांचें आपल्या कोटें ठिकाण नाहीं, आज आठ दिवस झाले, तेव्हां काय गत आहे श्री जागे! मोठे चिंतार्णवीं पडलों आहों. दौलत बुडाली ती एके दिवशी उभी राहील, चिंता नाहीं, परंतु अद्याप पांडुरंगराव वगैरे सरदारांचें ठिकाण नाहीं याजवरून फारच अवघड पडलें आहे. कांहीं लिहावयास सुचत नाहीं. परंतु सर्व प्रकारें घात जालासें दिसतें. आज आठ दिवस जाले, अद्यापि तहकीक नाहीं, तेव्हां आशा कशास धरावी! याउपरी हुजुरून फौज आल्यास मसलत. वरकड कांहीं नाहीं. आम्ही आज लांब

---

१ वडील चुलतबंधु कोन्हेरराव यांचें. २ परशुरामभाऊंचा वडील पुत्र रामचंद्रपंत. तो वयानें १५।१६ वर्षांचा असून भाऊंबरोबर स्वारीत होता. त्यास कर्नाटकचे स्वारीस बरोबर नेऊं नये, अशी भाऊंस चुलत्याची आज्ञा. ३ पत्र परशुरामभाऊंचें.

जावें, त्यास चिरंजीव दादा अद्याप आला नाहीं. आज हलकी मजल करा म्हणून त्यानें लिहिलें आहे यास्तव चार कोसांची मजल केली आहे. उद्यां चिरंजीव आल्यावर लांब जातों. हे आशीर्वाद. रवाना गुरुवार प्रहर दिवस प्रातःकाळ. तुमचें आवशीचें दोन तास रात्रीचें पत्र पावलें. निकडीनेंच जातों. काल भोजेस मुक्काम केला. मुक्कामास आल्यावर कृष्णराव यांचें पत्र आलें होतें. परंतु आजच्या पत्रावरून अवसानच गेलें ! कांहीं सुचत नाहीं. बरें ! जसें हरि टेवील तसें असावें ! श्रीइच्छा प्रमाण ! बाळा ! घात जाला ! सर्व प्रकारें बुडालों ! हे आशीर्वाद.

नं. १९८०. **श्रीगणपति**. (पौष शु० ७. १६ जानेवारी.)

चिरंजीव राजश्री बाळामाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील वर्तमान तागा छ ६ जिल्हेज भृगुवार जाणोन स्वकीय लेखन करीत जावें. विशेष. तुम्ही चिरंजीव राजश्री जिऊबा-कडील पत्रें आलेलीं पाठविलीं तीं पाहोन सर्व अर्थ कळला. होणार भवितव्यास यत्न कोणाचा ? वांचले, श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे, मागतीं येतील, भेटतील ! जिवानिशीं च न गेले हाच लाभ म्हणावा ! होणार देवादिकांस चुकलें नाहीं ! आह्मीच अवमान टाकिल्यास सुटका त्यांची कमी होईल ? जों दमांत दम आहे तों सोडवूं, चिंता नाहीं. तुम्ही अवमान न सोडावें. तागा रावसाहेबांमागें तिघेजण होतां, त्यांत एक गाहिलां! बरें! आम्ही या उपरी जसी तुमची आज्ञा होईल तसेच वर्तत जाऊं. चिंता न करणें. जोंपावेतों माझा जीव आहे तोंपावेतों करीन, प्राण वेंचीन, परंतु चिरंजीवांस दृष्टीनें पाहीन ! तुमची सर्वांची भेट होईल तें

---

१ जिवाजी रामचंद्र जोशी पोतनीस हे सावशीच्या लढाईतून चुनग्यासह बचावून रामदुर्गाकडे आले होते त्यांचीं लढाईच्या हकीगतीचीं पत्रें. २ पांडुरंगरावाची हैदराच्या कैदेंतून सुटका होऊन ते परत येतील.

करीन. मोठे डाव उचलोन घेऊन सुटकेचा विचार होय तोच अर्थ होईल. याउपरी अवसान धरून चित्ताचे ठायीं धीर धरणें. सर्वांचें सांत्वन करणें. मातुश्री काशीकाकी व आक्का या उपरी कांहीं जगत नाहींत! त्यांस दुःखाचे पर्वत जाले! एंकाचें अद्यापि ठिकाणच नाहीं! पहिलें पत्र लिहून तयार केलें होतें इतक्यांत तुमचें पत्र आलें, त्यावरून निःसंदेह जाला. याउपरी पुरंदरास पत्रें लिहून मजलीवरून रवाना करितों. सर्व मसलत होईल. चिंता नाहीं. श्रीमंत रावसाहेब दैववान् आहेत. चुलते आम्ही एकत्र होऊन बंदोबस्त करितों. किमपि इकडील लष्करची काळजी न करणें. तुम्ही आपले स्थळ राखून बहुत जपून फार फार सावध असत जाणें. तेथें शत्रु जवळ आहे. शें दोनशें स्वार रोजमऱ्यावर ठेऊन बहुत खबरदार राहणें. याउपरी फार काय लिहावें? नावच बुडाली! त्याची चिंता कसी जाईल? ईश्वरसत्तेस इलाज काय आहे? कांहीं सुचत नाहीं!!! बुनग्याकडे पत्रें पाठवितों. आम्हीही फार लांब जात नाहीं. गोकाकचे सुमारेंच अथवा अलिकडे चार दिवस गुजराणी करितों. सावध सावध राहत जाणें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. होणारास उपाय नाहीं. आतां आपण धैर्य धरावें झगडे साऱ्या गोष्टी यथास्थित आहेत. येथील चिंता न करावी. वडिलांस मात्र रातबिरात बहुत सावध असावें. एंकाचें मात्र ठिकाण नाहीं. शोधास गेले आहेत. काय वर्तमान येईल न कळे! सवेंशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ हैदराकडे पाडाव गेलेला श्रीपतराव मोरेश्वर याची आर्जा. २ पांडुरंगराव व गंगाधररावं यांची धोरली बहीण साळूआक्का. ३ कोन्हेररावाचें. ४ मिरजेचा किल्ला. ५ रघुनाथराव नाळकंड कुरुंदवाडकर. ६ चुलता कोन्हेरराव याचें.

नं. १९८१. **श्री.** (१६ जानेवारी.)

सेवेशी शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना तागायत पौा शुद्ध सप्तमी सह अष्टमी गुरुवासरे मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें छ २२ जिल्का-दचीं पाठविलीं तीं पाहोन लिहिला मजकूर कळला. " कुमदान चार हजार फौज व सात आठ हजार स्वार व तोफासुद्धां आला याजमुळें सावनूर प्रांतांत वगैरे फार धास्त बसली आहे. कुमदान बंकापुरास आला. पहिली फौज होती ती व कुमदान मिळोन जय बराच आहे. आह्मी वरचेवर फौजा पाठवावयाविशीं लिहितों, परंतु अद्यापि फौजा येत नाहींत म्हणोन लिहिलें, त्यास कालच्या मुहूर्तानें राजश्री हरीपंततात्या फौजसुद्धां रवाना जाहले. फौज पुण्यास आहे याजकरितां राजश्री तात्या पुण्यास जाऊन फौजसुद्धां भीमेच्या पाण्यानें सुरापुराकडे जाऊन नबाब-सुद्धां कर्नाटकांत जागार. याउपरी राजश्री तात्या लोकरच येतील. " तूर्त रास्ते यांचे पथक व प्रतिनिधीकडील फौज व बाजीपंत अण्णा इतके आल्यास मग शत्रूच्या फौजेस जुमानीत नाहीं म्हणोन लिहिलें, त्यास रास्ते यांजकडील आनंदराव निंबाजीस आपणाकडे जाणेविशीं पत्रें गेलीं आहेत. राजश्री बाजीपंत अण्णा वगैरे यांस पत्रें पाठवावीं तर राजश्री हरीपंत तात्या निघाले त्यापक्षीं पत्रें पाठवावयाचें प्रयोजन नाहीं. राजश्री तात्यांस निघावयाची दिवसगत असती तर पत्रें पाठ-वितों. " गदग, लक्ष्मेश्वर, मुळगुंद, कुंदगोळ, नवलगुंद, मिशीकोट असा झाडून तालुका सुटला आहे. सावशी व येळवंती व शिरहट्टी व श्रीमंत गड इतकीं मात्र आलीं नाहींत. बाकी कोणेही राहिले नाहीं. ' म्हणोन लिहिलें तें कळलें. " श्रीमंत सौा मातुश्री आनंदीबाई सामान्य

---

१ हें पत्र सावशीची लढाई होण्यापूर्वी पांडुरंगरावास लिहिलें आहे. २ निजाम-अल्ली.

माणूस नव्हे, चांगल्या स्थळीं लांब ठेविलेस क्षेम आहे " म्हणोन लिहिलें, त्यास तूर्त इकडे आगवीत नाहींत. तिकडेच अमानेंसें आहे. सिंहगड हस्तगत जाहला. प्रस्तुत होळकर शिंदे सिंहगडाजवळच आहेत. " आम्ही मुळगुंदाकडे आल्यावर तडसचें ठाणें अमिन्नाच्या फौजेनें घेतलें. हें वर्तमान मिश्रिकोट हुबळीकरांस कळतांच टाकोटाक कुमक पाठवून मागती सवेंच ठाणें घेतलें. शंभर माणूस त्याकडील धरून आणिलें आहे. कलघटगीचें ठाणेंही घेतलें. तडस व कलघटगी दोनी ठाणीं चांगलीं नव्हेत. आलीं गेलीं सारखींच आहेत; म्हणोन लिहिलें तें कळलें. सावनूरकर नबाब यांणीं श्रीमंतांस व कारभारी यांस थैल्या पाठविल्या आहेत. प्रविष्ट करून उत्तरें पाठवावीं; म्हणोन लिहिलें त्यास उत्तरें घेऊन मागाहून पाठवितों. राा माधवराव चिंतामण व राजश्री गंगाधर विश्वनाथ यांचा मजकूर लिहिला तो कळला. आपलें पत्र श्रीमंत राजश्री नानास होतें तें पावतें केलें त्यावरून सेवा चाकरी फार केली व धारवाडावरही कामकाजें चांगलींच केलीं हे अर्थ नानास समजले परंतु अद्याप जाबसाल समर्पक जाहला नाहीं. मागाहून जाबसाल करून लिहून पाठवितों व आपल्या पत्राचीं उत्तरें घेऊन पाठवितों. राजश्री व्यंकटराव दादा घोरपडे जाहजांत बसोन म्हापणाकडे गेले त्यांचें बोलणें चालणें लागलें आहे, परंतु बेरजेचा ठराव जाला नाहीं. जाल्यावर लिहून पाठवितों. राजश्री दादा घोरपडे श्रीमंत राजश्री भाऊंकडे येणार म्हणोन ऐकितों व श्रीमंत राजश्री भाऊंनीं लिहिलें होतें. श्रीमंत राजश्री हरबा अण्णा तो आम्हास कांहींच लिहीत नाहींत. राजश्री रंघुनाथराव कोल्टकर पुण्यास आले होते. उभयतांच्या कानावर घालून घरास जावयाचा मजकूर ठरवून

---

१ तोतयाकडे मिळाल्याबद्दल पेशवेसरकारास किती दंड द्यावयाचा त्या रकमेचा. २ परशुरामभाऊंची बहीण जिऊबाई हिचा नवरा. हा तोतयास मिळाला होता. ३ मखारामबापू व नानाफडनवीस यांच्या.

मशारनिल्हेस निरोप देविला. पुण्याहूनच घरास जातील. "राजश्री हरीपंत तात्यास निघावयासी दिवसगत अमल्यास राजश्री आपा बळवंत धणी करून कांहीं फौज देऊन पाठविल्यास उत्तम" म्हणोन लिहिलें, त्यास राजश्री तात्याच निघाले. आमचे शरीरीं स्वस्थ नाहीं. राजश्री रामचंद्र भट वैद्य यांचें औषध घेत असतों. राजश्री तात्या पंढरपुराकडून जागार त्यास निकडीस परगण्यांची रखवाली जाहली पाहिजे, याजकरितां कारभारी यांणीं निरोप दिला तर जाऊन बंदोबस्त करून तात्या पुढें सुरापुराकडे गेल्यावर घरीं आठ पंधरा दिवस राहून येऊं म्हणतों. परंतु हे कांहीं निरोप देतां दिसत नाहीं ! शरीरीं आरोग्य जाहल्यास जात नाहीं. मागाहून सविस्तर लिहून पाठवितो. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. १९८२. **श्रीगणपति.** (पौष. शु० ९–१७ जाने०)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. येथील वर्तमान ताा छ ६ जिल्हेज भृगुवार प्रातःकाल जाणोन सदैव पत्र पाठवीत जाणें. इकडील वर्तमान तर राजश्री गोविंदपतमामा पुत्रसह व आप्पाजी दामोदर व चिरंजीव जिऊबा, नारोपंत फडणीस, बाळाजीपंत गडबोले, विठ्ठलपंत लेले, नारोपंत बक्षे पुत्रसह, असे कित्येक गृहस्थ आले. शिलेदारही फार करून खासे खासे पायउताराच आहेत. कांहीं मेले. कनिष्टपक्ष दोन हजार घोडे थकले, मेले, गेले ! या प्रकारची हवाल लष्करची जाहली. बुनगयामही उपद्रव बहुत जाला. कोणाचें काय गेलें नकळे. दौलत सारी

---

१ पटवर्धनांच्या जहागिरींतले परगणे मंगळवेढें व करकंब यांची. २ मंगळवेढ्याम. ३ उपनाम सखदेव जोशी. मोठे मर्द शिपाई पालखीपदस्थ होते. मिरजकरांच्या पागेवर हेच मुख्य असत. ४ उपनाम करमरकर यांचेच पुत्र राघोपंतभाऊ हे अलिकडच्या काळांत मिरजप्रांतीं वैद्य म्हणून प्रसिद्धीस आले होते. यांस लोक केवळ धन्वंतरी मानीत. ५ जिवाजी रामचंद्र पोतनीस. ६ शत्रूनें घोडीं हिसकून घेतलीं म्हणून

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

बुडाली ! मसलत सर्व बुडाली ! हें सर्व जातें आणि चिरंजीव शाबद येते तर सर्वहीं फिरोन नीटच होतें. परंतु तोही प्रकार दिसत नाहीं ! आज नववा दिवस झुजास. अद्यापि सरदारांची तहकीक खबर नाहीं. तेव्हां आशा धरणें ठीक नाहीं. एक तर शत्रु--स्वाधीन जाहले किंवा कांहीं ईश्वरी घात ! कांहीं नकळे. परंतु दहा वीस ब्राह्मण व दहा मराठे असे. शिवराम बाबा, बहिरजी घोरपडे, नीळकंठराव शिंदे आदि-करून तसाच प्रकार दिसतो ! ! ! आज उद्यां तहकीक वर्तमान येईल ! बाळा ! ! कांहीं बाकी नाहीं ! ! आज चार पांच दिवस कांहीं सुचत नाहीं. तहकीक वर्तमान यावें या अर्थें चहूंकडे माणसें रवाना केलीं आहेत. येतील, ठीक दिसत नाहीं ! राजश्री नागोजीरावनाना बुण-ग्यांत आहेत. भवानजी पाटील शहाजी भोंसले यांचे बंधु जिवंत परत आले म्हणतात: फार करून पादचारीच आहेत. अशांच्या गती अशा जाहल्या, तेव्हां लहानसानांची गत कळतच आहे ! ! ! आजपावेतों तात्या वांचले हीच सर्वांची कल्पना होती परंतु कालपा-सून आमचें अवसान गेलें. राजश्री गणेशपंत जोशी लष्करांत होता तो आला. त्याणें चिरंजीव धोंडूबाईकडून माणसें यवनाचें लष्करांत बातमीस पाठविलीं आहेत. येसाजीपंतास आह्मींही लिहिलें आहे. रामचंद्रपंत मामा लष्करांत आहेत त्यांस लिहिलें आहे. तेथें लष्करांत कृष्णरावजीचींही माणसें गेलीं आहेत. माझें अवसानच गेलें. कांहीं सुचत नाहीं. चिरंजीव राजश्री दादा व आपा व गणपतराव असे काल येथें आले. एक दोन दिवसांत आप्पा व गणपतराव सुभेदार यांची रवानगी माघारी करितों. सर्व प्रकारें घर बुडालें. नाव बसली. याउपर कांहीं बाकी राहिली नाहीं. फारकरूनतर येतात ते पाद-

---

१ म्हणजे हे सर्व लोक लढाईंत पडले असावे ! २ शिवराव घोरपड्यांचे कारभारी. ३ अकलकोटकर. यांचें पथक सावशीच्या लढाईंत होतें.

चारीच आहेत. आह्मी गेल्यावर सुमार पाहून करितों. शिवरामबावा नाहींत त्यापक्षीं त्यांचे लेक तर रहातच नाहीं. असो. कोण काय म्हणतील हेंही समजत नाहीं. मी चिंतासागरीं पडलों. वांचली मंडळी तीं तरी सर्वस्वास मुकली. तुम्ही घरीं आहां, तेथें कहर जाहला असेल ! मातुश्री काशी मामी व आक्का आदिकरून एक घोळ तुजभोंवता घालतील ! इलाज नाहीं. निरुपाय गोष्ट घडली. आज येण्याची लटकी आशा आहे. यांत श्रीने कृपा केली तर फारच चांगलें; नाहीं तर कांहीं बाकी नाहीं. हें पत्र कोणास न दाखवणें. जवळ शत्रु आहे. तुम्हाजवळ स्वार नाहींत. शें पन्नास स्वार ठेऊन चौकी पाहरा बंदोबस्त करीत जाणें. स्थळाची चौकशीनें बंदोबस्ती करणें. पुण्याहून लौकर पुस्तपन्हा जाहला तरीच परिणाम ! ही सर्व फौज बुडाली. यांत कांहीं बाकी नाहीं. तूर्त उपयोगाचीही नाहीं. शत्रु माघारा बंकापुराम गेला म्हणतात तेव्हां सर्व यश घेऊनच गेला असें दिसतें. हें पत्र कोणास न दाखवणें. आह्मी लवकरच दरमजल जातों. फौजेचा निकाल गोविंदपंत मामाचे विचारें होईल तसा करितों. जे राहतील ते राहतील. पुढें कसें करावें हेंही तुम्हास सुचेल तें लिहिणे. मला कांहीं सुचत नाहीं. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १९८३. **श्री.** (पौष शु० १०—१८ जाने०)[1]

विनंती सेवक सखो रंगनाथ. विज्ञापना छ ८ जिल्हेज रविवार दोन प्रहर. मुक्काम हसूर परगणे तोरगल येथें असों. विशेष. स्वामीनीं कबनूरचे मुक्कामाहून आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें सविस्तर कळलें. शत्रूशीं लढाई जालियाचें व श्रीमंत[2] क्षेमरूपतेचें

---

१ हें पत्र कुरुंदवाडकरांचा कारकून सखो रंगनाथ हा कोन्हेरराव पटवर्धन कुरुंदवाडकर यांच्या स्वारींत होता त्यानें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस लिहिलें आहे. त्यांत सावशीच्या लढाईची फारच चांगली तपशीलवार हकीकत दिलेली आहे. २ श्रीमंतांच्या म्हणजे कोन्हेररावाच्या क्षेमरूपतेचें.

वगैरे सविस्तर लिहून पाठविणें, म्हणोन पत्रीं आज्ञा, त्यास मार्गशीर्ष वा॥ १४ बुधवारीं तिसरे प्रहरीं स्वारी तयार करून श्रीमंत राजश्री रावसाहेब व शिवराव घोरपडे व कृष्णराव पानशे व वासुदेव काका व गोविंदपंत मामा याप्रमाणें तयार होऊन गेले. गोटांत श्रीमंत राजश्री तात्यासाहेब मात्र राहिले होते. बुधवारीं अस्तमानीं कुंदगोळाहून बातमी तात्यासाहेबांकडे आली कीं, महमदअल्ली कुमदान फौज च तोफांसुद्धां भारी सामानानिशीं सावशीस आला. रात्रौ गोटावर छापा घालणार, म्हणतांच तात्याहेब दोन घटका आवशीचे रात्रीस तयार होऊन गोटापासून कोसावर नौबद वाजवीत सूर्योदयापर्यंत उभे राहिले. रावसाहेब वगैरे मंडळी यांस ही बातमी कुमदान सावशीस आला म्हणोन कळल्यावर सूर्योदय होतांच सावशीपासून दोन कोसांवर राहून तेथें कृष्णराव व रावसाहेब स्नानसंध्या करून भोजन केलें. तयार झाले. तों तात्यासाहेब छबिन्यास उभे होते ते तसेच लढाई करावी म्हणोन आले. तेव्हां हे व ते मिळोन सावशीस नीट चालोन गेले. बरोबर तोफा दोन लहान होत्या. सावशीस कुमदान आपल्या तयारीनिशीं राहिला होता. दोहीं बाजूंस फौजांच्या टोळ्या मध्यें तोफा पांच सात, त्याभोंवतें बुरूज बारांचे. याप्रमाणें लढाईची तरतूद करून सावशीचा आमरा करून राहिला असतां याणीं नीट चालोन त्याजवर घेतलें. त्याच्या आगीच्या माऱ्यांत पुरते जाऊन यांणीं दोन तोफा सुरू केल्या, परंतु त्या लागू झाल्या नाहींत. गोळे पुढेंच पडले. पल्लेदार थोरल्या तोफा गोटांतील आण.

---

१ कोन्हेरराव. या पत्रांत सर्वत्र 'रावसाहेब' हें नांव येईल तेथें तेथें त्याचा अर्थ कोन्हेरराव असा समजावा. २ पटवर्धन शिळकर. ३ जोशी सखदेव. मूळ वास्तव्य पाग नजीक चिंपळूण. ४ पांडुरंगराव गोविंद. ५ फौज म्हणजे घोडेस्वार. त्या काळीं पायदळास कोणी फौज म्हणत नव्हतें. ६ बार म्ह. बंदूकवाले कवाइती पायदळाचे शिपाई.

विल्या होत्या त्या तोफा जाऊन पोंचल्या नाहींत. थोर तोफा असत्या तर कारागिरी होती. लहान तोफा, काट चालला नाहीं, हें पाहून कुमदानानें एकदांच सात आठ तोफा सुरू केल्या, तोफांचे गोळे फौजेंत लागू होऊन पांच सात घोडीं व भले लोक जायां होतांच फाजेतकालवाकालवी झाली. तेव्हां रावसाहेबांनीं तजवीज केली कीं, दम धरून लढाई करावी. अशी गडबड जाल्यास बुडविनीस. म्हणोन रावसाहेब आपले पथकांतून एकटेच निघोन तात्यासाहेबांकडे गेले. तात्यासाहेबांस मनसोब्याच्या गोष्टी सांगितल्या जे 'पुढें जाऊं नये. मागें फिरावें. लोकांस ताकीद करावी. शिवराव घोरपडे यांणीं तोंड लाविलें आहे, त्यांस उपराळा करावा. एकाएकीं निघों नये. शत्रु पाठीवर येईल. दम खात खात जावें,' म्हणोन सांगावयास गेले. तात्यासाहेबांस वर्तमान रागास येऊन सांगतात. तात्यासाहेब माघारे फिरण्याची योजना करितात, तों लोकांनीं धर टाकिला ! फौजेच्या चलका सुटल्या तेव्हां सरदारानीं काय करावें ! कोणास कोणी पुसेनासें झालें ! तशांत शिवराव घोरपडे यांणीं तोंड लावून कड निकडी चढ्या केल्या. परंतु उपराळा त्यांस कोणाचाच झाला नाहीं. तेव्हां सहजच फौज कचरली. तात्यासाहेबांकडून रावसाहेब माघारे जातात, तों त्यांच्याही पलकांतील लोक भगाण होऊन जिकडील तिकडे पळाले. कोणाचीच गांठ पडली नाहीं. तात्यासाहेब चार हजार फौजेचे धनी, परंतु तशा समयास तात्यासाहेबांबरोबर पांच लोक नव्हते ! असा प्रसंग प्राप्त झाला तेव्हां रावसाहेब एकटे दम खात हातांत हत्यार धरून येत असतां त्यांजवर मिठी बहुतांची पडली. ते समयीं रावसाहेबांनीं शिपाईगिरीची शर्त केली. परंतु दुसरें कोणी सोबतीस नाहीं. कोणी असतें तर एकमेकांची कुमक करिते. परंतु तो समय तसाच. खाशास गांठ पडली तेव्हां त्यांणीं आपली शर्त करून धारातीर्थीं मृत्यु पा-

वले. जखमा मस्तकास डोईंत तरवारीच्या तीन चार होत्या. डोळ्याजवळ भाल्याची खोंक होती. अंगावर चिलखत होतें म्हणोन जखमा जाल्या नाहींत. एरवीं फार जणांची गांठ पडली, तेव्हां कळतच आहे ! रावसाहेब तेथें रणास आले. तात्यासाहेब व श्रीपतराव व वासुदेवकाका व कान्होपंत व आनंदराव माधव तोफखानेकडील व शिवराम घोरपडे व बहिरजी घोरपडे व भिकाजी घोरपडे सावशीकर धारवाडकर यांजकडे होते ते पितापुत्र व नीळकंठराव शिंदे[1] येणेंप्रमाणें मंडळी त्याजकडे पाडाव गेली. नौबती तात्यासाहेबांची व पानशे यांची व घोरपडे यांची येकूण तीन व हत्ती तात्यासाहेबांकडील दोन व पानशेकडील अंबारीसुद्धां तीन व घोरपडयांकडील एक, एकूण सहा, व तोफा सात, येणेंप्रमाणें पाडाव त्यांजकडे गेले ते कुमदानानें सावशीहून दुसरे दिवशीं सरदार मंडळी व तोफा हत्ती वगैरे बंकापुरास रवाना केले. राजश्री बाजीराव बर्वे यांणीं तात्यासाहेबांस ओळखून आपले खिजमतगार व ब्राम्हण व आचारी वस्त्रेपात्रें देऊन बंकापुरास रवाना केले. रणभूमीस तेथेंच दादेसाहेब कुडचीकर व अक्कलकोटकर व सोनवलकर व वाघोजी मगर खासा व घोरपडे यांजकडील खासे भले लोक वीस पंचवीस ठार पडले. याप्रमाणें गुरुवारीं गर्दी झाली. गोट अगदीं गडबडला. एकाएकीं दगा होईल हें कोणाचे ध्यानांतही नवतें ! अकस्मात् अशा गोष्टी झाल्या तेव्हां गडबड जी उडाली ती लिहितां पुरवेना. तशांत गोट तयार होऊन बुनगें नरगुंदचे रोखें निघालें. आह्मीही आपल्या मलतनत राहुटीं व जामदारखाना वगैरे खटल्यासुद्धां निघालों. ते प्रहर रात्रीं नरगुंदास आलों. रात्रौं तसेच जागोजाग गांवासभोंवतें राहून भृगुवारीं प्रातःकाळीं सहा

---

[1] मनोळीकर.

घटका रात्रौ तेथून निघालों ते दोन प्रहरीं रामदुर्गाअलीकडे कंकणवाडीस मुकामास आलों. नंतर उंट, घोडीं, माणसें, बुनगें, ज्याचें त्यास मिळालें व कितीएकांस मिळालेंच नाहीं. मुक्कामास आल्यावर सरदार लोकांचा शोध करितां कोणीच आले नाहींत, सारेच राहिले, म्हणोन कळतांच चिंतार्णवीं पडलों. मग माणसें शोधावयास पाठविलीं वीस पंचवीसपर्यंत. नरगुंद नवलगुंद सौंदत्तीहून खालीं धारवाड येथें आले असतील, जखमा असतील, म्हणोन माणसें पाठविलीं. व रामप्या कुलगोडकरही पाठविला होता. पाहून माघारा आला तेव्हां ठिकाण न लागे, तेव्हां रणभूमी शोधून पहावी म्हणून आबण्णा व बैरागी बाबा माणसें देऊन तिसरे दिवशीं त्या जाग्यास रवाना केलीं. तेव्हां आबण्णा चौथे रोजीं त्या जाग्यास जाऊन पावला. तळ शोधिले. तेथें खाशांचें शव पडलें होतें. तेव्हां नजीक गांव होतें तेथें जाऊन दहन करावयाची तरतूद करून शुभा वगैरे शवाजवळच नेविलें. चंदन व बिल्वकाष्ठें व तुळसीकाष्ठें तेथील मळ्यांतील घेऊन सप्तमी बुधवारीं संध्याकाळचे तीन चार घटका दिवसास दहन केलें. ते दिवशीं त्या खेडयांत राहून दुसरे दिवशीं अस्थि घेऊन काल मंदवारीं संध्याकाळीं आला. स्वामीकडून शिवाजी अप्पाजी येऊन बसले होते व कुरुंदवाडाहून तुळाजी जासूद व निंबाजी खिजमतगार येऊन बसले होते. त्यांशीं जाब काय म्हणोन द्यावा ! यास्तव आबण्णा येईल म्हणोन चिंताक्रांत होऊन मार्ग पहात बसलों होतों. तो आला. येतांच पत्र लिहून शिवाजी आप्पाजी यास आज प्रातःकाळींच रवाना केला आहे. येऊन पोहोंचलाच असेल. स्वामी लष्करांत आले नाहींत, कुरुंदवाडासच आहेत, म्हणोन कळलें; तेव्हां कुरुंदवाडीं स्वामी असतील म्हणोन तुळाजी व निंबाजीस कुरुंदवाडास आजच रवाना केले.

---

१ कोन्हेरराव. २ तुळी रघुनाथराव. ३ परशरामभाऊंच्या लष्करांत.

शिवाजी व तुळाजी मिळोनच गेले. पुढें फुटून जातील तर नकळे. आज आबण्णास पाठवावें तर लष्करचें कूच होऊन मुक्काम मजकुरास आलें. आज आबण्णा बरोबरच आला. येथून आबण्णास स्वामीकडे पाठविला आहे. उद्यां प्रातःकाळीं अथवा संध्याकाळीं येऊन पावेल. स्वामींनीं ' पत्र कां पाठविलें नाहीं ? माणसें नाहींत कीं काय ? ' म्हणोन आज्ञा केली, त्यास दादासाहेब ! कोणती गोष्ट काय म्हणून लिहूं ? रावसाहेब धारातीर्थीं पडले म्हणोन ठीक सांगते आले म्हणोन लिहूं, किंवा तात्यासाहेब मंडळीसुद्धां शत्रूकडे पाडाव गेले म्हणोन लिहूं ? कोणतीही गोष्ट तथ्य नये, तेव्हां काय लिहावें, म्हणोन भ्रांतीस पडोन शोधास लागलों. लढाई झाल्यापासून नववे दहावे दिवशीं रावसाहेब कैलासवासी जाल्याचें ठिकाण लागलें. तसेंच तात्यासाहेब सदरहू मंडळीसुद्धां पाडाव गेले, बंकापुरास नेले, म्हणून मागाहून तोफखान्याकडील व गोटांतील कोण कोण बैदानीं धरून नेले होते ते रायर हुबळीस मुक्कामाहून पळून आले त्यांणीं सांगितले. वरून तथ्य भासलें. आमचा बहिरू अबदागिऱ्या हुबळीहून आला. त्याणें याचप्रमाणें वर्तमान सांगितलें. स्वामींचें पत्र तुकाजीबरोबर आलें होतें त्याचें उत्तर सवेशीं पाठविलेंच आहे. दादासाहेब ! रावसाहेब यांचे शोधाविशीं बहुत यत्न केला. आबण्णा जाऊन सार्थक करून आला. कोणी तिकडे जावयास धजेना, तेव्हां आबण्णानें धारिष्ट करून जाऊन सार्थक करोन आला. रावसाहेब पुण्यवंत धारातीर्थीं मरण पावले, ते देवलोकास गेले. परंतु सर्वांचा घात झाला. ईश्वरें एकाएकीं घाला घातला. तुळाजी जासुदास कुरुंदवाडास न पाठवितों, परंतु स्वामी तेथें असतील म्हणोन कल्पना घेऊन पाठविला. अद्याप तो पावला नसेल. पागेंतील घोडीं स्वारीबरोबर गेलीं होतीं. त्यांजपैकीं शत्रूकडे पाडाव गेल्याची याद अलाहिदा पाठविली आहे. आमचे पथकापैकीं शिलेदारांकडील घोडीं अदमासें

ऐशी नव्वदपर्यंत गेलीं. जखमी बहुत लोक नाहींत. वीसपर्यंत आहेत परंतु जखमा हलक्या आहेत. राजश्री अप्पाजी मामा राजवाडे यांची नासाडी फार झाली. पंचवीसपर्यंत माणूस जखमी जालें. खराबी जाली. इतकें होऊन रावसाहेब येते तर उत्तम होतें ! परंतु भगवत्संतोस उपाय नाहीं. सेवेशीं श्रुत व्हावें. सेवकावर सदैव कृपा लोभ असों दीजे हे विज्ञापना.

नं. १९८४. **श्री.** (पौष व०–जाने० दु० पंधर०)

राजश्री परशुरामपंत भाऊ गोसावी यांस अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित मुराजी जगथाप हवालदार किल्ले भुजबलगड. दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वक्षेम लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. सांप्रत पोकळेची भाजी व कोथिंबीरी पाठविली असे. आह्मी आपल्या नमतेंतील आहों. सदैव पत्रीं परामर्ष करीत असिलें पाहिजे. अमित्राची फौज हुबळीवर आहे. आणखी दीडदोन हजार स्वार व दोन तीन हजार बारांनिशीं राजश्री श्रीनिवास बारकी म्हणणार येऊन मिळाले व बातेऱ्या बांधितातसें वर्तमान आहे. आपल्या सैन्याची धाशत बरीच त्यांस लागली आहे. भारी जय होऊन गांठ पडल्यास विमुख होतील. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असावा हे विनंती.

नं. १९८५. **श्री.** (पौष शु. १२–२० जाने.)

रवाना छ १० जिल्हेज भृगुवार.

चिरंजीव राजश्री जिऊबा यांप्रती विष्णु कृष्ण. आशीर्वाद. उपरी तुम्ही दोन पतें पाठविलीं तीं पावलीं. कोन्हेरराव यांचें वर्तमान लिहिलें तें संध्याकाळीं घरांत कळविलें तेसमयीं आकांत जाला ! दुःखास पारावार नाहीं ! समजोन कोणास म्हणोन सांगावें ! यांचे घराण्यांत आज कोन्हेरराव यासारिखा हत्तीमाणूस नव्हता ! धीराचा

पुरुष होता. न घडावयाची गोष्ट ईश्वरें घडविली ! कुरुंदवाडासही वर्तमान कळविलें. काल आबण्णाही आला असेल. यापुढें काम चालीस लागेल. येथें तीन दिवस अशौच बसले होते. आजपावेतों आम्ही झुंजेंभांडणें पाहिलीं, आइकिलीं, मोडही बहुत वेळ झाले, परंतु असा नाश जाहला पाहिला नाहीं ! कालचक्राचा महिमा त्या-सारखे शहाण्याच्या बुद्धीस भ्रंश जाहला आणि लोकांत शहाणपणास वट्टा लागला ! सर्व आश्चर्य करितात ! दैवी कृत्यास उपाय नाहीं. मेले ते गेले. सांपडले आहेत त्यांची आशा आहे. त्यांचे सुटकेविशीं येथून श्रीमंत बाळासाहेब पत्रें कारभारी यांस व शिवाजीपंतास नित्य एक जोडी रवाना करून लिहितात. त्याकरितां राजश्री हरिपंत यवनां-कडे जाऊन त्यास घेऊन कर्नाटकांत जावें असा पहिला मनसबा होता. इकडील वर्तमान कळतांच यवनांकडे जावयाचें राहिलें. हुजरात व पथकें वीस पंचवीस हजार फौज घेऊन धारवाडच्या सुमारें क्षेप-निक्षेप येतात. ग्रहण झाल्यावर दोन तीन दिवशीं निघणार. अगोदर पुढें नरसिंगराव धायगुडे व हुजरात मिळोन पांच हजार फौज पुढें रवाना जाली. आठ दहा दिवशीं त्या प्रांतें येणार. यवनांकडे ' सत्वर सुरापुरच्या सुमारें फौजसुद्धां यावें ' म्हणोन जलद पत्रें पुरंदराहून गेलीं. मागाहून कृष्णराव काळे यवनाकडे जाणार. तीही फौज येईल. असें करितां माघ मासीं सर्व फौजा जमा होतील. हैदरखान यास तंबी पोंचल्याखेरीज यांची सुटका व्हावयाची कठीण आहे. प्रारब्ध चांगलें असेल तर केला मनसबा सिद्धीस जाऊन सुटका होईल. ईश्वरावर सारा भार आहे. सांपडल्या गृहस्थांची हरएक द्वारें बातमी येई ऐसा उपाय करणें. हे आशीर्वाद.

(२१ जानेवारी.)

नं. १९८६. श्री.

पौ छ १६ जिल्हेज.

तीर्थस्वरूप राजश्री भाऊ वडिलांचे सेवेशी.

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

अपत्यें समान बळवंतराव कृष्ण व हेरी पुरुषोत्तम दोनी कर जोडून शिरसाष्टांगें नमस्कार, विज्ञापना तागायत पौष शु॥ त्रयोदशी-पावेतों किल्ला पुरंदर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल चिरंजीव राजश्री गंगाधरराव यांचीं पत्रें मिरजेहून आलीं त्यांतील मजकूर चिरंजीव राजश्री पांडुरंगराव तात्याचें व फौजेचें वर्तमान—" चिरंजीव राजश्री तात्यासुद्धां सर्व मंडळी पाडाव शत्रूकडे सांपडले. तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव यांचें तो ठिकाण नाहीं. फौजेंत गरक जाहलें, " याप्रमाणें वर्तमान लिहिलें त्यावरून परम खेद होऊन चिंता लागली ते कोठवर लिहावी ! येथें राजश्री नाना व राजश्री बापू यांस तींच पत्रें दाखविलीं त्यावरून तूर्त फौज राजश्री नरसिंगराव धायगुडे वगैरे पांच हजार दरमजल आपणाकडे जावयाची आज्ञा जाहली आहे. वडीलें व चिरंजीव रघुनाथराव फौजसुद्धां तिकडे जावयास गेले म्हणोन कळलें, त्यास वडिलीं तरी उतावळी न करावी. त्याची बातमी राखोन सावधपणें हे फौज मागाहून वडिलांस येऊन मिळे तोंपर्यंत उतावळी करून पुढें जाऊं नये. मुख्य गोष्ट शत्रूची बातमी विशेष रक्षावी. आम्हांस तर कांहीं सुचेनासें जालें आहे. वडिलीं चिरंजीव राजश्री गंगाधरराव यांस वरचेवर पत्रें लिहून सावध करीत जावें आणि तिकडील सविस्तर लिहून पाठवीत जावें. इकडील सविस्तर राजश्री शिवाजीपंतीं लिहिलें आहे त्यावरून कळों येईल. श्रीमंत राजश्री नाना मेणवलीस गेले आहेत. ग्रहण झालेनंतर येतील. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

नं. १९८७. **श्री.** (पोष शु. १३–२१ जानेवारी.)

पैवस्ती छ १२ जिल्हेज गुरुवार सन सब्बा सबैन पौष मास.

---

१ पुरुषोत्तमराव कृष्ण यांचे पुत्र हरिहरराव तात्या. २ तुल्ही परशुरामभाऊ. ३ कुरुंदवाडकर.

सेवेशी शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ११ जिल्हेज भौमवासर. मुक्काम भिवडी यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्रें छ ५ जिल्हेज व छ ६ जिल्हेजचीं तीन रवानग्याचीं पाठविलीं तीं काल दोन प्रहरीं पावोन लिहिला मजकूर कळला. लढाई बिघडल्याचें वर्तमानाचें पत्र श्रीमंत राजश्री भाऊंचें आलें त्यांत लिहिलें होतें कीं, तुम्हास पत्रें तिकडून आलींच असतील. त्यास इकडून पत्रें.....आपलीं पत्रें आलीं त्यांजवरून अगदीं अवसानच गेलें! बाकी राहिली नाहीं. तसींच पत्रें घेऊन राजश्री नाना व बापूकडे गेलों. श्रीमंत राजश्री बळवंतराव[1] व आम्ही मिळोन पत्रें दाखविलीं. पत्रें वाचून पाहिलीं आणि तेही फार श्रमी जाहले. इंग्रजांकडील वकिलास निरोप द्यावयास श्रीमंतसुद्धां आले होते. बोलणेंचालणें जाहलें. राजश्री कृष्णरायासीं बोलून नबाबास पत्रें लिहिलीं कीं, राजश्री हरीपंत तात्यांचा मनसबा सुरापुराकडे यावयाचा होता तो या लढाईकरितां राहिला. इकडेच त्यांस जावें लागतें. आपण यांच्या लष्करच्या रोखें यावें" म्हणोन लिहिलें आहे. राजश्री हरीपंत तात्यांस पत्र पाठविलें कीं, तुम्ही जलदीनें कूच करून धारवाडच्या रोखें जावयाचें करावें. पहिला मनसबा राहिला व पुढें निकडीनें जावयाजोगी सडी फौज पांच हजार राजश्री नरसिंगराव घायगुडे यांजबराबर देऊन पुढें रवाना करावी. मागाहून मजल दरमजल तुम्ही जावें. येणेंप्रमाणें पत्रें पाठविलीं. आपण पत्र पाठविलें होतें तें येतांच राजश्री हरीपंत

---

१ हें पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस लिहिलेलें आहे. टिंचें दिलेल्या ठिकाणीं मूळ पत्र फाटलेलें आहे. २ बळवंतराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर. पुरुषोत्तमराव दाजींचे मागें श्रीमंत पेशव्यांच्या संरक्षणार्थ पुरंदरास यांची नेमणूक झाली होती.

तात्यांकडे पाठविलें. राजश्री बाळाजीपंत[1]—भाऊंकडील—तात्यांकडे पुण्यास पाठविले. अगोदर पत्र श्रीमंत राजश्री भाऊंचें आलें होतें. त्याजवरून राजश्री हरीपंत तात्याचें.....राजश्री हरीपंत तात्यांचे पुण्याजवळ पांच सा मुक्काम होतील. ऐवजाचे जाबसाल करून भरणा करून घेतला पाहिजे, याकरितां पांच सा दिवसांत कूच करून लांब लांब मजली करून येतात. गुंता नाहीं. पुढें फौज पाठवावयाविशीं व त्वरेनें जावयाविशीं निकडीचीं पत्रें तीन चार पाठविलीं. रास्ते यांस फौजेत जावयाविशीं ताकीद जाहली. श्रीमंत राजश्री नाना मेणोलीस ग्रहणासाठीं काल संध्याकाळीं गेले. द्वितीयेस येणार.

न. १९८८. **श्री.** (पौष शु. १४–२२ जाने.)

पौ छ १२ जिल्हेज. सुरुसन सब्बा सबैन मय्या व अल्फ.

विज्ञापना[2]. सर्व प्रकारें घात जाहला. बाकी राहिली नाहीं. आह्मी लिहित होतों कीं, "शत्रूचें सामान भारी आल्यास बुनगे एकीकडे लावून द्यावें, आणि सडी फौज करून आज या ठाण्याजवळ, उद्यां दुसऱ्या ठाण्याजवळ, याप्रमाणें गनीमाई करावी" याप्रमाणें लिहित होतों. श्रीमंत राजश्री नानांनीं याचप्रमाणें लिहिलें होतें. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव व कृष्णराव व शिवराव यांणीं जुजें भांडणें पाहिलीं होतीं. कुमदानावर सारी हुजरात राजश्री त्रिंबकराव मामा घेऊन गेले होते ते समयींची अवस्था साऱ्यांनींच पाहिली.

---

१ परशरामपंतभाऊंकडील कारकून बाळाजीपंत यांस हरीपंत तात्यांकडे पाठाविलें. २ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें. ३ पत्र शिवाजी बाबाजीचें पुण्याहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस. यावर इंग्रजी तारीख आहे ती पैवस्तीची घातली आहे. हींत तीन किंवा चार दिवस वजा केले म्हणजे ती रवाना तारीख समजावी.

हाती. धडच (१) कांटयावर घालून असी अवस्था केली ! श्रीमंत राजश्री तात्या लढाईच्या कामास माहीत नव्हते, परंतु सर्वत्रांनीं असा मनसबा केला ! सारांश, श्रीमंत राजश्री तात्या स्वस्तिक्षेम मात्र असावे म्हणजे सर्व गोष्टी यथास्थितच होतील. धारवाडास मोड होतांच शेंपन्नास स्वारांनिशीं आले म्हणोन लिहिलीं येतात तीं आतां खरीं

---

१ स. १७७१ च्या एप्रिलांत त्रिंबकराव मामांनीं श्रीरंगपट्टणास वेढा घातला होता तेव्हां. तो प्रसंग असाः—मराठ्यांनीं पट्टणाभोंवतीं वेढा बसवून आपणास चोहोंकडून जखडून धरिलेंसें पाहून हैदरानें महमदअल्ली कुमदान या सरदारास दहा बारा हजार कवाइती निवडक पायदळ व कित्येक हजार स्वार व कांहीं हलक्या तोफा असें सामान बरोबर देऊन पट्टणांतून बाहेर हळूच लावून दिलें. मराठ्यांनीं घेतलेलीं ठाणीं काबीज करून व जाळपोळ करून त्यांच्या लष्कराची रसद बंद करावी, पिछाडीस वारं वार उपद्रव करून कहीकबाड मारून काढावें व त्यांस पट्टणाचा वेढा उठविण्यास भाग पाडावें, याप्रमाणें मसलत योजून तो कुमदान मराठ्यांच्या चौक्यांचा नजर चुकवून निसटून गेला तों ती बातमी त्रिंबकराव मामास समजली. लगेच ते दहावीस हजार हुजरात बरोबर घेऊन कुमदानाच्या पाठीस लागले. पट्टणापासून चार कोसांवर त्यांनीं त्यास गांठिलें. परंतु कुमदान मराठ्यांशीं झुजत झुजत मजल चालूं लागला. मग मराठ्यांनीं त्यावर निकरानें वारंवार हल्ले करून त्याचे हजारों लोक मारले व जखमी केले. अशी दुर्दशा होतांच कुमदान एका बळकट इमारतीचा आसरा धरून बसला व मामांनीं त्याभोंवतीं चौक्या बसवून आपल्या लष्करांतून थोरल्या तोफा आणावयास माणसें पाठविलीं. त्या तोफा येऊन पोंचत्या म्हणजे कुमदानाचा साराच ग्रंथ आटपत होता ! पण काळोख पडल्यावर आपल्या तोफा वगैरे अवजड सामान व घायाळ झालेले लोक जागच्या जागींच टाकून कुमदानानें सडया लोकांनिशीं पळून जाण्याची तयारी केली. तो आपणास टाकून जाणार ही बातमी त्या कण्हत पडलेल्या दुर्दैवी घायाळ लोकांस समजतांच ते किंकाळ्या फोडून रडूनओरडून आकांत करूं लागले. मग कुमदानाचें काळोखांतून निमूटपणें निसटून जाणें कसें होणार ! मग त्यानें त्या घायाळ लोकांस चुचकारून तुम्हांस सोडून जात नाहीं, काळजी करूं नका, स्वस्थ रहा; असें सांगून स्वस्थ केलें आणि कांहीं वेळ गेल्यावर एकदम सर्वांवर मारेकरी घालून त्यांस ठार मारून अंधारांतून पलायन केलें ! असा तो क्रूर चांडाळ कुमदान होता !

वाटत नाहींत. जरकरून कोणत्या ठिकाणीं गेले असते तरी चिठी तरी पाठविते. चिठी त्यांच्या हातची नाहीं. त्याजवरून उभयतां कारभारी आदिकरून कोणाची बुद्धि चालत नाहीं. उभयतां श्रमी जाहले, तें कोठपावेतों लिहावें ! प्रथम स्वारीस गेल्यासारखें चांगलें जाहलें होतें. यश मेळविलें होतें तें जतन केलें असतें म्हणजे मोठीच गोष्ट जाहली असती. गनीमाई करून चार दिवस मातबर फौज येई तों राहते म्हणजे सर्व ठीकच होतें. होणार भावि त्यास इलाज नाहीं ! धारवाडास आले हें खरें असल्यास कदाचित् ते पत्र पाठविणार नाहींत असेंही होईल. आपण तरी शोधास माणसें पाठविलींच आहेत. स्वस्तिक्षेम इतकीं अक्षरें येतांच लिहावें. आपण चिंतार्णवीं पडलांच आहां. हिंमत धरावी. नाहीं तरी दुसरा उपायच नाहीं. त्यांणीं जलदी केली तसी आपण न करावी म्हणोन श्रीमंत राजश्री भाऊंस आपण लिहावें. अमक्या स्थळीं आहेत अशी बातमी येतांच लिहून पाठवावें. इकडे पत्रें आलियावर कोणीकडून तरी वर्तमान आलेंच असेल. जलदीनें लिहावें. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९८९. श्री. (पौष शु० १४--२२ जानें.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जावें. विशेष. तुम्ही छ ४ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ १२ मिनहूस पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. लढाई बिघडली सबब राजश्री पांडुरंगराव यांचे मदतीस तुम्ही फौजसुद्धां जात आहां, उत्तम आहे. लौकर जाऊन

---

१ पत्र नानाफडनविसांचें.

पोंहचावें. परंतु त्यांचें सामान आहे भारी. यास्तव तुम्ही गनिमी कावा करून असावें. उतावळी करून गांठ घालूं नये. येथून राजश्री हरीपंतांची रवानगी जाहली आहे. लौकरच येऊन पोंचतील. हैदरास काव्यादाव्यानें तंबी पोंचवावी. हे सर्व मजकूर तुह्मांस माहीतच आहेत. विचारें करून त्यास जरब पोंचे तें करावें. सरदारांचें ठिकाण लागतांच सत्वर लेहून पाठवावें. गोष्ट[1] वाईट जाहली. होणारास उपाय नाहीं. तुह्मीही उतावळी करूं नये. गनीमीनें असावें. मातबर फौजेखेरीज ठीक जाणें नाहीं. हरीपंतही लौकरच येतील. पांडुरंगराव वगैरे सरदारांचें वर्तमान तथ्य जरूर लिहून पाठवावें. चिंता लागली आहे. आपणासारखें कृतकर्मे त्या फौजेंत असते तर असें न होतें ! बरें ! असो. श्रीमंतांचे दैवेंकरून सर्वही गोष्टी उत्तमच होतील. रवाना छ १२ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं. १९९०. **श्रीगणराज**. (पौष शु० १५–२३ जानेवारी.)

छ १५ जिल्हेज पौषमास.

चिरंजीव राजश्री जिवाजी रामचंद्र यांसी प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ १३ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. तुम्ही छ ९ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. हत्ती व कारखाना व जड भारी यादवाडास ठेविलें आहे, व तीर्थस्वरूप राजश्री भाऊंचें पत्र आल्याचा मजकूर लिहिला तो कळला, व हसूरचे मुक्कामास आल्याचें वर्तमान लिहिलें, व शत्रूचे फौजेचें वृत्त लिहिलें तें व नरगुंदास तोफेविशीं शत्रूचें पत्र आलेचा मजकूर लिहिला तो कळला. तानाप्पा इंदलकर याचें पत्र आलेलें पाठविलें तेंही पावलें. त्यांतीलही अर्थ समजला. लक्ष्मेश्वर तीन दिवस झुंजले उपरी शत्रूनीं कौल

---

१ येथून खास दस्तूर.

देऊन घेतलें. कोनाप्पास व लोकांस कैदेंत ठेवल्याचा प्रकार लिहिला तो कळला. कित्तूरकराचा मजकूरही कळला. " झाडून फौजेस एक रोजमुरा दिला. जखमा भारी व ज्यांस घोडीं नाहींत असे होते त्यांस एक महिन्याची बेजमी करून देऊन निरोप दिला " म्हणून लिहिलें तें कळलें. " नरगुंदचा ऐवज तूर्त आणावा तरी शत्रूचे स्वार तेथें आहेत यास्तव आणवितां नये " म्हणून लिहिलें तें प्रमाणच. सोय पाहून आणवावा. तूर्त उतावळी करूं नये. तीर्थस्वरूप राजश्री भाऊंचे विचारें आणवणें. वेंकापा नाईक कलकेरी यांसीं मजकूर सांगितलेला लिहिला तो कळला. प्रविष्ट होऊन हस्ताक्षर चिठी येणेंचें संकट आहे. " फौजेंत कोणी मरदार असल्याविना बंदोबस्त होणार नाहीं " म्हणून लिहिलें, ऐसीयासी प्रस्तुत तीर्थस्वरूप राजश्री भाऊ आले आहेतच. पुढें ईश्वरइच्छेनुरूप जसी सोय होईल तसी पहावयास येईल. ईश्वरी कृपा आहे तरी तीर्थस्वरूप राजश्री तात्याही लवकरच येतील. " आपली फौज पागासुद्धां दोन हजार होईल " म्हणून लिहिलें तें कळलें. राजश्री कृष्णराव पानशे बोलल्याचा प्रकार लिहिला तो कळला. आजपावेतों तुम्ही व तीर्थस्वरूप राजश्री भाऊ एकत्र जाहलांच असाल. सविस्तर वर्तमान लिहिणें. तीर्थस्वरूपांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीत जावी. पुरंदरचीं पत्रें आलेलीं तीर्थस्वरूप राजश्री भाऊंकडे पाठविलीं आहेत त्यांवरून सविस्तर कळेल. पांच सहा हजार फौज नरसिंगरावं धायगुडे समागमें रवाना जाली आहे ते लवकरच येऊन पोंहोंचतील. राजश्री हरिपंत तात्याही लवकरच येतील. निजामबाबासही[1] निकडीचीं पत्रें गेलीं आहेत. ईश्वरीकृपेनें लवकरच शत्रूचें पारिपत्य होईल, चिंता नाहीं. बहुत सावधपणें असावें. राजश्री हरीपंतही अतःपर जलदच येतात. गुंता नाहीं. वडिलांचे पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

---

१ निजाम अल्लीस.

नाइकू जामेंदारास आशीर्वाद. घाबरे न होणें. श्रीमंतांचे प्रतापें तीर्थस्वरूपही लवकरच सुटून येतील. हे आशीर्वाद.

नं. १९९१. **श्री.** (पौष व. १–२४ जाने.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ १४ जिल्हेज मंदवार मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ ७ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ ११ मिनहस पावोन सविस्तर मजकूर कळला. सारांश, श्रीमंत राजश्री तात्या आदिकरून सरदार पेंचांत आले हाच भाव लिहिण्यांत, त्याजवरोन अवसानच गेलें! कांहींच सुचेनासें जाहलें. पत्र पावतांच भिवडी हून निघोन पुण्यास आलों. राजश्री हरिपंत तात्या व राजश्री आपा बळवंत यांच्या निघण्याच्या त्वरेसाठीं आलों. त्यास येथील फौजेचा मोठा राडा पडला आहे. पन्नास लक्ष रुपये आणावे तेव्हां निकाल पडावा; त्यास सारा ऐवज सावकारांचें रदकर्ज आठ नव लाख रुपये होळकरांकडील ऐवजाचे जाहले. पट्टीचा ऐवज [1]सरा लाखपावेतों जाले. त्यास सात आठ लाख रुपये येथील येथें पोटास वगैरे व कापडखरेदी पट्टीच्या ऐवजींच सावकारांनीं दिले ते खर्च जाहले. तळावर हवाले टवाले म्हणतां सात लाख रुपये राहिले. पन्नास देणें त्यास सातांचा ऐवज आहे. येणेंकरून समजूत पडत नाहीं. तत्रापि आम्ही आल्यापासून खटपट करितात. ज्याचें देणें थोडकें आहे ते निवडून त्यांचा अजमास करून सात आठ हजार फौजसुद्धां राजश्री आपा बळवंत व राजश्री नरसिंगराव धायगुडे रवाना करावे. वोढ पाडावी, मागाहून जसा निकाल निघेल तसा काढून राजश्री हरिपंत तात्यांनीं निघावें. याप्रमाणें बेत आहे. राजश्री आपा बळवंत यांचा

---

१ पांडुरंगराव तात्या. २ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

मुहूर्त चतुर्थी इंदुवारीं परवांचा आहे. परवां निघावें असा निश्चय बोल-ण्यांत आला आहे. कूच जाहलें म्हणजे लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब तिकडे फौजसुद्धां गेले आहेत. त्यांणीं तरी आतां उताविळी करून बारीच्या[1] पलीकडे फौजेचा जय पडल्याखेरीज जाऊं नये येणेंप्रमाणें आम्हीं लिहिलें आहे. आपणही लिहावें. तिकडील तहकीक बातमी वर्तमान आलें असल्यास लिहावें. चिंतार्णवीं पडलों आहों. आपला नाश, दुसऱ्याचें हंसें, याप्रमाणें घडलें आहे ! इलाज नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९९२. **श्रीवेंकटेश.** (पौष व० ३–२६ जाने०)

पैाँ छ १६ जिल्हेज, मुक्काम मनोळी.

श्रीमंत राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य शामय्या बिदरूर. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा करीत असावें. विशेष. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी पत्राननीं (!) परा-मर्ष घेणेंस सुज्ञ असां. इकडील वर्तमान तरी कुमदानाची फौज दोन हजार उगरगोळपावेतों येऊन आपले स्वारी येतात ह्मणोन दोन प्रहरापावेतों वाट पहात सडे फौज उभा राहिला होता. आपले फौजांची स्वारी नाहीं आले त्यावरून नरगुंदाकडे स्वारी गेले. पांचशें राऊत मात्र आपले बातमीकरितां आज सायंकाळपावेतों राहिले आहे आणि बेटगिरीस तीन हजार फौज, बार तीन हजार येऊन बेट-गिरीस राहिले आहे. धारवाडास मोर्चा काल लाविले. दबादबे सला-बत टेंकडीवरी बांधून पांच तोफा ठेविले आहे. आजी तोफांचा मार अतिशय जाहले. मोर्च्यांचा सामान अतिशय केला आहे. नणगाडी (?) तीनशें हे केले आहे. कामाठी दोनी तीनी हजार आहे. दोनशें बैलां-

---

१ मनोळीच्या बारीपलीकडे. २ हें पत्र लिहिणारा माणूस कानडा आहे हें त्याच्या लेखनशैलीवरून दिसून येईल.

वरी पखाली पाणी घालतात. पाणी घालून चिखल करून मोर्चा फार त्वरेनें चालवितात. आज धारवाडाहून बातमी आले. गीर्द चौकी चहूंभोंवतीं आहे. कळावें, याकरितां लिहिलें आहे. कुमदानाची धमक भारी आहे. तोफा अठरा आहेत. फौज आठ हजार. शिरटीकर देसाई आले आहे. बंदोबस्तीस उणें नाहीं. आपण पक्के बंदोबस्तीनें असावें. कृपा करावी हे विनंति.

श्रीगणपति.

नं. १९९३. (पौष व० ३–२६ जाने०)

चिरंजीव राजश्री गंगाधरराव बाळ यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी येथील कुशल ताा छ १६ जिल्हेज मुक्काम मनोळी जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. मुक्काम मजकुरीं आल्यानंतर स्वारांचे डाकेबरोबर पत्र काल रवाना केलें आहे तें पावलेंच असेल. तुम्ही छ १३ जिल्हेज भृगुवारचीं पत्रें पाठविलीं तीं कालच दोन घटका रात्रीस पावलीं व सरकारचे पत्राचें उत्तर व शिवाजीपंताचे पत्राचें उत्तर तुम्हास आलें तींच पत्रें पहावयास पाठविलीं तीं पावोन लेखनार्थ कळला. तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव यांचेंही पत्र पावलें. सविस्तर भाव कळों आला. त्रिवर्गांचीं पत्रें पाहोन माघारीं पाठवावीं म्हणोन लिहिलेवरून तिनी पत्रें माघारीं पाठविलीं आहेत. राजश्री नरसिंगराव घायगुडे पांच सहा हजार फौजेनिशीं पुढें सरकारांतून रवाना केले, मागाहून राजश्री हरीपंत जलद येतात, म्हणोन लिहिलें तें कळलें. नरसिंगराव यांची रवानगी त्वरेनें जाहली असल्यास लौकरच येऊन पोंहोंचतील. चिरंजीव मंडळीसह शत्रूकडे पाडाव गेले हें वर्तमान सरकारांत कळल्यानतर राजश्री हरीपंत सुरापुराकडे जाणार होते तो प्रकार राहिला. मशारनिल्हे याच रोखें येतात असें शिवाजीपंताच्या लिहिण्यांत आहे. परंतु राजश्री हरीपंत सुरापुराकडे गेले असते तर नबाब त्वरेनें निघते, आणि साम-

फौजेचा गाहा गुत्तीच्या सुमारें होता; तेव्हां हैदरखानास मसलत तिकडेच भारी पडती तें ठीक होतें. आम्ही इकडे आलों आहोंच. आणखी पांच सहा हजार फौज मात्र नरसिंगराव यांजबरोबर जलद यावी म्हणजे धारवाडचे मोर्चे उठतील; आणि मग कुमदान बंकापुराशिवाय ठरत नाहीं! हरीपंत नबाबसुद्धां गुत्तीच्या रोखें गेल्यास तिकडे पायबंद जबरदस्त बसल्यानंतर सारें ताड तेथेंच पडेल. इकडे रान मोकळें पडल्यानंतर तालुक्यांत अंमलही बसेल असें आहे. यास आम्ही येविशींचा मजकूर पुरंधरास लिहिला आहे, परंतु घडतां कोणतें घडतें पहावें! इकडे काम तूर्त धारवाडचे मोर्चे मात्र उठवावयाचें जरूर आहे. मोर्चे उठल्यानंतर मग विशेष काम दिसत नाहीं. हरीपंत इकडेच आल्यास सारें लढाईचें तोंड बंकापूरच्या आसपासच पडेल. आणि हरीपंतांचें जाणें तिकडे न जाहल्यास दिवसगत लागेल असें वाटतें. शत्रु शेर जाहला, त्यानें यश मातबर मिळविलें, याजमुळें हावभरी होऊन धारवाडास मोर्चे दिले. आज तीन दिवस जाहले. किल्ल्यांतील पत्र अद्याप आलें नाहीं. तस्मात् चौक्यांची बंदोबस्ती चांगली आहे याजमुळें पत्र येऊन पावत नाहीं. दोडवाड वगैरे जागांचीं पत्रें मोर्चे बसल्याचीं आलीं. तोफा उडतात त्या ऐकावयास येतात. अशांत नरसिंगराव धायगुडे जलद आल्यास ठीक आहे. मशारनिल्हेस पत्र लिहिलें आहे. त्यांजकडे जलदीनें रवाना करावें. दोन चार मजली नेमानें आले असल्यास मग दिवसगत लागणार नाहीं. त्वरितच येतील. येथून धारवाड बारा चवदा कोस. आम्ही समीप असतां मागील फौजेची वाट पहात बसावें हेंही ठीक नाहीं. किल्यांत दारूगोळा वगैरे सरंजाम बराच आहे. लोकही पंचरूढ आहेत. रा॥ वासुदेव दादाजी व शिदोजी जगताप हे उभयतां सख्यत्वें मर्द माणूस आहेत. एकाएकीं गडबडणार नाहींत. परंतु नकळे,

श. १६९८ **सावशीची लढाई** इ. स. १७७७

यास्तव आज रात्रीं मुहूर्त आहे, बुनगें सर्व तेथेंच येऊन सडे होऊन दोडवाडचे सुमारें जातों. दोडवाडाहून धारवाड पांच कोस राहतें. उगेच जाऊन तालामाला पाहोन येतों. एवढ्यानें अंतल्यास अवसान चढेल. उतावळी करित नाहीं. युक्तीनेंच होईल तें करितों. चिंता न करावी. धारवाडास मोर्चे बसल्याचें वृत्त सांडणी स्वाराबरोबर काल पुरंदरास लिहोन पाठविलेंच आहे. सारांश, तूर्त पांच सात हजार फौज आल्यास काम होतें. असो. त्यांचे विचारास येईल तसें करितील! सूचनेस्तव लिहिलें आहे. हल्लीं शिवाजीपंत यांसीं पत्र लिहिलें आहे तें रवाना करावें. चरकड येथील बंदोबस्त खर्चवेंचाचा करितों. फौजेचाही करितों. तुम्ही येथील फिकीर न करणें. रुपयांचा अजमास पाहन लिहितों. तुम्ही बहुत सावध राहणें. सदैव पत्र पाठवीत जाणें. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे तर चिरंजीव मंडळी सुटोन येतील चिंता नाहीं. एक दोन स्थलें जागृत पाहोन सेवा करवावी. कांहीं अनुष्ठानही करवावें. फलदाता ईश्वर आहे! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १९९४. **श्री.** (पौष व. ४–२७ जाने.)

सेवेशीं आपाजी त्रिंबक. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ १७ जिल्हेज. स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं 'येणें' म्हणून आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. आज्ञेस उज्र नाहीं. स्वामीचा मार्ग चातकन्यायें लक्षीत होतों. स्वामीचें येणें झालें ही गोष्ट मोठी झाली. मला बरकडीच्या हाडास धबका लागला याजमुळें बहुत श्रमी आहें. अद्याप उपशम होत नाहीं. उपाय करीत आहें. स्वल्प उपशम होतांच सेवेशीं येतों. श्रीमंत राजश्री तात्या तर शत्रूच्या हातीं सांपडले, श्रीसत्तेस इलाज नाहीं! आतां सर्वांस स्वामीशिवाय आधार नाहीं. स्वामींचें येणें झालें म्हणजे या फौजेंत

---

१ पत्र परशुरामभाऊस.

आळा बसेल. एरवीं बाकी नव्हती ! धारवाडास शत्रु बसला तर बुनगें बारीअलीकडेच टाकून सडे होणें, तरी पक्क्या विचारें व्हावें. शत्रु फारू शेर झाला आहे. सर्व सुज्ञ आपण. येविशीं विनंति लिहावी अशी नाहीं. सेवशीं विदित होय, हे विज्ञापना.

नं. १९९५. **श्री.** (पौष व० ४–२७ जाने०)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जिवाजीपंत स्वामीचे सेवंशीं.

पोष्य आपाजी त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ १७ जिल्हेज. वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मी पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लिहिला मजकूर कळला. कागदाच्या गडद्या पाठवाव्या ह्मणून राजश्री हवालदारांस पत्र पाठविलें तें प्रविष्ट केल. त्यांनीं बिगारीचीं माणसें देऊन गडुया रवाना केल्या आहेत. येऊन पावतील. तोफांची मारगिरी येथें ऐकूं येती ती धारवाडची किंवा शत्रूची हें कळत नाहीं. तें लिहावें. अद्याप आमची बरकडींतील तिडीक बरी जाहली नाहीं. उपशम होतांच निघून येतों. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

नं. १९९६. **श्री.** (पौष व० ४–२७ जानेवारी.)

सेवंशीं शिवाजी बाबाजी. विज्ञापना ता॥ छ १७ जिल्हेज भौमवासरे मुक्काम पुणें स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ १० जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं काल दोन पावेन लिहिला मजकूव कळला. राजश्री बाजीराव बर्वे यांचें पत्रावरून कळलें. वाईटांत बरें, जखमी शत्रूच्या हस्तगत जाहले ते सुटतील हा भरंवसा आहे. श्रीमंतांचें दैव विचित्र आहे. सुटतील. चिंता नाहीं. श्रीमंत कोन्हेरराव स्वामिकार्यावर खर्च जाहले. त्यांणीं आपला[1]

---

[1] पत्र गंगाधरराव गोविंद यांस.

लौकिक करून कैलासवास केला; परंतु सर्वांस दुःखाचे पर्वत जाहले ! त्यांचें स्त्रीचें घरच बुडालें ! होणारास इलाज नाहीं. श्रीमंत राजश्री भाऊंचींही पत्रें आलीं होतीं. बर्वे यांच्या पत्रावरून सविस्तर कळलें. .....भिंडयाचे घरीं पत्र दाखविलें. पुरंदरास नकल करून पाठविली. राजश्री हरीपंत तात्यांस पत्र दाखविलें. आह्मी पुरंदरास असतांच वर्तमान आलें त्याजवरून नबाब निजाम अल्लीखान यांस पत्रें पाठविलीं कीं " सुरापुराकडील मजकूर राहिला. आपण कृष्णातीरास यावें. राजश्री हरीपंत तात्या धारवाडच्या रोखें जातात तों आपण लांब लांब मजली करून यावें. " येणेंप्रमाणें पत्रें पाठविलीं. होळकर व शिंदे यांस हरिपंतांसमागमें द्यावें म्हणोन विनंती केली. उभयतांच्या खातरेस आलें आहे. त्यांस सत्वर येण्याविशीं पत्रें पाठविलीं आहेत. होळकर सिंहगडाखालीं होते ते रिकामे जाहले. परंतु होळकराची फौज हिंदुस्थानांत होती त्यास जाटांनीं कांहीं बुनगें त्यांचें लुटलें. ते भारी, हे थोडके, याजकरितां ते माघारे फिरोन आले. याजकरितां होळकर हिंदुस्थानांत जावयासी निरोप मागतात. श्रीमंत राजश्री नाना मेणवलीस ग्रहणास गेले तें अद्यापि आले नाहींत. राजश्री हरीपंत तात्यांस त्वरेनें निघण्याविशीं चिठ्या पाठविल्या. आम्ही चतुर्दशीस निघोन राजश्री हरीपंत तात्यांकडे आलों. सांगावयाचे रीतीनें सांगितलें, व त्यांसही काळजी मोठीच आहे. परंतु ऐवज नाहीं, लोकांचें देणें, याजकरितां इलाज नाहीं. तत्राप तोडजोड करावयास चुकत नाहींत. आम्ही आल्यावरी फारच निकड केली त्याजवरून राजश्री नरसिंगराव धायगुडे व सटवाजी भोंसले, मानाजी फांकडे व विसाजीपंत आठवले यांजबरोबर हुजरातचीं पथकें, येणेंप्रमाणें पांच सहा हजार फौज तयार जाहली. काल मुहूर्तेंकरून गोटाबाहेर निघाले. आज कूच

---

१ हें पत्र टिंचें दिलेल्या ठिकाणीं फाटलेलें आहे.

करून पुढें मजल दरमजल येत आहेत. चार रोजांत राजश्री हरी-पंत तात्या निघतात. गुंता नाहीं. यांचें कूच जाहलें म्हणजे आम्ही भिवंडीस येतों. उभयतांस विनंती करून उभयतां सरदारांस रवाना करावें ही तरतूद करून पाहतों. मोडाची फौज आली त्यास आधार श्रीमंत राा भाऊ गेले आहेत ही मोठीच गोष्ट जाहली. इकडून फौज जाऊन लौकरच पोंहोंचवावी असी तरतूद केली आहे. पुढें फौजा रवाना होतात.....वा राजश्री हरीपंत तात्यांचें येणें तेही महादेव उजवा टाकून मिरज प्रांत फार करून उजवा टाकून जावें येणेंप्रमाणें ठराव. राजश्री नरसिंगराव बाबा पुढें जातात त्यास सांगितलें. मागाहून राजश्री हरीपंत तात्या जाणार त्यांसीं जावयाच्या मार्गाचा निश्चय केला. गुंता नाहीं. हैदरखानाकडील सामान वरचेवरी येत आहे, टिपूही येणार, म्हणोन लिहिलें; त्यास अस्मानी फत्ते त्याची जाहली! मागाहून सामान यावें. श्रीकृपेंकरून इकडील .....

..... एक वेळ भलती सलती गफलत होत असते, वारंवार होत नाहीं! त्वरेविशीं जितका आमचा यत्न आहे त्यास चुकत नाहीं. अतःपर विलंबही नाहीं ... नबाबाकडे पत्रें वारंवार पाठविलीं आहेत. ते ..... आले. अतःपर जलदीनें कृष्णेवर येतील. अलीकडील प्रकार दर्शविला, त्यास भरणा बेंगरूळाकडे जावा तेव्हां त्याजकडील राजकारण बनावें; तो प्रकार लांबच आहे. राजश्री बाजीराव बर्वे यांचे पत्राची नक्कल पाहिली. पतांतील मजकुराप्रमाणें केलें अ-ल्यास मोठीच गोष्ट आहे! कोणीही आपला असावा! सोडावयाचा प्रकार त्यांणीं लिहिला आहे परंतु तो केवळ त्यांचें ऐकेल असें नाहीं! तत्राप दैवाची गत नकळे! असें जाहल्यास श्रीमंतांचें पुण्य, वडि-लांचा आशीर्वाद! श्रीमंत राजश्री तात्यांनीं एकनिष्ठपणें सेवा केली

---

१ सखारामबापू व नानाफडनवीस यांस. २ शिंदेहोळकरांस.

त्याचें सार्थक हेंच. परंतु हैदर मात्रागमनी आहे याजकरितां भरंवसा नाहीं. सारांश, तूर्त बर्वे यांणीं बरदास्त केली हीच मोठी गोष्ट आहे. नारोपंत वझे यांचें ठिकाण नाहीं म्हणोन श्रीमंत राजश्री भाऊनीं लिहिलें होतें त्यास ठिकाण लाग ं किंवा नाहीं ? पाडाव गेले त्यांत आहेत किंवा बुनग्यांत आले ? शे लागला असेल. श्रीमंत राजश्री तात्यांनीं युद्धाचा प्रसंग पाहिला तां मोठी शर्त केली ! युद्धाचा लौकिक चांगला जाहला. यशअपे॰ ईश्वराधीन आहे. आपण हिंमत धरून जिकडे तिकडे लिहितां ही गोष्ट फार उत्तम आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणराज.

नं. १९९७. (पौष व. ४–२७ जाने.)

चिरंजीव राजश्री जिवाजी रामचंद्र यांसी प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरि. येथील कुशल तागायत छ १७ जिल्हेज. भौमवार जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्ही छ १४ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. तीर्थस्वरूप राजश्री भाऊ चतुर्थीस आले म्हणून लिहिलें तें कळलें. उत्तम गोष्ट जाहली. तीर्थस्वरूपांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीत जाणें. धारवाडास शत्रूची फौज येऊन उतरली आहे म्हणून लिहिलें तें कळलें. पुरंदराहून फौजा रवाना जाहल्या. लवकरच येऊन पोंचतील. धारवाडची फौज उठोन जाईल. चिंता नाहीं. अंबारी व थोरला डेरा कचेरीचा ठेऊन बाकी आटाळा तीर्थस्वरूप राजश्री भाऊंनीं आणवावयासी सांगितला त्याजकरून यादवाडाहून आणविला म्हणून लिहिलें. उत्तम केलें. बर्व्याचें उत्तर दिल्याचा मजकूर लिहिला तो कळला. विनोबा शिदोरे यांसी बरें वाटत नाहीं. सबब

यादवाडास पाठविलें ह्मणून लिहिलें तें कळलें. वरकड सविस्तर तीर्थस्वरूप राजश्री भाऊंस लिहिलें आहे. त्यावरून कळेल. तीर्थस्वरूप राजश्री भाऊंस आमचे डेरेस येऊन रहावें ह्मणोन लिहिलें आहे. वडिलांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. बारीक मोठें वर्तमान लिहीत जावें. आमचे डेरेस येऊन रहावें म्हणून तुह्मी विनंती करावी. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

१ पटवर्धनांपैकीं आह्मी मिरजकर मुख्य सरदार. आमचे डेऱ्यांत-ज्या डेऱ्यांत गोपाळराव, वामनराव व पांडुरंगराव स्वारींत असतां आजपर्यंत रहात आले त्या डेऱ्यांत तुम्ही आमचे तर्फे मुख्य सरदार ह्मणन रहात जावें.

परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली.

स. १७७७ जानेवारीपासून मार्चअखेरपर्यंत.

कोल्हापूरच्या मोहिमेचें काम तसेंच टाकून परशुरामभाऊ सावशीच्या लढाईंत दाणादाण झाल्यामुळें पळून आलेल्या हतवीर्य व निरुत्साह अशा फौजेचें आधिपत्य पतकरण्याकरितां मनोळीकडे कूच करून गेल्याचें मागें लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें ते ता० २२ जानेवारीस मनोळी येथें लष्करांत येऊन दाखल झाले. तैं ठाणें सदाशिव कृष्ण मनोळीकर यांजकडे होतें तें तोफा व बुनगें ठेवण्याकरितां आपल्या ताब्यांत घेऊन ते प्राप्त झालेल्या पुढील मोहिमेच्या उद्योगास लागले.

हा उद्योग मोठा संकटाचा होता. सावशीच्या लढाईंतून पळून आलेली व भाऊंनीं कोल्हापूरच्या मोहिमेंतून आपणाबरोबर आणिलेली मिळून एकंदर आठपासून दहा हजारपर्यंत फौज मनोळीस जमली होती. पण दोन हजार लोकांस सुद्धां चार महिनेपर्यंत रोजमुरा देण्यास भाऊंजवळ पैका नव्हता. यामुळें आपल्याच मुलखांतून दाणावैरण लुटून आणून खाण्याचा क्रम या फौजेनें पहिल्याच दिवसापासून सुरू केला ! अशी फौज बरोबर घेऊन महमदअल्ली कुमदानाशीं गांठ घालावी तर निकाल काय होईल हें आगाऊ ठरल्यासारखेंच होतें ! कुमदानाच्या सैन्यांत घोडेस्वारांची संख्या जवळजवळ भाऊंच्या इतकीच असून कवाइती पायदळ आठ हजार व दहा बारा तोफा होत्या. शिवाय नुकताच जय मिळाल्यामुळें तें सैन्य ताजेंतवानें व हुशार होतें. अशा त्या सैन्यापुढें पूर्वी मोड झाल्यामुळें दहशत खाणारी तीं भाऊंची मराठी फौज कसची टिकते ! तेव्हां आपण

होऊन शत्रूशीं लढाई करण्याची त्यांची सोय नव्हती व तो तर दिवसेंदिवस शेर होत चालला होता. त्यामुळें कसेंही करून त्याचा प्रतिरोध करणें अत्यंत अवश्यक झालें होतें. ज्या दिवशीं परशुराम-भाऊ मनोळीस लष्करांत दाखल झाले त्याच दिवशीं कुमदानानें धार-वाडास वेढा बसवून तोफांची मारगिरी सुरू केली होती. हा वेढा उठविणें हें भाऊंचें पहिलें काम होतें.

मनोळीपासून धारवाड चवदा कोस आहे. मनोळीजवळच डोंगराळ प्रदेशाचा एक पट्टा असून त्यांत त्या काळीं किर्रं दाट झाडी होती. त्यांतून धारवाडाकडे जाण्याचा रस्ता होता. त्याला मनोळीची बारी हें नांव होतें, ही बारी म्हणजे त्या काळचीं सैन्यें धारवाडाकडे जाण्याचा राजरस्ता होता. मनोळी तालुक्यांतच या जंगलांतून येण्याजाण्याच्या आणखी वाटा होत्या, त्या विशेष सोईच्या नसल्यामुळें मनोळीची बारी हाच मुख्य मार्ग होता. बारीपलीकडे मुरगोड, हुली, एकोडी, मोरब हीं ठाणीं होतीं, त्यांच्यापलीकडे दोडवाड. दोडवाडाहून धारवाड पांच कोस होतें. हीं सर्व ठाणीं अद्यापि मराठ्यां-च्या ताब्यांत होतीं. हीं सर्व ठाणीं राखावयाचीं, धारवाडचा वेढा उठवावयाचा, आणि कुमदानास बारीअलीकडे येऊं द्यावयाचें नाहीं, हीं तीन कामें तूर्त बारीअलीकडे मनोळीस राहून भाऊंस साधा-वयाचीं होतीं. पुण्याहून हरीपंततात्या थोरली फौज घेऊन येणार होते ते आल्यावर मग बारी ओलांडून कुमदानावर चालून जावयाचें व त्यास मोडून पिटून लावून तुंगभद्रेपर्यंत पुनः अंमल बसवावयाचा, हीं पुढचीं कामें होतीं.

मनोळीस आल्यावर सहावे दिवशीं भाऊंनीं पांच हजार फौज तयार करून सडी स्वारी करण्याच्या उद्देशानें बारीपार पाठविली. तींत रास्ते, अक्कलकोटकर भोंसले व धारवाडचा सुभेदार व मिरजकर पटवर्धन यांचीं पथकें होतीं. या फौजेनें एकोडीस राहून दोडवाड-

पर्यंत तलावा करावा असें ठरलें होतें. असा तलावा करण्यांत समांतर व एकमेकांपासून जवळ अशा निरनिराळ्या वाटांनीं फौज जावंयाची असल्यामुळें दहा दहा कोस लांबीरुंदीचा प्रदेश व्यापावयास सांपडून दाणावैरणीकरितां शत्रूच्या किरकोळ टोळ्या हिंडत असतील त्यांचा फन्ना पाडितां येतो, शत्रूच्या हालचालींची बातमी समजते, त्यांवर वचक राहतो, व लुटीवर पोटही भरितां येतें. त्याप्रमाणें ती फौज तलावा करूं लागली तेव्हां शत्रूची एक लहानशी टोळी दुसऱ्याच दिवशीं तिच्या तावडींत सांपडली व तिचीं चाळीस पन्नास तट्टें तिनें हिरावून घेतलीं. या सडया फौजेच्या मदतीस परशुरामभाऊ बारीपलीकडून दररोज तीन चार हजार पेंढारी पाठवूं लागले. याप्रमाणें मराठी फौजेची दौड कुमदानाच्या तळापासून तीन चार कोसांवर दररोज येऊं लागली तेव्हां.तो धारवाडचा वेढा उठवून हुबळीस जाऊन राहिला. याचें कारण उघडच आहे. धारवाडसारख्या मातबर किल्ल्यास भाऊंची फौज समीप असतां वेढा बसवावयाचा तर कुमदानाजवळ एक मोर्चेबंदीस, एक तळावर व एक शत्रूच्या तोंडावर अशी तिहेरी फौज असावयास पाहिजे होती. परंतु तितका सेनासमुदाय त्याजवळ नसल्यामुळें व मराठ्यांच्या फौजेचें तोंड आतां आपणाकडे फिरलें आहे, त्या अर्थीं लवकरच लढाई होणार असें वाटल्यामुळें तो कुमदान हुबळीपर्यंत मागें हटून गेला. प्रथम त्यानें तोफा व बुनगें वंकापुरास लावून देखील दिलें होतें. पण कांहीं दिवसांनीं परशुरामभाऊ आपणावर चालून येत नाहींत, अशी खात्री झाल्यावर तोफा व बुनगें माघारें आणून बातेऱ्या बांधून बंदोबस्तानें व सावधपणानें तो हुबळीसच तळ देऊन राहिला.

इकडे परशुरामभाऊ मनोळीसं तळ देऊन राहिले होते, त्यांसही कुमदान सैन्याच्या जय्यत तयारीनिशीं वीस कोसांच्या छटयावर नेहमीं

राहूं लागल्यामुळें फारच सावधपणानें बातमी राखून बंदोबस्तानें रहावें लागे. त्यांच्या लष्करचे पेंढारी बारीपार जाऊन मध्यें दोन तीन मुक्काम करून लक्ष्मेश्वरपर्यंत स्वाऱ्या करून गुरें वळवून आणीत व शत्रूच्या लष्करचे बैदही बारीच्या तोंडापर्यंत स्वाऱ्या करून परत जात. कधीं कधीं पेंढारी व बैद यांची गांठ पडे तेव्हां पेंढारी बैदांस लुटीत. कधीं बैद पेंढाऱ्यांस लुटीत, असेंही घडे! उभय लष्करांपैकीं तीन चार हजार स्वारांच्या टोळ्याही तलावा करीत एकमेकांच्या तळाच्या रोंखें जात येत असत. अशा प्रकारच्या या गनिमी हालचालींमुळें मोहिमेचा सोक्षमोक्ष करणारीं लढाई होऊं नये, पण भाऊनीं बुनगे व तोफा घेऊन बारीपलीकडे जाऊं नये व शत्रूनेंही अलीकडे येऊं नये, दोघांसही एकमेकांची दहशत असल्यामुळें दोघांनींही ठाणीं घेण्याच्या भरीस पडूं नये, अशी स्थिति होणें अपरिहार्य होतें. ही स्थिति जरी तूर्त भाऊंस इष्ट होती तरी ती तशी टिकणें हें त्यांनीं बारीच्या तोंडीं मनोळीस तळ देऊन राहण्यावर अवलंबून होतें. परंतु दोन तीन आठवडे मुक्काम होतांच मनोळी तालुक्यांत वैरणकाडी मिळेनाशी झाली. तळ हालवून दुसरीकडे जावें तर केलेली मेहनत व्यर्थ होऊन बारी शत्रूच्या हातीं लागणार, शिवाय कित्तूर, नवलगुंद व डंबळ येथील देसाई आपल्या भयानें दबून राहिले आहेत ते शत्रूकडे जाणार. अशा स्थितींत भाऊंनीं विचार केला कीं, वैरणीसाठीं येथून तळ हालविणें ज्या अर्थीं प्राप्त झालें आहे त्या अर्थीं मनोळीपासून पांच पंचवीस कोसांच्या अंतरावर दाणावैरणीची सोय पाहून रहावें व कोठें चार रूपये मिळाले तर मिळवावे म्हणजे ते फौजेचा एखादा रोजमुरा देण्यास तरी उपयोगीं पडतील व शत्रूनें बारी ताब्यांत घेण्याचा यत्न केल्यास तत्काळ त्वरेनें परत यावयास सांपडेल. या मसलतींत फक्त कसे तरी महिना पंधरा दिवस काढण्याचीच सोय होती. भाऊंचें मुख्य लक्ष शत्रूच्या हातीं गेलेला मुलूख जिंकून त्यास

तुंगभद्रापार हुसकून लावण्याच्या मसलतीवर होतें. पुण्याहून हरीपंत-तात्यांची फौज आल्याखेरीज ती मसलत कशी तडीस जाणार ? पण पुण्याकडून थोरली फौज येण्याची गोष्ट तर दूरच राहिली; परंतु " कुमदानास वरचेवर शत्रूकडून कुमक पोंचत आहे त्याअर्थी पांच चार हजार स्वार तरी माझ्या कुमकेस तावडतोब पाठविल्याशिवाय शत्रूपुढें अहेंत या स्थितींतसुद्धां माझा टिकाव लागणार नाहीं " म्हणून भाऊंनीं मनोळीहून, व गंगाधररावांनीं मिरजेहून वारंवार जिकिरीचीं पत्रें कार-भाऱ्यांस लिहिलीं आणि त्यांचा वकील शिवाजीपंत म्हैसकर पुरंदरास होता त्यानें सखारामबापू, नाना फडनवीस व हरीपंत फडके यांच्या घरांचे उंबरठे खेपा घाल घालून झिजविले. तरी पुण्याहून अशा आणी-बाणीच्या वेळीं भाऊंकडे पांच स्वार सुद्धां रवाना झाले नाहींत !

गुजराथच्या स्वारींतून जुलई १७७६ त पुण्यास फौजा परत आल्या त्या अद्यापि तेथेंच होत्या व त्यांच्या देण्याचा त्यावेळेपासून राडा पडला होता तो अजूनही तसाच होता. अर्थात् मागच्या देण्याचा कांहीं तरी निकाल झाल्याशिवाय या फौजांपैकीं एक स्वार-सुद्धां परशुरामभाऊंच्या मदतीस अगर अन्यत्र कोठें मुलुखगिरीवर जाण्यास कबूल नव्हता. स्वारांनीं पागे व पथके यांस तगादा लावावा, पाग्यांनीं व पथकांयनीं हरिपंततात्यांच्या दारांत धरणें देऊन त्यांस उपाशीं बसवावें, तात्यांनीं कारभाऱ्यांच्या दारांत गयावया करीत जाऊन बसावें असा क्रम सात महिने चालला होता ! फौजेचें देणें अपरंपार झालें होतें तें वारण्यास कारभारी समर्थ नव्हते. राज्यांतून नेहमीं येणाऱ्या वसुलाचा निम्मे हिस्सा मृगसाल सुरू होतांच तालुक्यांच्या मामलेदारांनीं पदरचा आगाऊ द्यावा, बाकीचा वसूल तीन किंवा चार हप्त्यांनीं द्यावा, ही सर्व रक्कम आगाऊ दिलेल्या पैक्याच्या व्याजासुद्धां साल संपेपर्यंत त्यानीं तालुक्यांतून अजमासाबरहुकूम वसूल करून घ्यावी, असा-

त्या काळीं जमाबंदीचा शिरस्ता होता. 'अजमासा' ची सनद सरकारांतून सालोसाल मामलेदारांस मिळत असे तिलाच हल्लीं बजेट हें नांव आहे. मामलेदारानीं मालाच्या आरंभीं निम्मे रक्कम पदरची आगाऊ द्यावयाची तिला ' रसद ' म्हणत असत. ही रसद ज्येष्ठ महिन्यापासून हातीं येऊं लागतांच पावसाळ्यानंतर जी मोहीम होण्याची ठरली असेल तीकरितां कोणास तीन हजार, कोणास पांच हजार, कोणास दहा हजार, तर कोणास हजार, पांचशें, दोनशें सुद्धां याप्रमाणें स्वार चाकरीस ठेवण्याविषयीं सरकारांतून निरनिराळ्या सरदारांस हुकूम होई व त्या स्वारांस देण्याकरितां नालबंदीची वगैरे रक्कम त्या सरदारांकडे पाठविण्यांत येई. मग ते सरदार शिलेदारांस बोलावून आणून त्यांस सालिना काय तैनात द्यावयाची तें घोडें माणूस पाहून ठरवीत व नालबंदीची (तैनातीपैकीं चवथा अगर तिसरा हिस्सा आगाऊ द्यावयाची ती) रक्कम त्यांच्या पदरीं घालीत. शिवाय मोहिमेस निघण्यापूर्वी ' रवानगी ' व ' कापड ' या सदराखालीं कांहीं रक्कम सरदारांकडून शिलेदारांस मिळत असे. मोहीम सुरू झाल्यावर पुढें स्वारांस रोजमुरे द्यावे लागत व ती संपली झणजे तैनातीपैकीं सर्व बाकी चुकती करावी लागे. त्यासंबंधें सर्व पैका मुलखांतील निरनिराळ्या मामलेदारांकडून सरकारांत हप्ते येत त्यांतून चुकता व्हावयाचा असे. मराठी फौजांची चाकरी नेहमीं आठमाही असे. क्वचित् बारमाही चाकरी शत्रूच्या मुलखांत छावणी झाल्यास मात्र पडे. उदाहरणार्थ, समजूं कीं, कोणा शिलेदारास तीनशें रुपये तैनात ठरली आहे. बहुधा श्रावणाच्या महिन्यांत त्या शिलेदारास नालबंदी मिळे. त्याला मिळावयाच्या रकमा आह्मी उदाहरणाकरितां घेत आहों हें पुनः सांगावयास नको च. समजा कीं त्या शिलेदारास सवाशें रुपये नालबंदी मिळाली. पुनः भाद्रपदांत स्वारीस तयार होण्याविषयीं पत्र आलें तेव्हां रवानगी झणून आणखी दहा रुपये मिळाले. पुनः आश्विनांत दसऱ्याचें कापड ५० आंख अथवा रोख

रु. २५ मिळाले. मिळून १६० रुपये त्यास पोंचले व १४० सरकारांतून देणें राहिलें. नंतर त्याचा सरदार आपलें घर सोडून डेरेदाखल झाला, म्हणजे डेऱ्यांत येऊन राहूं लागला, अशी त्यास बातमी आली. सरदार डेरेदाखल झाला म्हणजे ती मोहीम सुरू झाल्याची व फौज जमा होण्याची खूण होय. लगेच त्या शिलेदारास सरदाराचें पत्र आलें कीं, तुम्ही जलदीनें तयार होऊन अमुक मुक्कामीं लष्करांत दाखल व्हावें. त्याप्रमाणें तो कार्तिक शुद्ध प्रतिपदेस घराहून निघूनं त्याच दिवशीं लष्करांत हजर झाला व त्याच दिवसापासून त्याचा रोजमुरा सुरू झाला. हा रोजमुरा आठवड्याचा चार रुपये ठरला होता. वैशाख-अखेरपर्यंत तो कर्नाटकांत अगर हिंदुस्थानांत मोहिमेवर होता म्हणून त्यास सात महिन्यांत रोजमुरा ११२ रुपये मिळाला. नंतर मोहीम संपल्यामुळें बाकी २८ रुपयांची वरात अगर रोख रुपये त्यास मिळाले व रोजमुरा बंद झाला. याप्रमाणें सरकाराशीं केलेला करार पुरा करून तो घरीं आला. पाऊस सुरू होण्यापूर्वी आपल्या मुलामाणसांत जाऊन रहावें, आपली शेतीभाती व संसाराचीं इतर कामें पहावीं, घोड्यांस विश्रांति देऊन ते ताजेतवाने करावे, इकडे शिलेदारांची फार ओढ असल्यामुळें छावणीस राहण्याचें त्यांच्या जिवावर येई. त्यांस राहून घ्यावयाचें झाल्यास सरदारांनीं सक्ती करून कांहीं उपयोग होत नसे. आर्जवानें कोण राहतील ते राहतील. छावणीस फौज ठेवावयाची गोष्ट निघाली कीं, सरंजामी सरदार शिंदे, होळकर, विंचूरकर, रास्ते, पटवर्धन वगैरे होते त्यांच्या पोटांत धस्स होई. याचें कारण उघड आहे. समजा कीं, दर स्वारास तीनशें रुपयेप्रमाणें हिशेबानें एक हजार स्वार बाळगण्याच्या शर्तीवर कोणास तीन लक्ष रुपयांचा मुलूख जहागीर मिळाला होता. त्याप्रमाणें त्यानें हजार स्वारांसह वैशाखअखेर पर्यंत स्वारींत चाकरी केली. एथपर्यंत ठीक झालें. पण पुढें त्यास छावणीस राहण्याचा हुकूम सरकारांतून झाल्यास त्यानें आपल्या

फौजेस रोजमुरे कोठून द्यावे ? छावणीचा खर्च त्यानें सरंजामाच्या उत्पन्नांतूनच समजून घ्यावयाचा ठराव असल्यामुळें व वर सांगितल्याप्रमाणें वैशाखअखेरपर्यंतच शिलेदार तीनशें रुपये खाऊन गेल्यामुळें पुढचे आश्विनपर्यंतचे रोजमुरे सरदारानें पदरचेच दिले पाहिजेत. शिवाय पावसाळ्यांत कांहीं आसरा करून घेण्यासाठीं पालपडदा पाहिजे त्यास व सणावाराकरितां व भाद्रपदमासीं पक्षाकरितां म्हणून शिलेदारांस कांहीं निराळें द्यावेंच लागे. मिळून दर स्वारास पाऊणशें रुपये प्रमाणें धरिले तरी हजार स्वारांच्या सरदारास निदान पाऊण लाख रुपये छावणीनिमित्त खर्च नाहक पडला ! अशा दोन किंवा तीन छावण्या पडल्या म्हणजे सरदारी लिलांवांसच निघावयाची ! सरकारच्या सांगण्यावरून त्या सरदारानें ठरावापेक्षां अधिक फौज चाकरीस ठेविली असली तर त्याची फजिती पुसूंच नये ! राज्यांत चोहोंकडे शांतता असली तरी देखील फौज छावणीस ठेवणें फार कठिण. मग सर्वत्र बंडाळी सुरू झाल्यामुळें कोठूनच वसूल येईनासा झाल्यावर स्थिति काय विचारावयाची आहे ? महादजी शिंद्यांनीं हिंदुस्थानांत दहा हजार फौजेनिशीं छावणी केली अगर परशुरामभाऊ पांच हजार फौजेसह कर्नाटकांत छावणीस राहिले असें कोठें लिहिलें असेल तर त्याचा अर्थ काय, त्यांत अडचणी किती, हें आतां वाचकांस चांगलें समजेल !

गुजराथच्या स्वारींतून ज्येष्ठ वद्यांत फौजा देशीं आल्या, त्यापैकीं सरंजामी फौज पटवर्धन वगैरेंची होती ती घरोघर निघून आली. तिची व तिच्या सरदारांची देण्याघेण्यासंबंधें काय लायाळी सुरू असेल ती असो. पण हुजरातीची फौज हरिपंततात्यांबरोबर पुण्यास आली ती कांहीं केल्या आपल्या देण्याचा निकाल करून घेतल्याखेरीज घरोघर जाईना. तिची अवस्था फारच कठिण होती. त्या हुजरातींत घाटगे, घोरपडे, भोंसले, निंबाळकर, पाटणकर, दरेकर, थोरात वगैरे छत्रपतींचे वेळचे अनेक मानकरी जुने सरदार होते, त्यांस

श. १६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

लहान लहान सरंजाम पंचवीस पन्नास स्वारांपासून दोनशें तीनशें, पांचशें, सातशें, स्वारांच्या बेगमीपुरते दिलेले होते व हे सर्व सरंजाम बंडाळीनें गेलीं तीन वर्षें गांजून गेलेल्या महाराष्ट्र देशांत होते. अर्थात् फौजेच्या खर्चापुरतें उत्पन्न सरंजामांतून त्यांस मिळत नव्हतें. त्यांत कारभाऱ्यांच्या प्रोत्साहनावरून व ईर्षेनें व अभिमानानें आपलें महत्व व लौकिक वाढविण्यासाठीं या सर्व सरदारांनीं नेहमींच्या करा. पेक्षां दीडपट दुप्पट तिप्पट सुद्धां फौज बाळगलेली होती. त्यांत त्यांस स० १७७४ व १७७५ सालीं एकामागून एक अशा दोन छावण्या पडल्या होत्या, तेव्हां त्यांचे हाल काय विचारावे ? कोणाच्या फौजेस दोन नालबंद्यांपैकीं एकच अर्धीमुर्धी पोंचलेली, कोणाच्या फौजेस सालाच्या ४८ रोजमुऱ्यांपैकीं दहावीसच पोंचलेले, कोणाचीं सरंजामाचीं खेडीं तर कोणाचीं घोडीं व चीजवस्तसुद्धां गहाण पडलेलीं; अशी त्या सर्व सरदारांची दुर्दशा होती. त्या सर्व सरदारांस व त्यांच्या फौजेस कारभारी म्हणू लागले कीं, तुमचें मागचें देणें देण्यास आह्मांजवळ पैका नाहीं. याकरितां तो सवडीप्रमाणें पुढें देऊं. तूर्त यंदाची म्हणजे सब्बा सबैन सालची नालबंदी देतों. पुढें वसूल जसजसा हातास येईल तसे रोजमुरेही देऊं. पावसाळा संपल्यावर तुम्ही हरीपंततात्यांबरोबर कर्नाटकचे स्वारीस जावें. परंतु फौजेनें त्यांस साफ सांगितलें कीं, आर्बा, खमस व शीत या तीन सालांतले आमचे रोजमुरे तुम्हांकडे थकले आहेत ते सर्व द्यावे, खमस व शीत दोन्ही सालांची नालबंदी ज्यांस ज्यांस मिळाली नाहीं त्यांची त्यांस द्यावी. त्याशिवाय आम्ही येथून हालत नाहीं ! कारभारी व हरीपंत यांच्या कानीं कपाळीं ओरडत बसावें व दाणावैरणीसाठीं पुणें प्रांताचीं खेडीं लुटावीं, एवढेंच काम या फौजेनें त्या चातुर्मास्यांत केलें तोतयाशीं लढण्यास या फौजेचा उपयोग झाला नाहीं. शेवटीं पावसाळा संपल्यावर सावशीची लढाई झाल्यामुळें कर्नाटकांत फौजा पाठविणें फार जरूर पडलें,

श. १६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

पूर्वसंकेताप्रमाणें स्वारीस निघण्याविषयीं निजामअल्लीचा तगादा लागला, आणि मनोळीहून परशुरामभाऊंनीं कुमक पाठविण्याविषयीं वारंवार निकडीचीं पत्रें पाठविण्याची पराकाष्ठा केली, तेव्हां कारभाऱ्यांनीं फौजेच्या देण्याचा एकंदर हिशेब केला तों पन्नास लक्ष रुपये देणें निघालें ! आणि तें द्यावयास त्या वेळीं त्यांजजवळ सारे सात लक्ष रुपये होते ! तत्रापि त्यांनीं ज्यांचें देणें अगदीं थोडें थोडें होतें अशा पांच हजार स्वारांची निवड करून त्यांचा पैका देऊन त्यांस विसाजी आपाजी आठवले नांवाच्या सरदाराबरोबर परशुरामभाऊंकडे रवाना केलें. परंतु ही सुद्धां फौज भाऊंकडे पोंचली नाहीं. ती मिरजेच्या सुमारें जाते तों कोल्हापूरच्या मोहिमेवर रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा गुंतले होते त्यांस जाऊन मिळण्याविषयीं त्या फौजेस पुरंदराहून हुकूम गेला. मालोजी घोरपडे, मानाजी फांकडे व नरसिंगराव धायगुडे यांसही परशुरामभाऊंकडे पाठविण्याचें ठरलें होतें व त्याप्रमाणें धायगुडयांनीं तीन चार मजली कूचही केलें होतें. परंतु या सरदारांस कारभाऱ्यांच्या आशीर्वादाप्रमाणें द्रव्यदर्शन न झाल्यामुळें त्यांनींही पुढें पाऊल टाकण्याचें नाकारिलें ! मिळून एवढें महाराष्ट्र पाठीशीं असतां परशुरामभाऊंवर प्रसंग गुदरला तेव्हां त्यांस पुणें दरबाराकडून काडीचीही मदत झाली नाहीं !

फौजेचा तर आपला सर्व पैका वसूल केल्याखेरीज न हालण्याचा आग्रह, आणि तो पैका तर कोठून हातीं येण्याचा मार्ग दिसेना ! मग सावकारास जेरीस आणून तोड करून घेण्याच्या मार्गास आणण्याकरितां मुरदाड कुळ ज्याप्रमाणें ओढ धरितें त्याप्रमाणें कारभाऱ्यांनीं निरुपाय होऊन शिस्त धरिली ! त्यांनीं फौजेजवळ बोलणें घातलें कीं, आर्ब्यांचे रोजमुरे व खमसची नालबंदी व रोजमुरे मिळून एकंदर ऐवज होईल त्याचा निम्मा भाग तूर्त देतों. निम्मा राहिला तो दोन महिन्यांनीं देऊं. सन शीतची नालबंदी तुमची देणें ती तुह्मी

आह्मांस माफ करावी ! फौजेचें उत्तर कीं, शीतची नालबंदी आम्हांस अजीबाद माफ करवत नाहीं. ती पुढें तुह्मास मिळेल तेव्हां द्या. पण बाकीचा पैका तरी सर्व एका रकमेनें रोख द्या ! यावर कारभारी महिना दोन महिने कांहींच बोलेनात ! शेवटीं त्यांपासून कांहींच अधिक निघत नाहींसें पाहून फौजेंतले लोक चरफडत त्यांच्या म्हणण्यास कबूल झाले आणि त्यांस बरोबर घेऊन हरिपंत तात्या फाल्गुनांत स्वारीस निघाले ! हा झाला मागच्या देण्याचा नमुना. त्यांची चालू सालची बेगमी म्हटली तर अर्धीमुर्धी नालबंदी व एक दोन महिन्यापुरते रोजमुरे एवढीच कारभाऱ्यांनीं केली होती ! असली फौज काय मुलखगिरी करणार हें दिसतच आहे !

जानेवारींत कोल्हापूरच्या मोहिमेवर रामचंद्र गणेश व बाजीपंत यांस ठेवून परशुरामभाऊ घाईघाईने मनोळीकडे कूच करून गेल्याचें मागें लिहिलेंच आहे. येसाजी शिंदे त्यांच्या जाण्याची वाटच पहात होते. भाऊ जातांच शिंद्यांनीं मिरज प्रांताचे गांव मारण्याचा सपाटा लाविला. रामचंद्रपंत व बाजीपंत यांची फौज शिंद्याइतकीच सुमारें चार पांच हजार होती. दोन्ही फौजा सारख्याच असून एकमेकांस वचकत असल्यामुळें एकमेकांवर चालून जाण्यास समर्थ नव्हत्या. रामचंद्र गणेश बत्तीसशिराळ्याकडे गेलेसें पाहून येसाजी शिंद्यांनीं मिरजप्रांतांत लुटालूट व जाळपोळ सुरू केली. ते मिरजेकडे आले तों शिंद्यानीं ती बाजू सोडून वारणेपलीकडचे गांव जाळण्याची सुरुवात केली ! हैदरअल्लीनें करवीरकरांस द्रव्य देऊन ही पुंडाई करण्यास त्यांस चिथावून दिलें होतें. करवीरकरांस हैदरानें तीन लक्ष होन दिल्याची त्या वेळीं परशुरामभाऊंच्या लष्करांत वदंता होती त्या अर्थी यापैकीं बरीच मोठी रक्कम त्यानें त्यांस दिली असावी हें स्पष्ट आहे. फौज जमा करून पेशव्यांच्या मुलखांत धामधूम करण्यांत हैदराकडून मिळालेल्या रकमेचा व्यय येसाजी शिंद्यांस करावयाचा होता. व त्यास

अनुसरून त्यांनीं मुधोळचे शंकराजी घोरपडे व हणमंतराव व नाईकजी घाटगे बुधकर व अकलूजकर निंबाळकर यांशीं आपणास सामील होण्याविषयीं बोलणें लाविलें. त्याप्रमाणें घोरपडे व घाटगे हजार दोन हजार स्वारांसह करवीरास आले. घोरपडे व घाटगे यांचें साहाय्य मिळाल्यामुळें आतां येसाजी शिंदे रामचंद्र गणेशावर चाल करितील असा अंदाज करून कारभाऱ्यांनीं विसाजीपंत आठवले पांच हजार फौजेसह परशुरामभाऊकडे जात होता त्यास तिकडे न जातां रामचंद्र गणेश यांस जाऊन मिळण्याविषयीं हुकूम केला. त्याप्रमाणें तो तत्काळ तिकडे जातांच रामचंद्र गणेश याजवळ करवीरकरांशीं लढाई करण्यापुरती फौज जमली. परंतु ही लढाई या वेळीं झाली नाहीं. कारण ज्या शर्तीवर शंकराजी घोरपडे कुमक करण्यास तयार होता त्या शर्ती येसाजी शिंद्यास मान्य होईनात. शिवाय कारभाऱ्यांनीं मालोजी घोरपडयाच्या द्वारें शंकराजीस पेशवे सरकारांत सातशें स्वारांनिशीं चाकरीस ठेवण्याचा करार केला यामुळें तो करवीरकरांस सोडून निघून गेला. रामचंद्र गणेश याच्या फौजेच्या दहशतीमुळें यापुढें करवीरकरांनीं पेशव्यांच्या मुलखांत आवाडाव करण्याचें सोडिलें, पण आतां ही पेशव्यांची फौजच घांसदाण्याकरितां मिरज प्रांतास उपद्रव देऊं लागली !

परशुरामभाऊ मनोळीस व कुमदान हुबळीस तळ देऊन राहिले होते. त्यांच्या एकमेकांविरुद्ध हालचाली कशा चालल्या होत्या हें मागें दाखविलेंच आहे. त्या हालचालींत आतां अकस्मात् विशेष गरमपणा दिसूं लागला. कुमदानाच्या मनांत मनोळीची बारी ताब्यांत घेण्याचें होतें व त्यासाठीं भाऊंवर चालून गेल्यास ते मनोळी सोडून मागें सरतात कीं नाहीं हें तो पाहणार होता. त्यासाठीं त्यानें हैदराजवळ आणखी तीन चार हजार लोकांची कुमकही मागितली होती.

ती कुमक येऊन पोंचल्यावर त्यानें पुढें पाऊल टाकण्याच्या फार सावधपणानें उपक्रम सुरू केला, प्रथम त्यानें चार हजार स्वारांची टोळी बारीअलीकडे स्वाऱ्या घालण्याकरितां पाठविली. ती फौज मोरबेच्या ठाण्याचा आसरा धरून सौंदत्तीपावेतों स्वारीस येऊं लागली व मराठ्यांच्या कहीस दगा करावा म्हणून टपून बसूं लागली. ती बातमी परशुरामभाऊंस कळतांच ते मनोळीचा तळ उठवून सौंदत्तीस गेले, आणि तेथून दररोज बारीपार उतरून एकोडीपर्यंत तलावा करूं लागले. बारीपलीकडे दाणावैरणीची सुबत्ता होती. गांवोगांवच्या शिवारांत रबीचें पीक चांगलें होतें तें चारून आपल्या फौजेचीं घोडीं ताजींतवानीं करावीं असें भाऊंच्या मनांत आलें. शत्रूची आपण काडीमात्र पर्वा करीत नाहीं हेंही त्यांस दाखवावयाचें होतें. यासाठीं बुनग्यांसुद्धा सर्व लष्कर त्यांनीं बारीपार नेलें. हा त्यांच्या हातून अविचारच झाला. कारण कुमदानानें पिटून लाविल्यामुळें बुनगे वगैरे सर्व लटांबर बारीअलीकडे त्यांस पुनः आणावें लागलें. तो प्रकार असा;—त्यांच्या फौजेच्या टोळ्या बारीपार चौंहोंकडे हिंडूं लागतांच कुमदानानें आपल्या फौजेच्या टोळ्या परत बोलाविल्या इतकेंच नव्हे, तर तो हुबळीहून कूच करून बंकापुरच्या रोखानें दहा बारा कोस माघाराही सरकला! पण ही त्याची फक्त हूल होती. परशुरामभाऊंस आपण दूर गेलोंसें दाखवावें म्हणजे ते बेसावध राहतील. मग रात्रीं अकस्मात् येऊन त्यांवर छापा घालावा, अशी त्याची मसलत होती. त्याप्रमाणें उगरगोळ येथें भाऊंचें लष्कर उतरलें असतां तो दहा बारा हजार कवाइती पायदळ व सात हजार स्वार व तोफा घेऊन फाल्गुन शु० ११ रोजीं छापा घालावयास आला. चंद्रास्त होण्याच्या सुमारास त्याची स्वारी समीप येऊन ठेपली. पण भाऊ नेहमीं सावधपणानें

वागत व शत्रूची बातमी चांगली राखीत. यामुळें छापा येत अस-ल्याची बातमी त्यांस आगाऊ कळली होती. लष्कराभोंवतीं छबिने म्हणजे पहारा करणाऱ्या स्वारांच्या टोळ्या होत्या त्यांस शत्रूची चाहूल कळण्यापूर्वीच तो कोसावर येऊन पोंचल्याची बातमी सांगत त्या-च्याच लष्करांतून एक बैद आला ! भाऊंनीं तत्काळ फौज तयार करून लढाईच्या तयारीनें अघाडीस उभें राहून बुनगें वगैरे सर्व लटां-बर बारीपार लावून दिलें. बुनग्यापैकीं ज्याला त्याला आधीं पार होण्याची घाई, यामुळें बारीच्या तोंडीं दाटी होऊन कोणाकोणाचीं तट्टें गफलतींमें गेलीं. बाकी सर्व बुनगें सुरक्षितपणें माघारें मनोळीस आलें. मागून सर्व फौजेनिशीं भाऊही आले. उगरगोळाहून निघतां निघतां त्यांची व शत्रूची थोडी चकमक उडाली. त्यांत त्यांचे दहा पांच लोक जायां जखमी झाले तेवढेच. बाकी फौज बुनग्यासुद्धां सुरक्षितपणें परत आली. भाऊ मनोळीस पूर्वीच्या तळा-वर राहिले आणि कुमदान उगरगोळास राहिला. उजाडल्यावर त्यानें बारीच्या पायथ्यास हुली म्हणून ठाणें आहे तें घेण्यास फौज पाठ-विली. तिनें हल्ला करून पेठ व गढी घेतली व किल्लयास तोफा लाविल्या. तों बारीपलीकडून भाऊंनीं कुमक पाठविली ती येतांच शत्रु पळून गेले. कुमदानानें आपणास बारीखालीं बुनग्यासुद्धां राहूं दिलें नाहीं तर आपणही त्याम तेथें राहूं द्यावयाचें नाहीं असा निश्चय करून त्या दिवशीं भाऊ फौजेसुद्धां बारीपलीकडे येऊन पांच कोस तलावा करून गेले. असे हे दररोज येऊन आपणाभोंवतीं घिरट्या घालून आपला कोंडमारा करणार असें पाहून दुसरेच दिवशीं कुमदान उगरगोळाहून परत हुबळ्ळीस गेला !

आज दोन अडीच महिने भाऊंनीं मनोळीस कसेबसे दिवस काढिले. ते तेथें राहिल्यानें पुष्कळ कामगिरी झाली. आजच कांहीं

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स.१७७७

हैदराचें राज्य झालें नाहीं, त्याशीं झुजण्यास अजून पेशवे सरकारची फौज समीपच आहे, हें धारवाड प्रांतींच्या रयतेस कळून चुकल्यामुळें त्या सरकारच्या सामर्थ्याविषयीं तिच्या मनांत थोडीशी आदरबुद्धि राहिली, तिकडचे कित्तूरकर, नवलगुंदकर वगैरे बलाढ्य देसाई शत्रूकडे जाण्यास तयार झाले होते ते वचकून जागच्या जागीं राहिले, धारवाडचें संरक्षण झालें, आणि मनोळीची बारी मराठ्यांच्या हातीं राहिली. परंतु यापुढें भाऊंचें मनोळीस राहणें केवळ अशक्य झालें. मनोळी तालुक्यांतली दाणावैरण संपली होती तरी ती दररोज बारीपलीकडून आणून निर्वाह चालविण्यास ते कबूल होते. परंतु रोजमुरा देण्यासाठीं फौजेंतील लोकांचे दंगे होऊं लागले व धरणीं बमूं लागलीं तेव्हां कोठून तरी चार रूपये मिळवून आणून त्यांच्या तोंडावर टाकल्याखेरीज गत्यंतर राहिलेंच नाहीं. स्वारींत आनंदराव रास्ते होते त्यांचें बरेच दिवस भाऊंजवळ बोलणें पडलें होतें कीं, आमचे तालुक्यांत शत्रूच्या चियावणीवरून जालेहाळकर वगैरे देसाई पुंडावा करून ठाणीं बळकावून बसले आहेत त्यांस वठणीस आणून त्यांपासून जबर दंड घ्यावे व ठाणीं आमच्या हवालीं करावीं. यांत तुमचें काम होईल व आमचेंही काम होईल. तें बोलणें मान्य करून भाऊंनीं तळ हलवून जालेहाळच्या रोखें कूच केलें. तथापि त्यांचें लक्ष कुमदानाच्या हालचालींकडे होतें व हल्लीं जिकडे मुलुखगिरी व्हावयाची होती तो प्रदेश बारीपासून पांचपंचवीस कोसांत असल्यामुळें प्रसंग पडल्यास कव्हांही परत येणें त्यांच्या हातांत होतें.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

नं. १९९८. **श्रीगणपति.** (पौष व. ५.-२८ जानें.)

आशीर्वाद उपरी. छ १४ जिल्हेजचें पत्र राजश्री नानाफडणीस यांजकडील जासुदाबरोबर पाठविलें तें काल छ १७ मिनहूस पावलें. लेखनार्थ कळला. व राजश्री नानांचें पत्रही पावलें. तुम्हास राजश्री नानांचें व राजश्री हरीपंत यांचें पत्र आलें त्यांतील मजकूर लिहिला तो सर्व कळला. नानांच्या पत्राचें उत्तर येथून लिहोन दिलें आहे व या जासुदाबरोबर तुम्हांसही चिठी लिहोन दिली आहे. तुमच्या पत्राचें उत्तर लिहोन द्यावें. " राजश्री आपा बळवंत व धायगुडे, मानाजी शिंदे, दहा हजार फौजेनिशीं रवाना केले, लौकर येतात, उतावळी करून बारीपार जाऊं नये " म्हणोन कित्येक लिहिलें तें कळलें. राजश्री आपा बळवंत पुढें येतात, उत्तम आहे. तेथून निघोन दोन चार मजली आल्याचें वृत्त टाकोटाक लिहोन पाठवावें. धारवाडास मोर्चे शत्रूचे बसोन आज पांच सा दिवस जाहले. तोफांचे आवाज ऐकावयास येतात. मागील फौजेची वाट पहात बसावें तर लौकर फौज येत नाहीं. आम्ही समीप असतां उगेच येथें बसावें तेंही ठीक नाहीं. तलाव्यास आम्हीच जाणार होतों, परंतु मुहूर्त प्रशस्त लाभत नाहीं याजमुळें आम्ही राहिलों. फौज मात्र आज रवाना करितों. तलावा करून तालामाला पाहोन येतील. तदोत्तर आम्हीच सुमार पाहोन जात आहों. गेलों तरी सडे जाऊं. बुनगें येथून पुढें जेत नाहीं. चिरंजीव आपा व राा बाबूराव छत्रे पुढें तासगांवास गेले म्हणोन लिहिलें तें कळलें. राजश्री रामचंद्र गणेश इकडील तोंड मोकळें टाकून शिराळ्याकडे गेले म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास त्यानीं फिरोन कागलाकडे येऊन रहावें येविशीं येथून रााा नानास लिहिलें आहे. तेथून पत्रेंही येतील व आम्हींही मशारनिल्हेस लिहिलें आहे.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यास.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

तुह्मीं बहुत सावधपणें रहावें. इकडील काळजी न करावी. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें चिरंजीवांची सुटका लौकरच होईल. रवाना छ १८ जिल्हेज. सोमवासरे प्रथम प्रहर दिवस. आज सडी फौज रास्तेकडील व गोविंद-पंतमामा व दीड हजार फौजेचीं पथकें देऊन व शहाजी भोंसले यांचें पथक व धारवाडकरांचें पथक[2] असे पांच हजार नेमणूक करून येकोडीपावेतों पाठविले आहेत. तेथून दोडवाडपावेतों पाठविले आहेत. तेथून दोडवाडपावेतों बनल्यास जातील. नाहीं तर येकोडीसच माघारे येतील असें केलें आहे. लष्करचे पेंढारी याणीं त्यांचे लष्करचे पंच-वीस तीस तट्टू व कांहीं थोर घोडे घेऊन आले. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १९१९. **श्री.** (पौष व० ५–२८ जाने०)

पै॥ छ १८ जिल्हेज. मुक्काम मनोळी.

राजश्री परशुरामपंतभाऊ गोसावी यांस—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित मुरारजी जगताप हवालदार किल्ले भुजबळगड. दंडवत. विनंति उपरी येथील क्षेम जाणूंन स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. आपला मुक्काम मनोळीवर जाहलेमुळें अमित्रास दहशत पडली. आपली सडी फौज पुढें गेल्यास धारवाडास जरूर ठरून राहतील[3]. आपला लौकिक आणिकांस नये. कैलासवासी रावजी[4] तागायत इकडील ममता चालत आली त्याजअन्वयें आपली ममता असावी. परकी विचार नाहीं. सांप्रत भाजीचा जिन्नस पाठविला असे. सदैव पत्रीं परामर्ष करीत असलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंति.

---

१ अक्कलकोटकर. २ धारवाडच्या सुभ्याकडील पथक, चारशें स्वारांचें. ३ जरूर ठरून राहतील याचा अर्थ त्यांस धारवाडास ठरून राहणें अवघड जाईल ! ४ गोपाळराव.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

नं. २०००. **श्रीसुब्रह्मण्य.** (पौष व० ५–२८ जाने०)

पै॥ छ १८ जिल्हेज. मुक्काम मनोळी.

दंडवत विनंती. सहीत द्यावा. भारी फौज आल्याखेरीज आपण घाट उतरूं नये. आजी उतरतों, उद्यां उतरतों, हे आवाई घालून मनांतच हे गोष्टी ठेऊन कार्यभाग करावा. बातमी अनेक प्रकारें राखावी. नष्ट फौजेस सरदार पाहिजे. तुम्ही आलां तेणेंकडोन दबाव बराच बसला आहे. बहुत बहुत खबरदारीनें असावें. भले लोकांच्या गोष्टीवर न जातां दादा ज्याप्रमाणें खबरदार होते त्याप्रमाणें असावें. राजश्री पांडुरंगराव तात्यांस स्वदस्तुरें दोन बंद पहिले लिहिले होते. ते नूतन नवे, तेथें आमचें म्हणणें चित्तास कोठें येतें ? राजश्री नारो त्रिंबक यांसही लिहिलें. होणार चुकत नाहीं. फार लिहिलें म्हणून राग न करावा. हे विनंती. घाट उतरणें जरूर असलिया रामदुर्गापासीं अथवा बदामीसमीप नरसापूरच्या घाटानें. यामध्यें आपल्या मर्जीस येईल तें प्रधान ! हे विनंती.

नं. २००१. **श्री.** (पौष व० ५–२८ जाने०)

पै॥ छ १८ जिल्हेज. मुक्काम मनोळी.

तीर्थस्वरूप राजश्री भाऊ वडिलांचे सेवेशीं. अपत्यें धोंडूबाई नमस्कार. विनंती येथील कुशल ताा पौष वद्य षष्ठी सौम्यवार मुक्काम कडलीकोप वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्ही पत्रें पौष वद्य ४ इंदुवारचीं पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सर्व कळला. " शत्रूची फौज धारवाडास बसली आहे, त्यास आम्ही उदईक सडे होऊन जात आहों"सें लिहिलें, उत्तम आहे. सावधपणें असावें. मागा.

---

१ हें पुरवणीपत्र परशुरामभाऊंस दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर यांनीं लिहिलें आहे. याचें मुख्य पत्र सांपडलें नाहीं. २ गोपाळराव. ३ ही शिवाजी केशव ऊर्फ शिउबा आपा पटवर्धन भिलवडीकर यांची कन्या. हिचें नेहमीं राहणें कंकणवाडी येथें असे.

हूनही मातबर फौजा येणार आहेत म्हणोन लिहिलें तें कळलें. हल्लीं येथून भाजी व पिकलीं केळीं पाठविलीं आहेत. येऊन पावतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं. २००२. **श्रीक्षेत्रपाल.** (पौष व० ५–२८ जाने०)

पौ छ १८ जिल्हेज. मुक्काम मनोळी.

तीर्थस्वरूप राजश्री भाऊ वडिलांचे सेवेशीं—

अपत्यासमान कृष्णाबाई शिंदे. दंडवत विनंति. येथील कुशल जाणोन स्वानंदलेखनाज्ञा करावी. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान न कळतां चित्त सापेक्षित असे. तर सदैव पत्रद्वारें सांभाळीत असावें. तदनंतर अमित्राकडे उभयतां चिरंजीव पाडाव सांपडले आहेत. त्यांचे वर्तमानाविशीं आपली आज्ञा पाहिजे. यास्तव लिहिलें असे. आपली आज्ञा जाहली तर इकडून माणसें रवाना करूं. म्हणजे तीर्थस्वरूप राजश्री तात्या वगैरे मंडळीकडील आद्यंत वर्तमान येईल. बंकापुराहून पट्टणास मंडळीसह तात्यास नेलें. आजी आठ रोज जाहले ऐसें पक्कें वर्तमान आलें आहे. विदित होय. आपणाकडे वरचेवर तथ्य बातमी येईल ती लिहिली पाहिजे. विशेष काय लिहिणें. कृपा अनुदिनीं वर्धविली पाहिजे. हे विनंति.

नं. २००३. (पौष व०–जाने० दु० पंधर०)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यास पत्र.

" चिरंजीव दादाचे पोटांत शूल उठतो. माझें शरीर अशक्त आहे. चाकरीचे दिवस. यास्तव चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी पुरंदराहून आणवावें. व वडिलांस चार गोष्टी सांगून विनोबा आबास इकडे पाठवून द्यावें. बाळा ! कांहीं सुचत नाहीं. परंतु जीवित्व आहे

---

१ उभयतां चिरंजीव कोण ? एक नीलकंठराव मात्र रावणीच्या छावणींत सांपडल्याचें प्रसिद्ध आहे. २ चुलता भास्कर हरि बाबा.

तोंवर करावें ! चिरंजीव मंडळीसह सुटल्याशिवाय घरीं येऊन तोंड दाखवावें हें नाहींच नाहीं. तुम्ही चिंता न करणें. लोक फिरोन उठून गेले व कोणाचीं बुनगीं गेलीं आहेत. त्यास मिरज प्रांतीं चौकशी व ताकीद करून गेलेले लोक व बुनगीं लष्करास पाठवून द्यावीं. "

नं. २००४. (पौष व० ६–२९ जाने०)

गंगाधरराव गोविंद यांस परशुरामभाऊंचें पत्र रवाना छ १९ जिल्हेज.

" बातमी राखावयाचा व सावधतेविशींचा मजकूर तपशिलें-करून लिहिला, त्यास बातमीची व छबिन्याची वगैरे बंदोबस्ती चांगली आहे. सर्व रक्षक हरि आहे. चिंता न करावी. तलाव्यास आमची फौज दोडवाडपावेतों गेली आहे. आमच्या लष्करचे पेंढारी दररोज तीनचार हजार बारीपार जाऊन येतात. कांहीं तीस चाळीस तट्टें परवां अमित्राच्या लष्करचीं पाडाव करून आणिलीं, त्यापासून त्यांनीं दहशत खादली आहे. आज नवलगुंदपावेतों दोन चार जागांहून बातम्या आल्या. बुनगें व भारी तोफा बंकापुरास लावून देऊन सडे आहेत. पांच सात तोफा मात्र आहेत. आमची निकड पाहून धारवाडचे मोर्चे उठविणार. मोर्चे उठविल्यादाखलच आहेत. काल आह्मी तलाव्यास फौज रवाना केली ह्मणून तोफा आवळूनच आहेत. आज तोफांचे आवाज ऐकूं येत नाहींत. मागील भरणा (फौजेचा) येतांच बारीपार होतों. "

नं. २००५. श्री. (२९ जाने०)

पैवस्ती छ १८ जिल्हेज. सन सब्बा सबैन. पौष वद्य षष्ठी सौम्यवार. मुक्काम मनोळी.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

पोष्य बाजीराव गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ता॥ छ ५ जिल्हेज जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कुशल कळत नाहीं, तेणेंकरून चित्त सापेक्षित आहे. तर सविस्तर लेहून संतोषविलें पाहिजे. यानंतर राजश्री पांडुरंगपंततात्या फौजसुद्धां या प्रांतीं आले होते. नबाबाकडील[1] फौज बंकापुरीं होती. आणखी मागून पट्टणाहून महमदअल्ली कुमदान यासमागमें दहा हजार बार, दहा बारा तोफा, पांच हजार स्वार आगखी आले. ते सर्व एकत्र होऊन सावशीस आले. सावशीहून सात कोस तात्यांचा मुक्काम होता तेथून मार्गशीर्ष वद्य चतुर्दशीस सडी फौज तयार होऊन सावशीहून कोसावर मुक्काम केला. दुसरे दिवशीं गुरुवारीं अमावास्येचे दिवशीं छ २८ जिल्कादीं तिकडून सडी फौज तोफा घेऊन चालोन आले. तों इकडील[2] फौज तयार जाहली. सकाळच्या प्रहर दिवसापासून उभय दळीं लढाई सुरू जाहली ते दोन प्रहर दिवसपर्यंत एक प्रहर उभयपक्षीं युद्ध चांगलें जाहलें. तिकडील फौजेचें मराठे सामान चांगलें. लोक चांगले जुजले. दोन दोन चार चार कळ्यर्‍या[3] केल्या. परंतु इकडील फौजा भारी व तोफखान्याचा व बारांचा मारही भारी जाहला. त्याजमुळें तिकडील फोज मागें सरली. लोकांनीं शर्त केली, परंतु लढाई बिघडली. जयपराजय आपले स्वाधीन नाहीं. ईश्वरसत्ता प्रमाण. त्यास मानवी उपाय नाहीं. राजश्री तात्या व राजश्री श्रीपतराव व शिवरामराव घोरपडे व बहिरजी घोरपडे गजेंद्रगडकर व रामचंद्रपंत दातार व वासुदेवकाका व कानोपंत व नीळकंठराव शिंदे मनोळीकर वगैरे पाडाव सांपडले. राजश्री कोन्हेरराव[4]जी व कृष्णराव पानशे

---

१ बर्वे. हे राघोबादादांकडचे सरदार हल्लीं हैदरअल्लीकडे होते. २ हैदरअल्लीकडील. ३ हैदराची. ४ उलटून हल्ले. ५ कोन्हेरराव लढाईत पडल्याचें वर्तमान अद्यापि पत्र लिहिणारास कळलें नव्हतें !

निघोन गेले म्हणून वर्तमान आहे. तात्यांस एक जखम भाल्याची पाठीवर व तरवारीची डोईवर आहे. श्रीपतरायासीं जखम तरवारीची डोईवर आहे. जखमा हलक्या आहेत. रामचंद्रपंतास तोंडावर ज़खम हलकी आहे. शिवरामराव यांच्या तोंडावर जखम भारी आहे. तबीब लावून जखमा बांधविल्या. थोडक्याच दिवसांत बऱ्या होतील. जख-मांची दास्त लष्करांत न होय, म्हणून बंकापुरीं पाठविले आहेत. त्यांच्या साहित्याविशीं आपण तिळमात्र चिंता न करावी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २००६. श्री. (पौष व० ६-२९ जाने०)

पु॥ राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरी. आजपर्यंत जाहलें तें जाहलें. आमचें मत श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामी धणी आहेत त्यांचें साहित्य करून त्यांस पदावर बसवून त्यांची सेवा करावी हें उत्तम. अतःपर विरुद्ध वाढवूं नये. जर आपले विचारें हे गोष्ट आल्यास याची पैरवी श्रीमंतांकडून व इकडून करूं. आह्मीं लिहिलें हें पुर्तेपणें मनन करून उत्तर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २००७. श्री. (पौष व० ६–२९ जाने०)

ब्राह्मण.	मराठे.
तरवार. भाला.	तरवार. भाला.
१ तात्या[1] जखमी कानावर व कुसेस लागून दोन्ही जखमा तरवार व कुसेस लागून भाल्याची भारी नाहीं.	१ शिवराम बाबा[2]. तोंडावर. भारी. तरवार. जखम मांडीस. भाल्याची हलकी.
	१ बहिरजी घोरपडे[3]. जखम नाहीं.

---

१ हें पुरवणीपत्र बाजीराव बऱ्यांचेंच होय. २ पांडुरंगरावतात्या. ३ घोरपडे गुत्तीकर. ४ गजेंद्रगडकर.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

१ रामचंद्र कृष्ण. हलके तरवारीची तोंडावरी. कांहीं चिंता नाहीं.
१ श्रीपतराव, आबांचे पुत्र. तरवार. हलकी.
१ आनंदराव तोफखाने. तरवार. मानेवर हलकी.
१ येसाजीपंत मंगळवेढेकर. मानेवर तरवारीची. कहरी आहे.
१ कानोपंत. हलकी.
१ वासुदेवकाका. पाठीवर हलकी.

१ कृष्णाबाई शिंदींचा लेक. हलकी जखम.
१ भिकाजी घोरपडे. तोंडावर जखम.
१ त्याचा लेक. हलकी जखम.
१ गंगाजी. निा रॉव दादा. हातावर. कहरी जखम.
१ बहिरजी घोरपडेचा मेहुणा.
४ खिजमतगार.

११

७

एकूण असामी १८.

नं. २००८. **श्रीगणपति.** (पौष व० ६–२९ जाने०)

आंशीर्वाद उपरी. धारवाडच्या किल्लयांत राा वासुदेव दादाजी राजश्री येसाजीपंतआपा यांचे पुतणे तेथें आहेत त्यांस आम्ही येथें आल्याचें वर्तमान कळलें नव्हतें. त्यांनीं राजश्री कृष्णराव यांस पत्र लिहिलें आहे. आंत सामान चांगलें आहे. हल्लीं वेढ़ा बसला आहे. या फौजेस ते कांहीं खातरेंत आणीत नाहींत ! बजिन्नस पत्र पहावयास पाठविलें आहे त्यावरून कळेल. काल तलाव्यास राजश्री गोविंदपंतमामा व शंहाजी भोंसले यांचें पथक व रास्ते ऐसे पाठ-

---

१ दातार, फडणीस, लक्ष्मेश्वरचे. २ आबा ह्मणजे मोरो बल्लाळ पटवर्धन यांचे पुत्र. ३ कृष्णाबाईच्या मुलाचें नांव नीळकंठराव शिंदे मनोळीकर. ४ सावशीकर. ५ गोपाळराव गोविंद पटवर्धन यांचा विश्वासू हुजऱ्या. ६ पत्र परशुरामभाऊचें गंगाधरराव गोविंद यांस.

विले आहेत. काल तुम्हांस डांकेबरोबर पत्रें पाठविलीं आहेत त्यांत दोडवाडास शत्रूनें तोफा लाविल्या आहेत ऐसें लिहिलें होतें. त्यास तें वर्तमान तथ्य नव्हे. शत्रु धारवाडासच आहेत. अद्याप दोडवाडास उपद्रव नाहीं. आम्ही एकाएकीं उतावळी करून जात नाहीं. मागील फौजांच्या अन्वयेंच सुमार पाहोन वर्तमान कर्तव्य तें करूं. आम्ही बातमी राखून आहों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २००९. श्री. (पौष व० ७—३० जाने०)

श्रीमंत मातुश्रीबाई वडिलांचे सेवेशीं.

विनंती सेवक बाजीराव देवाजी. साष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमंत राजश्री व्यंकटराव घोरपडे तोतयाकडे गेले सबब सरकारांतून तुह्माकडेस ऐवज नजरेचा ठरला त्यापैकीं श्रीमंत राजश्री परशुरामपंत भाऊ यांणीं आह्मास तुम्हाकडून ५००० पांच हजार रुपये देविले. ते सदरहू पांच हजार रुपये राजश्री महादाजी विठ्ठल व राजश्री सदाशिव बल्लाळ यांचे विद्यमानें आम्हास भरोन पावले. जाणिजे. छ २० माहे जिल्हेज. सुा सब्बा सबैन. शके १६९८ दुर्मुखी नाम संवत्सरे पौष वद्य ८ हें लिहून दिलें कबज सही. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. २०१०. श्री. (पौष व० ७ ३१ जाने०)

पौ छ २१ जिल्हेज. मुक्काम मनोळी.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री जिवाजीपंत जोशी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य काळो बहिरव. कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम भृगुवार तीन प्रहर जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे.

---

१ अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर. २ पेठे नरगुंदकर.

श. १६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

विशेष. दोन पत्रें तुह्मांकडे पाठविलीं, एकही उत्तर आलें नाहीं ! जासूद जोडयाही आल्या नाहींत. शत्रूनें धारवाडास मोर्चे लाविले आहेत. तोफांची मारागिरी करितात. बातमी तेथें येतच असेल. कुमक लौकर केल्यानें मनोळीस लष्कर आल्याचें फळ आहे. याउपर हैगई होऊं नये. एकादशी मंगळवारीं जयप्रद योग आहे म्हणून वेदमूर्ति राजश्री विठ्ठलभट नाटेकर ज्योतिषी चांगले ते सांगतात. वडिलांस श्रुत करावें. श्रीमंतांचें कल्याण इच्छित आहों. शत्रूनें बंकापुराहून सर्व कैदी मंडळी पट्टणास रवाना केली आहे. कळावें. माणसें पाठवितों त्याचीं उत्तरें लौकर आपण देत नाहीं. इकडून पत्रें वरचेवर पाठवीतच आहों. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

नं. २०११. **श्रीगणपति** (पौष वद्य-जाने० दु० पंधर०)[1]

चिरंजीव राजश्री शिवाजीपंतांस आशीर्वाद. कहीबरोबर फौज जात आहे. फौजेबरोबर कहीनें जावें. दुसरीकडे जाऊं नये. अशी निक्षून ताकीद गोटांत करणें. मनोळी तालुक्याच्या खेडयांस उपसर्ग लावूं नये अशी ताकीद करणें हे आशीर्वाद.

नं. २०१२. (पौष व० ७–३१ जाने०)

परशुरामभाऊचें गंगाधरराव यांस पत्र लष्कर मुक्काम मनोळी येथून मिरजेस. पैवस्ती छ २२ जिल्हेज पौष मास:--

" आम्हाकडील फौजा तलाव्यास आज चार रोज बारीपार एकोडीस राहून दोडवाडपर्यंत फिरोन येत असतात. या धास्तीमुळें–दुरोंख शह राखणें कठिण–याजमुळें शत्रूनें धारवाडचे मोर्चे उठविले. (त्यानें) अगोदर एक दोन दिवस बुनगें बंकापुराकडे लावून दिलें होतें. तदोत्तर सडेच होते. निघोन कांहीं हुबळीकडे व कांहीं मिश्रीकोटया. कडे गेले. (त्यांनीं) झाडीचा आसरा केला. अतःपर आम्ही पुढें

---

१ परशुरामभाऊंस. २ किंवा परशुरामभाऊंची.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

जाणें तें मागील फौजांच्या येण्याअन्वयेंच करूं. सडे स्वारीस आनंदराव निंबाजी–रास्त्याकडील–व आम्हाकडील श्रीधरपंत सुभेदार न येसाजीपंत आपांचे पुत्र त्रिंबकराव अण्णा ऐसे गेले आहेत त्यांस उदईक परत बोलाविलें आहे. "

नं. २०१३. (पौष व०-फेब्रु० प० पंधर०)

परशुरामभाऊंकडून गंगाधरराव गोविंद यांस पत्र लष्करनजीक मनोळी येथून मिरजेस—

" शत्रु धारवाडचा वेढा उठवून हुबळीस गेले. तेथें सडे होऊन त्यांनीं आपलें बुनगें व तोफखाना मिश्रीकोटास लावून दिला म्हणून वर्तमान आलें आहे. चिरंजीव मंडळीसुद्धां बंकापुरास होते ते पट्टणास गेले अशी खबर आहे. आम्हांस मनोळीस येऊन दहा दिवस जाहले. ठाण्याची घालमेल पडली होती. आज ठाणें घातलें. कांहीं खर्चाची तरतूद येईल ऐवजीं करून रामदुर्गचे सुमारें होतों. जालेहाळ तालुका रास्त्यांकडे आहे. कांहीं ठाणीं जमीदारांनीं घेतलीं आहेत. तिकडे गेल्यास कांहीं खर्चासही मिळेल. मागाहून थोरली फौज आल्यावर योग्य तें करावयास येईल. सध्यां तिकडे जातों. "

नं. २०१४. श्री. (५ फेब्रु०)

पैवस्ती छ ७ मोहरम. मुक्काम मनोळी.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य सदाशिव रामचंद्र. कृतानेक नमस्कार. विनंती उपरि येथील कुशल तागायत पौष वद्य द्वादशीपावेतों जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष आपणाकडील मंडळीचें[3] वर्तमान

---

१ शत्रुकडे पाडाव सांपडलेले पांडुरंगराव वगैरे. २ रामचंद्रबाबा शेणवी यांचे पुत्र. ३ मावशांच्या लढाईंत पराभूत झालेल्या मंडळीचें.

कळतांच स्वार होऊन आपणापाशीं येऊन पोहोंचावें हेंच उचित, परंतु काय करावें ! आम्हापाशीं साहित्य[1] नाहीं. आमची अवस्था केवळ पराधीन त्याजमुळें संकटांत पडलों आहों. हा कालवर आह्माकडील जाबसालाचा[2] प्रथम दिवस. किमपि सोई न जाली. ऋणानुबंध प्रमाण ! यानंतर राजश्री हरीपंततात्या आज्ञा[3] घेऊन निघाले. फौजेसह येतात. आह्मीही येतों. प्रस्तुत आपण कोणेविशींची उतावळी न करावी. अतःपर विवेकेंकडून जें कर्तव्य तें करावें. सविस्तर वृत्तांत राजश्री बाळाजीपंत लिहितील त्याजवरून कळों येईल. आमचे श्रम आपल्यास ल्याहावे, त्यास आपणही घोरांत पडलां यास्तव फार वाईट वाटतें. पत्रीं काय ल्याहावें ! आपलें उत्तर लवकर यावें. मार्गप्रतीक्षा करीत आहों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

राजश्री रघुनाथराव स्वामीस नमस्कार. उत्तर पाठवावें हे विनंती.

नं. २०१५. (पौष व० १२-५ फेब्रु०)

परशुरामपंतभाऊचें गंगाधरराव यांस पत्र लष्कर मुक्काम मनोळी येथन मिरजेस २६ जिल्हेजचें—

" राजश्री रामचंद्र गणेश यांचें व करवीरकर यांचें युद्ध होणार. थोडीशी लढाई जाहली, आणखी होणार, म्हणून ऐकिलें; त्याजवरून तिकडील काळजी लागली आहे. कुमदान हुबळीवरच आहे. आम्ही मागाहून फौज येई तोंवर उतावळी करीत नाहीं. आमचा मुक्काम मनोळीजवळच आहे. रास्ते यांचा आग्रह जालिहाळाकडे जावें असा होता, परंतु शत्रु कांहीं शह सोडून गेला नाहीं व कित्तरकर वगैरे जमले आहेत

---

१ फौज. २ आपण दादासाहेबांस सोडून इकडे आलों सबब कारभाऱ्यांनीं आपणास तैनात व सरंजाम नेमून द्यावा हा जाबसाल. ३ आज्ञा कारभाऱ्यांची. ४ सहस्रबुद्धे. पटवर्धनांचा कारकून. ५ कुरुंदवाडकर.

ते तिकडेही जात नाहींत व इकडेही येत नाहींत. परंतु आम्ही जालिहाळाकडे गेल्यास ते शत्रूकडे जातील व शत्रूकडे मिळणें त्यांस प्राप्त होईल; असें जाणून तूर्त तो मनसबा राहविला. भोंसले देशीं येतात म्हणून शिवाजीपंतांनीं लिहिलें, त्यास त्यांची कांहीं फौज या मनसब्यावर आल्यास फारच उत्तम होईल. तूर्त ईश्वरकृपेंकडून धारवाडचा शह मात्र तुटला. काल तोफखान्याकडील दोनशें गाडदी एक महिन्याची बेजमी करून धारवाडचे किल्ल्यास पाठविले आहेत."

नं. २०१६. श्री. (६ फेब्रु०)

छ १८ जिल्हेज.

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेशीं—

पोष्य गंगाधर बापोजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ताा पौष वद्य १३ पावेतों आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून पत्र येऊन परामर्ष होत नाहीं. तर असें नसावें. सदैव पत्रीं सांभाळीत असावें. इकडील वृत्त विस्तारें श्रीमंत राजश्री गंगाधररावजींचे पत्रावरून कळों येईल. श्रीमंत राजश्री तात्यांनीं जाते समयीं येथें येऊन गेले. त्यांजवर असा प्रसंग पडला ! बरें ! याउपर सर्वप्रकारें वडीलपण आपणाकडे आहे. सत्वर अमित्रापासोन सुटका होय तो अर्थ आपण करीत आहां, परंतु त्यांची मुक्तता सत्वर होऊन आपले मंडळींत येत तें करावें. ज्या अर्थानें सुटका होय तें केलें पाहिजे. आपणावर कसाला फार पडला, शरीर अशक्त, केवळ चिंता केलियानें फारच अशक्तता होईल. तर चित्तास धीर द्यावा, बहुत सावध असत जावें. सर्व दौलतीचा भार व सर्व कुटुंबाचा विचार तुम्हांवर. चाकरीचुकरीचे दिवस. आपणाजवळ मामा एकटे. या समयीं

---

१ हे मिरजकरांच्या पथकाचे फडणीस. उपनांव ओक. यांची नोकरी हल्लीं सांगली संस्थानाकडे आहे. २ गोविंद सखदेव.

घरीं आम्हासारख्यानें रिकामें बसावें हें उत्तम नव्हे. परंतु सरकारची फौज येई तंवपावेतों उतावळी करूं नये. आपणाकडील वृत्त वरचेवर ल्याहावया. आज्ञा करीत असावें. येथें श्रीमंत[1] स्थळीं बहुत सावधगिरींत असतात. एका संकटामुळें सर्वांवर संकट प्राप्त झालें ! बरें ! तीर्थरूप नाना[2] कैलासवासी यांचे पुण्यप्रतापेंकरून व श्रीपांडुरंगाच्या कृपाईक्षणें-करून सर्व संकटें परिहार करणार तो समर्थ आहे. श्रीमंत राजश्री पंत-प्रधान यांचा पुण्यप्रताप तर थोरच आहे. बहुत काय लिहिणें हे विनंति.

विनंती सेवक केसो बल्लाळ व रामचंद्र बल्लाळ गोरे. साष्टांग नमस्कार विज्ञापना. पत्रद्वारें सेवकांचा परामर्ष केला पाहिजे. श्रीभगवान् कृपा करून श्रीमंत राजश्री तात्यासाहेबांस दुष्टापासून आपल्या मंडळींत आणील तो सुदिन ! सर्व प्रकारें वडील स्वामी आहेत. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०१७. (पौष व० १४–७ फेब्रु०)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव[3] यांस पत्र छ २८ जिल्हेजचें लष्कर मुक्काम मनोळी येथून मिरजेस---

" जालिहाळाकडे जावयाचा मनसबा होता, परंतु शत्रूची फौज हुबळीवर होती व बुनगे देखील मिश्रीकोटास होतें तें (त्यानें) हुबळीस आणविलें. व्यंकटराव बारकी याजबरोबर आणखी दोन हजार स्वार व बार तीन हजार याप्रमाणें नवा जमाव येऊन त्यास मिळाला. आणखीही वरचेवर जमा होऊन हुबळीस येतच आहेत. बातेऱ्या बांधोन हुबळीजवळच लढाई द्यावी असा त्याचा मनसबा आहे. आम्हीं जालिहाळाकडे जावें तर मुरगोड, एकोडी वगैरे बारीपार ठाणीं आहेत तीं जातील, व बारी शत्रूच्या हातीं लागेल; यास्तव तिकडे जाण्याचा मनसबा सध्या राहविला. "

---

१ गंगाधरराव. २ मिरजेच्या किल्ल्यांत. ३ गोविंद हरी.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

नं. २०१८. **श्री.** (माघ शु० २–१२ फेब्रु०)

श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचे सेवेशीं.

आज्ञाधारक देवराव सिंगाडे रामराम. विनंती येथील वर्तमान ताा छ १ मोहरमपावेतों साहेबांचे कृपादृष्टीकरून वर्तमान यथास्थित असे. विज्ञापना ऐसी जे, साहेबांकडून पत्र येऊन परामर्ष होत नाहीं, यामुळें दुसरा निजध्यास नाहीं. सदैव पत्र येऊन साहेबांचें दिवसेंदिवस उत्कर्षाचें वृत्त कळावें आणि शत्रूचा पराभव व्हावा हें इच्छून रात्रंदिवस चाकरीवर हजर असों. आपणही सावधगिरीची लोकांस वरचेवर आज्ञा करीत जावी. लष्करांत सावधता असावी. पुरंदराहून जमाव येऊन आपणास सामील होयपर्यंत बहुतशी निकड कोणे गोष्टीची नसावी. मुख्य गोष्ट, भाऊसाहेब ! आपण सर्वत्रांस वडील. आपण सावध असावें. यापरतें दुसरें कांहीं अधिकोत्तर नाहीं. श्रीकृपेनें फौज सामील जालेवर शत्रूचा पराभव करून श्रीमंत राजश्री तात्यासाहेबांसही मंडळीसुद्धां आणाल. चिंता नाहीं. सेवेशीं श्रुत होय. हे विनंति.

श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादा यांसीं विज्ञापना. सदैव आज्ञापत्र पाठवून सांभाळ करीत जावा. श्रीमंत वडिलांची मर्जी राखून बहुत सावधपणें असावें. सुचली विनंति लिहिली आहे. हे विज्ञापना.

नं. २०१९. **श्री.** (१० फेब्रुवारी.)

पौा छ ६ मोहरम. मुक्काम मनोळी.

विनंती सेवक केसो सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत माघ शुा ३ इंदुवासर यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं कृपा करून आज्ञापत्र पाठविलें तें पावोन संतोष झाला. इकडील मजकूर तरी रााा रामचंद्रपंततात्या व राजश्री बाजीपंतअण्णा

---

१ अष्ट्यांचा कमावीसदार. याचें हें परशुरामभाऊस पत्र.

कवेठेवरी आहेत. शिंदा वडगांवावरी फौजसुद्धां आहे. एक दिवस मात्र त्यांची त्यांची गोळागोळी जाली. त्या अलीकडे कांहीं नाहीं. दहा वीस तट्टें कहीचीं त्यांनीं पाडून चोरीनें नेलीं. एक दोन दिवशीं कूच करून उदगांवचे सुमारें हे जाणार. याजप्रमाणें वर्तमान आहे. गुदस्तां भगवंतराव प्रतिनिधीकडे अकलूजकर निंबाळकर व हणमंतराव घाटगे व नाईकजी घाटगे होते ते भीमातीरीं कांहीं जथले आहेत. पैलीकडे चाकरीस जाणार म्हणून जनवार्ता आहे. आम्हीं तिकडे बातमीस माणसें पाठविलीं आहेत. आलियावरी सत्य मिथ्या कळेल. आम्ही खबरदार आहों. दोनशें अडीचशें माणूस शिबंदीचें ठेविलें आहे. स्वामीचें पत्र शिबंदी न ठेवणें म्हणोन आलें, त्यास गांव अफाट, कुसूं नाहीं, शिबंदी न ठेवितां परिणाम काय ? वारणातीरचे अलीकडील गांव थोराताकडील व मिरजेकडील अगदीं शिंद्यांचे धास्तीनें वोस पडत चालिले. आमचें लष्कर याच रोखें राहील हा भरंवसा नाहीं. वडगांव येथून चार कोस. त्याचा दग्याचा कारभार ! परवां इंगळी गांव येडुरानजीक तो त्यानें अगदीं मारला. व अंकली मिरजेजवळ उदगांवचे नजीक लहान खेडें आहे त्याजवरी आले होते; परंतु तेथें साधलें नाहीं ! आंत प्यादे बातमी लागोन आह्मीं घातले होते. आपण शिबंदी न ठेवणें म्हणोन आज्ञा लिहितां; पुढें गांवची गत होईल ते हो, परंतु शिबंदी नलगे, अशाच आज्ञा निक्षणच असेल तरी या पत्राचें उत्तर आलियावर दूर करों, आज्ञेनुरूपच ठेवों. आपण म्हणतील कीं रामचंद्र गणेश यांचें लष्कर जवळ असतां शिबंदीचें प्रयोजन काय ? तेंही प्रमाणच आहे. परंतु जाग्याची व राहणाराची अबरू राहिली पाहिजे. दुसरें आपली आज्ञा नसतां शिबंदी बाळगिली तरी पुढें आपला पेंच येणार, यास्तव जे आज्ञा कर्तव्य ते

---

१ कवठें पिरान वारणातीरीं आहे तें. २ करवीर राजमंडळाकडे. ३ येसाजी शिंद्याच्या. ४ येसाजी शिंद्याचा.

निक्षूणच केली म्हणजे तदनुरूपच वर्तों. आमचा आग्रह नाहीं. आपले आज्ञेनें प्रसंग घडेल तो सुखेनैव घडो ! गांवही तजावजा होईल. वस्ती राहणें कठीण पडेल. तिकडे शत्रूची फौज कोणे ठिकाणीं वेढा उठ-वून राहिली किंवा बंकापुराकडे निघून गेली हें कळवावें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०२०. **श्रीगणराज.** (माघ शु० २–१० फेब्रु०)

श्रियासह चिरंजीव राजश्री भाऊ व बाँळ यांसीं प्रती भवानी-बाई. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ १ मोहरम जाणून स्वकीय लेखन करीत असावें. विशेष. चिरंजीव राजश्री तात्या शत्रूकडे पाडाव सांपडले, चिरंजीव कोन्हेरराव कैलासवासी झाले, ईश्वरी क्षोभ जाहला. बरें होणार तें जाहलें, आतां सर्व भिस्त आपणावर आहे. आपण उतावळी करून बाँरीपलीकडे जाऊं नये. दरबारीं लिहून पाठवून फौजा मातबर सत्वर येऊन पोंचतशा कराव्या; मग शत्रूस जरब द्यावी. तोंपर्यंत पुढें जावयाचें न करावें. मनसबा करणें तो पक्केपणें करीत जावा. तुह्मी तिकडे गेलां, इकडे राजमंडळकरांनीं उप-द्रव मांडला आहे यांचें पारिपत्य होतां दिसत नाहीं ! इकडील बंदो-बस्त कारभाऱ्यांनीं कसा काय केला ! रामचंद्र गणेश आहेत, परंतु थोडे आहेत. तेच भय वागवून आहेत, तेव्हां पारिपत्य होणें कळतच आहे ! सध्या एवढया शत्रूचा बंदोबस्त झाला तर आमचा टिकाव येथें होईल. नाहीं तर येथें कसें राहावें ? ठाँणेंही कांहीं मातबर नाहीं, पेठेचा गांव, असा मजकूर आहे. मागील आमची घरची चिंता असों द्यावी. ईश्वरें चोहोंकडून काल कठीण आणिला. मेले व सांपडले त्यांचा शोक करावा कीं पुढील चिंता करावी ! कोणतें

---

१ धारवाडचा. २ रघुनाथराव नीळकंठ. हा पत्र लिहिणारणीचा मुलगा. परशुरामभाऊ हा तिचा धाकटा चुलत दीर. ३ बारी मनोळीची. ४ ठाणें कुरुंदवाडचें.

कार्य करावें ! ईश्वरें आह्मांवर मोठा कहर केला तो पत्रीं कोठवर ल्याहावा ? असो. होणार भविष्य असेल त्याप्रमाणें होईल. चिंता कोठवर करावी ? आतां दुसरी तुमची मोठी काळजी लागली आहे. शत्रूचा सूड घ्यावा एतद् निमित्य उतावळी कराल तर किमपि न करावी. सध्या दुष्टाचे कारागृहीं सांपडले आहेत त्यांच्या गती काय होत असतील ईश्वर जाणे ! बरें ! त्यांचें जन्मांतर तसें होतें त्याप्रमाणें भोग प्राप्त जाहला. भोगिल्यावांचून सुटका नाहीं. दैवयोगेंकरून सुटावयाचे असले तर हरयत्न होईल, अगर कांहीं होईल. आपण सुटोन येतील. नसेल दैवीं तर दुष्टाचे कारागृहांत आहेतच. अशांतून पार पाडणार कोण आहे ? सर्व आधार श्रीगजाननावर आहे. भगवत्सत्ता प्रमाण ! मुख्य आपण सर्वथा उतावळी न करावी. आह्मांकडे लक्ष असों द्यावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

अपत्यें शिवरामानें व गणपतीनें साष्टांग नमस्कार. विज्ञापना. सदैव पत्रीं सांभाळ करावा. हे विज्ञापना.

नं. २०२१. (माघ शु० ५–१२ फेब्रु०)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस छ ३ मोहरमचें पत्र

लष्कर मुक्काम मनोळी येथून मिरजेस—

" शत्रूची फौज हुबळीवरच आहे. आमच्या लष्करचे पेंढारी लक्ष्मेश्वरपर्यंत स्वाऱ्या करून गुरें वळून आणितात. अमित्राकडील राऊतही मोरबेपर्यंत तलाव्यास येत असतात. साधल्यास आमचे पेंढारी त्यांचीं दोन चार घोडीं पाडून आणितात. एखादे दिवशीं पेंढारीही दगावतात ! देशाहून फौजा लवकर येत नाहींत, तेव्हां नबाबाकडील फौज जलदीनें येणें कळतच आहे ! फौजेविशीं पुरंदरास ल्याहावयाची सीमा जाली ! शत्रु जमत चालला. नवलगुंदकर यांजकडील शंभर राऊत व चारशें प्यादे त्याजकडे गेले. आणि शिरहट्टीकर तो आहेच.

डंबळकरही तयार जाले आहेत. जातात ! फारकरून जातील असें दिसतें. असो. ईश्वर इच्छा प्रमाण ! येथें येऊन आम्हांस आज वीस दिवस जाले. मनोळी परगणा कहीखालींच बेचिराख जाला. कांहीं खर्चास महिना पंधरा दिवसांची बेगमी केली होती ती येथंच खादली. मागती येथून कूच व्हावयाचे दिवशीं दंगाच आहे ! श्रीनिर्मित असेल तसें घडेल ! काळजी कोठवर म्हणून करावी ! सर्वांगास वेदना, तेथें कोणतें म्हणून लिहावें ! सर्व भार श्रीगणोबावर आहे ! "

श्रीगणराज.

नं. २०२२. (माघ शु० ६–१३ फेब्रु०)

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंति सेवक महादाजी बल्लाळ. साष्टां नमस्कार विज्ञापना ता॥ छ ४ मोहरमपावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं मनोळी मुक्कामाहून आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर कळलें. श्रीमंत रावसाहेब[1] कीर्ति संपादून धारातीर्थीं गेले. ब श्रीमंत राजश्री तात्यासाहेब[2] पाडाव गेले म्हणोन लिहिलें; त्यास मागें सर्वांस दुःखार्णवीं घातलें ! काय करावें ! दुष्टाचे हातीं सांपडले ! त्याचे परिहार श्रीमंतांचे दैवेंकरून होतील तो सुदिवस ! मागें युद्धें बहुत जालीं. परंतु असा क्षोभ कोठें जाला नाहीं ! जन्मांतर ! उपाय नाहीं ! स्वामीच्या श्रमास पारावार नाहीं. स्वामी धैर्यवंत आहेत. आतां सारी भिस्त स्वामीवर आहे. धैर्य धरून होईल तें प्रमाण ! स्वामीची तरतूदही बरीच आहे. फौज येईल तों सबुरीनेंच असावें. भाऊसाहेब ! आपण तरी उतावळी न करावी. पक्का मनसबा करून मसलत करावी. रात्रंदिवस आमचा निदिध्यास स्वामीकडे आहे. आज्ञेप्रमाणें सावध आहों. राजमंडळकरांनीं दंगा फारच आरंभिला आहे. शत्रु शेर जाले आहेत. यांत लज्जारक्षक

---

१ कुरुंदवाडकरांचे कारभारी. २ कोन्हेरराव. ३ पांडुरंगराव.

श्रीगजानन आहे. स्वामीही जवळच मनोळीस आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०२३. श्री. (माघ शु० ६–१३ फेब्रु०)

पैग छ ६ मोहरम. सब्बा सबैन. मनोळी.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाजीरांव गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल छ ४ मोहरम जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. "राजश्री पांडुरंग-रावतात्यांच्या जखमा बऱ्या जाहल्या किंवा नाहीं, किती दिवसांत बऱ्या होतील, प्रस्तुत कोठें आहेत तें वगैरे सविस्तर वर्तमान ल्याहावें," म्हणोन लिहिल, त्यास सावशीच्या मुक्कामाहून राजश्री तात्यांची व वरकडांच्या जखमा शेकून बांधून सर्व सरंजाम करून देऊन बंकापुरीं रवाना केले होते[3]. बंकापुरास राजश्री गंगाराम किल्लेदार यांसीं पत्र लेहून आम्हाकडील कारकून तेथें होते त्यांस त्यांजकडे पाठवून तेथें परामर्ष होत होता. त्यास परभारें पत्र बंकापुरास पट्टणाहून आलें कीं, 'त्यांस पट्टणास रवाना करणें.' त्याजवरून त्यांस तेथून पट्टणास रवाना केलें; परंतु जखमा बऱ्या होत आल्या होत्या. कांहीं कसर राहिली होती. मार्गीही दास्त होतच होती. बऱ्या जाहल्या असतील. आचारी व ब्राह्मण व एक दुसरें मराठी माणूस चाकरीस आपल्या ममतेचें असावें, याविशीं नबाबास पत्र लिहिलें आहे त्याचें उत्तर

---

१ सबब फारसें शत्रूचें भय मानीत नाहीं असा वाक्यशेष. २ बर्वे. हा दादासाहेबांचा विश्वासू सरदार तूर्त हैदराच्या दरबारीं कांहीं राजकारणाकरितां आला होता. ३ यावरून सावशीच्या लढाईंत हा बाजीराव हजर होतासें दिसतें. ४ हैदरअल्लीस.

श. १६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स.१७७७

येतांच आचारी ब्राह्मण खिजमतगार पाठवूं. अथवा आपणाकडून तेथून आणवूं. वरकड इकडील वर्तमान तर आणखी फौज पुढें पट्टणाहून वरचेवर येतच आहे. कांहीं दाखल जाहली. कांहीं येत आहे. नबाब खासा स्वारी सत्वर येणार आहेत. तिकडील सविस्तर लिहीत असावें. वरकड पांडया सांगतां कळेल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २०२४. **श्री.** (माघ शु० ६–१३ फेब्रु०)

पै॥ छ ६ मोहरम. सन सब्बा सबैन.

विनंती उपरी. ' वर्तमान पांडया सांगतां कळेल (असें आह्मीं लिहिलें,) ऐसीयासीं घरांतील विरुद्धानें राज्य विध्वंस जालें. याजकरितां आमचे विचारें असें आहे जे, आपण श्रीमंतांचें लक्ष धरून श्रीमंत राज्यावर येत असी योजना करावी. आपण श्रीमंतांकडील संशय धरितील तर तिकडील संशय निवृत्त करून आणूं. आपले स्वज्ञातीमध्यें मातबर सरदारी आपलीच मात्र आहे. आम्हास वाटतें जे, तुम्ही या गोष्टीस दृढतर चित्तावर धरल्यानें राज्याचा बंदोबस्त होईल; याजकरितां लिहिलें आहे. त्याचें पुर्तेपणें मनन करून उत्तर पाठवावें. हा मजकूर तुम्हाकडेही प्रकटांत येतां नये, म्हणून जबानी पांडयास सांगितला आहे. हें चित्तावर धरून सिद्धीस नेल्यानें इहलोकीं कीर्त आहे आणि ईश्वरासही मान्य आहे. विस्तारें ल्याहावें तर आपण सुज्ञ दीर्घदृष्टि आहेत. राज्याचा नाश होतो हें पहावत नाहीं याजकरितां लिहिलें आहे. याजवर जसें आपल्या विचारास येईल तसें उत्तर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

---

१ हें एका विश्वासू नोकराचें नांव. २ मागच्याप्रमाणें हेंही बांजीराव बव्याचें परशुरामभाऊंस पत्र. ३ रघुनाथराव दादासाहेबांचें.

श. १६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली. इ.स. १७७७

नं. २०२५. श्री. (माघ शु० ६–१३ फे०)

राजश्री जिवाजीपंत अण्णा[1] स्वामीचे सेवेशीं––

पोष्य रामचंद्र बल्लाळ गोरे साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ ४ मोहरमपावेतों यथास्थित असे. विशेष. तुम्हाकडून बहुत दिवसपर्यंत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, सावशीच्या लढाईचें एक वर्तमान आलें । दिवसापासून प्राण मात्र शरीरांत आहेत. जिऊबा ! असी गत धीं कोणाची होत नाहीं ! कालें पाश घालून ओढून नेलें ! दर पत्री लिहीत होते कीं, " कुमदानाची फौजा भारी आहे. आम्ही सड होऊन आसऱ्यानें असतों " म्हणोन वारंवार लिहित असतां शेवटीं ही गत जाहली ! शत्रूचे कारागृहीं पडले ! दैवगतीनें सुटले तर नकळे ! एरवीं सरकारची फौज येऊन छावणी होऊन त्यास जरब पोंचवून त्यापासोन खंडणी घेऊन यांस सोडविणें हें कळतच आहे ! मोंगलें[2] मनावर घेऊन बाहेर निघाला आहे. मोंगलाचीं पत्रें श्रीमंतांस येत त कीं, " आम्ही निघोन बेदरास आलों. सरकारची फौज जलद पाठव वी. कर्नाटकांत छावणी करणार " म्हणोन यवनाचीं पत्रें येत असतां सरकारची फौज तीन मास निघत आहे ! अशी तरतूद ! शिंद्यानें[3] दंगा फार मांडला आहे. मिरज प्रांतांत गांव जाळितो, संक्राँजी घोरपडे कोल्हापूरकरांकडे येणार म्हणोन वर्तमान आहे. माणसास माणूस खावयाचा काळ आला आहे ! ! ! सर्व दौलत गेली तरी चिंता नव्हती; तात्या सुखरूप येते म्हणजे सर्व होतें ! ते सर्वांचे प्राक्तनानें शत्रु-हस्तगत जाले. शत्रु त्यांस कोठें ठेवील, काय करील ! चौघे पांचजण आहेत यांस एकत्र ठेवील किंवा निराळें ठेवील हें नकळे ! येथून विप्र पाठविला आहे. जाऊन पावेल तेव्हां खरा.

---

१ मिरजेहून मनोळीस भाऊंच्या लष्करांत पोतनीस यांस पत्र. २ निजाम-अल्ली. ३ येसाजी शिंद्यानें. ४ मुधोळकर.

तुह्मांकडील सविस्तर लिहून पाठवावें. जिवास झुरणी लागली आहे. सर्व ताफा बसला ! काय करावें ! बहुत काय लिहिणें हे विनंती.

राजश्री भिकाजीपंत दाजी व वामनाजीपंत यांस साष्टांग नमस्कार विनंती. सदैव पत्रीं संतोषवावें. तो प्राणी सुटेल तेव्हां संतोष ! मध्यें नाहीं ! हे विनंती.

नं. २०२६. **श्री.** (माघ शु० ७–१४ फेब्रु०)

पैा छ ५ मोहरम. मुक्काम मनोळी.

राजश्री भाऊ गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बहिणाबाई डफळे. देशमुख प्रांत चार, सरकार विजापूर, दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपणाकडून अलीकडे बरेच दिवसांत पत्र येऊन परामर्ष होत नाहीं याजकरितां चित्त सचिंत असे. तर सदैव पत्र पाठवून समाचार घेत असिलें पाहिजे. यानंतर राजश्री पांडुरंगरावतात्या यांचे फौजेचें वर्तमान अस्तावेस्त ऐकिलें त्याजवरून अहोरात्र तिकडीलच फिकीर लागली असे. तर कसें काय वर्तमान जाहलें तें सविस्तर राजश्री तात्या सुखरूप असल्याचें ल्याहावें, म्हणजे चित्तीं स्वस्थता होईल. प्रस्तुत आपणही मोहिमेस निघालां आहां म्हणून ऐकितों. कोणे सरदेस स्वारी जाणार हें ल्याहावें. विवेकियांप्रती विस्तार लिहिणें काय असे ? बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २०२७. **श्री.** (माघ शु० १०–१७ फेब्रु०)

परशुरामभाऊंचें पत्र छ ८ मोहरम इंदुवारचें गंगाधरराव यांस लष्कर मुक्काम मनोळी येथून मिरजेस—

" अतःपर एका दोहों दिवशीं कूच करून जालिहाळाकडे जातों. जावें हे कांहीं मनसब्याची रीत नाहीं. परंतु महिना येथें येऊन

होत आला. वैरण अगदीं मिळत नाहीं. या तालुक्यांतील गांवखेडीं लुटलीं गेलीं. बाकी राहिली नाहीं. काय करावें ! कूच करावें म्हणतों परंतु होईलसें दिसत नाहीं ! ”

नं. २०२८. **श्रीगणपति.** (माघ व० १०–१७ फेब्रु०)

पै॥ छ १० मोहरम. सुरूसन सब्बा सबैन. माघमास.

तीर्थस्वरूप राजश्री बाबूमामा वडिलांचे सेवेशीं अपत्यें परशुराम रामचंद्र साष्टांग नमस्कार विनंती ता॥ छ ८ मोहरम मुक्काम मनोळी जाणोन यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन लेखनार्थ कळला. “ लढाईचें वर्तमान ऐकिल्यानंतर कोंकणांत गेलों होतों तो घरास आलों ” म्हणोन लिहिलें तें कळलें. ईश्वरें अनुचित गोष्टी घडविल्या. होणारास उपाय नाहीं. आतां जिवांत जीव आहे तों चिरंजीवाचे सुटकेची काळजी लागली आहे. नहोन दुसरें नाहीं. श्रीमंतांचे प्रतापें व वडिलांचे आशीर्वादेंकरून शत्रूवर जरब बसोन सुटका चिरंजीवाची मंडळीसह लौकरच होईल. चिंता न करावी....[1]. ईश्वरें मोठा कहर केला ! चिरंजीव सुटून येतील तो सुदिन ! कांहीं सुचत नाहीं. बरें ! आपले आशीर्वादेंकरून सुटून येतील. वडिलीं कांहीं अनुष्ठान करवावे. एखादें जागृत देवस्थान पाहून सेवेशीं ब्राह्मण घालावे. ईश्वर फलदाता आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं. २०२९. **श्री.** (१७ फेब्रु.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं—

पोष्य नरसिंगराव[2] जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंति उपरि-येथिल कुशल तागायत माघ शु. १० पर्यंत मुक्काम घोरपडी येथें क्षेम-

---

१ टिंबें दिलीं आहेत तेथें मूळपत्र फाटलें आहे. २ धायगुडे.

रूप असों. विशेष. तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. त्यांवरून सविस्तर मजकूर कुमदान व येसाजी शिंदे व शंकराजी घोरपडे यांजकडील लिहिला तो कळों आला. तीं पत्रें आम्हीं राजश्री हरिपंततात्यास दाखविलीं; त्यांवरून आम्हास समागमें फौजा देऊन तुम्हाकडे रवाना करितों म्हणून सांगितलेवरून आम्हीं आजपावेतों वाट पाहिली. परंतु फौजेची तोड पडोन फौज लौकर बाहेर निघत नाहीं ! त्यास आम्हीं तो आपली फौज आपल्या पत्रापूर्वी महादेवापासीं रवाना केली आहे. आम्ही तो तुम्हापाशीं येऊन पोंचतों. मागाहून राजश्री तात्या झाडून फौजा घेऊन येतील. पांच हजार फौज द्यावी म्हणोन बहुत प्रयत्न केला. कारभाऱ्यांनीं उगेंच आशेस लाविलें. शेवटीं आतां ह्मणतात कीं, तुम्हीं आपलेच पथकानिशीं जाणें ! फौज तूर्त येत नाहीं. त्यावरून आम्ही रुसवा करून सासवडापावेतों आलों. तेथून श्रीमंत नानांनीं माघारें नेलें कीं, तुमची रवानगी करितों. इतकें बोलोन ते लग्नास गेले. शेवटीं फौजेंतले पांच राऊत आमचेबरोबर दिले नाहींत ! आह्मी येतों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. २०३०. **श्री.** (माघ शु० १०-१७ फे०).

श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचे सेवेशीं अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित ह्मसाजी गायकवाड. दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष छ ८ मोहरम सोमवार प्रहर दिवसा मुधोळाहून रा॥ संकराजी घोरपडे हजार फौजेनिशीं परत करविरास गेले. साहेबांसीं कळावें करितां लिहिलें असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं २०३१. **श्री.** (माघ शु० १०-१७ फे०)

राजश्री चिंतोपंत[1] यांचे पत्राची नक्कल.

" विज्ञापना. ताा छ ८ मोहरम इंदुवारपर्यंत यथास्थित असे.

---

१ चिंतोपंत नांवाचे कोणी कमावीसदारानें मूळपत्र परशुरामभाऊंस लिहिलें त्याची ही नक्कल करून भाऊंनीं मिरजेस पाठविली.

विशेष. मुधोळकरांची फौज राजमंडळचे कुमकेस जाणार ही आवाई होती. हल्लीं आज राा रामचंद्र घोरपडे व घाटगे वगैरे मिळोन हजार बाराशें स्वार ढवळेश्वर प्रांत मुधोळ येथून कूच करून अडीच प्रहरां कबूरचे सुमारें येऊन पुढें डोणवाडावरून मनोळीवरून सामान-गडचे रोखें जात आहेत. हे शिंद्यास[1] मिळालियावर कांहीं राजश्री रामचंद्रपंत[2]तात्यावर गडबड करितील. शिंदा गुंडास[3] आहे. तोफा चार बाहेर काढल्या आहेत, परंतु बाहेर वडगांवास आले नाहींत. आतां हे मिळाल्यावर येतील. हें वर्तमान लिहून राा रामचंद्रपंत तात्यास कळविलें. आजच पत्रें गेलीं. आपणास परभारें यादवाडाहून वर्तमान गेलेंच असेल. सरकारची फौज अद्यापि आलियाची बातमी नाहीं. अद्याप निघालीच नाहीं ! ही फौज मिळालियावर तात्या कोणते सुमारें जातात पहावें. सेवेशीं श्रुत होय. आम्हापाशीं शिबंदी चार-साडेचारशें प्यादे आहेत. परंतु ठाणियांत शंभर आहेत. वरकड खेडि-यांनीं हुकेरी भोज वगैरे ठिकाणीं गेले आहेत. हे विज्ञापना.

नं. २०३२. (माघ शु० १२–१९ फे०)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें १० मोह-रमचें पत्र गंगाधरराव यांस मिरजेस–

" हरिपंत तात्या अद्यापि लोणीजवळच आहेत. पुढें जाण्या-विषयीं त्वरा करीतच आहों. विसाजी आपाजी व माधवराव धायगुडे महादेवापर्यंत गेल्याची बातमी आली. रा० महादजी शिंदे यांस बोलावूं वरचेवर पत्रें जातात. होळकरही जवळच आहेत, परंतु ठराव होणें तो नाना मेणवलीस लग्नाकरितां गेले आहेत ते परत आल्या-शिवाय होत नाहीं. शंकराजी घोरपडे यांस सरकारांत गुंतविण्या-विषयीं हरिपंत तात्या नेहमीं मालोजी घोरपडे यांस सांगत असतात.

---

१ येसाजी शिंद्यास. २ रामचंद्र गणेश याजवर. ३ पन्हाळ्यास.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

कारभारी यांचीही मालोजी घोरपडयांस नेहमीं याचविशीं चिठी जात असते. "

नं. २०२३. (माघ शु० १२–१९ फे०)

लक्ष्मण हरी लागू यांचें पत्र गंगाधररावांस १० मोहरमचें.

" हैदर नाइकाची फौज हुबळीवर आहे. आपली फौज मनोळी-वर आहे. शंकराजी घोरपडे व बुधकर घाटगे येसाजी शिंद्याच्या भेटीस्तव मुधोळाहून गेले आहेत. आज भेटी होतील. "

नं. २०२४. श्री. (२० फेब्रु०)

पैवस्ती छ १२ मोहरम.

सेवेशीं तीर्थी लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा मागृ शुा १३ गुरुवार प्रातःकाळ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस आशी-र्वाद–पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी सेवकावरी सदैव कृपा करून सविस्तर लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर वडिलीं राजश्री आनंदराव लिमये सरदेशकत यांजसमागमें आज्ञा कीं, " हैदरखान याजकडील फौजांची बातमी राखोन वरचेवर लिहित जाणें " म्हणून आज्ञा, त्यास काल बुधवारीं संध्याकाळीं बात मीचीं माणसें हुबळीवरून आलीं कीं, महमदअल्लीखान व कृष्णराव व श्रीपतराव वगैरे फौजेसह मोहरमीं असुराकरितां हुबळीवरी आजी पंधरा दिवस मुक्काम करून राहिले होते. प्रस्तुत तेथून गुरुवारीं अगर शुक्रवारीं कूच करून बेटगिरेचे मुक्कामास येणार. वाडियावरी पाय-दळ व तोफखाना ठेऊन पुढें सडे फौज व बैद व काकर वगैरे मनोळी व मुरगोडपर्यंत दौड पाठवावी. त्यानंतर मनोळीवरील फौज

---

१ हा बोडपाड येथील ठाणेदार.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गर्दिमी हालचाली इ.स. १७७७

दम धरून राहतात किंवा पुढें निघून जातात, ही योजना करून याअर्थीं बेटगिरेम येणार आहेत. वडिलांस कळला तो सेवेशीं विनंती लिहिलों. असो. विदित होय. राजश्री श्रीनिवासराव बारकी व उजनापा नगर हे फौजसुद्धां बंकापुरावरी आहेत. हे बेटगिरेचे सुमारें आलीयानंतर बंकापुरावरील फौज हुबळीस येणार ऐसा मनसुबा आहे. वडिलांस विदित होय. विशेष काय लिहिणें कृपा लोभ करावी हे विज्ञप्ति.

नं. २०३५. (माघ शु. १४–२१ फे.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र मुक्काम लष्करनजीक मनोळी येथून— पै॥ छ १५ मोहरम सब्बासबैन.

माघमास.

" तुम्ही डेऱ्यांतं राहण्याविशीं कितेक प्रकारें लिहिलें, त्यास हा डेरा तो डेरा दोन नाहींत ! मग गुंता काय ? तुम्ही लिहिलें कीं, ' तेथें राहिल्यानें संतोष होईल. ' त्यास तुमचे संतोषाहून आणखी विशेष काय आहे ? कित्येक संकल्पविकल्प होते, परंतु तुम्ही याप्रमाणें लिहिलें. याउपरी काडीचा संशय मनांत न आणितां दिवस उत्तम पाहून जातों. तेथें राहतों. याउपरी गुंता नाहीं. दिवस मात्र पाहून जातों. बहुत सावध राहत जावें. सर्व भार तुम्हांवर आहे. सर्वांचें शांतवन करीत असावें. ईश्वरें मोठा समय आणिला आहे. बरें ! श्रीगजानन सर्व अरिष्टें निवारण करील ! "

नं. २०३६. श्री. (२१ फेब्रु०)

सेवेशीं[3] शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत माघ शुद्ध चतुर्दशी भृगुवारपावेतों मुक्काम पुणें

---

१ हें कानडी माणसाचें मराठी वेडेंवांकडें आहे! २ मुख्य सरदाराच्या ह्मणजे आमच्या (मिरजकरांच्या) डेऱ्यांत. ३ गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस पुण्याहून पत्र.

येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र छ ५ मोहरमचें पाठविलें तें छ ११ मिनहूस पावलें. " लष्करचे नांवचे दोन लाखोटे व सुबराव यांचे दोन व बळवंतराव यांचा एक व श्रीमंतांचा एक याप्रमाणें पाठविले आहेत. ज्याचे त्यास पावते केले पाहिजेत. " संक्राजी घोरपडे तो कालच करवीराकडे गेला असेल अथवा आज जाईल. " ह्मणोन लिहिलें तें कळलें. " करवीरच्या पारिपत्यास होळकर पाठविणार ते लौकरच रवाना व्हावे. याउपरी उपेक्षा केल्यास बहुतच अवघड पडेल. आह्मी वारंवार लिहित गेलों असोन स्थिरता बहुत जाहली. " म्हणोन लिहिलें तें कळलें. फौजा लौकरच रवाना जाहल्या तरच बचाव आहे. नाहीं तरी मिरज प्रांतीं दंगा होऊन गांव खेडीं मारलीं जातील. ऐशास आह्मी पुरंदराहून येथें आलों. राजश्री हरीपंत तात्यांजवळ तिकडील वृत्त सविस्तर सांगितलें. फौजा लौकर गेल्यास उत्तम, नाहीं तरी पुढें मसलतीस कठीण पडेल, याप्रमाणें सांगितलें. त्यास राजश्री विसाजीपंत यांजबरोबर तीन हंजार हुजरातची फौज देऊन श्रीमंत राजश्री भाऊंकडे रवाना केले होते. त्यास मधीं मानकरी मिळोन लबाडी करावी, करवीराकडे जाऊन मिळावें, असें जाहलें म्हणोन विसाजीपंत व प्रतिनिधी व रामचंद्र गणेश एकत्र होऊन त्यांचें पारिपत्य करून मग विसाजीपंतांनीं भाऊंकडे जावें, याप्रमाणें विसाजीपंतांस पत्रें गेलीं. ते प्रतिनिधीकडे गेले. गुंता नाहीं. भाऊंकडे राजश्री नरसिंगराव धायगुडे व मानाजी शिंदे व मालोजी घोरपडे व पायगुंडे असीं चार पथकें मिळोन उदईक रवाना होतात. जलद जाऊन सामील होतील. संक्राजी घोरपडे यांची सातशें स्वारांची बोली करून चाकरीस सरकारांत ठेविले. करारांचीं पत्रें व

---

१ विसाजी आपाजी आठवले हा फडणिशीकडचा कारकून हल्लीं हुजरातींत हंगामी सरदार नेमिलेला होता. २ घाटगे, घोरपडे वगैरे. ३ मानाजी पायगुंडे याचें पथक चारशें स्वारांचें.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स.१७७७

सरकारचीं पत्रें भाऊंकडे जावयाचीं सांडणीस्वारांबरोबर पाठविलीं आहेत. मालोजीचे विद्यमानें संक्राजीची बोली जाहली आहे. एक दोन आडमुद्दे संक्राजीचे होते तेही यांणीं कबूल केले. याउपरी कर वीरकरांकडे जाणार नाहीं. भाऊंस जाऊन सामील होतील असें दिसतें. मग पहावें ! " श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांजकडील कारकून व स्वार पत्रें घेऊन आले जे, वस्तवानीसह राघोपंत तेथें आहेत त्यांची रवानगी करून देणें. त्याजवरून आज छ ९ रोजीं त्यांची रवानगी करून देतों. " म्हणोन लिहिलें तें कळलें. " राजश्री हरीपंत तात्यांचें कूच कधीं होणार तें लिहिणें. " म्हणोन आज्ञा, त्यास लोकांचा फडशा फार करून जाहला, चार रोजांत कूच करून दरमजल जातों म्हणोन तात्यांनीं सांगितलें. परंतु येथून कूच व्हावयासी अनिष्ट. पक्ष आठ दिवस लागतील. आह्मी व श्रीमंत राजश्री बळवंतराव[1] मिळोन राजश्री हरीपंत तात्यांकडे आलों. रागें भरलों. उपाय आमचा होता तो केला. चुकलों नाहीं. आठ दिवस याच मुक्कामास लागतील ! आह्मी यांच्या म्हटल्यावरून लिहीत गेलों तें सारेंच लटकें जाहलें ! आतां तसें होणार नाहीं असें वचन राजश्री हरीपंत तात्यांचें आहे. यांत घडेल तें प्रमाण ! आपण बहुत सावधपणें असावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०३७. (माघ व०—फेब्रु० दु० पंधर०).

शिवाजी बाबाजीचें पत्र गंगाधरराव यांस पुरंदराहून मिरजेस

" करवीरकरांकडे घोरपडे घाटगे—मिळाले, यामुळें त्यांचा जथ भारी होत चालला. इकडील सामान कळतच आहे ! रामचंद्र गणेश यांजवळ विसाजी आपाजी पोंचल्याचीं पत्रें आलीं. राजश्री भवानराव गेले नाहींत. पांच सातशें स्वारांनिशीं खानापुरास मुक्काम करून

---

१ बळवंतराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर.

आहेत. सरकारचा दाब उणा पडला याकरितां चाकरीचें लक्ष कोणी धरीत नाहीं ! हरीपंत तात्यांच्या लष्करांत रोजमुरा नाहीं. पुण्याचे आसपासचे तमाम गांव वैरणीबराबर लुटले जातात. मुलुखगिरींत गांव लुटतात त्याप्रमाणें पुणें प्रांतीं जालें आहे. कांहीं बाकी राहिली नाहीं. पुणें प्रांतीं काडीस हात लागत नव्हता त्याची अवस्था या प्रकारची जाली आहे."

नं. २०३८. श्री. (२२ फेब्रु०)

पौ छ १७ मोहरम. बुधवार.

सेवेशीं शिवाजी बाबाजी वे बाळाजी विष्णु कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत माघ शु० पौर्णिमा मंदवार. पावेतों मुक्काम पुणें येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र छ ९ मोहरमचें पाठविलें तें छ १२ मिनहूस पावलें. राजश्री बाजी राव बर्वे यांणीं पत्र आपणास पाठविलें त्याची नक्कल व आपण मशारनिल्हेच्या पत्राचें उत्तर लिहून दिलें त्याची नक्कल करून पाठविली त्याप्रमाणें पावली. लिहिला अभिप्राय कळला. श्रीमंत राजश्री पांडुरंगराव तात्या मंडळीसह पट्टणास नेले म्हणोन लिहिलें तें कळलें, तात्यांच्या जखमा बऱ्या जाहल्या किंवा नाहीं ? बातमी आलिया ल्याहावें. मंडळीसुद्धां पट्टणास आहेत किंवा निराळे निराळे आहेत त्याचा शोध आलिया लिहून पाठवावें. "श्रीमंत राजश्री मोरोबा दादा यांची समजाविशी होत होती ती जाहली कीं नाहीं ? समजाविशी जाहलिया फारच चांगलें," म्हणोन लिहिलें, त्यास राजश्री कृष्णराव बल्लाळ समजाविशीचें बोलणें बोलत आहेत. परंतु अद्यापि ठरावांत आलें नाहीं. ठरावांत काय येईल तें सविस्तर मागाहून लिहोन पाठवितों. मुंबईकर वकील मुंबईहन पुण्यास यावयासी निघाला आहे. आठ चार रोजांत

---

१ पत्र परशुरामभाऊंस.

येईल. बोलणें चालणें येथें येऊन झाल्यावरी लिहून पाठवूं. राजश्री संक्राजी घोरपडे व हणमंतराव घाटगे व नाईकजी घाटगे त्रिवर्ग एकत्र होऊन मुधोळाहून कूच करून करवीराकडे जाण्याकरितां गेले. नीच पथरूप (?) जातां गुंता नाहीं म्हणोन लिहिलें, त्यास संक्राजीचा बंदोबस्त मालोजी घोरपडे यांच्या विद्यमानें जाहला आहे आणि सरकारचीं पत्रें घोरपडयास गेलीं आहेत. मग काय करितो पहावें. परंतु फार करून करवीराकडे जाणार नाहीं असें दिसतें, मग पहावें. " मनोळीच्या ठाण्याविशीं राजश्री सदाशिवपंत[1] यांस वचन देऊन आणिलें. ठाणें आपले हवालीं करून घेतलें. दरम्यान रास्तेकडील आनंदराव निंबाजीस दिलें आहे. तरी सनदा पाठवाव्या व मशार-! निल्हेच्या घरच्या चौक्या उठवाव्या" म्हणोन लिहिलें, त्यास श्रीमंत राजश्री नाना लग्नास गेले अहेत ते आल्यावरी विनंति करितों. हरपनहळ्ळीकर व्यंकटराव याचें पत्र आपणास आलें तेंच बजिन्नस पाठविलें तें पावलें. बाजीराव बर्वे यांचें पत्र व हरपनहळ्ळीकराचीं पत्रें यांतील अर्थ सविस्तर राजश्री हरीपंत तात्यांस सांगितला आणि तींच पत्रें श्रीमंत राजश्री बळवंतराव दादा यांजकडे पुरंदरास पाठविलीं. दादा सखा रामबापूस दाखवितील. आपण लिहिलें कीं, फौजा लौकर आल्या तरच मनसब्यास ठीक पडेल, दिवसगत लागल्यास मग फारच कठीण पडेल, म्हणोन लिहिलें; त्यास फौजा जलदीनें आपणाकडे जाव्या; तात्यांनीं सत्वर कूच करावें; याविशीं निकडीची विनंति वारंवार करीत आहों. विनंती करण्याची पराकाष्ठा जाहली. फौजा जाऊन स्वामींस सामील होतील तेव्हां आमचे चाकरीचें स्वरूप कळेल ! " करवीरकरांनीं चोहोंकडून दंगा मांडिला आहे. अकस्मात् रात्रीस जाऊन गांवखेडीं

---

१ सदाशिव कृष्ण मनोळीकर. यांचे वंशज हल्लीं नासगांवांत राहतात. त्या वेळीं मनोळीची मामलत यांजकडे होती. उपनांव जोशी.

मारितो. कित्तरकर व शिंदा एक होणार. सूत्रें खेळत आहेत. आम्ही शिबंदीखर्चाखालीं व्यर्थ आलों. उपाय नाहीं. " म्हणून लिहिलें, त्यास राजश्री विसाजीपंत व पंतप्रतिनिधी व रामचंद्र गणेश हे एकत्र झाले म्हणजे शिंद्याच्या तोंडावरी जातील. आपण आपल्या गांवखेडयांचा बंदोबस्त करवावा. मातुश्री अनूबाई[1]कडील पांच हजार रुपये येथें खर्चास घेतले त्याची नरात घेऊन पाठवून देणें म्हणोन लिहिलें, त्यास वरातीविशीं हरीपंतांस विचारिलें आहे. मागाहून वरात घेऊन पाठविनों. आपण लिहिलें कीं, " फौजेविशीं लिहिण्याची तो शर्त जाली. आज दीड महिना लिहितां लिहितां दमलों. परंतु अद्यापि फौज येत नाहीं ! असो ! " म्हणून लिहिलें, त्याम लढाई बिघडल्याचें वर्तमान आल्यातागाईत तिकडे फौजा लौकर रवाना व्हाव्या येविशीं विनंती निकडीची करितों. त्यास फौजा आपणाजवळ जाऊन पोंचतील तेव्हां स्वामीस कळेल ! यत्नास चुकत नाहीं. आम्ही यत्न करितों परंतु फळास येत नाहीं त्यास इलाज काय करावा ? धांवाधांवीस चुकत नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०३९. (माघ व० २--२४ फेब्रु०)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र १५ मोहरमचें लष्कर मुक्काम मनोळी येथून मिरजेस.

" आम्हास तर मोठाच पेंच प्राप्त जाला आहे. मागेंही जातां नये, पुढेंही जातां नये, असें प्राप्त जालें आहे. उपाय काय ! शत्रूचें सामान जयतच जातें. आम्ही येथें आहों याजमुळें अद्यापि हुबळीहून शत्रूचें कूच नाहीं. याउपर कूचही होणार म्हणून आवई आहे. कूच करून कोणीकडे येतात न कळे ! येसाजी शिंद्याचें खूळ मोडलें म्हणजे मागील काळजी नाहीं. मग पुढें पाऊल टाकावयास पेंच नाहीं.

---

१ घोरपडे इचलकरंजीकर.

मागें पाहून पुढें पाऊल टाकण्यांत मोठा पेंच आहे. काय करावें ! आज दोन दिवस आमची कही बारीपार जात असते. समागमें मातबर पथक द्यावें लागते. "

न. २०४०. (माघ व० २ –२४ फेब्रु०)

शिवाजी बाबाजीचें गंगाधररावास पत्र पुरंदराहून मिरजेस माघ वद्य द्वितीयेचें-- -

" हरीपंत तात्यांचें कूच अद्यापि जालें नाहीं. कूच लौकर होतां दिसत नाहीं. नरसिंगराव धायगुडे उद्यां रवाना होणार म्हणून हरीपंतांच्या सांगण्यावरून लिहिलें होतें, परंतु अद्यापि रवाना जाले नाहींत, व लौकर रवाना होऊन भाऊंस जाऊन मिळतील असें म्हणवत नाहीं. येसाजी शिंदा मिरज प्रांतीं गडबड करील यास्तव रामचंद्र गणेश व प्रतिनिधि व विसाजीपंत यांणीं एकत्र होऊन तूर्त तिकडे बळ पाडावें असा मनसबा जाला आहे. नाना लग्नास कोंकणांत गेले आहेत त्यांस तिकडे आठ चार दिवस लागतील. उपरांत येथें येऊन शिंदे होळकरांजवळ बोलून मसलतीस सिद्ध करावें असें आहे. घडेल तेव्हां खरें ! भाऊंचा मुक्काम आज दीड महिना मनोळीवर आहे. वैरण मिळत नाहीं. परगणा खराब जाला. डावें उजवें कोणीकडे जावें तरी शत्रू बारी बळकावील यास्तव त्यांम कोणीकडे जातां नये. आज दीड महिना आम्ही उभयतां कारभारी यांस विनंति करितां करितां दमलों. राजश्री हरीपंतांकडे सांगून पाहिलें. परंतु सांगितल्याप्रमाणें कांहीं निदर्शनास येत नाहीं, मोहरमच्या दहा तेरखा जाल्यावर हैदरखान पट्टणाहून फौजेनिशीं धारवाडप्रांतीं येतो म्हणून तहकीक वर्तमान लिहिलें तें कळलें. हरीपंत तात्यांनी फौजेची तोड काढली होती. कर्जपट्टीचा ऐवज व होळकरांकडील नऊ लक्षांचा ठराव जाला त्यांपैकीं सहा लक्षांची नेमणूक यांजकडे केली होती. तो ऐवज घेऊन

वांटणी करून मजल दरमजल जावेंसा ठराव करूनच श्रीमंत राजश्री नाना लश्कर गेले. मागें होळकराकडील ऐवज न देणेंविशीं फिसाद जांबुवंतानें केली त्याजवरून तूर्त ऐवज हातास येत नाहींसें जालें आहे. तेव्हां फौजेची तोड निघत नाहीं. सारांश, भरंवसा फौजेचा नाहीं. बुडवावयाचा समय दिसतो. "

नं. २०४१. श्री. (माघ व० ३–२५ फेब्रु.)

पैवस्ती छ १८ मोहरम.

श्रीमंत राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं—

पोष्य विसाजी आपाजी. साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागा छ १६ मोहरम. मुक्काम मळणगांव. यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें छ १३ मोहरमीं खानापूरचे मुक्कामीं पावलें. " तुमची रवानगी फौजसुद्धां झाल्याचें वर्तमान फार दिवस वरचेवर लिहोन येतें, अद्यापि पंचक्रोशींत[1] आहां, ही गोष्ट मसलतीस फार वाईट. शत्रूनें आमचा शह नजीक आल्यामुळें धारवाड सोडून हुबळीवर वातेच्या खणून राहिला आहे. त्याची कुमक मागाहून वरचेवर येते. लढाई बिघडून सवा महिना जाला. अद्याप सरकारची फौज येत नाहीं हें अपूर्व वाटतें ! असो. तुमची रवानगी जाल्याप्रमाणें जलद येऊन पोंचावें. " म्हणून व करवीराकडील मजकूर व हैदरखानाकडून करवीरास खर्चास गेल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास भाऊ ! आमची रवानगी जाल्यावर लांब लांब मजली करून निकडीनें आपलेकडे येत असतां मागाहून आज्ञा आली कीं, " करवीरकरांचा जमाव भारी होत चालला, याजकरितां सध्या तुम्ही कर्नाटकाकडे न जाणें. राजश्री पंतप्रतिनिधीस मेळवून राजश्री रामचंद्रपंत तात्या व बाजीपंत अण्णा सारे एकत्र होऊन करवीरकरांचें

---

१ उपनाम आठवले. २ पुण्याच्या पंचक्रोशींत.

पारिपत्य झालें पाहिजे. " म्हणून दोन तीन पत्रें निक्षूनच आलीं. त्याजवरून खानापुरास आलों. पंतांचें दर्शन जालें. बोलावयाचे अर्थ होते ते बोललों. परंतु धातुपोषण मात्र ! यावयाचें मानस तूर्त दिसत नाहीं. याजकरितां आम्ही निरोप घेऊन उभयतांचीं निकडीचीं पत्रें आलीं होतीं तिकडे गेलों. तूर्त उभयतां वारणा संगमावर वडसावीस आहेत. करवीरकरांस घोरपडे, घाटगे वगैरे नवीन चार हजार फौज जाऊन मिळाली. जमाव भारी जाहला. त्याणीं पुढें चार हजार फौज येऊन वारणेअलीकडे भोवेडें म्हणून गांव सरकारचा मारून सडे तेथें आहेत. याप्रमाणें इकडील अर्थ. आपलेकडे येण्याचे निकडीमुळें मागन फौज यावयाची त्या पथकांची देखील वाट पाहिली नाहीं. शेवटीं असा प्रकार झाला " नरसिंगराव बाबा धायगुडे यांची फौज महादेवाजवळ ठेवावी. मागाहून मशारनिल्हेची रवानगी करितों " म्हणून व " मानाजी शिंदे यांची रवानगी करितों. उभयतां भाऊंकडे जातील, " म्हणोन पुरंदराहून लिहून आलें, त्याजवरून बाबांची फौज मागाहून ठेविली. आपले समागमाची इच्छा फार होती, ईश्वर इच्छा ! घडविणें स्वामीकडे आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०४२. (माघ व० ३–२५ फेब्रुवारी.)

शिवाजी बाबाजीचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र पुरंदराहून मिरजेस.

" खासा नरसिंगराव पुढें गेले नाहींत. त्यांचे बंधु माधवराव गेले आहेत. नरसिंगराव बाबा खासा व मालोजी घोरपडे व मानाजी शिंदे व पायगुंडे येणेंप्रमाणें आजच निघोन गेले. महादजी शिंदे यांचे आडमुद्दे ऐकोन घेऊन करवीरचें यश त्यांस द्यावें असा निश्चय कारभारी यांच्या बोलण्यांत आहे. "

---

१ रामचंद्र गणेश व बाजीपंत यांचीं.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हा चाली इ.स. १७७७

नं. २०४३. श्री. (माघ व० ३–२५ फेब्रु०)

पैा छ १६ मोहरम. भौमवार.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंति सेवक लिंगो येळदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ताा छ १६ मोहरमपावेतों मुक्काम येकोडी. स्वामीचे कृपें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं तीन स्वार रखवालीस पाठविले ते येथें येऊन पोंचले. त्यांजबरोबर आज्ञापत्र निरोपिलें ते मस्तकीं वंदून सनाथ जालों. शत्रूकडील बातमी लिहिणे-विशीं आज्ञा, त्यास हुबळीहून शत्रु कुसुगल देसाई नवलगुंदकर याच्या गांवावरी कहीस येऊन गांवांत शिरून कबाड बांधीत असतां गांवां-तील लोकांनीं गोळ्या मारून पिटून बाहेर कहाडिलें. दहा पांच घोडीं पाडाव करून घेतलीं. दुसरे दिवशीं हुबळीहून सडी फौज तोफांसुद्धा कुसेगलावर येऊन तोफा लाविल्या. परंतु कारेगारी चालली नाहीं जूज होऊन दहा वीस ठार होऊन व कांहीं जखमी होऊन माघारे गेले. आणि सडी फौज मागती स्वारी करावी म्हणोन काल संध्या-काळीं हुबळीस येऊन उतरली आहे म्हणोन वर्तमान आलें आहे. सत्य मिथ्या न कळे, याजकरितां मुद्दाम माणूस बातमीस पाठ-विलें असे. येतांच सेवेशीं लिहितों. रखवालीस स्वार दररोज रुपये २। दर असामीस मागतात. त्यास पोटास व दाणावैरण घेऊन राहणेविशीं निरोपावें. सेवग्याच्या शेंगा स्वामींकारणें पाठविल्या आहेत. हे विज्ञप्ति.

नं. २०४४. श्री. (माघ व० ४–२६ फेब्रु०)

पैा छ १९ मोहरम.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेशीं. विनंती सेवक अंताजी शंकर[1]. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान

---

१ फडणीस वरगणे तेरदाळ, उपनाम फणसाळकर.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

तागायत छ १७ मोहरम बुधवार प्रथम प्रहर रात्रीपावेतों यथास्थित असे. विशेष. पुरंदराहून फौज रवाना जाली ते महादेवाचे सुमारें आली. म्हणोन वर्तमान कळलें, त्याजवरून बातमीस माणसें पाठविलीं होतीं; मौजे हिंगणगांव प्रांत मिरज येथें गेलीं व फौजही तिकडून आली. हिंगणगांवापासून दोन कोसांवर मौजे मळणगांव व शिरढोण येथें काली मोकाम मंगळवारीं जाहला. उदईक कूच होऊन पुढें येणार, याप्रमाणें कागद काल मंगळवार तेरखेचें पत्र आजी राा रायगौंडा पाटील हिंगणगांवकर याचें आलें. फौजेंत सरदार राजश्री विसाजीपंत बापू म्हणून आहेत. फौज चार पांच हजार आहे. फौजेंत कैद नाहीं. गांवखेडीं लुटितात. याप्रमाणें रायगौंडानें लिहिलें आहे. याप्रमाणें बातमी सेवेशीं कळावी म्हणोन लिहिलें असे. राजश्री संकराजी घोरपडे करवीरास गेले. शिंदेही पुढें दोन कोस सामोरे येऊन भेटी जाहल्या. पंचगंगातीरीं स्वामीचे मठानजीक उतरले आहेत. पैकेच्या निशेचा खटला पडला आहे. पुढें काय घडतें पहावें. तिकडीलही बातमी आतांच आली. पुरंदराहूनही संकराजी घोरपडे यांसीं पत्रें उभयतां कार्यभागी यांचीं व राजश्री मालोजी घोरपडे यांचीं आलीं आहेत. सातशें स्वारांची बोली सरकारांत ठरली आहे. शेरा पेशजी सरकारांत आहे त्याप्रमाणें द्यावा, याखेरीज जातीस पन्नास हजार रुपये दरसाल द्यावे असें ठरलें. " सातशें स्वारांनिशीं चाकरीस येणें " म्हणोन पत्रें आलीं आहेत असें वर्तमान आहे. सेवेशीं कळावें म्हणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २०४५. (माघ व० ४--२६ फेब्रुवारी.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र छ १७ मोहरमचें. लष्कर मुक्काम मनोळी येथून मिरजेस—

" नरसिंगराव धायगुडे व मानाजी शिंदे व मालोजी घोरपडे यांची सरकारांतून इकडे रवानगी जाली. याउपर कोठें न गुंततां

आपणाकडे येतील " असें शिवाजीपंतांनीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें येतील तेव्हां खरे ! आमची लिहावयाची सीमा जाली. राजश्री हरी-पंततात्यांचें अद्यापि कूच नाहीं. थेउरावरच आहेत ! मुलुखगिरीचे दिवस तर थोडे राहिले. कारभारी यांनीं काय योजिलें आहे न कळे. शत्रुकडील फौज सडी वारीपार वंटनाळ सौंदत्तीपर्यंत आली होती. फिरोन मोरबेस माघारे गेले. आह्मीं दोन तीन बाऱ्यांस चौकी ठेऊन बंदोबस्त केला आहे. त्या बाऱ्यांतून शत्रूची फौज यावयास वाट नाहीं. ते काल तलाव्यास आले होते म्हणून आह्मी आज एकोडीच्या वारीपार जाऊन आलों. त्यांची चार हजार फौज पुढें आली होती ती माघारी हुबळीस गेली. आह्मी सायंकाळीं माघारे आलों. "

नं. २०४६. **श्री.** (माघ व० ४—२६ फेब्रु०)

पैा छ १८ मोहरम.

तीर्थस्वरूप राजश्री परशुरामपंतभाऊ वडिलांचे सेवेशीं अपत्यें काळो बहिरेव साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल तागायत १७ मोहरम दोनप्रहर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. हुबळीकरांच्या फौजेपैकीं दोन अडीच हजार फौज मोरबेवर आल्याची बातमी काल तिसरे प्रहरीं आली ती टाकोटाक लिहून आपणाकडे माणसें रवाना केलीं तीं आज हुबळीच्या बारीस सूर्यो-दयास जाऊन माणसें पावलीं. तों तिकडून आपली कही बारीपार होऊन येत होती. पेंढाऱ्यांनीं माणसांस नागवून कागदपत्र घेतले. माणसांची फाजिती लिहितां पुरेना ! या प्रकारें बेकैदी आपणाकडील राऊत करितात. नाजूक बातमी आपणास पोंचावी म्हणून माणसें रवाना केल्यास ही गत होत्ये ! असें जाहल्यास बातमी पोंचत नाहीं. आपणास कळावें याकरितां लिहिलें आहे. कही आलेली नीट खेडया. वर चालोन येतात याची वाट काय ? खेडीं मारावयाचा प्रकार आहे कीं काय ? कळविलें पाहिजे. मोरबेकडील वर्तमान काल पांचवे तासीं

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

फौज आठ हजार व पायींचें माणूस मिळोन आली. सर्वेच एकोडीस जावयाकरितां गेली म्हणोन वर्तमान आलें आहे. आपली बातमी असेल. इकडे आलें वर्तमान लिहिलें आहे. बारीक मोठें वर्तमान लिहून माणसें पाठविलीं होतीं. कागद घेतले, माणसांस नागविलें, याउपर वर्तमान तरी कसें पावेल ? चार जोडया आपणाकडे जाऊन पांच रोज जाले. अद्यापि कांहीं वर्तमान कळलें नाहीं. सविस्तर निरोपावें. कृपा करावी हे विनंती.

नं. २०४७. **श्रीगणपति.** (२६ फेब्रुवारी.)

पैवस्ती छ १८ मोहरम.

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेशीं—

पोष्य रामचंद्र सिद्धेश्वर मनोहर मुक्काम मिरज. साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ माघ वद्य ४ बुधवारपावेतों यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. चिरंजीव विठोबा तोतयाकडे गेल्यामुळें आम्हावर पेंच आला. त्याचा प्रकार श्रीमंत राजश्री बाळासाहेब याणीं लिहिलें होतें त्यावरून कळलेंच असेल. राजश्री नाना व बापू व शिवाजीपंत यांस पत्रें लिहून पाठवावीं. आपलेशिवाय आम्हांवरील पेंच दूर करणार कोण आहे ? पत्रें अगत्यरूप पाठवून द्यावीं, अनमान न करावा. पत्राचा अनवा[1] पेशजी पाठविला आहे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करीत असिलें पाहिजे. हे विनंती.

नं. २०४८. **श्रीसुब्रह्मण्य.** (माघ व० ५–२७ फेब्रु०)

राजश्री परशुरामपंतभाऊ गोसावी यांस—

दंडवत[2]. विनंति. येथील क्षेम जाणन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. यानंतर आपण स्मरणपर्वक ममतापत्र लिहिलें. बहुत

---

१ अनवा ह्मणजे मसुदा. २ पत्र दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर यांचें.

संतोष पावलों. फौज घेऊन अतिसत्वर यावें म्हणन लिहिलें. उत्तम. याहून अधिकोत्तर काय ? राजश्री देवजीपंत सुभेदार आज उदईक फौजसुद्धां येणार. आम्ही पहिल्यापासोन आपल्या लक्षांतच असों. कैलासवासी दादा याणीं बहुतां प्रकारें श्रीमंत पेशवे यांचे दरबारीं साहित्य करून आम्हीं आजीपावेतों राहावें असें जाहलें. हल्लीं त्यांचे ठायीं तुम्ही आहां, जेणेंकडून पहिल्याप्रमाणें ममता असलिया आम्हांस आपल्याखेरीज दुसरी जोड आहे कीं काय ? आपणास मुद्दाम जासूदजोडीयांसमागमें अधिकउणें घरोब्यानें लिहिलें आहे. राग न करावा. आपण तरी सांगणाराचे गोष्टीवरी न जातां जें करणें तें दूर-देशी पाहून कर्तव्य करावें. या काळांत अबरूच्या लोकांचें संकट आहे ! बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. २०४९. **श्रीसुब्रह्मण्य**. (माघ व० ५–२७ फेब्रु०)

पैवस्ती छ १८ मोहरम.

राजश्री परशुरामपंतभाऊ गोस्वामी यांस.

दंडवत. विनंती उपरी आपणास आह्मीं एक दोन पत्रें पाठविलीं त्याप्रमाणें मसलत केली; तेणेंकडून अमित्रास धाशत बहुत तजविजेंत पडून त्यानें श्रीरंगपट्टणास पत्रें पाठविलीं आहेत म्हणून वर्तमान. उत्तरेकडून फौजाही न आल्या, आश्चर्य ! आपण कोणतेंही जलदीनें न करावें. धीर थोर गोष्ट. रात्रींच्या समयांत फार जागरूक असावें. डेरेभोंवतीं चौकी मावळे लोकांची असों द्यावी. आह्मी वृद्ध आमचें लिहिणें मानीत जावें. येणेंकरून श्रेय आहे, आणि कार्यासही येईल. राजश्री देवजी सुभेदार लोकांची समजावीसी करून स्वल्प दिवसांत येऊन पावतात. दिवसगत कां लागली म्हणून शब्द ठेवाल तरी चिरंजीवांनीं लोकांस देणेंघेणेंविशीं कबूल केलें त्याचा निकाल

---

१ गोपाळराव गोविंद. २ हेंही पत्र दौलतराव घोरपड्यांचें.

पडेना, यास्तव हे दिवस लागले. नाहीं तरी राहणें काय कामाचें ? मनसब्याचा भार आपणावर. सर्वत्रांवर ममता करून सेवा घ्यावी. कार्यें साधणें ज्यास त्याणीं सर्वत्रांवर एकरूप ममता करीत जावें. सज्ञाप्रती विशद लिहिणें नलगे. हे विनंती.

नं. २०५०. (माघ व० ६–२८ फेब्रु०)

शिवाजी बाबाजीचें पत्र गंगाधरराव यांस १९ मोहरमचें पुरंदराहून मिरजेस—

" हरीपंततात्यांची रवानगी करण्याविशीं त्वरा व्हावी म्हणून लिहिलें, त्यास आम्ही पहिल्यानें पुण्यास आलों तेव्हां होळकराकडील ऐवजास हिसका बसला म्हणोन पुरंदरास जाऊन होळकर जेजुरीहून कुरकुंब्यास गेले त्यांजकडे माणसें व पत्रें पाठविलीं. होळकराकडील ऐवज हातास येतांच पुढें फौज येणार ती व राजश्री हरीपंतांचें कूच होणार. श्रीमंत राजश्री नाना लग्नाकारितां कोंकणांत गेले होते. लग्न माघ शु० १५ स जालें. काल तेथून निघाले. उदईक पुण्यास घरास येणार. शिंदे म्हणतील तें मान्य करून त्यांस करवीरची मसलत सांगावी, येणेंप्रमाणें ठराव जाला आहे. "

नं. २०५१. श्री. (माघ व०–मार्च प० पंधर०)

यादी लष्करपायमल्ली खर्च मौजे व कर्यात ढालगांव सुरूसन सब्बा सबैन.

---

१ या पत्रांत वजनी जिनसाचें पक्कें वजन दिलें आहे तें हल्लींप्रमाणेंच ८० भार शेर व ४० शेरांचा मण असें होतें. कैली माप मात्र त्या काळीं मिरज प्रांतीं ६४ भार मापटें असे व हल्लीं ८० भार आहे. माप बारुलें होतें तें वर सांगितलेंच आहे. या सर्व गोष्टी लक्ष्यांत ठेवून तुलना करून पाहिल्यास पेशवाईतल्या धारणी हल्लींपेक्षां फार स्वस्त होत्या असें दिसत नाहीं. मात्र गेलीं बारा वर्षें दुष्काळाचीं व महागाईचीं गेल्यामुळें तेवढीं बजा केलीं पाहिजेत.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

कि॥ मसाला व रोखे.
२०० ब॥ रोख[1].
१० जाजती खेडेस म्हणोन घेतले.
१०० मसाल्यास ऐवज गांवांत उत्पन्न होईना. निकड करूं लागले. ते समयीं घोडा किंमत रुपये ३०० सवदागिरांनीं मागितला होता तेव्हां दिला नाहीं. तो गांवखराबीमुळें हल्लीं भरतीस घातला.
१२ मसाल्याचे राऊत ५ असामी यांनीं कमरखुलाई म्हणून घेतले.
१० कमरखुलाई.
२ खोजगिरी.
१२
३७ अंतस्थ खुद्द केसोबा ओक
५ ओलाँ स्वाध्यान त्याबद्दल मोरोपंत यांस.
१ भटीब॥
३६५

१२ पागेस चंदी. हरबरे, कैली बारूलें मापें -।१ दर ८॥- प्रमाणें.
१०।= जोरी. कैली बारूलें मापें दर ८॥२ प्रमाणें.
१२॥= वजनी. वजन पक्कें.
१॥ तूप ८८३
-।= कणीक ८८६
-॥।- गूळ ८८६
-॥- हळद ८८४
-॥- भांग
१ अफू
४ अंबाडी ८१
४ सूत ८८६
१२॥=
२०॥ सुमारी. सुमार.
६॥ नालदबे २० दर ३ प्रमाणें.
२ मेखा ५००
८ चरसे २ दर ४
४ खाद्या २
२०॥
५५॥

---

१ ब॥ रोखा = बमोजीब रोखा. रोख्याबरहुकूम. २ हा बिसाजीपंत आठवल्याची रोखाचिट्ठी घेऊन त्याच्या लष्करांतून स्वार घेऊन कारकून आला होता. नारायणराव पेशव्यांचा मारेकरी महमद इसब यास नागपूरकर भोंसल्यांनीं कैद केलें होतें तेव्हां नागपुराहून त्यास आणण्याकरितां हरीपंत फडक्यानीं मागें याच इसमास पाठविलें होतें. (पहा नं. १५४०). ३ गांवकरी ओलीस म्हणून लष्करच्या लोकांच्या स्वाधीन केले त्यांच्या पोटगीस.

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

किरकोळ खर्च.

२ ॥ स्वार रोखा घेऊन आले
त्यांस दुरोजा पोटास.

-॥- गहूं ८८३ दळ-
णावळसुद्धां.

८॥ गूळ वजन८८ २॥

८॥ सुपारी ८८१।

८- तंबाकू ८८१।

८॥ मीठ

८- भांग

१ तूप

-।॥ डाळ कैली.

२॥॥।

२८॥ केसोपंत यांसीं भोजनखर्च.

-।॥ गहूं कैली ८८१॥
दळणावळसुद्धां.

-॥- तांदूळ ८८१

-॥- सुपारी पक्के ८८१।

८- ॥ डाळ तुरीची ८८॥-

-॥- पानें सुमार १०००

८॥ सोले वजन पक्के.
८८३।

२८॥

४॥- किरकोळ खर्च.

२ दाणे कैली८१८३॥
गु॥ नागाप्पा.

-॥- गहूं ८८२

८- पानें सुमार १५०

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

·।·	ढाल्ये यांसीं
·॥·	सराफदार वगैरे
१	वोल पाठविली नाईकोजी दुवा त्याच्या पाटास.
	४॥–
	९।–॥
	४२९॥–॥

नं. २०५२. (माघ व० ८–२ मार्च.)

परशुरामभाऊंचें मनोळीहून लष्करांतून गंगाधरराव यांस पत्र मिरजेस. रवाना छ २१ मोहरम.

" शत्रूची फौज हुबळीसच आहे. आजी उदईक सडे स्वारीनिशीं बारीपार जातों. एक दोन दिवस बारीपार राहून माघारे येतों. सावधतेनेंच जातों. येथें वैरण देखील मिळेनाशी जाली आहे. काय करावें ! ईश्वरें संकटीं घातलें आहे. पार पाडणारही तोच आहे ! "

नं. २०५३. (४ मार्च.)

शिवाजी बाबाजीचें गंगाधरराव यांस पत्र माघ व० १० भौमवासरचें पुण्याहून मिरजेस—

" राजश्री नाना लग्नास गेले होते ते समागमें स्त्री घेऊन वद्य सप्तमी मंदवारीं पुण्यास आले. मध्यें होळकराकडील ऐवजास हिसका बसला होता त्यास होळकर कुरकुंब्याहून उरळीस आले; आतां त्यांनीं ऐवज द्यावासें ठरलें आहे. हरीपंततात्या उदईक एकादशीस कूच करून जाणार असा सिद्धांत जाला आहे. शंकराजी घोरपडे येसाजी शिंद्याजवळ एक किल्ला मागतो तेव्हां त्याचें त्याचें बनेलच असें नाहीं.

राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी आपाजी यांच्या फौजेनें मिरज प्रांताचीं खेडीं लुटल्याचें आपण लिहिलें ती पुरवणीच नानांस दाखविली. तेव्हां ते बोलले कीं, ' पुणें प्रांताच्या गांवखेडयांची अवस्था तुम्ही पहातच आहां. तसेंच तिकडेही जालें असेल. इलाज नाहीं. कालच्च असा आला ! कांहीं बाकी कोठें राहतां दिसत नाहीं. ' असें म्हणत होते. सारांश, राज्याचा बरा विचार दिसत नाहीं ! "

नं. २०५४. **श्रीगणपति.** (माघ व० ११–५ मार्च.)

आशीर्वाद उपरी. शत्रूकडील लोक वंटनाळपावेतों येऊं लागले व कहीस दगा करावा म्हणून त्यांची फौज मोरबचे आसरेस राहून संवदत्तीपावेतों आले. याजकरितां आम्ही सोमवारीं सडे होऊन संवदत्तीनजीक मुक्कामास आलों. काल भौमवारीं बेटगिरेपावेतों तलाव्यास गेलों होतों. त्यांजकडील राऊत कोणी आढळला नाहीं. झाडून हुबळीसच्च गेले. देशाकडून फौज यावयाचा प्रकार दिसत नाहीं, एक जागां किती दिवस असावें ? आणि वैरणही लांबत चालली. याजकरितां सडे होऊन येथें आलों; याजमुळें कहीचाही सुभत्ता व त्यांजकडील पुढें येणारासही दबाव. व रबीही मिळती, चार दिवस घोडीं तरी ताजीं होतील. असें समजोन सडे होऊन येथें आलों. शिवरात्रीस गोटास जाऊन फिरोन सडेच येथें येऊं. चिरंजीव राजश्री राघोबादादास ज्वर येत होता म्हणून गोटांत ठेऊन आलों. ज्वर राहिला. कळावें. पेंढारी याचें खत पाठविलें तें पावलें. आणखी दुसरें खत याचे नांवचें आहे म्हणून लिहिलें तें कळलें. याची उगवणी जाहल्यानंतर तेंही मनास आणूं. दुसरें खत किती रुपयांचें आहे त्याचीही नक्कल पाठवून देणें. आम्ही उदईक गोटास जातों. मागाहून फौज येत नाहीं तेव्हां येथेंच किती दिवस बसावें ? व रोज

---

१ परशुरामभाऊंचें गंगाधररावास पत्र मिरजेस.

मुऱ्यासही ऐवज नाहीं, व लोकांचा गवगवा पडणार, हें ठीक नाहीं. लांब स्वारीस जावें तर शत्रु हुबळीस आहे. बुणगें दूर राहतें. यास्तव सर्वांचे विचारें बुणगें मुदलावीचे सुमारें आसऱ्यास ठेवावें. मग गदग प्रांत, नवलगुंद प्रांत, लक्ष्मेश्वर तालुका वैगरे व सावनूर तालुक्यांत स्वाऱ्या कराव्या. चार रूपये कोठें मिळाले तर पहावें ! काल तर कठीण दिसतो. कांहीं सुचत नाहीं. येथें राहून तरी आठ चार दिवसांत फौज येते असें नाहीं, यास्तव असें योजिलें आहे. गनिमी सडे फिरोन दिवस घालवावे ! फल नाहीं असे दिवस आले आहेत ! आणखी दोन चार हजार फौज तरी येती तरी काम होतें. बरें ! ऋणानुबंधेंकडून घडेल तें खरें ! याप्रमाणें शिवाजीपंत यांसींही लिहिलें आहे. कोठें तोफा लावून ठाणें घ्यावें तर तेंही ठीक पडणार नाहीं. बहुतच पेंच दिसतात. मुभत्ता मनसवियांत दिसत नाहीं. एक श्रीमंताचे पुण्येंकडून काय घडेल तें घडो ! असो. जिवांत जीव आहे तों यत्न करावा. फलदाता ईश्वर आहे. मुदलावी येथून दूर नाहीं. बारा कोस आहे. सडे चहूंकडे फिरतां काय होतें हेंही कळेल. प्रांत सुटणें कठीण दिसतो. अंमल बसत नाहीं. खर्चास मिळत नाहीं. फाजितीचा रंग आहे ! यांत श्रीगजानन कृपा करील तर काय एक न घडेल ? वरकड कांहीं दिसत नाहीं. बहुत सावधतेनें आहों. अद्यापि हैदर पट्टणांतच आहे. आमचीं मंडळीं सर्व पट्टणासच आहे. उभयतांचा बहुत सन्मान हैदरखान करीत आहें म्हणोन वर्तमान आलें आहे. आम्हीं येथन लिगू फरास एक गृहस्थाबरोबर पट्टणास पाठविला आहे. पहिलीं माणसें गेलीं आहेत. लहकीक वर्तमान येईल तें खरें ! रामचंद्रपंत व करवीरकर कोठें आहेत हें लिहावें. करवीरकर याणीं शें दोनशें राऊत किल्लूर प्रांतांतून हैदराकडे रवाना केले म्ह-

---

१ पांडुरंगराव गोविंद व श्रीपतराव मोरेश्वर यांचा.

णोन वर्तमान आहे. त्यांचें त्यांचें सूत्र आहे यांत संशय नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

"नबाबाकडे बातमीस आणखी जासूदजोडया रवाना कराव्या. शिवाजीपंत म्हणोन सरकारचे वकील तेथें आहेत त्यांसीं पत्रें लिहून रवाना करावीं. म्हणजे धौशा[1] व ते भेटून पुढें येणार होते तें वर्तमान कळेल. त्यांचा व आपला मनसबा एकच आहे किंवा कांहीं कोठें मनसब्याची सुरत दिसत नाहीं ? काशीरामबोवा बैरागी आले; मागाहून तरवारसिंग पुण्यास आले आहेत ते येणार," म्हणून लिहिलें तें कळलें. बैरागीबोवा आले, चांगलें जाहलें. हे आशीर्वाद.

नं. २०५५. (माघ व० १२–६ मार्च.)

नजीक सौंदत्ती सडे स्वारींतून परशुरामभाऊंचें पत्र छ २५ मोहरमचें गंगाधरराव यांस मिरजेस—

"शत्रूकडील फौज हुबळीहून कूच करून माघारी छबी आरलीकट्टें येथें मुक्कामास गेली म्हणून धारवाडाहून आतांच बातमी आली. उद्यां शिवरात्र याजकरितां आमचें मत माघारे गोटास जाऊन पुनः यावें असें आहे. परंतु सर्वांचे विचारें ठरेल तसें करूं."

नं. २०५६. (माघ व० १२–६ मार्च.)

शिवाजी बाबाजीचें पुण्याहून मिरजेस गंगाधरराव यांस पत्र छ २५ मोहरम गुरूवासरचें—

"होळकराकडील ऐवजाविशीं नाना व हरीपंततात्या होळकराच्या डेऱ्यास गेले होते. त्यांनीं ऐवज द्यावासें ठरलें आहे. हातीं ऐवज आल्यावर हरीपंत फौजसुद्धां ताबडतोब निघून येतात. "हैदरखानाची फौज हुबळीवर आहे तिला वारंवार कुमक येऊन मोठाच जथ पडत चालला आहे तेव्हां आपल्या फौजेचें राहणें मनोळीस कसें होईल" म्हणून लिहिलें, त्यास दोन चार दिवसांत हरीपंतांचें कूच

---

[1] धौशा व निजामअली.

जालें तर उत्तमच. नाहीं तरी आतां भाऊंनीं जडभारी मागें ठेवून सडे होऊन डावे उजवे बाजूनें राहत जावें हें उत्तम. आम्ही दोन महिने फौज पाठवावयाविशीं खटपट करितों, परंतु उपयोगास कांहींच आलें नाहीं ! विसाजी आपाजी येऊन गेले ते रामचंद्र गणेशांकडे गेले. भाऊंकडे दोन तीन हजार फौज जाती तर मोठी उमेद आली असती. काय करावें ! आमचा इलाज होता त्यास चुकलों नाहीं. "

नं. २०५७. **श्रीगणराज.** (फा० शु० १–१० मार्च.)

तीाा राा भाऊ वडिलांचे सेवेशीं. अपत्यें गंगाधरानें साा नमस्कार विज्ञापना ताा छ २९ मोहरम दोन प्रहर भृगुवार (?) पर्यंत कुशल असों. सदैव आशीर्वाद पत्र पाठवीत जाणें. वडिलीं सडे स्वारींतून सौंदत्तीचे मुक्कामाहून छ २५ मोहरमचें पत्र पाठविलें तें आतांच पावलें...राा रामचंद्र गणेश अद्याप चिकोडीवरच आहेत. शिंद्याची व घोरपड्याची एकी जाहलियाचें वर्तमान अद्याप तहकीक नाहीं. अद्याप घाटत आहे. सडे स्वारींतून पत्र पाठविलें आहे म्हणोन वडिलीं लिहिलें, परंतु तें पत्र आम्हांस पावलें नाहीं...शत्रूची फौज माघारी छबीचे मुक्कामास गेल्याची बातमी आली म्हणोन लिहिलें तें कळलें. कोण अर्थास्तव माघारे गेले न कळे. कावेबाज दगाबाज आहेत. त्यांचा विश्वास मानूं नये. माघारी वोढ काढून बारीपार फौजा आल्या म्हणजे दगा करावा असा मनसबा करितील. गोटास येऊन मागती सडे होऊन जाणार म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. मागती सडेच सावधपणें जावें. पुरंदराहून राा शिवाजीपंताचें पत्र आलें तें पाठविलें आहे. त्याजवरून सविस्तर कळेल. राा नाना पुण्यास आले. याउपर तरतूद फौजेची होणें ती होईल.....आमचे पत्रीं शिवाजीपंतांनीं लिहिलें आहे जे, राजश्री हरीपंततात्यांचें कूच एकादशी बुधवारीं हो-

---

१ परशुरामभाऊंस गंगाधरराव गोविंद यांचें पत्र सिरजेहून.

णार म्हणोन लिहिलें आहे. कूच झालें असलिया उदईक वर्तमान येईल. राा रघोजी भोंसले पैठणावर आले. त्यांसही कर्नाटकचे मसलतीस योजिलें तर बहुतच सरस होईल.....आम्ही आपले जागां किल्ल्याचा बंदोबस्त करून सावध आहों. वडिलीं बहुत सावधपणानें असावें. बहुत काय लिहिणें विदित होय हे विज्ञापना.

नं. २०५८. (फाल्गुन शु० ३–१२ मार्च.)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून पत्र गंगाधरराबांस मिरजेस. रवाना छ २ सफर बुधवार—

" शिंदे यांस करवीराकडे रवाना करण्याविशींचें बोलणें होत आहे. रघोजी भोंसले काल येथें आले. कारभारी पुढें जाऊन भेटले. श्रीमंतांच्या भेटी चार दिवसांत होतील. शंकराजी घोरपडे यांचा येसाजी शिंद्यांशीं बनाव बसला. आतां दोघेही रामचंद्र गणेश व विसाजी आपाजी यांजवर हालचाल करितीलसें दिसतें. या दोघांचीही तयारी चांगली आहे. काय होईल तें खरें ! भाऊसाहेबांकडील कहींची व शत्रूकडील कहींची गांठ पडल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. शत्रूचा जमाव दिवसेंदिवस अधिक होत चालला, परंतु भाऊसाहेबांची सडी स्वारी पुढें गेली होती त्या धास्तीनें अमित्राची फौज मागें हटली. भाऊसाहेबांनीं सांभाळून आपला आब राखून सावधपणें रहावें. तेही केले सवरलेले आहेत, व आपणही लिहीतच आहां. हरीपंततात्यांकडील फडणीस सदाशिवपंत करमरकर ह्याची चार मुसलमान शिलेदारांशीं कांहीं हिशेबाविशीं बोलाचाली होऊन शिलेदारांनीं सदाशिवपंतास वार करून ठार मारिलें. तेथील चौकीदारांनीं दोघां मुसलमानांस ठार मारिलें परंतु दोघे पळाले. गोटांत गूल होऊन जीनबंदी देखील झाली होती. "

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गनिमी हालचाली इ.स. १७७७

न. २०५९. (फा० शु० ४–१३ मार्च.)

लष्कर मुक्काम उगरगोळ येथून परशुरामभाऊंचें छ ३ सफर गुरूवारचें पत्र गंगाधररावांस मिरजेस—

" नानांस पेशजी लिहिण्यांत कांहीं बाकी ठेविली नाहीं. आणखीही लिहितों. त्यांतील कांहीं फलादेश दिसोन आला तर लिहिण्याचें सार्थक ! धारवाडचा बंदोबस्त चांगला आहे. मोरबेपावेतों आह्मी काल तलाव्यास जाऊन दोन घटका मोरबेजवळ उभे राहून फिरोन मध्यें भोजन करोन गोटास आलों. आह्मी माघारे फिरल्यानंतर बेदडयांची व (आमच्या) पेंढाऱ्यांची गांठ पडली. चाळीस पन्नास घोडीं त्यांचीं पेंढाऱ्यांनीं पाडून आणिलीं. आमची गांठ पडली ह्मणजे पारिपत्य चांगलेंच होतें. असो. आतां आह्मी गनिमाई करून फिरूं लागलों त्यापक्षीं श्रीकृपेनें एखादे दिवशीं गांठ पडेल. आतां त्यांस मोरबेपावेतों यावयासही अंदेशा पडेल. कारभारी यांस पत्रें लिहावीं ह्मणून लिहिलें, त्यास कारभारी यांनीं दौलतीची अनास्था केली. त्यांस लिहन फल काय ! "

नं. २०६०. (फा० शु० ५–१४ मार्च.)

मुक्काम भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें छ ४ सफरचें पत्र गंगाधरराव यांस मिरजेस—

" होळकराकडील ऐवजाचा फडशा जाला. तो ऐवज लोकांस वांटून कूच करावेंसें ठरोन राा हरीपंत कूच करोन थेउरास गेले. आतां मध्यें कोठेंही थांबत नाहींत, भाऊकडेच जातात, असें दिसतें. फौजेच्या रवानगीचें श्रीमंत नानांस फारच जरूर, परंतु चोहोंकडोन हिसके बसतात ! यांचा इलाज नाहीं. तत्राप तोडजोड करून फौज रवाना करावी, करवीरची मसलत शिंद्याशीं बोलून चालून त्यांच्या गळ्यांत घालावी असें करितात. दोन महिने (सावशीच्या) लढाईस

जाले असतां पांच राऊत (देखील) तिकडे गेले नाहींत, येणेंकरून नाना फार लज्जित आहेत. हे यत्न करितात त्याप्रमाणें इतरांस अगत्य असतें तर कामच होतें ! "

नं. २०६१. (फाल्गुन शु. ५–१४ मार्च.)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव यांस पत्र– पै॥ छ ६ सफर.

" येथील लोकांची अवस्था––राजश्री हरीपंत सुद्धां हिंवऱ्याजवळ गोट आहे. हरीपंत तात्या मोठे मोठे लोक जमा करून किल्ल्यावर घेऊन आले. तेव्हां ठराव जाला कीं, सन शीतची नालबंदी (फौजेनें) आम्हास बक्षिसी द्यावी. सन खमसची नालबंदी व रोजमुऱ्याचा ऐवज व सन आर्बापैकीं बाकी राहिला आहे तो ऐवज एकंदर करून तूर्त (आम्ही फौजेस) निम्मे द्यावा. बाकीचा निम्मे दोन महिन्यांनीं द्यावा. याप्रमाणें कारभारी यांणीं निश्चयांत आणिलें. ते समयीं कोणी मान्य केलें, कोणी न केलें. खालीं गोटास गेल्यावर बोलों म्हणोन बोलोन गेले. लोकांचें म्हणणें कीं, ' खमसची नालबंदी व रोजमुरा आज नक्त द्यावा. सन शीत (तुम्ही) देत नाहीं, उत्तम. पुढें आमच्या कपाळानें मिळाला तर द्यावा ! ' असें म्हणतात. लोकांचाही अन्याय नाहीं. कारभाऱ्यांजवळ तर पैका नाहीं. नीलकंठराव थोरात यांस लोकानीं उष्णांत उभें केलें होतें ! गवगवा भारी. लोकांची समजूत पडणें कठिण जालें आहे. कारभारी व हरीपंत तात्या संकटांत पडले आहेत. काल निरूपाय गोष्ट जाणून हरीपंत तात्या प्रहर रात्रीस हिंवऱ्याहून किल्ल्यावर आले व बोलों लागले कीं, ऐवजाशिवाय तोड पडत नाहीं ! "

श.१६९८ परशुरामभाऊंच्या गानिमी हालचाली इ.स. १७७७

नं. २०६२. (फाल्गुन शु० ८–१६ मार्च.)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें छ ६ सफर मंदवारचें पत्र गंगाधररावांस मिरजेस—

" हरीपंत तात्या थेउराहून कूच करून गेले त्या दिवशीं निम्में लष्कर बरोबर गेलें. निम्में राहिलें होतें तेंही समजावून नेलें. होळकराकडील ऐवजास फिरून हिसका बसला होता तोही उलगडला. नानांच्या चिळ्या जलदीविशीं हरीपंतांस नित्य जातात. एक ऐवज नाहीं याकरितां मोळ्याच मनसब्यास पेंच पडत चालला आहे. मोरोबांचे शरीरीं समाधान जालें. त्यांजकडील मध्यस्थ कृष्णराव बल्लाळ व गोपाळ नाईक तांबवेकर पुण्याहून (मोरोबांशीं) बोलून चालून आले आहेत. कारभाऱ्यांशीं बोलणें चालणें सांप्रत सुरू आहे. " जसे दोघे (कारभारी) तसे (मोरोबादादा) तिसरे. (त्यांनीं) फौजेंत चाकरीस जावेंसें जाल्यास जावें. (त्यांस) किल्ला एक द्यावा. खास पथक करावें. ' येणेंप्रमाणें मोरोबांचें बोलणें आहे. परंतु पुरती निखालसता जाल्याखेरीज कारभारी त्यांस फौजेंत पाठविणार नाहींत. "

नं. २०६३. (फाल्गुन शु० ९–१७ मार्च.)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव यांस पत्र छ ८ सफरचें—

" गुजराथेंत फत्तेसिंग व गोविंदराव यांमध्यें लढाई होऊन गोविंदरावांचा मोड जाला व ते दोनशें स्वारांनिशीं पळून गेले. लढाईंत खंडेराव गायकवाड यांचा पुत्र पडला व मोठमोठे चांगले लोक कामास आले. दोहोंकडील हजार माणूस पडलें. फत्तेसिंगाची फौज गोविंदरावाच्या पाठीस लागली आहे. "

नं. २०६४. (फाल्गुन शु० ९–१७ मार्च.)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजींचें पत्र छ ८ सफर इंदुवारचें गंगाधरराव यांस मिरजेस––

" करवीरकरांचें व हैदरखानाचें सूत्र एक आहे हें कारभारी यांस समजलें आहे. महादजी शिंद्यांकडील बाळाराव किल्ल्यावरच आहेत. त्यांशीं बोलणें चालणें होतच आहे. शिंद्यांचे आडमुद्दे भारी आहेत. अशेरी किल्ला मागतात. जहागीर मागतात. ती दिलिया करवीरकरांवर किंवा हैदरखानावर सांगाल तिकडे स्वारीस जाऊं म्हणतात. यांचें मानस अशेरीखेरीज एक किल्ला द्यावा व जहागीर हिंदुस्थानांत द्यावी. नाना कारस्थान करावयास चुकत नाहींत. घडेल तें खरें ! हरीपंततात्यांचा मुक्काम थेउरासच आहे. होळकराकडील ऐवज आला नाहीं. सारा लबाडीचा प्रकार दिसतो ! "

नं. २०६५. (फाल्गुन शु० १३–२२ मार्च.)

लष्करांतून परशुरामभाऊंचें छ १२ सफर मंदवारचें पत्र गंगाधररावांस मिरजेस–

" काल भृगुवारीं तीन प्रहर रातीं शत्रूचा छापा आला. आमचे छबिने चांगले होते. बातमीही राखिली होती. कोसावर छापा आल्याची बातमी घेऊन त्यांतून एक बेदडा आला. आम्ही तयार होऊन तोंडावर उभे राहिलों. बुनगें बारीचे आंत लावून दिलें. बारीतोंडीं दाटी जाली तेव्हां बुणग्यांपैकीं कोणाकोणाचीं घोडीं गेलीं. श्रीमंतांचे व वडिलांचे पुण्येंकरून सर्व मंडळी खैर आहेत. दहा पांच जायां जखमी जाले त्यांचीं याद मागाहून पाठवितों. "

नं. २०६६. (फाल्गुन शु० १५–२३ मार्च.)

भिवडीनजीक पुरंदर यथून शिवाजी बाबाजीचें छ १३ सफर रविवारचें पत्र गंगाधररावांस मिरजेस––

" हरीपंत तात्यांनीं होळकराकडील ऐवजाची वांटणी करून

लोकांची समजूत पाडिली; आणि परवां त्रयोदशीस भृगुवारीं थेउराहून कूच करून सहा कोस गेले. काल (पुढें) कूच जालें. आज (आणखीही) होईल. सुरापूरची खंडणी पुरंदरासच जाली आहे; तेव्हां आतां भीमेच्या पाण्यानें न जातां महादेवावरून कृष्णातीरास जाऊन करवीरच्या शहास न गुंततां नीट भाऊंसाहेबांचे रोखें जातील."

नं. २०६७. (फाल्गुन शु० १५–२३ मार्च.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र, लष्कर मुक्काम मनोळी येथून मिरजेस—

" कुमदान यानें उगरगोळास राहून हुलीची पेठ व गढी घेतली. किल्ला अद्याप झुजत आहे. बुनगें व चिरंजीव राजश्री दादा यांस यादवाडाकडे लावून देऊन आम्ही आज रविवारीं सडे जालों. मनोळीवर आहों. हुलीच्या किल्लयांत इकडून कुमक जाऊन पोंचली. शत्रु वेढा उठवून गेले. "

नं. २०६८. **श्री.** (फाल्गुन शु० १५–२३ मार्च.)

चिरंजीव राजश्री भाऊ यांसी प्रति जानकीबाई[1] आशीर्वाद उपरी येथील कुशल ताा छ १३ सफरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मी छ १२ सफरचें पत्र पाठविलें तें पावोन लिहिलें वर्तमान कळलें. " शत्रूचे फौजेचा छापा आला, आह्मी सडे होऊन तोंडावर उभे होतों. सर्व सांभाळून गोटास आलों. " म्हणून लिहिलें

---

१ जानकीबाई ही परशुरामभाऊंची आई. छाप्याचें वर्तमान कर्णोपकर्णी ऐकून ती चिंताक्रांत होईल सबब भाऊंनीं तिला ताबडतोब पत्र लिहून झालेली हकीकत कळविली त्या पत्राचें हें उत्तर. मनोळीहून तासगांव सरळ वाटेनें ८० मैल निदान आहे. ता. २१ मार्च रोजीं उगरगोळच्या मुक्कामीं तीन प्रहर रात्रीस छापा आला. उजाडल्यावर २२ तारखेस भाऊनीं तासगांवास आईकडे व मिरजेस बाळासाहेबांकडे पत्रें लिहिलीं. तीं पोंचून जानकीबाईंनीं हें २३ तारखेस तासगांवाहून उत्तर लिहिलें.

तें कळलें. ईश्वरें खैर केलें ! याउपरी बारी राखून अलीकडे बंदोबस्तीनें असावें. शत्रूची फौज हावभरीत आहे. आपले फौजेचा जमाव थोडका, यास्तव अलीकडेच असावें. राजश्री परशुराम नाईक परांजपे येथें आले, त्यांस भोजनास बोलवावें किंवा कसें काय तें लिहावें. नाईकाचें सरकारांत कसें काय बोलणें जाहलें असेल तें आपणास कळलें असलियास लिहावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २०६९. (फाल्गुन शु० १५–२३ मार्च.)

पौा छ १४ सफर. सन सब्बा सबैन. फाल्गुन मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. होसदुर्गावर छापा आला ते समयीं गाडद्यानें येऊन बातमी सांगितली त्याजप्रमाणें याही खेपेस बेदडा आला त्यानें वर्तमान सांगितलें म्हणून निभावलें ! नाहीं तर दगाच जाहला होता. परंतु श्रीकृपेंकरून निभावलें. शत्रूचा मुक्काम काल उगरगोळावरच होता. आज जातो कीं राहतो हें कळलें नाहीं. सर्वांचे विचारें बुनगें लावून देऊन सडे व्हावें असा प्रकार आहे. त्यास तो आज कूच करून गेल्यास उत्तमच जाहलें. नाहीं तर सडे होतों. हैदरखान तर श्रीरंगपट्टणांतून बाहेर निघाला. आतां तो इकडे येतो यांत गुंता नाहीं. नबाब निजाम अल्ली-

---

१ तोतयाच्या बंडासंबंधें हे रामचंद्र नाईकाचे बंधु सरकारांत रुजू समजावयाचे कीं बंडखोर समजावयाचे ? तोतयाच्या संसर्गामुळें दूषित आहेत कीं प्रायश्चित्त घेऊन शुद्ध झाले आहेत ? हा लिहिण्याचा भावार्थ. २ ता० २७ मार्च सन १७७० रोजीं हैदरअल्लीनें गोपाळरावांवर छापा घातला होता त्या छाप्यांत परशुरामभाऊ व गंगाधरराव बाळासाहेब उभयतांही होते. त्या छाप्याची आठवण परशुरामभाऊ या पत्रांत बाळासाहेबांस देत आहेत. त्या छाप्याचें वर्णन गोपाळरावांनीं नं. ९०१—च्या पत्रांत केलें आहे.

खान बाहेर निघोन चार पांच मजली आले. धौशा गदवालची खंडणी अडीच लक्ष रूपये घेऊन तुंगाभीरास अदवानी तालुक्यांत आले. नबाब बसालतजंग यांनीं डेरे दिले. कर्नोलकरांसही पत्रें धौशांनीं बाहेर निघावयास पाठविलीं तेही निघणार म्हणून वर्तमान. अशांत राजश्री हरीपंत तात्या सुरापूरचे सुमारें यावे, आणि आम्हाकडे चार हजार फौज रवाना जाहली, तर चांगलें आहे. करवीरकरांचे राऊत ऐवज आणावयास हैदरखान यांजकडे गेले होते, त्यास त्यानें तीन लक्ष होन देऊन राऊत रवाना केले म्हणून बेदडा आला त्यानें वर्तमान सांगितलें. तेव्हां कांहीं ऐवज दिला असेल यांत गुंता नाहीं. आतां राजकारण बळावलें ! यांत श्रीसत्ता प्रमाण. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २०७०. (फाल्गुन शु० १५–२४ मार्च.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल ताा छ १४ सफर मुक्काम मनोळी वर्तमान यथास्थित असे. विशेष. बुनग कडकोळास लावून दिलें म्हणून कालचे पत्रीं लिहिलेंच होतें. सडे मनोळीस होतों. कुमदान यानें हुलीस मोर्चे लाविले होते. गांव जाळून टाकिला. आम्ही बारीचे तोंडीं सडे स्वारीनिशीं जाऊन किल्लयांत दोन तीनशें गाडदी घातले. वरून स्वार जातात तोंच शत्रु उठोन गेले. कालचे रात्रीस उगरगोळहून कुमदान कूच करून माघारा गेला तो कोणे ठिकाणीं मुक्काम केला आहे त्याचे बातमीस माणसें पाठविलीं आहेत. उदईक बुनगें येथें आणवितों. आम्ही सडे फौजसुद्धां बारीखालीं जाऊन पांच सात कोसांचा तलावा देऊन येतों. खालींच सडे राहतों. येथें राहिल्यानें वैरणीची सोय नाहीं, याजकरितां सडसडीत बारी-

पार जातों. आतां एक जागां राहत नाहीं. फिरती स्वारी करितां. चिंता न करणें. चिरंजीव राजश्री दादास समाधान नाहीं. त्यास घोडयावर बसावयाचा प्रकार नाहीं, याजकारितां काल कडकोळास लावून दिलें होतें. आतां चिरंजीवांस उदईक येथें आणवून आह्मी पुढें जाऊं. राजश्री शिवाजीपंत यांस पत्र लिहिलें आहे. पुढें रवाना करावें. कृष्णाबाई शिंदीचीं माणसें पट्टणास गेलीं होतीं. हैदरखान बाहेर निघाला हें पाहोन आलीं. आणि बापूजी नारायण यांचीं पत्रें आलीं तींच पहावयास पाठविलीं आहेत. हीं तुह्मीं वाचून पाहून शिवाजीपंताकडे पाठवावीं. करवीर-करांचे राऊत हैदरखानाकडील ऐवज घेऊन गेल्याचें काल लिहिलें आहे. याजउपर तरी सरकारांतून शिंदेहोळकर करवीरचे पारि-पत्यास यावे. राजश्री हरीपंत तात्या सुरापूर मानी (?) तरीच बरें. नाहीं तर ठीक नाहीं. शत्रु येतो. श्रीनें काय योजिलें आहे न कळे ! श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. उदईक बुनगें येथें माघारें आणवितों व आह्मी फिरोन बारीपार जातों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. रा॥ दोन प्रहर.

नं. २०७१. **श्रीगणपति**. (फाल्गुन व० ३-२७ मार्च.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ १७ सफर गुरूवार वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री हरीपंत तात्यांकडे होळकराकडील ऐवज पटला, याउपर त्यांचें कूच लवकरच होईल, ह्मणून लिहिलें; त्यास फाल्गुन वद्य पक्ष—तोही दहा दिवस राहिला, तेव्हां गेल्यांतच ! आह्मासच येऊन दोन अडीच महिने जाले. कळेल तैसें गुदरलें. कर्जही दहा वीस[2] मेळविले, तेही खर्चले ! पुढें परिणाम कांहींच दिसत नाहीं.

---

१ अदवानीहून पाठविलेलीं. २ दहा वीस हजार रुपये.

मनसब्याची सुरत ठीक दिसत नाहीं. लोकांचे दंगे होऊं लागले. तोफखान्यांत आजपावेतों दोन दंगे जाहले. तैसेच राजश्री नांगोजी-राव नाना यांनीं आजपावेतों चाल ढकल करीत आले. आम्हास मिलेल तें आह्मी दिल्हें. त्यांत त्यांचा परिणाम नाहीं. दंगे होतात. पढें मेळवन द्यावयाचेंही दिसत नाहीं. याजमुळें यात्रा फुटावयाचे लागांत आहे ! पोटास थोडेंबहुत पावत असतां " मोडांत घोडीं थकून गमावलीं त्यांचा निकाल करून द्यावा " ह्मणून बेकैदीचें भांडण भांडतात ! कालचे दंगेंत राजश्री कृष्णराव[1] यांचे लोकांत कराचल्या देखील उपासल्या होत्या ! शामराव मगर त्यांजकडे आहेत त्यांनीं लबाडी करून मेलई[2] केली. त्यांचें पारिपत्य थोडेंबहुत काठ्यांचे मारहाणीखालीं जाहलें. असीं बंडें होऊं लागलीं. मनाळी[3] वर वैरण देखील मिळेना. आतां येथें राहावयाची सोय नाहीं. हुलीस मोर्चे होते ते दिवशीं बुनगें कडकोळाकडे लावून दिलें होतें. दुसरे दिवशीं आमचें बुनगें आणविलें. रास्तेकडील लोकांचें बुनगें-लोकांचें थोडें थोडें आलें. खासबुनगें यादवाडाकडे गेलें. तेथूनही बागलकोटा-कडे जाणार. परंतु कोणीकडे जातील नकळे. याउपर आह्मी येथून चार दिवसांत कूच करून बदामीकडे जाणार. लोकांत अवसानच नाहीं असें जाहलें आहे ! अशांत राजश्री हरीपंत तात्या येतात तर ठीक होतें. नाहीं तर ठीक दिसत नाहीं. श्रीइच्छाप्रमाण ! किती लिहावें ! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २०७२. श्री. (२७ मार्च.)

वडिलांचे सेवेशीं. अपत्यें वेणूबाई. नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य ४ गुरूवारपावेतों सुखरूप असों.

---

१ मुरारराव घोरपडयांचे कारभारी. हल्लीं शिवराव घोरपडयांचें पथक यांचे हानाखालीं होतें. २ लष्कर. ३ पानशे. ४ वखेडा. ५ त्रिंबकराव मामा पेठे यांची स्त्री वेणूबाई. हिचें आपल्या आईस ह्मणजे अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर यांस पत्र.

विशेष. वडिलीं फकिराबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पत्रीं कितेक मजकूर लिहिला, त्यास येविशींचा अर्थ सर्व राजश्री दादबा व गोविंदपंत येत आहेत. एक दोन रोजीं मागाहून पाठवितों. सविस्तर विनंती करितील त्याअन्वयें कर्तव्य तें करावें. हल्लीं मोकळिकेचीं पत्रें सरकारचीं पाठविलीं आहेत. हीं लक्ष्मण व्यंकाजी यांस देऊन जप्ती उठवावी. प्रत्येक गांवांत आपलीं ठाणीं घालावीं. वे॥ शास्त्रीबोवा यांचें पत्र लिहोन घेतलें. फडणिसांची तेरीख आदी-करून जाहली. परंतु मजमदार निशाण करीत नाहीं. एक दुसरा रोज लागेल. मागाहून मशारनिल्हे घेऊन येतील. त्याअन्वयें प्रायश्चित्तही करवावें. चिरंजीव राजश्री दादा यांस टाकळीस आणवावें. आलेच असतील. परंतु सूचना लिहिली आहे. लौकर आणवावें. लक्ष्मण व्यंकाजी यांस एक पत्र व राजश्री पांडुरंगराव यांचे नांवें पत्र आहे तें राजश्री गंगाधरराव यांस द्यावें. गांवगन्ना निराळीं पत्रें घेतलीं आहेत. लक्ष्मण व्यंकाजी लबाडी करून दिवस घेऊं लागला तर आपले प्यादे पन्नास व राऊत पन्नास पाठवून गांवकर यांचीं पत्रें गांवास देऊन ठाणीं घालवावीं ! रुपयेचा फडशा जाहला. पन्नास हजार रुपये बाजी गोविंद यांस देविले. पावणा लक्षाचा फडशा येथें जाहला. त्याचा मजकूर सर्व मशारनिल्ह येतील ते विनंती करितील. राजश्री परशुरामभाऊ यांजकडे तुम्ही रुपये पांच हजार दिलेत ते येथें सरकारांत वजा दिले नाहींत. राजश्री बाजीपंतास (सरकारां-

---

१ हें जासुदाचें नांव. २ तोतयाच्या बंडांत सामील झाल्याबद्दल पेशवे सरकारांतून इचलकरंजी संस्थान जप्त झालें होतें त्यांच्या मोकळिकेबद्दल. ३ हें पेशवे सरकारच्या जप्तीकारकुनाचें नांव. ४ रामशास्त्री न्यायाधीश यांचें प्रायश्चित्ता-संबंधें. ५ व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर. ६ पांडुरंगराव शत्रूच्या कैदेंत होते तथापि सरदारी त्यांच्याच नांवें असल्यामुळें सरकारचें पत्रही त्यांच्या नांवचें होतें. ७ जप्ती उठविली तेव्हां इचलकरंजीकरांकडून नजराणा घेण्याचें ठरलें त्यापैकीं.

तून) पन्नास हजार रुपये देविले आहेत, त्यापैकींच पंचेचाळीस हजार रुपये तुम्ही देणें. पांच हजार रुपये परशुरामभाऊंकडून घेऊन बाजीपंतास देणें अगर बोलून ठेवणें.

नं. २०७३. **श्री.** (फाल्गुन व० ३–२७ मार्च.)

वडिलांचे सेवेशीं.—तुह्मी पदरचे न द्यावे. परशुरामभाऊ यांस सरकारांतून देत नाहींत, मग कोणाशीं भांडावें ? सरकारची वोढ कळतच आहे. बाजीपंत यांस पहिले पंचवीस हजार दिले. बाकी पंचवीस द्यावयाचे, त्याची मुदत माघ पौर्णिमा पंधरा हजार. त्यांत परशुरामभाऊ यांचे पांच हजार व रोख द्यावयाचे दहा हजार ते. वैशाखअखेर मासचे हप्तेचे दहा हजार द्यावयाचे. येणेंप्रमाणें सरकारांत फडशा केला. चैत्र मासचे रुपये चाळीस हजार व वैशाख मासचे अखेरीचे रुपये पस्तीस हजार एकूण पावणा लक्ष येथें फडशा जाहला. आपणास कळावें ह्मणोन लिहिलें आहे. आतां गुंता कांहीं राहिला नाहीं. मशारनिल्हेस लौकर रवाना करितों. प्रायश्चित्ताचा ठराव रुपये बाराशेंमध्यें करावें याप्रमाणें करार जाहला. कळावें. चिरंजीव सौभाग्यवती रमाबाई येणार, त्यास पालखी पाहिजे व एक दुसरा उंट तीन चार उंटें (?) व पालखी व दोन तट्टें व दोन थोर घोडीं वीस पंचवीस प्यादे जरूर पाठवावे. प्रतिपदेस येथून निघून तिकडे येतील. पत्र पावतांच रवानगी करावी. बरोबर एक कारकून पाठवावा. एक ब्राह्मण पाठवावा. राजश्री बाजीपंत यास रुपये देणें ते आधीं गांवांत ठाणीं घालून मग रुपयांचा फडशा करावा. बाजीपंतास रुपये देतों. आपण वीस हजार रुपये परभारें राजश्री परशुरामभाऊ यांजकडून देवावे. त्याच्या कारकुनाचे नांवचें कबज माघारें पाठविलें आहे हें त्यास द्यावें. परशुरामभाऊ रुपये बाजीपंतास देतील नाहीं तर बाजीपंत जाऊन फडशा

---

१ या पुढचा मजकूर पुरवणीपत्रांत आहे. तें पत्र पुढच्या नंबरांत छापलें आहे.

करून घेतील. सरकारांत मजरा पडत नाहींत, भांडून परिणाम नाहीं, याजकरितां पत्र पावतांच आधीं परशुरामभाऊ यांजकडे कबज पाठवून ऐवज फिरोन देणें आणि बाजीपंतास देवावा. (हरीपंततात्यांचें) लष्कर सुरापूरचे रोखें आलें. हल्लीं सिद्धटेकावर मुक्काम आहे. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. २०७४. (फाल्गुन व० ५–२९ मार्च.)

भिवडीनजीक पुरंदर येथून बाळकृष्ण हरी म्हैसकर याचें छ १९ सफरचें पत्र परशुरामभाऊंस लष्करांत—

" हरीपंत तात्या समागमें चार तोफा आहेत व तोफखान्या-वरचे सखारामपंत पानशे समागमें आहेत. "

नं. २०७५. (फाल्गुन व० ६–३० मार्च.)

भिवडीनजीक पुरंदर येथून बाळकृष्ण हरी म्हैसकर याचें छ. २० सफरचें पत्र परशुरामभाऊंस लष्करांत—

" हरीपंततात्यांचा मुक्काम सिद्धटेकावर आहे. आज उद्यां कूच होईल. फरांचिसांचा वकील रेददंडयाकडे आला आहे. फरांचिस हें इंग्रजांचें वर्म आहे. शिंदे जामगांवीं आहेत. होळकर वाफगांवीं आहेत. भोंसले येथेंच आहेत. सरकारांत एक दोन मेजवान्या जाल्या. आज कारभाऱ्यांस भोसल्याकडून मेजवानी आहे. "

नं. २०७६. **श्री.** (फाल्गुन व० ७–३१ मार्च.)

पुरवणी राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. तिकडील मनसुब्याचे व इकडील मनसुब्याचे प्रकार लिहिले ते सर्व कळलें. एक वेळ आपली भेट होती म्हणजे साऱ्या

---

१ हरीपंत फडक्यांचें पत्र,

गोष्टींचा उमज पडता. आह्मी सिद्धटेकास आलों. मागाहून कार-भाऱ्यांचा कागद आला कीं, धारवाडास जाणें. तें वर्तमान आपणास लिहिलेंच आहे. हल्लीं पत्र आलें कीं, सुरापूरची खंडणी हुजूर आली. आम्ही धारवाडाकडे न जातां नीट वाटेनें जाबतिजंगास जाऊन मिळावें म्हणून कारभाऱ्यांनीं लिहिलें, त्यास पंढरपुरास येतों. इतक्यांत आपल्या-कडील वर्तमान कळेल. मग जाणें तिकडे जाऊं. फौजेस पैका नाहीं. यामुळें अनिवार कर्ज झालें आहे. श्री निभावील तें खरें ! वरकड दांदांची समजावीस होत होती, कधीं मळमळीत पडलें ? परंतु शिल-शिला लागला आहे ! घडेल तें लिहून पाठवूं. अनेक प्रकारचीं राज-कारणें घाटत आहेत. यजमानांस सावध करितों. तेही सावध आहेत. परंतु फितुरी फार ! करितील काय ? आह्मीं कोणत्या सुमारें यावें तें लिहावें. भाऊसाहेब ! पैक्याचा पेंच मोठा पडला आहे. आपली भेट होती तर हरएक तजवीज निघती. परंतु तोही योग घडत नाहीं ! इंग्रज मुंबईकर याचा वकील पुण्यास आला आहे, बोलणें होईल तें लिहून पाठवूं. उभयतां सरदार देशीं आहेत त्यांनीं वांकडें पाहूं नये, सरकारच्या लक्षांत असावें, अशीं हीं साधनें करीत आहों. आपण मनोळीच्यापुढें गेलां होतां, तिकडून कुमदान आला, आपण सांभा-ळून मनोळीस आलां, ह्मणून वर्तमान कळलें. त्यास येविशींचें वर्त-मान लिहीत जावें. वरचेवर इतल्ला मजला द्यावा. रवाना छ २१ सफर. कृपा केली पाहिजे हे विनंती.

---

१ मोरोबादादांची. २ नाना फडनवीस यांस. ३ शिंदे होळकर.

पाळेगारांचें पारिपत्य.

सन १७७७ एप्रिल ते जुलैपर्यंत.

पुरंदरचा तह झाल्यामुळें दादासाहेबांची पेशवाईच्या गादीवर स्थापना करण्याची मसलत इंग्रजांनीं सोडून दिली, तेव्हां दादासाहेबांचे सरदार आबाजी महादेव व बाजीराव बर्वे हे हैदरअल्लीकडे गेले व कृष्णेपर्यंत तुमचा अंमल बसवून देतों, असें त्याजवळ कबूल करून त्याजकडून फौजेच्या पोक्त सरंजामानिशीं महमदअल्ली कुमदानास बरोबर घेऊन तुंगभद्रेअलीकडे आले. याप्रमाणें मराठी राज्यांत प्रबळ अंतःक्षोभ उत्पन्न करण्यासाठीं त्यांनीं जें प्रचंड कारस्थान योजिलें होतें त्याची धारवाड शाखा व करवीर शाखा अशा दोन शाखा आज स्पष्ट दिसूं लागल्या होत्या. तिसरी पुण्याची सर्वांत महत्वाची शाखा ती अजून गर्भावस्थेंत होती. तिजविषयीं पुढें लिहिण्यांत येईल. तूर्त या दोन शाखांपैकीं धारवाडाकडील मसलतीस तर उत्तम रीतीनें सुरूवात होऊन सांवशीच्या लढाईमुळें निम्में काम होऊन गेलें. कुमदानाचा त्या प्रांतीं सर्वत्र अंमल बसून शिवाय कित्तूर, नवलगुंद, डंबळ व जालिहाळ येथील देसाई त्यास अनुकूल झाले. त्यांनीं उघड बंड करून भोंवतीं पेशवे सरकारचा मुलूख होता त्यापैकीं हातीं लागेल तितका बळकाविला. या देसायांस बरोबर घेऊन कुमदान मनोळीची बारी चढून करवीरकरांकडे यावयाचा होता. हैदरअल्लीनें करवीरच्या महाराजांस मुबलक पैका देऊन त्यांस फौज ठेवून दंगा करण्याविषयीं प्रोत्साहन दिलें होतें. त्याप्रमाणें त्या महाराजांनीं फौज ठेऊन पेशवाईच्या मुलखावर चोरून छपून स्वाऱ्या घालण्याची सुरूवात केली होती व घोरपडे, घाडगे, थोरात व सटवोजी भोंसले हे

चार मराठे सरदार अनुकूल करून घेतले होते. कुमदान व करवीर-कर एकत्र झाल्यावर मोठींच धामधूम किंबहुना राज्यक्रांतीचा प्रारंभ-सुद्धां झाला असता ! परंतु सावशीची लढाई झाल्यापासून एक महि-न्याच्या आंत परशुरामभाऊ मनोळीस येऊन बारीच्या तोंडीं तळ देऊन राहिले यामुळें हें आंतून तयार होत आलेलें कारस्थान बरेंच विसकटलें. भाऊंनीं गनिमी हालचाली करून कुमदानास व बंडखोर देसायांस कसें थोपवून धरिलें हें मागच्या प्रकरणांत स्पष्ट झालेंच आहे.

मनोळीस धान्य व वैरण मिळेनाशी झाली व फौजेंतले लोक रोजमुऱ्यासाठीं दंगा करूं लागले, तेव्हां पाळेगारांस वठणीस आणून त्यांपासून खंडणी घेऊन फौजेचें पोट भरावें म्हणून परशुरामभाऊ मनोळीहून तळ हालवून बदामीचा रोख धरून कूच करून चालले. प्रथम थोडे दिवस त्यांचा मुक्काम त्या तालुक्यांत इडगल येथें होता. कुमदा-नानें बारीकडे येण्याचा एलगार करावा व त्याबरोबर भाऊंनीं मागें उलटून त्याच्या रोखावर टेहाळणीकरितां फौज पाठवावी असें दोन तीनदां झालें. तेव्हां कुमदानानें तो नाद सोडून दिला. मग खंडणी वसूल करण्याचा व ठाणीं घेण्याचा भाऊंचा उद्योग निर्वेधपणें चालू झाला. इडगलाहून निघून ते जालिहाळाकडे गेले व तेथील देसायानें सर-कारचीं ठाणीं बळकाविलीं होतीं तीं घेऊन प्रत्येक गांवापासून दोनतीन हजारांपासून पंचवीस हजार रूपयांपर्यंत त्यांनीं खंडणी घेतली. 'पाळे-गारांचें पारिपत्य' हा जरी मथळा आम्ही या प्रकरणास दिला आहे तरी या सालच्या एप्रिल ते जुलईपर्यंत महाराष्ट्रांत एवढींच एक महत्वाची गोष्ट घडत होती असें नाहीं. पटवर्धनांची फौज या अवधींत कोणच्या कामगिरीवर गुंतली होती, एवढेंच दाखविण्यापुरता तो मथळा आहे. त्यापेक्षां अधिक महत्वाच्या दुसऱ्या गोष्टी याच अवधींत घडत होत्या त्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. याकरितां त्याच गोष्टीं-विषयीं थोडें थोडें लिहूं.

मनोळीकडे जातांना परशुरामभाऊ करवीरकरांस जरबेंत ठेवण्यासाठीं रामचंद्र गणेश यांस ठेऊन गेले होते व त्यांच्या मदतीस बाजीपंत अण्णा व प्रतिनिधि यांचीं पथकें दिलीं होतीं हें वाचकांस आठवत असेलच. रामचंद्र गणेश यावर सरशी करण्याकरितां करवीरकर येसाजी शिंदे यांनीं शंकराजी घोरपडे, घाटगे, थोरात व सटवोजी भोंसले हे पेशव्यांचे सरदार आपणाकडे मिळवून घेतले. तेव्हां रामचंद्र-पंतांचें बळ कमी न पडावें म्हणून त्यांच्या कुमकेस कारभाऱ्यांनीं चार हजार फौजेसह विसाजीपंत आठवले या सरदारास पाठविले. ही सारी फौज मिरज प्रांतांत तळ देऊन राहिली असतां इतर मराठी फौजां-प्रमाणें तिच्याही पोटास कारभाऱ्यांकडून पैका मिळाला नाहीं. रामचंद्र गणेश यानें गंगाधरराव गोविंद पटवर्धन मिरजकर यांजजवळ पन्नास हजार रुपये कर्ज मागितलें तें त्यांनीं दिलें नाहीं. मग रामचंद्रपंतानें मिरज प्रांतींच्या गांवखेडयांवर घांसदाण्याबद्दल रोखे करून चोपून वसूल करून घेतला. त्याबद्दल मिरजकरांनीं त्याच्या लष्करचीं घोडीं उंटें पकडून ठेविलीं व कारभाऱ्यांकडे पुण्यास पुष्कळ गिल्ला केला. परंतु रामचंद्रपंत ऐकेना, तेव्हां त्यास तीस हजार रुपये देण्याचें कबूल करणें मिरजकरांस भाग पडलें. येसाजी शिंद्यांनीं पेशव्यांचे मराठे सरदार मिळवून घेतले होते, त्यांपैकीं सटवोजी भोंसल्याखेरीज बाकी कोणाशीं त्यांचें पटलें नाहीं. सबब ते सरदार आपापल्या घरास परत गेले. अर्थात् रामचंद्र गणेश यांशीं बरोबरीनें युद्ध करण्याचें सामर्थ्य त्यांस राहिलें नाहीं. तथापि ते तारीख १९ मे रोजीं रामचंद्र गणेश यांजवर चालून आले. तेव्हां कवठें हिंगणगांव येथें उभय सैन्यांची गांठ पडून युद्ध झालें. त्यांत येसाजी शिंद्याचा पराजय होऊन ते व सटवोजी भोंसले दोन चारशें स्वारांनिशीं पन्हाळ्यास पळून गेले. त्यांच्या चार तोफा व घोडीं शत्रूच्या हातीं लागलीं. असा त्यांचा मोड झाल्यामुळें त्यांचा दंगा बंद

झाला. पुढें जून महिन्यांत नद्यांस पाणी भरलें तेव्हां करवीराकडून पेशवाई मुलखास उपद्रव होण्याचें तादृश भयही राहिलें नाहीं. सबब रामचंद्र गणेश फौजेसह पुण्याकडे परत यावयास निघाले.

कुमदान व करवीरकर यांजवर दाब ठेवण्यासाठीं अनुक्रमें परशुरामभाऊ व रामचंद्र गणेश झटत होते; पण हीं दोन्हीं बंडें बळावूं न देण्याची ही तात्पुरती मात्र तजवीज होती. या दोन बंडांचा पक्का बंदोबस्त करण्यासाठीं अधिक तरतूद करणें प्राप्त होतें व त्याप्रमाणें पुणें दरबारानें तशी तजवीज केलीही होती. करवीरकरांस पक्कें जेरीस आणावें म्हणून त्या कामावर त्यांनीं महादजी शिंद्यांची योजना केली होती, व त्याप्रमाणें फौज जमा करीत ते सरदार रहिमतपुरापर्यंत येऊन पावसाळ्याकरितां तेथें छावणीस राहिले होते. पावसाळा संपल्यावर ते करवीरच्या रोखें कूच करून जाणार होते. दुसरी मसलत कुमदानाचा धनी हैदरअल्ली यास वठणीस आणणेंची. त्या कामासाठीं पुणें दरबार व निजामअल्ली एकत्र झाले होते, व असें ठरलें होतें कीं, निजामअल्लीनें आपला सरदार इब्राहिमखान धौशा यास मुबलक फौज बरोबर देऊन कर्नाटकांत पाठवावें व पुण्याहून हरीपंत फडक्यांनी मोठी फौज बरोबर घेऊन त्या प्रांतीं जावें. नंतर दोघांनीं एकत्र होऊन हैदरअल्लीस तंबी पोंचवावी.

या मसलतीस अनुसरून जय्यत फौज व तोफखाना बरोबर घेऊन धौशा आपला मुलूख सोडून निघाला तो गदवाल संस्थानची साडेपांच लक्ष रुपये खंडणी घेऊन कर्नुळाकडे गेला. तेथें त्यास कर्नूळ, कडेंप व अदवानी येथील नबाब येऊन मिळाले; परंतु हरीपंततात्या पुण्याहून निघाले होते ते येऊन मिळतपर्यंत पुढें पाऊल टाकण्याची धौशास छाती होईना. अशा स्थितींत हैदराकडून टिपू सुलतान व मीर रेझा फौज घेऊन त्यावर चालून आले होते, त्यानीं अकस्मात् एके रात्रीं येऊन त्याच्या लष्करावर छापा घातला; परंतु धौशा सावध

असल्यामुळें त्यानें तो छापा मारून काढून त्यांस पिटवून लाविलें. नंतर त्या पराजित झालेल्या दोघां सरदारांस कुमक करण्यासाठीं हैदर-अल्ली प्रचंड सेना घेऊन श्रीरंगपट्टणाहून शिऱ्यास आला, तेव्हां धौशास कुमक करावी ह्मणून खुद्द निजामअल्ली दोन तीन मजली कूच करून आले. परंतु हरीपंतांच्या येण्याकडे निजामअल्ली व धौशा यांचे डोळे लागले होते. ते आल्याखेरीज शत्रूशीं गांठ घालणें दोघांसही इष्ट वाटलें नाहीं. हरीपंत एप्रिलच्या अखेरीस तुंगभद्रेच्या आसपास येऊन पोंहोंचले. परशुरामभाऊंच्या मनांत असें होतें कीं, हरीपंतांस महिना पंधरा दिवस आपणाजवळ ठेवून घ्यावें व त्यांच्या मदतीनें हुबळीस कुमदान तळ देऊन राहिला होता त्यास तेथून हुसकून लावावें आणि डंबळकर वगैरे बंडखोर देसायांचें यथास्थित पारिपत्य करावें. इतकें झाल्यावर हरीपंतांस धौशाकडे लावून द्यावें व आपल्या सरंजामाचा मुलूख शत्रूच्या हातीं गेला आहे तो आपला आपणच सोडवावा. ही मसलत मनांत आणून भाऊंनीं हरीपंतांस आपणाकडे बोलाविलें. दोघांच्या गांठी तारीख ५ मे रोजीं गजेंद्र-गडानजीक पडल्या. नंतर पुढच्या उद्योगास लागावें तों धौशाचीं हरीपंतांस फारच निकडीचीं पत्रें आलीं कीं, हैदरअल्ली सर्व फौजेसह आम्हावर चालून येत आहे व आम्ही दरकूच मागें हटत आहों. या प्रसंगीं तुम्ही जलदीनें येऊन आम्हांस सामील व्हावें. तीं पत्रें आल्यामुळें हरीपंत तत्काळ फौजेसह कूच करून धौशाकडे निघून गेले. मग परशुरामभाऊंनीं आरंभिलेली मसलत आपणच तडीस नेण्याचें ठरविलें. हैदरअल्लीनें कुमदानास हुबळीहून परत बोलावून नेल्यामुळें भाऊंचें काम बरेंच सवघड झालें होतें. त्यांनीं प्रथम डंबळच्या देसायावर स्वारी केली. भाऊंनीं गदगचें ठाणें व पन्नास हजार रुपये खंडणी घेऊन त्या देसायाशीं समेट करण्याचा बेत यापूर्वी ठरविला होता व त्यास तो देसाई मान्यही झाला होता

परंतु भाऊंजवळून हरीपंतांची फौज निघून जातांच डंबळकर देसाई लबाडीच्या गोष्टी सांगूं लागला. तेव्हां भाऊंनीं त्याचीं ठाणीं हरलापूर, उंमचगी, नरेगळ, जखली वगैरे घेतलीं. त्यांत त्यांनीं पहिल्या दोन ठाण्यांची पंचवीस हजार रुपये व चौथ्याची साडे नऊशें होन खंडणी घेतली. नंतर त्याचें हिरेहाळ नांवाचें एक भक्कम ठाणें होतें त्यास भाऊंनीं वेढा घातला. त्या ठिकाणीं पंधरा दिवस निकराची लढाई झाली. तेथें कृष्णराव पानशे गोळी लागून पडले व जनोबा सुभेदार यादवाडकर जखमी झाले. शेवटीं ता. ५ जून रोजीं भाऊंनीं तें ठाणें काबीज केलें व डंबळकरापासून ऐशीं हजार रुपये खंडणी घेतली. शिवाय त्यांनीं कृष्णराव पानशांच्या कुटुंबास पांचशें रुपयांचा गांव त्या देसायाकडून इनाम देवविला.

इकडे मुंबईहून इंग्रजांचा वकील मि. मॉस्टिन एप्रिलच्या प्रारंभींच येऊन पुण्यास दाखल झाला होता व त्यानें दादासाहेबांस सात लक्षांची जहागीर व त्रिंबकचा किल्ला द्यावा असें बोलणें पुणें दरबाराशीं लाविलें होतें. त्याच सुमारास फ्रेंच लोकांचा वकीलही पुण्यास येऊन बसला होता. त्या दोघांही वकिलांचीं बोलणीं पुणें दरबारानें ऐकून मात्र घेतलीं; परंतु करार असा कांहींच कोणाशीं केला नाहीं.

जून महिन्याच्या प्रारंभीं नाना फडणवीस यांस गारद्यांकडून दंगा करवून मारून टाकावें असें कोणी कारस्थान केलें होतें. परंतु तें उघडकीस आल्यामुळें नानांचे प्राण वांचले. गेलीं दोन वर्षें मोरोबा दादा पुणें दरबारावर नेहमींच रुसलेले होते. त्यांची समजूत काढण्याचा कारभारी प्रयत्न करीत होते.

सोलापूर प्रांतीं नरसो गोविंद या नांवाचा कोणीं बंडखोर उठला होता, त्यानें पटवर्धनांचें करकंब हें ठाणें ता. २५ मे रोजीं शिडया लावून घेतलें. त्या बंडखोराचें पारिपत्य करून तें ठाणें सोडविण्याची

कामगिरी कारभाऱ्यांनीं तुकोजी होळकर यांस सांगितली. ते होळकर देवदर्शनार्थ तुळजापुरास त्या सुमारास गेले होते. त्यांजवळ फौज जुजबीच होती, सबब त्यानीं आपली बाकीची फौज जमविण्यास सुरुवात केली. शिवाय त्यांस पुणें व भिरज येथूनही कांहीं कुमक येऊन पोंचली. फौजेची पुरेशी भरती झाल्यावर होळकर करकंबेकडे कूच करून आले.

परशुरामभाऊंचा निरोप घेऊन हरीपंत फौजेसह गेले ते जातांना कनकगिरी या संस्थानापासून सत्तर हजार रुपये खंडणी घेऊन केंचनगुड्डाकडे गेले. तेथें धौशाची व त्यांची गांठ पडली. ते एकत्र होतांच हैदरअल्ली मागें हटून चित्रदुर्गाकडे गेला. नंतर या दोघांनीं केंचनगुड्डु लुटून फस्त केलें. इतकें होईतों जून महिन्यास सुरुवात झाली. हरीपंतांच्या मनांत तुंगभद्रेपलीकडे शत्रूच्या मुलखांत छावणी करावयाची होती, परंतु या गोष्टीस धौशा मुळींच कबूल होईना. तुंगभद्रेअलीकडे मोंगलाई मुलुखांत आपण छावणीस राहणार असा त्यानें आग्रह धरिला व तो त्याप्रमाणें कूच करून निघूनही गेला ! मग हरीपंतांनीं निरुपायानें तुंगभद्रेअलीकडे छावणीचा बेत ठरविला. परंतु त्यांची फौज पोटास न मिळाल्यामुळें बेदील झाली होती. तिचे मनांत मुळींच छावणीस रहावयाचें नव्हतें ! पोटास द्या, नाहीं तर परत पुण्यास चला, असा फौजेनें हरीपंतांस सक्त तगादा बसविला. ती बातमी परशुरामभाऊंस कळतांच त्यांनीं विचार केला कीं, हरीपंतांची फौज परत गेल्यावर आपला तरी निभाव या प्रांतीं कसा लागतो व शत्रूच्या हातीं गेलेला मुलूख तरी कसा सुटतो ? याकरितां कसेंही करून हरीपंतांस फौजेसह या प्रांतीं छावणीस ठेवून घेतलेंच पाहिजे. असा विचार करून त्यांनीं चार लक्ष रुपये कर्ज काढून हरीपंतांच्या फौजेचा खर्च चालविण्याची योजना केली व त्यांजकडे वारंवार खर्चास पैका पाठविणेंविषयीं पुण्यास कारभाऱ्यांकडे सक्तीचीं पत्रें लिहिलीं. नंतर ते हरीपंतांस घेऊन येण्याकरितां त्यांच्या लष्करा-
- कडे सडेस्वारीनें कूच करून चालले.

नं. २०७७. (फाल्गुन व० ८–१ एप्रिल.)

बाळकृष्ण हरि यांचें भिवडीनजीक पुरंदर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. छ २२ सफरचें—

" करवीरच्या मसलतीसाठीं येथून बाळाराव व गुरुजी महादजी शिंद्याकडे गेले आहेत. हरीपंत तात्या आजी पंढरपुरास पोंचावे असा नेम होता. पोंचले असतील. इंग्रजांचे वकील पुण्यास आले. येथें आज उद्यां येणार. फरांचिसाचे वकील रेवदंड्यास आहेत, त्यांस आणावयास गेले आहेत. "

नं. २०७८. **श्रीव्यंकटेश प्रसन्न.** (फाल्गुन व० १०–३ ए०)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशीं.

सेवक जिवाजी रघुनाथ. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ २४ माहे सफर मुक्काम लष्कर कसबे वेळजाल (?) ताा लोकापल्ली स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे. विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावून परम संतोष जाहला. " प्रस्तुत नबाबाचा मुक्काम कोणे ठिकाणीं, समागमें तोफखाना वगैरे सामान फौज किती, कर्नाटकांत मोहिम नबाबाची जाहली आहे त्यांत कोणते मार्गें किती दिवसांत येणार, तें तपसिलें ल्याहावें. इकडील वर्तमान पुरंदराहून तुम्हांकडे वरचेवर येतच असेल. राजश्री हरीपंततात्या बाहीर निघाले आहेत. लौकरच कृष्णातीरास येणार. तीर्थस्वरूप राजश्री परशुरामपंतभाऊ मनोळीवर दहा हजार फौजेनिशीं आहत. हैदरखान याची फौज हुबळीवर आहे. राजश्री रामचंद्र गणेश वगैरे सरदार दहा हजार फौज करवीर तालुक्यांत आहेत.

---

१ हा पेशव्यांकडून निजामअल्लीच्या दरबारीं वकील होता. याचें हें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र.

राजश्री नरसिंगराव धायगुडे फ़ौजसुद्धां महादेवाजवळ आहेत. नबाब कृष्णातीरास आले म्हणजे फौजांचा जथ पडोन शत्रु विलयातें पावतील. नबाबाजवळ सरदार कोणकोणते आहेत ? धौशाही फौजसुद्धां नबाबास सामील जाहले असतील. हें सविस्तर ल्याहावें. " म्हणोन आपण पत्रीं लिहिलें होतें. ऐशियास पेशजी राजश्री बापूंचें पत्र आलें होतें तेव्हां आम्ही जाफरूद्दौला बहादूर यांस आणावयास गेलों होतों. नबाबाची मुलाजमत जाहली. नबाबांनीं बराय सरदार हिमतजंग बहादूर वगैरे पंधरा हजार फौज आपले सरकारची जाफरूद्दौला याचे तैनाती केली व जाफरूद्दौलाकडील खासगत फौज दहा हजार स्वार व दहा हजार प्यादे बार व नबाबाकडील व खासगत त्यांच्या मिळोन तोफा लहानमोठ्या चाळीस या सरंजामानिशीं बहादुरास कर्नाटक प्रांतीं हैदरनाईक याचे तंबीस रवाना केलें. दीड महिना जाहला. बहादुर कृष्णापार होऊन गदवालची खंडणी साडेपांच लक्ष रुपये करार करून कर्नुळास गेले. रणमस्तखान पठाण येऊन भेटले. तेथून पुढें कूच करून गुत्तीस सुमारें समीप गेले म्हणोन छ २३ रोजीं वर्तमान आलें. हैदर नाईक खासा पट्टणास होता तो दोन तीन कुचें करून पेशकदमी करून पुढें आला आहे. महमदअल्ली कुमदान हुबळीवर आहे, टिपू व मीर[3] वगैरे गुत्तीपलीकडे आहेत, म्हणोन वर्तमान येत आहे. खासा नबाब मुक्काम-मजकुरीं आहेत. राजश्री तात्यांचे येण्याची दिसगत जाहली. त्यांची मार्गप्रतीक्षा आजपावेतों केली. हल्लीं तात्या सिद्धटेंकास आल्याचें वर्तमान आलें. परभारें धारवाडचे रोखास जातात. तात्या सिद्धटेंकाहून कूच करून पुढें गेल्यावर नबाबही कृष्णातीरास जातील.

---

१ कारभारी सखारामबापू यांचें. २ हा कर्नूळचा नबाब. ३ हैदरअल्लीचा मे हुणा मीररेजा. ४ हरीपंततात्या.]

सांप्रत नबाबासमागमें निंबाळकर व सलगर व हांके व पांढरे व खास रिसाले वगैरे सरदार सरंजामसुद्धां पंधरा हजार स्वार व पांच हजार गारदी आहेत व तोफा लहानमोठ्या चाळीस पन्नास आहेत. हैदर नाइकास तंबी करावी हा इरादा बंदेगानअल्लीचा, यांत गुंता नाहीं. राजश्री परशुरामभाऊ यांणीं बहादुराशीं कागदींपत्रीं सिलसिला ठेवावा. एखाद प्रसंगीं लढाई भिडाईंत परस्परें इतल्ला देत जावा, मदत करीत जावी, म्हणोन नबाबांनीं आज्ञा केली. त्यावरून आम्ही भाऊंस पत्रें पाठविलीं व सरकारांत लिहिलें होतें. त्याजवरून सरकारांतूनही त्यांस आज्ञा गेली व नबाबांनीं जाफरूद्दौला बहादूर यांस येविशीं पत्रें लिहीत आहेत व आम्ही आमचे तर्फे राजश्री रावजी जिवाजी कारकून बहादुरासमागमें आहेत त्यांस लिहिलें आहे; व बहादुरासही पत्रें पाठविलीं आहेत. त्याप्रमाणें परस्परें सिलसिले राखतील. नबाबांचा इरादा हैदरखानाची तंबी करावी हा आहे. राजश्री हरीपंततात्या लौकर कृष्णापार जाहले म्हणजे बहादुरही गुत्तीहून शिऱ्याचे सुमारें येतील. त्यांणीं त्यांणीं एकत्र होऊन खानास तंबी करावी हा विचार आहे. आपल्याकडे करनाटकची बातमी येत जाईल ते लिहिण्यांत येत असावी. इकडोनही वर्तमान वरचेवर लिहिण्यांत येत जाईल. नबाब मजबूद आहेत. हैदरखानाचें पारिपत्य सहजांत होईल. श्रीमंत व नबाब एकदिल. तेव्हां हैदरखानाचा मजकूर किती आहे ! पारिपत्य सहजांत होऊं शकेल. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंति.

न. २०७९. (फाल्गुन व० १० ३ एप्रिल.)

बाळकृष्ण हरीचें भिवडीनजीक पुरंदर येथून छ २४ सफरचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

---

१ निजामअल्लीचा सरदार जाफरुद्दौला ऊर्फ धौशा गुत्तीच्या आसपास आहे त्याशीं.

"हैदरखानाकडील ऐवज करवीरकर शिंद्यास आला त्यापैकीं कांहीं घाटग्यास व घोरपडयास देऊन समजाविशी काढिली आहे, पन्हाळ्यास सारी फौज जमा जाली आहे, सहा सात हजार फौज व सहा हजार पायदळ व पांच तोफा येणेंप्रमाणें सिद्धता केली आहे," म्हणून लिहिलें तें कळलें. नाना फडणीस तळेगांवास गेले आहेत ते परत आल्यावर सविस्तर त्यांस सांगतों. नाना परत आल्यावर इंग्रजांचे वकील आले आहेत त्यांच्या भेटी होणार. फरांचिसाचे वकील बोरघाटाखालीं आले आहेत त्यांजकडे सरकारांतून अंबारीचा हत्ती एक व दहा घोडे व पंचवीस राऊत असे पाठविले आहेत."

नं. २०८०. **श्री.** (चैत्र शु० १-८ एप्रिल.)

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र गणेश स्वामी गोसावी यांस.

पोष्य माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंती, उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें. विशेष राजश्री व्यंकटराव नारायण घोरपडे हे तोतयाकडे गेले होते, सबब यांचे सरंजामाची जप्ती होती, ते मोकळी होऊन नजरेच्या ऐवजाचा करार जाहला आहे. त्यापैकीं फौजेचे खर्चास पंचवीस हजार रुपयेची वरात पेशजीच्या पन्नास हजारांशिवाय हल्लीं दिली आहे. त्यास मशारनिल्हेस प्रायश्चित्त जाहलें नाहीं याजकरितां ऐवज द्यावयास ते दिक्कत करितात म्हणोन तुम्हाकडील चिमणाजी महादेव कारकून याणीं विनंती केली. त्यावरून वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री यांस प्रायश्चित्तविषयाविशीं पत्र गेलें होतें. त्याणीं लिहिलें कीं, " घोरपडे यांस तीन चांद्रायणें सुवणप्रत्याम्नायें बाराशें रूपये नेमून सरकारचे कारकुनाचे गुजारतीनें क्षेत्र खिद्रापूर टाकळी येथें श्रीकृष्णातीरीं प्रायश्चित्त द्यावें याविशीं क्षेत्राचे ब्राह्मणांस व पांडुरंगराव गोविंद यांस पत्रें घोरपडे याजकडील दादो यशवंत व गोविंद बल्लाळ यांजवळ दिलीं आहेत.

तीं त्यांजकडे गेलींच असतील. तुम्ही वरातेप्रमाणें ऐवज मशारनिल्हे-पासून घेणें. हल्लींचे वरातांसुद्धां पावणा लक्ष रूपये तुम्हाकडे देविले. बाकी सवा लक्ष रूपये नजरेचे ठरले त्यापैकीं पन्नास हजार राहिले, त्याची पक्की निशा घेऊन मशारनिल्हेचे सरंजामाची जप्ती मोकळी करणें. जाणिजे. रवाना छ २९ सफर. मु॥ सब्बा सबैन मय्या व अल्फ. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. २०८१. **श्री.** (चैत्र शु० २–९ एप्रिल).

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

पो॥ बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें, विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. कित्तूरकर व करवीरकर यांचें सूत्र आहे. एकत्र जाहले आहेत व कुमदानही मागती हुबळीहून मोरबेवर आला आहे म्हणोन लिहिलें, त्यास तेथील बंदोबस्तास रा. रामचंद्र गणेश व बाजी गोविंद आहेत. लौकरच बंदोबस्त होईल. रा. हरीपंत यांजकडून चार पांच हजार फौज पुढें रा. परशुरामपंतभाऊ यांजकडे पाठवावयाविसीं तुम्ही लिहिलें, त्यास याजउपरी सारेच फौजेसुद्धां हरीपंतांनीं लौकर जावें याविशीं त्यांस पतें रवाना जाहलीं आहेत. तेही दरमजल जात आहेत व नबाबही धौशेसुद्धां गदवालचे रोखें गेलेच आहेत. रा. महादजी शिंदे यांस पाठवावयाविसीं लिहिलें, त्यास त्यांची रवानगी कोल्हापुराकडे लौकरच होई असें करितों. रा॥ छ ३० सफर बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. २०८२. **श्री.** (चैत्र शु० ७–१६ एप्रिल.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र गणेश स्वामी गोसावी यांस—

पोष्य माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंति उपरी

येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुम्ही फौजसुद्धां मिरजप्रांतीं येऊन सरकारी महालांचे कमाविसदार व जमीदार रोखे करून धरून नेऊन मारहाण करितां, घांसदाणा मागतां, गांव लुटतां, रयतेस मनस्वी उपद्रव देतां, म्हणोन हुजूर बोभाट येतात. ऐशास सरकारी महालीं उपसर्ग करणें, घांसदाण्याचा ऐवज मागणें. कमाविसदार व जमीदारांस धरून नेऊन मारहाण करणें हे गोष्ट उत्तम नाहीं. अतःपर कमाविसदार व जमीदार धरून नेले असतील ते सोडून देणें. याउपरी रोखा पत्र एकंदर न करणें. जाणिजे. छ ५ रबिलावल सुा सबा सबैन मय्या व अल्फ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २०८३. श्री. (चैत्र शु० ९–१६ एप्रिल.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. " राजश्री रामचंद्रपंत व बाजीपंत फौजसुद्धां मिरज प्रांतीं येऊन प्रांतांत उपसर्ग करितात, महालची खराबी केली, आमचे सरदार शत्रूच्या पेंचांत, त्यांची सुटका होण्याची आपणास इरे आहेच; राजश्री हरीपंत लौकर कर्नाटकांत जात असें जालें पाहिजे. नबाबही पुढें गेलेच आहेत. " एतद्विषयींचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास आपले लिंहिल्यावरून उभयतांस निक्षून सरकारचीं पत्रें पाठविलीं असत. याउपरी बंदोबस्त करितील. उपसर्ग प्रांतांत करणार नाहींत. वरकड—सरदार लौकर सुटून येण्याची उत्कंठा आह्मांस लागली आहे. कर्नाटक प्रांतीं फौजा रवाना होऊन शत्रु जरबेंत येऊन सरदारांची सुटका सत्वर व्हावी, याअर्थें हरीपंतही दरमजल

रवाना केले. नबाबांसही याच अन्वयें पत्रें वरचेवर जात आहेत. नबाबांची फौज व सरकारची फौज एकत्र जाली म्हणजे जरब बसेल. सारांश येविशींची फिकीर येथें नाहीं असा अर्थ नाहीं. रवाना छ ७ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं. २०८४. श्री. (चैत्र शु० १०–१७ एप्रिल.)

पौ छ ९ रबिलावल सन सब्बा सबैन. चैत्रमास.

श्रीमंत राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशीं,

पोष्य विसाजी आप्पाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागा छ ८ रबिलावल मुक्काम डिगरज यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पहिलें लिहिलेंच आहे. पन्हाळकर किल्ला सोडून मैदानीं न येत. सरकारचे फौजेचा मुक्काम एक मास येथें जाला. पोटास नाहीं. वैरण देखील न मिळे. याजकरितां पोटाची तजवीज करून होईल तितकी फौज राखून चार दिवस इतक्यांत आसपास शहास रहावें, वरकड फौजेची योजना करून (कर्नाटकांत परशुराम-भाऊंकडे) रवाना करावी, असा मजकूर उभयतांहीं ठरावून येथें आलों. आम्हीं दहा कोसीं मंगसुळीच्या सुमारें जाऊन असावें, नंतर श्रीमंत राजश्री हरीपंततात्याची आज्ञा होईल तिकडे जावें, अथवा इकडे प्रयोजन पडल्यास यावें, असें सांगून आज निरोप जाला. श्रीमंत राजश्री भाऊ जालीहाळाकडे गेले. तिकडील वर्तमान आलें असेल तें ल्याहावें. तूर्त आम्हांस पोटाचा पेंच फार आहे. येथून कांहीं लभ्य जालें नाहीं. पुढें ईश्वरी इच्छा ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०८५. श्री. (चैत्र शु० १०–१७ एप्रिल.)

श्रीमंत राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं. पोष्य विसाजी आप्पाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून

---

१ रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा यांनीं.

स्वकीय लिहीत असिलें पाहिजे. इसबबेग गाडदी जमादार याचा उंट कहींस मिरजेच्या रानांत गेला तो आपल्याकडील स्वारांनीं वळून नेला आहे. तो सोडून द्यावा व दहा तट्टें हरोलींत नेलीं आहेत व एक तट्टू आज गेलें आहे तीं सोडून द्यावयाविशीं विनंती लिहून कारकून पाठविला होता. सोडचिठीची आपली आज्ञा झाली होती. परंतु मागती मर्जीस न येऊन कारकुनावर इतराजी जाली. माघारा आला. त्यास आपली इतराजी व्हावी अशी चाल आमची आपले घरासीं नाहीं. दुसरेकडील राग आम्हाकडे करणें उचित आहे ! असो. काल बाजीपंत लकडवाले यांजपासीं विनंती केली आहे. त्यांनीं विदित केली असेल. सेवंशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २०८६. (चैत्र शु० ११-१८ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ९ रबिलावल मुा सूल ताा जालिहाळ जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. अलीकडे तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, त्यास करवीरकरांकडील वगैरे सविस्तर ल्याहावें. आम्ही इगडलाजवळून कूच करून येथें आल्यावर तुम्हास पत्र पाठविलें आहे. पावलेंच असेल. येथून कूच करून जालिहाळाकडे जाणार होतों. त्यास दोडवाड मनोळी येथील पतें आज दोन तीन दिवस येतात कीं, येकोडी मुरगोडावर कुमदान येणार, तदोत्तर मनोळीस येणार, त्याजवरून येथेंच तूर्त मुक्काम केला आहे. मनोळीकडे आलाच तर तिकडे मागती जावें लागेल, नाहीं तर जालीहाळाकडे जात आहों. परवां धौशाचीं पत्रें चेनपल्ली गुत्तीपासोन पांच कोस आहे तेथून आलीं. पंधरा वीस हजार फौज, व पंधरा हजार बार, व जेजाला दोनशें, तोफा वीसपर्यंत आहेत. याउपर गुत्तीस वेढा देणार. तिकडे त्यांनीं चांगलाच पायबंद बसविला आहे.

तेहीं राजश्री हरीपंत तात्यांची वाट पाहतात. अद्याप तात्यांचें येणें होत नाहीं! काल शिवाजीपंताचीं पत्रें छ ३० सफरचीं परांडे येथील मुक्कामाहून आलीं. त्यांत लिहिलें आहे कीं, " निंबाळकरांनीं घांसदाण्याचे रोखे माघारे टाकिले सबब चार दिवस इकडे अधिक लागले. याउपर गुंता नाहीं. मजल दरमजल हरीपंततात्या कृष्णातीरास कपाट संगमाजवळ येत आहेत." असें लिहिलें आहे. त्यास आठ दिवस जाहले. अद्याप कोठें उमटत नाहींत! आणखी मांडणी स्वारही पाठविले आहेत. येतील तेव्हां खरे! दिवस अखेरीचे आले. हरिपंतांच्या येण्याची फारच दिवसगत लागली याजमुळें बहुत मनसब्यांस धक्का बसला. असो. होणारासारखें घडतें. उपाय काय! कित्तूरकर जमावमुद्दां बाहेर निघाला आहे. नवलगुंदकर व गदगकर व जालीहाळकर वगैरे देसैक तमाम शत्रूच्या मिळणींत आहेत. ईश्वरकृपेंकरून पारिपत्य यथास्थित होईल तेव्हां खरें. आम्ही येथें सडेच आहों. बुणगें बदामीजवळ आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठवितों. तुमचीं पत्रें तीन वेळ रवाना केलीं तीं आजच पावलीं. विस्तार कळले. कांहीं बाकी राहिली नाहीं! उत्तरें सारीं मागाहून पाठवितों. दहा विसांवर जात असलिया जाळून टाकणें! कटकट कामाची नाहीं. कोठेंही उगवायासी येतील. परंतु सुमनुष्य नाहींत! ईश्वरें काय योजिलें आहे न कळे. श्रीइच्छा प्रमाण. काळजी कोणती म्हणून करावी? बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

---

१ देसाई. २ रामचंद्र गणेश मिरजप्रांतीं घांसदाण्याचा वगैरे उपद्रव करीत होता त्यास दहावीस हजार रुपये दिल्यानें उपद्रव टळत असेल तर देऊन टाकावे असा भाव.

नं. २०८७. (चैत्र शु० १२–१९ एप्रिल)

लें उपद्रव बंद व्हावा येविशीं साधन करावें, त्यास परवांचे दिवशीं भोसल्यांस मेजवानी झाली त्यामुळें नीट गांठ पडली नाहीं. दुसरे दिवशीं गांठ घालून मागतीं सविस्तर वर्तमान निवेदन करून 'पुढें या गोष्टीचा बंदोबस्त काय, प्रांतांत बाकी राहिला नाहीं, काय ती आज्ञा सांगावी,' म्हणोन पुसिलें. त्यावरून आज्ञा जाली कीं, 'कांहीं फिकीर करूं नका, सरकारचीं पतें व कारकून व आमचीं पत्रें देतों, बंदोबस्त होईल, म्हणोन सांगितलें. त्याप्रमाणें कारकून राजश्री आबाजी विठ्ठल नेमिले. पत्रें राजश्री रामचंद्रपंत व चिमणाजी महादेव यांस देविलीं. पत्रें व कारकून काल सायंकाळीं खेालीं आले. कारकुनास रूबरू ताकीद आहे कीं, परिच्छिन्नवादें त्यांस सांगोन त्यांचें कूच करवावें. ऐसें स्पष्टपणें सांगितलें व पत्रेंही निक्षूणच आहेत. नानांनीं बाजीपंतांस व चिमणाजीपंतांसही लिहिलें आहे. पत्रावलोकनीं कळों येईल. त्यास पत्रें व कारकून आज येथून रवाना केले आहेत. कारकुनास घोडें पुण्यास खासपागेंत देविलें होतें. त्यास दिवसगत लागेल, यास्तव रहिमतपूरपर्यंत यांनीं जाऊन तेथून घोडें देऊन आपणाकडे पाठविले आहेत. तेथून आपण यांस घोडें देऊन एक दोन माणसें लागलीं तरी देऊन लष्करांत रवाना करावें. काम बजाविलीलसें आहे. " चिमणाजी महादेव यांस पत्र पेशजी नानांचें पाठविलें त्यांत कांहीं ऐवज पाठविणार होतों असें लिहिलें तें नसावें, निक्षूणपणेंच लिहावें. तैसें लिहिल्यानें संधी राहते. " म्हणोन पत्रीं लिहिलें, त्याजवरून हल्लीं निषेधून बेदिकत लिहिलें आहे. वरकड वर्तमान (आपण विचारिलें,) त्यास राजश्री हरीपंततात्यांनीं उंमरजेचें ठाणें घेतलें. पुढें दर–

---

१ शिवाजी बाबाजी हैसकर यानें पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव यांस लिहिलेल्या पत्राचा एकच हा बंद सांपडला. २ गांठ नाना फडनविसांची. ३ पुरंदराखालीं. ४ जि० विजापूर.

कूच जातात ऐसें वर्तमान येथें आहे. आपण समीप. तेथें वरचेवर वर्तमान येतच असेल. तीर्थस्वरूपही तेथेंच असतील. अगर मंगळवेढ्यास आले कीं आपणापाशीं आहेत हें कांहीं कळत नाहीं. सविस्तर लिहावें. इंग्रजांकडील वकील येथें येऊन भेटी जाल्या, येविशीं पेशजी सविस्तर लिहिलें आहे. अलीकडे विशेष कांहीं नाहीं. तेथेंच ते आहेत. फरांचीसांचा वकील आला होता त्यास आणावयास स्वार, कारकून, हत्ती पाठविला होता. तो वकील दिव्याच्या घाटाखालीं आला. एक दोहों दिवशीं येथें दाखल होईल. त्यास जागा बागांत सुपें गांव खेडें आहे तेथें येथून एका कोसावर नेमिली आहे. त्यास व इंग्रजांच्या वकिलास सवा कोसाची तफावत आहे. एकास एक भारी आहेत ! ऐसा मनसबा केला आहे. अद्यापि कोणाशीं बोलणें जाहलें नाहीं. पढें समजों लागेल. राजश्री महादजी शिंदे करवीरावर जातात. मसलत कबूल केली. तरतूद होत आहे. सरकारांतून मातबर चार तोफा देविल्या आहेत. त्यांकडेही येसाजी शिंद्याचें सूत्र आलें आहे. भोसल्यास मेजवान्या उभय कारभारी यांजकडे जाल्या. सरकारांतून जाली. येथून माघारे जावयाचें लौकरच होईलसें दिसतें. राजश्री बापोजी[1] नाईक यांस पेशजी आपण पत्र पाठविलें व हल्लीं पाठविलें त्या दोही पत्रांचीं उत्तरें घेऊन पाठविलीं आहेत व श्रीमंत राजश्री नानांस पत्रें पाठविलीं त्यांचीं उत्तरें घेऊन पाठविलीं आहेत. श्रीमंत राजश्री भाऊ प्रस्तुत कोठें आहेत हें लिहून पाठवावें. राजश्री आबाजी विठ्ठल कारकून पाठविले आहेत हे चांगले काम बजावयाजोगे आहेत, व यांस श्रीमंत राजश्री नानानींही बेमुरवत कूच करावेंणें म्हणोन सांगितलें आहे. हे पोंहचून बंदोबस्त जाहला न जाहला हें लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणें कृपालोभ करावा हे विज्ञापना.

---

१ चारामतीकर.

नं. २०८८. **श्री.** (चैत्र शु० १२-१९ एप्रिल.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री चिमणाजीपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. राजश्री रामचंद्र गणेश फौजसुद्धां मिरजप्रांतीं येऊन सरकारचे कमाविसदार धरून मारहाण करून घांसदाणा मागतात, गांव लुटतात, म्हणून कळलें; ऐशास तुम्हांकडे ऐवजाची ओढ याअर्थें ऐवज रवाना करावा, ऐशी योजणूक होती. परंतु तुम्ही त्या प्रांतीं रोखे पत्र करून ऐवज जमा करितां, त्यापक्षीं ऐवज पाठविण्याचें कारण दिसत नाहीं. सरकारचे महालीं रोखे करणें, गांव मारणें, या गोष्टीची सलाह तुम्ही दिली असेलसें वाटतें. परंतु हे गोष्ट ठीक नाहीं. याउपरी मशारनिल्हेस सांगोन रोखे पत्र होऊं न देणें. कमाविसदार व जमीदार सोडून देविणें. मिरज प्रांतांत उपद्रव करितां हें ठीक नाहीं. परिणाम पहावा. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं. २०८९. **श्रीगणपति**. (चैत्र व०–एप्रिल दु० पंधरवडा.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद. उपरी. राजश्री हरीपंत तात्यांकडे येथून सांडणीस्वार व जासूद जोडया चार पांचपावेतों पाठविल्या आहेत. अद्याप एकाही पत्राचें उत्तर आलें नाहीं. काल जमखिंडीहून रा भास्करपंत मामांचें पत्र आलें, त्यांत लिहिलें आहे कीं, सोलापुरानजीक आले, दरकूच कपाट संगमास येतात, असें लिहिलें आहे. काल तोफखान्याचेंही पत्र तोफखाना हरिपंतांस येऊन मिळाला म्हणोन राजश्री कृष्णराव यांजकडे आलें. सोलापुरा-

---

१ पत्र परशुरामभाऊंचें लष्करांतून मिरजेस. २ उपनाम सखदेव जोशी. ३ तोफखानेवाले सखारामपंत पानशे यांचें.

हून दरकूच येतील तर एका दोहों दिवशीं कपाट संगमास यावे असें आहे. येतील तेव्हां खरे ! राजश्री बापूजी नारायण यांजकडील पत्रें आजच आलीं. धौशा मनमुडगावरच अद्याप आहे. गुत्तीस वेढा दिला नाहीं. राजश्री हरीपंतांची वाट पहात बसला आहे. खासा हैदरखान जमेतसुद्धां बाहेर निघोन चित्रदुर्ग येथें फितवा करून स्थल हस्तगत करावें म्हणोन शिऱ्यास आला. तों वर्तमान फितव्याचें राजास कळलें. तेव्हां जे लोक शें दोनशें फितले होते त्यांचीं डोचकीं मारून बंदोबस्त केला. प्रस्तुत हैदरखान शिऱ्याजवळच आहे. धौशावर येऊन एक वेळ छापा घालावा अशी त्याची उमेद फार आहे. हैदरखानाबरोबर सामानही भारी आहे. लौकर सरकारच्या फौजा धौशास मिळाल्या तर ठीक आहे. मग कुमदान आदिकरून तिकडेच जातील. नबाब बसालतजंगाची फौज अद्याप धौशास मिळाली नाहीं. तयार आहे. याउपर जाईल. कडपेकरही जाणार. कुमदान हुबळीवरच आहे. कांहीं फौज शहापूर प्रांतांत स्वारीस गेली होती. हल्याळ सांबराणींत ठाणें घातलें असें वर्तमान आहे. मनोळी दोडवाड येथील पत्रें रोज येतात कीं शत्रूची फौज येकोडी व मुरगोडावर येणार. याजकरितां तिकडे तलाव्यास काल चिरंजीव राजश्री बळेवंतराव व राजश्री गोविंदपंत मामा व रास्ते यांचें पथक असे पाठविले आहेत. कडलीकोप हुबळीपर्यंत जाऊन येतील. आम्ही मुळावर होतों त्यास एक जागां पांच सात मुक्काम जाहले, यास्तव तेथून कूच करून काल जालीहाळनजीक नदीवरच येऊन राहिलों. बुनगे बनशंकरीजवळच आहे. आह्मास व बुनग्यास दीड कोसाची तफावत आहे. आह्मी तूर्त येथें शहास गुंतत नाहीं. बागलकोटचे कमाविसदार यशवंतराव तोफा प्यादे घेऊन आले आहेत. आम्ही

---

१ पटवर्धन यादवाडकर. यांनीं पुढें अग्निहोत्र घेतलें सबब यांस दीक्षित म्हणूं लागले.

राजश्री हरीपंत तात्या कृष्णेवर आल्याशिवाय येथें मसलतीस गुंतत नाहीं. मागाहून सविस्तर लेहून पाठवितों. येथें पथकांत व शिवाय हुजुरांत खर्चास ऐवज नाहीं. कोठें चार रुपये मिळावयाचे ह्या प्रसंगीं कळतच आहे ! मोठें संकट आहे. ईश्वरेंच परिणाम लावावा ! न होन दुसरें नाहीं. श्रीइच्छा प्रमाण ! चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार आजवर यादवाडांत होते. पायें हल्लीं बरा जाहला. परवां येथें आले. चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादाची शरीर प्रकृत प्रस्तुत बरींच आहे. नागोराव व कृष्णराव यांचे लाखोटे पाठविले ते पावले. चिरंजीव राजश्री जिऊबास आणावयासी स्वार रवाना केले आहेत. दोन चार दिवसांत येतील. राजश्री शिवाजीपंतही पुणियास गेले असतील, यास्तव येथून हरीपंत तात्यांकडे राघो विश्वनाथ यांसीं पाठविले आहेत. या रोखें आणावे असें मानस आहे. काय घडेल पहावें. कुमदान हुबळीवरच आहे. कांहीं फौज बाळापुरास गेली असी बोलवा आहे. बातमीस माणसें पाठविलीं आहेत. तहकीक वर्तमान आलियावर लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २०९०. **श्री.** (चैत्र शु० १५–२२ एप्रिल.)

पैवस्ती छ १४ रबिलावल. सन सबा सबैन. चैत्र मास. सेवेशीं बाजी गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ १३ रबिलावलपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज्ञापत्र सादर झालें. तेथें आज्ञा कीं, " मिरज प्रांतांत मुक्काम करून गांव लुटितां, जमीदारांस धरून आणून घांसदाणा घेतां, त्यास सरकार तालुका असतां उपद्रव द्यावयाचें कारण काय ? याउपर ताकीद करून रखवाली करणें व घांसदाण्याचे रोखे मना करणें. " म्हणोन आज्ञा.

---

१ सावशीच्या लढाईंत जखमी झालेला. २ हें बाजीपंत अण्णाचें पेशव्यांस पत्र. हे घसईकर जोशी. दुसरे बाजी गोविंद नांवाचे पेशवाईंत सरदार होते त्यांचें आडनांव बर्वे. ते बाजीराव. हे बाजीपंत.

त्यास येविशींची विनंती तपसीलवार जासूद जोडीबराबर लिहिलीच आहे. व राजश्री रामचंद्रपंत तात्या व राजश्री चिमणाजी महादेव यांनीं लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. सेवेशीं श्रुत होय, हे विज्ञापना.

नं. २०९१. श्री. (चैत्र शु० १५-२२ एप्रिल.)

छ १३ रबिलावल. चैत्र शुद्ध पौर्णिमा.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

पोष्य चिमणाजी महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ १३ रबिलावल दोन प्रहरपर्यंत आपले कृपेकरून क्षेम असे. विशेष. स्वामीकडून राजश्री काशीपंत आले त्यांणीं सविस्तर मजकूर सांगितला. त्याजवरून उभयतांस विनंती करून आज कही मना करविली आहे, परंतु दुसरीकडे कूच करून जावें तरी फौजेस खर्चास नाहीं, शिराळे वगैरे इकडे वैरणीचा तोटा, प्रतिनिधी-च्या मुलखांत जावें तरी फौज त्याजकडील आमच्या समागमें, तेव्हां तिकडे जावयाची सोय नाहीं. फौज उठून जाणार. येथून मसलत विसकटून फौजेस निरोप देऊन हुजूर जावें तरी महादजी शिंदे लौकर इकडे येणार. तेव्हां फौजेचा जथ जाला आहे हाच उपयोगी. तेव्हां चोहोंकडून पेंच. वारणेअलीकडे सरकारचाच तालुका. मासपक्ष क्रमावे लागतात, तेव्हां कोणीकडे जावें ? फौजेस पैका नाहीं याजकरितां फौज ताकीद मानीत नाहीं. सर्व कारभार अनिवार झाला आहे. त्यास स्वामीच्या तालुक्यांत घांसदाण्याचे रोखे जाले आहेत. त्यास ऐवज वसूल करणार तेव्हां कूचच होणार. दोहींकडून नुकसानीच. यास्तव स्वामींनीं तीस हजार रुपयांचे रोखे जाले आहेत इतका ऐवज गांवगन्ना

---

१ हा रामचंद्र गणेश याचा दिवाण. २ रामचंद्र गणेश व बाजीपंतअण्णा यांस

ताकीद करून चहूं दिवसांत वरातदारास पावता होय तो अर्थ करावा. त्यास आपलें पत्र कीं, " तीस हजारांचे रोखे जाले आहेत त्याप्रमाणें गांवगन्ना ताकीद करून ऐवज आठ चहूं दिवसांअलिकडे देंवितों. आजपर्यंत वसूल जाला असेल तो तिसांत मजुरा द्यावा. " याप्रमाणें आपलें लिहून पत्र आलें म्हणजे कूच करवितों. आपला ऐवज कर्जा-दाखल जमा धरून हरएक ऐवजीं तुम्हास पावेल, ऐसी उभयतांस विनंती करून सरकारांतून तोड काढावयास येईल. ही मसलत सर्वांचे उपयोगाची. फौजेस भक्षावयास नाहीं, सावकार नाहीं, तेव्हां या फौजेची उस्तवारी स्वामीखेरीज या प्रांतीं कोण करणार आहे ? पोटास नाहीं म्हणून स्वामीसन्निध यावयाचें कारण पडलें. अलाहिदा काशीपंत लिहितील त्याजवरून कळेल. हा विचार बरा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०९२. श्री. (चैत्र शु० १५–२२ एप्रिल.)

शिक्का.

आज्ञापत्र. राजश्री पंत प्रधान ता॥ मोकदमानी मौजे मालगांव का॥ बेडग. प्रांत मिरज. सुरु सन सब्बा सबैन मय्या व अल्फ. खासा स्वारी या प्रांतांत आली असतां तुम्ही अद्यापि घांसदाण्याचे चुकोतीस न आलां हे कोण गोष्ट ! देखत आज्ञापत्र घांसदाण्याचे चुकोतीस हुजूर येणें. दिरंग न लावणें. या कामास स्वार पागा दिला अवधूतराव यशवंत यांजकडील पाठविले आहेत यांस मसाला

---

१ ही रोख्याची नक्कल. गांवावर फौजचंद सरदारानें रोखा केला तर तो कसा सकीचा असे हें रामचंद्र गणेश यानें मालगांवावर केलेल्या या रोख्यावरून दिसून येईल. रामचंद्र गणेश याजवळ पेशव्यांच्या मुतालिकीची शिक्के कट्यार असल्यामुळें या रोख्यास आज्ञापत्राचें स्वरूप त्यास देतां आलें. नाहीं तर नेहमींच्या नमुना हटला तर " आज स्वारी राजश्री रामचंद्र गणेश दिमत पंत प्रधान तहा मोकदमानी मौजे मालगांव " इ० इ. असा असतोयाचा.

३०० तीनशें रुपये आदा करणें. जाणिजे. छ १३ रबिलावल. आज्ञाप्रमाण. मोर्तब.

नं. २०९३. श्री. (चैत्र शु० १५–२२ एप्रिल.)

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक विमणाजी महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागा छ १३ रविलावलपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचें वर्तमान क्षेम असे. विशेष. आज्ञापत्र सादर झालें तें छ १२ मिनहूस पावलें. तेथें आज्ञा कीं, " राजश्री रामचंद्र गणेश यांसीं तुम्ही सल्ला देऊन फौजेसुद्धां मिरज प्रांतीं येऊन सरकारचे कमाविसदार धरून नेऊन मारहाण करून घांसदाणा मागतां, गांव लुटितां, खर्चास पाठविण्याचे योजणुकेंत होतों; त्यास तुम्ही सरकार तालुक्या-पैकीं ऐवज जमा करितां त्यापक्षीं ऐवज पाठवावयाचा नाहीं. मिरज प्रांतांत उपद्रव देतां हें टीक नाहीं. परिणाम पहावा. " म्हणून, त्यास श्रीमंत राजश्री तात्या व अण्णा फौजसुद्धां मिरज प्रांतीं माझ्याच सल्ल्यानें आले असें नाहीं. मला ऐवज आणावयाकरितां त्यांणीं सेवेशीं रवाना केलें होतें, त्यास " फौजेची हैराणगत फार आहे. ऐवजाची बेगमी करून द्यावी. " म्हणोन विनंती तीन महिने निरंतर करीत गेलों; व यांचीं पत्रें निकडीचीं येत तीं दाखवीत आलों. तत्राप स्वामींनीं तरतूद करून दिली नाहीं ! रिकामा लष्करांत आज्ञा घेऊन आलों. येथील विचार पाहतां पंधरा रोजमुरेपर्यंत फौजेचे तटले आहेत. रोज उठोन धरणीं पारणीं, फौज उठोन चालली, लोक छबिन्यास देखील न जात, वैरग देखील नाहीं, फौजेस दगा होईल, याजकरितां कूच करून श्रीकृष्णादक्षिणतीरीं ब्रह्मनाळ येथें येऊन मुक्काम केला. राजश्री गंगाधरराव यांजपाशीं पन्नास हजार

---

१ फडनवीस. २ रामचंद्र गणेश. ३ बाजीपंत.

रुपये हे कर्ज मागों लागले. ते पैसा एक न देत ! तेव्हां फौजेस निरोप देऊन यावें, त्यास राजश्री महादजी शिंदे येणार ह्मणून राजश्री गुरुंजी बावांचीं पत्रें आलीं. त्यास चार दिवस ठांसन राहणें प्राप्त. परंतु फौजेचा तवा तोबरा चालला पाहिजे. घोरपडे व वाळवेकर[2] वगैरे यांजकडे सरकारांतून या फौजेस ऐवज नेमणूक करून दिला त्या ऐवजास वेध फार. वेध तुटल्यानंतर ऐवज येणार. त्यास दिवसगत लागणार. याजकरितां राजपथकी सरंजामी आहेत त्यांखेरीज मिरज प्रांतांकीं घांसदाणा म्हणोन पंचवीस हजार रुपयेपर्यंत द्यावे ऐसा करार करून रोखे केले. तितका मात्र ऐवज घेणार. ' गांवखेडीं लुटितां ' म्हणोन लिहिलें, त्यास वैरण रानांत राहिली नाहीं. तेव्हां गांवास उपद्रव लागेल, यास्तव दोन तीन पागा व त्यांजकडील राऊत याप्रमाणें देऊन गांवखेडयाचा बंदोबस्त करावा म्हणोन मिरजकरांस हे म्हणतात तें ते आईकत नाहींत. ' जमीदार व कमाविसदार सोडून देणें ' म्हणून लिहिलें, त्यास जमीदार कमाविसदार धरून आणिलेच नाहींत, मग सोडून काय द्यावे ? ' चार दिवस ठांसून राहावें ' म्हणोन छ ८ रबिलावलचे पत्रीं आपलीच आज्ञा. तेव्हां राहणें प्राप्त जालें. ' मिरज प्रांतीं उपद्रव लागतो हें ठीक नाहीं. परिणाम पहावा. ' म्हणोन लिहिलें, त्यास ही मसलत स्वामीचीच. मिरजकर व उभयतां सरदार पदरचेच. तेव्हां परिणाम सर्व लागणें हे आपणाकडेच आहे ! येथून वाळवें शिराळेकडे जावें तर तिकडे वैरणीची काडी राहिली नाहीं. तेव्हां तिकडे जाऊन परिणाम कैसा लागेल ? कऱ्हाड प्रांतीं जावें तरी प्रतिनिधीचा मुलूख. त्यांची फौज समागमें आहे ती उठोन जाणार ! वारणेपलीकडे जावें तर तिकडे आज तीन महिने फाजेमुळें वैरण राहिली नाहीं. तेव्हां

---

१ महादजीपंत गुरुजी. हे महादजी शिंद्याजवळ पेशव्यांचे वकील होते.
२ देशिंगकर. ३ धोरात.

तिकडे जाणें ठीक नाहीं. मग जावें कोणीकडे ? राहिलें तो पाहिजे. चोहोंकडून पेंचच आहे. त्यास पुण्यास परत येण्याविशीं आज्ञापत्र आल्यास उठोन येतील, इतकी तोड दिसत्ये ! ऐवजाची तरतूद जाल्यास उत्तम आहे. येथून कूच करून एखादीकडे जावें ऐसें एक दो दिवशीं करितों. मिरज प्रांतीं उपद्रव न लागावा या अर्थी ताकीद होत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०९४. (चैत्र शु० १५–२२ एप्रिल.)

परशुरामभाऊंचें पत्र छ १३ रबिलावलचें, जालीहाळनजीक मुक्काम येथून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस—

" इकडील वर्तमान तर राजश्री हरीपंततात्या उंबरजेच्या अलीकडे कूच करून आल्याचें पत्र अद्यापि आलें नाहीं. कुमदान[1] अद्यापि हुबळीवरच आहे. दोन चार हजार फौज मात्र माघारी गेली. शिंदे करवीरच्या पारिपत्याकरितां जेजुरीच्या अलीकडे आले, पौर्णिमेस देवास यात्रेकरितां करवीराजळ येणार, असें वर्तमान ऐकिलें. शिंदे जर करून पौर्णिमेस आले असले तर याउपर करवीरची मसलत लौकरच उरकेल. "

नं. २०९५. श्री. (२३ एप्रिल.)

पैवस्ती छ १४ रबिलावल. सन सब्बा सबैन. चैत्र मास.

सेवेशीं रामचंद्र गणेश. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा चैत्र वद्य प्रतिपदा. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष मिरजकरांविशीं आज्ञापत्र सादर जालें. सविस्तर अर्थ कळला. सारांश पोटाचा प्रकार कसा करावा हा प्रकार लिहावयासी आज्ञा जाली पाहिजे. त्याप्रमाणें करावयासी येईल. सविस्तर अर्थ राजश्री नानांस राजश्री चिमणाजीपंत यांणीं लिहिला आहे. त्याजवरून श्रुत होईल.

---

[1] करवीरानजीक जोतिबाच्या डोंगरावर चैत्री पौर्णिमेस यात्रा भरते तीकरितां. जोतिबा हा शिऱ्यांचा कुळस्वामी आहे. [1] पत्र पेशव्यांस.

अक्षतृतीयेपर्यंत या प्रांतीं मुक्काम आहेत. थोडीबहुत पायमल्ली व ऐवज घेतला हा मिरजकरांस घोरपडे वगैरे यांजकडील लाव्हन देऊं, सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २०९६. श्री. (चैत्र व० ४–२६ एप्रिल:)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री चिमणाजीपंत स्वामीचे सेवेशीं.

पो बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. राजश्री पांडुरंगराव गोविंद यांजकडे मिरज प्रांत आहे, त्यास राजश्री रामचंद्रपंत व बाजीपंत यांचा मुक्काम तालुके मजकुरीं होऊन रयतेस उपद्रव फार जाहला, कांहीं गांव लुटले गेले, कांहीं फौजेनें जाळिले, याप्रमाणें सरकारच्याच फौजेचा उपद्रव सरकार तालुक्यांत होतो म्हणून कळलें हें ठीक नाहीं. फौजेस ताकीद चांगली करून यांच्या प्रांतांत उपद्रव न होय तें करणें. येविशींचा फिरोन बोभाट न येई तें करणें. तरच तुमची शाबास ! तुम्ही लिहिलेंत कीं, मिरज प्रांतांतील दुमाल्यापासून मात्र कोठें कांहीं घेतों, आणि राजश्री गंगाधररावांचीं पत्रें वारंवार येतात कीं मिरज प्रांताचे गांव मारतात, लुटतात, खंडण्या घेतात ! याकरितांच कारकून हल्लीं सरकारांतून पाठविला आहे. तुम्ही तेथें असतां असें होणार तर नाहीं. जर जाहलें व होत असेल तर मग तारीफ काय करावी ! मग येथून तरी तुह्माकडील तर्तूद कशास करावी ? हें करणें वाईट, तुह्मासच पुढें जड पडेल, याचा विचार पुर्ता करावा. रा छ १७ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. २०९७. (चैत्र व० २–२४ एप्रिल).

परशुरामभाऊंचें पत्र छ १५ रबिलावलचें नजीक जाली हाळ येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" शत्रूची फौज हुबळीवरच आहे. हल्याळ सांबराणीचें ठाणें घेऊन मागती फौज हुबळीस गेली. बैद वगैरे मिळोन तीन हजार-पावेतों फौज माघारी गेली. खासा हैदरखान शिग्यावर आहे. धौशा मनमुडगाजवळ आहे. तेथें मिरानें येऊन छापा घातला. परंतु धौशा सावध होता यामुळें छापा मारून काढिला. तीन हजारपर्यंत घोडे पाडाव आणिले. शेवटीं मीर खासा ताडमरीवरून पळोन गेला. याप्रमाणें बापूजी नारायण यानीं लिहिलें आहे. त्यांचीं माणसें थेट धौशाच्या लष्करांतून पाहूनच आलीं. निजामअल्लीखानही दर कूच धौशाकडे जात आहेत. हरीपंत तात्यांचें उंबरजेहून कूच जाहल्यावर सांडणीस्वार आला. मध्यें न गुंततां हरीपंत आज उद्यां कपाटसंगमास येतात. त्यांची आमची भेट लवकरच होईल. आमचें बुनगें बदामी-जवळच आहेत. आम्ही सडेच आहों."

नं. २०९८. (चैत्र व० ४–२६ एप्रिल.)

परशुरामभाऊंचें छ १७ रबिलावलचें पत्र मुक्काम नजीक सुडी दोन कोस तालुके जालिहाळ येथून मिरजेस गंगा-धरराव गोविंद यांस—

" जालिहाळनजीक होतों तेथून परवां कूच करून सातगिरीस मुक्काम करून तेथील देसायापासून सहा हजार रुपये खंडणी घेतली. दुसरे दिवशीं कूच करून येथें आलों. येथून पाव कोसावर कलिगनूर खेडें चौबुरजी गढी जालिहाळच्या देसायाची होती तीस काल तोफा लाविल्या. आज गढी घेतली. दुसरे दोन गांव चांगले तटबंदीचे देसायाकडील आहेत ते घ्यावयास चार चार दिवस लागतील. "

---

१ हैदराचा मेहुणा मीर रेजा यानें.

नं. २०९९. **श्री.** (चैत्र व० ४–२७ एप्रिल.)

पैा छ १९ रबिलावल. मुक्काम सुडी.

साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल रविवार नऊ तास तों यथास्थित आपले दयेकडून. कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपलें पत्र पावून साकल्यार्थ मनन झाला. आपण काल जालेहाळच्या खेडयांस उतरलां होतां. आज तो सुडीस तोफा वाजत होत्या. बहुशा तो गांव वेढला असेल. राजश्री हरीपंततात्या जवळपास आले कीं कसें, आपली त्यांची भेटी कधीं होईल, तें निरोपावें. धौशा-वर छापा आलेला नामोहरम जाला हें वर्तमान हुबळीसही आलं. टिपूचं सांपडला असें वर्तमान ! कोणी म्हणतें जे दोनशें रावतांनिशीं तो मात जखमी गेला. मीर व हुसेनखान दोघे पाडाव सांपडले. तीन हजार घोडे धौशास सांपडले. हैदरखान खंडणी धौशास द्यावी या पैगामांत आहे, परंतु धौशा ऐकत नाहीं. ' पट्टणापर्यंत स्वारी आल्या-वर मनास आणूं ' म्हणून गुरमकोंडेकडून पट्टणचा रोख धरून धौशा जातो. महंमद अल्लीही फिरंगीसह धौशाकडे येणार. कर्नोळ व कडप-कर बरोबर आहेत. राजश्री तात्यांचा मार्ग पाहतात म्हणे. हे जातांच हैदराचा नूर उरत नाहीं ! मीर पाडाव गेल्याचें वर्तमान येतांच हुब ळीची तीन हजार फौज गेली. कुमदान यांसही येणेंविशीं पट्टणचें पत्र आलें आहे. जाणेंचे तजविजेंत आहेत, परंतु बाहेर आबानें आहेत. तात्या समीप आले म्हणतांच हे जातात ! कुमदानाजवळ तीन चार हजार फौज, चार हजार बार, व कानडे प्यादे दहा हजार आहेत. रा० सुबराव काल शिरसंगीस पैकेचे वसुलास म्हणून पन्नास पाऊणशें स्वार घेऊन आले आहेत. रा॥ देसाई काय करितात पहावें. रा॥ त्रिंबकराव अण्णाकडे त्याची बातमी असेल. सरकारचे ऐवजाकरितां आ-

---

१ काळो बहिरव पेठे नरगुंदकर यांचें परशुरामभाऊंस पत्र. २ अर्काटचा नबाब. ३ मद्रासकर इंग्रज. ४ हा धारवाडचा सुभेदार येसाजीराम याचा पुत्र.

पणाकडून रा॥ देसाई यांजकडे कोणी गेले असतील तेही वर्तमान लिहितील. बहुत काय लिहिणें कृपा असावी. श्रीमंतांचें पुण्य समर्थ येणेंमुळें सर्व अरिष्टें परिहार होतील. हे विनंती.

नं. २१००. श्री. (चैत्र व० ४–२७ एप्रिल.)

पैा॥ छ १९ रबिलावल.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत[1] स्वामीचे सेवेशीं.

पोष्य काळो[2] बहिरव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. स्वक्षेम लिहिलें पाहिजे. विशेष. आपलें पत्र पावन साकल्यभाव कळला. तीर्थस्वरूप राजश्री भाऊंची[3] मर्जी आम्हांवर सुधी नाहींसा भाव सुचविला, ऐशास राजश्री आपाजीपंत रामदुर्गाहून आजं रविवारीं येथें येणार होते. न आले तर प्रातःकाळीं रा. आपाजी हरी यांस पाठवीत असों. आपाजी हरी यांस कांहींसें बरें नाहीं. ते राहिल्या रा. शंकरोबा मामास पाठवीत असों. परंतु आपाजीपंत व आपण तेथें आहां, इकडील न्यून पडों देऊं नये. उपचार लिहिणें काय ! तीर्थस्वरूपांनीं राग केला तरी आमची सुटका त्यांस नाहीं ! आपण सांगत असावें. वरकड भाऊंचे पत्रावरून कळेल. रा. महादजी शिंदे निरेवर आले होते. आजीवर श्रीकेदारलिंगास आले असतील. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

नं. २१०१. श्री. (चैत्र व० ४–२७ एप्रिल.)

पुा॥ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. मुख्य पत्रावरून सर्व कळेल. रा० गिरमाजीपंत यांस फुरसत चिठी चार दिवसांचीच पाठविली ! नित्य घोर करतात. असो. रा. आपाजीपंत उदईक सोमवारीं निघोन येतात. साकल्य सांगतील. भाव चित्तीं घेऊन

---

१ नारो त्रिंबक पोक्षे. २ पेठे नरगुंदकर. ३ परशुरामभाऊंची. ४ काळो बहिरव पेठे नरगुंदकर याचें परशुरामभाऊस पत्र.

समर्पक निरोपावें, त्यावरून स्वस्थ राहूं. सर्वस्वें आमचे साभिमानी आपण. उपचार लिहिणें नाहीं. हेबाळचीं गुरें हुबळीकरांनीं काल नेलीं. आणखी आवाडाव करणार. आपणही सुडीकडे लांब गेलां. राजश्री तात्यांची आपली लौकर भेट झाली तर शत्रूस सलाबत विशेष पडेल. सदैव वर्तमान लिहीत जावें. हुबळीकर मोरबेकडे आलेसें वर्तमान उठलें होतें. पाहतां सुबराव शिरसंगीस आले. त्याबरोबर शें-पन्नास राऊत आले होते त्यांचा गलबला ! विशेष कांहीं नाहीं; कुम दान यास ' लांब लांब न जाणें. आलें यश जाईल.' हेच ताकीद हैदरखानाची येती म्हणे. लिहिलें वर्तमान अंतरंग त्याचे खलबतांतील आहे. उगरगोळावर येऊन गेले त्यादिवशीं फारच घाबरले होते म्हणे. आपली गांठ तुटली ह्मणोन क्षेम गेले. आतां तों शत्रूची बाजू कचरली आहे. आपलाच अभ्योदय होत जाईल. श्रीदयें उदय आप-लाच होत जाईल असें होईक ही पाहिलेलें आहे. आम्ही आपल्या पदरचे, आपलें कल्याण इच्छिणार, परंतु आपली निर्दया सांगणारा-मुळें होती ! येणेंमुळें चित्तास परम विस्मय वाटतो. आम्ही आपण टाकिलें तरी सुटतों असा अर्थ नाहीं ! कैलासवासी तीर्थस्वरूप रांव आपले हातीं आम्हास देऊन गेले आहेत. त्यांचा आमचा ऋणानु-बंध चालत कोणें प्रकारें आला हें राज्यांत प्रसिद्ध आहे. त्यांचा जंग रक्षून सांभाळ करावा. येथील कसाले तापत्रय लिहि-ल्यास आपणास कंटाळा येतो. आम्ही दुसरे कोणास ल्या-हावें ? आम्हास छाती श्रीशिवाय आपणाशिवाय तिसरा आश्रय आहे कीं नाहीं चित्तास आणावें. येथें कोणें रीतीनें काल घालवितों हें अंतरंग बहिरंग सर्व प्रकारें नानाप्रकारचें तापत्रय एकदां भेट होती तर विदित करतों. आमचे लाभ कालानुसार भेट होणें तेव्हां

---

१ कुमदान याच्या लोकांनीं. २ गोपाळराव.

होईल. मुख्य सर्व अरिष्ट परिहार होऊन आपण क्षेम, त्यांतच आमचा तरणोपाय. दुसरा विचार किमपि नाहीं. रा० आपाजीपंत यावे, कसे येऊन पावतात ? रा० आपाजीपंतांबरोबरच येतात. सर्वप्रकारें आपण चित्तावर घेऊन बंदोबस्त करावा. कृपा असावी हे विनंती.

न. २१०२. **श्री.** (चैत्र व० ५–२८ एप्रिल.)

सेवेशीं विनंती, सेवक नरहरिराव नरसिंह साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ रबिलावल. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतु राजश्री रामचंद्रपंत-तात्या डिगरजेवर आहेत. मिरज प्रांतांत अतिशय उपद्रव केला आहे म्हणोन वर्तमान लिहिलें आहे. राजमंडळकरांचें यांच्यानें कांहीं जालें नाहीं. स्वराज्यांत उपद्रव करितात ! तेथून कूच करून येडुरावर येणार, हुकेरी प्रांतांत धामधूम करणार, म्हणोन वर्तमान आहे. राजमंडळकरांची फौज करवीरास आली. शिंदे[1] व घोरपडे[2] एकत्र आहेत. सरकारची फौज तेथून इकडे आल्यावर काय मसलत करितात हें कांहीं कळत नाहीं. सामानगडकर यांनींही उपद्रव मांडिला आहे. व उत्तरेकडून शिंदे[3] रहिमतपुरास आले. ते आल्यावर करवीरकरांचें कांहीं पारिपत्य जाहलें तर उत्तम ! नाहीं तर तेंही याच ऐवजीं जाहल्यास उपाय नाहीं ! श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत तात्या कारकून व स्वार गांवगन्नाचे घांसदाणे व कर्जपट्टी व सुखवस्तु यांजकडून त्यांचे जीव पाहन रुपये घेणार; यास्तव स्वारी करून हुकेरी प्रांतांत उपद्रव करणार ऐसें वर्तमान आहे. वर्तमान आढळलें तें सेवशीं विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ येसाजी शिंदे. २ शंकराजी घोरपडे मुधोळकर. ३ महादजी शिंदे.

नं. २१०३. श्री. (चैत्र व० ६–२९ एप्रिल.)

पौा छ२० रबिलावल. सन सब्बा सबैन. चैत्रमास. जाबसूद. श्रीमंत राजश्री गंगाधररावजी स्वामींचे सेवशीं—

पोष्य विसाजी आप्पाजी साा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २० रबिलावल यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " तट्टें गेलीं त्यांचा माग जैसिंग अथवा हरोलीस लावलासें नाहीं. पाडून मात्र नेलीं म्हणोन कहीवाले सांगतात. " म्हणोन लिहिलें तर मिरज प्रांतांत तट्टें दुसरे रावतांनीं पाडून नेलीं असा प्रकार नाहीं ! मग न सोडावीं. असी मर्जी असल्यास इलाज नाहीं. गारद्यांचा उंट सोडावयाचा प्रकार तर मुलखाची खराबी त्रिवर्गांनीं केल्याचा मजकूर लिहिला, त्यास धणीपणा आम्हाकडेच आहे असा प्रकार नाहीं. आपल्यासही समजलें असोन लिहिलें, अपूर्व आहे ! आम्हांस श्रीमंत हरीपंततात्या व आपण दोन नाहींत असें समजोन आपले निसबत विनंती लिहितों. मर्जीस न ये तर सेवक लोकांचा यत्न काय ? मर्जी उंट तट्टें सोडावयाची नसली तर तैसेंच उत्तर पाठवावें. व्यर्थ लिहून वारंवार बेमर्जी करून घ्यावी असा प्रकार नाहीं. गारदी लोक आपलेच आहेत. त्यांचे नुकसानीचा मजकूर नाहीं. आज कुच होऊन कवठ्यांचा मुक्काम आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २१०४. (चैत्र व० ७–३० एप्रिल.)

पौा छ २३ रबिलावल सन सब्बा सबैन. चैत्रमास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं. प्रती[1] परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी येथील कुशल ताा छ० २१ रबिलावल मुक्काम सुडी ताा जालीहाळ जाणोन स्वकीय लिहित जावें. विशेष. तुम्ही

---

१ सरदार आठवले.

तेरदाळच्या माणसाबरोबर छ १४ रबिलावलचें पत्र पाठविलें तें व छ १८ रबिलावलचीं पत्रें डांकेबरोबर पाठविलीं तीं ऐसीं काल व परवां पावोन लिहिला मजकूर कळला. राजश्री रामचंद्र गणेश यांजकडून चिमणाजीपंत येऊन तुम्हांसी बोलून यादबुद ठराव केल्याचें सविस्तर लिहिलें, व चिमणाजीपंताचें पत्र व बाजीपंताचें आलें त्याची नक्कल पाठविली तीही पावली. भाव कळला. लबाड कारभार त्यांचा दिसतो. पैका देऊनही बचाव दिसत नाहीं, मग पैका कां द्यावा ? तुह्मी करारमदार यादबुद ठीकच केली आहे. परंतु त्याप्रमाणें त्यांजकडून निभावल्यास केला करार कांहीं वाईट नाहीं. ठीकच आहे. आह्मी दोनही पर्याय लिहिले आहेत. जसें युक्तीस पडेल तसें करावें. हुजुरून पक्का बंदोबस्त होऊन निक्षून आज्ञा उभयतांस आल्याशिवाय ऐकणार नाहींत. येविशीं राजश्री नानांस व शिवाजीपंतांस पेशजीं पत्रें पाठविलीं आहेत तीं पावलींच असतील. शिवाजीपंतही जाऊन पावले असतील. काय करावें ! रामचंद्रपंत व बाजीपंत यांनीं मिरज प्रांतांत असी धूम उठवावी आणि आह्मी येथें चाकरी करावी असें नव्हतें ! परंतु एक चिरंजीव शत्रूचे हातीं सांपडलेमुळें निरुपाय जाणोन लाचार होऊन चाकरी करितों. उपाय काय ! मागाहोन शिंदे येणार ह्मणोन लिहिलें, ते आल्यावर तर कांहींच बाकी राहणार नाहीं ! मग रुपये देऊनही फल नाहीं ! शिंदे आले म्हणजे एक वेळ करवीरकरांचा बंदोबस्त तरी होईल ! इकडील वर्तमान तर--कुमदान अद्याप हुबळी वरच आहे. धौशा गुत्तीनजीक आहे. राजश्री हरीपंततात्यांकडून आजच सांडणीस्वार तालिकोटच्या मुक्कामाहून काल निघोन आज आला. आज कपाटसंगमास येतों असें लिहिलें होतें. ' याउपर तुम्ही

---

१ पांडुरंगराव. २ मिरज प्रांताचा उपद्रव चुकावा ह्मणून रामचंद्र गणेश यास रुपये देऊनसुद्धां.

पुढें सांगाल त्याप्रमाणें येऊं ' असें लिहिलें आहे. त्यास आमचे मतें परभारें त्यांस धौशाकडे लावून दिल्यास कुमदान माघारा जाईल न कळे. दुसरें, नवलगुंद, डंबल व शिरहट्टीकरांचें पारिपत्य चांगलें जाहलें पाहिजे. यास्तव त्यांस इकडे आणवून पंधरा दिवस ठेऊन घेऊन हे जमीदार लगामीं लागल्यावर मग सर्वेच तुंगभद्रापार लावून द्यावें. वरकड आपल्या तालुक्याचा बंदोबस्त आमचा आम्हीच करावा. त्याप्रमाणें पन्नास साठ हजार रुपये खर्चासही आम्ही त्यांस इकडेच मेळवून देऊन आणावें, असा निश्चय ठरला आहे. संगमाहन हणमसागरावरून गजेंद्रगडास मुक्कामास येतील. येथून गजेंद्रगडही तीन कोस आहे. तेथेंच आमच्या व त्यांच्या भेटी होतील. जाहल्यानंतर मागाहून सविस्तर लिहोन पाठवितों. नबाब निजामअल्लीखान यांच्या लष्करांतून जिवाजी रघुनाथ यांचें पत्र तुम्हास आलेलें पाठविलें तें पावलें. लिहिला भाव कळला. राजश्री तात्या पुढें आले. याउपर नबाबही येऊन मिळतील. जालीहाळकर देसाई यानें तालुका मजकूरपैकीं दहा बारा खेडीं घेतलीं आहेत, त्यांपैकीं मांडलगेरें, गलीगनूर व बेविनकट्टें वगैरे चार गांव घेतले. सुडीस तोफा लावून आज चार दिवस जाहले. ठाणें चांगलें आहे. थोरल्या तोफा यादवाडास होत्या, त्या बुनग्यांत आणून ठेविल्या आहेत. अद्याप येथें आणल्याच नाहींत. दोन तोफा रास्ते यांजकडील मध्यम आहेत त्याच लागू केल्या आहेत. काल दोन जंबुरेही बुणग्यांतून आणविले. पेठ हल्ला करून घेतली. गढी अद्याप लढत आहे. दोहों दिवसांत उरकेल. रास्ते यांजकडे खर्चास पंधरा हजार रुपये करार केले आहेत, त्यांपैकीं पांच हजार रुपये काल आले. बाकीचेही देतील. रास्ते यांच्या कार्यास ऐवज द्यावा असें नाहीं, परंतु येथें खर्चाची निकड व सुडी त्यांचे सरंजामाची नव्हे व कमाविशीचीही नव्हे. बदामीकर किल्लेकरी यांस वीस हजारांचीं खेडीं दिलीं आहेत, त्यापैकीं आहे. सबब जाणोन

करार केले. ठाणें घेतल्यावर ऐवजही देतील. ठाणें दोन चार दिवसांत येईल. बुनग्यांतून थोरल्या दोन तोफा आज आणविल्या आहेत. आल्यावर त्याही लागू करितों. मोर्चे प्यादे व गाडदी व कांहीं भले[1] लोकांचे असे आहेत. रामचंद्र गणेश यांणीं असें करावें आणि आह्मी पहावें असें नाहीं ! ! ! परंतु हरिसत्तेस इलाज काय ? तीस हजार रुपये कबूल करूनही फल नाहीं ! तुम्ही उतावळी करून घोडीं सोडिलीं हें ठीक न केलें. सारे जाबसाल उरकल्यानंतर मग सोडावयाचीं होतीं. असो. याउपर तरी घोडीं घ्याल तीं लौकर न सोडणें. आम्ही चाकरी करून शिवाय खंडणी द्यावी ! असो. इलाज काय ? तीस हजार रुपये करार केले त्यांत दोनी ऐवज लावून शिराळेकर व थोरात लावून द्यावे. घोरपडयांचा ऐवज न द्यावा. त्यांजकडे पहिला ऐवज उगवला पाहिजे. चिरंजीव हरबाअण्णास प्रायश्चित्त द्यावयाची तजवीज करावी येविशीं शिवाजीपंत यांसींही लिहावें. शिवाजीपंत मंगळवेढ्याहून पुरंदरास गेले किंवा नाहींत, तें लिहावें. लौकर जावें म्हणोन त्यांस लिहावें. शिंदे करवीरच्या मोहिमेवर येणार असा सिद्धांत जाला. तेव्हां तिकडील निर्वेध जाहलासा होईल. प्रस्तुत रामचंद्रपंत कोठें आहेत ? पुढें त्यांचा काय मनसबा हें लिहावें. रा॥ त्रिंबकराव यांस उतार पडला किंवा तिडीक तसीच आहे ? आरोग्य जाल्याचें वृत्त लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २१०५. (चैत्र० व० १४–६ मे.)

पैा छ १ रबिलाखर. सन सब्बा सबैन. वैशाख मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद. उपरी. कुमदान हुबळीवर राहून एका दिवशीं दो दिवशीं धारवाडास सडी फौज

---

१ शिलेदार. २ उपनांव टकले. हा गोविंद हरीचा जांवई ह्मणजे ज्यास पत्र लिहिलें आहे त्याचा मेहुणा.

पाठवून गोळागोळी करितो. कुमदानाकडील सत्र आम्हाकडे राजश्री कृष्णरावजी यांचे मार्फतीनें आज महिना पावणा महिना लागलें आहे, कुमदानाकडूनच आहे. एक दोन वेळ इकडील माणसें त्याच्या लष्करास जाऊन आलीं. देवीसिंग म्हणोन जमातदार इकडील तोफखान्यांत[1] गाडद्यांचा आहे त्यासी पाठविला होता. जाऊन आला, त्याजबरोबर त्याजकडील दोघे जमातदार आहेत. बोलण्यांतील अर्थ–" आपण येतों. तीन हजार गाडदी व पांच हजार स्वारांनिशीं सरकारांत चाकरीस ठेवावें. विजापूर राहावयासी द्यावें. तेथें आल्यावर लाख रुपये मला व बरोबर येतील त्यांस खर्चास द्यावे. " आम्ही पन्नास हजार रुपये म्हणोन बोलिलों आहों. ठराव होईल तो मागाहून लिहितों. विजापूरचेंही कबूल केलें आहे. घडणें कठीण आहे, परंतु तो होऊन बोलतो त्यासी नाहीं कां म्हणावें ? यास्तव नादीं लाविलें आहे. घडेल तें प्रमाण ! तुम्हास कळावें यास्तव लिहिलें आहे. बोली लावूनही दगाबाजी करावयास चुकणार नाहीं ! परंतु आम्ही दूर आहों ते पक्षीं इतके लांब त्याच्यानें येववतही नाहीं. इतकियांत विसाजीपंत तीन हजार फौज आहे त्यांनिशीं करवीराहून आले तर चिंता नाहीं. श्रीमंतांचे पुण्य-प्रतापेंकरून घडेल तें प्रमाण ! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २१०६. (चैत्र व० १४-६ मे.)

पैा छ १ रबिलाखर. सन सब्बा सबैन. वैशाखमास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल वर्तमान ताा छ २७ रबिलावल भौमवार मुक्काम मुधोळ मोगेर तेा गजेंद्रगड यथास्थित असे. विशेष.

---

१ पानसे तोफखानेवाले.

राजश्री हरीपंततात्यांचा व आमचा भेट काल चार घटका दिवस असतां जाहली. तों अस्तमान जाहला. प्रदोष होता, बोलणें चालणें व्हावयाचें याजकरितां तात्या आमचे डेऱ्यासच भोजनास राहिले. भोजनोत्तर बोलणें चालणें अडीच प्रहर रात्रपर्यंत जाहलें. धवशा अदवानीजवळ आले. नबाबही कृष्णातीरीं पाठीमागें आले. लवकर येणेंविशीं तात्यांस पत्रें आलीं. श्रीकृपेंकरून फौजा तर कर्नाटकांत आल्या. नबाब व जाबीतजंग अनुकूल, तेव्हां आतां चिंता नाहीं. परंतु दिवस मुलूखगिरीचे थोडे राहिले, इतकाच पेंच ! असो. श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे तर सर्व यथास्थित होईल. कुमदान थोडक्या जमावानिशीं सडा अद्याप हुबळीस आहे म्हणून वर्तमान. याजउपर तेथें राहणार नाहीं. आम्ही व राजश्री तात्या मिळोन जतलीचे मुक्कामास गेलों. गदगासं ठाणें बसवून परगण्याचा बंदोबस्त करून तुंगातीरास हरपनहल्लीच्या सुमारें जाणार. जाबीतजंगांनीं तुंगातीरानेंच हरपनहल्लीचे सुमारें यावें, भेटी व्हाव्या, असा मनसबा आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठवितों. प्रातःकाळीं मजलीस गेल्यावर सविस्तर लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २१०७. (चैत्र व० ३०–७ मे.)

परशुरामभाऊंचें पत्र छ २८ रबिलावलचें डंबळ तालुक्यांतून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" शंकराजी घोरपडा परत मुधोळास गेला ही मोठी गोष्ट जाहली. रामचंद्र गणेश कोठें आहेत ? पुण्यांत इंग्रजांचे वकील आले आहेत. श्रीमंतांचा मजकूर ठरावांत आला. सात लक्षांची जहागीर द्यावी असें ठरलें. एक त्रिंबकच्या किल्ल्याची आड आहे म्हणोन

---

१ धौशा. २ दादासाहेबांचा.

पुण्याच्या पत्रांत लिहिलें आहे. फरांचिसाचा वकील आला आहे त्याचेंही वर्तमान लिहावें. "

नं. २१०८. (चैत्र व० ३०–७ मे.)

शिवाजी बाबाजीचें पत्र भिवंडीनजीक पुरंदराहन परशुरामभाऊंस २८ रबिलावलचें.

" मी रविवारीं किल्लयावर जाऊन दोघां कारभारी यांची गांठ घेतली. " रामचंद्र गणेश व चिमणाजी महादेव यांस कोल्हापरच्या बंदोबस्ताकरितां पाठविलें आहे ते मिरजप्रांत लुटितात व म्हणतात कीं, आम्हांस आधार असल्याशिवाय आम्ही मिरजप्रांतांत येऊं कीं काय ? त्याजवरून तुम्हीं उभयतांनीं रामचंद्र गणेश यास सांगून आमचा प्रांत लुटविला व पुढेंही लुटविणार. " याप्रमाणें बहुत रागें भरून बोललों. बोलण्यांत कांहीं बाकी ठेविली नाहीं. तेव्हां सखा-रामपंतबापू म्हणाले कीं, " रामचंद्र गणेश यानीं प्रांत लुटण्या-विषयीं आम्हीं सांगितलें असें कृष्णेचें पाणी हातांत घेऊन सांगाव म्हणजे तुमची जी तसनस जाली असेल ती आम्ही भरून देऊं ! " कारभारी याणीं रामचंद्र गणेश यांजकडे आजरोजीं सरकारचीं पत्रें व हुजरे पाठविले आहेत. इतःपर मशारनिल्हे प्रांतांतून कूच करून जातील. ममईचा वकील आला आहे तो श्रीमंत दादांकडील तहाचें बोलतो. फरांचिसाचे वकील आहे आहेत त्यांच्या भेटी परवां जाल्या. बोलणें चालणें होत आहे. राजश्री रघोजी भोंसले सेना-साहेब सुभा यांस निरोप जाला. देऊरास जावयास गेले. तेथें आठ चार दिवस राहून परभारेंच जातील. "

नं. २१०९. श्री. (चैत्र व० ३०–७ मे.)

पौा छ ६ रबिलाखर सन सब्बा सबैन. वैशाखमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

श. १६९९ **पाळेगारांचें पारिपत्य** इ. स. १७७७

पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष. राजश्री रामचंद्र गणेश यांचे स्वारींतील घोडीं, उंटें वगैरे कहींतील व गांवगन्ना वसुलास राऊत गेले होते त्यांचीं घोडीं तुम्हीं नेलीं आहेत म्हणोन कळलें, ऐशास त्यांचे स्वारींतील घोडीं, उंटें वगैरे नेलीं असतील तीं सोडून द्यावीं. तुमच्या तालुक्यांतील ऐवज मशारनिल्हे याणीं नेला असेल त्याचे रुजुवातीस कारकून लष्करांत पाठवून रुजुवात करून आह्मांकडे लिहून पाठवावें. याउपरी घोडीं, उंटें वगैरे आधीं सोडून द्यावीं. रुजुवात पक्की करून त्यांचे हातचें लिहिलें घेऊन पाठवावें. घोडीं वगैरे द्यावीं. रवाना छ २८ रबिलाबल बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. २११०. श्री. (वैशाख शु० १–८ मे.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं—

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. मिरज प्रांतीं राजश्री रामचंद्र गणेश व बाजीपंत व विसाजीपंत यांजकडील उपसर्ग जाल्याचा मजकूर तपशिलें लिहिला तो कळला. ऐशास आपले पत्रापूर्वीच त्रिवर्गास वारंवार पत्रें व कारकून पेशजी रवाना केलेच आहेत व हल्लीं खिज. मतगारही निकडीनें पाठविले असत. अतःपर कूच करून वारणे. पलीकडे जातील. कळलें पाहिजे. घोडीं, उंटें त्यांचीं तुम्हीं धरून नेलीं असतील तीं सोडून देवावीं व आपले महालापैकीं त्याणीं वसूल काय नेला असेल तो लेहून रुजुवातीनें पाठवावा. रवाना छ २९ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

पौ छ ३ रबिलाखर सन सब्बा सबैन.

नं. २१११. (वैशाख शु०–मे प० पंध०)

परशुरामभाऊंचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस—

" कुमदानास माघारे येणेंविशीं हैदरखानाकडून पत्रें आलीं आहेत. तो माघारा जातो म्हणन वर्तमान आहे. आम्हीं यादवाडाहून दोन तोफा व मुदलावीहून दोन लहान तोफा आणविल्या आहेत. "

श्रीगणपति.

नं. २११२. (वैशाख शु० ३–१० मे.)

पौ छ ६ रबिलाखर सन सब्बा सबैन.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ २ रबिलाखर मुक्काम जथली नजीक डंबळ वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री हरीपंत तात्यांची आमची भेट जाहल्यानंतर एक पत्र व येथें आल्यानंतर एक पत्र अशीं दुकित्ता पत्रें पाठविलीं आहेत. त्यांजवरून सर्व कळलें असेल. हैदरखान गुत्तीचे अलीकडे सहा कोस आला. धौशा अदवानीजवळ. नबाब दोन मजली पाठीमागें. अशांत जलदी करून जलद यावें म्हणून नबाबाचीं व धौशाचीं पत्रें निकडीचीं आलीं. शत्रूची गांठ पडावयाचा समय, अशांत इकडे आम्हीं राजश्री हरीपंततात्यांस गुंतवावें तर तें ठीक नाहीं; याजकरितां राजश्री हरीपंततात्या काल भृगुवारीं कूच करून जथलीहून बेदवटीस गेले. आज कनकगिरीनजीक मुक्कामास जातील. कनकगिरीचे वकील आले आहेत. संस्थानचे खंडणीचे विल्हेस लावून पुढें तुंगातीरास हरीपंत जातील. कनकागिरहून तुंगातीर एक मजल. धौशासही तुंगातीरानें यावें म्हणून पत्रें पाठविलीं आहेत. तुंगातीरीं भेटी होतील. उपरांतीक काय मनसबा करितात पहावें. हैदरखान तर गुत्तीअलीकडे सहा कोस आल्याची बातमी. सामान दहा पंधरा हजार फौज, तीस

चाळीस हजार बार व पंचवीस तोफा असें सामान आहे म्हणून बातमी. शेंवु इतका लांब वाढून आला तेव्हां एक लढाई मातबर व्हावी असा प्रकार दिसतो. राजश्री हरीपंतांची व धौशांची भेट जाहल्यानंतर नबाबही येऊन सामील होतात. नबाब व तात्या एक जाहल्यानंतर शत्रूची गांठ पडल्यानंतर त्याचा फडशा व्हावा असा योग दिसतो. यांत श्रीसत्ता प्रमाण. हुजरातींत पैशाची ओढ भारी. आह्मी पहिल्याप्रमाणें इकडे राहिलों. राजश्री व्यंकटराव घोरपडे व नागोजीराव पथकसुद्धां तात्यांकडे लावून दिले. त्यांचा तालुका तिकडे, याजकरितां तिकडे लावून दिले. राजश्री विसाजी आपाजी आठवले आह्माकडे नेमिले आहेत त्यांस पत्रें पाठविलीं आहेत. ते येतील. देशाहून धायगुडे येतात त्यांसही आम्हाकडे नेमिले आहेत. आणखी हुजरातींतील शिवराव कडेकर वगैरे पागे मिळोन दोन हजार फौज नेमिली आहे ती उद्यां येईल. कुमदान हुबळीकडे आहे. आमचे मतें तात्यांस आठ दिवस ठेऊन घेऊन शिरहट्टी, हुबळी आदिकरून सरंजामाचीं ठाणीं घेऊन तात्यांस लावून द्यावें. असें बोलोन जतलीकडे आलों. दबावानेंच काम व्हावयाजोगें होतें. परंतु नबाबाचीं पत्रें मोठ्या निकडीचीं आलीं, तो मनसबा मातबर नासेल, याजकरितां तात्या तिकडे गेले. दोन हजार फौज आम्हाजवळ ठेविली नाहीं. राजश्री विसाजी अप्पाजीजवळ फौज आहे त्यांतील सरदार दोन चार येथें होते त्यांसी पाठवितों म्हणोन बोलिले आहेत. अद्यापि आले नाहींत. उद्यां कनकगिरीस जातील. तुम्हीं शंकराजी घोरपडे भेटल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. निरोप घेऊन घाटगे थोरात आपले घरास गेले म्हणून रामचंद्रपंतांचें पत्र आलें होतें. पुढें रामचंद्रपंत यानीं मनसबा काय केला ? प्रस्तुत कोठें आहेत ? पुढें मनसब्याचें काय ठरलें ? शिंद्याकडील[1] बोली लागली आहे

---

१ येसाजी शिंद्याकडील.

म्हणोन कळलें त्यास काय वर्तमान हें सविस्तर लिहावें. जोंपर्यंत राजश्री हरीपंततात्याची व धौशाची भेट होय तोंपावेतों अवघडच आहे. हैदर पुढें येतो. हे मागें सरत येत आहेत. हे एकत्र मिळाल्यावर मग चिंता नाहीं. परतु त्यांचा खर्चाचा मोठा गळाठाच आहे. भगवंतच परिणाम लावील तर न कळे ! येरवीं कांहीं बाकी नाहीं. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे तरी सर्वही उत्तमच होईल. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २११३. **श्री.** (वैशाख.शु० ३–१० मे.)

पौ छ ६ रबिलाखर सन सब्बा सबैन. वैशाख मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. गदगचें ठाणें द्यावें व पन्नास हजार रूपये द्यावे असा डंबळकराचा करार असतां राजश्री हरीपंततात्या कूच करून गेले, या अर्थी ठाणें द्यावयासी लबाडी दिसती. याजकरितां गदग तालुकियाचे गांव खेडीं खंडीत आहों. एक गांव हरलापुर म्हणोन देसाई याचा पंचवीस हजार रूपये खंडून तेथील ओली घेऊन आज जयलीहून कूच करून निरलगी येथें मुक्कामास आलों. उदईक येथून कूच करून नरेगलचे मुक्कामास जाणार. रास्तेची फौज उद्यां आम्हाजवळ येईल. राजश्री नारोपंत दातारही रास्तेचे फौजेंत आले आहेत. उद्यां रविवारीं आम्हाजवळ येतील. कुमदान हुबळीसच आहे. राजश्री विसाजीपंत आठवले यांस इकडे पाठविण्याविशीं दोन पत्रें तुम्हाकडे पाठविलीं आहेत, तीं त्यांजकडे पाठविलीं. असतील. त्याजवरून मशारनिल्हे तेथून निघाले कीं नाहीं हें लिहावें. या तालुकियांत आहों. कोठें कोठें कांहीं मिळाल तर पहावें ! शत्रूनें हुबळीवर छावणीचा डौल घातला आहे धारवाडचे पेठेचीं घरें मोडून नेऊन तेथें छपरें घालीत आहे. आमचे

---

१ हरीपंतांचा.

मतें एकवेळ राजश्री हरीपंतसुद्धां जाऊन तेथून त्यास उठवून द्यावें असें होतें. परंतु इकडील निकडीमुळें कांहीं घडलें नाहीं. धारवाडचा वेध तुटत नाहीं. रस्त देखील बंद जाहली आहे. राजश्री भिवराव पानशे यांचें पत्र काल कृष्णरावजीस आलें त्यांत होळकराची रवानगी इकडे होत आहे म्हणोन लिहिलें आहे. येतील तेव्हां खरे ! इकडे आह्मी आहों, कोठें गांवखेडें घेतलें तर पायचें माणूस अगदीं नाहीं. यास्तव दोनशें तीनशें मावळे लोक लष्करची बोली करून चाकरीस मिळाले तर तलाश करून जरूर ठेऊन पाठवून द्यावे. राजश्री विसाजीपंत आठवले इकडे येतात किंवा नाहीं हें लिहावें. आह्मी कोठें एक रात्र न राहतां सावधगिरीनें आहों. पर्जन्यकाळ समीप आला आहे. काय करावें ! राजश्री हरीपंततात्यांच्या लष्कराबरोबर चार जासूद जोडया दिल्या आहेत. वरचेवर बातमी येईल ती लिहितों. पुण्याची डांक बसवावी ह्मणजे पुण्यास शिवाजीपंत यांसी वर्तमान लिहावयासी ठीक पडेल असें आहे. चिरंजीव राजश्री दादास कांहीं समाधान आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २११४. श्रीं. (वैशाख शु० ७–१३ मे)

पैवस्ती छ ६ रबिलाखर सन सब्बा सबैन. वैशाखमास. जाबसूद छ ७ रबिलाखर सन मजकूर. बंद तीन पाटपोट थोरले गडीचे.

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामाचे सेवेशीं—

पोप्य बाजी गोविंद. साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल ता॥ छ ५ रबिलाखरपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. मिरज प्रांतीं घांसदाण्याचा ऐवज घेतला त्याची रुजुवात होऊन ऐवज ठरावा, त्याची बरात शिराळेकर वगैरे यांजवर लावून द्यावी, येविशींचें

बोलणें राजश्री लक्ष्मण वेंकाजी यांजबराबर आपण सांगितलें, त्या-प्रमाणें शिराळेकरांवर वरात बिसा हजारांची. त्यास त्यांचे चार गांव व प्रांत मिरज येथील चौथाईचा ऐवज लावून द्यावा ऐसा करार केला. शिराळेकरांस तगादा लाविला कीं, मुदतीप्रमाणें ऐवजाची निशा करून द्यावी. नाहीं तरी गांव गुंतल्यानें जड पडेल. त्यावरून त्यांणीं पाय-मल्लीची रदबदल केली. त्यास थोडीबहुत सूट द्यावयाचा करार करून बाकी अजमासें सत्रा हजारपावेतों त्यांजकडे ऐवज निघतो त्याची निशा मुदतीप्रमाणें सावकाराकडून आपली करवावी. बाकीचा ऐवज रुजुवात जाहल्यावर स्वारींत कोठें ऐवजाची सोय पडल्यास उत्तम. नाहीं तर पुण्यास आह्मी लवकरच जात आहों. श्रीमंतांस विनंती करून ऐवज लावून देऊं व आपला घांसदाण्याचा ऐवज हुजु रून द्यावा ऐसी श्रीमंतांची मर्जी, तत्राप शिराळेकरांचा ऐवज येथेंच देवावा याविशीं नानाप्रकारें यत्न करून तोडीवर गोष्ट आणून रुजु वातीचें काम चालतें करावें, लोकांचीं घोडीं उंटें तट्टें सोडावीं, याविशीं मशारनिल्हेनीं आपणास विनंती केली. परंतु ती गोष्ट आपले मर्जीस येत नाहीं. नानाप्रकारें सुचे जाबसाल आणून बखेडा घालावा, घोडीं तट्टें न सोडावीं, ऐवजाची सावकारी निशा व पुढील निभावणीचे करार करून मागतां, त्याम ऐसे करार मागेंहीं कोणी केले नाहीं. पुढें आम्हासही कर्तव्य नाहीं. करवीरची मसलत आपले विचारास शेवटास न जावी ऐसी आपली मर्जी, तेव्हां आह्मी तरी राहून फौज खराब करावी, आपले प्रांतास आमचा उपद्रव लागतो याची बदलामी कशास घ्यावी ! आठ चौहों दिवशीं वारणेस पाणी आल्यावर फौजसुद्धां कूच करून पुरंदरास जात असों. मग करारमदार लेहून द्यावयाचें कारण नाहीं ! येविशीं श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांणीं पत्र लिहिलें आहे तें अंलाहिदा पाठविलें आहे. त्याप्रमाणें कर्तव्य असल्यास अमलांत

आणावें. नसेल तर पत्राचें उत्तर पाठवावें. त्याप्रमाणें करूं. याउपरी मर्जीस येईल तैसें करावें. लोभ करावा हे विनंति.

नं. २११६. **श्री.** (वैशाख शु० ७–१३ मे.)

यादीं कसबा दिगरुजवरोन स्वारी रा॥ विसाजीपंत बापू मुक्काम मौजे दिगरजवर केला ते समयीं खर्च क॥ मजकुरावर पडला. सुरुसन सन्बा सबैन. मय्या व अल्लफ. छ ९ रबिलाखर, रोज भौमवार.

१४ चिनी. समागमें कारकून

बाळाजीपंत.

१० चिन्नी.

२ भेटी.

२ बकरीं म्हणोन.

१४

२७॥ रखवाली स्वार १० दर रु.

२ प्रमाणें.

२० रखवाली.

५ पोटखर्च म्हणोन घेतले.

२॥ पानसुपारी. दर राऊतीं ।- प्रमाणें.

२७॥

३ किरकोळ खर्च.

१ चोपदार.

१ जासूद.

१ खिजमतगार.

३

४४॥

६ निशाण. बळवंतराव नाग नाथ.

१ भेटी.

१ बकरें.

१ तूप.

१ हरभरे.

२ मोत्याजी खोजगीर (?)

६

५ बाणदार. एक बणबी राखिली कडबेची. त्यासीं खोजगिरी.

११

४४॥

५५॥

---

१ आठपले.

नं. २११६. (वैशाख शु०—मे. दु० पंधर०)

शिवाजी बाबाजी याचें पत्र भिवंडीहून. माहे रबिलाखर:

" रामचंद्र गणेश व शिंदे यांची लढाई जाहल्याचा मजकूर लिहिला तो कळला. करवीरकरांकडे घोरपडे व घाटगे सामान भारीं होतें तेसमयीं ते चालून येते तरी यांच्यानें दम धरवत नव्हता. ते निघोन गेले. थोडक्या सामानानिशीं येऊन करवीरकर फसले. मोठी गोष्ट जाली. करवीरकरांचा चांगलाच रेंच मोडला. घोडीं सांपडलीं त्यांचा व माणूस ठार जाल्याचा अजमास व तोफा सांपडल्याचा व पाडाव त्यांजकडील सांपडल्याचा तपशील लिहिला तो कळला. राजश्री महादजी शिंदेही साल्प्याच्या घांटाजवळ गेले. फौज जमा करीत करीत पुढें जातात. आतां शिंद्याचें पारिपत्य चांगलेंच होईल. श्रीमंत राजश्री भाऊंचा मुक्काम डंबळास आहे. विसाजी आपाजी[1] फौजसह राजश्री हरीपंततात्यांनीं भाऊंकडे जावयास आगविले म्हणून लिहिलें, उत्तम आहे. इकडील वर्तमान तर राजश्री सखारामपंतबापू हिवरें सासवड येथेंच पंधरा वीस दिवस आहेत. राजश्री नाना पुण्यांतच आहेत. "

नं. २११७. (वैशाख शुद्ध ९—१६ मे.)

परशुरामभाऊंचें छ ८ रबिलाखरचें पत्र मुक्काम जखली परगणे डंबळ येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" डंबळकरांचें उमंचगी गांव घेऊन ठाणें बसविलें. गांवापासून पंचवीस हजार रुपये खंडणी घेतली. तेथून कूच करून परवां येथे आलों. नरेगल व जखली येथें ठाणीं घातलीं. डंबळकरांकडून बोलणें लागलें आहे कीं, ' गदगचें ठाणें द्यावयास कांटकानीं लबाडी केली आहे. त्यांस सांगून ठाणें देववितों. पन्नास हजार रुपये खंडणीही देतों. ' हरीपंततात्या कनकगिरीचे मुक्कामास गेल्याचीं पत्रें आलीं. "

---

१ येसाजी शिंदे.

श्रीगणपति.

नं. २११८. (वैशाख शुं० १०–१७ मे.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं. प्रतीं परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ९ रबिलाखर मुक्काम जखली तालुके डंबळ जाणोन स्वकीय लिहित जावें. विशेष. इकडील वर्तमान सविस्तर कालचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. डंबळकराकडून तह करावयास वकील येणार ते अद्याप आले नाहींत. आज येणार. आल्यानंतर गदगचें ठाणें दिल्यास व ऐवजाची निशा खंडणीची केल्यास मग त्याच्या तालुकियास उपद्रव लावीत नाहीं. गदगचें ठाणें न दिल्यास मग उपसर्ग देणें प्राप्तच आहे. राजश्री हरीपंततात्या यांची व धौशाची भेट जाहल्याचें अद्याप पत्र आलें नाहीं. आल्यानंतर लिहोन पाठवितों. कुमदान अद्याप हुबळीसच आहे. राजश्री विसाजीपंत आठवले अक्षतृतीयेस मुहूर्तेंकरून इकडे यावयास अघाडीची पिछाडी केली म्हणोन तुम्ही लिहिलेंच होतें. त्यास अलीकडे कोठें आले हें कळत नाहीं. तर सविस्तर लिहावें. हल्लीं राजश्री शिवाजीपंत म्हैसकर यांस पत्र लिहोन लाखोटा पाठविला आहे. पुरंधरास लौकर पाठवून जाब आणवून पाठवून द्यावा. मेढा तोफ सावशीचे लढाईपासोन नरगुंदासच आजपर्यंत होती. हल्लीं नरगुंदास लिहोन पाठवून आणविली ती जालीहाळास आली. उदईक येथें येईल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २११९. **श्रीगणराज.** (वैशाख शु० ३–२० मे.)

= अपत्यें शिवरामानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १२ रबिलाखरपावेतों यथास्थित

---

१ कुरुंदवाडाहून शिवराव नीलकंठ याचें पत्र रघुनाथराव नीलकंठ यास परशुरामभाऊंच्या लष्करांत.

असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वाद पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. सविस्तर वृत्त लिहावया आज्ञा केली पाहिजे. यानंतर काल सोमवारीं राजश्री रामचंद्र गणेश यांचें व राजमंडळकरांचें झूज कवठें हिंगणगांवनजीक जाहलें. राजमंडळकरांचा मोड जाहला. राजमंडळकरांकडील तोफा चार सांपडल्या व घोडीं सांपडलीं. प्यादयांचीं हत्यारें सांपडलीं. प्यादे हजार दोन हजार तुडविले व मारले. जखमी जाहले. येसाजी शिंदा व सटवाजी भोंसला दोन चारशें स्वारांनिशीं पळोन गडांस गेले. त्यांचे अंगांत गुर्मी होती, ईश्वरकृपेंकरून पारिपत्य बरेंच जाहलें. शत्रु पराभवातें पावला. उत्तम गोष्ट जाहली. वडिलांकडेही वर्तमान आलें असेल, सविस्तर लिहावया आज्ञा करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१२०. **श्रीगणपति.** (वैशाख शु० १३—२० मे.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमान तरी वरचेवर लिहीतच आहों त्याजवरून कळत असेल. जखलीवर चार मुक्काम जाहले. जखलीची खंडणी साडेनऊशें होनांवर उरकली. नरेगल सरकारचा खालसात गांव, तेथें ठाणें बसविलें. राजश्री रामचंद्रपंत मामाचे जिम्मे केलें. तेथून कूच करून परवां एकादशीस येथें आलों. हिरेहाळ हा गांव डंबळकरांचा इनाम आहे. गांव मातबरच आहे. ठाण्यांत लोक, ठाणें जबरदस्तच आहे. चार दिवस लागतील. गांवास तोफा लाविल्या आहेत. मोर्चेही कायम केले आहेत. परंतु बाहेर आसरा कांहींच नाहीं याजमुळें मोर्चे लवकर चालत नाहींत. चार दिवस लागतील. येथील फडशा जाहल्यानंतर आणखी दोन गांव डंबळकरांचेच दोन कोसांवर आहेत तेथें जाणार. कुमदान अद्याप हुबळीवरच आहे. धारवाडास त्याचा वेध भारी लागला

---

१ पन्हाळ्यास.

आहे. दाणावैरण आंत जाऊं देत नाहींत. आसपास कोसीं दोन कोसीं चौक्या आहेत. अशांत लौकर निर्वेध केल्यास उत्तम आहे ! नाहीं तर किल्ल्याचा परिणाम दिसत नाहीं. आम्ही विसाजीपंताची वाट पहात आहों. ते आल्यानंतर गदग मुळगुंदाकडे जातों, म्हणजे पायबंद हुबळीस बसेल. परंतु विसाजीपंत कधीं येतात पहावें. आपाजी पायगुंडे यांसही पत्रें पाठविलीं आहेत. येतात न येतात पाहावें. डंबळकरांकडून वकील येणार होता तो अद्याप आला नाहीं. राजश्री हरीपंतनाल्या यांजकडून कालच पत्रें आलीं. कनकगिरीची खंडणी सत्तर हजार रुपये घेऊन गुडुास गेले. धौशा अदवानीजवळ आहे तोही गुडुाजवळच येणार. उभयतांच्या भेटी तेथेंच होतील. भेटी जाहल्याचीं पत्रें आल्यावर मागाहून सविस्तर लेहून पाठवितों. हैदरखान गुत्तीजवळ आला होता, परंतु फिरोन माघारा दहा कोस गेला; असें बापूजी नारायण[1] यांच्या पत्रांत आहे. आम्हाकडे राजश्री हरीपंततात्यांचीं पथकें नेमिल्याप्रयाणें शिवराव कडेकर मात्र आले आहेत. बाकीचे अद्याप कोणी आले नाहींत. मेढा तोफ मांवशीचे लढाईपासोन नरगुंदास आजपर्यंत होती तेथून आणविली ती जालीहाळास आली. शिवाजीपंतास पत्र लिहिलें आहे. प्रविष्ट करावें. मावळे प्यादे मागाहून यत्न करून पाठवितों म्हणोन लिहिलें तें कळलें. जरूर ठेवून पाठवावे. दोनतीनशें माणूस जरूर पाठवून द्यावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २१२१. **श्रीगणपति.** (वैशाख व० ३–२५ मे.)

चिरंजीवें राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र, आशीर्वाद. उपरि येथील कुशल ताा छ १७ रबिलाखर रविवार तृतीय प्रहर हिरेहाळनजीक जालिहाळ जाणोन स्वकीय लिहित

---

[1] हे अदवानीच्या नबाबाकडे पटवर्धनांचे वकील होते.

जावें. विशेष. तुम्ही छ १३ रबिलाखरचें पत्र पाठाविलें तें छ १५ मिनहूस पावोन लेखनार्थ सविस्तर कळला. शिंद्याची व सरकारचे फौजेची लढाई होऊन शिंदा मोडला. खासा पळोन गेडास गेला. तोफा, घोडीं व बाजारबुणगें वगैरे लुटल्याचें तपसीलवार लिहिलें तें कळलें. श्रीमंतांचा प्रताप थोर म्हणून यश मातबर आलें. चांगली गोष्ट जाहली. आतां शिंदा तोंड दाखवीत नाहीं ! सांप्रत रामचंद्र गणेश कोठें आहेत ? याउपर मनसबा काय करितात हें लिहावें. राजश्री हरीपंततात्या यांच्या व धौशाच्या भेटी गुडानजीक छ ११ रोजीं जाहल्या. याउपर मनसबा ठरेल तो मागाहोन लिहोन पाठवितों. हैदरखान गुत्तीपर्लीकडे तीन कोसांवर आहे व मीर व टिपू बलारीकडे आहेत. कुमदान हुबळीसच होता. त्यासही ताबडतोब बोलाविल्यावरून गेला. काय निमित्य एकाएकीं गेला हें कळत नाहीं. धौशा व तात्या एकत्र जाहले यामुळें कुमदानास बोलाविलें असेल असें वाटतें. शिंद्याच्या लढाईंत मानाजी घाटगा पडला म्हणून लिहिलें तें कळलें. मानाजी घाटगा चांगला माणूस होता. होणार चुकत नाहीं. हुबळी व मुळगुंद लक्ष्मेश्वर वगैरे ठाण्यांत हैदरखानाचे लोक नाहींत, गांवचेच प्यादे आहेत. तिकडे आह्मास जावयाची निकड आहे. परंतु हिरेहाळ अद्याप लढत आहे. मोर्चे देऊन आज आठ दिवस जाहले. गांव मातबर. अद्याप आयांस आला नाहीं. टाकून जातां नये. विसाजीपंत आठवले यांची वाट पहात आहों. कृष्णेस पाणी आलें होतें याजमुळें चार मुक्काम मशारनिल्हेचे कृष्णेवर जाहले. तदोत्तर कृष्णा उतरोन आलिकडे आले. इतकियांत बिलगीकर जमीदाराचे एक दोन गांव आहेत त्यांस तोफा लाऊन गुंतले

---

१ पन्हाळ्यास.

आहेत. त्याप्रमाणें एक गांव घेतला. आम्ही तर त्यांस जलद येण्याविशीं सांडणीस्वाराबरोबर पत्र पाठविलें आहे. आणखी चार दिवस तिकडेच खेडीं ध्यावयास राहतात किंवा येतात पहावें ! विसाजीपंत आल्यावर फडशा येथील होतो. मग बहुत दिवस लागणार नाहींत. डंबळकरांकडील वकील आला आहे. हिरेहाळचे मोर्चे उठवावे, फडशा खंडणीचा वगैरे करितों, म्हणतात. परंतु आह्मी मान्य करीत नाहीं. कृष्णरायासारखा माणूस या खेडयावर पडला तेव्हां गांव घेऊन सरकारचें ठाणेंच बसवावें असें आहे. घडेल तें खरें. धारवाडच्या आसपास खेडयांनीं नेरद्र व अमीनबावी वगैरे जागां शत्रूकडील लोकांच्या चौक्या जबरदस्त होत्या त्या उठोन गेल्या. किल्लयांतील माणूस बाहेर फिरावयास मोकळीक जाहली. शिवाजीपंत पुरंधरास निघोन जाणार होते ते गेलेच असतील. कुमदान कूच करून हनगलावरून झाडीचे आसऱ्यानेंच गेला. त्याचे बातमीस माणसें पाठविलीं आहेत. येतील. राजश्री रामचंद्रपंत प्रस्तुत कोठें आहेत ! करवीरकरांचा रेंच बराच मोडला. तिकडील तीनशें माणूस मारलें गेलें, तेव्हां इकडीलही जायां जखमी जाहलेंच असेल. तपसिलवार वर्तमान आलें असेल तें लिहावें. उभयतांचा पुढें काय मनसबा आहे तें सविस्तर लिहावें. राजश्री हरीपंततात्या व धौशा तुंगभद्रा उत्तरतीरीं आहेत. एक दिवशीं दोन्ही फौजा पार जाऊन केंचनगुडु मारिलें. बहुत कांहीं तेथें नाश जाहला. श्रीसत्तेस इलाज नाहीं. मोंगलांकडील छावणीचा काय मनसबा होतो पहावें. छावणी जाहली तरच चांगलें. माघारे गेले तर मग मागती कधीं येतील पहावें ! श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. विसाजी आपाजी अद्यापि आले नाहींत मध्येंच कोठें बिळगीची खेडीं आहेत त्यांस मोर्चे लावून बसले आहेत ! कधीं येतील पहावें. हे आशीर्वाद.

---

१ रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा यांचा.

श्रीगणपति.

नं. २१२२. (वैशाख व० १०—१ जून.)

चिरंजीव राजश्री बाठासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ २४ रबिलाखर मुक्काम हिरेहाळ तालुके जालिहाळ जागोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्हीं छ १६ रबिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छ १८ मिनहूस पावोन लेखनार्थ कळला. राजश्री विसाजीपंत आठवले येऊन सामील जाले. आज चार दिवस जाहले. अद्याप हिरेहाळचा फडशा नाहीं. मोर्चे लावून आज चवदा दिवस जाहले. मोर्चे चहूंकडून जवळ गेले आहेत. गांव जेर जाहला आहे. गांवाची बोलीही जीतभर (?) सुद्धां सोडून द्यावें अशी प्याद्यांनीं लाविली, परंतु आम्ही सोडीत नाहीं. फक्त हत्यारें मात्र न्यावीं असें म्हणतों. दोन्ही दिवसांत उरकेल. तदोत्तर हुबळीकडेच जातों. कुमदान चेनगिरीकडे गेला. हुबळी वगैरे ठाण्यानें शिरहट्टीकरांचे लोक थोडेबहुत आहेत. अमीनबावी, नरेंद्र वगैरे धारवाडच्या घेऱ्यांतील खेडीं तमाम धारवाडकरांनीं सोडविलीं. बेटगिरी, मिश्रीकोट येथील सूत्र लागलें आहे म्हणून वासुदेव दादाजी यानीं धारवाडाहून लिहिलें आहे. रामचंद्र गणेश कवळ्यावर आहेत म्हणोन लिहिलें तें कळलें. रामचंद्रपंत छावणीस राहतात किंवा पुरंधरास जाणार, सांप्रत त्यांचा मुक्काम कोठें आहे, दिवाजवळ प्रस्तुत कांहीं जमेत आहे किंवा अगदींच विसकटलें, हें लिहावें. "राजश्री बाजीपंत यानीं ऐवज लावून द्यावयाचा करार केला होता, परंतु कराराप्रमाणें गोष्ट अमलांत न आली याजमुळें उंटें, घोडीं सोडलीं नाहींत." म्हणोन लिहिलें तें कळलें. रुजुवातीस ते अमान्य जाहले त्यापक्षीं घोडीं, उंटें सोडूं नयेत. "फकीर पट्टणाहून आला त्यानें जबानीं काय काय सांगितलें" म्हणून लिहिलें, त्यास पट्टणांत युक्तीनें प्रवेश करून चौकीच्या गारद्यांस

---

१ येसाजी शिंदे करवीरकर यांजवळ.

ममतेंत घेऊन चिरंजीव राजश्री तात्या, श्रीपतराव वगैरे मंडळीच्या चार नजरा जाल्या. चिठी प्रविष्ट करून उत्तरें घेऊन आला. सुखरूप आहेत असें जबानीं सांगितलें. वरकड विशेष नाहीं. पट्टणांत सरकारच्या फौजा इकडून आल्या ऐसी गरम आवाई आहे असें सांगत होता. फकिरास इनाम द्यावयाविशीं लिहिलें, उत्तम आहे. देतों. चिरंजीव राजश्री दादानीं घोडी एक चांगली त्यास बक्षीस दिली. पट्टणास चिरंजीवाकडे पाठवावयाविशीं चिठी पाठविली ती पावली. पुढें रवाना आठ चार दिवसांत करितों. फकीर तूर्तच जाईल असें दिसत नाहीं. मागाहून शोध करून लिहोन पाठवितों. " चिरंजीव मथूंबाईस राजश्री लक्ष्मण हरी यांच्या पुतण्यास द्यावी व चिरंजीव ताराबाई महादाजीपंत कुंटे यांच्या मुलास देणार, बनल्यास जेष्ट शुद्धांत कार्यासिद्धि करणार, " म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. लग्नाचा सिद्धांत जाहल्याचें लिहावें. राजश्री हरीपंततात्यांच्या व धौशांच्या भेटी जाहल्याचें वर्तमान पेशजी लिहिलेंच आहे. " गुंडु मारून तारांज केलें. धौशाचे मनांत छावणीस रहावयाचें नाहीं. तूर्त माहिना पंधरा दिवस त्यानें जाऊं नये असा करार केला आहे. मुष्टुराजवळ नदीपार होऊन हरपनहळ्ळीची खंडणी घेऊन चित्रदुर्ग प्रांतांत जाणार. कडपें कर्नोलकर येऊन भेटले. हैदर-

---

१ रघुनाथराव नीलकंठ कुरुंदवाडकर यानी. २ मथाबाई ही वामनराव गोविंद यांची कन्या. ही लक्ष्मण हरी लागू यांचा पुतण्या जनार्दन रघुनाथ यास दिली. हिचा वंश सांप्रत सांगली, मिरज, तासगांव वगैरे स्थळीं आहे. ३ ताराबाई ही पांडुरंगराव गोविंद यांची कन्या. ४ परंतु ताराबाई कुंट्यांच्या मुलास न देतां लक्ष्मण हरी लागू यांचा नातु नारायणराव हरी लागू यास दिली, तिचे चिरंजीव ह्मणजे चिंतामणराव आपासाहेबांचे भाचे हरबादादा हे सांगली संस्थानचे कारभारी पुष्कळ दिवस होते. ताराअक्काचे वंशज अद्यापि सांगली संस्थानचे प्रमुख तैनातदार आहेत. लागू हे मूळचे केळशी जि० रत्नागिरी येथील राहणार. ५ गुडु अथवा केंचन गुडु हें एका संस्थानचें नांव. केंचन म्हणजे सोनें. गुडु म्हणजे पर्वत. ६ ओसाड.

खान माघारा मदगिरीकडे गेला. "याप्रमाणें राजश्री तात्यानीं लिहिलें आहे. " धौशा रहात नाहीं. काय उपाय करावा ! खर्चाची फार ओढ आहे. " म्हणोन कित्येक तात्यानीं लिहिलें आहे. त्यांस आम्हीं उत्तर लिहिलें कीं " हरप्रयत्न करून धौशासमेत तुंगभद्रापार छावणी करावी म्हणजे पैकाही मिळेल; आणि तालुका सुटेल; आणि शत्रूवर दाब बसेल; " असें लिहिलें आहे. वरचेवर लिहीतच आहों. घडेल तें पहावें ! शिवाजीपंत पुरंधरास गेलेच असतील. तिकडील सविस्तर लिहावें. दोघी मुलींचे लग्नाचें बनून आलें आहे त्याप्रमाणें कार्यसिद्धि करावी. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २१२३. (वैशाख व० १०–१ जून.)

परशुरामभाऊचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र मिरजेस—

" काल राजश्री हरिपंततात्यांचीं पत्रें आलीं त्यांतील अर्थ " धौशा परिछिन्न छावणीस रहात नाहीं. पंधरा दिवस (त्यानीं आम्हीं) एकत्र रहावें असें ठरलें होतें त्यांत पांच सात दिवस जाले. लौकरच जातील. तुंगभद्रापार रहावयाचें दिसत नाहीं. त्यास आम्हीं कोणत्या सुमारें यावें, आपली आमची भेट कोठें होईल, कसें करावें, तें लिहावें; " म्हणून लिहिलें होतें. आम्हीं त्यांस उत्तर लिहिलें कीं, धौशास जाऊं न द्यावें. जेणेंकरून छावणी करून पार राहणें होईल तीं गोष्ट करावी. परंतु घडतां दिसत नाहीं ! कसें होतें पहावें. "

नं. २१२४. श्री. (वैशाख व० ११–२ जून.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ २५ रबिलाखर इंदुवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आम्हीं पुरंधरास व पुण्यास आल्याचीं पत्रें आपणा-

---

१ पत्र पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यास.

कडे लिहोन पाठविलीं तीं पत्रें पावलींच असतील. अलीकडील वर्तमान नरसिंगराव गोविंद व पांढरे व उंबरजकर तेली वगैरे भिवरथडीस जमा जाले जाहेत, कोठें तरी दंगा करावा या विचारांत आहेत, ह्मणोन मंगळवेढयाहून पत्रें आपणाकडे गेलींच होतीं. करकंबेसही सावधतेचीं पत्रें पाठविलींच होतीं. व श्रीमंत राजश्री बळवंतरावदादा पुरंधरास येतांना करकंबेवरून आले तेव्हां ' सावधता असावी. नवे लोक ठेवून बंदोबस्त करावा. ' म्हणोन सांगितलें असतां कसें जाहलें न कळे ! भेदानें जाहलेंसें भासतें. तपशीलवार वर्तमान आल्यावर कळेल. नरसो गोविंद यानें करकंबेचें ठाणें छ २१ रबिलाखरीं बुधवारीं रात्रौ उजाडतां गुरुवारीं दगा करून शिडया लावून ठाणें घेतलें; राजश्री बाळाजीपंत व मोरोपंत यांस जागांच कैद केलें म्हणोन पागा उंबरें व भोसें येथील पत्रें दोन दिवसांत अडीच दिवसांत आलीं ! ते समयीं श्रीमंत राजश्री नानांस विनंती केली. होळकर तुळजापुरास जावयास निरोप घेऊन गेले आहेत. त्यांजकडे सरकारचें पत्र व उभयतांचीं पत्रें व हुज़रे व आम्हाकडील माणसें येणेंप्रमाणें पाठविलीं कीं, " ठाण्यास येणेंप्रमाणें दगा जाहला. तरी पत्र पावतांच जाऊन ठाणें घेऊन त्याचा पाठलाग करून बंदोबस्त करावा, " येणेंप्रमाणें पाठविलीं आहेत. आज आणखी पत्रें व कारकून पाठवितों. राजश्री विसाजीपंत बिनीवाल्यांकडील दोनशें राऊत आहेत हे रवाना करितों. आणखी तरतूद होईल ती वरचेवरी करितों. आम्हींच होळकराकडे जावें, त्यास येथूनही तरतूद जाहली पाहिजे. तरतूद होणें ती जाहल्यावरी श्रीमंत राजश्री नानांच्या विचारें जाहल्यास होळकराकडे जातों. जों ठाण्याची मजबुदी जाली नाहीं तों ठाणें हातीं आल्यास उत्तम. नाहीं तरी पुढें अवघडच पडेल. चाळीस वर्षें करकंबेस हात लागला नव्हता. पागा देखील तेथें होती. सर्वस्वें घर बुडालें ! मिरजेस राऊत असतील ते मंगळवेढयास पाठवावे म्हणजे ते होळकरास

सामील होतील. बंदोबस्त होईल. दोन परगणे देशचे स्वस्तिक्षेम राखिले होते त्यांची अवस्था या प्रकारची जाहली ! कमावीसदारानें बेफाम[1]णें ठाणें गमावून सर्वस्वें बुडविलें ! आह्मी येथून तरतूद वरचेवरी होईल ती करून मग होळकराकडे जावयाचें जाहल्यास करूं. येथें धांवाधांव करावयाची ती आह्मीं व श्रीमंत राजश्री बळवंतदादा मिळोन करितों. आपणास तिकडोन वर्तमान आलेंच असेल. राऊत मंगळवेढ्यास पाठवावे. श्रीमंत राजश्री भाऊंकडे पत्र पाठवून पांचशें राऊत आणवावे. तिकडील बंदोबस्त जाहल्यावरी मिरजेस येतील. आधीं पत्रें रवाना करावीं व मिरजेचे राऊत मंगळवेढ्यास पाठवावे. आम्हीच होळकराकडे आज गेल्यानें येथील तरतूद होणार नाहीं, याजकरितां कारकून पाठवितों. आम्ही जावेंसें जाल्यास जातों. सेवेशीं, श्रुत होय हे विज्ञापना. पिंपळनेरचें पत्र आलें तेंच ऐन जिन्नस पाठविलें आहे. हे विज्ञापना.

नं. २१२५. श्री. (वैशाख व० १३–३ जून.)

सेवेशीं[2] शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ २६ रबिलाखर भौमवासरे मुक्काम पुणें. यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष नरसिंगराव गोविंद व पांढरे व तेली उंबरजकर यानीं दगा करून करकंबेचें ठाणें घेऊन कमावीसदार व फडणीस कैद केले येविशींचें वर्तमान मुजरद जासुदाबरोबर लिहून पाठविलें आहे व आपणास तिकडून वर्तमान कळलेंच असेल. राजश्री तुकोजी होळकर तुळजापुरास जावयास गेल आहेत त्यांस पत्रें व हुजरे पाठविले आहेत कीं तुह्मीं करकंबेस जाऊन बंदोबस्त करावा म्हणोन लिहिलें आहे. परंतु ते सात आठशें स्वारांनिशीं आहेत. तितक्या सामानानिशीं पारिपत्य

---

१ नजीक करकंब. २ पत्र पुरंधराहून मिरजेस गंगाधरराव यांस.

होणें कळतच आहे. येथून एकदम हजार दोन हजार फौज पाठविणें हेंही कळतच आहे. याजकरितां श्रीमंत राजश्री नानांचें म्हणणें " होळकर गेले आहेत. येथून तरतूद होईल ती आह्मी करितों. राजश्री रामचंद्र गणेश यांजकडील फौज पाठविल्यास पोटास दिलें पाहिजे. व तुह्मीं दोन हजार फौज रोजमऱ्यावरी जमा करावी. व पांच सातशें गाडदी ठेवावे ते रवाना करावे. मिरजेचें सामान आणवावें व तें मंगळवेढ्याचें सामान एकत्र करून व नवे राऊत ठेवणें ते ठेवून सारें सामान होळकरास सामील व्हावें म्हणजे काम होईल. परभारा हवाला म्हटल्यास होत नाहीं. " असें म्हणणें, ऐसियास मिरजेस फौज असेल ती राजश्री गंगाधरपंत फडणीस यांजबरोबर देऊन मंगळवेढ्यास पाठवावी म्हणजे श्रीमंत राजश्री मेघश्यामराव बापू व ते एकत्र होतील. नवी फौज आपण ठेवावी म्हणोन आपण लिहितील त्याप्रमाणें ठेवून जमा करून होळकरास सामील होतील. म्हणजे काम लवकर होईल. याजकरितां आधीं राजश्री गंगाधरपंताची रवानगी करावी. व नवे राऊत ठेवावयाविशीं श्रीमंत राजश्री बापूस लेहून पाठवावें व राजश्री गंगाधरपंतास समक्ष सांगावें. त्याप्रमाणें मंगळवेढ्यास जाऊन तरतूद करितील. राजश्री रामचंद्र गणेश यांजकडील फौज न्यावी तेव्हां रोजमऱ्यास ऐवज द्यावा लागतो त्याची तरतूद व गाडदी नवे पांच सातशें ठेवून पाठवावे तेव्हां दहा हजार रुपये पुण्यांतच पाहिजेत. त्याची आज्ञा काय येविशींचे साऱ्या मजकुराचीं समक्ष उत्तरें पाठवावीं म्हणजे त्यासारखे गाडदी ठेवून पाठवूं व राजश्री रामचंद्र गणेश यांच्या फौजेच्या खर्चास द्यावयाचें कसें तें लिहावें. लाख पन्नास हजार रुपये खर्च पडतात येविशींची आज्ञा काय ? ऐवजाची तरतूद पाहिजे. श्रीमंत राजश्री भाऊंस आपण लिहिलेंच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१२६. (वैशाख व० १४–४ जून.)

परशुरामभाऊंचें पत्र. छ २७ रबिलाखरचें हिरेहाळ परगणे डंबळ येथून—

" कृष्णरावासारखा सरदार येथें हिरेहाळावर पडला, वाईट गोष्ट जाहली. कालपासून डंबाळकरांकडून बोलणें लागलें आहे कीं चार रुपये अधिकउणे माथीं मारावे परंतु हिरेहाळचे मोर्चे उठवावे. कृष्णराव येथें पडले तेव्हां आमचे मतें गांव कापूनंच काढावा असें आहे. रास्त्यांकडील दोन तोफा बदामीस आणविल्या आहेत. विसाजी-पंतही लौकरच येतील. हरीपंततात्या गुडुचे मुक्कामास गेले. तेथें धौशाच्या भेटी जाहल्या. श्रीकृपेंकरून कुमदान परत फौजसुद्धां गेला. याउपरी महालांचा ऐवजही येईल व ठाणींही बसतील. पन्नास हजार रुपयांची तूर्त तरतूद करून पाठवावी. "

नं. २१२७. (वैशाख व० ३०–५ जून.)

हिरेहाळ येथून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" जनोबा सुभेदार यांस काल गुरूवारीं अघाडीच्या मोर्च्यांत बंदुकीची गोळी उजव्या खांद्याजवळ लागून पाठीवर निघाली. पार जाली नव्हती. जखम हलकीच आहे. गांव तर कौलानें घेतला. चिरंजीव राजश्री (रघुनाथराव) दादाचे विद्यमानें संस्थानचा देखील सल्ला उरकला. संस्थानचे पंचावन हजार व हिरेहाळचे पंच-वीस येणेंप्रमाणें ऐशीं हजारांवर गोष्ट उरकली. कृष्णराव पानशे येथें पडले त्यांच्या कुटुंबाकडे ५०० रुपयांचा गांव संस्थानिकानीं इनाम चालवावा असें ठरलें आहे. परवां कूच करोन हुबळीकडे जात आहों. "

---

१ पानशे. २ सरदार आठवले. परंतु नं. २१२२ च्या पत्रांत विसाजीपंत येऊन सामील झाले त्यास चार दिवस झाल्याचें लिहिलें आहे. त्यावरून या पत्राच्या तारखेंत मूळ पत्राची नक्कल घेतांना कांहीं घोंटाळा झाला आहे असें दिसतें.

नं २१२८. श्री. (वैशाख व० ३०—५ जून.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता० छ २८ रबिलाखर गुरुवासरे मुक्काम पुणें. वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण शेटीबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. पंढरपूरचें पत्र पाठविलें तेंही पावलें. करकंबचा मजकूर कळला. करकंबेस दगा जाहल्याचें पत्र पागा उंबरें येथून अडीच दिवसांनीं आम्हांकडे आलें. सरकारांत आलें. ते समयीं श्रीमंत राजश्री नानास विनंती केली. होळकर तुळजापुरास गेले त्यांजबरोबर सामान दीड हजार फौज, पन्नास उंट सुतरनालाचे येणेंप्रमाणें आहे. ते कात्राबाज मांडोगणावर गेले होते. पत्रें जात तों सोनारीच्या रोखें गेले असावे. जलद हुजुरे व पत्रें रवाना झालीं.[1] लांबहाते हजार फौजेनिशीं इकडेच होते त्यांस राजश्री नारो गणेश यानीं रवाना केले व होळकरांस मशारनिल्हेनीं लिहून पाठविलें जे, " प्रसंग पाहून लोकांस बोलावूं पाठवावें. आम्ही या वळणाचे लोक पाठवितों. " याप्रमाणें तरतूद जाहली आहे. राजश्री महिपतराव कवडे बदमामली प्रमाणेंच, परंतु त्यांचें पत्र सरकारांत आलें कीं " आम्हीं राजश्री हरीपंततात्यांकडे जावयास तयारी केली होती. जावें, तों हा प्रसंग जाहला. आतां सरकारांतून फौज पाठवावी. आम्ही सामील होतों. " त्याजवरून त्यांजकडे पत्रें पाठविलीं कीं, " मंगळवेढ्यास सामान जमा जाहलें आहे. तर तुम्हीं मिळोन क्षेत्रास[2] जमा व्हावें. " राजश्री बाबूजी नाईक यांची पागा बारामतीस आहे ती रवाना करावी. यानीं व राजश्री विसाजी कृष्ण यांचे दोनशें राऊत येणेंप्रमाणें श्रीमंत राजश्री बापूस पंढरपुरास सामील व्हावें. चौघांचा

---

१. पत्र पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव यांस. २ पंढरपुरास.

जमाव एकत्र होऊन होळकरास सामील व्हावें. नंतर पारिपत्य पुरतें करावें. येणेंप्रमाणें तरतूद जाहली आहे. तोफा व गाडदी पाठवावे लागतील येविशींचा मजकूर आपणास लिहिलाच आहे. कोंकणांत फौज आहे ती आणवावयाची तरतूद आहे. राजश्री रामचंद्र गणेश यांस जावया विनंती केली, त्यास " शिंदे करवीर प्रांतीं गेले. या संधीस सरकारची फौज सारीच आल्यानें त्यांस वाईट वाटेल. याजकरितां मशारनिल्हेनीं फौजेस निरोप देऊन राहिली आहे ती राखावी. निरोप न द्यावा. तितक्या-निशींच शिंद्यास सामील व्हावें. " येणेंप्रमाणें पत्रें गेलीं आहेत. तेव्हां ते तिकडेच गुंतले. शिंदे यांनीं करवीरची मसलत कबूल केली. होळकरांस चाकरी नव्हती. चाकरी आपणास सांगावी असेंही त्यांचें मानस होतें. त्यास हें काम सांगितलें. सरदार मातबर आहेत. सहजांत तिकडे गेले, पत्रें गेल्यावर नाहीं म्हणतां नये, तेव्हां मान्य करून तरतूद करावीच लागेल व करितील. नांवाचे सरदार, इभ्रत पडेल. जों ते भारी जमले नाहींत तों जलदी करून गांठ घालावी येणेंप्रमाणें पत्रें वरचेवरी पाठविलीं. आज कारकूनही रवाना करितों. तरतूद बरीच होत चालली आहे. होळकर पत्रें जातांच जाऊन पोंहोचले म्हणजे कामच होईलसें दिसतें. आपण मंगळवेढ्याकडे राऊत व प्यादे रवाना केले, उत्तमच केलें. राजश्री गंगाधरपंतास पाठविलें असल्यास उत्तमच झालें. नसल्यास अनमान न करतां आधीं त्यांस पाठवावें म्हणजे घेऊन चाकरीस जातील. खटपट करितील. याजकरितां जरूर रवाना करावें. कुमदान हुबळीवरून गेल्याचें वर्तमान आलें त्यापक्षीं श्रीमंत राजश्री भाऊंकडून पांच सातशें राऊत जरूर आणवावे. तोफांचें व गाडदी ठेऊन पाठवावयाची तरतूद झाली पाहिजे. तोफांचा सारा सरंजाम नवा करावा लागतो. गाडदी ठेविले पाहिजेत. त्यांस ऐवज दिलाच पाहिजे.

येविशीं आज्ञा असावी. इतकें न होतां होळकर जातांच काम जाहलें असतां उत्तमच गोष्ट जाहली ! करकंब गेलें, नाश फार जाहला व पुढें होणार, व बदनक्ष मोठा झाला. आज वर्तमान करकंबेहून आलें कीं, सरकार निसबतीचे होते त्यांचीं घरें (बंडखोरांनीं) लुटिलीं. जामदारखाना लुटला. घोडीं वाडयांत आणून ठेवलीं. चांगलीं घोडीं लांबविलीं. गांव कांहींसा बुडाला. याप्रमाणें वर्तमान आलें आहे. फार वाईट गोष्ट जाहली. उपाय नाहीं. होणार त्यास इलाज नाहीं. राजश्री रामचंद्र गणेश यांस शिंद्याकडे जावयासी पत्रें गेलीं आहेत, ते गेले असतील. शिंद्यांस मिरज प्रांतीं उपद्रव करूं नये येविशीं पत्रें गेलींच आहेत. आणखी पाठवितों. श्रीमंत राजश्री नानांनीं आपणास लिहावयास सांगितलें कीं, " शिंदे मातबर सरदार आहेत. त्या प्रांतांत आहेत. त्यांजकडे कारकून पाठवावा. जवळ आल्यावर खाशानें एखाद्यानें जाऊन मेजवानीस बोलवावें. हजार दोन हजार रुपये खर्च जाहल्यास चिंता नाहीं. परंतु मेजवानी करावी. " याप्रमाणें सांगितलेवरून विनंती लिहिली आहे. श्रीमंत राजश्री नाना पुण्यांतच आहेत. राजश्री बापू सासवडासच आहेत. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीमंत राजश्री बळवंतराव दादा व आम्हीं पुण्यांतच आहों. हे विज्ञापना.

श्रीगणपति.

न २१२९. (ज्येष्ठ शु० १–६ जून.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ २९ रबिलाखर भृगुवार तृतीय प्रहर दिवस मुक्काम हिरेहाळ जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुह्मी छ १५ रबिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं आजच. दोन-

प्रहरीं पावोन लेखनार्थ सविस्तर कळला व शिवाजीपंताचींही पावोन भाव कळों आला. चिरंजीव मथाबाईचे लग्नाचा निश्चय पंचमीस करून लग्नपत्रिका पाठविल्या त्या पावोन संतोष पावलों. निर्विघ्नपणें कार्यसिद्धि जाहल्याचें वर्तमान लिहोन संतोषवावें. वरकडांच्या लग्नपत्रिका यादीप्रमाणें प्रविष्ट जाल्या. " करवीरकरांच राऊत हजारपावेतों पिरानकवळ्यापासून डिगरजपावेतों येऊन फिरोन माघारे गेले. रामचंद्र गणेश वांगीवर गेले. महादजी शिंदे रहिमतपुराअलीकडे आले. तिमराव त्यांजकडे रवाना केले ते जाऊन पावले. पत्रांचीं उत्तरें आलीं. आमचा प्रांत चुकवून कऱ्हाडाकडून जातात. " म्हणून लिहिलें तें कळलें. राजश्री त्रिंबकराव टकले देवदर्शनास जेजुरीस गेले होते ते आले. त्यांनीं ' शिंदे यांची फौज चांगली आहे. लष्करांत कैद आहे. ' म्हणून सांगितल्याचा भाव लिहिला तो कळला. शिंदे आले, मोठी गोष्ट जाली. आतां रामचंद्र गणेश माघारे येवोत अथवा जावोत. चिंता नाहीं. याउपर करवीरकरांचा फडशाच होईल. फिरोन लढा राहणार नाहीं, आजला शिंदे वारणातीरास करवीर तालुक्यास आलेच असतील. बरोबर फौज किती सांप्रत आहे व तोफा किती आहेत हें सविस्तर लिहावें. सांप्रत करवीरकरांचा जमाव किती आहे, कोठें आहे, हेंही लिहावें. " करकंबेच्या मजकुराचें पत्र चिटंकोपंताचें आलेलें पाठविलें आहे त्यावरून सविस्तर कळेल, वाईट गोष्ट जाली. " म्हणोन लिहिलें, त्यास चिटकोराम यांचें पत्रच इकडे आलें नाहीं. चुकोन तेथें राहिलें असेल. त्यास पेशजी पत्रें (बंडवाले) ठाणें घालोन गेले म्हणोन संकलितच तुम्हीं लिहिलें होतें. परंतु तपशीलवार वर्तमान कळलें नाहीं. कोणा कोणाची गत काय जाली, त्याजवळ जमाव किती आहे, तुम्हीं तीर्थस्वरूप राजश्री बापूकडे राऊत प्यादे पाठविले

---

१ चिटको राम दातीर. पागा फडनीस.

आहेत. त्यांजवळही सामान जमलें आहे. सारे मिळोन किती आहेत हें तपशीलवार लिहावें. पुरंधराहून लौकर अशांत तिकडे फौज रवाना जाहल्यास खूळ मोडेल. नाहीं तर बंड बळावेल. क्षेत्राची[1] गत काय आहे हें सविस्तर लिहावें. ईश्वर एक एक संकट नवेंच निर्माण करितो ! काय करावें ! होणारास उपाय नाहीं. राजश्री श्रीधरपंत सुभेदार मिरजेस येऊन भेटोन पुढें तासगांवास गेले म्हणोन लिहिलें तें कळलें. " राजश्री नानास दगा कोणी करावासा केलें होतें, परंतु वर्तमान कळोन सावध जाले, " म्हणोन लिहिलें तें कळलें. व शिवाजीपंता-च्याही पत्रावरून कळलें. ईश्वर रक्षणार तेव्हां मनुष्य--यत्न चालत नाहीं ! राजश्री हरीपंतांकडील वर्तमान तर धौशा परिछिन्न छावणीस रहात नाहीं, व नबाबाची आज्ञाही त्यास मनापासून नाहीं, याजमुळें धौशा माघारा जाणार ! हरीपंत नदीपार जात नाहींत. धौशा नि-क्षून निघून गेल्यानंतर कोपळाकडून बंकापुराकडे येणार असें आहे. आम्हीं तर परिछिन्न कडपें कर्नोलिकर व अदवानीकरांस सामील करोन घेऊन धौशा गेला तरी पलीकडे छावणी करावी असें लिहिलें आहे. परंतु हें घडावयाचें दिसत नाहीं. काय करितात पहावें. कुमदान माघारा गेला तो चेनगिरीवर फौज ठेऊन आपण पुढें गेला अशी बातमी आहे. हिरेहाळचे प्यादे चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादांचे विद्यमानें कौल घेऊन आजच तृतीय प्रहरीं उतरले. गांवांत ठाणें सरकारचें बसलें. याउपर येथील फडशा जाला. एका दों दिवशीं कूच करून हुबळीकडे जात आहों. गदगचें ठाणें बसावयाचें आहे हें बसल्यावर पर्जन्याचा फौजेचा सुमार पाहून जाणें तिकडे जाऊं. करकंब वळणचे लोक आहेत ते तर घरास जाणारच. तिकडचें वर्तमान ऐकिल्यापासून रोज निरोप

---

१ पंढरपूरची.

मागतात. निरोप द्यावा तर तेथें आधिक जमतील. न द्यावा तर उठोन जावयाचे सुमारांत आहेत. यास्तव सुमार पाहून तुह्मांकडे ह्मणून रवाना करितों. माणूस पाहून तीर्थस्वरून राजश्री बापूंकडे रवाना करावयासी त्यांसीं निरोप द्यावा. शिंदे करवीर तालुक्यांत आले तेव्हां इकडे उपद्रव राहिला नाहीं. आणि फौजही मातबर आली आहे, पारिपत्य अथवा सलुख होईल. कांहीं तरी होईल. पर्जन्यकाळही आला आहे. अलीकडे तर कांहीं त्यांचे वस्तु होणें नाहीं. पलीकडीलही बंदोबस्त जाला. आतां मोठा वेध करकंबेकडीलच लागला आहे. लौकर पारिपत्य जालें तरच बरें आहे. नाहीं तर मोठेंच खूळ होणार. त्यास मीही शिवाजीपंतांस लिहिलें आहे. राजश्री आपा बळवंत प्रस्तुत देशीं आहेत त्यांचे रवानगीविशीं लिहावें ह्मणजे तो निघाला तर निघेल. आणि पारिपत्यही दोन तीन हजार मिळाले तर होईल. नाहीं तर होणार नाहीं. रामचंद्रपंत कांहीं जात नाहींत आणि कामही होणार नाहीं. राजश्री हरीपंततात्यांची भेट जाहलियाउपर कांहीं तिकडून तरतूद न होय तर इकडून करावयाची करितों. परंतु पारिपत्य जालें पाहिजे हें खरें. श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २१३०. **श्री.** (ज्येष्ठ शु० ४–९ जून.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना छ २ जमादिलावल गुरूवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ २९ रबिलाखरचीं पतें पाठविलीं तीं काल चंद्र १ मिनहूस पुण्यास येत असतां मार्गीं पावलीं. सविस्तर मजकूर कळला. श्रीमंत राजश्री

---

१ पत्र पुरंदराहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. याही पत्राच्या तारखेंत आठ चार दिवसांचा घोंटाळा दिसतो.

भाऊंचा लाखोटा पावला. सविस्तर मजकूर कळला. कृष्णराव पानशे यांसीं गोळी कपाळास लागोन ठार जाहले म्हणोन लिहिल्यावरून बहुतच खेद जाहला. कृष्णराव यासारखा मनुष्य होणें नाहीं ! त्यांचे भाऊबंदही आहेत, परंतु त्यांची गोष्ट दुसरी. त्यांचे साम्यतेस जोडा-वीशी नाहीं. राजश्री भिवराव चांगले आहेत. वरकड भाऊबंद पुढें निभावयाचे आहेत ! होणारास उपाय नाहीं. थोरल्या महार्णवांतून वांचले. खेडयावर असी गोष्ट जाहली ! उपाय नाहीं. आम्ही पुण्यास आलों. राजश्री चिमाप्पा पानशे पुण्यांतच होते त्यांस वर्तमान सांगि-तलें. त्यांणींच तीं पत्रें ऐनजिनसी भिवराव यांजकडे पाठविलीं. नववे दिवशीं चिमाप्पास कळलें. तसींच पत्रें सोनेरीस गेलीं. आम्ही चिमा-प्पाच्या घरास गेलों होतों. एक दोन दिवसांत सोनेरीस जातों. चिमाप्पा आजच सोनेरीस गेले. सरकारचा लाखोटा व ज्याचें त्यास प्रविष्ट केलें. श्रीमंत राजश्री नानाचा गोत्रज मृत्यु पावला त्याचें सुतक नानास आहे. आज नववा दिवस. उद्यांचा दिवस आहे. श्रीमंत राजश्री नानास पुण्यांत दगा गाडद्यांकरवीं करवावा असा मंत्र जाहला होता. सुचें जाहलें, बंदोबस्त जाहला, त्याजमुळें एक वेळ दगा चुकला ! कोणी करविलें, काय वर्तमान, हें अद्यापि ठिकाणीं लागलें नाहीं. मागाहून लिहून पाठवूं. श्रीमंत राजश्री बळवंत-राव दादांस व आम्हास त्वरित येण्याविशीं पत्रें नानानीं पाठविलीं होतीं. पंढरपुराअलीकडे आलों तेथें पावलीं. आम्ही त्वरेनेंच आलों. या गोष्टीवरूनच बोलावूं पाठविलें. या मंत्रांत दामोदर मंडळीच फार-करून आहे. नांवें लिहितां नयेत, व पुर्ता पत्ताही पाहिजे. मागा-हून लिहून पाठवूं. शिंद्यांचा मोड जाहला. पळोन गेले. आतां राजश्री

---

१ सावशीच्या लढाईंतून. २ पानशांचा नेहमीं राहण्याचा इनामगांव सोनेरी. ३ येसाजी शिंद्यांचा रामचंद्र गणेश यानें मोड केला.

रामचंद्र गणेश कवठयावर कशास राहतील ? करवीर तालुकियांत जातील. राजश्री महादजी शिंदेही तिकडे जातात. त्यांजकडे कारकून पाठवावा. ते लक्ष राखतात; मिरज प्रांतास उपद्रव देणार नाहींत. श्रीमंत राजश्री नानाची शुद्धता जाहली म्हणजे शिंद्यांस पत्र स्वदस्तूरचें नानाचें घेऊन पाठवितों. राजश्री मोरोबा दादाची व नानाची समक्ष गांठ पडोन बोलणें चालणें जाहलें. फारकरून निखालसता व्हावीशी आहे. श्रीमंत राजश्री महाराज[1] यांस समाधान नाहीं. कोणे समयीं काय होईल हा भरंवसा नाहीं. तसें जाहल्यानें नवे खुळास जागा होती. याजकरितां एखादें मूल भोंसल्याचे वंशाचें पाहून. जेष्ठमासीं महाराज जिवंत आहेत तों तक्तावर बसवावेंसें आहे. उभयतां कारभारी सप्तऋषीस[2] जातील. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१३१. **श्री.** (ज्येष्ठ शु० ५–१० जून.)

सेवेशीं[3] शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील तागायत छ ३ जमादिलावल भौमवासरे मुक्काम पुणें. यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ २७ रबिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छ २ जमादिलावलीं पावोन सविस्तर मजकूर कळला. नानास दगा करावयास गाडदी यांनीं मनसबा केला होता त्याचें ठिकाण लागलें असल्यास लिहून पाठवावें म्हणोन लिहिलें, त्यास ठिकाण लावावें, चौकशी करावी, तेव्हां त्याचा बंदोबस्त ज्यांनीं करविलें त्यांसुद्धां करावा तेव्हां ठीक. ती गोष्ट या प्रसंगीं करितां येत नाहीं, याजकरितां बंदोबस्त मात्र करून तसाच मजकूर ठेविला आहे. कागदीं

---

१ सातारचे छत्रपति रामराजे. २ सानाऱ्यास. ३ पत्र पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव यांस.

पत्रीं लिहितां येत नाहीं. करकंबचा प्रकार लिहिला, त्यास होळकरास पत्रें वरचेवरी पाठविलीं आहेत. त्यांनींही आपले लोकांस बलावणीं पाठविलीं आहेत. राजश्री बाबूजी नाईक यांची पागा व खास पथक तीनशें पाठवावें म्हणोन बारामतीस पत्रें पाठविलीं त्याचीं उत्तरें " रवानगी केली. राजश्री मेघश्यामराव यांस सामील होतील. " म्हणोन पत्राचीं उत्तरें आलीं. राजश्री विसाजी कृष्ण यांजकडील अडीचशें स्वारसुद्धां राजश्री दाजीबा गेले. हें सामान व बारामतीचें व मंगळवेढें याचें मिळोन एकत्र होतील तों होळकर आले म्हणजे त्यांस सामील होतील. आवईनें ठाणें सोडल्यास उत्तमच झालें. बळ जाहल्यास तोफा गाडदी पाठविले पाहिजेत व फौज नवी मेळविली पाहिजे. त्यास आपणाकडे पत्रें पाठविलीं आहेत त्यांचीं उत्तरें आलीं म्हणजे आपण लिहितील त्याअन्वयें गाडदी व तोफांची रवानगी करूं. आवईनें कार्य जाहल्यास उत्तमच झालें. श्रीमंत राजश्री नानास विनंति करून तरतूद बरीच करविली आहे. राजश्री हरबाअण्णाचा मजकूर आपण लिहिला तो कळं[1]., श्रीमंत राजश्री बळवंतराव दादाच्या पत्रावरून सविस्तर कळेल. श्रीमंत राजश्री आपांनीं आम्हांस व दादांस पत्रें पाठविलीं कीं, " त्यास समाधान नाहीं याजकरितां परसांत आणून ठेविले आहेत. कारभारी यांस विनंती करून चिठी घेऊन पाठवावी " म्हणोन लिहिलें त्याजवरून विनंती केली. परंतु अद्यापि मर्जीस येत नाहीं. आम्ही व दादा यत्न करून पहातों. राजश्री महादजी शिंदे यांस राजश्री रामचंद्र गणेश व बाजीपंत-अण्णा सामील झाले. येथूनही पत्रें त्यांस शिंद्याबरोबर रहावयाविशीं गेलीं आहेत. शिंद्यांजवळ राहतील. रुजुवातीचा प्रकार लिहिला तो कळला. रुजुवात जाली म्हणून यादी पाठवावी. बोलून

---

१ भास्कर हरि पटवर्धन यांनीं मिरजेहून.

घेऊं. आबाजीपंतही आले आहेत. सांची भेटी करून वर्तमान श्रवण करवितों. घोडींउंटें सोडल्याचा मजकूर लिहिला तो कळला. उत्तम आहे. शिराळेकरांचें वगैरे कबूल न केलें, उत्तम गोष्ट केली. श्रीमंत राजश्री भाऊंकडील पत्रें आलीं त्यांतील मजकूर लिहिला तो कळला. धौसा बहुसा छावणीस राहातां दिसत नाहीं, याजकरितां नबाबास पत्रें लोचीं म्हणोन आज्ञा त्यास. छावणी करावयाविशीं नबाबास येथून पत्रें वारंवार गेलीं आहेत. बहुत प्रकारें छावणीस राहतील. नबाब मात्र मायारे जातील. धौशास ठेविंतील असें आहे. वरचेवरी पत्रें पाठवीत आहेत. फरांच्यांकडील वकील व इंग्रजांकडील वकील पुण्यांतच आहेत. अद्यापि ठराव लिहावया जोगा नाहीं. राजश्री सखारामपंत सासवडाहून काल इंदुवारीं पुरंधरास गेले. राजश्री नाना दशमीस किल्ल्यास जाणार. राजश्री रामाजीपंत यांचे स्त्रीस समाधान नाहीं. वांचेलसा भरंवसा नाहीं. याजकरितां लग्न आजच योजिलें आहे. पुण्यास आले आहेत. देवाघरा म्हणोन गृहस्थ पुण्यांतच आहेत. त्यांची मुली पाहिली आहे. कळावें. राजश्री मोरोबादादाकडील ठराव होत आहे. मागाहून लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

मं. २१३२. **श्री.** (ज्येष्ठ शु० ११—१६ जून.)

पुरवणी. राजश्री भाऊस्वामींस विनंती उपरी. जाबीतजंग सुद्धां पलीकडे छावणीस रहावे या प्रकारची योजना ठीक जाली असतां आमचे गळाटयामुळे न जाहले. मुसारे फिरलें. नवलीच्या ओढयावरी राहिलों. उदईक जाबीतजंग जातील. आम्हीं आपले पत्राचें उत्तर येईतों. सिदनुराजवळ दम धरितों. फौजेंत कांहीं जीव

---

१ ही हरीपंत फडक्यांनीं परशुरामभाऊंस लिहिलेल्या पत्राची पुरवणी आहे. सर्व खासदस्तुरची आहे. हिचें मुख्य पत्र सांपडलें नाहीं. २ तुंगभद्रेपलीकडे शत्रूच्या मुलुखांत.

राहिला नाहीं. मरगळीचे दिवस ! पोटास द्यावयास नाहीं. लोक कसे राहतात ? याजकारितां आपणास लिहिलें आहे. लाख दोन लाखांची आपणाकडून तूर्त तरतूद होऊन आली तर चार दिवस राहतील. नाहीं तर सारे उठोन जातात ! मी एकटा तळावर रहातों ! येथें लिहावयास स्थळ आपण. कोणती तजवीज करावी ? आपण मनसबा कसा योजिला तें लौकर लेहून पाठवावें, फौजेत कांहीं जीव राहिला नाहीं. पुढें कितेक मसलती आहेत. आह्मीं तुंगभद्रेअलीकडे राहिल्यास हैदरनाईकाचा जमाव बंकापुरास होईल. आपण कसें करावें ? पोटाची तजवीज काय, परिणाम कसा, तें लिहून पाठवावें. तीन वर्षें बरें वाईट हांकिलें. परंतु असा समय पडला नाहीं. विजातीय अर्थ पडला आहे ! पुण्याकडील पुस्तपन्ह्याचा प्रकार तर आपणास शिवाजीपंत लिहीत असतील. उभयतां लोकांजवळ मनस्वी आमचें करणें ठीक नाहीं म्हणोन बोलतात त्याचीं वर्तमानें येथें येतात, त्यामुळें लोकांत माझी पत नाहींशी झाली आहे ! कर्ज मिळत नाहीं. पैसा नाहीं. इतके दिवस मेहनत करून तोंडास मसलत येऊन ही अवस्था जाली ! लोकांचे मतें तडका पुण्यास जावें. त्यास गेल्यांत बरें कीं राहिल्यांत बरें ? कसा विचार करावा तें लौकर लिहावें. उशीर लावूं नये. लोक केवळ हवालदील जाले आहेत. वाजवी पाहतां नेहमीं पोटास नाहीं तर त्यांनीं तरी कसें करावें ! आपले उत्तराची मार्ग-प्रतीक्षा करीत आहें. रवाना छ ९ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

नं. २१३३. श्री. (ज्येष्ठ शु० १३-१८ जून.)

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें जिऊबानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत

---

१ तुह्मी आह्मी. २ उभयतां कारभारी सखारामबापू व नाना फडणवीस. ३ जिवाजीपंत जोशी पोननीस यांचें परशुरामभाऊंच्या लष्करांतून मिरजेस पत्र.

छ ११ जमादिलावल मुक्काम हुबळी येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. राजश्री हरीपंतताात्या जालीहाळास आले. इकडे येणेंविशीं तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांनीं त्यांस लिहिलें होतें, परंतु लोक त्यांस कांहीं इकडे येऊं देईनात ! ते देशास गेल्यावर या प्रांतीं आमचा टिकाव होणें कठीण, याजकारितां भाऊंनीं राजश्री रामचंद्रपंत मामाकडून राजश्री हरीपंततात्यांस चार लक्ष रुपये द्यावयाचा करार केला. त्यापैकीं काल साडेबारा हजार होनांची चिठी त्यांचे लष्करांहून पाठविली. आज आह्मीं येथून कूच करून त्यांजकडे[1] जावयास चाललों. तेथें गेल्यावर जे लोक छावणीस राहतील त्यांस ठेऊन घ्यावें, जातील त्यांचे मुबदला दुसरे ठेवावे, परंतु हरीपंतांनीं सरदारी मोडूं नये असें योजिलें आहे. चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी, कर्नोल, कडपेकर यांचीं पत्रें आलीं आहेत कीं, " आह्मीं तुह्मास[2] दहा लक्ष रुपये जाहले तरी खर्चास देतों. आणखी आमचें पायदळ बारा पंधरा हजार, चार तोफा व दोन हजार स्वार असे घेऊन तुह्मांबरोबर येतों. सर्वस्व या मसलतीस खर्च करितों. परंतु शत्रूचें पारिपत्य सर्वच मिळोन करावें. जलद तुंगभद्रापार यावें. सत्वर आलां तर आमचीं संस्थानें राहतात आणि अब्रू राहती. नाहीं तर जी मुरारराावाची गत जाहली ती आमची होती ! याप्रमाणें पत्रें आलीं व पुरुषोत्तमपंत[3] हावेरीस आहेत त्यांच्या पत्रावरून कसेंही करून हरीपंतास ठेवून घ्यावे. या मसलतीमुळें आज निघोन चाललों. धौशासही पत्रें लिहिलीं आहेत. हरीपंत तात्यांचे सरदारीचा बखेडा जाहला याजमुळें त्यांनीं फार भाऊसाहेबांस म्लान वदनें लिहिलें आहे. हुबळीकर[4] नीट बोलणें बोलत नाहीं. तूर्त हे असेंचं टाकून चालिले, नवे हुबळींत

---

१ म्हणजे ५० हजार रुपयांची. २ हरीपंतांकडे. ३ पुरुषोत्तम तमाजी हा चित्रदुर्गकरांचा कारभारी. ४ हुबळीकराचा निकाल न लावतां.

ठाणें बसलें. तूर्त येथें आपोजीपंत पोसे यांस ठेविलें आहे. विरकड ह मर्व मजकूर तिथिरूपाचे पत्रावरून विदित होईल. राजश्री बाळाजीपंत भिडे यांनीं आम्हांजवळ येथें रुपये ११० एकशें दहा हुकेरी दिले ते आहेत. घडिलीं सदरहू रुपये राजश्री बाबाजी विश्वनाथ चाफेकर यांस तेथें द्यावे आणि पावल्याचें कबज घ्यावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विज्ञापना.

नं. २१३६. श्री. (ज्येष्ठ शु ८ ते १५ = २७ जून)

राजश्री माऊ स्वामीचे सेवेशीं विनंती उपरी. इकडील वर्तमान दोन तीन पत्रीं लिहिलें त्यावरून कळलें असेल. पलीकडे राहणें जाहलें नाहीं, मोठी गोष्ट कमी पडली ! माघारे फिरलों, त्यास महिना पंधरा दिवस इकडे करमणूक करावी. मग आपण आम्ही एकत्र व्हावें. चांगली जागा पाहून रहावें. त्यास पोटास नाहीं ह्या जमुळें लोकांनीं ताळ सोडला ! रोज देंगा ! सर्वांचा मनोदय कीं पुण्यास जावें ! असें करूं नका म्हणावें तर पोटास द्यावयास पैका नाहीं ! हें वर्तमान सांडणीस्वारबरोबर लिहून पाठविलें आहे. आपणाकडे यावें, मग जें होणें तें होऊ, असा प्रकार; त्यास आपणाकडे जाऊं देऊं नये, पुण्यास घेऊन जावें, हेच मसलत सर्वांची आहे ! आमचे मतें महिना पंधरा दिवस दम धरून रहावें, पुण्याचीं उत्तरें काय येतात पहावें. तसें करावें, परंतु फौजा ऐकत नाहीं. आपणापासून पांच सात कोस रहावें, आपली भेट व्हावी, हें तरी घडावें, परंतु लोक कसें करितील कळत नाहीं. आपण कोठें आहांत, वर्तमान काय, लिहावें. सर्वांनीं विचार केला कीं, एक रोजमुरा आठवडा व एक दीड कांहीं खुर्दा असें द्यावें. येणेंकरून दम धरितील, तेव्हां लोकांस सांगितलें कीं, ' भाऊपर्यंत चला. तेथें जातांच रोजमरा

---

१ ही हकीकत फडके यांनीं परशुरामभाऊस खासदस्तुरें लिहिलेल्या पत्राची पुरवणी, हिचें मुख्य पत्र सांपडलें नाहीं.

देतों. मग विचार करणें तो करूं. तथापि ऐकत नाहीं ! निकड करून आपणापर्यंत यावें हें मानस ईश्वरें घडविलें तर येऊं ! भाऊसाहेब! अशी कधीं गुदरली नाहीं ! कोणाचे डोळ्यांत मर्यादा राहिली नाहीं ! कोणती गोष्ट करावी ? मजला येथें मोठें संकट पडलें आहे. आपली भेट होती तर कांहीं तरी पर्याय निघता. आम्ही चांगलें नसावें ही गोष्ट बहुतांचे चित्तांत होती ती घडली ! माझी मला काळजी नाहीं. परंतु पलीकडे राहणें न झालें तर अलीकडे तरी रहावें. येणेंकरून शत्रूवर कांहीं तरी दाब राहील म्हणून लोकांचे गळां पडतों. परंतु एकच आरोळी आहे ! भाऊसाहेब ! याचा विचार कसा करावा ? जर लिहिल्याप्रमाणें तूर्त दोन लक्ष रूपये पावले तर पंधरा दिवस गलबल पडणार नाहीं. इतक्यांत आपली भेट होईल. पुण्याचे कागद येतील. मग करणें तसें करूं. अशी अमर्यादा व बोलणें कधीं ऐकिलें नाहीं ! ग्रहदशाच अशी, यास काय करावें ! देशास गेल्यानें अगदीं वाईट, याजकरितां कसें करावें ? परिणाम कसा लागेल ? आपण इकडे राहिले. पेंच नसता तर असेच हांकून पुण्यास नेतों. मग होणें तें होतें. परंतु विजातीय समय प्राप्त जाला आहे ! मनांत इतकें आहे कीं, एक वेळ आपली भेट व्हावी. मग करणें तें करावें. परंतु लोक कसें करितात कळत नाहीं. आम्ही गजेंद्रगड उजवा टाकून येतों. आपण कोणे स्थळीं आहेत, भेटीचा योग कैसा घडेल, तें लिहावें. याउपर विचार करावयास दिवस राहिले नाहींत. मोठ्या विचारांत पडलों आहों. याचा विचार करून लौकर लौकर उत्तर पाठवावें. आम्ही लोकांस सांगावें अशी शक्ति मजपाशीं राहिली नाहीं ! बेकैदी जाली आहे ! मनस्वी भाषणें आहेत ! कसेंही असो, पुण्यास जाणें तरी दोन लक्ष रूपये रोजमुरा वांटला तरी पुण्यापावेतों जिवंत जाऊं देतील ! नाहीं तर

परिणाम शुद्ध नाहीं. सर्वांनीं रया सोडली. या समयीं संभाळाल तर मोठी गोष्ट आहे. माझे पेक्षां मसलतीची काळजी आपणास अधिक आहे, तेथें लिहावेंसें नाहीं. रवाना छ १२ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. २१३५. **श्री.** (ज्येष्ठ व. ३०–५ जुलई.)

विज्ञापना[1]. राजश्री हरीपंततात्यांस फौजेंतील लोक छावणीस राहूं देत नाहींत. पुण्यास घेऊनच येणार. 'पहिल्या आवाया तवाया सोसिल्या असतां निकडीसच यावयास कारण काय,' आपण म्हणतील; त्यास लोकांस सन खमसचे नालबंदीपैकीं निमेसिमे ऐवज पावला तो पावला. बाकी कोणास पैसा नाहीं. अलीकडे सन शीत व सब्बा सालांत पैसा नाहीं. रोजमरेही फार तटले आहेत. तुंगभद्रातीरास महर्गता जाहली. खर्चास पैसा द्यावयास राजश्री हरीपंततात्यांजवळ नाहीं हें मुख्यत्वें व चहूंकडील राजकारणें पाहतां फौजेंत दुलंग[2] आहेत, ते श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील राजकारणांत. ते साऱ्या फौजेंत बखेडा करितात. आबाजी महादेव हैदरखानाकडे गेला आहे. त्याचें म्हणणें काय कीं, " फौज छावणीस न रहावी इतका प्रकार जाहल्याम फौज देशीं परत जाईल. मग आपण कृष्णेपावेतों अंमल बसवितों. देशीं फौजा जातील तेव्हां तिकडे आपण राजकारणें करून बाहेर निघावें " अशीं नानाप्रकारचीं राजकारणें आहेत याजकरितां कसेंही करून फौज छावणीस रहावी येणेंप्रमाणें ठरलें. त्याप्रमाणें तरतूद जाहली आहे. यांत घडेल तें प्रमाण ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पत्र शिवाजी बाबाजीचें पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस. २ दुलग म्हणजे दोहीं डगरींवर हात ठेवणारे, फितुर झालेले मानाजी फांकडे वगैरे. ३ हैदरअल्लीनें कीं दादासाहेबांनीं ! ४ पुणें दरबारानें ठरविलें.

नं. २१३६. **श्री.** (ज्येष्ठ व० ३०–५ जुलई.)

पैवस्ती छ ३ जमादिलाखर. सन सब्बा सबैन. आषाढमास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी "राजश्री हरीपंततात्या यांच्या लष्करचे लोक फुटोन देशास जाऊं लागले, रोजीं चार पांचशेंपावेतों ऐनापुराजवळ कृष्णा उतरून जात आहेत. एकवेळ हरीपंत यावयास महत्प्रयास जाहले ! ! ! आतां माघारे गेल्यावर लौकर येणें कळतच आहे ! " म्हणोन लिहिलें, ऐशास " देशास गेल्यास परिणाम नाहीं. श्रीमंतांची मसलत बुडते, आपले अबरूस खत्ता, राहिल्यांतच लौकिक आहे. " म्हणून हरीपंतांस नानाप्रकारें लिहोन पाठवीतच आहों. त्यांचाही लोकांपुढें उपाय नाहीं ! मुख्य पोटामुळें इतका बखेडा जाहला. येथून गोपाळपंत काळे नि० विसाजीपंत आठवले तात्यांकडे पाठविले व पत्रेंही पाठविलीं आहेत. त्याजवरून " गेली फौज ती गेली; बाकी राहिली ती फौजसुद्धां खामखां छावणीस राहतों; आपणाकडे येतों; तूर्त पन्नास हजार रुपये हर कसें करून पाठवावे; " म्हणोन कालच पत्रें आलीं. छावणीस राहतात. पन्नास हजारांची हुंडीही पाठविली. तात्यांनीं रहावयाचें केलें याजमुळें मोठी गोष्ट जाहली. आतां चिंता नाहीं. हरीपंत ज्यापक्षीं राहिले तेव्हां गेलेले लोक फिरोन आपोआप येतील. श्रीमंतांचे प्रतापेंकरून मोठींच कामें होतील. तात्या माघारे जात होते याजमुळें ह्या देशांत कोणास आमचा भरंवसा पुरत नव्हता. आतां फिकीर नाहीं. धौशाही कृष्णेअलीकडे छावणी करितो. तात्यांचें राहणें व्हावें याजमुळें आमची ओढ सोसून पन्नास हजारांची हुंडी व पन्नासांच्या वराता धरल्या. एकूण लाख रुपयांचा भरणा केला. ऐवज मामलतीचे ऐवजीं राजश्री रामचंद्रपंत मामाकडून देविला. आपणास कळावें.

---

१ पेशवे सरकारची.

अद्यापि भरंवसा पुरत नाहीं, परंतु राहतील असें वाटतें. बेटगिरी घेतल्यावर दोन चार दिवसांत राजश्री हरीपंततात्या व आम्ही एकत्र होऊन तूर्त सावनूर तालुक्यांत जाणार. तेथें गेल्यावर शिरहट्टी सांवशीचें काम करावें म्हणजे लक्ष्मेश्वर तालुक्याचा बंदोबस्त जाहला, मग कित्तूर तालुक्यांत यावें, असी योजना आहे. श्रीइच्छेनुरूप घडेल तें प्रमाण ! बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २१३७. **श्री.** (आषाढ शु० ३–७ जुलई.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ १ जमादिलाखर इंदुवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्रें जिवा माळी याजबरोबर पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. आपल्या पत्रापूर्वी राजश्री हरीपंततात्यांकडील पत्रें तीन वेळां मिळोन एकदांच पावलीं. त्यांतील भाव " पहिला धौशा छावणीस रहात नव्हता. मग त्याचा रहावयाचा[1] निश्चय जाला. पलीकडे उतरावें तों लोकांनीं अडाविलें. पोटास नाहीं. महर्गता जाली. तीन तीन फांके ! ! ! उपाय नाहीं. तेव्हां धौशास युक्तीनेंच निरोप दिला आणि तुंगभद्रेवरून कूच करून अलीकडे आलों. अलीकडील तालुक्यांत रहावें, त्यासही (फौज) मान्य नाहीं ! ' तुह्मांस देशास घेऊन जातों. नाहीं तरी नालबंदीची बाकी व रोजमरे तटले आहेत ते द्यावे. नाहीं तर पुरंधरास चलावें. संतोषें न याल तरी आह्मांस तरी जरूर घेऊन जावें लागतें. शेवटीं जबरदस्तीनें घेऊन जाऊं. ' येणेंप्रमाणें निकड करून आपणास घेऊन येतात. इलाज नाहीं. प्रस्तुत दोन लाख रुपये पाठवावे तरी आपला प्राण वांचतो. आपणापावेतों येतों. नाहीं तरी इकडे राहणें होतच नाहीं व प्राणही

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

वांचत नाहीं ! " ह्मणोन पत्रें. त्याजवरून राजश्री सखारामबापूंकडे पुरंधरास श्रीमंत राजश्री नानांनीं आम्हांस पाठविलें. शहराबाहेर आलों तों जिवा माळी भेटला. पत्रें पाहून पुरंधरचें पत्र पाहून गेलों. वरकड पत्रें श्रीमंत राजश्री नानांकडे पुण्यास पाठविलीं. आमच्या नांवचीं पत्रें श्रीमंत राजश्री बळवंतराव दादांस दाखवावयासी बरोबर पुरंधरास नेलीं. त्यांसही दाखविलीं. पुरंधरास जाऊन त्यांस वर्तमान सांगितलें. पुढें विचार काय ? तेव्हां ठरोव जाहला कीं, तमाम हुजुरातीच्या लोकांस पत्रें पाठवावीं कीं, खमसची नालबंदी राहिली आहे ती व रोजमरे तटले आहेत ते व पुढें चारमाही बेगमी करून पाठवितों. तुम्ही छावणीस रहावें. येणेंप्रमाणें पत्रें व राजश्री हरीपंततात्यांस खातरजमेचीं पत्रें पाठवावीं. ऐवज तूर्त दोन लाख रूपये पाठवावे. जर करून छावणीस राहिल्यास ऐवजाची पुरवणी वरचेवरी करावी. येणेंप्रमाणें ठराव करून[1] पुण्यास काल रात्रौ आलों. त्यांस सविस्तर वर्तमान सांगोन दोन लाख रूपये सांडणीस्वारांबरोबर तयार करून आजच होन वगैरे नाणें रवाना जालें. शिलेदारांस वगैरे पत्रें खातरजमेचीं तयार होत आहेत. आजच रवानगी करून पाठवितात. जर करून छावणीस राहिल्यास बरें होईल. कारण कीं सालमजकुरीं कांहीं जाहलें नाहीं. राहिल्यानें ठाण्यांचा बचाव. पुढील कर्तव्यास उमेद. फौज देशीं आल्यानें कित्येक खळें होतील. त्यास वरचेवर पत्रें त्यांस पाठविलीं आहेत हीं पत्रें पावत तंव श्रीमंत राजश्री भाऊंची व हरीपंततात्यांची गांठ मलप्रभेवर पल्लीकडे अमतां पडल्यास जे बखेडेखोर आहेत त्यांची तोड पाडून रहावयाचें करितील, इतका भरंवसा मात्र दिसतो. श्रीमंत राजश्री भाऊंची गांठ पडूं न देतां अलीकडे यावें हींच मसलत साऱ्या लोकांची आहे ! शेवटीं असाही प्रकार लिहिला आहे कीं, " उठोन येतील ते येतील.

---

१ ठराव सखारामबापूनीं केला. २ नाना फडणवीस यांस.

पांच सात हजार फौज पागासुद्धां राहिली तरी सुद्धां श्रीमंत राजश्री भाऊ व तुम्हीं मिळावें. तों इकडून राजश्री रामचंद्र गणेश यांजबरोबरची फौज आली आहे त्यांपैकीं समजूत करून राजश्री बाजीपंत-अण्णा यांजबरोबर पाठवावी असा विचार आहे." जर करून राजश्री हरीपंततात्यांस तिकडे राहूंच न दिलें, घेऊनच आले, तरी तिकडे श्रीमंत राजश्री भाऊंचा टिकाव कैसा होतो ? व धारवाड आदिकरून रहात नाहीं. कृष्णेपावेतों मोकळें होतें. याजकारितां कारभारीही मोठया विचारांत पडले आहेत कीं, पुढें कसें करावें. काय करावें ? वरचेवरी पत्रें राजश्री हरीपंततात्यांस पाठवितात कीं, कसेंही करून तुम्ही चार हजारांनिशीं रहावें. तों इकडून फौजेची व पोटाची पुरवणी करितों. येणेंप्रमाणें पत्रें निकडीचीं जातात. पत्रें जातात तों नदी मलप्रहरा उतरोन फौज न आल्यास कांहीं तरी तोड काढोन निम्मेनिम्मेनिशीं राहतील असा मात्र भरंवसा आहे. राहिल्यास सर्व गोष्टी पुढें श्रीमंतांच्या दैवेंकडून नीटच होतील. या वेळेस न राहिले तरी साऱ्याच मनसब्यास खामी बसते ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१३८. (आषाढ शु० ७–९ जुलई.)

शिवाजी बाबाजीचें पत्र छ ४ जमादिलाखर बुधवासरचें पुण्याहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस–

" शिंदे रहिमपुरास राहिले आहेत तेथेंच राहिल्यास (गांवास) उपद्रव लागेल. व नद्यांस पाणी आहे तों चिंता नाहीं, परंतु त्यानंतर करवीकरांचाही उपद्रव फार होईल ह्मणोन लिहिलें; त्यास शिंदे सरकारांत लिहितात कीं, त्यांजकडील बोलावयास आले आहेत. ठराव जाल्यास उत्तम. नाहीं तरी ती मसलत आपल्यास पावली. रहिमतपुरास उपद्रव लागत असल्याचें धोंडोपंत कमाविसदार कांहीं लिहीत

नाहींत. तेव्हां उपद्रवाविशीं शिंद्यांस पत्र पाठवावें तर त्यांस वाईट वाटेल. हरिपंततात्यांकडील मजकूर लिहिला तो कळला. धोशा तर गेलाच. तेव्हां तुंगभद्रेपलीकडे छावणी व्हावी तो प्रकार दिसत नाहीं. खर्चास पैका नाहीं, फांके होतात, हें वृत्त येथें कळल्यावर खर्चाची बेगमी करून पाठवावी व तिकडून वराता येतील त्या धराव्या. येणें-प्रमाणें जालें दोन लाख रूपये पाठविले. वरचेवरी आणखी पाठ-वितात. लोकांसही धीरभरंवशाचीं पत्रें पाठविलीं आहेत. तुकोजी होळकर यांजकडे थोरली तोफ येथून गेली ती नरसिंगपुराजवळ पावल्याचें उत्तर आलें. आजपावेतों त्यांजकडे पावलीच असेल. सोला-पुराहूनही तोफा गेल्या आहेत. गाडदी पुण्यांत ठेवून पाठवावे म्हणोन होळकरांनीं नारो गणेश यांस लिहिलें होतें. त्यावरोन त्यांनीं पांच सहाशें गाडदी ठेवून पाठविले आहेत. होळकराची फौजही आतां जमली आहे. करकंब लौकरच हस्तगत होईल. "

नं. २१३९. **श्री.** (आषाढ शु० ५–१० जुलई.)

श्रीमंत राजश्री सुभेदार स्वामीचे सेवेशीं.

आज्ञाधारक कोन्हेरराव कृष्ण. साष्टांग नमस्कार विनंति विज्ञा-पना तागायत छ ४ माहे जमादिलाखरपर्यंत वर्तमान यथा-स्थित असे. विशेष. इकडील वर्तमान करकंबचा प्रकार जाहला तो स्वामीस कळलाच असेल. स्वराज्यांत न घडावयाचा तो विचार घडून आला ! प्रस्तुत पुरंदराहून राजश्री तुकोजी होळकर यांस आज्ञा जाली आहे जे, करकंबचें पारिपत्य करणें. होळकरां-जवळ फौज पांच हजार त्यांची आहे. शिवाय बार प्यादे देशींचे चार हजारांपर्यंत ठेविले आहेत. सोलापुरास सरकारची आज्ञा तोफा घेऊन

---

१ शिवरा नीलकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर. २ मैंदरगीचा कमाविसदार.

होळकराकडे जाणेंविशीं जाली आहे. तोफा दोन तीन बाहेर निघाल्या आहेत. एका दों दिवशीं जाणार आहेत. काय होतें पहावें, गांवांत दोन अडीच हजारपर्यंत प्यादा. पांचशें स्वार आहेत. पर्जन्यकाळमानामुळें चार रोज मसलत पडली. पारिपत्य जाहलेशिवाय रूप नाहीं. करकंब बेसावधतेनें गेली. श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे. मोंगल खासा भागानगराम गेला. चौशा अरकरेंनजीक मुरापूर येथें आहे. त्या प्रांतींच छावणी करावी हा त्याचा सिद्धांत दिसून येतो. साहेब जादा पंधरा हजार फौज, दहा पंधरा हजार कचरासुद्धां कलबुर्गेस दाखल झाला. छावणी कलबुर्गेची निश्चय जाली. पर्जन्य नाहीं. वैरणीचा कहर जाला आहे. दोन अडीच कट कडबा मिळत नाहीं!... जाधवरायाचा जिल्हा अगदीं साहेबजाद्यास दिला. जाधवरायाचें संस्थान मोडलें. बहुता दिवसांची सरदारी होती.....जोरीची धारण अकरा पायली जाली. .....सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ २० जमादिलाखर सु॥ समान सबैन.

नं. २१४०. श्री. (१४ जुलई.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना• तागायत आंषाढ शुद्ध नवमी इंदुवासरे मुक्काम पुणें. वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहावें. श्रीमंत राजश्री भाऊ व राजश्री हरीपंततात्या कोणे मुक्कामीं आहेत ? येथून पत्रें खातरजमेचीं छावणीस रहावयाविशीं गेलीं आहेतं त्यांजवरून त्यांणीं राहण्याचा डौल धरिलाच असेल. पत्रें तिकडून येतच असतील. इकडील वर्तमान तर श्रीमंत मातुश्री गंगा-

---

१ करंकंबच्या ठाण्यांत बंडवाल्यांचे. २ धनाजी जाधव सेनापति यांचा नातू रामचंद्रराव जाधव याची. ३ या पत्रांत टिंबें दिलेल्यां ठिकाणीं मजकूर महत्वाचा नसल्यामुळें गाळला आहे. ४ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

बाई यांस मात आठ ज्वर आले. वायु जाला. एकाएकींच परवां सप्तमी मंदवारीं देवाज्ञा जाली ! ईश्वरें मोठा घात केला ! श्रीमंत लहान आहेत. मातुश्री पांघरूण होतें तें गेलें ! निरुपाय गोष्ट भगवंतें घडविली. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१४१. श्री. (१५ जुलई.)

पैा छ १५ जमादिलाखर. सुरुसन सब्बा सबैन. मय्या. व अल्लफ.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा आषाढ शुद्ध दशमी भौमवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन छावणीचें वगैरे वर्तमान कळत नाहीं, तर सविस्तर ल्याहावें. यानंतर इकडील वर्तमान तर श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांसी नवज्वराचा उपद्रव जाहला. ज्वर आल्यापासून आठवे दिवशीं दीड प्रहर दिवसास देवाज्ञा जाहली. ईश्वरें मोठा घात केला. श्रीमंत लहान. मातुश्री म्हणजे पांघरूण होय. मोठी अनुचित गोष्ट जाहली. किल्लयावरच दहन जाहलें. काल श्रीमंत सौ॥ मातुश्री पार्वतीबाई पुरंधरास गेल्या. श्रीमंत राजश्री नानाही उदईक पुरंधरास जाणार. " राजश्री रामचंद्रनाईक व त्यांचे पुत्र होळकराजवळ आहेत. त्यांचे अन्याय माफ केले, त्यांस पाठवावें, " म्हणोन होळकरास पत्रें गेलीं आहेत. श्रीमंत मातुश्री बाईस तीन दिवस जाहले. त्याच दिवशीं पत्र पाठविलें नाहीं म्हणोन आपण रागें भरतील, त्यास आम्हांजवळचे जासूद बरचेवरी पत्रें होळकराकडे घेऊन गेले आहेत. चार जासूद तिकडेच आहेत. प्यादे मिरजेचे उठोनच गेले ! याजकरितां माणूस जवळ नव्हता. याजकरितां पत्रास विलंब लागला. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पत्र परशुरामाऊंस लष्करांत.

नं. २१४२. (आषाढ व० १२–३१ जुलई.)

रामोजी नारायण गोखले यांचें पंढरपुराहून मिरजेस गंगाधर-राव गोविंद यांस पत्र—

७५० जालनापुरी तिवटें उंच उणाख दर ॥≈ पासून दर पांच पावेतों सणगें.
१०० तापते.
५० उणाख.
५० उंच.
१००

२० गजनीवजा राधानगरी हात १८ दर ८॥ प्रमाणें
७५ जोट कडपेंचे. दर ३८२ पासून दर ३। पर्यंत.
० छिटें बंदरी. येक देखील आलें नाहीं.
२५ खारवे सुमार.
पैकीं ताडपत्री व येतगिरी शेले २०० व लुगडीं सुमार १०० घेतों ह्मणजे सरंजाम जाला.
१७०

५० सुरती दर ८ दर १ प्रमाणें.
७५ अमदाबादी दर १४ दर १५ दर १८ पावेतों.
१२५

९० मुसनफ छत्रपूरची दर ३॥॥ प्रमाणें. सवंग चांगली म्हणोन जाजती पन्नास.
२०० धोतरंजोडे दर २॥ दर २॥॥ दर ३ दर ३॥॥ दर ४। दर ६ दर ७ दर ८. नागपुरी आणीक २० उंच घ्यावयाचे आहेत.
४१५

---

१ हें पत्र १२ जुलई सन १७७६ (आषाढ व. १२ सन मच्चा) या दिवशीं लिहिलेलें असून येथें चुकून लागलें आहे. पत्र लिहिणारा ज्या दोन लग्नांच्या कापडखरेदीस गेला होता त्यांचा उल्लेख परशुरामभाऊंच्या नं. २१२४ च्या पत्रांत आहे. ' दोन लग्नांचें कापड जें मागतील तें तयार करून श्रीमंतांची मर्जी राखून खरेदी केल्याचें या पत्रांत आहे. लग्नाच्या कापडाची खरेदी एक वर्ष आगाऊ पंढरपूरच्या जत्रेंत ! २ चीन इंग्लंड वगर परदेशांतून आलेलीं.

धारवाडप्रांतीं छावणी.

स. १७७७ जुलई ते नोव्हेंबरपर्यंत.

हरीपंततात्यांची फौज रोजमुरे थकल्यामुळें व मागील बाकीची फेड न झाल्यामुळें बेदील होऊन अगदीं कह्यांतून गेली. तिनें त्यांचा हुकूम बिलकुल जुमानूं नये, नेहमीं दंगा करीत असावें, त्यांनीं पुढें कूच करा म्हटलें तर तिनें वाटेंतच झेंडे रोवून डेरे, राहुट्या उभ्या करून मुक्काम करावा, असें प्रत्यहीं होऊं लागलें. फौजेचें म्हणणें कीं आह्मास पोटास मिळत नाहीं, मागचीं देणीं सरकाराकडे तुंबलीं आहेत त्यांचा निकाल होत नाहीं, त्याअर्थीं आम्ही छावणीस रहात नाहीं. आह्मी घरीं जाणार. तुह्मी बरे बोलानें न आलांत तर बळजबरीनें तुम्हांस बरोबर घेऊन जाणार ! ममजूत घालण्याचे सर्व उपाय थकले तेव्हां फौज नेईल तिकडे जाणें हरीपंतांस भाग पडलें. पर शुरामभाऊंनीं विचार केला कीं, पांच सहा महिने महाप्रयास करून एकदांची हरीपंतांची स्वारी कर्नाटकांत आणिली; आणि येऊन महिना दीडमहिना झाला नाहीं, मोहिमेचें कोणचेंच काम अजून यांच्या हातून झालें नाहीं, तों इतक्यांतच हे परत जाणार; तेव्हां हैदरखानाचें पारिपत्य न झाल्यामुळें सरकारचें अतोनात नुकसान होणार व जहागीर शत्रूच्या ताब्यांत गेल्यामुळें आपलीही सरदारी बसणार. याकरितां हरप्रयत्न करून हरीपंतांस फौजेसुद्धां या प्रांतीं छावणीस राहून घेतलें पाहिजे. असें मनांत आणून ते हरीपंतांच्या फौजेस तूर्तातूर्त कांहीं पैका देण्याची तरतूद पाहूं लागले. तेव्हां कोपळचे मामलेदार रामचंद्र नारायण हुपरीकर हे त्यांच्या फार उपयोगीं पडले. त्यांनीं त्यांस

कांहीं कर्ज देण्याचें कबूल केलें. देशास जाऊं नये, छावणी या प्रांतींच करावी, आम्हास येऊन मिळावें, आम्ही तुमचा खर्च चालविण्याची कांहीं तजवीज पहात आहों, अशीं जों जों भाऊंचीं हरीपंतांस निकडीचीं पत्रें जाऊं लागलीं तों तों हरीपंतांच्या फौजेतले लोक देशीं जाण्याम अधिकच उतावीळ झाले ! भाऊंची स्वतःची फौज आज चार महिने उपाशीं अथवा अर्धपोटीं रहात आहे. ते हे आमच्या पोटाम काय देणार ? असें त्यांस वाटत होतें. शेवटीं मलप्रभेवर हरीपंतांचा मुक्काम असतां भाऊंनीं त्यांजकडे एक लाख रूपये पाठवून दिले तेव्हां त्या फौजेस थोडा धीर आला. मग ती फौज बरोबर घेऊन वेण्णिहाळ नांवाचा त्या प्रांतीं प्रसिद्ध ओढा आहे त्याच्या कांठाकांठानें हरीपंत परशुरामभाऊंकडे आले. भाऊंचा मुक्काम त्यावेळीं मोरब येथें होता. नवलगुंदच्या देसायापासून खंडणी वसूल करण्याकरितां तेथें ते राहिले होते. हरीपंत आठ कोसांवर आलेसें पहातांच मोरबेवरच आपली फौज ठेवून भाऊ सडेच हरीपंततात्यांच्या लष्करांत गेले. फौजेच्या खर्चास दोन तीन लक्ष रुपये दरमहा आम्ही तुम्हांस मिळवून देऊं. चाकरी पडेल ती मन लावून करीत जावी. बरोबर पैंढार वगैर असेल तें दरोबस्त देशास लावून द्यावें. बरोबर बाळगूं नये व रयतेस उपसर्ग लागूं देऊं नये. याखेरीज पैका लागेल तो आम्हाजवळ मागूं नये. सरकारांतून काय येईल त्यावर गुजराण करावी. या भाऊंच्या शर्ती होत्या त्या हरीपंतांनीं कबूल केल्या. हरीपंत परत येणार हें पाहून सखारामबापू व नानाफडनवीस गांगरून गेले होते. गतवर्षी आठ महिने फौज पुणें प्रांतीं तटून राहिली होती तेव्हां तिनें मुलखाची कशी दुर्दशा केली, मुलखगिरीच्या निमित्तानें तिला बाहेर काढण्यास किती प्रयास पडले, हें सर्व त्या उभयतांनीं अनुभविलें होतें. शिवाय हरीपंत व परशुरामभाऊ परत आले तर हैदरअल्लीस कृष्णेपर्यंत रान मोकळें सांपडेल हें त्यांस माहीत होतें. सबब त्यांनीं हरीपंतांकडे तत्काळ दोन

लक्ष रूपये पाठविले आणि त्यांस व फौजेंतील शिलेदारांस छावणीस राहण्याविषयीं उत्तेजनपर पत्रें लिहून दरमहा तीन लक्षप्रमाणें चार महिन्यांत बारा लक्ष रूपये तुम्हाकडे पोंचते करितों असें आश्वासन दिलें. एकूण हरीपंतांचें फौजेसुद्धां छावणीस राहणें आतां पक्कें ठरलें. मग त्यांचें लष्कर घेऊन परशुरामभाऊ शिरहट्टीस आले.

लक्ष्मेश्वर परगण्याचा देसाई नेहमीं शिरहट्टीस राहत असल्यामुळें त्यास शिरहट्टीकर म्हणत असत. त्या देसायानें हैदरअल्लीकडे जाऊन त्याची फौज प्रांतांत आणून पटवर्धनांपासून लक्ष्मेश्वर परगणा घेतला होता. परगण्यांतल्या बहुतेक ठाण्यांत त्याचेच लोक होते. त्या ठाण्यांत शिरहट्टी व सावशी हीं दोन फार बळकट ठाणीं असून शिरहट्टींत देसायाचीं मुलेंमाणसें व कारभारी होते. खुद्द देसाई बंकापुरास राहिला होता. लक्ष्मेश्वर परगण्यांत अंमल बसविण्याच्या प्रारंभीं हें शिरहट्टीचें ठाणें घेण्याचा निश्चय करून हरीपंतांचें लष्कर बरोबर घेऊन वर सांगितल्याप्रमाणें परशुरामभाऊ तेथें ता. १९ जुलई रोजीं दाखल झाले. परंतु भाऊंची फौज नवलगुंदकराच्या खंडणीसाठीं मोरबेस तळ देऊन राहिली होती. ती आल्याखेरीज शिरहट्टीस मोर्चे बसविणें हरीपंततात्यांस ठीक वाटलें नाहीं. नवलगुंदकर देसायानें पांसष्ट हजार रूपये खंडणीबद्दल दिले तेव्हां भाऊंची फौज मोरबेहून निघून ता. २९ जुलई या दिवशीं शिरहट्टीस दाखल झाली. ती येतांच हरीपंततात्यांची फौजही तयार होऊन उभय सैन्यांनीं हल्ला करून पेठ घेतली व किल्ल्यास मोर्चे बसवून तोफांची मारगिरी सुरू केली. आंत देसायाचें हजार बाराशें चांगलें लढवाई माणूस होतें तेंही निकरानें किल्ला झुजवीत होतें. सबंध आगस्ट महिना वेढ्याचें काम रेंगाळत चाललें होतें व मधून मधून समेटाचेंही बोलणें सुरू होतें. परंतु किल्लेकऱ्यांस बंकापुराहून अगर

सावशीहून आपणास कुमक येईल ही आशा होती त्यामुळें कसे तरी दिवस घालविण्याकरितां आज एक बोलावें, उद्यां दुसरेंच बोलावें, याप्रमाणें त्यानीं उपक्रम सुरू केला होता. पंचवीस हजार रुपये सालिना उत्पन्नाचा सरंजाम व येळवंतीचें ठाणें देतों, किल्ला स्वाधीन करा, असेंही भाऊनीं बोलणें लाविलें होतें; पण किल्लेकरी कांहीं केल्या ताळ्यावर येईनात. एक महिना किल्ल्याच्यां तटबंदीवर तोफांचा मारा सुरूं होता तरी ती कोठेंही ढांसळली नव्हती. शेवटीं हल्ल्यानें किल्ला घेण्याचा बेत ठरवून भाऊनीं ता० ३१ आगस्ट रोजीं खंदकावर बातेऱ्या होत्या त्यांवर हल्ला केला. परंतु हुजरातचे लोक कोणी मदतीस आले नाहींत व खंदकांतले लोक सावध होते; त्यामुळें हल्ला लागू न होतां शेंपन्नास माणूस जायां जखमी होऊन भाऊंस मागें हटावें लागलें. त्यायोगें त्यांस फारच क्रोध येऊन दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यानीं बातेऱ्यांवर पुनः मोठ्या ईर्षेनें हल्ला केला. " अघाडीस चिरंजीव राजश्री बळवंतरावच होते. मग हुजरात कुमकेस आली. बातेऱ्या घेऊन खंदकांत शिरून दोन अडीचशें माणूस कापून काढिलें. तेथेंच मोर्चा कायम करून दरवाजांस आगी दिल्या व घुरूजही खणावयास लाविलें तेव्हां आंतल्यानीं सांगोन पाठविलें कीं ' आतां आम्हास जीवदान मात्र द्यावें, ' तेव्हां कौल न देतां शिडया लावून हल्ला केला तो सायंकाळच्या दोन घटका दिवसास केला. गांव घेतला. अगोदर दोन अडीचशें माणूस कापून काढिलें. वरकडांचे हातपाय, कान कापले. मग दहा वीस तसेचही सोडून दिले. इतकें होईतों अडीच प्रहर रात्र जाहली. प्रातःकाळपासोन स्नान केलेंच नव्हतें. मग येऊन स्नान केलें. रातौ दिवटया लावून देसाई याच्या बायका तिघी व मूल एक व शिवापा, हिऱ्यापा व सुरेराव वगैरे कारकून, दळवाई, नाइकवडी, तमाम सांपडले. कैदेंत ठेविले आहेत. " याप्रमाणें शिरहट्टी घेतल्याचें हें वर्णन भाऊनीं स्वतःच लिहिलें आहे. हें जबरदस्त ठाणें

होतें तें पडल्यावर लक्ष्मेश्वर परगण्यांतलीं श्रीमंतगड, येळवंती, वड-वट्टी, बालेहसूर, हमगी हीं सर्व ठाणीं ताब्यांत येण्यास उशीर लागला नाहीं. एक सावशीचें ठाणें मात्र राहिलें, तें घेण्यास शिरह-ट्टीहून पटवर्धनांचीं तीन पथकें, रास्ते व सौंडूरकर घोरपडे यांचीं पथकें एवढीच फौज घेऊन भाऊ निघाले व हरीपंत बाकी लष्कर घेऊन खंडणी वसूल करण्याकरितां सावनुराकडे गेले.

जहागिरीच्या परगण्यांत अंमल बसला खरा, परंतु मराठी फौजेच्या लुटालुटीमुळें तो बेचिराख होत चालला होता त्यामुळें त्यांतून कांहीं वसूल येण्याची तादृश आशा परशुरामभाऊंस दिसेना. ते लिहितात " लष्करांत कैद काडीची नाहीं. ' पेंढारी परिच्छिन्न लावून द्यावे तरच कैद राहील. पैकाही मिळेल. नाहीं तर आम्ही या लष्करांत राहणार नाहीं. ' अशी दबावणी घालितों. " याउपर पेंढारी राहिल्यास लुटोनच टाकूं, असेंही म्हणतों. परंतु (पेंढारी) मालोजी घोरपडे वगैरे यांच्या गोटांत आश्रयानें राहिले आहेत. त्यांस सांगोन पाठविल्यास ' पेंढारी यांस निरोप देतों. ठेवून घेत नाहीं. ' असें तोंडानें मात्र हणतात, परंतु घालवीत नाहींत ! काय करावें ! "

पटवधनांचें करकंब हें ठाणें नरसो गोविंद नांवाच्या बंडखो-रानें घेतलें होतें त्याचे पारिपत्यास्तव सरकारांतून तुकोजी होळकरांची योजना झाली होती हें मागें सांगितलेंच आहे. होळकरानीं वेढा घालून ता० २३ जुलई रोजीं हल्ला करून करकंबचें ठाणें घेतलें, नरसो गोविंद याची दाणादाण करून त्याचीं घोडीं, उंटें वगैरे सर्व अजबाब लुटून घेतला व तो पळून जात असतां पाठलाग करून त्यास पकडून कैद केलें. हें सर्व ठीक झालें. पण आतां होळकरांच्या ताब्यांत गेलेलें हें ठाणें धडपणें पटवर्धनांच्या हातीं पुनः लागणें कठिण दिसूं लागलें ! होळकरानीं तेथें पटवर्धनांच्या पागेचीं घोडीं

होतीं तीं लांबविलीं, गांव लुटला, परगण्यांतले गांवोगांवचे पाटील धरून आणून वसूल घेतला, इतकेंच नव्हे; तर या प्रांतीं बंडखोरांचा उपद्रव फार असल्यामुळें पटवर्धनांच्यानें करकंबचें ठाणें राखवत नाहीं म्हणून आम्हींच त्याचा बंदोबस्त केला आहे, असें त्यानीं पुणें दरबारास बिनदिक्कत लिहून पाठविलें ! पटवर्धनांच्या हवालीं ठाणें करण्याविषयीं व तेथली त्यांची व रयतेची मालमत्ता घेतली असेल ती परत देण्याविषयीं कारभाऱ्यांनीं होळकरांकडे सरकारचे हुजरे व रागें भरून लिहिलेलीं पत्रें तीन तीन वेळां पाठविलीं तरी ते मुळीं त्याची दादच घेतना ! रहिमतपुरास महादजी शिंदे छावणीस राहिले होते त्यांचीही आवाडाव अशाच प्रकारची तेथें चालली होती. तेथें पंत-प्रतिनिधी व नाना फडनवीस यांचीं कुरणें होतीं त्यांतले कुरण्ये हांकून देऊन त्यानीं आपलीं घोडीं त्यांत खुशाल चारणीस घातलीं ! गांवचा शिवार चारणें, रयतेची वैरणकाडी व धान्य लुटून घेणें, उदमी लोकां-पासून जबरीनें माल घेणें, नसत्या पंचाइती उकरून काढून लोकांवर मसाले करणें व दंड घेणें वगैरे नाना प्रकारचे उपसर्ग त्यांज-पासून होऊं लागल्यामुळें रहिमतपूर अगदीं ओस पडण्याच्या बेतास आलें ! तो गांव पटवर्धनांच्या सरंजामांतला असल्यामुळें त्यानीं अनेक प्रकारें अनेक वेळां कारभाऱ्यांचीं पत्रें शिंद्यांस आणून लाविलीं तथापि त्यानीं आरंभिलेला उपक्रम सोडिला नाहीं ! यासंबंधें शिवाजी-पंत म्हैसकर लिहितो, " श्रीमंत रावसाहेब लहान आहेत म्हणून अशा गोष्टी आहेत ! सरकारचा दाब कमी जाला आहे. शिंदे कागदीं-पत्रीं नीटच लिहितात आणि लबाड्यांं करावयास चुकत नाहींत ! होळ-करही सरकारांत पत्रें चांगलींच लिहितात आणि (करकंबच्या) ठाण्याची अवस्था या प्रकारची आरंभिली आहे ! श्रीमंत पारिपत्य करितील हें ध्यानांत असतें तर लबाड्या कां करिते ! वरचेवर पत्रें

कां पाठवावीं लागतीं ? सरकारचा दाब उणा पडला म्हणोन असें होतें ! " सरकारचा दाब कमी होणें हें राष्ट्रावर परचक्राइतकेंच भयंकर संकट आहे हें त्या काळच्या लोकांच्या प्रत्ययास पदोपदीं येत होतें. हल्लीं त्याची जाणीव बुजून गेली आहे तरी तें पूर्वीप्रमाणेंच आतांही अगदीं खरें आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. असो. होळकर कांहीं केल्या करकंब सोडीत नाहींतसें पाहून फारच रागें भरून सखाराम बापू व नाना फडनवीस यानीं होळकरांच्या वकिलास बोलावून आणून ताकीद दिली कीं, " नरसिंगराव यानें ठाणें घेतलें परंतु गांवास उपद्रव नव्हता. तुह्मीं सरकारचे सेवक असतां गांव लुटिला, ठाणें देत नाहीं, येणेंकरून फजीत पावाल ! " इतकी ताकीद देऊन त्यानीं होळकरांचीं दरबारांत कामें चालू होतीं तीं चार आठ दिवस अगदीं बंद पाडिलीं. वकिलानें हा झालेला प्रकार होळकरांस लिहून कळविला तेव्हां कोठें करकंब सोडून जाण्याचें त्यांच्या मर्जीस आलें ! ते तेथून पंढरपुरास जाऊन देवदर्शन करून आगस्टाच्या अखेरीस जेजुरीस आले.

मराठ्यांशीं गव्हर्नर जनरल वारन हेस्टिंग्स् यानें पुरंदरचा तह ठरविल्यामुळें मुंबई सरकार फिक्कें पडून पूर्वी इतक्या अभिमानानें धरिलेला दादासाहेबांचा पक्ष त्यास आतां सोडावा लागला. तथापि त्या सरकारानें वारन हेस्टिंग्स् याविरुद्ध कोर्ट आफ् डायरेक्टर्स् यांजकडे विलायतेस तकरार केली होती व तेथें आपलें ह्मणणें पसंत पडून पुरंदरचा तह अजूनही रद्द होईल अशी त्यास आशा होती. पुरंदरच्या तहांत मुंबई सरकारानें दादासाहेबांस आश्रय देऊन ठेवून घेऊं नये असें कलम असतांही त्यानीं त्यांस मुंबईंत ठेवून घेतलेंच होतें. श्रीमंतांस ठेवून घेतल्याबद्दल पुणें दरबारानें वारंवार तक्रार केल्यावरून वारन् हेस्टिंग्स् यानीं मुंबई सरकारचा निषेध केला. दादासाहेबांच्या

खर्चाची व राहण्याची यथायोग्य सोय करून द्याल तर ते मुंबई सोडून तुम्हाकडे यावयास कबूल होतील असें मुंबई सरकारचा वकील मि० मॉस्टिन् हा पुणें दरबारास सांगत होता. पण ती यथायोग्य सोय कोणची हाच वाद मुळीं संपेना ! कारभाऱ्यांच्या मतें श्रीमंतांस पांच सात लाखांची जहागीर बस्स झाली. श्रीमंतांच्या मतें आपणास पंधरा वीस लाखांची निदान पाहिजे. अशी स्थिति असल्यामुळें मॉस्टिन् याच्या खटपटीस कांहींच यश आलें नाहीं. मुंबईकरानीं विलायतेस अपील केल्याची बातमी पुणें दरबारास लागली असल्यामुळें तें दरबार मुंबईकरांविषयीं साशंक होतें आणि फ्रेंच वकील पुण्यास आला होता त्याच्याद्वारें पुणें दरबारानें फ्रेंच लोकांशीं कांहीं गुप्त राजकारण केलें असल्याचा संशय आल्यावरून दरबाराविषयीं मुंबई सरकारचेंही मन फार क्षुब्ध झालें होतें. कारभाऱ्यानीं रेवदंडा बंदर फ्रेंचांस दिलें व त्या लोकांचें एक लढाऊ जहाज देखील त्या बंदरांत आलें अशी त्या वेळीं सर्व महाराष्ट्रांत जर दाट वदंता पसरली होती तर ती इंग्रजांच्या घरीं गेली असल्यास काय नवल आहे ? त्यांतली खरी गोष्ट शिवाजीपंतांनीं लिहिली आहे ती एवढीच कीं, रेवदंडयास फक्त वखारीस जागा देण्याबद्दल मात्र वकिलाचें कारभाऱ्यांशीं बोलणें निघालें होतें. पण शेवटीं कारभाऱ्यानीं तें देखील कबूल केलें नाहीं. फ्रेंच वकील पुण्यास आल्याबद्दल मुंबईवाले कलकत्त्यास कांहीं वेडेंवाकडें लिहून पाठवितील याकरितां कारभाऱ्यानीं वारन् हेस्तिंग्स यांस लिहिलें कीं, " तुमचा तह जाला तो प्रमाण आहे. (आमचें हें) दरबार आहे; चार सुष्टदुष्टांचे वकील येत असतात ते हेही आले आहेत. याजविषयीं संशय धरूं नये. " मि. मॉस्टिन यास निरोप देतेवेळीं त्यानें कारभाऱ्यांस बजाविलें कीं, पुरंदरच्या तहाप्रमाणें आम्ही वर्तत जाऊं. त्यांत गुंता नाहीं. परंतु तुम्ही फ्रेंचांचा वकील येथें

ठेऊन घेतला आहे ह्यामुळें विलायतेस संशय उत्पन्न होऊन काय लढा पडेल हें सांगवत नाहीं. याकरितां त्यास निरोप द्यावा हें उत्तम. तेव्हां कारभाऱ्यानीं "पहातां प्रकार फरांचिसाकडील उपयोगही दिसेना, याजकारितां 'ठरावाप्रमाणें तुम्ही वर्तावें' येणेंप्रमाणें मुंबई-वाल्यांशीं बोलून चालून निरोप दिला. फरांचिसाकडील वकील आहेत त्यासही निरोप देणार." परंतु फरांचिसाच्या वकिलास त्या वेळीं व पुढें पुष्कळ महिनेपर्यंत कारभाऱ्यानीं निरोप दिला नाहीं व त्यामुळें मुंबईकरांचा वकीलही पुणें सोडून गेला नाहीं. याउपर मुंबईसरकारच्या वर्तनाबद्दल कारभाऱ्यांस पक्का संशय येऊन ते त्याजविषयीं सावध-गिरीनें वागूं लागले. "मुंबईवाल्यांच्या चित्तांत लबाडी पुरतेपणें आहे. श्रीमंत तो त्याजवळ आहेतच. कोणे समयीं काय करितील हा भरंवसा पुरत नाहीं." असें समजून त्यानीं करवीरच्या मोहिमेवरून परत आलेले रामचंद्र गणेश यांस तीन चार हजार फौजेसह मुंबईच्या वाटे-वर तळेगांव येथें जाऊन राहण्याचा हुकूम केला व आनंदराव गोपाळ यांचें पथक यांच्या कुमकेस नेमिलें.

ता० १२ जुलई रोजीं गंगाबाई नवज्वराच्या दुखण्यानें पुरंदर मुक्कामीं वारली. त्या वेळीं सवाईमाधवराव पेशवे यांचें वय सारें सव्वा तीन वर्षांचें होतें. त्यांचें संगोपन करण्याचें काम आतां सदाशिवराव भाऊसाहेबांची पत्नी पार्वतीबाई हिजवर पडलें. ती आजारी होती व पुरंदरची थंड हवा तीस सोसण्याजोगी नव्हती तरी तिला आतां पुणें सोडून पुरंदरावर जाऊन राहणें भाग पडलें. गंगाबाईनें मरतेवेळीं राम-चंद्र नाईक परांजपे व त्यांचा पुत्र यानीं तोतयाचें बंड उत्पन्न करून तें फैलावण्याचा गुन्हा केला होता तो कारभाऱ्यांकडून माफ करवून त्यांस कैदेंतून मुक्त करविलें.

मोरोबादादाची समजूत घालण्याचें काम या वर्षीं कारभाऱ्यांस फार महत्वाचें होऊन बसलें होतें व तें सबंध दीड वर्ष चाललेंच होतें.

सन १७७३ त बारभाईंच्या कारस्थानाचा उद्भव झाला तेव्हां मोरोबा हा कारभाऱ्यांच्या गणनेंत नव्हता. त्यानें कांहीं फितूर केल्याचें उमगलें तरी तो त्यांस उपेक्ष्य वाटला. ७५ त तसाच कांहीं प्रकार पुनः दृष्टीस पडला तेव्हां त्यानें माफी मागितली ती देण्यांत येऊन त्यास पुनः असें न करण्याबद्दल सक्त ताकीद देण्यांत आली. ७६।७७ त पहावें तों मोरोबाचा बडेजाव फारच वाढलेला होता. तो अजून कारभाऱ्यांस शिरजोरपणाचे जाबसाल सांगत नव्हता तरी तुह्मी मला कारभारांत घ्यावें व आपल्या बरोबरीनें अधिकार द्यावे असें त्याचें त्यांशीं बोलणें सुरू होतें व कसें तरी करून त्याची समजूत घालण्याचें कारभाऱ्यांस अगत्य वाटूं लागलें होतें ! याचें कारण असें कीं, दादासाहेबांच्या पक्षाचे जितक लोक राज्यांत होते त्या सर्वांचा पुढारी आतां मोरोबादादा बनला असून इंग्रज, दादासाहेब व हैदरअल्ली या सर्वांशीं त्याचा गुप्तपणें पत्रव्यवहार सुरू होता. या गोष्टी आतां कारभाऱ्यांस कळल्या होत्या. याकरितां ते त्यास आपणांत मिळवून घेण्यास तयार झाले. मग असें ठरलें कीं, पेशवाईचे जसे सखाराम बापू व नाना फडनवीस हे कारभारी आहेत त्याचप्रमाणें मोरोबादादा हेही तिसरे कारभारी असावे आणि या नव्या कारभाऱ्यानीं फौजेचा कारभार पहावा. हें बोलणें मोरोबानें मान्य केल्यावर त्याचा हात पक्केपणें आपल्या कारभारांत गुंतावा व त्यानें आपणास सोडून प्रतिपक्षाकडे कधीं जाऊं नये, अशा मतलबानें कारभाऱ्यानीं त्याशीं बोलणें लाविलें कीं, " (बारभाईंचा) मनसबा प्राप्त जाल्यापासून (आह्मी) उभयतांहीं हातचें पदरचें भरीस घातलें. (सरकारास) कर्ज मेळवून दिलें. आतां आमची पत राहिली नाहीं. तुह्मीं असुदे आहां. (तुमची) पत आहे. फौजेची उस्तवारी होयसें करावें. " परंतु त्यांचा हा डाव ओळखून मोरोबानें पैका कर्ज देण्याचें साफ नाकारिलें !

श. १६९९ **धारवाडप्रांतीं छावणी** इ. स. १७७७

मराठ्यांच्या फौजा शिरहट्टीस वेढा घालून बसल्या होत्या. त्या आधींच तुंगभद्रेपलीकडे हैदरअल्लीनें चित्रदुर्गास वेढा घातला होता. कडपें, कर्नूळ, अदवानी, बल्लारी, गुत्ती, रायदुर्ग चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी, हीं आठ संस्थानें माधवराव पेशवे वारले तेव्हां तुंगभद्रेपलीकडच्या मुलखांत नांदत होतीं, व गुत्तीखेरीज हीं सर्व संस्थानें मराठयांस खंडणी देणारीं होतीं व गुत्ती तर मराठयांचीच होती. यांपैकीं कडपें व कर्नूळ येथील पठाण नबाब हे निजामअल्लीच्या ताब्यांतले होते व अदवानीचा नबाब तर खुद्द निजामअल्लीचा भाऊच होता. यामुळें या तीन संस्थानांस हैदरअल्लीचा विशेष उपद्रव नव्हता. बाकीच्या संस्थानांपैकीं बल्लारी, गुत्ती व रायदुर्ग हीं तीन संस्थानें गेल्या तीन वर्षांत हैदरअल्लीनें समूळ बुडविलीं होतीं. राहतां राहिलीं चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी हीं दोन संस्थानें. त्यांचाही नायनाट करून टाकण्याचा पक्का निश्चय करून हैदरअल्ली या खेपेस आला होता. चित्रदुर्गकर संस्थानिकास ही बातमी कळली असल्यामुळें त्यानें आपला कारभारी पुरुषोत्तम तमाजी यास हरीपंततात्यांकडे कुमक मागण्यासाठीं पाठविलें. मराठ्यांची सेना तुंगभद्रेवर आली आहे त्याअर्थीं आतां हैदराच्यानें आपलें कांहीं नुकसान होत नाहीं असें त्या संस्थानिकास वाटत होतें. परंतु फौजेच्या दंग्यामुळें हरीपंततात्या परत फिरून स्वदेशाकडे कूच करून चालले व त्याच सुमारास हैदरअल्ली प्रचंड सैन्यासह येऊन चित्रदुर्गास वेढा देऊन बसला. त्या वेळीं तो संस्थानिक फारच घाबरून गेला व शत्रु म्हणेल तें कबूल करण्यास तयार झाला. हैदरअल्लीनें चवदा लक्ष होन खंडणी मागितली व शिवाय आपल्या फौजेसह संस्थानिकानें स्वतः आमच्या चाकरीस यावें अशी शर्त घातली. ती शर्त कांहीं तादृश कठिण नव्हती. खंडणी देणेंच काय तें दुरापास्त होतें. कारण कीं दुर्गी

होनाचा भाव तीन रुपये चारआण्यांपेक्षां केव्हांही कमी नव्हता. तेव्हां चवदा लक्ष होन ह्मणजे साडेपंचेचाळीस लक्ष रुपये त्या गरीब संस्थानिकानें कोठून द्यावे ? तथापि त्यानें वेळ मारून नेण्यासाठीं (बहुधा हप्तेबंदीनें) तेसुद्धां देण्याचें कबूल केलें व जवळचें सोनेंरुपें जवाहीर खंडणीच्या भरतीस घातलें. परंतु जिनसाची किंमत संस्थानिकानें दुप्पट सांगावी तर हैदरानें निमपट धरावी असें होऊं लागलें. इतक्यांत हरीपंत व परशुराम-भाऊ देशास परत न जातां तुंगभद्रेपलीकडे लक्ष्मेश्वर परगण्यांत छावणीस रा हिले आहेत अशी चित्रदुर्गकरास बातमी लागली. तुंग-भद्रेचें पाणी ओसरतांच ते आपल्यास मदत करून संकटांतून मुक्त करितील अशी त्यास आशा उत्पन्न झाली, व त्यानें हैदरास खंडणी देण्याचें मुळींच नाकारिलें ! तेव्हां अर्थांतच उभयपक्षीं निकराचें युद्ध सुरू झालें. हैदरानें चित्रदुर्गास मोर्चेबंदी करून रात्रंदिवस तो-फांचा भडिमार सुरू केला. तेव्हां एके रात्रीस किल्लेकरी आवेशानें बाहेर पडून शत्रूचे मोर्चे उधळून देऊन चार पांच हजार माणूस जखमी व ठार करून परत गेले. या पराभवामुळें न कचकरतां हैदरानें पुनः मोर्चेबंदी केली. तरी किल्लेकरीही पूर्वीप्रमाणेंच हिमतीनें हमेशा बाहेर पडून मोर्च्यांवर चालून येऊन युद्ध करीत होते.

या वेळीं हैदरअल्लीचे वकील पुण्यास लक्ष्मणराव रास्ते यांच्या विद्यमानें कारभाऱ्यांशीं तहाचें बोलणें करीत होते. त्यांचें म्हणणें कीं, तुमच्या आमच्या राज्याची तुंगभद्रा नदी ही हद्द असावी. पलीकडे तुम्ही येऊं नये व अलीकडे आम्ही येऊं नये. तीन सालांची खंडणी व मागील बाकी तुमची सर्व देतों. शिवाय सावशीच्या लढाईंत पाडाव झालेले पांडुरंगराव वगैरे सर्व सरदार सोडतों. मुरारराव घोरपड्यांस सोडावें तर त्यांचा आमचा शीवशेजार असल्यामुळें त्यापासून आम्हास-उपद्रव होईल; याकरितां त्यास मात्र आम्ही सोडणार नाहीं. कारभा-ऱ्यांचें म्हणणें कीं, तुम्ही तिसालां खंडणी व मागील बाकी द्यावी.

मुरारराव‍ासुद्धां सर्व कैदी सोडावे व तुंगभद्रेपलीकडचा तुम्ही घेतलेला सर्व मुलूख परत द्यावा. हें त्यांचें म्हणणें हैदरास कबूल न झाल्यामुळें तहाचें बोलणें तितकेंच राहिलें.

हरीपंतांची फौज छावणीस राहतेवेळीं तिला कारभाऱ्यांनीं चार महिनेपर्यंत दरमहा तीन लक्ष रुपये रोजमुऱ्याबद्दल देण्याचें अभिवचन दिलें होतें, पण वेळच्यावेळीं तेवढीसुद्धां रकम त्यांच्यानें देववेना; आणि फौजेस तर रोजमुरा वेळच्यावेळीं मिळावा व नालबंदीच्या मार्गील बाकीपैकींही कांहीं थोडेंबहुत मिळत जावें, अशी इच्छा असल्यामुळें तिचा गवगवा बंद होईना. हा गवगवा मोडण्यासाठीं हल्लीं कारभाऱ्यांनीं असें ठरविलें कीं, सावकारांच्या मागील देण्या, पैकीं थोडाथोडा ऐवज त्यांच्या पदरीं घालून त्यांस लष्करास रवाना करावें. त्या सावकारांनीं प्रत्येक पथकाच्या रोजमुऱ्यास कमींत कमी रकम लागेल ती ठरवून घेऊन त्याप्रमाणें दरमहा देत जावी. पण यांत काय झालें ? दगडापेक्षां वीट मऊ इतकाच प्रकार झाला ! कारभाऱ्यांनीं आजच हात आंखडला तर सावकार चार दिवस मागून आंखडणार इतकेंच ! कारण कारभाऱ्यांकडून मिळेल व पुढें लवकरच मिळण्याजोगा असेल तेवढाच ऐवज सावकार देणार ! मिळून फौजेचा गवगवा कायमच ! इतकें असून शेवटीं सावकार त्यावेळीं लष्करास गेले नाहींत ते नाहींतच ! मग कारभाऱ्यांनीं दसऱ्याकरितां लाख रुपयांचें कापड लष्करास रवाना करून हरीपंतांस लिहिलें कीं, तूर्त आम्ही रोजमुऱ्याचा ऐवज तुम्हाकडे कांहींच पाठवीत नाहीं. तुम्हीं सावनूर वगैरे संस्थानांपासून काय खंडणी मिळेल तीवर पोट भरावें व आर्बा व खमस या दोन सालच्या नालबंदीबद्दल आम्हांवर वीस लक्षांच्या वराता कराव्या. वरातींत मुदत लिहाल त्याप्रमाणें ऐवज पोंचता होत जाईल. त्याप्रमाणें वराता लष्करांतून कारभाऱ्यांवर होऊं लागल्या व तेही त्याप्रमाणें मुदतशीर पैका देऊं लागले.

शिरहट्टीहून कूच करून भाऊ सावशीस आले. तेथें त्यांचा सुमारें तीन आठवडे मुक्काम होता. त्या अवधींत सावशी व मिश्रीकोट हीं दोन्ही ठाणीं लढाई न करितांच स्वाधीन झालीं. एक जुन्या हुबळींचें ठाणें मात्र घ्यावयाचें राहिलें त्यासही मोर्चेबंदी करण्याचा विचार सुरू होता. इतक्यांत शत्रूकडील बातमीचा म्हार सांपडला त्यास मार देतां तो सांगूं लागला कीं, येथून चार मजलींवर मीर रेजा व टिपू सुलतान बल्लारी तालुक्यांत आले आहेत ! याच सुमारास परशुरामभाऊंस दुसरी बातमी लागली कीं, चित्रदुर्गवाल्याचा व हैदराचा तह होऊन हैदरानें तेथील मोर्चे उठविले व तुंगभद्रेच्या रोखें सर्व सैन्यासह कूच केलें. त्या वेळीं यद्यपि तुंगभद्रेस उतार नसल्यामुळें शत्रु अलीकडे येण्याचें तादृश भय नव्हतें; तथापि एकंदरींत विचार पहातां सावनूरची खंडणी झाल्याशिवाय दुसऱ्या कामास गुंतून पडणें सांप्रत योग्य नाहीं, नदीचें पाणी उतरून शत्रूस अलीकडे येण्यास वाव सांपडण्यापूर्वी खंडणी वसूल केली पाहिजे, असा विचार करून भाऊ सावनुराकडे गेले. तिकडे जाण्यापूर्वी त्यांनीं धारवाड व कोपळ या दोन सुभ्यांच्या मामलती रामचंद्रपंत हुपरीकर यांच्या गळ्यांत बांधून त्यांजपासून साडेचार लक्ष रुपये रसद म्हणून घेतली.

हरीपंततात्या यापूर्वीच सावनुरास फौजेसह जाऊन बसले होते. त्या संस्थानाच्या पोटांत हावनूरची देसगत होती तेथील वसुलास पांच हजार स्वारांची टोळी घेऊन विसाजीपंत आठवले गेले होते. परशुरामभाऊ तेथें गेल्यापासून खंडणीचें बोलणें नेटास लागलें व हावनूरसुद्धां सावनूरची खंडणी तीन लक्ष पंधरा हजार रुपये करार होऊन त्याप्रमाणें नक्त वसूलही त्याच वेळीं झाला. सावनुराजवळ फौजांचा तळ असतां पंधरा दिवस पावसाची संतत धार एकसारखी सुरू होती. आधींच पैक्याची पराकाष्ठेची टंचाई असल्यामुळें फौजेस अर्धपोटीं किंबहुना उपाशीं सुद्धां केव्हां केव्हां रहावें लागे. त्यांतून हा

पर्जन्याचा उपद्रव. मग हाल काय विचारावयाचे आहेत ! खुद्द भाऊंचें तापत्रय या दिवसांत कसें होत होतें त्याचें वर्णन त्यांच्या दोन तीन पत्रांत आलें आहे. " कचेरीचा डेरा व मुदबखाची व देवपजेची व जामदारखान्याची राहुटी अगदीं उभी करावयाचे कामांतून गेली. टाकून दिली. फक्त मैदानांत स्वयंपाक व जेवण होत असतें. पर्जन्याची अतिवृष्टि. एक राहुटी राजश्री हरीपंतांनीं दिली आहे तेवढ्यावर सर्व गुजराण करितों. मोठे विपत्य होतात. " ही जर मुख्य सरदाराची दशा तर गरीब सैनिकांची काय अवस्था असेल !

मराठी फौजा सावनुराजवळ राहिल्या तेव्हां चित्रदुर्गकराशीं कसा तरी समेट करून तेथील मोर्चे उठवून हैदरअल्ली तुंगभद्रेच्या पैलतीरीं हरिहरापासून पांच कोसांवर येऊन राहिला. पलीकडच्या घांटा घांटास चौक्या बसवून इकडील माणूस तिकडे न फिरके अशी त्यानें तजवीज केली होती. नदी दुथडा भरून चालली असल्यामुळें दोन्ही सेना पाणी ओसरण्याची वाट पहात स्वस्थ बसून होत्या. परशुरामभाऊंच्या मनांत कित्तुराकडे जाऊन तेथील देसायापासून खंडणी घ्यावी व जातां जातां जुनी हुबळी काबीज करावी असें होतें. पण आपण दूर जावें तर शत्रूची किरकोळ फौज अलीकडे उतरून सावनूर संस्थानास उपद्रव देईल ही अडचण होती. शिवाय आणखी एक अडचण अशी होती कीं, हैदरानें समेट करून मोर्चे उठविले असतांही चित्रदुर्गकर संस्थानिकानें केवळ मराठी फौजा सावनुराजवळ आल्या या भिस्तीवर शत्रूशीं ठरलेला तह हा दुसऱ्यानदां मोडला होता. त्यानें हरीपंत व परशुराभाऊ यांस पत्र पाठविलें कीं, तुमच्या भरंवशावर मी शत्रूशीं केलेला तह मोडला. आतां तुह्मीं दूर गेलांत तर शत्रु येऊन पुनः चित्रदुर्गास मोर्चे बसवील. याकरितां तुह्मी दुसरीकडे न जातां नदी उतरून समोर आम्हांकडे यावें. आह्मी

तुमचा स्वारीखर्च देऊं व आमच्या सर्व फौजेसह तुम्हास सामील होऊं. मोहिमेचे दिवस आतां जवळ जवळ येत चालले असल्यामुळें किरकोळ कामांत गुंतण्यास अवसर नव्हता. मोहिमेकरितां निजाम-अल्ली डेरेदाखल झाले होते व धौशानेंही आपला तळ हालविला होता. निजामअल्लीनीं हरीपंतांस पत्र पाठविलें होतें कीं, " गुदस्ताप्रमाणें बजबज होऊं नये. दुसरी फौज (पुण्याहून भरतीस) आणवावी, व खर्चाची बेगमी करावी. गवगवा असों नये. असें असल्यास आम्ही येतों. हैदरखानाचें पारिपत्य उभयतां मिळून करूं. मुलूख सुटेल व खंडणी येईल ती निमेनिम घ्यावी याप्रमाणें पुरंदराहूनच ठरलेलें आहे. " याप्रमाणें निजामअल्लीनें गुदस्ताप्रमाणें बजबज होऊं नये म्हणून स्पष्ट इशारा दिला असतांही त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं !

मराठी फौजेची उपासमार चालली होती म्हणून तींत फितूर करण्यास दादासाहेबांचे सरदार आबाजी महादेव व तुळ्या पवार यांस सहजच अवसर सांपडला. ते दोघे मराठी फौजेच्या छावणी-जवळच बंकापुर नांवाचा बळकट किल्ला हैदराच्या ताब्यांत होता तेथें राहून त्या फौजेंतील शिलेदारांशीं राजकारणें खेळविण्यांत व त्यांस पैका देऊन वश करण्यांत गुंतले होते. त्यांचा फितर फौजेंत दोन तीन वळां हरीपंतांस उमगला, तेव्हां त्यांनीं फितुरी लोकांस धरून त्यांस कडक शासन केलें. परंतु आपले फौजेंत फितूर किती झाला आहे याचा त्यांस त्या वेळीं पक्का अंदाज झाला नाहीं. पोटास वेळचेवेळेवर मिळत जातें तर बहुधा फौजेंत फितूर झालाच नसता. फौजेच्या पोटास किती मिळावयास पाहिजे होतें व सरकारांतून काय मिळालें त्याच्या यादी वगैरे साधनें आह्मांपाशीं जरी नाहींत तरी कांहींशी अंदाज करण्यास जागा आहे व त्यावरून देखील फौजेची फारच वाईट स्थिति होती हेंच दिसून येतें. पुढें एका ठिकाणीं परशुराम-

भाऊंनीं लिहिलें आहे त्यावरून या मोहिमेंत तीसपासून पंस्तीस हजार मराठी फौज गुंतली होती असें कळतें. इतकी ही भाऊंची व हरीपंतांचीं मिळून सर्व फौज छावणीस होती. यांत अर्ध्याहून अधिक लोक जरी सरंजामी सरदारांचे होते तरी मागें लिहिल्याप्रमाणें बहुतेक सरंजाम कर्जानें आगाऊच ग्रासलेले असल्यामुळें त्यांतून रोजमुऱ्यास पैका मिळण्याचें नांवच घ्यावयास नको होतें. आतां पसतीस हजार स्वारांचा सरसकट नुसता रोजमुरा दरस्वारास दरमहा वीस रूपये धरला तर सातलक्ष म्हणजे छावणीच्या चार महिन्यांचे अठ्ठावीस लक्ष रूपये होतात ! आतां परशुरामभाऊ व हरीपंत एकत्र मिळाल्यापासून त्यांस आदा काय झाला याचे या प्रकरणांत छापलेल्या पत्रांतून उल्लेख आले आहेत त्यावरून हिशेब करूं. कारभाऱ्यांकडून पुण्याहून आले दोन लक्ष, भाऊंनीं कर्ज काढून पुरविले ते चार लक्ष, धारवाड व कोपळ तालुक्यांची रसद साडेचार लक्ष, नवलगुंदची खंडणी पांसष्ट हजार, सावनूरची तीन लक्ष पंधरा हजार मिळून एकंदर बेरीज सारी चौदा लक्ष तीस हजार रूपये होते ! यांत पायदळ व तोफखाना स्वारीबराबर होता त्याचा हिशेब धरिलाच नाहीं आणि बुणगें, पेंढार व अठरा कारखाने बरोबर होते त्यांचाही हिशेब धरिला नाहीं ! तो धरिला तर चारमाही खर्च आणखी बारा लक्ष रूपये सहज वाढतील. चाळीस लक्षांच्या खर्चास चौदा लक्ष आदा ! पुनः यांत चालू सालच्या नालबंदीचें नांव नाहीं तें नाहींच ! ती नालबंदी कोणास कांहीं द्यावी लागली असल्यास व मागील बाकी कांहीं दिली असल्यास अधिकच तारांबळ ! अशी दुर्दशा असल्यामुळें व आतां तुंगभद्रेअलीकडे राहून कोठून कांहीं खंडणी वगैरे उकळावयाचें राहिलें नसल्यामुळें नदी उतरून शत्रूच्या मुलखांत जाऊन भरेल त्या रीतीनें फौजेचें पोट भरणें परशुरामभाऊ व हरीपंत यांस भाग पडलें होतें. यामुळें त्याच विचारास ते आधीं प्रवृत्त झाले.

प्रथम मसलत मुष्टुराकडे जावें व धौशास मिळवून घेऊन नंतर तेथेंच नदीपार व्हावें, अशी ठरून सावनुराहून लष्कराचें कूचही झालें होतें. परंतु इतक्यांत जवळच गलगनाथाजवळ नदीस उतार झाल्याचें समजलें, तेव्हां मुष्टुराकडे जाऊन धौशाची वाट पहात बसावें तर तो कधीं येतो कोणास ठाऊक, तेथपर्यंत फौजेच्या पोटास काय द्यावें असा विचार करून भाऊ व हरीपंत यानीं गलगनाथाजवळच तुंगभद्रा उतरण्याचा बेत ठरविला. तुह्मी मुष्टुराकडे जाल तर तुम्हास कांहीं पैका देण्याची सोय आमच्यानें होणार नाहीं. परंतु गलगनाथाजवळ नदी उतरत असलां तर पहिल्याच मुक्कामास सव्वा लक्ष होन तुमच्या पदरांत घालतों व पुढें चित्रदुर्गास पोंचाल तेव्हां आणखी पैका देऊन शिवाय तुम्हास फौजसुद्धां सामील होतों असें चित्रदुर्गकरानें खात्रीनें सांगितल्यावरूनच हा अकस्मात् गलगनायाजवळ नदीपार होण्याचा बेत ठरला होता. मोहिमेवर असलेल्या फौजेस वक्तशीर पोटास न मिळेल तर तिचे हातून कांहीं काम होणार नाहीं हें कारभाऱ्यांस कळत नव्हतेंसें नाहीं. जेव्हां जेव्हां त्यांचा हात चालला तेव्हां तेव्हां लष्करास पैका रवाना करण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं. नोवेंबर-अखेरपर्यंत हरीपंतांनीं फौजेच्या मागील बाकीबद्दल पुण्यास कारभाऱ्यांवर एकंदर साडेबावीस लक्षांच्या वराता केल्या होत्या त्यांपैकीं दहा लक्षांचा भरणा करण्याची तजवीज त्यांनीं केली होती व बाकी रकमेचाही निकाल काढण्यांत ते गुंतले होते. शिवाय फौज आतां मोहिमेवर निघणार तों आयत्यावेळीं त्यांनीं रोजमुरा वांटण्याकरितां सावकारांमार्फत लष्करास साडेचार लक्ष रुपये पाठविले होते.

नं. २१४३. श्री. (आषाढ शु० १०–१५ जुलई.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ ९ जमादिलाखर मुक्काम सनेवाडी तालुके नवलगुंद जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्ही छ २८ जमादिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं छ २ जमादिलाखरीं होंगलचे मुक्कामीं पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. वऱ्हाडी आपापल्या घरास सुखरूप जाऊन पोंहचल्याचें लिहिलें तें कळलें. अलीकडे कोणतीं ठाणीं घेतलीं म्हणोन लिहिलें, त्यास हुबळी घेतल्यावर बेटगिऱ्यास येऊन बेटगिऱ्यांत ठाणें पडल्याचें वृत्त लिहिलें आहे. " होळकेराजवळ[1] आमचा जमाव तीनशें स्वार व पांचशें प्यादे नेहमीं असावे असें तीर्थस्वरूप राजश्री बापूंस लिहिलें आहे. दारूगोळा पुरवावा लागतो, त्यास ' दारूगोळीचा मक्ता बोलून पहावें. मक्ता कबूल न करीत त्यापक्षीं दारूगोळी द्यावी व मोर्चास बिगारी खोरीं कुदळी वगैरे साहित्य द्यावें ' म्हणोन लिहोन पाठविलें. " म्हणोन लिहिलें, उत्तम केलें. दारूगोळीचा मक्ता त्यांनीं कबूल केल्यास दहा पांचें[3] आरतें परतें उरकावें. मक्ता अनुकूल न पडे त्यांस त्यापक्षीं दारूगोळी पुरवावी लागेल. " भोशांजवळ होळकरानीं[2] आमचा जमाव चौकीस ठेविला असतां गांवकरानीं बातमी त्यांस[4] कळवून रात्रौ छापा आणिला. ते सावध होते. बरीच झटापट झाली. त्यांजकडील दोन घोडीं व माणसें ठार झालीं. आम्हांकडीलही पांच सात माणूस जायां जखमी झालें. भोसेकर फितव्यांत याजमुळें तेथें जमाव ठेविला नाहीं. माघारा होळकराचे लष्करांत आणविला. " म्हणोन लिहिलें तें कळलें. सांप्रत होळकर कोठें आहेत, ठाणेंतील जमावाचा दबाव कसा आहे, तोफा

---

१ करकंबचें ठाणें पटवर्धनांपासून बंडवाल्यांनीं घेतलें होतें तें त्यांस परत घेऊन देण्याच्या मसलतीस गुंतलेल्या तुकोजी होळकरांजवळ. २ होळकरांनीं.

३ दहा पांच हजार. ४ बंडवाल्यांस.

येऊन पोंचल्या किंवा नाहीं, हें सविस्तर लिहावें. उमरजकर तेलियाचे दरवडे मंगळवेढें प्रांतावर पडतात म्हणोन लिहिलें तें कळलें. चहंकडून शिलशिला लागला आहे. काय करावें ! कधीं सुबत्ता होईल कळत नाहीं. " मंत्र्यांकडील ऐवज दामाशाईप्रमाणें पावता जिकडील तिकडे करितों " म्हणोन लिहिलें, उत्तम. केसो बाबाजी म्हैसकर यांजकडे सरदेसकतीबद्दल तफावतीचा ऐवज येणें, त्यास मशारनिल्हेपासोन ऐवजाचे कागद दोन लिहोन घेतले त्यांच्या नकला पाठविल्या त्या पावल्या. त्यांच्या नकला करून मशारनिल्हेस पत्र ऐवजाविशीं लिहोन स्वार व कारकून त्याजकडे पाठविले आहेत. अद्याप उत्तर आलें नाहीं. निकड करून ऐवज येईल तो घेतों. " करवीरकर संस्थानींच आहे. त्यांजवळ हजार बाराशें राऊत व पायदळ आहे. " म्हणोन लिहिलें तें कळलें. कागद गड्या व कापड जनार्दनपंत गोखले यांजबराबर रवाना केलें, त्यास ते नरगुंदास येऊन त्यानीं लिहोन पाठविलें. तदोत्तर राऊत पाठवून कागद गड्या व कापड आणविलें. लष्करांत येऊन पोंहचले. बेटगिरें घेतल्यावर मोरबेवर आलों. राजश्री हरीपंततात्या मलप्रभेवर आहेत, छावणीस राहत नाहींत, हें सविस्तर पेशजीच्या पत्रीं लिहिलेंच आहे. लाख रुपये खर्चास छावणीस त्यानीं रहावें याजमुळें पाठविले होते. त्यास आमची गांठ पडल्याखेरीज देशास जाऊं नये म्हणोन आमच्या रोखें बेण्णिहाळचे पाण्यानें इकडे आले. येथून आमचें लष्कर आठ कोसांवर मोरबेवर आहे. आम्ही सडे तात्यांच्या लष्करांत येऊन चार दिवस जाले. बोलणें चालणें जालें. " निवळ रोजमुरा लागेल तो दोन तीन लक्ष रुपयेपर्यंत दरमहा हरकसें करून देऊं. मग त्या खेरीज तुम्ही कांहीं मागों नये. चाकरी चुकरी पडेल ती नीट करावी. पेंढार वगैरे गाबाळ झाडून देशास लावून द्यावें. नालबंदीचे ऐवजीं थोडे राहून घेणें तर

त्यांस खर्चास सरकारांतून ऐवज खर्चास दरमहा तीन लक्षप्रमाणें चारे माही बेजमी बारा लक्ष पुण्याहून कारभारी करणार त्यापैकीं द्यावें. " असें कित्येक तात्यांशीं बोलून छावणीस रहावें असें केलें आहे. राहिल्यानें लौकिक राहतो. शत्रु तुंगभद्रेअलीकडे उतरूं पावणार नाहीं. घेतलीं ठाणीं स्वस्थ राहतील. पुढें नदी उतरावयाचा मनसबा करावा. असें कित्येक आहे. श्रीमंतांच्या प्रतापें घडतां घडेल तें खरें ! याउपर शिरहट्टीकडेच जात आहों. मातबर ठाण्यांपैकीं सावशी व शिरहट्टी दोन मात्र आहेत. सारी फौज समीप गेल्यावर हातीं येतील. धौशाचीं पत्रें आह्मांस आलीं आहेत कीं, " हरीपंत तर देशास जातात. तुमची छावणी कोठें होणार ? गजेंद्रगडाजवळ राहिलां तर आह्मी कवताल-भनूजवळ छावणीस राहूं. आमच्या उपराळ्यास तुम्ही. तुमच्या उपराळ्यास आम्ही. " असें कित्येक लिहिलें आहे. अद्याप उत्तर पाठविलें नाहीं. तेही कृष्णेअलीकडे छावणी करितात ! खासा हैदरखान कुमदान-सुद्धां दुर्गाजवळ दोन कोसांवर उतरला आहे. दुर्गकराशीं तह करीत नाहीं. स्थळच घ्यावें ही त्याची कस्त आहे. पर्जन्यकाळीं इकडून दुर्गकरांस कुमक होणें कळतच आहे ! बंकापुरास पांचशें राऊत दोन अडीच हजार पायदळ आहे. कलघटगींत ठाणें सरकारचें आहे. तेथें बंकापुरचा जमाव येऊन ठाण्यावर हल्ला केली. हल्ला ठाण्यांतील लोकांनीं मारून काढली. बंकापुरकर नामोहरम होऊन मिश्रीकोटाजवळ आश्रयास राहिले. ही बातमी आम्हांस कळतांच फौज विसाजीपंत आठवले यांचे चिरंजीव राजश्री बळवंतराव व रास्ते असे रवाना केले होते, परंतु गांठ पडली नाहीं. ते पळोन गेले. हे माघारे आले. आज रोजीं राजश्री हरीपंततात्यांचें कूच करविलें. कालेवाडचा मुक्काम नेमिला आहे. उदईक शिरहट्टीचे मुक्कामास जाणार.

---

१ चित्रदुर्गाजवळ.

आज मजलीस गेल्यावर आमचें लष्कर तिकडेच आणवितों. दुर्गकराची कांहीं कुमक करावी असें मनांत आहे. घडेल तें खरें ! पर्जन्यकाळांत दुर्ग कांहीं वांचत नाहीं असें दिसतें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

पैा छ १४ जमादिलाखर. आषाढ मास. समान सबैन.

नं. २१४४. श्री. (आषाढ शु० १३–१८ जुलई.)

सेवेशीं शिवोजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ १२ जमादिलाखर मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ ४ जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. इकडील वर्तमान श्रीमंत मातुश्री गंगाबाई कैलासवासी जाहल्याचें लिहिलें आहे तीं पत्रें पावलींच असतील. श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें..... राहिले. मो.....(हरिपंततात्या) तुंगभद्रापार राहते तरी मोठाच मनसबा होता. ती गोष्ट नच जाहली. वाईटांत बरें, अलीकडे राहिले हेंच चांगलें ह्मणावें ! मिरज प्रांतींच्या लावणीचा मजकूर लिहिला तो कळला. " राहिमतपुरीं महादजी शिंदे राहिले आहेत येणेंकरून उपद्रव लागतो. लावणी बुडाली. तेथून कूच करून जात तो प्रकार करावा. शिंद्यांस पत्रें तुह्मी चांगलीं पाठवीत नाहीं, त्यावरून काय म्हणावें ! " ह्मणोन लिहिलें, त्यास सरकारचीं पत्रें जात नाहींत, कारकुनास ताकिदी होत नाहीं, असें आपणास समजल्यावरी आह्मी काय लिहावें ! परभारीं पत्रें व त्यांच्या कारकुनाचीं पत्रें वरचेवरी जातात. उपद्रव तिळमात्र देत नाहीं म्हणून त्यांचीं पत्रें येतात. आह्मी पत्रें व हुजरे अतःपर धोंडोपंताकडेच पाठवितों. चहूंकडून

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. हें टिंचें दिलेल्या ठिकाणीं फाटलेलें आहे. २ महादजी शिंद्याच्या. ३ धोंडो केशव नेने हा राहिमतपुरचा कमाविसदार.

अनुपत एकदांच आली आहे म्हणून लिहिलें तें प्रमाणच आहे. कालाचें माहात्म्य आहे ! असेच दिवस राहणार नाहींत. ईश्वर चांगले दिवस दाखवील. खर्चाची ओढ, लष्करांतही रोजमुरे तटले आहेत म्हणोन लिहिलें, त्यास तालुक्यांत निर्वेध कोणताही परगणा नाहीं. तेव्हां चार रूपये येणें कळतच आहे ! तेव्हां सहजच वोढ झाली ! उपाय काय ? छावणीस फौज राहिल्याची.....म्हणजे राहिले, कोण आले, कोण..... होईल. श्री.....गेले. आम्हास किंचित् समाधान नाहीं. याजकरितां दोन दिवस राहिलों. द्वितीयेस जाणार. रा० रामचंद्र नाईक याजविशीं श्रीमंत मातुश्री बाईनीं काल--समयीं सांगितल्यावरून त्यांचे अन्याय माफ करून पुरंदरास आंणिलें. पुढें तालुकाही द्यावा असें आहे. यांत घडेल तें प्रमाण. रा. मोरोबादादाकडील समजाविशीचा प्रकार तूर्त बाईंच्या प्रकाराहून राहिलासा जाहला. पुढें घडेल तेव्हां खरा ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २१४५. (आषाढ व० २–२२ जुलई.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरि येथील कुशल तागायत छ १६ जमादिलाखर मुक्काम नजीक शिरहट्टी जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्ही छ ८ जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं मुक्काम मजकुरीं पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. " मंगळवेढेकर ब्राह्मण व फारिद्यास खर्चास व वस्त्रे देऊन गांवास पाठविले. आषाढअखेर मागती येण्याविशीं ताकीद केली आहे, येतांच पाठवूं. " म्हणून लिहिलें, उत्तम आहे. " फकीरास फिरोन श्रीरंगपट्टणास रवाना करावा. संज्ञेच्या चिठ्ठया पाठविल्या आहेत. रवाना कराव्या. युक्तीस आल्यास

१परांजपे.

खर्चास पाहिजे असल्यास (पांडुरंगरावतात्यांकडे) पाठवून द्यावें " ह्मणोन लिहिलें, त्यास तुमच्या चिठ्ठ्या अद्याप आल्या नाहींत. आल्यावर फकीराची रवानगी करितों. खर्चास पावणार नाहीं. पावेसें अस-ल्यास देतों. " दारूचा कारखाना तेरदाळास चालता करितों. " म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. " करकंबची बोली होळकराकडे लागली आहे. त्यांजकडील जमाव स्वार प्यादे बाहेर होते ते पळोन गेले. होळकराजवळ फौज जमली. पुरंधरची तोफ व वाफगांवची तोफ आली याजमुळें बंडवाल्यांस धास्त पडली " म्हणोन तपसिलवार लिहिलें तें कळलें. जमाव होळकराजवळ भारी जमला व तोफाही आल्या याजमुळें दाब बसला. फारकरून ठाणें सोडून नरसिंगराव पळाले असतील असें वाटतें. याउपर ठाणें हस्तगत जाहलि. याचें लिहोन पाठवावें. " राजश्री मोरोबादादा यांची समजूत जाहली. त्यांस दीड हजार फौजेचा सरंजाम द्यावा. याप्रमाणें करार जाहला. याच अन्वयें राजश्री नानांसही सरंजाम द्यावा असें ठरलें. सरंजामाच्या यादी निवडावयास लागले आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचीही समजूत थोडाबहुत सरंजाम देऊन करणार " याप्रमाणें शिवाजीपंत यांनीं लिहिलें आहे ह्मणून लिहिलें तें कळलें; याप्रमाणें ठरलें असल्यास बरेंच आहे. शिंदे यांनीं रहिमतपुरास उपद्रव दिला आहे. त्याच्या बंदोबस्ताविशीं शिवाजीपंतांस तुम्ही लिहिलें व त्यानीं उत्तर पाठविल्याचा प्रकार लिहिला तो कळला. आजला शिवाजीपंतानीं त्यांस ताकीदपत्रें सरकारचीं पाठविलींच असतील. विना ते गांवां-तून गेल्याखेरीज उपसर्ग राहणार नाहीं. कापड खरेदी करावयास रामाजी नाईक यांस पंढरपुरास रवाना केल्याचें लिहिलें, उत्तम केलें. ओढीचा प्रकार लिहिला, उपाय काय ? येथील ओढ कोठवर लि-

---

५ बंडवाल्यांकडील.

हावी ! पथकांतील चार चार रोजमरे तटले आहेत. सरंजामाचे महालांतन पैका येईल हा प्रकार समजलाच आहे. शिबंदी मात्र तूर्त ज्याची त्यानीं वारली तर हेंच फार आहे ! राजश्री हरीपंततात्या रहात नव्हते. जेव्हां लोकांच्या रोजमऱ्याचे हवाले तीन लक्षांचे घेतले तेव्हां राहणें जाहलें. आम्ही हवाला मात्र घेतला, परंतु ऐवजास ठिकाण नाहीं ! कर्जवाम पहात आहों. थोरलें ओझें उचललें आहे ! परिणाम कसा लागतो कळत नाहीं. नच करावें तर मसलत फसते. मग आम्ही या प्रांतीं राहूनही फल नाहीं. यास्तव विश्व प्रयत्न करून छावणीचा ठराव केला. भिस्त पैक्यावर. घरची फौज व बाहेरील फौजेचें पोट चालिलें पाहिजे. पैशास तर कोठें ठिकाण नाहीं ! कांहीं सुचेनासें जाहलें आहे. कबूल न केल्यासही संकट. असा प्रकार घडला आहे. गजानन कसा पार पाडील कळत नाहीं. बरें. श्रीइच्छा प्रमाण. हरीपंतांच्या लष्करांत कैद काडीची नाहीं. " पेंढारी परिछिन्न लावून द्यावे तरच कैद राहील, पैकाही मिळेल, नाहीं तर आम्ही या लष्करांत राहणार नाहीं. " अशी दबावणी घालितों, " याउपर पेंढारी राहिल्यास लुटोनच टाकूं " असेंही म्हणतों, परंतु पेंढारी मालोजी घोरपडे वगैरे[1] यांच्या गोटांत आश्रयानें राहिले आहेत. त्यांसही सांगोन पाठविल्यास पेंढारी यांस निरोप देतों, ठेवून घेत नाहीं, असें तोंडानें मात्र म्हणतात; परंतु घालवीत नाहींत ! काय करावें ! सरकारांतून दोन लक्षांचा ऐवज आलेला दीडमाही व तिमाही वं आठवंडेकरी म्हणतां खर्च जाहला, याखेरीज तीन लक्षांचा हवाला आम्ही घेतला आहे. यांत मानेकरी[2] यांचा भरणा–नालबंदी, थोडी-बहुत मागील बाकीपैकीं, व मागील रोजमरे तटलेले त्याजपैकीं असें

---

१ घोरपडे वगैरेस. २ हुजरातपैकीं मानकरी सरदार घोरपडे, पाटणकर, निंबाळकर वगैरे.

आहे. हा ऐवज सावनूरपैकीं उगविणार. सावनूरकरांस कागदींपत्रीं त्वष्ट लाविलें आहे. अद्याप त्यांजकडून कोणी येगार आले नाहींत. याउपर येतील. आमची फौज अद्याप मोरबेवरच आहे. नवलगुंदकरांची गोष्ट पांसष्ट हजारांवर उरकली आहे. परंतु अद्याप ऐवजाची निशा नाहीं. वास्तव तेथें मुक्काम आहे. रा॥ रा॥ रामचंद्रपंत मामा निशेकरितां देसाई यांजकडे संवदतीस गेले आहेत. एका दोहों दिवशीं येतील. तदोत्तर तेथून कूच करून आमचीं पथकें इकडे येतील. करकंबचें आजपावेतों उरकलें असावें असें वाटतें. अथवा आठ चार दिवसांत उरकेल. कापडाचे खरेदीबद्दल राजश्री रामाजी नारायण रवाना केले म्हणोन लिहिलें तें उत्तम केलें. पैठण वगैरे गजन्या आणवाव्या. पागांचीं खोगिरें वगैरे फरसाव जिनसा पानसाची तरतूद करावी. पुरंधरास तोफांविशीं वगैरे वरचेवर लिहीत आहोंत. घडेल तें खरें. वरचेवर पत्र पाठवीत जावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २१४६. (आषाढ व० ५–२५ जुलई.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. आह्मी अद्यापि सडेच राजश्री हरीपंत तात्यांसमागमें आहों. पंधरा दिवस जाहले. चतुर्दशीस येथें आलों. तेच दिवशीं मोर्चे द्यावे तर मजलीस येई तों संध्याकाळ जाहला. तदोत्तर पर्जन्यही लागों लागला. अद्याप उघडत नाहीं. चिखलानें लष्कर फार हैराण आहे. याउपर निस्तोष उघडला तर मोर्चे कायम होतील. इतक्यांत आमची फौजही येत आहे. शिरहट्टींत देसाई नाहीं. बंकापुरास आहे. कारभारी व रांडापोरें येथेंच आहेत. पांच सातशें माणूस गांवांत आहे. लक्ष्मेश्वर पर-

---

१ पत्र परशुरामभाऊंचें.

गण्याचे गांवकरी येऊन भेटले नाहींत. आमची फौज आल्यावर लक्ष्मेश्वरांत ठाणें घालतों. गांवकरी अगोदर येऊन भेटोन रखवालीस स्वार नेते तर रखवाली होती. परंतु आलेच नाहींत, याजमुळें पर-गण्याचे गांव रहात नाहींत. त्यांत होईल तितकी ताकीदही करवितों. कोनापा शिरहट्टीस कैदेंत होता तो कालच रात्रौ पळोन आला. मुळगुंदास आला आहे. आज येईल. राजश्री लक्ष्मणपंत सुभेदार येऊन पावले. हैदरखान चित्रदुर्गानजीक आहे. दुर्गास मोर्चेबंदी करून तोफा सुरू केल्या तेव्हां घाबरून चवदा लक्ष होन द्यावयास दुर्गकर कबूल जाहले आहेत. आठ दिवसांचा वायदा केला आहे. झाडयानिशीं ऐवज घेऊन मग कूच करून हरपनहळ्ळीस येऊन त्यांचे गळीं पडणार. दुर्गकरांस पैका फारच पडला. इतकें असोन मागती जमाव चाकरीस यावा, असा करार जाहला आहे. याप्रमाणें तह-कीक वर्तमान बापूजी नारायण यांजकडून[1] आलें व सावनुराहूनही आलें. तथ्यच आहे. हरपनहळ्ळीचा गुंता उर कोन कडपें, कर्नोळ व अदवानीकरांस तसदी देणार. तूर्त नदी भरली आहे तों अलीकडे चिंता नाहीं. श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. मनसबा भारी पडला. दोन्ही संस्थानें पलीकडे राहिल्यामुळें इकडून निघून त्याचे लगामीं लागलीं. पैकाही त्याम मिळाला. याउपर मस-लत कठिण दिसते. होळकर भोंसले नबाब आदिकरून एकत्र होऊन मनसबा जाहल्यासच सिद्ध होईल. नाहींतर बहुत कठिण दिसतें. पर्जन्यकाळीं तर कांहीं चिंता नाहीं. चित्रदुर्गचा तह जाहला तेव्हां हरपनहळ्ळीकर जसें पाहिजे तसें कबूल करितीलच. घडेल तें प्रमाण ! कांहीं लिहावयास सुचत नाहीं. राजश्री आबाजी महादेव श्रीमंतांकडून हैदरखानाकडे गेले. राजश्री मोरोबादादाची समजावीस जाहली,

---

१ अदवानीहून.

बरेंच जाहलें. पुढें फौज त्यांचे आज्ञेंतच चालावीशी जाहल्यास मात्र मनसब्यास पेंच न पडे म्हणजे बरें ! असो. चिंता कोठवर करावी ! फौजेंत ताळ नाहीं. खर्चाची ओढ मोठी आहे. घडेल तें खरें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २१४७. श्री. (२६ जुलई.)

सेवेशीं शिवोजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ आषाढ वद्य षष्ठी मंदवासरे मुक्काम भिवडी यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. श्रीमंत मातुश्री बाईंचें वर्तमान कळलेंच असेल. अलीकडील वर्तमान तर रावसाहेब बाईसाहेबांस पुसतात " कोठें आहेत ? " तेव्हां सांगणार सांगतात कीं " देवास गेलीं आहेत ! " ' त्यांस आणवणें ' असें श्रीमंतांनीं म्हटल्यावर ' आणवितों ' ह्मणतात ! विसरी पाडितात. उपाय काय ? फार वाईट गोष्ट जाहली. श्रीमंत सौ॥ मातुश्री व पार्वतीबाई श्रीमंतांजवळ राहिलीं पाहिजेत. त्यांस किल्ल्यावरील हवा-मानत नाहीं. तीं कृश जाहलीं आहेत. याजकरितां हिवरें सासवडास श्रीमंतांसह रहावें असेंही म्हणतात. परंतु कांहीं निश्चय जाहला नाहीं. रा॥ आपा बळवंत यांचे स्त्रीस बहुत दिवस समाधान नव्हतें ती मृत्यु पावली. आज दहा दिवस जाहले. मोरो माधवराव पेठेही एकाएकींच बोलतां चालतां संध्याकाळीं नित्याप्रमाणें भोजन करून पहाटेस मृत्यु पावले. राजश्री मोरोबादादांकडील ठरावांत आले होते. परंतु त्यांचे नवे नवे जाबसाल निघों लागले याजकरितां ती गोष्ट तूर्त राहिली. घडेल तेव्हां खरें ! श्रीमंत राजश्री नाना पुरंधरास आले आहेत. आम्हांस समाधान नव्हतें. ज्वर, वायु, खोकल्याचा उपद्रव मोठा, याजकरितां पुण्यास राहिलों होतों. त्यास श्रीमंत राजश्री नानांची चिठी जरूर

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. २ पार्वतीबाईस.

येण्यास आली त्याजवरून काल येथें आलों. आजी किल्ल्यावरी जाणार. पर्जन्य वारा अतिशय ! बोलाविल्याकरितां यावें लागलें. किल्ल्यावरी गेल्यावरी सविस्तर मजकूर समजेल तो लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २१४८. (आषाढ व० ७–२७जुलई.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरि येथील कुशल तागायत छ २१ जमादिलाखर मुक्काम नजीक शिरहट्टी जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्ही छ १० जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें छ १९ मिनहस पावलें. राजश्री महादाजीपंत गुरूजी व धोंडोपंत नेने यांचीं पत्रें रहिमतपुराहून आलेलीं पाठविलीं तीं पावलीं. श्रीमंत मातुश्री गंगाबाई आषाढ शुद्ध सप्तमीस देवाधीन जाहल्याचें लिहिलेवरून कळलें. परम अनुचित गोष्ट घडली. श्रीमंत लहान असें असतां मातुश्री गेली ! फार वाईट जालें. होणार तें सोडीत नाहीं, त्यास उपाय काय ? काल मोठा फटकळ आला. काय करावें ! हरिसत्ता प्रमाण ! रहिमतपुरास शिंद्यांचा उपद्रव लागल्याचें धोंडोपंताचे पत्रावरून सविस्तर कळलें. सरंजामापैकीं एकही महाल अथवा गांव खेडें निर्वेध राहिलें नाहीं. असो, काळजी तरी कोठपर्यंत करावी ! दरबारीं तरी कोणास ल्याहावें ? जें न होय तें थोडें. अलीकडे करकंबेकडील कांहीं वर्तमान कळत नाहीं. सरकारची तोफ व होळकराकडील तोफखाना एकत्रच आहे. पेशजी तुमच्या लिहिल्यांत कीं, " बाहेरील त्यांचा जमाव पळाला. आंतून तहाची बोली लागली आहे. " तेव्हां अवसान समजलेंच आहे ! मोर्चे बसले आहेत किंवा फडशा जाहला, कसा काय मजकूर, तें सविस्तर लिहावें. राजश्री मोरोबादादा यांची समजूत निघून जाहली म्हणोन

ऐकतों. त्यास शिवाजीपंतांचीं पत्रें आलीं असतील तर तपशीलवार लिहावें. इकडील वर्तमान तर मुक्काम मजकुरीं राजश्री हरीपंतांस येऊन आठ दहा दिवस जाहले. अद्याप शिरहट्टीवर मोर्चे बसले नाहींत याचें कारण कांहीं दिवस पाऊस लागला होता. तदोत्तर आमची फौज मोरबेवर नवलगुंदचा फडशा जाहला नव्हता यास्तव ठेऊन आलों होतों. ती फौज आल्याखेरीज मोर्चे देऊं नयेत असें हरीपंतांचे मतें, याजकरितां तीही फौज आणविली. आज येईल. उदईक इंदुवारीं मोर्चे द्यावे असें ठरलें आहे. ते कायम ठरलियानंतर लिहोन पाठवितों. लक्ष्मेश्वरांत ठाणें बसोन चार दिवस जाहले. फौजेस आजवर पैका दिला तरी कैद काडीची नाहीं ! चाकरीचुकरीस मागें पुढें पाहतात. मन घालोन झटत नाहींत. हुजुरातींत कांहीं ताळ राहिला नाहीं. आम्ही इतकी खटपट करूनही फल दिसत नाहीं ! न केल्यास तेंही वाईट ! काय करावें ! हरीपंत राहिल्यानें दाब बसेल. ठाणींठुणीं लौकर हातीं येतील. चार रुपये मिळतील. शत्रु पुढें येणार नाहींत. हें समजोन केलें, परंतु लोकांचीं देणीं फार चढलीं आहेत. देणाऱ्यानीं कोठवर द्यावें ? कांहीं दिलें तरी पुरवठ्यास येत नाहीं ! कसा परिणाम लागतो नकळे ! जें होणें तें श्रीमंतांचे पुण्येंकरूनच होईल. एरवीं समजलेंच आहे ! दुर्गकरांचा अगोदर पंधरा लक्ष होनावर हैदराशीं तह ठरला. कांहीं नक्त व कांहीं कापड जवाहीर सोनें रुपें देऊं लागले तेव्हां किंनत फेर पडोन तह बिघडला. मोर्चे कायम जाहले. तेव्हां दुर्गकरानीं आंतून रात्रौ मोर्चांवर पडोन दोन चार हजार माणूस जायां जखमी केलें. कित्येकांचीं डोचकीं देखील कापून नेलीं ! कुमदान पाडाव गेला असें वर्तमान आज चार दिवस उठलें आहे. बापूजी नारायण व सावनूर वगैरे चहूंकडून वर्तमान आलें आहे. कांहीं तरी झालें असेल असें वाटतें. तहकीक बातमी एका दोहों दिवशीं येईल. आल्यानंतर लिहून पाठवितों. दुर्गकर हिंमत धरून लढत

आहेत, परंतु इकडून उपराळा ये समयीं जाहल्यास फार चांगलें. परंतु तो प्रकार समजलाच आहे ! दुर्गास शत्रु बसला तेव्हां हरपनहळ्ळीकर लगामीं त्याचे लागतीलच. येथून उपराळा होतच नाहीं. तूर्त नद्यांस पाणीही आहे. धौशा देवदुर्गाजवळ आहे. सारांश कृष्णेअलीकडेच गाहिला आहे. दिपवाळीपावेतों संस्थानिक दम धरितील तर श्रीसत्तेनें उपराळा जाला तर नकळे. पुण्याहून दोन लाख रुपये आले होते त्या अलीकडे कांहीं पत्र देखील नाहीं ! कारभारी कांहीं ऐवज पाठवितात किंवा नाहीं नकळे. बरें ! सर्व भार श्रीवर आहे ! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हें आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २१४९. (आषाढ व० ११.–३० जुलई.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरि येथील कुशल ताा छ २४ जमादिलाखर भौमवार प्रातःकाल जाणोन स्वकीय लिहित जावें. विशेष. तुम्हाकडे रवाना करावयास पत्रें लिहोन तयार केलीं, त्यास शिरहट्टीस मोर्चे बसविल्यावरच रवाना करावीं म्हणोन दोन दिवस रवानगी केली नाहीं. त्यास काल इंदुवारीं बारा घटकानंतर राजश्री हरीपंततात्यासुद्धां मोर्चास तयार होऊन निघालों तों चिरंजीव राजश्री दादाही तोफखानासुद्धां येऊन पोहोंचले. चढे घोडयानिशीं पेठ घतली आणि जातां जातां मोर्चे कायम केले. तोफाही सुरू केल्या आहेत. आंत दोन तोफा बिडी व दोन तीन जंबुरे आहेत. आंतील तोफांची मारगीर बंद जाहली. श्रीगजाननाचे कृपेंकरून लौकरच स्थळ हस्तगत होईल. आंत हजार बाराशें माणूस

---

१ पत्र परशुरामभाऊंचें हरीपंत फडक्यांच्या लष्करांतून. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर हे मोरचच्या मुक्कामीं भाऊंची सर्व फौज तोफांसुद्धां होती ती घेऊन आले ते शिरहट्टीस मोर्चे बसविण्याच्या वेळींच येऊन पोंचले.

आहे. दमानेंच लढत आहेत. किती दिवस लागतील पहावें. येथील काम जाहल्यावर सलाबतही पडेल. सावनूरही[1] चार रुपये देतील. तों-पावेतों दिवस घालविले पाहिजेत असें आहे. घडेल तें प्रमाण ! हे आशीर्वाद.

नं. २१५०. श्री. (३० जुलई)

सेवेशीं[2] शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता॥ आषाढ वद्य एकादशी सौम्यवार पावेतों मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण खिजमतगार व जासु-दासमागमें पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर समजला. " मंगळवेढ्याहून तीर्थस्वरूप राजश्री बापूंचें[3] पत्र आलें. बुधवारीं होळकरानीं करकंबेवर हल्ला केला.. पेठ घेतली. निकड करून मोर्चे गांवकुसाजवळ कायम केले. पेठ बहुतकरून जाळली. निकड पाहून नरसिंगराव गोविंद ठाणें टाकोन पळोन गेला. पाठलागास होळकराची फौज गेली आहे. शेंसव्वाशें घोडीं उंटें पाडून आणिलीं. ठाणेंत होळकराचे लोक गेले. ' सरकारचें पत्र आणोन ठाणें हवालीं करून घेणें ' ह्मणोन होळकर ह्मणतात. यास्तव पत्र पावतांच ' ठाणें हवालीं करणें ' म्हणोन होळकरास पत्र व सरकारचे हुजरे पाठविणें म्हणोन लिहिलें, त्यास करकंबचें ठाणें सोडोन नरसो गोविंदराव जातांच तीर्थ-स्वरूप राजश्री हरीपंतदादाचें[4] पत्र आलें जे, ' होळकरास सनद पाठ-वणें म्हणजे ठाणें हवालीं करितील ' म्हणोन लिहिलें होतें. त्यावरून वडिलांचें पत्र येतांच सरकारचें पत्र घेऊन जलद वडिलांकडे पाठविलें. हुजरे पहिलेच तेथें आहेत. पत्र मात्र पाठवावें म्हणोन लिहिलें होतें त्याप्रमाणें पत्र पाठविलें, व आणखीही पत्र पाठविलें आहे त्यावरून

---

१ सावनूरकर नबाब. २ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. ३ मेघश्याम-राव कृष्ण पटवर्धन यांचें. ४ उपनांव ह्मैसकर. वास्तव्य मंगळवेढें.

ठाणें हवालीं करितील व घोडीं वगैरे घेतलीं असतील तींही देतील. व आणखी कोठें घोडीं उमगतील तीं देवावीं म्हणोनही पत्रें पाठविलीं आहेत. पहिल्या पत्रावरून व या पत्रावरून ठाणें हवालीं केलेंच असेल. व घोडीं व गुरेंही सोडोन दिलीं असतील. कांहीं राहतील तीं ओळखून याद पाठवावी म्हणोन वडिलांस लिहिलें आहे. याद येतांच आणखी पत्रें व हुजरे पाठवितों. होळकराच्या वकिलाचीं पत्रें सरकारांत आलीं जे, " नरसिंगराव पळोन जात होता त्याच्या पाठीवर फौज गेली होती. माढ्याजवळ उंसांत नरसिंगराव लपला होता तो सांपडला. बेडी घालून होळकरानीं ठेविला आहे. " म्हणोन लिहिलें होतें. नरसिंगराव सांपडला ही मोठी गोष्ट जाहली, तीर्थस्वरूप राजश्री हरीपंतदादांचें पत्र " नरसिंगराव पळोन गेला, होळकरानीं सरकार सनदेचा उजूर केला आहे, तरी पत्र पावतांच सरकारचें पत्र पाठवावें. " असें आलें त्याजवरून त्याच समयीं किल्ल्यावर जाऊन सनद घेऊन पाठविली. ती पावतांच ठाणें हवालीं करितील. लढा पडणार नाहीं. हल्लीं जिवा माळी याजबरोबरही सरकारचें पत्र घेऊन पाठविलें आहे. हुजरे पहिलेच गेले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१५१. (आषाढ व० ३०—३ आगस्ट.)

भिवडी नजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें पत्र छ २८ जमादिलाखरचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" फरांचिसांस सरकारांतून रेवदंडा बंदर दिलें. त्याणीं तिर्कती पाल रेवदंडयास आणिलें म्हणोन बाजारी वर्तमान ऐकितों, त्यास हा मजकूर काय आहे तो लिहावा. " म्हणून लिहिलें, त्यास रेवदंडयास वखारीस जागा द्यावयाचें बोलणें जालें आहे, परंतु करारांत आलेलें नाहीं. पाल आला तो पाहिल्यानें ते आले तेव्हांचाच आहे. अर्लाकडे

आलेला असें नाहीं. मुंबईवाल्यांच्या मतें दादासाहेबांचें साहित्य करावें असें आहे. परंतु कलकत्तेवाल्यांचें लक्ष्य इकडे पुरतें आहे. याजकरितां मुंबईवाल्यांच्यानें केवळ लबाडी होत नाहीं असें आहे. पुढें काय होईल तें पहावें. महादजी शिंद्यानीं रहिमतपुरास श्रीमंत पंत प्रतिनिधि यांच्या कुरणांतील व राजश्री नाना फडणीस यांच्या कुरणांतील कुरण्ये उठवून लावून दिले. कुरणें चारितात. श्रीमंत रावसाहेब लहान आहेत, म्हणून अशा गोष्टी आहेत. सरकारचा दाब कमी जाला आहे. शिंदे कागदीं पत्रीं नीटच लिहितात, आणि लबाडी करावयास चुकत नाहींत ! होळकरही पत्रें सरकारांत चांगलींच लिहितात, ठाण्याची[1] अवस्था या प्रकारची आरंभिली आहे ! श्रीमंत पारिपत्य करितील हें ध्यानांत असतें तरी लबाड्या कां करिते ? वरचेवर पत्रें कां पाठवावीं लागतीं ? सरकारचा दाब उणा पडला ह्मणोन असें होतें ! "

नं. २१५२. **श्रीगणपति.** (श्रावण शु० ४–७ आगस्ट.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ ३ रजब. मुक्काम शिरहट्टी जाणोन स्वकीय लिहित जावें. विशेष. तुम्ही छ २० जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छ २५ जमादिलाखरीं पावोन लेखनार्थ सविस्तर कळला. चिरंजीव सौ॥ ताराबाईस उपशम जाहल्याचें लिहिलें, पाहोन संतोष पावलों. " चिरंजीव सौ॥ मनाबाईस व आवडाबाईस मूळ आलें होतें. सासऱ्यांस रवानगी केली " म्हणोन लिहिलें, उत्तम केलें. शिवाजीपंतांचीं पत्रें पुरंधराहून आलेलीं पाठविलीं तीं पाहोन लिहिला भाव कळला. " रा॥ रामचंद्र नाईक यांस पुरंधरास आणिले आहेत, पूर्ववत्प्रमाणें त्यांच्या मामलती त्यांजकडे सांगणार. " म्हणोन लिहिलें तें कळलें. महादजीपंत दातार यांजकडील आठशें रुपये विसाजी-

---

१ करकंचच्या ठाण्याची.

पंत आठवले यांचे आले म्हणोन लिहिलें तें कळलें. मशारनिल्हेस सांगतों. ते ज्यास देवितील त्यास द्यावे. इकडील वर्तमान तर दुर्ग अद्यापि लढत आहे. दहा पांच वेळां आंतून बाहेर पडोन दुर्गकरानीं[1] शर्तीनिशीं मोर्चेवर मारामारी केली. परंतु शत्रु जबरदस्त ! स्थल घेतल्याखेरीज सोडीत नाहीं. उपराळ्याचा प्रकार इकडून व्हावयाचा तो नद्या भरल्या असतां समजलाच आहे ! पुरुषोत्तमपंत तुंगभद्रेवर राजश्री हरीपंततात्यांकडे आला होता. हे माघारे फिरले तसा तो माघारा दुर्गासच जात होता. इतक्यांत वेढा बसला. बाहेरच खेडयांत लपोन आहे. त्याचें पत्र आलें होतें. त्यांतील भाव " सेनापतीची[2] अवस्था होत आहे. ये समयीं कसेंही करून जीवदान द्यावें. खर्चही देऊं. " असें कित्येक लिहिलें होतें. परंतु ही गवगव्याची फौज. लोकांचें देणें मनस्वी. काय दिलें तरी पुरवठ्यास यावयाचें नाहीं. त्यांत नदी भरली आहे. जाऊन उपराळा होणें व लोकांस हिंमत चढणें हें समजलेंच आहे ! शिरहट्टीस मोर्चे देऊन दहा अकरा दिवस जाहले. ठाण्यांत पाणी खारें अगदीं वाईट आहे. किल्ल्याच्या पश्चिमेस एक विहीर खंदकालगती गोडी होती तेथील पाणी गांवकर दोनशें प्यादे चौकीस ठेऊन नेत होते. तें आठ दिवस कोणास कळलेंच नाहीं ! कळल्यानंतर मग विहीर घेऊन पांचशें माणसांचा मोर्चा तेथें कायम केला. आतां बाहेरील गोडें पाणी बंद जाहलें. आंत देसाई यांचीं मुलें माणसें व जडभारी सर्व आहेत. एकटा देसाई मात्र बंकापुरास आहे. मोर्चे निकडीनेंच चालतात. धमधमा तयार होत आहे. आंत दोन तोफा थोर व जंबुरे सात आठ आहेत. थोरली तोफ आज दोन तीन रोज बाहेरील तोफांनीं बंद केली आहे. याउपर लौकरच उरकावेसें आहे. फार करून संधानानेंच हस्तगत व्हावें

---

१ हा [illegible]दुर्गकरांचा कारभारी. २ मुरारराव घोरपडे यांची.

असें आहे. घडेल तें मागाहून लिहोन पाठवितों. येथील फडशा जाहला म्हणजे श्रीमंतगड, येळवंती, व बालेहसूर, सांवशी श्रम न करितां यावी असें आहे. घडेल तें खरें. सावनूरकर अद्याप कोणी आलें नाहीं. माधवराव येणार ते निवर्तले. हल्लीं भास्करराव येणार आहेत. एका दो दिवशीं येतील. तदोत्तर खंडणीचा जाबसाल ठरेल. येथें मुक्काम आज पाऊण महिना आहे. आणखी आठ चार दिवस लागतीलच. परगण्यांत एक कसब्याविरहित खडें निखालस राहिलें नाहीं ! लष्कर अनिवार ! रोज कहीकबाडाखालीं बाकी राहिली नाहीं. पुढें एखाद्याचे मामलतसंबंधें चार रूपये देणें तर कोणत्या आधारावर द्यावे ? पथकाचे रोजमुरे चार चार तटले आहेत. तुमचें उत्तर 'पैसा मिळत नाहीं' असें स्पष्ट आलें ! मामलतीचा प्रकार तर या रीतीचा. प्रस्तुत ज्याची त्यानें शिबंदी फोड-ल्यास फार आहे ! हुजरातच्या फौजेचा महिना भरला. त्यांची सोय जाहली पाहिजे. काळजी तरी कोणती म्हणोन करावी ? कांहीं सुचेनासें जाहलें आहे. परिणाम कसा लागेल पहावें ! " केसो बाबा-जीस राऊत पाठवून आणविलें. ऐवज मागितल्यास 'रूजुवात जाहली पाहिजे. अमुक तमुक, म्हणोन बयानाच सांगों लागले. मग एक रोज कारकून त्यांचे राहुटीस बसविला. उपोषण जाहलें. तेव्हां पंधरा दिवसांत निमे ऐवज त्यानें द्यावा असें ठरलें. ऐवजाचे तरतुदेकरितां निरोप घेऊन घरास गेले. मुकासीबद्दल साडेनऊशें होनांचा जाबसाल पावती मुकासी यांची आणून दाखवावी. नाहीं तर तोही ऐवज पंधरा दिवसांत द्यावा, असा करार करून गेल " म्हणून लिहिलें तें कळलें. इकडे पर्जन्य ग्रहणाच्या संधींत पडला तो पडला. त्याजवर आजपर्यंत अगदीं नाहीं. पट्टणास रवाना करावयाच्या चिठ्ठया दोन संज्ञेच्या चिरं-

---

[1] हा सावनूरकराचा वकील.

जीव राजश्री जिऊबाकडे पाठविल्या त्या पावल्या. फकीराची रवानगी याउपर करितों. " मंगळवेढ्याहून फरीदा व श्रीनिवासपंत यांस आणवून मागाहून पाठवितों " म्हणून लिहिलें, उत्तम आहे. पागेचा फरसावे लौकर तयार करवून पाठवून द्यावा. पंढरपुराहून लिहिल्याप्रमाणें कापड आणविलें. उत्तम केलें. राजश्री आपा बळवंत यांची स्त्री व मोरो माधवराव पेठे निवर्तल्याचें लिहिलें तें कळलें. " राजश्री बाळाजी हरी याजकडे सरदेशकतीचे मामलतपैकीं ताळेबंदाची बाकी दोन हजार होन व याखेरीज सहा हजार होन खंडपुरोहीबद्दल यावे• माहितगारी आनंदराव यांस आहे. बाळाजी हरीस आणून रूजुवात करून फडशा करून घ्यावा. " म्हणोन लिहिलें, त्यास या गोष्टीची माहीतगारी आम्हास नाहीं. हल्लीं तुम्ही लिहिलेवरून कळलें. त्याजकडील मामलत निघोन किती वर्षें जाहलीं ! अद्याप बाकी ठेविली, काय म्हणावें ! असो. याउपर मशारनिल्हेस पत्र पाठवून आणवितों. उभयतांचे माहितगारीनें बाकी मनास आणून फडशा करितों. दुर्ग करास वेध लागला आहे. या समयांत कुमक व्हावी, परंतु कुमकेचा प्रकार दिसत नाहीं. नद्या भरल्या आहेत याजमुळें तर टाळाटाळीस निमित्यही आहे. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून जें होणें तें होईल. परंतु विचार ठीक दिसत नाहीं. बहुत काय लिहिणें. करकंबचें ठाणें होळकर हवालीं करितील. तेथें जमाव गेला आहे तो परत येईल त्या पैकीं राजश्री गणेश बाजीराव यांची व वोलेकर शिंदे व म्हैसाळकर व जाखोजी कदमाची मंडळी इकडे लावून द्यावी. आपाजी दामोदर तूर्त करकंबेस ठेवावे. करकंबचा बंदोबस्त चांगला करावा. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ खोगिरें वगैरे सामान.

श्रीगणपति.

नं. २१५३. (श्रावण शु०—आगस्ट प० पंधर०)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद. उपरि. तीर्थ-स्वरूप राजश्री आपाचे प्रायश्चित्ताचा मजकूर वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्रभट बावा आल्यावर जाहला तो लिहिला तो सर्व कळला. तेथील आग्रहाची रीत सर्वत्र जनांस ठाऊक आहे ! आजपावेतों तीर्थस्वरूप कैलासवासी सर्वांनीं संगोपन करून आबच रक्षीत आले. म्हणूनच मंडळींत निभावले ! कसेंही जाहलें तरी उघड पडली नाहीं. अलीकडे बहुतच विरुद्धास कारणें जाहलीं. परंतु तुम्हाकडे थोरपण, आणि आडनांव पटवर्धन, मंडळींत दुसरा विचार नव्हता. गुदस्तां तोतयाचे संबंधामुळें जाहलें त्यास इलाज नाहीं. वडिलांस आरोप आला. ब्राह्मणांपुढें इलाज चालेना. ब्रह्मकर्म आहे, परंतु तोतयाचा फडशा होऊन वर्ष होत आलें आहे. चिरंजीव राजश्री हरबाअण्णा घरास येऊन कमपेश आठ महिने जाहले. आज आठ महिने वडिलांचे घरास कोणी जात नाहीं हाही दुर्लौकिक, यास्तव आपण अंगावर घेऊन हरप्रकारें जसें कळेल तसें वेदमूर्ति राजश्री बाबांस आपण सांगून 'प्रायश्चित्त घेतलें' असें करून लौकिक करावा. फार काय लिहिणें. तुम्ही मन लावून वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाबांस बोलावून खटपट करून एक वेळ लौकिक चांगला दिसेलसें करावें. बहुत काय लिहिणें. (या आमच्या) लष्करांत श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील हुजरे कोठें आले आहेत म्हणोन बोलवा आहे. आबाजी महादेव बंकापुरास आहेत

---

१ परशुरामभाऊंचा चुलता भास्कर हरी यांचा पुत्र हरबाअण्णा तोतयाकडे गेला होता. सबब त्यांच्या घरावर मिरजेंतील ब्राह्मणांनीं बहिष्कार घातला होता. भास्कर हरी तर आग्रहास पेटल्यामुळें प्रायश्चित्त घेऊन मोकळे होईनात, त्यासंबंधें हें पत्र भाऊंचें. २ चुलत्याचे घरचीं. ३ रामचंद्रबाबा दीक्षित घाटवे उपाध्ये. ४ हा श्रीमंत दादासाहेबांचा दिवाण. हा व बाजीराव बर्वे हैदरअलीकडे येऊन कांहीं राजकारण करण्याच्या खटपटींत होते.

त्यांनीं कांहीं हैदरखान याचे लष्कराहून द्रव्य आणिलें आहे तें आमच्या फौजेंत वांटून कांहीं भेद करावा या संधानांत आहेत. आम्हासही वर्तमान कळलें आहे. सावधता करितों. परंतु खर्चाची ओढ भारी आहे. इलाज नाहीं. फार काय लिहिणें. मागाहून सविस्तर लिहितों. हे आशीर्वाद.

नं. २१५४. श्री. (श्रावण शु० ६–९ आगस्ट.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता॥ छ ५ माहे रजब मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ २३ जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला. " तीर्थस्वरूप राजश्री भाऊंचीं पत्रें शिरहट्टीचे मुकामचीं आलीं. राजश्री हरीपंततात्या व वडील एकत्र जाहले. शिरहट्टीस मोर्चे लावणार. राजश्री हरीपंततात्यांच्या फौजेच्या रोजमुरेचा हवाला तीन लक्षांचा तीर्थस्वरूपांनीं घेतला, तेव्हां छावणीस हरीपंत राहिले. " म्हणोन लिहिलें तें कळलें. " हैदरखान चित्रदुर्गास मोर्चे लावून तोफा लागू केल्या, तेव्हां चवदा लक्ष होन दुर्गकरांनीं कबूल केले व हैदराचे चाकरीस त्यानीं आपला जमाव पाठवावा असा तह ठरला. पुढें हरपनहळ्ळीकरांच्या गळीं पडणार. " म्हणोन लिहिले तें कळलें. " सरकारच्या फौजेस पैसा नाहीं. दोन लाख रूपये सरकारांतून रवाना जाहले ते जाऊन पोहोंचले. त्याणें काय होतें ! पैरवी उभयतांनीं करावी " म्हणोन लिहिलें, त्यास तरतूद होत आहे. " शिंदे होळकर—भोंसले देखील—कर्नाटकांत रवाना करावे येविशीं बोलावें " म्हणोन लिहिलें, त्यास भोसले तो लांब पडले. शिंदे–होळकर यांचे रवानगीचा प्रकार कारभारी बोलतात

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस उमरजेस. २ कारभारी बापू व नाना यांनीं.

" हरीपंततात्यांनीं कूच केलें तर लोक ढाला उभ्या करितात ! ही रीत आजपर्यंत नव्हती. " म्हणोन लिहिलें, त्यास श्रीमंत राजश्री रावसाहेब लहान, दाब कमी पडला म्हणोन अशा गोष्टी घडतात ! करकंबेचा मजकूर लिहिला तो कळला. होळकरास वरचेवर पत्रें पाठवितों, पहिलीं पत्रें एक दोन गेलीं व हुजरेही गेले. आणखी सरकारचें पत्र व श्रीमंत राजश्री नानांचें व बापूंचें पत्र होळकरास नारो गणेशास घेऊन हुजरे व पत्रें रांज्यांस[3] राजश्री नारो गणेशाकडे पाठविलीं. मशारनिल्हेचें पत्र होळकरास आणविलें आहे तें पत्र घेऊन हुजरे उद्यां येतील. येतांच करकंबेकडे रवाना करितों. " राजश्री अमात्य पंत बावडेकर यांणीं तीर्थस्वरूप राजश्री तात्यांपासून दहा हजार रूपये कर्ज घेतलें, त्यास तीन वर्षें जाहलीं. ऐवज देत नाहींत. त्यास सरकारचें पत्र विजयदुर्गास पाठवाव. गंगाधरपंतास[4] पत्र पाठवून त्यांजकडील गांव साळसी महालचे आहेत ते जप्त करवावे " म्हणोन लिहिलें, त्यास श्रीमंत राजश्री नानांस विनंति केली. ते बोलिले कीं, " आधीं पत्र त्यांसच देणें. पत्रावरून निकाल करून दिला तर उत्तम. नाहीं तर तुम्ही सांगाल त्याप्रमाणें करावयास येईल " म्हणोन बोलिले. त्याजवरून राजश्री सुबराव पंडित यांस सरकारचें पत्र घेऊन पाठविलें आहे हें त्यांस पावतें करावें. ऐवज दिला तर उत्तम. नाहीं तर आपण लिहिल्याप्रमाणें करावयास येईल. करवीरकरांकडे दाणा--गल्ला जाऊं न देणेंविशीं पत्रें पाठवावयाची याद पाठविली, त्याप्रमाणें सहा पत्रें घेऊन पाठविलीं आहेत. इतक्यावर बंदोबस्त करितील. दाणा गल्ला जाऊं देणार नाहींत. आणि जाऊं लागला तर आपण बंदोबस्त करावा. येविशीं सरकारचेंही पत्र आपणास आहे. श्रीमंत राजश्री भाऊंस पत्र लिहोन लाखोटा

---

१ सेंडे. २ हा होळकराचा दिवाण. ३ रांजें अगर रांझें हें गांवाचें नांव. ४ गंगाधर गोविंद भानु हे विजयदुर्गचे सुभेदार.

पाठविला आहे. कागद कामाचे आहेत. उभयतांनीं लिहावयास सांगितलें आहे. लखोटा आधीं श्रीमंतांकडे पाठवावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१५५. (श्रावण शु० ८–११ आगस्ट.)

लष्करनजीक शिरहट्टी येथून परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र मिरजेस. पैवस्ती छ १० रज्जब.

" नरसिंगराव गोविंद धरले. शें सवाशें घोडे घेतले. प्यादे सांपडले त्यांस होळकरानीं शिक्षा केली " वगैरे लिहिलें तें कळलें. " शिंदे रहिमतपुरास आहेत. रहिमतपूरची लावणी ते तेथें आहेत याजमुळें बुडाली " म्हणोन लिहिलें तें कळलें. चोहोंकडे अशीच अवस्था जाली आहे ! राजश्री मोरोबादादा यांचे समाजाविशीचा प्रकार होत होता इतक्यांत श्रीमंत मातोश्री गंगाबाई निवर्तली व आणखी नवीं नवीं बोलणीं (मोरोबाकडून) निघूं लागलीं, याजमुळें तूर्त तसेंच राहिलें. दुसरा मजकूर बाजारवार्तेचा लिहिला तो कळला. या गोष्टी ऐकाव्या इतकेंच. खरा प्रकार समजलाच आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेब मातोश्रीची आठवण काढितात म्हणून लिहिलें, त्यास ईश्वरी इच्छेस इलाज काय आहे ? ते प्रतापी पुरुष अवतारी आहेत ! त्यांस दुसरियानें समजवावें असें नाहीं. येथील फौजेच्या खर्चाची फारच ओढ. हुजुरून कांहीं यावें असें दिसत नाहीं. परिणाम लागणें कठिण आहे. आज बारा तेरा दिवस (शिरहट्टीस) मोर्चे लागून जाले. परंतु मोर्चे ठीक चालत नाहींत. तोफा थोर नाहींत. आहेत त्यांस दारूगोळा नाहीं ! "

नं. २१५६. श्री. (श्रावण शु० १०–१३ आगस्ट.)

सेवेशीं शिवाजी बालाजी. कुलानेक साष्टांग नमस्कार विज्ञप्ति

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

विज्ञापना तागा छ ९ रजब मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला. राजश्री बाळाजीपंत याचें पत्र करकंबेहून आलें त्याची नकल पाठविली ती पावली. " दोन पतें होळकरास पावलीं, परंतु ठाणें देत नाहींत. मसलतीचा खर्च मागतात. निदान पंचवीस हजार द्या " म्हणतात. ठाणें घेतल्यापूर्वी चौथाई वसूल घेतला. हल्लीं गांवोगांवचे पाटील आणोन पैका घेतात. येविशीं सरकारांत विनंति करून होळकरास निक्षून पत्र पाठवून ठाणें हवालीं होय तें करणें म्हणोन लिहिलें, त्यास पहिलीं दोन पतें पाठविलीं व हुजरे व राजश्री नारो गणेशाचें पत्र पाठविलें. त्याजवर दुसऱ्यानें सरकारचीं पत्रें व हुजरे पाठविले. तिसऱ्यानें सरकारचें पत्र रागें भरून व श्रीमंत राजश्री नानाबापूंचें पत्र रागें भरून व हुजरे पाठविले. राजश्री नारो गणेश यांस सरकारचें पत्र व उभयतां कारभारी यांचीं पत्रें पाठवून मशारनिल्हेचें पत्र होळकरास आणून पाठविलें. हुजऱ्यांस बरोबर देऊन पाठविलें. त्याजप्रमाणें तीन जोडया हुजऱ्यांच्या पाठविल्या आहेत. कळावें. शिद्यांसही रहिमतपुराविशीं निक्षून पत्रें सरकारचीं व उभयतांचीं पाठविलीं आहेत. " तीर्थस्वरूप राजश्री भाऊंचीं पत्रें आलीं. शिरहट्टीवर राजश्री हरीपंततात्यांसुद्धां हल्ला करून पेठ घेतली. ठाण्यास मोर्चे लाविले आहेत. हैदरखान चित्तदुर्गानजीक आहे. चित्रदुर्गकराचा तह पंधरा लक्ष होनावर जाहला होता तो बिघडला. चित्रदुर्गकर मोर्चांवर चालोन येऊन दोन चार हजार माणूस जायां जखमी केलें. कांहीं गळे कापून नेले म्हणोन वर्तमान आहे. " म्हणोन लिहिलें तें कळलें. सरकारचे फौजेंत खर्चाची ओढ फार आहे त्यामुळें कैद नाहीं. कामकाज होत नाहीं. फौज थोडी. शत्रु समीप. नदीस पाणी आहे तों चिंता नाहीं. पाणी उतरले उपरी पेंच पडेल. याजकरितां आजपासून तरतूद होऊन फौजेची रवानगी

होत असावी " म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐवजाची तरतूद करून पुढें फौजेची तरतूद करून पाठवावी तर होळकर शिंदे यांस पाठवावें, भोंसल्यास आणवावें, म्हणोन विनंति आम्ही करीतच आहों. त्यास भोंसल्यास पत्रें येण्याविशीं गेलीं. ते दसऱ्यास तयारी करून येतील. होळकर शिंदे हिंदुस्थानांत जाण्याविशीं उद्विग्न जाहले आहेत. तत्राप कर्नाटकांत जरूरच जावें, करवीरकरांचें पारिपत्य करून जावें, म्हटल्यास रवानगी त्यांचीही करावी असें आहे. यांत घडेल तें प्रमाण ! आम्ही निकड वरचेवर करितों. हैदरखानाकडील वकील बोलतो. राजश्री लक्ष्मणराव रास्ते वाईहून आले आहेत. त्याचें म्हणणें " तुंगभद्रेचा तह करावा. तीन सालां खंडणी व मागील बाकी द्यावी. श्रीमंत राजश्री तात्या मंडळीसुद्धां सोडावे. सेनापतीस न सोडावें. त्याचा आमचा शींवशेजार आहे " असें म्हणतात. यांचें म्हणणें " तीन सालां ऐवज बाकी द्यावी. ठाणीं कर्नाटकसुद्धां सरकारचीं सोडावीं. कर्नाटकपैकीं एक दुसरें ठाणें तुम्हास देऊं. वरकड सोडावीं. सेनापतीसुद्धां सर्वांस सोडावें. " येणेंप्रमाणें बोलणें आहे. त्यास वकील " लेहून पाठवून उत्तर आणवितों " म्हणतो, परंतु तिकडील आशय पाहतां " हरतऱ्हेनें फौजा तुंगभद्रेपलीकडे गेल्यापूर्वी तह जाहल्यास करावा. " असें आहे. यांचेंही मानस " चार रुपये अलीकडे पलीकडे करून शत्रूकडे सांपडले आहेत ते सोडून आणावे. पलीकडील ठाण्यापैकीं येतील तीं येतील. भलता ठराव होईल तसा करावा " असें आहे. यांत घडेल तें प्रमाण लेहून पाठवूं. राजश्री मोरोबादादाचें बोलणें चालणें जाहलेंच

---

१ लक्ष्मणराव रास्त्यांच्या मध्यस्थीनें हैदराचा वकील तहाचें बोलणें कारभाऱ्याशीं बोलतो. २ कर्नाटक बालेघांटपैकीं शिऱ्यांचा सुभा माधवराव बल्लाळ पेशव्यांनीं जिंकिला होता त्यांतलीं शिरें, मदागिरि, चेनरायदुर्ग, होसकोटें, बाळापूर, गुरमकोंडा इत्यादि सर्व ठाणीं, हीं दोन वर्षांपूर्वी टिपूनें घेतलीं होतीं. ३ तुंगभद्रेपलीकडील.

आहे, परंतु हिसके मधीं फार होते, परंतु आतां निकालावरी आले आहेत. घडेलसें भासतें. ठराव जाहल्यास लिहून पाठवूं. मुंबईवाल्यांच्या चित्तांत " कसेंही करून विलायतेहून हुकूम आणून श्रीमंत राजश्री दादासाहेबांचा पुस्तपुन्हा करावा " या गडबडेंत आहेत. विलायतेहून हुकूम येणार नाहींसें भासतें. फरांचिसाचे वकील हुजूर आले आहेत याकरितां ते संशय धरितील याजकरितां त्यांस पत्रें येथून गेलीं आहेत. ' तुमचा तह जाहला तो प्रमाण आहे. हें दरबार आहे. चार सुष्ट-दुष्टांचे वकील येत असतात ते फरांचिसाचेही आले आहेत. याज-विशीं संशय धरूं नये " येणेंप्रमाणें दोन वेळां पत्रें गेलीं आहेत. उत्तर आल्यावर समजेल. करकंबच्या ठाण्यासाठीं दोन पत्रें, अगोदर तीन पत्रें हुजरे जोडया उभयतांच्या पत्रासुद्धां पाठविलीं आहेत. हुंजरे दोन दोन दिवसांच्या अंतरानें पाठविले आहेत. पहिल्या हुजऱ्यांचा जाबसाल आज उद्यां समजेल. तीन खेपांच्या हुजऱ्यांबरोबर पत्रें रागें भरून लिहिल्यावरून ठाणें हवालीं करितील असें भासतें. सरकारचे पत्राची अवस्था या प्रकारची जाहल्यास पत्रें किती घ्यावीं, किती पाठवावीं, सुमार राहिला नाहीं ! काय करावें ! शिंद्यांस पत्रें हल्लीं घेऊन पाठविलीं आहेत. आपल्या पत्राचें उत्तर मागाहून घेऊन पाठ-वितों. सेवेशीं श्रुत होय हें विज्ञापना.

नं. २१५७. (श्रावण शु० १५–१८ आगस्ट.)

लष्कर मुक्काम शिरहट्टी येथून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगा-धरराव गोविंद यांस पत्र. रवाना छ १४ रज्जब.

" शिरटीकर बोलत होते, परंतु बोलण्यांत धर नाहीं. लबाडीचें बोलणें बोलों लागले. याजमुळें आज चार दिवस कोणी भांतून बोलावयास येऊं लागले तर येऊं देत नाहीं. धमधमा तयार जाला. कालच वर तोफा चढवून मारगिरीस प्रारंभ केला. गोष्ठे

आंत जाऊन पडतात. गरनाळ एक आहे ती सुरू केली आहे व धारवाडाहूनही एक तोफ आणविली आहे. दुर्गकराकडील मजकूर आज दोन दिवस कळत नाहीं. अद्यापि हिमतीनेंच लढतात."

नं. २१५८. श्री. (श्रावण व० ६–२४ आगस्ट.)

पैा छ २९ रज्जब. सन समान सबैन. श्रावण मास.

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति तागा छ २० रज्जब भानुवासरे मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन तिकडील वृत्त कळत नाहीं. तरी लेहून पाठविलें पाहिजे. यानंतर करकंबेविशीं होळकरास पत्रें पाठविलीं व हुजरे तीन जोडया पाठविल्या त्यास दोन जोडया परत आल्या. पत्राचें उत्तर होळकरांनीं पाठविलें कीं, " तेल्याचा दंगा व सुरापूरकरांचा दंगा आहे. ठाणें जतन होत नाहीं. " असें पटवर्धन म्हणतात म्हणोन आम्ही बंदोबस्त केला " असें लिहिलें ! तिसरी जोडी गेली त्या समयीं उभयतांनीं फारच निकड करून रागें भरून लिहिलें आहे. पत्रावरून होळकरांनीं ठाणें द्यावेंसें आहे. हुजरे यांणीं पत्रें देऊन निकड लाविली आहे म्हणून वर्तमान आलें आहे. येथें होळकराकडील कारकनास कारभारी फार रागें भरले. कामेंकाजें त्याच्या निसबतीचीं बंद केलीं. तेव्हां कारकुनानें होळकरास लिहिलें कीं, ' ठाण्याविशीं आमची अब्रू रहात नाहीं. कामकाजें होत नाहींत. ' " नरसिंगराव याणें लबाडी करून ठाणें घेतलें परंतु गांवास उपद्रव नव्हता. तुम्ही सरकारचे सेवक असतां गांव लुटिला, ठाणें देत नाहीं, येणेंकरून फजीत पावाल. " म्हणून फारच रागें भरल्यावर कारकुनाचेंही

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. २ कसबे उमराज जिल्हा विजापूर येथील बंडखोर तेली.

पत्र गेलें आहे. ठाणें अतःपर ठेवणार नाहींत. हवालीं करितीलसें दिसते. तत्राप न कळे ! इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री नाना काल पुण्यास गेले. मासपक्ष पुण्यांतच राहतील. आम्ही उदईक जाणार. राजश्री मोरोबादादाची समजाविशी होत होती, त्यास नवे नवे आडमुद्दे घातले होते ते त्यांणीं सोडिले. आतां यांणीं बोलणें लाविलें कीं, " मनसबा प्राप्त जाहल्यापासून आम्ही उभयतांही हातचें पदरचें भरीस घातलें. कर्जवाम मेळवून दिलें. आतां आमची पत राहिली नाहीं. तुम्ही असुदे आहां. तुमची पत आहे. फौजेची उस्तवारी होयसें करावें " येणेंप्रमाणें बोलणें लाविलें आहे. ते मान्य करीत नाहींत तेव्हां सहजच चार दिवस राहिलें. कळावें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील बोलणें चालणें लागलें आहे. यांचें मानस पांचापासून सात लक्षांची जहागीर द्यावी. त्यांचें मानस फार घ्यावी असें आहे. ठराव होईल तो लिहून पाठवूं. इंग्रजाकडील वकील येथें होते त्यास " कलकत्याहून वकील येऊन ठराव करून गेले तेणेप्रमाणें चालावें. लढा नाहीं. फरांचीसांकडील वकील येथें आले आहेत, तेणेंकरून विलायतेस संशय पडेल " म्हणून बोलले, व पाहतां प्रकार फरांचीसांकडील उपयोगही दिसेना. याजकरितां ' ठरावाप्रमाणें तुम्ही वर्तावें. ' येणेंप्रमाणें मुंबईवाल्याशीं बोलून चालून निरोप दिला. फरांचीसांकडील वकील आहेत त्यासही निरोप देणार. कळावें. राजश्री हरबाअण्णाच्या प्रायश्चित्ताविशीं पत्र आपल्या नांवें घेऊन मागाहून पाठवितों. परवानगी घेतली आहे. महीमंतगड श्रीमंत राजश्री भाऊ आपणाकडे गुदस्तांपासून मागतात त्यास प्रस्तुत द्यावा असें बोलण्यांतआलें. निश्चय ठरला म्हणजे लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ कर्नल अॅप्टन्.

नं. २१५९. (आषाढ व० ६-२६ आगस्ट).

परशुरामभाऊंचें लष्कर मुक्काम शिरहट्टी येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. पैवस्ती छ २५ रज्जब.

" मोर्चे शिरटीस देऊन पाऊण मास जाला. अद्यापि प्रथम दिवस आहे. धमधमा तयार जाला आहे. त्यावर तोफा ठेवून मारगिरी होत आहे व मोर्चांची निकडही होत आहे. सिद्धीस जाईल तेव्हां खरें ! एका दो दिवशीं खंदकावरील बातेऱ्या घेणार. दारू आहे तों गोळा नाहीं, गोळा आहे तर दारू नाहीं ! दारूकरितां सावनूर हावेरी वैगेरे जागां तलाश केला; परंतु दारू कोठेंही मिळत नाहीं. सावनूरकरांचा वकील अद्यापि आला नाहीं. त्यांचें व बंकापूरकरांचें नित्य घांसतच आहे. (मराठ्यांकडे) वकील पाठवाल तर तुमचा आमचा बिघाड असें बंकापूरकरांनीं सावनूरकरांस लिहिलें आहे. आह्मी शिरटी घेतल्यावर मग आह्माकडे सावनूरकर वकील पाठविणार आहेत. शिरटीकर आजपर्यंत समेटाचें बोलत होते तें लबाड आहे. बंकापूंरकरांचा मतलब कीं, कसेंही करून या ठाण्यांत कुमक घालावी. बंकापुराहून चारशें प्यादा सावशीस आला आहे. दुर्गकर अद्यापि शर्तीनें लढत आहेत. आजपर्यंत बाहेरील माणूस पांच सात हजार जायां जखमी जालें. जिदीस गोष्ट पडली आहे, कोणत्या थरास जातें पहावें ! "

नं. २१६०. श्री. (२७ आगस्ट.)

पैा छ २८ रजब. सन समान सबैन. श्रावण मास.

सेवेशीं[1] शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा श्रावण कृष्ण दशमी सौम्यवासरे मुकाम भिवडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री हरबाअण्णा यांच्या प्रायश्चित्ताविशीं श्रीमंतांसं[2] विनंती केली. त्याजवरून सरकारचें पत्र

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. २ नाना फडनवीस यांस.

आपणास दिलें आहे जे, " कृष्णातीरीं यथाविधि शिष्ट ब्राह्मण मेळवून प्रायश्चित्त द्यावें. " त्यास श्रीमंत राजश्री आपांस आम्हीं पत्र लिहिलें आहे. तरी त्यांचे व आपले विचारें मशारनिल्हे यांस शुद्धता करावी. बहुत दिवस बहुत प्रकारें विनंती करीत असतां विनंती मान्य करून आज्ञा दिली. आपल्या नांवचें पत्र सरकारचें घेऊन पाठविलें आहे. प्रायश्चित्त द्यावें. इंग्रजांकडील वकील यांस निरोप दिला तो अद्यापि पुण्यांतच आहे. मुंबईस जाणार. विलायतीहून श्रीमंत दादासाहेबांस कुमक करण्याविषयीं आज्ञा आणवावयाचे खटपटेंत आहेत. मुंबईवाल्याच्या चित्तांत लबाडी पुर्तेपणें आहे. श्रीमंत तो त्यांजवळच आहेत. कोणसमयीं काय करितील हा भरवसा पुरत नाहीं. होईल वर्तमान तें लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

न. २१६१. (श्रावण व० १२–२९ आगस्ट.)

पुण्याहून शिवाजी बाबाजीचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. रवाना छ २५ रज्जब भृगुवासर.

" फौजेच्या तरतुदीविशीं व खर्चाच्या बेजमीविशीं वारंवार विनंती करीतच आहों. त्यास साहुकार जमा करून " त्यांच्या मागील देण्यास (सरकारांतून) थोडा थोडा ऐवज द्यावा आणि रवानगी करावी. तेथें दरमहांची नेमणूक करोन द्यावी त्याप्रमाणें सावकारांनीं द्यावें. दसरियास कापड लाख रूपयांचें बरोबर न्यावें. " येणेंप्रमाणें सावकारांशीं बोलणें चालणें जालें आहे. फौजेचा प्रकार तर करवीरची मसलत शिंद्यांस सांगितलीच आहे. ती मसलत जाल्यावरी त्यांस दुसरी चाकरी ! होळकर पंढरपुरावरून आले. उदईक जेजुरीस येणार. त्यांस कर्नाटकचे मसलतीस पाठवावें याप्रमाणें त्यांच्या दिवाणाशीं (कारभाऱ्यांचें) बोलणें जालें आहे. कर्नाटकचे मसलतीची श्रीमंत राजश्री

---

१ भास्कर हरी यांस.

नानांस बहुतच काळजी लागली आहे. खटपट करावयास चुकत नाहींत. "

श्रीगणपति.

नं. २१६२. (भाद्र० शु० २–४ सप्टंबर.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ १ साबान गुरूवार मुक्काम शिरहट्टी जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. अलीकडे आठ दहा दिवस तुम्हाकडून पत्रें येऊन वर्तमान कळत नाहीं, तर सविस्तर करकंबेंत ठाणें पडलें न पडलें हें लिहावें. इकडील वर्तमान तर शिरहट्टीस मोर्चे दिल्यापासोन प्रथम दिवसापासोन देसायाचे लोक संधानाचें लबाड बोलणें बोलतच होते. शेवटीं ' पंचवीस हजारांचा सरंजाम देखील येलवंती द्यावी. ' यासही आम्हीं मान्य जाहलों. असें असतां फिरोन हमगी मागों लागले. दिवसेंदिवस चढत चालले. याजमुळें हल्लाच करावी असा सिद्धांत करून श्रावण वद्य चतुर्दशी रविवारीं प्रातःकाळीं अगोदर बातेऱ्यांवर हल्ला केली. तेव्हां हुजरातचे लोक उठले नाहींत, आमचे तिनीही पथकांचे मात्र उठले. रेवणींतील लोक सावध होते याजमुळें हल्ला लागू जाहली नाहीं. ते दिवशीं चिरंजीव राजश्री दादाकडील व आम्हाकडील मिळोन चार्ळास पन्नास माणूस जायां जखमी जाहलें, याजमुळें गांवकर फारच चढीं लागले. याजमुळें दुसरे दिवशीं अमावास्या इंदुवारीं मोठ्या प्रातःकाळीं बातेऱ्यांवर हल्ला केली. अघाडीस चिरंजीव राजश्री बळवंतराव[1]च होते. मग हुजरात कुमकेस आली. बातेऱ्या घेऊन खंदकांत शिरून दोन अडीचशें माणूस कापून काढिलें. तेथेंच मोर्चा कायम करून दरवाजांस आगी दिल्या; व बुरूजही खणा-

---

१ दीक्षित पटवर्धन यादवाडकर.

वयास लाविलें. तेव्हां आंतल्यांनीं सांगोन पाठविलें कीं, 'आतां आम्हांस जीवदान मात द्यावें.' तेव्हां कौल न देतां शिडया लावून हल्ला केली ते सायंकाळच्या दोन घटका दिवसास केली. गांव घेतला. अगोदर दोन अडीचशें माणूस कापून काढिलें. वरकडांचे हात पाय कान कापले. मग दहा वीस तसेचही सोडून दिले. इतकें होईंजे तों अडीच प्रहर रात्र जाहली. प्रातःकाळ-पासोन स्नान केलेंच नव्हतें. मग येऊन स्नान केलें. रात्रौ दिवल्या लावून देसाई याच्या बायका तिघी व मूल एक व शिवापा हिऱ्यापा व सुरेराव वगैरे कारकून, दळवाई, नाईकवडी, तमाम सांपडले. कैदेंत ठेविले आहेत. श्रीमंतगडकरानीं शिरहट्टीची अवस्था पाहोन कौल घेऊन उतरले. तेथेंही कालच ठाणें पडलें. पूर्ववतप्रमाणें बाबूराव त्रिमल यांस तेथें ठेविलें. वरकड येलवंती, वडवट्टी, बालेहसूर हमगी, सावशी हीं ठाणीं यावयाचीं, त्यास ठाण्याच्या चिठ्या देऊन ठाण्याठाण्यास लोक पाठविले आहेत. सावशीखेरीज वरकड ठाणीं चिठ्यानेंच येतील. गुंता पडणार नाहीं. सांवशीस मात्र बळ पडेल असें वाटतें. येळवंती वगैरे ठाणियांचा फडशा होतांच सावशीकडे जात आहों. श्रीमंतांचे प्रतापें फत्ते जाहली. मोठें यश आलें. हल्ल्याचे दिवशीं चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस डोईस गोळी चाटोंन गेली. ईश्वरें मोठी खैर केली. चिरंजीवास यादवाडास जावयास निरोप दिला. आजच निघोन गेले. जखम हलकीच आहे. विठ्ठलपंत बर्वे फलटणकर ठार पडले. वरकड शें पन्नास माणूस जायां जखमी जाहलें. ठाण्यांत हत्ती एक होता तो हुजरातचे लोक व चिरंजीव दादाकडील लोकांकडे मिळोन गोटांत आला आहे. अद्याप कोणी द्यावा हें ठरलें नाहीं. राघो बापूजीकडे तूर्त अमानत ठेविला आहे. याखेरीज उंटें दहा व चाळीस पन्नास घोडे तमाम लोकांकडे पाडाव आले. गांव लुटोन फस्त केला. घरें देखील जळालीं. शिरहट्टीचें

ठाणें ठेविल्यानें शिबंदीस मात्र आट ! ठाणें राखवत नाहीं, गेल्यानंतर घ्यावयाचे श्रम, यास्तव ठाणें पाडावयाचा मनसबा केला आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठवितों. दुर्गकर अद्याप हिमतीनेंच लढतात. आणखी दोन महिने दम धरिल्यास तोंपर्यंत नदीचें पाणी उतरेल. मग उपराळ्यास चिंता नाहीं. तूर्त नदीपार होणें कळतच आहे. सावनूरचा जाबसाल अद्याप उरकला नाहीं. राजश्री कृष्णापा नाईक कलकेरी सावनुरास जाऊन पांच सा दिवस जाहले. लौकरच येतील. तिकडील फडशा जाहला म्हणजे सावशीकडे कूच होईल. तुम्हाकडील सविस्तर लिहावें. पहिले दिवशीं हल्ला केली ते दिवशीं लागू न जाहली म्हणून चिरंजीव राजश्री बळवंतराव यांणीं दुसरे दिवशीं फारच कस्त केली. चिरंजीवाची जखम डोईंत अवघड जाग्यांत होती, परंतु वडिलांचे आशीर्वादें खैर जाहली. आमच्या पथकांतील माणूस नामी फार जायां जाहलें. श्रीमंतांचे व वडिलांचे पुण्यप्रतापेंकरून श्रीगजाननानें यश दिलें. हल्ल्यानें ठाणें हस्तगत जाहलें, मोठी गोष्ट जाली ! देसाई याच्या निसबतचे उपयोगी तितके हस्तगत जाहले. बायका व मूल देसाई याचा आहे तो व दोन चार कारभारी सारीं ठाणीं हस्तगत जाहल्यावर मिरजेस पाठवून देतों. बहुत जतन करावे. शिरहट्टी पाडून टाकितों. दोन चार हजार खर्च पडला तर देखील कोणी सांपडले आहेत त्यांजवरच उगवितों. परंतु फिरोन लढा ठेवीत नाहीं ! आमच्या कमाविसदाराचे हातून राखवत नाहीं आणि आम्हास ठाणें घ्यावयास फिरोन प्रयास पडतात. यास्तव सदर्हूप्रमाणें करावें. याउपर चतुर्थी येथें करून सावनूर तालुक्यांत जातों. येथील लोकांचें पारिपत्य जाहल्यामुळें या प्रांतीं फारच धास्ती बसली आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २१६३. (भाद्र० शु० २–४ सपटंबर.)

लष्करनजीक शिरहट्टी येथून नागोराव[1] श्रीनिवास यांचें गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस पत्र. रवाना छ १ साबान.

" शिरटीकरांनीं शेवटपर्यंत लबाडीच केल्यावरून वद्य अमावास्या सोमवारीं राजश्री हरीपंततात्यांनीं व राजश्री भाऊंनीं हल्ला करून गांव घेऊन किल्ल्यांतील पांचशेंपर्यंत प्यादा कापून काढिला. बाकी राहिले ते कित्येक धरून आणून कित्येकांचे हातपाय कलम केले. जमीदाराचा[2] कबिला[3] व कारभारी यांस धरून कैद केलें. "

नं. २१६४. श्री. (भाद्र० शु० ८–१० सपटंबर.)

पै॥ छ ११ साबान. सन समान सबैन. भाद्रपद शु॥ १२.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ७ साबान बुधवासर मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्रें छ १ साबान गुरूवारचीं पाठविलीं तीं छ ५ मिनहूस पावोन लिहिला मजकूर कळला. साहुकाराशीं बोलणें होत आहे. ठराव जाल्यावर रवानगी होईल. होळकर जेजुरीसच आहेत. उदईक येणार. राजश्री बाळाराव आलेच आहेत. कर्नाटकचे मसलतीचा ठराव जालेवरी लिहोन पाठवूं. भोंसल्यास पत्रें वारंवार जातच आहेत. ते दसरा करून निघतील. हैदरखान याजकडे (येथून त्याच्या) वकीलाचीं पत्रें गेलीं आहेत त्यांचा जाबसाल अद्यापि आला नाहीं. करकंबेहून राजश्री बाळाजीपंत यांचीं पत्रें वारंवार येतात. होळकर जेजुरीहून आल्यावर नागाव्याचें व घोडयांचें वगैरे मनास आणोन सुटतील तीं सोडवितों. राजश्री रामचंद्र गणेश यांनीं मिरज प्रांतांत ऐवज घेतला त्याची यादी पाठविली ती पावली. उभयतां कारभा-

---

१ हा मुरारराव घोरपडयांचा दिवाण. २ शिरहट्टीकर देसायाचा. ३ कुटुंब.

ऱ्यांस दाखविलीं. होईल तो यत्न करून पहातों. शिरटी घेतल्याचीं पत्रें राजश्री हरीपंततात्यांचीं आलीं. हल्ला करून घेतली. आतां सावनुराकडून तुंगभद्रातीरास जातों, म्हणोन मशारानिल्हेनीं लिहिलें आहे. चित्रदुर्गकराचीं पत्रें निकडीचीं येतात. तुंगभद्रेस पाणी आहे. उपाय नाहीं. तुंगभद्रातीरास जातों म्हणोन लिहिलें आहे. राजश्री मोरोबादादाकडील मजकूर आहे तसाच आहे. तळेगांवाकडे तिगस्तां फौज होती त्याप्रमाणें राजश्री रामचंद्र गणेश व आनंदराव गोपाळ येणेंप्रमाणें दोन तीन हजार फौजेनिशीं पाठवितात. कारण काय म्हणाल तर श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईस आहेत. नद्यांस पाणी उतरत आलें आहे. याजकरितां फौज जमलेली असावी याजकरितां तरतूद होत आहे. मळणगांवकर शिंदे यांजकडील ऐवजाचा मजकूर लिहिला तो कळला. राजश्री अन्नोजी शिंदेही आले आहेत. श्रीमंत राजश्री नानाच्या समक्ष बोलणें चालणें जालें. श्रीमंत राजश्री नानांचें मानस शेतें यांनीं केलीं आहेत त्यांचा आकार होईल तो (यांनीं मिरजकरांस) द्यावा. जीं शेतें पडलीं व रयताव्यास लाविलीं त्यांचा पैका मिरजकरानीं स्वतांपासून घ्यावा. पडल्या पडसरीचा पैका यांजवळ मागों नये. " शेतें यांणीं केलीं त्यांचा आकार लिहोन आणवणें म्हणजे पैका आम्ही देतों " असें म्हणतात. त्यास यांणीं शेतें केल्याचा आकार गांवाप्रमाणें लिहोन यादी पाठवावी. " मळणगांवकर शिंदे आम्हाकडे आहेत म्हणोन वारंवार आम्ही सांगत असतां बोभाट वारत नाहीं, आम्हांसाठीं चालवावें म्हणत असतां बाळासाहेब चालवीत नाहींत, " असें रुष्टपणें (नाना) म्हणतात. त्यास वाजवी जमिनीचा आकार करून पाठवावा. ऐवजाचा निकाल करोन घेऊं. " शेतें यांणीं लाविलीं असतील तितक्यांचा आकार करून पाठवावा. पडल्या पडसरीचा पैका मागों " नये म्हणतात. अलीकडे

दुसाल्म हे शेतें करीतच नाहींत. तपशीलवार सालोसालची यादी पाठवावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१६५. (भाद्र० शु० १३–१५ सपटंबर.)

लष्कर मुक्काम सावशी येथून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र— पैा छ १७ साबान.

" कोपळ व धारवाड तालुक्कियाची मिळोन साडेचार लक्ष रुपये रसद रामचंद्रपंत मामा यांजकडे करार केली. अलीकडे पुरंदराहून कांहीं ऐवज आला नाहीं. पेशजी दोन लक्ष आले तेवढेच, आणखी तरतूद करून रवाना करणार असें शिवाजीपंताच्या लिहिण्यांत येतें. परंतु ऐवज येईल तेव्हां खरा ! गवगवा पाठीस लागलाच आहे. (पुण्याहून) थोरल्या तोफा इकडे रवाना करणार, होळकराची-ही इकडे रवानगी होणार, असें ऐकण्यांत आहे. तोफा लौकर इकडे याव्या. होळकराची रवानगी इकडे जाल्यास फारच उपयोग आहे. शिरटीवर वैरणीचे मोठे हाल जाले. आतां ओलें गवत थोडेंबहुत मिळत आहे. भवानराव प्रतिनिधि यांस फारच बरें नाहीं म्हणून ऐकतों, त्यास त्यांची अवस्था काय आहे ती लिहावी. प्रस्तुत महादजी शिंदे कोठें आहेत, काय मनसबा, तो लिहिणें. "

न. २१६६. (भाद्र० शु० १३–१५ सपटंबर.)

लष्करनजीक सावशी येथून परशुरामभाऊंचें छ १२ साबानचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस.

" शिरटी घेतल्यावर श्रीमंतगडकर प्यादे पळोन गेले. वरकड येळवंती, वडवट्टी, हमगी, बालेहसूर, बिदरहळ्ळी तमाम ठाणीं पडलीं. शिरटी येथेंच गणेश चतुर्थी करोन वैधृत व षष्ठी टाळोन वीस घटकांनंतर कूच केलें. सावशीकडे सारें लष्कर न्यावें तर मुलखाची

---

१ रामचंद्र नारायण अनोशी हुपरीकर.

खराबी होते आणि सावनूरकरांकडीलही फडशा जाला पाहिजे; यास्तव हरीपंततात्या सावनूर तालुक्यांत गेले. तुंगभद्रेकडेही आवई पडली पाहिजे यास्तव विसाजीपंत आठवले यांस पांच हजार फौजेनिशीं हावनुराकडे पाठविलें. आमचीं तीन पथकें व रास्ते व व्यंकटराव घोरपडे इतके मात्र मुक्काम मजकुरास आलों. सावनूरचा फडशा झाल्यावर हरीपंततात्यांसही इकडेच आणवितों. येथील गुंता उरकल्यानंतर जुनी हुबळी व मिश्रीकोट इकडे जाणार. शिरदीचें ठाणें पाडावयास प्रारंभ केला आहे. दुर्गकरांस कुमक करावी असें मनांत आहे. परंतु फौजेंत खर्चाची फारच हलाखी, आणि नद्यांसही पाणी आहे. पाणी उतरतांच कुमक करावी असें घाटत आहे. "

नं. २१६७. (१५ सपटंबर.)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून भाद्रपद शुद्ध त्रयोदशीचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस—

" महिमंतगडच्या सनदा आमच्या नांवें करून घ्याव्या म्हणोन श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें आलीं, त्यांजवरोन सनदा तयार करून तासगांवास पाठविल्या आहेत. होळकर आले. आज (श्रीमंतांच्या) भेटी जाल्या, राजश्री रामचंद्र गणेश व आनंदराव गोपाळ यांची रवानगी तळेगांवाजवळ रहावयासीं आजच केली. श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईस आहेत. लगता जवळ. याजकरितां फौज तयार असावी म्हणून रवानगी केली. चार हजार फौजेची नेमणूक केली आहे. जमा होत होत होईल. "

नं. २१६८. (२० सपटंबर.)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. रवाना भाद्रपद व. ४ पैवस्ती छ २१ साबान.

" श्रीमंत राजश्री नाना आज पुण्यास गेले ते भृगुवारीं येणार. होळकर कर्नाटकांत जावयाचें बोलणें आहे तें नाना परत आल्यावर काय तें पक्कें ठरेल. " छ १ साबानचीं पत्रें ती॥ रा॥ भाऊसाहेबांकडील आलीं. शिरटीवरच मुक्काम आहे. शिरटी हल्ला करूनच घेतली. देसाई यांचीं बायकामुलें व कारभारी सांपडले आहेत. येळवंती व श्रीमंतगड वगैरे ठाणीं घातलीं. सावशीस ठाणें घालून सावनूर तालुक्यांतून तुंगभद्रेवर जाणार " म्हणोन पत्रें आल्याचा मजकूर लिहिला तो कळला. " चित्रदुर्गकर अद्यापि हिमतीनें लढत आहेत. कुमक जाली पाहिजे." म्हणोन लिहिलें, त्यास नदीचें पाणी उतरल्यावर कुमक होईल. अगोदर कुमक होणें कळतच आहे ! " शिरटीवर चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस डोईस गोळी चाटून गेली परंतु खैर आहेत. चिरंजीव राजश्री राघोबादादासही दगडाची जखम लागली आहे. आणखीही नामी नामी माणूस जायां जखमी जाले ' म्हणोन लिहिलें तें कळलें. " करवीरकरांचा तह अद्यापि होत नाहीं. ते आपले जागां लढाईचें सामान तयार करितात. याजकरितां त्यांचें लौकर पारिपत्य करण्याविशीं महादजी शिंदे यांस पत्रें जावीं " म्हणोन लिहिलें, त्यास पत्रें वारंवार याच अन्वयें जात असतात. " करवीरकरांकडे रसद जावयाची बंद केली, यामुळें कडाड जाला आहे. त्यांनीं आम्हासीं बोलणें लाविलें होतें जे ' रसद हमरहा चालवावी. आह्मी तुमच्या तालुक्यास उपद्रव देणार नाहीं. तुह्मी आमच्या तालुक्यास उपद्रव देऊं नये. " आह्मी उत्तर केलें जे " सरकार आज्ञेशिवाय तह होणें नाहीं. " ह्मणोन लिहिलें तें कळलें. राजश्री हरीपंततात्यांकडे रोजमऱ्यास ऐवज (कारभारी) पाठवीत नाहींत. त्यांनीं सावनूर वगैरे जागां पोटास मेळवावें. सन आर्बा व सन खमस मिळोन विसा लक्षांच्या नालबंदीच्या ऐवजाच्या वराता कराव्या, म्हणून पत्रें लष्करास गेलीं. कापड रवाना होत आहे. नालबंदीच्या वराता होऊन ऐवज प्रावता जाला

ह्मणजे हरीपंततात्यांस उमेद येईल. तुंगभद्रेचें पाणी उतरल्यावर पलीकडे गेलें ह्मणजे चित्रदुर्गकरही चार रुपये देईल असें आहे. "

नं. २१६९. (भाद्र० व० ३–२० सपटंबर.)

लष्कर मुक्काम सावशी येथून परशुरामभाऊंचें छ १७ सा-
बानचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" जामदारखान्याची राहुटी व कचेरीचा डेरा व मुदबखाचा डेरा यांप्रमाणें तीन दाग़िने अगदीं कामांतून गेले आहेत. तयार करोन पाठवोन द्यावे म्हणोन पेशजी लिहिलेंच आहे. त्यावरून तयार केलेच असतील. याउपर दोनी डेरे व जामदारखान्याची राहुटी लौकर पाठवून द्यावी. "

नं. २१७०. (भाद्र० व० ३–२०सपटंबर.)

लष्कर मुक्काम सावशी येथून परशुरामभाऊंचें छ १७ सा-
बानचें पत्र मिरजेस गंगाधर गोविंद यांस—

" राजश्री मुरारराव हिंदुराव घोरपडे यांची स्त्री व शिवराम बाबा यांची स्त्री मिरजेंत आहेत. राजश्री राव सेनापति यांचा व आमचा स्नेह. त्याजवर दृष्टि ठेवून सौ॥ राणूबाई व सौ॥ सुबाबाई यांचा परामर्ष हरएकविशीं तुम्ही करीतच आहां. त्याप्रमाणें पुढेंही करावा. "

नं. २१७१. (भाद्र० व० १२–२८ सपटंबर.)

विठ्ठल कृष्ण दातार यांचें येळवंती परगणे लक्ष्मेश्वरें येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. रवाना छ २५ साबान पैवस्ती छ १ रमजान, आश्विन शु० २ समान सबैन.

" श्रीमंत राजश्री पांडुरंगराव तात्या व (तीर्थस्वरूप) रामचंद्रपंत वगैरे शत्रूकडे पाडाव गेल्यावर फौज माघारी आली. आह्मी मनोळीच्या मुक्कामीं लष्करांत आलों. तेव्हां स्वामींनीं आज्ञा केली जे,

भाऊसाहेबांची मर्जी राखून आज्ञेप्रमाणें बरोबर लष्करांत राहणें. त्यावरोन शिरहट्टीस लष्कर येई तों लष्करांतच होतों. शिरहट्टीस मोर्चे लाविल्यावर आम्हांस भाऊसाहेबांनीं आज्ञा केली जे, लक्ष्मेश्वर आदी-करून तमाम ठाणीं बसवावीं. त्याप्रमाणें आम्ही जाऊन ठाणीं बसविलीं. उपरांतिक शिरहट्टी हस्तगत जालेवर लष्कर तेथून कूच कतरे समयीं भाऊसाहेब आम्हांस बोलिले जे, कसेंही करोन आम्हास ५० हजार रूपये खर्चास देणें. तालुक्यापैकीं ८०।९० गांव बेचिराख जाले आहेत. बहुतेक परगणा उद्वस्त जाला आहे. हे तर इतके रूपये मागतात: यांस काय उत्तर द्यावयाचें ती स्वामींनीं आज्ञा करावी. शिरहट्टीचा किल्ला पाडून टाकणेंविशीं भाऊसाहेबांनीं आग्रह धरून किल्ला पाडावयाची सुरूवात केली आहे. हैदरखान व चित्रदुर्गवाले यांचा तह जाला. दुर्गवाल्यानीं अकरा लक्ष होन खंडणी कबूल केली. पैकीं रोख दोन लक्ष होन दिले. हैदर नाइकानें पट्टणास जावयाचा निश्चय करून इकडे कुमदान वगैरे पांच हजार स्वार व दहा हजार प्यादे येणेंप्रमाणें रवाना केले. सावनूरकरानीं खंडेराव याची दिवाण-गिरी काढून गिरिधरराव याचा पुत्र श्रीनिवासराव यास दिवाण नेमिलें. खंडेराव कैदेंत आहे त्याचे फार हाल होत आहेत. खंडणीचा अद्यापि ठराव जाला नाहीं. त्यासाठीं हरीपंततात्या सावनुरजवळ बेवनहळ्ळी-वर तळ देऊन राहिले आहेत. "

नं. २१७२. (आश्विन शु० ५-६ अक्टो०)

शिवाजी बाबाजीचें पत्र भिवडीनजीक पुरंदर येथून छ ३. रमजानचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस.

" लष्करचें वर्तमान तीर्थस्वरूप भाऊ सावशीवर आहेत. सावशीस मोर्चे लागले आहेत. (आंतल्यांचें) बोलणेंही लागले आहे. राजश्री हरीपंततात्या सावनूर तालुक्यांत गेले. हैदरखान

चित्रदुर्गावर आहे. दुर्गकर हिमतीनें झुजत आहेत. परंतु हैदरखान जिदीस आला आहे. येविशींची पैरवी श्रीमंतांनीं करावी. एकवेळ दोन लक्ष रुपये (कारभाऱ्यांनीं लष्करास) पाठविले त्यावर पैसा नाहीं. याकरितां (वेळेवर) तरतूद होऊन ऐवज जावा. " म्हणोन लिहिलें, त्यास येविशींची विनंती करीत आहों व कारभारी उभयतांही तरतूद करीत आहोंत. होळकराची रवानगी कर्नाटकांत होईलसा सुमार दिसतो. "

नं. २१७३. (आश्विन शु० ५–६ अक्टोबर.)

भिवडीनजीक पुरदर येथून शिवाजी बाबाजीचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस. पै॥ छ ५ रमजान.

" रहिमतपुराविशीं शिंदे खटपट करितात, त्यास बातमींत असावें " म्हणून लिहिलें, त्यास आम्ही बातमींत आहों. " शिंदे वडगांवचा तट पाडीत होत. थोडासा पाडिला. आतां पाडीत नाहींत. " म्हणून लिहिलें तें कळलें. हैदरखानाचे वकील रास्त्यांच्या विद्यमानें बोलत होते. वकिलांनीं हैदरखानास पत्र पाठविलें त्याचें उत्तर अद्यापि आलें नाहीं. सुरापूरकर बेरडानें लबाडी करून तिकोटें ठाण्यांची जप्ती करण्याकरितां दोन हजार जमाव गेला होता त्यास धुडावून लाविलें. "

नं. २१७४. (आश्विन शु० ८–१० अक्टो०)

परशुरामभाऊंचें पत्र छ ७ रमजानचें मुक्काम कारडगीनजीक सावनूर एक कोस- येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" मुक्काम मजकुरीं परवां आलों. येथून राजश्री हरीपंततात्यांचें लष्कर तीन कोस आहे. जे दिवशीं येथें आलों तेच दिवशीं राजश्री तात्या येऊन भेटून गेले. तदोत्तर दुसरे दिवशीं आम्ही त्यांच्या लष्करास जाऊन आलों. आजवर सावनूरकरांच्या निशेचा गुंता पडला

---

१ येसाजी शिंदे कोल्हापूरकर.

होता. राजश्री रामचंद्रपंत मामा गेल्यावर पक्की निशा जाली. दोन लक्ष पंचाण्णव हजार रुपये खंडणी व याखेरीज दिवाणागिरीची घालमेल होऊन गिरिधरराव यांचे पुत्र श्रीनिवासराव यांस दिवाणगिरी देविली. याजमुळें जाजती वीस; येणेंप्रमाणें तीन लक्ष पंधरा हजार नक्कच घेतले. येथून कूच करून हावनुरास जाऊन तेथील खंडणी करूं. तेथें चार पांच मुक्काम होतील. तेथून कित्तुराकडे जावें, जातां जातां जुनी हुबळी घ्यावी, असा मनसबा आहे. तुम्ही आम्हाकडे कापड रवाना केलें आहे तें दसऱ्यास येईल तर फारच बरें. मुदबखाचा व कचेरीचा डेरा व जामदारखान्याची राहुटी अगदीं कामांतून गेली. दोन दिवस कशीबी गुजराण करितों; परंतु पर्जन्य पडतो, विपत्य होतात, यास्तव लौकर रवानगी करावी. "

श्रीगणपति.

नं. २१७५. (आश्विन शु० १५-१६ अक्टोबर.)

पै॥ छ १९ रमजान. सुरूसन समान सबैन मय्या व अल्लफ.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ १३ रमजान मुकाम वाळानदी उत्तर तीर जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुह्मी पत्रें पाठविलीं त्यांचीं उत्तरें पुरवणीपत्रावरून कळतील. इकडील वर्तमान तर " सावनूरकराचा फडशा जाहला. हवाला ऐवजाचा राजश्री रामचंद्रपंत मामांनीं घेतला " म्हणोन करडगीचे मुक्कामाहून लिहिलेंच आहे. त्याअलीकडील वर्तमान तर हावनूरची बेरीज ठरेल ती सावनूरच्या ऐवजांत वजा द्यावी असा करार आहे. त्यास हावनूरकरांस नेट बसवून ठराव करावा लागतो. यास्तव करडगीहून कूच करून मध्यें एक मुक्काम दसऱ्याकारितां केला. परवां मुक्काममजकुरास आलों, वाळानदीस पावसामुळें पाणी चार दिवस आलें आहे. उतार नाहीं. हावनूरचा तालुका नदीपलीकडे आहे. अद्यापि बोलोन चालोन

हावनूरचा ठराव जाहला नाहीं. नदी उतरल्यानंतर एक मुक्काम त्यांच्या तालुक्यांत जाहल्यावर सहजांत उरकेल ! अगाध नाहीं. दुर्गचा तह जाहलेला बिघडला, परंतु फिरोन शत्रूनें आतां मोर्चे द्यावयाची गोष्ट राहिली. दुर्ग सोडून हरपनहळ्ळीच्या रोखें हैदरखान एक मजल आला आहे. हरपनहळ्ळीकरांस खंडणीचा तगादा शत्रूनें लाविला आहे. अद्याप बोली उरकली नाहीं. नदीपलीकडे जागां जागां शत्रूनें चौक्या ठेवून बातमीस इकडील माणूस फिरकूं देत नाहींत. तुंगभद्रेस अद्याप उतार नाहीं. आज चार दिवस पाऊस उघडला आहे. हावनूरची खंडणी अगोदर राजश्री विसाजी-पंत यांनीं पंचवीस हजार रुपये केली आहे, परंतु निशा नाहीं. सावनूरकरांचे मतें आणखी साधेल तेथवर साधावें. परंतु संस्थानांत ताकद कांहींच नाहीं. जास्ती याउपर चढेलसें दिसत नाहीं. राजश्री पुरुषोत्तमपंत दुर्गकर आमच्या लष्करांतच आहे. त्याचे मतें तुंगा उत्तर-तीरीं पाणी उतरेपावेतो महिना पंधरा दिवस राहावें. पाणी उतरल्यावर पार जावें. उतार होय तोंपर्यंत कित्तुराकडे जाल तर चित्रदुर्ग संस्थान रहात नाहीं अरें म्हणतात. तें खरेंच आहे. पण उत्तरतीरीं उगेच महिना पंधरा राहिल्यानें खावें काय ? पोटापाण्याची सोय पाहोन क्रमावें लागतें. " कांहीं खर्चास देऊं, परंतु पैका दुर्गाहून आणिल्याशिवाय येथें मिळणार नाहीं. आणून द्यावा तर वाटेचें संकट. सर्व शत्रूचा व्याप. " असें मशारनिल्हे म्हणतात. तह जाहलेला मोडावयाचें कारण हेंच कीं, राजाच्या भावास ओलीस पट्टणास रहा असें (हैदर) म्हणतो. ती गोष्ट होत नाहीं. याजमुळें बिघाड जाहला. दुर्ग खेरीजकरून त्याच्या प्रांतांत शत्रूचाच व्याप आहे. आमचे मतें उगेच येथें बसावें तें कित्तुराकडे जातां जातां जुनी हुबळी घेऊन तिकडे जावें. तें विल्हेस लागे तोंपर्यंत पाणीही उतरतें. मग पलीकडे जावयाची मसलत करावी. अथवा सोंदें बिदनूर प्रांतांत तर्त जाऊन

मुलूख मारावा असें आहे. यांत ठरेल तें मागाहून लिहून पाठवितों. कापड घेऊन अंताजीपंत गोखले घटपा उत्तरतीरास हुणशाळाजवळ आल्याचें पत्र कालच आलें. पर्जन्य लागला आहे. चिखलामुळें हलके हलके येतों असें मशारनिल्हेनीं लिहिलें आहे. याउपर लौकर येऊन पावतील. प्रस्तुत तात्या[1] व आम्ही व विसाजीपंत ऐसे एकत्रच आहों ! हा रोंख सोडून कित्तुराकडे जावें तर शत्रूचा जमाव किरकोळ अलीकडेही उतरतो. सावनूरकरांचा बचाव होत नाहीं. सावनूरकरांनीं खंडेराव याची दिवाणगिरी काढिली याजमुळें बहुत भितात. अंदेशांत पडले आहेत. चहूंकडून संकटें आहेत. कित्तूरकर याचा मनोदय कांहीं द्यावें असा आहे. आम्हीही जें समयास येईल तें द्यावें म्हणतों. कित्तुरास आग्रह करून फौज घेऊन जावी तर हे[3] गेल्यावर हेही कित्तूरकराजवळ कांहीं निराळा घासदाणा मागूं लागतीलच. तेव्हां केवळ नाहीं म्हणतां येत नाहीं. दोन चार ऐवज एकदांच निर्माण होतील असा समयही नाहीं. शत्रु जवळ, तेव्हां निखालस तेथेंच गुंततां येत नाहीं. असें आहे. यांत सुमार पाहून जसें साधेल तसें करितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २१७६. (आश्विन वद्य—अक्टो० दु० पंधर०)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. कचेरीचा डेरा व मुदबखाची व देवपूजेची राहुटी व जामदारखान्याची अगदीं उभी करावयाचे कामांतून गेली. टाकून दिली. फक्त मैदानांत स्वयंपाक जेवण होत असतें. पर्जन्याची अतिवृष्टि. आज दोन दिवस मात्र उघडला आहे. थंडीस प्रारंभ जाहला. एक राहुटी राजश्री हरीपंततात्यांनीं दिली आहे, तेवढ्यावर सर्व गुदराण करितों. मोठे

---

१ हरिपंत तात्या फडके. २ आठवले. ३ फडके व आठवले. ४ पत्र परशुरामभाऊंचें.

विस्मत्य होतात. लिहितां न पुरवे. आजला रवानगी केली असल्यास उत्तम. न केली असल्यास पत्र पावतेक्षणीं रवानगी करावी. लौकर येऊन पावल्यास बचाव होईल. आम्हाकडीलही मोबदला नाहीं असें जाहलें आहे. रवाना जाहलें असेल तर उत्तम. नाहीं तर जलदीनें रवाना करावें. हुजरातींत खर्चाची ओढ मोठी पडली आहे. इलाज नाहीं. मागून[1] खर्चास कांहीं येत नाहीं. याउपरी कशी गत होईल न कळे. शत्रु तर जवळ. याउपर नदी उतरोन पार गेलें पाहिजे असें आहे. श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २१७७. (आश्विन व० ४--२०आक्टो०)

परशुरामभाऊंचें छ १७ रमजानचें पत्र. लष्कर मुक्काम वाळानदीचें तीर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस--

" हैदरखान अणजी अळूरावर आहे. पुढें हरिहरास येणार अशी आवई मात्र आहे; परंतु अद्यापि फौज अथवा खासा आला नाहीं. नदीपलीकडील बातमी इकडे कळों नये म्हणोन शत्रूनें जागजागां घांटांनीं चौक्या ठेविल्या आहेत. दुर्गकराचा तह बिघडला. फिरोन मोर्चे दुर्गास द्यावे या मतलबांत शत्रु आहे, परंतु आम्ही नदी उतरावयाचा मार्ग पहात बसलों आहों याजमुळें तोही शहास गुंतत नाहीं. जर आम्ही हुबळी कित्तुराकडे गेलों तर मग दुर्गाचे गळीं पडावें व कांहीं फौज बंकापूरचे आसःयास पाठवावी या मनसब्यांत आहे. आमचे मतें तूर्त कित्तुराकडे गेल्यास ठीक नाहीं. तेव्हां जडें अनवटीकडे नदीचें पाणी उतरे तोंपर्यंत जावें, तिकडील मुलुख मारावा असें आहे. घडेल तें खरें. हैदरानें कुमदानास कैद केलें होतें. मागोन सोडोनही दिलें. पुनः हल्लीं कैद करून पट्टणास रवाना केलें.

---

१ पुण्याहून.

' नालबंदीच्या ऐवजाच्या वराता कराव्या. ऐवज पावेल. ' म्हणोन राजश्री नाना फडणीस यांणीं लिहिलें होतें. येथें लोकांजवळ आमची पत राहिली नाहीं. कोणी वराता घेईनात ! गरगशा ! तेव्हां दीड पावणेदोन लाख रुपयांचे हवाले कबूल करून पुण्यास वरात घेऊन पाठविली आहे. ऐवज उगवला तर उत्तम. नाहीं तरी मोठी फजिती होईल ! "

नं. २१७८. (आश्विन व० ४--२० आक्टो०)

लष्कर मुक्काम वाळानदीतीर येथून परशुरामभाऊंचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—पै॥ छ १९ रमजान.

" शिरटीकरानें हरामखोरी फारच केली आहे. त्याचीं मुलें-माणसें व कारभारी कैद करून मिरजेस शिरटी घेतली तेव्हांच पाठविले आहेत. त्यांच्या चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त नीट राखावा. सरकारांतून लष्करास कापड आलें तें दसऱ्याच्या आदल्या दिवशींच लष्करांत येऊन पोंचलें. सणास उपयोगी पडलें. आमचेंही कापड आधीं दोन दिवस येऊन पोंचलें. "

नं. २१७९. (२० आक्टो०)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें पत्र आश्विन कृष्ण चतुर्थीचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—पै॥ छ २१ रमजान.

" तीर्थस्वरूप राजश्री भाऊंचीं पत्रें आलीं. सावशी, मिश्रीकोट वगैरे ठाणीं घातलीं. जुने हुबळीस मोर्चे लावणार होते. परंतु शत्रूकडील बातमीचा म्हार सांपडला. धरून मार देतां त्यानें सांगितलें कीं " कुमदान व मीर (रेजा) ब बर्वे फौजसुद्धां मुरगोडापलीकडे दोन कोसांवर आले. " सत्य मिथ्या न कळे." म्हणोन लिहिलें तें कळलें. " होळकराची समजूत जाली न जाली, कर्नाटकांत कधीं येणार, तें लिहून पाठवावें " म्हणोन लिहिलें, त्यास त्यांनीं मनस्वी

आड घातले आहेत. कर्नाटकांत शिंद्यांस व आपणास पाठवाल तरी आपण जाऊं; एकटेच जात नाहीं, ह्मणतात ! जातां दिसत नाहींत. चार दिवसांत काय तो जाबसाल करोन ते वाफगांवास जाणार."

नं. २१८०. श्री. (२ नोवेंबर.)

श्रीमंत राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ कार्तिक शुद्ध द्वितीया रविवासरे मुक्काम नजीक पुरंधर. वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन संभाळ होत नाहीं. तरी सदैव पत्रीं संभाळ करावा. तिकडील राजकीय स्वकीय सविस्तर लिहावयासी आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर होळकर व शिंदे व भोंसले यांस कर्नाटकांत पाठविण्याविशीं विनंति कारभाऱ्यांजवळ करावयाची ती करीत असतों. भोंसले बाहेर निघाले आहेत. परंतु परस्वाधीनचा प्रकार ! येतील तेव्हां खरें. शिंदे करवीर-करांच्या मसलतीस गुंतले आहेत. विना त्यांचा बंदोबस्त जाहल्या-शिवाय दुसरी चाकरी कबूल करीत नाहींत. होळकर राजश्री गोविंद-राव गाइकवाड यांचें पद[1] काढिल्यामुळें रुसले आहेत. नजीक पुरं-धराहून कूच करून जेजुरीस गेले. तेथून कूच करून वाफगांवास जाणार. कर्नाटकांत जात नाहीं. राजश्री कृष्णराव[2] बळवंत यांची रवानगी तीन चार हजार फौजेनिशीं आपणाकडे होणार. लोकांस बोलावूं पाठविलें आहे. आपणाजवळ यावयास दोन मास कनिष्ठपक्षीं

---

१ गायकवाडांची सरदारी कारभाऱ्यांनीं गोविंदरावाकडून काढून फत्तेसिंगराव यास दिली त्यामुळें. २ आपा बळवंत मेहेंदळे. कृष्णराव बल्लाळ व कृष्णराव बळवंत अशीं दोन नांवें पेशवाईच्या कागदपत्रांत येतात. दोन्हीं नांवें सारखीं दिसतात तरी त्या व्यक्ति अगदीं भिन्न आहेत. कृष्णराव बल्लाळ हे मुत्सद्दी बारामतकर काळे व कृष्णराव बळवंत हे सरदार मेहेंदळे.

पाहिजेत. धौशाचें छ ११ रमजानीं कूच जाहलें. आपणाजवळ अविलंबेंच सामील व्हावें. येणेंप्रमाणें निजाम अल्लीखान यांची त्यास आज्ञा आहे. आपणास सत्वरच सामील होतील. ते सामील जाल्याशिवाय आपण विचार पाहून बलाबल पाहून कर्तव्य तें करावें. हांवभरी न होतां आब राखोन कर्तव्य तें करावें. श्रीमंत राजश्री नाना पुण्यास गेले आहेत. राजश्री बापू सासवडास आले आहेत. राजश्री त्रिंबकराव नारायण यांसी निम्मे दौलत सरदारी द्यावी. निम्मे राजश्री रघुपतराव. त्यांस बोलावूं गेले आहेत. त्यांणींही फौज कांहीं जमा केली आहे. परंतु येथून पत्रें गेलीं आहेत व राजश्री आनंदराव गोपाळ पथकसुद्धां तिकडे गेले आहेत, तेव्हां राजश्री रघुपतरावही येतील. जाहला कारभार शेवटास जाईल. राजश्री फत्तेसिंग यांजकडे अठरा लक्ष ठरले. त्याप्रमाणें पांचांची निशा जाहली. पौष मासची हप्तेबंदी दहा लक्षांची आहे. चैत्रमासीं तीन लक्ष द्यावे. येणेंप्रमाणें ठराव जाहला आहे. वराता नालबंदीच्या येतात त्यांची तोड पाडावी यां विचारांत कारभारी आहेत. कसेंही करून ऐवज देतात. गुंता नाहीं. राजकी व श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील अधिकोत्तर लिहावेंसें नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१८१. (२ नोवेंबर.)

विठ्ठल कृष्ण दातार यांचें येळवंती तालुका लक्ष्मेश्वर येथून मिर. जेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. रवाना कार्तिक शु० २ पैवस्ती छ ६ सवाल. समान सबैन.

" हरीपंततात्या व भाऊसाहेब यांचा मुक्काम बसवनकोप तालुके सावनूर येथें आहे. हैदर नाईक बारीपलीकडे पांच कोसांवर आहे.

---

१ त्रिंबकराव व रघुनाथराव हे दोघे नारो शंकर राजेबहादुर यांचे दत्तपुत्र. २ बंधु त्र्यंबकराव यांशीं लढण्याकरितां. ३ आपसांत न भांडण्याविषयीं पत्रें. ४ सरदारी दिल्याबद्दल सरकारांत घेण्याचा नजराणा.

तमाम नदीकिनाऱ्यास चौक्या बसल्या आहेत. आम्हीही इकडून सरदेचे गांव आहेत तेथें इतबारी लोक ठेविले आहेत."

नं. २१८२. (कार्तिक शु० २–२ नोवेंबर.)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बावाजीचें छ १ सवालचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र.

" होळकरांचा प्रकार तूर्त रुसव्यामध्येंच आहे. समजाविशीचा प्रकार न घडल्यामुळें फौजसुद्धां होळकर कूच करोन जेजुरीस गेले. तेथोन वाफगांवास जाणार आहेत. पुढें सरकारांतून जाबसाल होऊन त्यांचे समजाविशीचा प्रकार कसा काय घडेल तो लिहून पाठवूं. लष्करांहून श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें आलीं. वाळानदीवर आहेत. सावनूरची खंडणी तीन लक्ष पंधरा हजारांवर ठरली. हावनूरचा फडशा आजपावेतों जालाच असेल. तुंगभद्रेस अद्यापि पाणी आहे. हैदरखानाचे मोर्चे चित्रदुर्गचे उठले. फिरोन मोर्चे बसतं नाहींत. तो हरपनहळ्ळी तालुक्यांत आहे. चौक्या मार्गांनीं बसविल्या आहेत."

नं. २१८३. (कार्तिक शु० २–२ नोवें.)

शिवाजी बाबाजीचें पुण्याहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र.

" राजश्री गोविंदराव गायकवाड यांजकडे सेनाखासखेलीचें पद होतें तें काढून राजश्री फत्तेसिंग यांस करार करून १८ लक्ष रुपये करार केले. त्यास गोविंदराव याचे दरम्यान होळकर वगैरे सरदार होते तेणेंप्रमाणें गोविंदराव याचें येणें न जालें. दरम्यानगिरी नसतां रुसवा करून कूच करून जेजुरीस गेले. पुढें वाफगांवास जाणार. समजुतीचा प्रकार होईल तो लिहून पाठवूं. "

नं. २१८४. (कार्तिक शु० २–२ नोवें.)

शिवाजी बाबाजीचें पुण्याहून पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

" नारो शंकर याचे दत्तपुत्र दोघे. त्यास पहिला त्रिंबकराव घेतला होता त्याजवर इतराजी जाली तेव्हां दुसरा घेतला. त्यासच गुदस्तां (कारभाऱ्यांनीं) सरदारी देऊन पांच लक्ष रुपये नजराणा घेतले. एक साल त्याजकडे वहिवाटलें. सालमजकुरीं रा॥ त्रिंबकराव उभे राहिले. तेव्हां निमेनिमेप्रमाणें सरदारी द्यावी, सरंजाम वांटून द्यावा, दोघांपासून दहा लक्ष रूपये घ्यावे, येणेंप्रमाणें ठराव जाला. वस्त्रें जालीं. गोविंदराव गायकवाड यांजकडील सेनाखासखेली दूर करून राजश्री फत्तेसिंग यांजकडे करार जाली. पदाचे पांच लक्ष व सालाबादचे तेरा लक्ष एकूण अठरा लक्ष करार जाले. वस्त्रें जाहलीं. याऐवजींच हरीपंततात्यांकडील वरातांस ऐवज देणार. भोंसल्यास येण्याविषयीं पत्रें जातात. कार्तिकअखेर आले तरी येतील. "

श्रीगणपति.

नं. २१८५. (कार्तिक शु० ८–८ नोवेंबर.)

पौ छ ११ सवाल. सन समान सबैन. कार्तिक मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. " सांप्रत आपला मुक्काम कोठें आहे व हैदरखान कोठें आहे व पुढील मसलतीचा विचार विस्तारें ल्याहावें " म्हणोन तुम्ही लिहिलें, ऐशास आज पाऊण महिना वाळानदीनजीकच राजश्री हरीपंत व विसाजीपंतसुद्धां येथें आहों. नदीस तर अद्याप उतार नाहीं. हैदरखान अणजी अलूरा वरच्च आहे. अद्याप पुढें येत नाहीं. दुर्गकरांचा तर हैदराशीं बिघाड जाहल्याचें पहिले पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळलेंच असेल. संस्थानिकांचीं पत्रें आम्हांस आलीं आहेत कीं, " आपण समीप आलां याजमुळें बिघाड केला. शत्रु आमच्या हिसाबांत नाहीं. आपण तयार होऊन लौकर यावें " अशीं पत्रें आलीं आहेत. रा॥ पुरुषोत्तमपंत

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ चित्रदुर्गकरांचा कारभारी.

येथेंच आहेत. पत्रांचीं उत्तरें अवसान देऊनच लिहोन पाठविलीं. आम्ही पार गेल्यावर त्याजकडून चार रूपये प्राप्त होतात व जमेत-सुद्धां बरोबर येतो यांत गुंता नाहीं. हरपनहळ्ळीची अद्याप खंडणी नाहीं. राजश्री मुरारराव घोरपडे कपालदुर्गावर[1] कैदेंत होते, त्यास ते किल्ल्याचे लोक सुद्धां फितावून पळोन गेले असें वर्तमान बापूजी नारायण यांनीं लिहिलें आहे. परंतु तथ्य दिसत नाहीं. अशी गोष्ट घडावयाचीच नाहीं. जर घडली असल्यास त्यांच्या[2] दैवास जोडाच नाहीं ! लक्ष प्रकारें लटकेंच दिसतें. खंडेराव यांची तगेरी[3] करून श्रीनिवासराव यास नबाबांनीं दिवाणगिरी दिली होती. त्याचे वस्तु निभावणी होईना आणि खंडेराव हैदरखानाच्या पक्षांतील, मागें-पुढें पेंच पडेल, हें जाणोन खंडेराव यांसच फिरोन दिवाळीचे दिवशीं दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. खंडणीचा हवाला राजश्री रामचंद्रपंत मामांनीं घेतला आहे. ऐवजाचे उगवणीस्तव मामा अद्याप तेथेंच आहेत. कांहीं निशा जाहली, कांहीं होणें, इतक्यांत श्रीनिवास गिरधरराव यांची घालमेल जाहली. तत्राप ऐवजास खोट नाहीं. नबाब निजामअल्लीखान डेरेदाखल जाहले. धवशा गुडमटकलाजवळ आहे. लौकरच कृष्णापार होणार. तुंगभद्रेचें पाणी उतरावयास आणखी महिना पंधरा दिवस लागतील तोंपर्यंत मुष्टुरचे सुमारें जावें. अदवानीकडेही शह द्यावा. इतक्यांत पाणीही नदीचें उतरतें. मग पार जाणें होईल. एका दोहों दिवशीं येथून कूच होईल. कंपलीच्या सुमारें जावें. तेथें सर्व जमा-तील. पुढें मुष्टुरच्या घांटानें पार जावें अशी योजना आहे. होळकर इकडे कधीं येतात पहावें ! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ काबुलदुर्ग अशेंही या किल्ल्याचें नांव इंग्रजी पुस्तकांत लिहिलेलें आढळतें. २ मुरारराव्याच्या. ३ तगेरी म्हणजे बडतर्फी. ४ सावनूरच्या.

नं. २१८६. (कार्तिक शु० ९–९ नोवेंबर.)

लष्कर मुक्काम वाळानदीतीर येथून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. पैवस्ती छ ११ सवाल.

" आज पंधरा दिवस पर्जन्य एकसहा पडत आहे. डेरा तर उभा करावयाच्या कामांतून गेला. गुंडाळून ठेविला आहे. जामदारखाना, मुदब्रख व देवपुजेचे राहुटीची तीच अवस्था आहे. एक राहुटी नवी राजश्री हरीपंततात्यांनीं दिली आहे तींतच निद्रा व कारभार होत आहे. फार विपत्य होतात. हुजरातीच्या वराता पुरंदरास राजश्री हरीपंताकडून होत आहेत. वरातांप्रमाणें मुदतीचे ऐवज लोकांस पावतो. त्याचा बोभाट नाहीं. रोजमुऱ्याचेंच परम संकट आहे. कसा परिणाम लागेल न कळे ! तूर्त दोन महिन्यांच्या मुदतीच्या वराता केल्या आहेत. ऐवज पावला पाहिजे. नाहीं तरी संकट चाकरीचुकरीच्या वेळेस पडेल. माझ्या हातून जेथवर ओढवेल तेथवर ओढीतच आहों. एकच संकट नाहीं ! राजश्री हरीपंततात्यांची ओढ. आमच्या दोनी पथकांची ओढ. आम्हाजवळ हुजरातीसंबंधें खर्च आहे त्याची ओढ ! असें संकट पडलें आहे. मजला तर कांहीं सुचेनासें जालें आहे. परिणाम श्रीस्वाधीन आहे ! माझा बिचार व पत किती आहे तुम्ही जाणतच आहां. फौजेस झाडून निरोप द्यावा तर एकटें राहून मनसबे सांगून चालवीन म्हटल्यास कसें चालेल ? असो. ईश्वरें चिंता निवारावी ! "

नं. २१८७. (कार्तिक व० ६-२० नोवेंबर.)

शिवाजी बाबाजी म्हैसकर यांचें पुण्याहून मिरजेस रवाना छ १९ सवालचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस.

" वसईस राजश्री विसाजी केशव याचे मानसपुत्र येसोबा म्हणून गृहस्थ होता त्यानें वसई (श्रीमंत दादासाहेबांस) द्यावी असें

केलें होतें. सुचें जाल्यावर विसाजी केशव यांणीं बंदोबस्त करून येसोबासुद्धां कैद केलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईसच आहेत. विलायतेहून कलकत्यास पत्रें आलीं. कलकत्याहून सरकारांत पतें आलीं व मुंबईवाल्यांसही परभारा पत्रें गेलीं आहेत कीं, " तुह्मी दादासाहेबांचा पुस्तपन्हा करूं नये. त्यांस आसरा न देणें. कुमक न करणें. चित्तास येईल तिकडे जातील. " कलकत्तेवाल्यांनीं बंदोबस्त केला आहे तो पक्का आहे. "

नं. २१८८. (कार्तिक व० ९--२३ नोवें.)

लष्करनजीक गलगनाथ येथून परशुरामभाऊंचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस रवाना छ २२ सवाल.

" आबाजी महादेव व तुळाजी पवार हे अद्यापि बंकापुरासच आहेत. उभयतांनीं तेथून हुजरातेंत भेद केला होता. परंतु दोघे चौघे (फितुरी) धरून कैद केलें. जमखिंडीस पाठविले. एक दुसऱ्याचे हातपायही तोडिले. याजमुळें धास्त बसली. मुख्यत्वें धणी नाहीं या. मुळें दाब कमी पडला आहे. श्रीनेंच पार पाडावें ! "

नं. २१८९. श्री. (कार्तिक व० ९–२३ नोवेंबर.)

पैा छ २७ सवाल. समान सबैन.

सेवेशीं शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २२ सवाल मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. तीर्थस्वरूप राजश्री भाऊंचीं पत्रें सिदापूरनजीक वाळा नदी येथील मुक्कामचीं आलीं होतीं. " नद्यांस उतार जाहला नाहीं. हैदरखानाचा मुक्काम हरपनहळ्ळीजवळ आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून राजश्री आबाजी महादेव बंकापूरचे किल्लेस आला. त्याणें हुज-

---

पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

रातींत फितवा आरंभिला. फौज फोडावी या मसलतींत आहे. सावधता करितों. खर्चाची ओढ लष्करांत भारी " म्हणोन लष्करचे पत्रांतील वर्तमान लिहिलें तें कळलें. तिसरे तारखेअलीकडे पत्रें आलीं नाहींत. मागाहून सविस्तर लिहितों म्हणोन लिहिलें होतें. त्यास अलीकडे लष्करचें वर्तमान पत्रें आलीं असल्यास लिहावें. " जे फितुरांत असतील त्यांचें पारिपत्य बेमुरवत करावें म्हणजे दुसरे फंदफितूर करूं पावणार नाहींत. याची पैरवी हुजुरून व्हावी " म्हणोन लिहिलें, त्यास फितुरांत आहेत त्यांचें पारिपत्य यथास्थित होईलच. आणखी कोण कोण फितुरांत आहेत त्यांची चौकशी होतच आहे. पारिपत्य चांगलेंच करावें असा प्रकार होईल. चिंता नाहीं. होळकराची समजूत पडलियाचें कळवावें म्हणोन लिहिलें, त्यास होळकराचे समजुतीचा प्रकार अद्याप निश्चयांत नाहीं. आठ चार दिवसांत होईल. समजूत जाहल्यावर कर्नाटक प्रांतांत जावें असें होळकरास कारभारी म्हणतात परंतु घडेल तें खरें. राजश्री महादजी शिंदे राहिमतपुरीं स्वस्थ आहेत. सरदारांच्या समजुती पडल्या म्हणजे करवीरचे मसलतीस त्यांणीं सत्वर जावें अशीं सरकारचीं पत्रें जातात. कूच करून लौकरच जातील. " श्रीमंत महाराज करवीरवासी यांचे डेरे बाहेर जाहले. राजश्री सटवोजी भोंसले दोन हजार स्वारांनिशीं कडोलीवर येऊन उतरले आहेत. " म्हणोन लिहिलें तें कळलें. " आमचा प्रांत भरला आहे. कृष्णेसही उतार आहे. शिरोळकरांनीं पेशजी आपण होऊन आम्हाशीं बोलणें लाविलें होतें. परंतु आम्ही ही गोष्ट सरकार आज्ञेशिवाय कशी करावी ? प्रस्तुत त्यांचा जमाव भारी. प्रांताचा नाश होऊं लागेल. शिंदे या प्रांतीं आल्याउपरांतिक आमचे तालुक्यास उपद्रव लागेल येविशीं सरकारची व कारभारी उभयतांचीं पत्रें शिंद्यांस परस्परें जावीं. पूर्वीपासून परस्परें त्यांचा आमचा स्नेह आहेच, राजश्री खंडेराव देशपांडे यांजकडे गांव प्रतिनिधिकडून आहे, तेथें

चोरीचा माग नेऊन पाटीलकुलकर्णी धरून नेऊन प्रतिनिधींनीं आठशें रूपये घेतले. तहकीक वर्तमान ऐकिलें यास्तव ममतापूर्वक उभयतांचीं पत्रें शिंदे यांस तिकडूनच पाठवावीं " ह्मणोन लिहिलें, त्यास प्रतिनिधीकडील कारभारी यांस सांगितलें आहे व श्रीमंत राजश्री नानास विनंती करून पत्र घेऊन पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २११०. श्री. (कार्तिक व० १०-२४ नोवें.)

पैा छ २७ सवाल. समान सबैन.

विज्ञापना[1]. फितुरांत सांपडले आहेत त्यांच्या पारपत्याविशीं विनंती केली. त्यास लष्करांत फितुरांत आहेत त्यांचे ठिकाण लागल्याशिवाय अगोदरच पारिपत्य केल्यानें ठीक नाहीं. याजकरितां वरकड फितुरांत आहेत त्यांची चौकशी जाहल्यावरी पारिपत्य चांगलेंच करणार. " लष्करांत खर्चाची ओढ, याजकरितां ऐवजाची तरतूद जाहली पाहिजे. " म्हणोन लिहिलें, त्यास आर्बा व खमस दुसालां नालबंदीच्या वराता लष्करांतून हरीपंतांनीं कराव्या, येथें कारभाऱ्यांनीं तो ऐवज द्यावा, येणेंप्रमाणें ठराव जाहला होता. त्यांणीं वराता केल्या होत्या, त्यांपैकीं दहा लक्ष रूपयांची तोड पडली. बारा लक्ष रूपयांच्या वरातांची तोडजोड काढितात. लष्करांत खर्चास नाहीं, याजकरितां दोन लाख रूपये श्रीमंत राजश्री भाऊंकडे साहुकारीकडून ऐवज देविला व पैठणकर वगैरे साहुकार लष्करास रवाना केले. त्यांजकरवीं अडीच लक्ष रूपये यांचा भरणा करविला आहे. निकडीच्या वेळेस हा ऐवज द्यावा म्हणोन लिहून पाठविलें आहे, लष्करांत फितुराचा प्रकार कसा आहे, आंत कोण आहेत, हें समजत नाहीं. तिकडे पत्रें तपशिलवार आलीं असल्यास लिहून पाठवावें. " करवीरकरांकडे फौज

---

१ पत्र शिवाजी बाबाजी ह्मैसकर यांचें पुण्याहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

ठेवितात. शिंदे तर जागांच आहेत याविशींची तजवीज काय ! " म्हणोन लिहिलें, त्यास शिंद्याचे आडमुद्दे भारी ! " अशेरीचा किल्ला व देशीं पांच लक्षांची जहागीर व भेलसें पांच लक्षांचें येणेंप्रमाणें द्यावें म्हणजे करवीरचे मसलतीस गुंता नाहीं " असें म्हणतच आले व राजश्री बाळाराव या जाबसालासाठींच येथें बसले आहेत. भेलसें मात्र द्यावयास कारभारी उभयतां मान्य जाले आहेत. ' किल्ला व बाकी जहागिरीचा जाबसाल तुमची रवानगी हिंदुस्थानांत करूं ते समयीं देऊं ' असें म्हणत असतां शिंदे मान्य करीत नाहींत. याज्ञकरितां यांणीं निकडीचीं पतें करवीरच्या मोहिमेवर जाण्याविशीं त्यांस पाठविलीं नाहींत. ' जा ' म्हणतांच ' आमचे जाबसाल करून द्यावे ' असें शिंदे म्हणतात; याज्ञकरितां यांणीं ओढून धरिलें आहे. उगेच करवीरकरांकडील वर्तमान त्यांस कळावें म्हणोन परस्पर लिहवितात. त्याजवरून त्यांसही समजलें कीं, " आमच्या म्हटल्याप्रमाणें आजच करून देतात असें होत नाहीं. आह्मी छावणीस राहिलों. लौकिकांत करवीरचा बंदोबस्त आम्हाकडे लागला. असें जाहलें असतां करवीरकरांनीं जमाव करून उपद्रव करूं लागावें, आम्ही तमाशा पहावा, तें ठीक नाहीं. याजकरितां मागणीप्रमाणें कारभाऱ्यांनीं जहागीर दिल्यास उत्तम. नाहीं तरी मार्गशीर्ष शुा २ स कूच करून करवीराकडे जातात. कूच जाहलें म्हणजे पत्रें मिरजे प्रांताविशीं वगैरे घेऊन पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २१९१. **श्री.** (कार्तिक व० १०–२४ नोवेंबर.)

पौ छ २७ सवाल. समान सबैन.

विज्ञापना[2]. श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईसच आहेत. कलकत्त्याचीं पत्रें येथें आलीं व मुंबईस पाठविलीं त्यांच्या नकला कल-

१ मिरज प्रांतास उपद्रव न देण्याविषयीं. २ पत्र शिवाजी बाबाजीचें पुण्याहून मिरजेस गंगाधरराव यांस.

कत्तेकरांनींच येथें करून पाठविल्या; त्यांतील भाव "श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आंसरा न देणें. कुमक करूं नये. निरोप देणें. चित्तास येईल, तिकडे जातील. तुम्हीं त्यांचें साहित्य केल्यास कार्यास येणार नाहीं. श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचा आमचा सलोखा जाहला आहे तोच शेवटास न्यावा. लबाडी करूं नये." म्हणोन कलकत्त्याहून मुंबईवाल्यांस पत्रें आलीं आहेत. इंग्रजांकडील गुंता तिळमात्र नाहीं. पक्कें आहे. राजश्री आबाजी महादेव हैदरखानाकडे जाऊन बंकापुरास आले आहेत. फौजेंत फितवा करितात. हैदरखान पैकेकरी आहे! श्रीमंत दादासाहेबांनीं इकडील जितका यत्न करावयाचा तो करून पाहिला. शेवटास गोट गेलीच नाहीं. याजकरितां इंग्रजाकडील जाबसाल होतांच हैदरखानाकडे जलमार्गें जातील असा प्रकार दिसतो. दुसरी जागा राहिली नाहीं! वसईस फितवा जाहला होता. सावधता होऊन त्यांचें पारिपत्य करून बंदोबस्त राजश्री विसाजी केशव यांणीं केला. श्रीमंत राजश्री नाना पुण्यास आले त्यापासून पुण्यांतच आहेत. राजश्री सखारामपंतबापू सासवडास आहेत. काम कारभार फारकरून पुण्यांतच होत आहे. होळकर आजपावेतों रूसोनच आहेत. आजपावेतों जेजुरीसच होते. परवां कूच करून वाफगांवास गेले. वाफगांवास राजश्री विसाजी कृष्ण यांस पाठवून बोलून चालून समजूत होतेशी जाहल्यास उभयतांनीं जावें, समजावीस करावी, येणेंप्रमाणें बेत आहे. घडेल तें खरें! सुरापुराकडे प्रतिनिधीकडील फौज पाठवावी येणेंप्रमाणें ठरावांत आलें होतें, त्यास श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें व राजश्री हरीपंत तात्याचीं पत्रें आलीं कीं, "धारवाडाकडे फौज पांच हजार राहिली पाहिजे. इतलाखी ठेविल्यास पोटास दिलें पाहिजे, याजकारितां सरं-

---

१ फितुर करणाराचें. २ चिनीवाले.

जामी फौज पांच हजार पाठवावी " म्हणोन लिहिलें, त्याजवरून प्रतिनिधीची फौज व राजश्री आनंदराव गोपाळ व किंरकोळ मिळोन पांच हजार फौज सरंजामी धारवाडाकडे पाठवितात. कळावें. पालखीच्या रोजमऱ्याची वरात करकंबेवर पाठवितों म्हणोन लिहिलें, त्यास गुदस्तां आम्ही मिरजेस आलों त्या अलीकडील पालखीमुद्दां तीन हजारांचा खर्च जाहलाच आहे. झाडाच आपणाकडे पाठवितों. झाडा पाहून करकंबेवरी वरात देविली पाहिजे. गुदस्तांचा हिशोब श्रीमंत राजश्री तात्यानीं अजमास पाहून फडशा केला. त्या यादी दप्तरीं असतील. त्याअन्वयेंच खर्च जाहला आहे. अजमासही सेवेशीं पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं २११२. (कार्तिक व० ९–२३ नोवेंबर.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. [1]शिंदे रहिमतपूर सोडून निघाले म्हणोन देशाहून कोणाकोणाचीं माणसें येतात तीं सांगतात. परंतु तुमचें पत्र आलें नाहीं याजमुळें लटकें वाटतें. त्यास अद्याप निघाले किंवा नाहीं, फौज किती जमली आहे, हें सविस्तर लिहावें. " होळकर गायकवाडांकरितां रुसले आहेत. समजावीस जाहली. तत्राप वाफगांवास जाणार. कर्नाटकचे मसलतीस येतील असें दिसत नाहीं. राजश्री कृष्णराव आपा मात्र येणार. त्यांचे लोकांस येण्याविशीं पत्रें गेलीं आहेत. " म्हणोन शिवाजीपंतानीं लिहिलें होतें. त्यास तुम्हांकडे वर्तमान काय आलें आहे, होळकर येतच नाहींत किंवा येणार, हें सविस्तर लिहावें. इकडील वर्तमान तर हैदरखान हरिहरापलीकडेच आहे तेथेंच आहे. चेनगिरीकडे गेला, सडा जाहला आहे, अशीही बातमी आहे. परंतु दगेखोर ! त्याची बातमी

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ महादजी शिंदे करवीरचे मोहिमेकरितां.

ठीक लागत नाहीं. तुंगभद्रेस तर उतार चांगला जाहला. गलगनाथाजवळ पैलतीरास हैदरखानाची चौकी राहणार[1] सवाशें लोक, पांच सात राऊत व ब्राह्मण बातमीचे होते. आम्ही तलाव्यास उत्तरतीरास गेलों तों पलीकडून गोळ्या मारूं लागले व बाण टाकिले. तेव्हां इकडूनही करोलेनीं[2] मार दिल्हा. गांवचे नावाडी धरून आणिले. त्यांनीं उतार दाखविला. तेव्हां पलीकडे चिरंजीव राजश्री बळवंतराव[3] व व्यंकटराव[4] घोरपडे गेले. आणि प्यादे जाय्यां जखमी सारे केले. हत्यारें बंदुका तरवारी आणिल्या. चार घोडीं शिलेदारांकडे पाडाव आलीं. एक ब्राह्मण धरून आणिला. प्यादे जखमी धरून आणिले होते ते सोडून दिले. ती चौकी धुडावल्यापासोन कही आज पांच सात रोज पलीकडून भरून येत आहे. मुष्टुराकडे नदी उतरावयास जावें असें होतें, परंतु इकडे नदीस उतार जाहला; व तिकडे गेल्यास चित्रदुर्गकर पैका कबूल करीत नाहींत, याजमुळें तिकडे जावयाचें राहिलें. पुरुषोत्तमपंत येथें आहेत. त्यांनीं आह्मीं पार जाहल्यावर सव्वालक्ष होन तूर्त खर्चास द्यावे याप्रमाणें करार ठरला. परंतु हुजरातेच्या लोकांचे रोजमुरे तटले आहेत. दुमाही, दीडमाही, एकमाही, आठवडेकरी, पंधरवडेकरी, तूर्त एक तरी रोजमुरा वांटला पाहिजे, त्यास तीन साडेतीन लक्ष रूपये लागतात ! दुर्गकर कराराप्रमाणें आपल्या तालुक्यांत गेल्यावर पैका देतात व चाकरीसही जमाव घेऊन येतात. त्यांत गुंता नाहीं. नदीपलीकडे

---

१ नेहमीं रहात असे ती. २ बंदुकवाल्या स्वारांनीं. ३ पटवर्धन दीक्षित यादवाडकर. ४ घोरपडे गुत्तीकर म्हणजे आतां सोंडूरकर. कारण हैदरानें गुत्ती संस्थान बुडवून मुरारराव[1] कैदेंत टाकिल्यापासून गुत्तीकर घोरपड्यांची एक शाखा सोंडूर येथें व दुसरी दत्तवाड येथें राहूं लागली. याच घराण्यांतले यशवंतराव घोरपडे बाजीरावींत प्रसिद्ध होते. त्यांस कंपनी सरकारनें बेडग हा गांव दिल्यापासून त्यांचें घराणें तेथें रहात आहे.

पाय ठेवावा तेव्हां एक रोजमुरा तरी तूर्त द्यावा लागतो, त्याची तरतूद होत आहे. जाहल्यानंतर अमावास्या आंतच सत्वर जाणें होईल. पार गेल्यावर आधीं दुर्गकरांस सामील करून घेऊन मग दुसरी मसलत करणार. नबाब निजामअल्लीखान यांजपाशीं व तेथें वकील जिवाजी रघुनाथ सरकारतर्फे आहेत त्यांचीं पत्रें राजश्री तात्यांस आलीं आहेत. त्यांतील भाव कीं, " गुदस्तांप्रमाणें बचबच होऊं नये. दुसरी फौज पुण्याहून भरतीस आणवावी व खर्चाची बेगमी करावी. गवगवा असों नये. असें असल्यास आम्ही येतों. हैदरखानाचें पारिपत्य उभयतां मिळोन करूं. मुलूख सुटेल तो व खंडणी येईल ती निमेनिम घ्यावी याप्रमाणें पुरंधराहूनच ठरलें आहे. " असें लिहिलें होतें. " धौशाची रवानगी केली, लौकरच येऊन पावेल," म्हणोन लिहिलें आहे. उत्तरेंही येथून लौकर निघावयाविशीं गेलीं आहेत. धौशा कृष्णेवर आला. लौकरच उतरून येईल. मुदलावीस तोफा पुण्याहून आल्या आहेत. तेथून कारकून व राऊत आणावयास गेले आहेत. येतील. नदी उतरावयाचा तर निश्चय जाहला. पैसा नाहीं. परिणाम लावणें गजाननाकडे आहे ! बंकापुरकर स्वारी शिकारी लक्ष्मेश्वर प्रांतांत चोरीछपीनें करूं लागले. गुडगेरी खेडें लक्ष्मेश्वर परगण्याचें बंकापूरकरांनीं झाबडलें. त्याजमुळें चारशें राऊत परगणे मजकुरीं ठेविले. हुबळीस शंभर आहेत. आम्ही पार गेल्यावर अगदीं अलीकडे फौजेस ठेवणें ठीक नाहीं. याजकरितां नेहमी राजश्री विसाजीपंत आठवले यांस दोन हजार फौजेची भरती करून देऊन धारवाड प्रांतांत ठेवणार. बंकापुरास जमाव विशेष कांहीं नाहीं. आहे तोच आहे. अलीकडे दोनतीनशें बेद मात्र आले आहेत. कुमदानाची शह्याप सुटका नाहीं. रद-

---

१. यावरून महमदअल्ली कुमदान यास हैदरानें या वेळीं कैदेंत ठेविलें होतें, असें दिसतें.

बदली लागली आहे, परंतु कुमदानच कबूल करीत नाहीं. ' चाकरीच अतःपर पुरे ' ह्मणतो. नदीपलीकडील चौकी उठविली ते दिवशीं व्यंकोजी जानकर (?) यांस तरवारीच्या जखमा दोन, एक हातावर व एक खांद्यावर, अशा लागल्या आहेत. नदीपार गेल्यावर सविस्तर लेहून पाठवितों. उद्यां नदीपार व्हावें असें आहे. घडेल तें प्रमाण. चहूंकडून खर्चाची निकड आहे. स्थित राहील असें दिसत नाहीं ! यांत श्रीसत्ता प्रमाण आहे. करवीराकडील वर्तमान लिहावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २११३.

यादी[1] पटवर्धन मंडळीस जखमा लागल्या व सरकारकामास कोण कोण (आले) त्यांची नांवनिशीवर केली जाते.—

३ तीर्थस्वरूप कैलासवासी गोविंदपंत नानासाहेब यांच्या घराण्यांतील—

१ तीा कैलासवासी गोपाळरावसाहेब यांस सन आर्बा-सीतैनांत हलसंगीवर हल्ला केली ती माघारी फिरली त्या समयीं जख्म तरवारीची खांद्यावर लागली.

१ तीा कैलासवासी पांडुरंगराव तात्यासाहेब. सन सब्बा-सबैनांत हैदरखान याचे फौजेची लढाई मार्गशीर्ष वद्य ३० स कर्नाटकांत कोलवाडानजीक सावशी तीा कुंदगोळचे मैदानांत जाहली. ईश्वरइच्छें लढाई बिघडली. त्या वक्तीं जखमा कहरी डोकीवर व उजवे कानावर तरवारीच्या व पाठींत भाला अशा तीन लागून पाडाव गेले. सरकार चाकरीबद्दल बेडी बंदी-खाना. तेथेंच त्यांचा अंतकाल जाहला.

१ इंजानीबाम सन इहिदे मय्या तनांत सरकारकामावर

---

[1] ही यादी श्रीमंत कैलासवासी चिंतामणराव पांडुरंग ऊर्फ आपासाहेब सांगली-कर यांनीं तयार केली आहे. ही यादी व पुढील नंबरास छापलेलें टिपण यांचा " धारवाडप्रांतीं छावणी " या चालू प्रकरणाशीं कांहीं संबंध नाहीं. हे लेख कोठें तरी छापावयाचे ते येथें छापले आहेत. २ स्वतःस म्हणजे यादी लिहिणारास.

धोंडजी वाघ याचे लढाईंत जखमा कहरी कानावर तरवारीची व उजवे बरगडीस भाल्याच्या दोन लागल्या. वरकड वगैरे लागल्या.

१ तीा कैलासवासी रामचंद्रपंत आपा थोरले तासगांवकर यांचे घराण्यांतील.

१ खुद्द तीा रा॥ रामचंद्रपंतआपा यांस रेवदंडेकर शिंदी सात याचे लढाईंत उजवे हातास गोळीची जखम लागली.

१ तीा कैा॥ परशुरामपंतभाऊसाहेब यांस जखमा—

१ श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान सवाई माधवराव-साहेब यांच्या फौजेची व नबाब निजाम अल्लीखान यांचे फौजेची खर्ड्याचे मैदानांत सन खमस तिसैनांत लढाई जाहली त्या वक्तीं कपाळावर तरवारीची जखम लागली.

१ सन मय्या तैनांत श्रीमंत कैलासवासी महाराज छत्र. पति पन्हाळेकर यांचे फौजेची लढाई भाद्रपद वद्य चतुर्थीस मंगळवारीं पटणकुडीनजीक मैदानांत जाहली त्या वक्तीं जखम कहरी लागून पाडाव गेले. त्यांची बरदास्त करावी ते न करतां मारिले हें खराब काम केलें.

१ तीा कैा॥ रामचंद्रपंतआपासाहेब तीा॥ परशुरामपंत-भाऊसाहेब यांचे चिरंजीव यांस जखमा श्रीमंत महाराज छत्रपति पन्हाळेकर यांचे लढाईंत सन अर्बा तिसैनांत मार्गशीर्ष वद्य ७ स आळत्यानजीक लढाई जाहली त्या समयीं उजवे डोळ्याजवळ आंखास पहिल्यानें जखम लागली. दुसरी शेंडीजवळ. तिसरी डावे

बाहुटचास. चौथी उजवे हाताचें आंगळ्याजवळचे बोटाचे मागें. अशा चार जखमा लागून पाडाव गेले व सन मय्या तैनांत पटणकुडीचे मैदानांत लढाई जाहली त्या समयीं उजवे हातास गोळीची जखम लागली.

१ तीा हरीपंत बाबासाहेब यांस सन मय्या तैनांत पट्टण-कुडीचे मैदानांत श्रीमंत महाराज छत्रपति पन्हाळेकर यांचे फौजेची लढाई जाली ते समयीं डाव्या हाताचे तळव्यास कराचलीची जखम लागली.

४

२ तीा कैा त्रिंबकपंतआपासाहेब यांचे घराण्यांत त्यांचे उभ-यतां चिरंजीव.

१ नीलकंठरावदादा यांस सलास सीतैनांत श्रीमंत कैलास-वासी पंतप्रधान माधवरावसाहेब यांची व श्रीमंत कैलासवासी रघुनाथरावदादासाहेब यांचे फौजेची लढाई घोडनदीवर जाहली त्या समयीं पायास गोळीची जखम लागली व हैदरखान याचे फौजेची लढाई सन इहिदे सबैनांत फाल्गुन शु. ७ स मोतीतलावनजीक पट्टणचे मैदानांत जाहली. त्या वेळीं गोळी लागून सरकारकामास आले.

१ तीा कैलासवासी कोन्हेररावकाका यांस सन सब्बा सबैनांत तीर्थरूप पांडुरंगरावतात्या यांचे फौजेची व हैदरखान याचे फौजेची लढाई मार्गशीर्ष व. ३० स कर्नाटकांत कोलवाडनजीक सावशी तीा कुंदगोळचे मैदानांत जाहली त्या वक्तीं जखमा लागून ठार जाहले.

६ तीा कैलासवासी कृष्णंभट वापाजी यांचे घराण्यांतील—

१ तीा कैलासवासी नारायणरावनाना यांस सन सलास सीतैनांत घोडनदीनजीक लढाई श्रीमंत पंतप्रधान माधवरावसाहेब व दादासाहेब यांचे फौजेची जाहली त्या वक्तीं जखम लागली.

१ तीा कैलासवासी माधवरावअण्णा यांस सन सबैनांत श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान माधवरावसाहेब थोरले यांचे फौजेची व मीररेजाअल्लीखान याचे फौजेची लढाई शिऱ्यांवर जाली त्या लढाईंत तोफेचा गोळा मांडीस लागला. पुढें त्या जखमेनें त्यांचा अंतकाळ जाहला.

१ तीा कैलासवासी पुरुषोत्तमराव दाजी यांस श्रीमंत कैलासवासी बाळाजीपंत नानासाहेब याणीं सन अबैन[1] सालीं सावनुरास मोर्चे लाविले. सावनुराकडून मुजफरखान याचा मोर्चा सावनूरनजीक टेंकडीवर होता त्याजवर हल्ला करून टेंकडी घेतली. त्या वेळीं तिराची जखम लागली. नबाबाकडील तह होऊन त्याजकडील बावीस महालांपैकीं अकरा महाल घेतले.

१ तीा कैलासवासी लक्ष्मणराव यांस बळवंतरावदादा म्हणत. ते श्रीमंत पंतप्रतिनिधि यांजकडे चाकरीस होते त्यांस जखमा.

१ तीा कैलासवासी जनोबाभाऊ मेघश्यामरावबापू यांचे चिरंजीव यांस इहिदे तिसैनांत तीा कैा भाऊसाहेब

---

१ ही माहिती चुकली आहे. पहा ऐ. ले. सं. नं. ९०९।९१५ व ९५५. २ साल चुकले. सावनूरची स्वारी शीत व सब्बा खमसैनांत चालू होती.

याणीं धारवाडास मोर्चे बसविले, पेठेवर हल्ला केली, त्यावक्तीं गोळी लागून ठार जाहले.

१ तीाा कैलासवासी सदाशिवरावभाऊसाहेब यांस तीाा कैलासवासी नारायणरावनाना यांचे ओटयांत घातलें. त्यांस सब सलास तिसैनांत श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान सवाई माधवरावसाहेब यांचे फौजेची व नबाब निजाम अल्लीखान यांचे फौजेची लढाई खर्ड्याचे मैदानांत जाहली त्यावक्तीं पाठीस भाल्याची जखम लागली.

६

१ तीाा कलासवासी बाळंभटअण्णा यांचे घराण्यांतील—

१ तीाा कैलासवासी श्रीपतराव भाऊ यांस तीर्थरूप कैलासवासी पांडुरंगराव तात्यासाहेब यांचे फौजेची व हैदरखान यांचे फौजची लढाई सन सब्बा सबैनांत मार्गशीर्ष वद्य ३० स कर्नाटकांत कोलवाडनजीक सावशी ताा कुंदगोळचे मैदानांत जाहली त्या समयीं गुरगुजाची जखम लागली.

५ तीाा कैलासवासी भास्करपंतआपा यांचे घराण्यांतील—

१ खुद्द भास्करपंतआपा यांस सरकारकामावर वगैरे डोईवर तलवारीचा वार व उजवे दाढेंत गोळी लागून डावेकडे गेली. कोणकोणच्या लढाईंत जखमा लागल्या त्याचा छडा लागत नाहीं. परंतु पूर्वीच्या व याही सरकारच्या पदरीं राहिल्यावर लागल्या.

१ तीाा कैाा धोंडोपंतदादा यांस सन इसने सीतैनांत जमाखिंडीनजीक श्रीमंत कैलासवासी रघुनाथरावदादा-

साहेब यांच्या फौजेची व तीर्थस्वरूप गोपाळरावसाहेब यांचे फौजेची लढाई जाहली त्या समयीं उजवे कुशीस भाल्याची जखम लागली.

१ तीा विनोबा आबा यांस इसने सीतैनांत जमखिंडी-नजीक श्रीमंत कैलासवासी रघुनाथरावदादासाहेब यांच्या फौजेची व तीा कैा गोपाळरावसाहेब यांच्या फौजेची लढाई जाहली. त्या समयीं भाल्याची जखम पाठींत लागली व सन मय्या तैनांत श्रीमंत महाराज छत्रपति पन्हाळेकर यांचे फौजेची व तीा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई पट्टणकुडीचे मैदानांत जाहली त्या वक्तीं जखमा डोचकीवर व अनुवटीस व गालावर व मानेवर तलवारीच्या लागल्या.

१ तीा विठ्ठलराव धोंडदेव बाबा यांस इहिदे तिसैनांत टिपूकडील फौजेची व तीा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई गाजनूर (?) चे मैदानांत जाहली त्या वक्तीं गळ्याचें नरडें बचावून कातडयांतून.गोळी गेली व सन आर्बा तिसैनांत श्रीमंत महाराज छत्रपति पन्हाळेकर यांचे फौजेची व तीा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई आळत्यावर जाहली त्या वक्तीं उजवे हाताचे आंगठ्यास तलवारीची व गळ्याजवळ गोळीची जखम लागली व सन खमस तिसैनांत श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान सवाई माधवरावसाहेब यांचे फौजेची व नबाब निजामअल्लीखान यांचे फौजेची लढाई खर्ड्याचे मैदानांत जाहली त्या वक्तीं छातीस गोळी लागून ठार जाहले.

१ तीा रामचंद्रपंत काका यांस इहिदे तिसैनांत टिपू-कडील फौजेची व तीा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई धारवाडास जाहली त्या वक्तीं गोळी मानेस चाटून गेली.

५

२ तीा कैा गोविंदपंत नानासाहेब यांचे चुलतबंधु तीा कैा केशव भटजी यांचे घराण्यांतील--

१ तीा शिवबा आपा यांस नागपूरकर भोंसले यांजकडे चाकरीस होते तेथें लढाईंत तरवारीच्या जखमा चार लागल्या व श्रीमंत पंतप्रतिनिधि यांचे जवळ चाकरीस होते तेव्हां सांगोल्यावर उदाजी चव्हाण यांजबरोबर लढाई जाहली तेथें एक दोन जखमा लागल्या त्यांचे सालाचा पत्ता नाहीं.

१ तीा गणपतराव काका विसू काका यांचे चिरंजीव यांस सन तिस्सा तिसैनांत श्रीमंत महाराज छत्रपति सातारकर याचे फौजेची व तीा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई जाहली त्यासमयीं गुडघ्यास तरवारीची जखम लागली; व सनमजकुरीं तीा भाऊसाहेब मांडवगणाहून सुटल्या-नंतर कर्नाटकांत गेले त्यासमयीं धारवाडचे स्वारीचे रदकर्जासंबंधानें सरसुभ्याचीं ठाणीं घेतलीं त्यांचे बंदो-बस्तास लोक देऊन कर्नाटकांत ठेविले. आपण हुब-ळीचे अलीकडे आले. सरसुभ्याचे ठाण्यांतील हुबळींत सरसुभ्याकडील लोकांची कटकट जाहली त्यासमयीं बंदुकीचा धबका हाताचे अंगठ्यास बसला व डोईस जखम लागली.

५ तीा गोविंदपंत नानासाहेब यांचे चुलत बंधु तीा कैा अंताजी पंततात्या यांचे घराण्यांतील—

१ खुद्द तीा अंताजीपंततात्या यांस जखमा सन खमस सितैनांत जडें अनवटी प्रांत बिदनूर येथें लढाई झाली त्यावेळीं पोटास बेंबीचे खालीं गोळी लागली.

१ तीा बळवंतराव दीक्षित यांस जखमा.

१ सन इहिदे समानीनांत बोर घांटाखालीं श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान सवाई माधवरावसाहेब यांचे फौजेची व इंग्रजांच्या फौजेची लढाई जाहली त्यासमयीं ताफेचा गोळा दगडास आपटून त्याचा कपरा पायास लागला.

१ सन मजकुरा श्रीमंत कैलासवासी महाराज छत्रपति पन्हाळेकर यांजकडील लढाईंत अकीवाटावर उजवे हाताचे कोपरास भाल्याची जखम लागली.

१ सन इहिदे समानीनांत घुमट शिरोळ श्रीमंत महाराज छत्रपति पन्हाळेकर यांजकडील घेतलें त्यासमयीं डोकीस बर्चीची जखम लागली.

१ सन सब्बा सबैनांत शिरटीवर लढाई जाहली त्यासमयीं डोक्यास जखम गोळी लागून चाटून गेली.

१ सन मय्या तैनांत श्रीमंत महाराज छत्रपति पन्हाळेकर यांचे फौजेची लढाई पट्टणकुडीचे मैदानांत जाहली त्या समयीं कराचलीची जखम लागली.

५

१ तीा जनोबा सुभेदार यांस जखमा.

१ सन आर्बा सबैनांत महीचे लढाईंत उजवे पायास संगिनीची जखम लागली.

श. १६९९ **धारवाडप्रांतीं छावणी** इ. स. १७७७

१ सन सब्बा सबैनांत कैलासवासी पांडुरंगराव तात्यासाहेब यांचे फौजेची व हैदरखान याचे फौजेची लढाई सावशी ताा कुंदगोळचे मैदानांत जाहली त्यासमयीं गोळा दगडास लागून दगडाचा कपरा मांडीस लागला.

१ अणिगिऱ्यास मोर्चे लाविले त्यासमयीं गोळीची जखम पाठीस लागली.

१ सन खमस तिसैनांत श्रीमंत पंतप्रधान सवाईमाधवराव-साहेब यांचे फौजेची व निजाम अल्लीखान यांचे फौजेची लढाई खर्ड्याचे मैदानांत जाहली त्यासमयीं डाव्या हाताचे मनगटास कराचलीची जखम लागली.

४

१ तीाा विठ्ठलराव काका यांस जखमा.

१ सन इहिदे तिसैनांत टिपूकडील फौजेची व तीाा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई गाजनूरचे मैदानांत जाहली त्यावक्तीं जखम लागली व धारवाडची पेठ घेतली ते समयीं गोळी छातीस चाटून गेली.

१ सन तिस्सा तिसैनांत श्रीमंत महाराज छत्रपति सातार-कर यांचे फौजेची व तीाा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई जाली त्या समयीं डोळ्याजवळ सांगेची जखम लागली.

१ सन मय्या तैनांत श्रीमंत महाराज छत्रपाति पन्हाळेकर यांचे फौजेची व तीाा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई पटणकुडीचे मैदानांत जाहली त्यासमयीं जखम माडीस गोळी लागून पार जाहली.

श. १६९९ **धारवाडप्रांतीं छावणी** इ. स. १७७७

१ सन तिस्सा तिसैनांत एलबर्ग्यास मोर्चे होत त्यासमयीं गोळी पोटास लागली.

४

१ तीा विष्णुपंत भाऊसाहेब यांस जखमा.

१ सन मय्या तैनांत श्रीमंत महाराज छत्रपति पन्हाळेकर यांचे फौजेची व तीा भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई चिकोडीचे दक्षिणेस टेंकडीवर जाहली त्या समयीं.

१ सन अशर मय्या तैनांत अबदुलखान यासीं लढाई जाहली त्या समयीं उजवे पायास गोळीची जखम लागली.

२

१ तीा कैलासवासी गोविंदपंत नानासाहेब यांचे तीर्थरूप हरभट बाबा यांचे तीर्थरूप बाळंभट यांचे बंधु रघुनाथभट यांचे घराण्यांतील—

१ तीा वासुदेव धोंडदेव काका यांस सब्बा सबैनांत मार्गशीर्ष व. ३० स कर्नाटकांत कोलवाड नजीक सावशी तीा कुंदगोळचे मैदानांत हैदरखान याचे फौजेची व तीर्थरूप पांडुरंगराव तात्या यांचे फौजेची लढाई जाहली. त्या वक्तीं कमरेंत भाल्याची जखम लागून पाडाव गेले.

१ तीा श्रीधरपंत सुभेदार यांस सन इसने सितैनांत श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांचे फौजेची व तीा गोपाळराव साहेब यांचे फौजेची लढाई जमाखिंडीचे

मैदानांत जाहली त्या वक्तीं जखम डावे हातांचे आंग-
ड्यास व उजवे कानावर व डावे बाहुटयास तलवारी
च्या जखमा लागल्या.

२

३०

तपशील—

२८ सरकारच्या कामावर जखमा लागल्या व ठार जाहले असामी.

७ सरकार कामावर ठार जाहले.

२१ जखमी जाहले.

२८

२ कित्ता. पटवर्धन मंडळीपैकीं दुसरीकडे चाकरीस राहिले त्यांस जखमा लागल्या ते असामी.

३०

नं. २१९४.

टिपण—सुरुसन समान समानीन मय्या व अल्लफ सालच्या तीन यादींवरून तयार केलें तें—

सब्बा सबैनांत पांडुरंगराव गोविंद यांची व हैदरखानाकडील महमदअल्ली कुमदान याशीं लढाई झाली. पांडुरंगराव मंडळीसुद्धां शत्रूकडे पाडाव गेले. समान सबैनांत पांडुरंगराव श्रीरंगपट्टणांत कैदेंत मरण पावले. श्रीपतराव मोरेश्वर वगैरेंच्या सुटकेकरितां हैदरखानास राघवेंद्र नाईक नकाते यांचे विद्यमाने ऐवज होन हैदरी नाणें एक लक्ष देणें ठरला. पैकी वजा परभारें सरकारांतून दिले होन नाणें ५०००० बाकी होन ५०००० एकूण एक लक्ष. बाजार निरख दर

होनास ४८॥ प्रमाणें रु. २०१५६२॥ पैकीं वजा परभारें वसूल रु.२१००० निलकंठराव शिंदे मनोळीकर. ५२५०० बहिरजी घोरपडे. ११००० रामचंद्र कृष्ण दातार. ५५०० वासुदेव धोंडदेव. बाकी ऐवज केसो बल्लाळ गोरे यांजकडील कर्ज घेऊन सन इहिदे समानींत परभारें छ १० जमादिलाखरीं हुजरातीकडे खर्च लिहून दिला आहे ते हल्लीं जमा धरून खर्च रुपये १११५६२॥

थोरले गोपाळराव यांणीं मरणसमयीं कृष्णेस घांट व विष्णूचें देवालय बांधण्याची आपली इच्छा राहिली असें सांगितलें. ते वारल्यावर घांट व देवालय बांधविलें त्यास खर्च २४१२२३ रु० आला. गोपाळराव यांची स्त्री सरस्वतीबाई वेगळी हरिपुरास जाऊन राहिली तीस १००००० रु० दिले. पांडुरंगराव यांच्या मुलांपैकीं हरिहरराव यांचे लग्न, चिंतामणराव व विठ्ठलराव यांच्या मुंजी व लग्नें व बहिणीचें लग्न मिळून खर्च १३७२०७४ रु० झाला.

पांडुरंगराव व भाऊबंद मंडळी व सरदार लोक यांस सोडविण्याकरितां एक लक्ष होनांच्या रकमेंतून निमे रकम ५०००० हैदरी होन पेशवे सरकारांतून परशुरामभाऊंस कर्जाऊ दिले होते. सरकारी दर होनास चार रुपये एक आणा होता तथापि भाऊंनीं कर्जाची फेड केली तेव्हां त्यांस वरचा एक आणा सूट मिळाली. त्यामुळें सरकारचें नुकसान ३१२५ रुपये झालें.

हैदरअल्लीवर पांचवी स्वारी.

ता. २४ नोव्हेंबर स. १७७७ ते ६ एप्रिल स. १७७८ पर्यंत.

या स्वारीचें काम सुरू करण्याकरितां हरीपंततात्या व परशुरामभाऊ यांच्या फ़ौजा ता. २४ नोव्हेंबर स. १७७७ रोजीं गलगनाथाजवळ तुंगभद्रापार झाल्याचा मजकूर मागील प्रकरणाच्या अखेरीस आलाच आहे. खरें म्हटलें तर या स्वारीच्या कामास म्हणजे शत्रूशीं युद्ध करण्यास यापुर्वीच सुरुवात झाली होती. कारण कीं, मराठी फौजा सावनुराजवळून तळ हालवून गलगनाथाजवळ तुंगभद्रेच्या उतारास आल्या त्या दिवशींच त्यांपैकीं कांहीं लोकांनीं नदीपलीकडे शत्रूची चौकी होती तिनें गोळागोळी सुरू केली. अशा चौक्या शत्रूनें नदीच्या उताराउतारास व नाक्यानाक्याच्या सर्व मुख्य मुख्य ठिकाणीं यापूर्वीच बसविल्या होत्या व आपल्या हालचालींची बातमी मराठ्यांस कळूं नये असा बंदोबस्त केला होता. वर सांगितलेली चौकी फक्त सवाशें पायदळ, पांच सात स्वार व बातमी लिहिणारे कांहीं ब्राह्मण कारकून यांची होती. परशुरामभाऊनीं गांवचे नावाडी धरून आणिले व त्यानीं दाखविलेल्या उतारानें बळवंतराव पटवर्धन यादवाडकर व व्यंकटराव घोरपडे सोंडूरकर यांबरोबर स्वारांची एक टोळी पलीकडे पाठविली. तिनें तीं चौकी तुडवून कांहीं लोक मारिले व बाकीचे हत्यारांसुद्धां कैद करून आणिले. अशी दशा होतांच बाकीच्या चौक्या ताबडतोब पळून गेल्या व त्यामुळें मराठ्यांची कही दररोज नदीपलीकडून बिनदिक्कत मरून येऊं लागली.

१७ नोव्हेंबर.

वर सांगितल्याप्रमाणें चित्रदुर्गास जाण्याकरितां मराठी फौजा नदीपार झाल्या त्याच दिवशीं हैदरअल्ली हरिहरापलीकडे पांच कोसां-वर आजपर्यंत होता तेथून हरिहरास आला होता. तेथें त्यास मराठे नदीपार होऊन चित्रदुर्गास जात असल्याची बातमी लागली. त्याव-रून तो तत्काळ सडी स्वारी तयार करून त्यांस आडवा आला. हरीपंत-तात्यांस ही बातमी दुसऱ्या मजलीस समजली तेव्हां ते फिकिरींत पडले. कारण कीं, नदीपार होण्याच्या आपल्याच दिवशीं परशुरामभाऊंस मोडशीचा व ज्वराचा प्रबळ विकार होऊन त्यानें ते हैराण झाले होते. मुख्य सरदार कामावर नसला म्हणजे त्याची फौज ताब्दश झटून काम करीत नाहीं हा नेहमींचा अनुभव तात्यांस होताच. त्यांत त्यांची स्वतःची फौज बेदिल व फितुरानें ग्रासलेली असल्यामुळें शत्रूच्या मुल-खांत शिरतांना भाऊंच्या मसलतीवर व त्यांच्या बहा हजार फौजेच्या करामतीवर त्यांची विशेष भिस्त होती. तात्या ज्या वाटेनें चित्रदुर्गास जाणार होते ती वाट पहिल्या पांच सहा मजली डोंगराळ व अड-चणीच्या जंगलांतून होती व लष्कराबरोबर लमाण, पेंढार व बुणगें अनिवार जमलें होतें तें त्या डोंगराळ मुलखांतून शत्रूच्या तावडींतून सुरक्षित पार होणें मुष्किलीचें होतें. यामुळें हरीपंतांनीं शत्रु आडवा येतो हें वर्तमान समजतांच तो मार्ग सोडून तुंगभद्रेच्या कांठाकांठानें बल्लारी-कडे येऊन धौशास मिळवून घेऊन तिकडून मैदानांतून चित्रदुर्गास जाण्याची मसलत केली व तीस अनुसरून त्यानीं लष्कराचा रोंख हंपीकडे धरिला. तीही वाट डोंगराळ व अडचणींचीच होती. त्यामुळें कोठें तरी छापा घालण्याचा लाग साधेल तर पहावा या आशेनें हैदरअल्ली दहा बारा हजार स्वार, पंचवीस तीस हजार कवाइती पायदळ व पंधरा तोफा अशा जय्यत सरंजामानिशीं मराठ्यांच्या पाठोपाठ आठ दहा कोसांच्या तफावतीनें चालूं लागला. त्यानीं एखादा मुक्काम करून त्यावर उलटून

चालून यावें तर तो प्रदेश डोंगराळ असल्यामुळें मराठ्यांच्या घोडे-स्वारांस तेथें लढण्याची सोय नव्हती. यामुळें ते दरकूच हंपीवरून सोंडूरची बारी पार होऊन अदवानी तालुक्यांत मैदानाच्या प्रदेशांत आले. तेव्हां शत्रुही त्यांच्या मुक्कामापासून चवदा कोसांवर दरोजी येथें बातेच्या बांधून बंदोबस्तानें राहिला. सोंडूर संस्थानाच्या हद्दींत रामदुर्ग येथें मराठ्यांचें बुणगें होतें. आणि तेथून जवळच लष्कराचा तळ रारावी येथें होता. पंधरा सतरा मुक्काम तेथें झाले. आजपर्यंत परशुरामभाऊ अत्यवस्थ आजारी होते. दरमजलीस पालखींत घालून त्यांस लष्कराबरोबर चालवावें लागे. रारावीस आल्यापासून त्यांस आराम पडून लवकरच चांगलें आराग्य झालें. डिसेंबर.

लष्कर मैदानांत आल्यावर भोंवतालच्या मुलखांतून खंडण्या गोळा करण्याचें काम सुरू झालें. अनागोंदीचा संस्थानिक शत्रूच्या सूत्रांत होता. तो मराठ्यांस खंडणी देईना. सबब त्याचें कंपली हें जबरदस्त ठाणें सखारामपंत पानशे यानीं तोफा लावून घेतलें. बल्लारी तालुका शत्रूच्या ताब्यांतला असल्यामुळें त्यापैकीं एक गांव वाटेंत लागला तो पानशानीं जातां जातां घेऊन आंत शत्रूचे लोक होते ते कापून काढिले. नंतर अनागोंदीवाल्यानीं खंडणीचा जाबसाल उरकण्या-करितां मराठ्यांकडे वकील पाठविले. कनकागिरी हें दुसरें एक लहा-नसें संस्थान तेथें होतें, त्यापासून मराठ्यानीं जुजबीच खंडणी घेतली. तेथील संस्थानिक त्यांच्या वारंवार उपयोगीं पडे. शत्रूची बातमी त्यांस वेळेवर पोंचवी. महाराष्ट्राचें लष्कराशीं दळणवळण सांप्रत त्याच्याच मुलखांतून चाललें होतें. या कारणांमुळें त्यावर मराठ्यांस खंडणीची फारशी सक्ती करितां येईना. अदवानी संस्थानही त्यांस बराच पैका मिळण्याची जागा होती. परंतु तेथील नबाब बसालतजंग

हा निजामअल्लीचा भाऊ असल्यामुळें त्यापाशीं खंडणी मागावी तर निजामअल्लीस व त्याजकडून आपल्या कुमकेस येत असलेल्या धौशास वाईट वाटेल; असें जाणून अदवानीची खंडणी वसूल करण्याचें काम

दिसेंबर. मराठ्यांनीं तूर्त तहकूब ठेविलें. बल्लारीकडे येण्यांत मराठ्यांचा मुख्य हेतु धौशास सामील करून घेऊन मैदानांतून चित्रदुर्गाकडे जाण्याचा होता. परतु तो धौशाच लवकर येऊन मिळण्याचा रंग दिसेना !

अशा स्थितींत तें मराठी लष्कर धौशा लवकर येऊन मिळेल

दिसेंबर. या भरंवशावर पुढें चालून येऊन अडचणींत सांपडल्यासारखें झालें होतें. त्यास मागें येतां येईना व पुढेंही जातां येईना ! शत्रु त्यांच्या पिछाडीवर एक बरीच मोठी टोळी ठेवून बाकीची फौज घेऊन दरोजीहून निघून बल्लारीपुढें मुरगोड येथें म्हणजे मराठ्यांच्या अघाडीस सत्रा कोसांवर राहिला होता. शत्रूची टोळी पिछाडीस होती तिनें मराठी लष्कराकडे देशाहून येणाऱ्या लोकांचा मार्ग बंद केला होता. तिकडून लष्करास जातांना कोणी आपल्या तावडींत सापडेल ह्मणून ती टोळी अगदीं टपून बसलेली असे. एकदां गजें द्रगडकर घोरपडे यांचें पथक लष्करास येत असतां ती टोळी त्यांच्या पाळतीवर आली होती. पण घोरपडे वांकडया वाटेनें रात्रभर मजल मारून तीस चुकांडी देऊन लष्करास येऊन पोंचल. आणखी एकदां पुण्याहून दारूगोळीचे सातशें बैल भरून येत होते ते कनकागिरीच्या आसपास येतांत तों बैलवाल्यांस शत्रूची चाहूल लागली. तेव्हां ते तत्काळ ती वाट सोडून गजेंद्रगडाच्या आसऱ्यास गेले. मी येईंपर्यंत शत्रूशीं गांठ घालूं नये अशीं धौशाचीं हरिपंततात्यांस पत्रें मात्र दररोज येत. पण तो स्वतः कृष्णा उतरून लवकर येण्याचा कांहीं रंग दिसेना. शत्रूचा तर अघाडीस व पिछाडीस व्याप वाढूं लागला. लढाई करण्याविषयीं त्याची आतुरता दिसूं लागली. अशा स्थितींत बाजार-

बुणगें वगैरे तुंगभद्रापार लावून देऊन धौशा येईपर्यंत गानिमी काव्यानें शत्रूच्या तोंडावर सडे होऊन राहण्याचा हरीपंत व परशुराभाऊ यानीं निश्चय केला.

१ जानेवारी सन १७७८.

इतक्यांत हैदरअल्ली ता. १ जानेवारी सन १७७८ रोजीं अकस्मात् मराठी लष्करावर चालून आला ! तो छापा घालावयास येणार अशा भुमका नेहमीं उठत असल्यामुळें मराठे सरदार बातमी राखून बंदोबस्तानेंच होते. त्यांत वर सांगितल्याप्रमाणें बाजारबुणगें नदीपार पोंचवून देण्याच्या उद्देशानें आदल्याच दिवशीं हरीपंततात्या लष्कराजवळ वेगळेच राहिले होते. परशुरामभाऊ चांगले बरे होऊन आतां घोडयावर बसूं लागले होते यामुळें त्यांच्या सैन्यांत पूर्वीप्रमाणें उत्साह व अवसान दिसूं लागलें होतें. त्या दिवशीं हुजुरातीपैकीं गोविंदराव बारवकर व महिमाजी मुसे आणि रास्त्यांकडील आनंदराव जिवाजी या तीन सरदारांचीं पथकें मिळून तीन चार हजार स्वार लष्करच्या कहीबरोबर संरक्षणार्थ गेले होते. त्यांची व शत्रूची प्रथम गांठ पडली. कहीची तट्टें पाडून घेऊन शत्रु चोहोंकडून या चिमुकल्या टोळीवर तुटून पडला तेव्हां ती दमानें लढत लढत लष्करापर्यंत येऊन पोचली. त्या टोळीचे सरदार होते त्यांत गोविंदराव बारवकर ठार पडला. महिमाजी मुसे यास मांडींत गोळी लागली व आनंदराव जिवाजीस तलवारीचा वार लागला. यावरून ही टोळी किती आवेशानें व शौर्यानें लढली असावी याचा अंदाज करितां येतो. शत्रु आल्याची वर्दी येतांच हरीपंत व परशुरामभाऊ तत्काळ फौजेसह तयार होऊन अघाडीस जाऊन उभे राहिले; आणि बाजारबुणगें निमूटपणें तुंगभद्रेची वाट धरून चालूं लागलें. त्या वेळीं प्रहर दिवस शिल्लक होता. शत्रूवर प्रथम कोणी कोणी घोडीं घातलीं परंतु त्याच्या आगीच्या मारापुढें यांचे हत्यार लागेना, सबब यास मागें हटावें लागलें. मग शत्रूनें तोफांचा बेसुमार भडिमार

केला तेव्हां तो मराठी फौजेचा तीस पसतीस हजार स्वारांचा गोलचा गोल जमून ठासून उभा राहिला तो सायंकाळपर्यंत जाग्यावरून ढळला नाहीं ! आमच्या फौजेंत जबरदस्त फितूर असल्याखेरीज शत्रूस अंगावर चालून येण्याची छाती झालेली नाहीं हें हरीपंत व परशुरामभाऊ यांस कळून चुकलें असल्यामुळें शत्रूवर हल्ला करण्याच्या मोहास गुंतून त्यानीं आपली फौज विस्कळीत होऊं दिली नाहीं. यामुळें फितुरी सरदारांवर नजर व जरब त्यांस ठेवितां आली. बुनगें सुरक्षितपणें तीन कोस पार झाल्याची वर्दी येतांच मराठी फौज हळू हळू मागें सरूं लागली व शत्रूही त्यांवर चालून न येतां रारावी येथेंच तळ देऊन राहिला. त्या दिवशीं रातोरात मराठी लष्कर नदीपार होऊन उत्तर तीरास आलें. तों धौशा जवळ आल्याची बातमी आली व पांच सहा दिवसांनीं तो स्वतःच येऊन पोंचला. त्याबरोबर पंधरा हजार स्वार, पंधरा हजार गारदी व चाळीस तोफा असें सामान चांगलें होतें.

६ जानेवारी.

मराठी सैन्यांत फितूर फारच बळावल्यामुळें शत्रूस उत्तेजन येऊन तो चालून आला व त्यामुळें मराठ्यांस मागें हटून नदीअलीकडे वर सांगितल्याप्रमाणें यावें लागलें. आपल्या फौजेंत फितुरी कोण कोण आहेत याचा बारीक तपास हरी पंततात्यांनीं सुरू केला, तों मानाजी शिंदे फांकडे यांस शत्रुकडून आलेलें ऐन जिनसी पत्रच त्यांच्या हातीं लागलें ! त्यावरून त्या फितुरी सरदाराचें पारिपत्य करावें ह्मणून तात्या व भाऊ यानीं त्याच्या गोटावर अकस्मात् हल्ला केला. त्या गर्दींत मानाजी मारामार करीत निसटून शत्रूकडे गेला. त्याची बायको व सासू व कारभारी मात्र सांपडले व त्याचा संबंद गोट लुटला गेला. त्या धामधुमींत धायगुडे, निंबाळकर, दरेकर व पानशे यांचे गोट लगत होते तेही

लुटले गेले होते ! परंतु त्यापैकीं लुटींत गेलेला माल त्यांचा त्यांस मागून मिळाला. शत्रूकडून एक लक्ष होन मानाजीनें आणून फौजेंत वांटले होते, त्यांपैकीं पाऊण लक्षांचा छडा लागून तो ऐवज सरकारांत जमा झाला. यशवंतराव माने म्हसवडकर हा फितुरांत सांपडल्यामुळें त्यास तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें. व गारद्यांचा एक जमादार या प्रकरणांत उमगला त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. माने यास मारिल्यामुळें फौजेंत मराठे सरदार होते त्यांत बराच गवगवा झाला असावा असें वाटतें. कारण कीं, पुढें लवकरच महादजी राजे भोंसले व नीलकंठराव थोरात हे दोन मराठे सरदार फितुरीच्या गुन्ह्यांत सांपडलेले असतांही त्यांचें काय पारिपत्य करणें तें कारभाऱ्यांनीं करावें असें ठरवून व आपाजीराव पाटणकर यांस जामीन घेऊन हरीपंतांनीं त्या सरदारांस पुण्यास लावून दिलें.

जानेवारी. आणखीही दोन चार सरदारांकडे फितुराचें सूत्र मानाजीकडून आलें होतें. परंतु मुख्य फितुऱ्यांचा वेळींच बंदोबस्त झाल्यामुळें फौजेंत यापुढें आणखी अधिक फितूर झाला नाहीं.

धौशाची गांठ पडली तेव्हां उभयतां फौजांनीं नदीपार जाऊन शत्रूचें पारिपत्य करावें या मसलतीस धौशानें शाब्दिक संमति मात्र पूर्णपणें दिली. परंतु त्याप्रमाणें वागणूक त्याच्या हातून घडण्याचा कांहींच रंग दिसेना ! त्यास बरोबर घेऊन हरीपंततात्या परत फिरले, परंतु तो दोन तीन कोसांपेक्षां अधिक मजल करीचना ! आणि एक मजल झाली म्हणजे पांच चार मुक्काम त्यास थकवा घालविण्याकरितां करावे लागत ! अशा रीतीनें चाल करणाऱ्या सैन्यास शत्रूची गांठ पडण्याची कधीं संधि येणार ? त्यानें आपण होऊन चालून यावें तर ती संधि यावयाची, पण त्यावांचून त्याचें काय नडलें होतें !

फेब्रुवारी. मराठी फौज उपासमारीनें आपोआप मरत असतां लढाईचा प्रसंग आणून तो आपली हानि होण्याचा धोका कशास पतकरील ! धौशा जेथपर्यंत मराठ्यांच्या सोबलीस आहे

तेथपर्यंत ते एखादी मोठी मसलत करून आपणास अडचणींत पाडितील अथवा लांबून दौड करून येऊन आपणास गांठितील हें भय त्यास मुळीं बाळगण्याचें कारणच नव्हतें ! उलट तोच त्यांच्या नाकांत काडया घालण्याकरितां नदीच्या दक्षिणतीरीं मराठी लष्करापासून पंधरा वीस कोसांच्या अंतरानें रहात होता; व उत्तर तीरीं फौज पाठवून स्वस्थपणें मराठी मुलखांत लुटालूट करीत व खंडण्या उकळीत होता ! मराठे व मोंगल यांचें प्रचंड लष्कर आपल्या खिसगणतींत सुद्धां नाहीं असें दुनियेस दाखविण्याचा त्यास हा अपूर्व सुप्रसंग आला होता ! त्यानें कोपळ तालुक्याचीं तमाम गांवखेडीं खुशालपणें लुटून फस्त केलीं, आणि डंबळकर देसायापासून लाख होन खंडणी घेऊन लक्ष्मेश्वर परगण्यांतलीं बहुतेक ठाणीं पुन्हां काबीज केलीं. त्याच्या सैन्यांतून दहा हजार निवडक स्वारांची टोळी घेऊन टिपू सुलतान निघाला तो झपाटयानें चाल करून अकस्मात् धारवाडावर येऊन पडला. त्या प्रांताच्या रक्षणार्थ हरीपंततात्यांनीं तीन हजार फौजेसह विसाजीपंत आठवले नांवाचा सरदार तेथें ठेविला होता. त्यास टिपू येत असल्याची बातमी कळली असूनही तो सावध झाला नाहीं ! त्यामुळें जरी तो आयत्या वेळीं मारामार करीत निसटून गेला तरी कांहीं त्याच्या फौजेचीं व कांहीं धारवाडकरांचीं मिळून पांचसातशें घोडीं, उंटें व इतर अजबाव टिपूनें लुटून घेतला.

२१ फेब्रुवारी. धारवाडच्या पेठेंत सुभेदाराचा मुलगा आपल्या वाडयांत रहात होता त्यास बातमी लागतांच तो मात्र किल्यांत पळून गेला. पण त्याचा वाडा व पेठेंतले वाणीउदमी यांचीं दुकानें व सरकारी टंकसाळ हीं सर्व लुटलीं गेलीं ! आणखीही नासधूस पुष्कळ व्हावयाची, परंतु तितक्यांत किल्लेकरी हुशार होऊन त्यांनीं तोफांचा मार देऊन टिपूस पेठेंतून पिटून लाविलें. मग मिळालेल्या लुटीवरच

संतोष मानून व जातां जातां नवे हुबळीचें ठाणें केवळ दरडावणीनेंच काबीज करून तो आपल्या लष्करास परत गेला.

याप्रमाणें शत्रूची चोहोंकडे सरशी होत असतां समीप असलेल्या एवढ्या मोठ्या मराठी सैनेस अंगांत सामर्थ्य असूनही त्याचा कांहींएक प्रतीकार करितां आला नाहीं! याचें कारण केवळ धौशाची संगत हें होय. मोंगलाशीं पुणें दरबारानें हैदरअल्लीच्या पारिपत्याकरितां म्हणून निम्मे वांटणीचा तह ठरविला त्याप्रमाणें उभय सरकारांच्या फौजा स्वारीवर येऊन नमूद झाल्या; आणि आतां एक

फेब्रुवारी.

धौशाच्या दुष्टपणामुळें या सर्व खटपटींचा विपरीत परिणाम बनून आला! शत्रूशीं गांठ पडती तर कांहीं तरी सोक्षमोक्ष होता त्याला मराठे सरदार कबूल होते! परंतु त्यांचा सोबती धौशा आपल्या फायद्यासाठीं मुंगीच्या पायानें चालत होता व आपल्या फौजेच्या लहान लहान टोळ्या मुलूखभर पसरून खंडणी गोळा करण्यांत चूर होऊन गेला होता! आणि इतक्या श्रमानें आदल्याच वर्षीं शत्रूपासून हिसकून घेतलेला आपला मुलूख यंदा तोच शत्रु स्वस्थपणानें पुनः काबीज करीत असतां मराठ्यांकडून त्यास कांहीं एक अडथळा झाला नाहीं!

करवीरचा बंदोबस्त करण्याची मसलत महादजी शिंद्यांनीं पतकरली होती व ते रहिमतपुरास छावणीस राहिले होते, हा मजकूर मागें आलाच आहे. सटवोजी भोंसले नांवाचा पेशव्यांचा एक सरदार अलीकडे करवीरकरांस मिळाला होता. त्या सटवोजीनें करवीरच्या आसऱ्यास राहून पेशवाई मुलखांत व विशेषेंकरून मिरज प्रांतीं मोठी धामधूम केली. त्याविषयींचे बोभाटे नित्य पुण्यास जात होते व करवीरच्या मोहिमेवर लवकर निघून जाण्याविषयीं कारभाऱ्यांचा शिंद्यांस सक्तीचा तगादा होता. उलटपक्षीं

आपणास दक्षिणेंत दहा लक्षांची जहागीर व अशिरगडचा किल्ला कारभाऱ्यानीं दिल्याशिवाय आपण मोहिमेवर जात नाहीं हा शिंद्यांचा आग्रहही कायमच होता. शेवटीं भेलसें वगैरे दहा लक्षांची जहागीर हिंदुस्थानप्रांतीं तुम्हास देऊं व अशिरगडचा किल्लाही देऊं, असें कारभाऱ्यानीं वचन दिल, तेव्हां महादजी शिंदे स. १७७७ च्या नवंबरच्या अखेरीस करवीरच्या मोहिमेवर निघाले; ते फौज गोळा करीत मसूर कऱ्हाड मार्गानें वारणेवर आले. तेथून प्रथम पन्हाळ्यास घेरा घालण्याची हूल दाखवून ते वडगांवास गेले. तें ठाणें घेऊन व बंदोबस्ताकरितां दोन हजार फौज तेथें ठेवून हेरलें, अळतें, कडोली, पारगांव, सावगांव इत्यादि त्या प्रांतांतलीं तमाम ठाणीं त्यानीं काबीज केलीं. या खेपेस करवीरकरानीं फारशी फौज जमविली नव्हती. शिंद्यांपुढें मैदानांत आपलें कांहीं चालणार नाहीं हें जाणून त्यानीं आपल्या मुलखाचें व विशेषेंकरून पन्हाळा किल्ला व करवीर राजधानी यांचें रक्षण करण्याकडेच लक्ष पुरविलें होतें. करवीरच्या तटालगत प्रीतिराव चव्हाण हिंमतबहादर व सटवोजी भोंसले व फडतरे हे सरदार पंधराशें स्वार व तितकेंच पायदळ घेऊन राहिले होते. येसाजी शिंदे पन्हाळ्यास रहात व मधून मधून करवीरास येत. महादजी शिंदे रहिमतपुराहून निघाल्या पासूनच करवीरकरानीं त्यांशीं तहाचें बोलणें लाविलें होतें. प्रथम त्यांचें म्हणणें

डिसें. १७७७

" चिकोडी व मनोळी पेशव्यांस परत देतों व स्वारीखर्चाबद्दल एक लाख रुपये देतों. " असें होतें. तें महादजी शिंद्यांस कबूल न झाल्यामुळें ते करवीरावर पंचवीस हजार फौज सुद्धां चालून आले ! त्या प्रसंगीं त्यांच्या तेवढ्याही फौजेशीं करवीरकरांनीं हिमतीनें व कौशल्यानें लढाई दिली व त्यांचें बरेच घोडेंमाणूस जायां जखमी केलें. त्या नुकसानीस न जुमानतां शिंद्यांनीं हल्ला करून करवीरच्या

सैन्यास शहरांत पिटून घातलें व शहराभोंवत्या दाट चौक्या बसवून आंत रसद जाण्याची बंद केली. करवीरावर शिंदे चालून येतात हें पाहतांच करवीरवासी महाराज पन्हाळ्यास निघून गेले, परंतु राजमाता कोणाच्या आग्रहास न जुमानतां शहरांतच राहिली होती. तिनें निकरानें शहर झुंझविण्याचा निश्चय केला होता. तिजजवळ शिबंदीची भरती मुबलक असून तींत हिंमतही चांगली होती व दारू गोळा व धान्य यांचाही पुरवठा पुरेसा होता. राजधानीस घेरा बसल्यावर करवीरकर तीन लाखपर्यंत ऐवज देण्यास कबूल झाले. हें त्याचें म्हणणें मान्य करावेंसें अर्धवट मनांत येऊन पुढें कसें करावें, म्हणून महादजी शिंद्यानीं कारभाऱ्यांस पुरंदरास लिहिलें. त्यानींही पांच लक्षपर्यंत स्वारीखर्च म्हणून रक्कम घेऊन व चिकोडी मनोळी ताब्यांत घेऊन तह करावा असें शिंद्यांस सुचविलें. परंतु इतक्यांत काय झालें न कळे, याप्रमाणें तहाची घडी बसत आलेली एकाएकींच विसकटून महादजी शिंदे करवीरास मोर्चेबंदी करून बसले आणि पुण्याहून महाकाळी तोफ पाठवून देण्याविषयीं त्यानीं कारभाऱ्यांस पत्रें लिहिलीं.

जानेवारी.

शिंदे मिरज प्रांतीं आल्यापासून त्यांचा घासदाण्याचा व खंडणीचा किरकोळ उपद्रव मुलखास बराच लागत होता. करवीरकरांकडे यंदां स्वार चाकरीस गेले होते, त्यांचा पत्ता पाडून त्यांचीं घरेंदारें त्यानीं जप्त केलीं व करवीरकरांकडून ज्या ज्या लोकांस गांव वगैरे इनाम होते त्या त्या लोकांपासून त्यानीं एक-सालीचा ऐवज चोपून वसूल करून घेतला. मिरजकरांस त्यानीं तगादा लाविला कीं तुम्हां पटवर्धनांचीं तीन निराळीं पथकें असून सरंजामही तीन निरानिराळे आहेत. याकरितां तिघांकडून फौजेच्या टोळ्या आह्मांकडे या मोहिमेवर चाकरीस आल्या पाहिजेत; व तुमच्या फौजेस लागेल ती दारू गोळी तुम्ही पुरविली पाहिजे. तीं आह्मी

देणार नाहीं. याप्रमाणें तुह्मी फौज न पाठवाल तर आह्मी नवी फौज चाकरीस ठेवूं व तिचा खर्च मिरज प्रांतातून जबरीनें वसूल करून घेऊं. शिवाय मिरज किल्ल्यांत तोफा आहेत त्यांपैकीं एखाद दुसरी तोफ आह्मी पसंत करूं ती सर्व सरंजामानिशीं तुह्मीं आमच्या हवालीं करावी. मोहीम संपल्यावर ती तुमची तुह्मांस परत देऊं. या सर्व मागण्या चुकविण्याचा गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब मिरजकर यानीं पुष्कळ यत्न केला व पुणें दरबारचीं पत्रेंही शिंद्यांस आणून लाविलीं. आमची फौज कर्नाटकांत मोहिमेवर गुंतली आहे, याकरितां तुम्हांकडे निराळी फौज पाठविण्याची तसदी व खर्च आम्हांवर पडूं नये; हें त्यांचें म्हणणें सयुक्तिक होतें. परंतु शिंद्यांच्या आडदांडपणापुढें कोणाचें कांहींच न चालल्यामुळें त्यांस अडीचशें स्वार, तीनशें पायदळ, एक तोफ व एक गरनाळ इतकें दारूगोळ्यासुद्धां सामान तयार करून करवीरास पाठवावें लागलें.

कर्नाटक व करवीर येथें मोहिमा सुरू असतां राज्याच्या इतर भागांत काय भानगडी सुरू होत्या इकडेही लक्ष पुरविलें पाहिजे. श्रीमंत दादासाहेब यांस आतां इंग्रजांचा आश्रय सुटल्यामुळें ते कोठें इतर ठिकाणीं, विशेषेंकरून हैदरअल्लीकडे निघून जातील अशी लोकांची अटकळ होती. आणि तिला अनुसरून नानाप्रकारचीं वर्तमानें उठत होतीं. त्यांत एक वर्तमान श्रीमंत मालवणास येणार व तेथून करवीरच्या आश्रयास येणार असेंही उठलें होतें. परंतु हीं वर्तमानें पुढें खोटीं ठरलीं. श्रीमंत मुंबई सोडून कोठेंच गेले नाहींत. मि. मॉस्टिन पुण्याहून मुंबईस गेला होता तो जानेवारींत पुन्हां पुण्यास परत आला. नंतर लवकरच बातमी उठली कीं, श्रीमंत दादासाहेब गंगास्नानाकरितां नाशकास येणार आहेत ! लगेच कारभाऱ्यानीं रामचंद्र गणेश यांस तीन हजार फौजेसह बोरघांटाचे तोंडीं तळेगां-

वास राहण्याकरितां पाठविलें. शिवाजीपंत लिहितो, "मुंबईहून माष्टीम आला त्याची ही लबाडी दिसत्ये!" हा माष्टिमावरचा पुण्याच्या लोकांचा अविश्वास पुढें पुष्कळ पीडेस कारण झाला! श्रीमंतानीं मुंबईस राहून वसईच्या किल्ल्यांत फितूर केला होता. परंतु तो वेळींच उघडकीस आल्यामुळें तेथील सुभेदार विसाजी केशव लेले यानीं त्याचा तत्काळ बंदोबस्त केला. तुकोजी होळकरांची स्वारी अद्यापि रूसव्यांतच होती. शिंदे आल्याखेरीज आपण कर्नाटकचे स्वारीस जात नाहीं असें कारभाऱ्यांस सांगून ते जेजुरीहून निघून वाफगांवास दिसेंबरांत गेले. त्यांची समजूत घालण्या-
जानेवारी. करितां कारभाऱ्यानीं सरदार विसाजी कृष्ण बिनीवाले यांस वाफगांवास पाठविलें होतें. कांहीं जुळतेंसें दृष्टीस पडल्यास आपण दोघांपैकीं एकानें स्वतः जाऊन तुकोजी होळकरांची समजूत घालून त्यांस पुरंदरास परत आणण्याचा कार-भाऱ्यांचा हेतु होता. होळकरांचा मुख्य हट्ट फत्तेसिंगराव गायकवाड यांस सरदारी न देतां ती गोविंदरावांस द्यावी असा होता. परंतु फत्तेसिंगरावानें पुणें दरबारास अठरा लक्ष रूपये नज-राणा द्यावयाचें कबूल केलें होतें. व त्यापैकीं पांच लक्षांचा भरणाही केला होता. तथापि फत्तेसिंगरावाइतका गोविंदराव नजराणा कदाचित् देता तर या वेळीं फत्तेसिंगरावाकडून सरदारी काढून कारभाऱ्यानीं ती गोविंदरावास दिली असती व होळकराचा आग्रह तडीस नेला असता! कारण कीं, अहमदाबादेचा सुभेदार आपाजी गणेश याचा मुलगा अमृतराव याचा गारद्यांकडून खून करविल्याचा आळ या वेळीं फत्तेसिंगरावावर आला होता. त्यामुळें त्याच्या सरदारीची घालमेल करण्यांस हें निमित्त कारभाऱ्यांस पुरे होतें! नारो शंकर यांस पुत्र दोन. रघुपतराव व त्रिंबकराव दोघेही दत्तकच. त्यांपैकीं रघुपतरावास कारभाऱ्यानीं सरदारी दिली असून एक वर्षभर त्यानें वहिवाटही

केली होती. यंदां त्रिंबकराव हा सरदारीसाठीं नवीन उमेदवार उभा राहिला. तेव्हां सरकारांत पैक्याची ओढ झाल्यामुळें बुभुक्षित झालेल्या त्या कारभाऱ्यानीं ठराव केला कीं, उभयतां बंधूनीं दहा लक्ष रुपये नजराणा सरकारांत देऊन निमेनिम सरदारी वांटून घ्यावी ! होळकरांचा आग्रह होता कीं, सर्व सरदारी कारभाऱ्यानीं एकदां रघुपतरावास दिली आहे त्याप्रमाणें निभावणी केली पाहिजे. हाही होळकराचा हट्ट कारभाऱ्यानीं पुरविला असता. परंतु फेब्रुवारी महिन्यांत होळकरांच्या अंगांत कांहीं नवीनच वारें संचरलेंसें दिसूं लागलें. हरीपंतांच्या कुमकेस आपण कर्नाटकांत जाणार असा बहाणा करून ते फौज चाकरीस ठेवूं लागले. इकडे मोरोबादादा फडनवीस आपण पंढरपूर, नरसिंगपूर येथें यात्रेकरितां एका महिन्याच्या मुदतीनें जातों असें मिष करून जेजुरीहून कुटुंबसुद्धां बारामतीस गेले. मोरोबांचें होळकरांशीं आंतून सूत्र असून कांहीं मोठेंच कारस्थान उभारलें जाण्याच्या बेतांत आहे, अशी त्या वेळीं जनचर्चा सुरू होती !

फेब्रुवारी.

मार्च.

आपले कुमकेस, निदान धारवाड सुभ्याचे रक्षणाकरितां तरी नव्या भरतीची कांहीं फौज पुण्याहून पाठवावी असें हरीपंतानीं कारभाऱ्यांस वारंवार लिहिलें होतें, त्यास अनुसरून आपा बळवंत, बाजीपंत अण्णा व आनंदराव गोपाळ अशीं तीन सरंजामी पथकें मिळून पांच हजार फौज कर्नाटकांत धाडण्याकरितां कारभाऱ्यानीं तयार केली होती. होळकर, मोरोबादादा वगैरे मंडळीचें हल्लीचें धोरण पाहून ही फौज आपणांपासून दूर करण्यास नाना फडनवीस कांकूं करीत होते. परंतु कितीही फितुराचीं राजकारणें झालीं तरी मी तुम्हांस कधीं सोडणार नाहीं, याप्रमाणें सखारामबापूनीं वारंवार आणाशपथा दिल्यामुळें धीर येऊन नानानीं आपा बळवंत वगैरे सरदारांस

कूच करून जाण्याकरितां निरोप दिला. ते मार्च महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यांत पंढरपूरपर्यंत येऊन दाखल झाले.

टिपू सुलतान झपाटा मारून धारवाडची पेठ लुटून नव्या हुबळीचें ठाणें जातां जातां घेऊन परत आपल्या बापाच्या लष्करास गेला, हें मागें सांगितलेंच आहे. त्याच्या त्या पराक्रमानें उत्तेजित होऊन बंकापूरचा किल्लेदार गंगाराम नांवाचा होता तो चार हजार पायदळ व दोन हजार स्वार घेऊन बंकापुरांतून बाहेर पडला. लक्ष्मेश्वर परगण्यापैकीं येळवंती व मुळगुंद हीं दोन ठाणीं अद्यापि मराठ्यांकडे राहिलीं होतीं. येळवंतींत लक्ष्मेश्वरचा मामलेदार विठ्ठल कृष्ण दातार रहात असून तो दोन अडीच हजार पायदळ चाकरीस ठेवून बंकापूरकरांचा त्या परगण्यांतला अम्मल उठविण्याचा यत्न करीत होता. सबब मराठी फौज दूर आहेसें पाहून येळवंती व मुळगुंद हीं दोन्हीं ठाणीं घ्यावयास तो गंगाराम किल्लेदार निघाला. परंतु मुळगुंदकरांनीं त्याचा हल्ला मारून काढून त्यास हुसकून लाविलें व येळवंतीस त्यानें मोर्चे दिले असतां ते एकाएकींच उठवून त्यास पळून जावें लागलें ! अलीकडे महिना पंधरा दिवस हरीपंत तात्या व धौशा सर्व लष्करासह मुक्कामास असत तेथून चार पांच कोसांवर अघाडीस शत्रूच्या तोंडावर रास्ते, धायगुडे, बाबा फडके वगैरे सरदारांसह परशुरामभाऊ पंचवीस हजार सडी फौज घेऊन रहात असत. ते सिंगटाळूरपर्यंत तलाव्यास गेले असतां येळवंतीस बंकापूरकरानीं मोर्चे दिल्याचें वर्तमान समजल्यावरून ते दहा बारा हजार स्वारांसह त्या ठाण्याच्या कुमकेस धांवून आले. तों बंकापूरकरांनीं वर सांगितल्याप्रमाणें मोर्चे उठवून आगाऊच पोबारा केला होता !

मार्च

मराठे व मोंगल यांच्या फौजा तुंगभद्रेच्या उत्तरतीरानें पुढें येत असतां हैदरअल्ली दक्षिणतीरीं राहुन लुटालूट करीत मागें सरत

सरत हरिहराकडे झाडीच्या आश्रयास गेला होता. मराठ्यांचा रोंख सिंगटाळूरावर नदीपार होऊन चित्रदुर्गाकडे जाण्याचा होता. तसें करण्यांत तीन मुद्दे होते. एक तर पेशव्यांच्या आश्रयाखालचें चित्रदुर्ग संस्थान शत्रूच्या कचाट्यांतून सोडविल्याचा लौकिक मिळवून शिवाय त्या संस्थानिकापासून द्रव्य व मदतीस सैन्य मिळवावें. दुसरा हेतु, शत्रूचें सांनिध्य संपादून त्यावर जरब बसवून त्याचा व्याप मर्यादित करावा. तिसरा हेतु, धारवाड व कोपाळ या सुभ्यांचें होईल तितकें रक्षण करावें. हे हेतु मनांत धरूनच आज दोन महिने धौशानें किती आढेवेढे घेतले तरी दादा बाबा करून त्याची मर्जी संभाळून मराठे वागत होते. तो जें जें म्हणेल तें तें करण्यास त्यांनीं आळस केला नाहीं! मोहिमेच्या कामाकरितां हरीपंतानीं देशाहून

फेब्रुवारी. सप्तशकल व राम व फत्तेजंग या तीन मातबर तोफा कोपाळास आणविल्या होत्या. त्यांपैकीं एक तोफ तर अठरा शेर गोळ्याची होती. या तीन तोफा लष्करांत आल्याखेरीज आपल्याच्यानें पुढें येववत नाहीं असा धौशानें हट्ट धरिला, तेव्हां मराठ्यानीं त्या तोफा लष्करास आणिल्या. वास्तविक त्यांचें तूर्त तरी कांहींच काम नव्हतें. आगाऊच लष्कराबरोबर अनिवार लटांबर जमा झालें होतें त्यांतच आणखी या तोफांची भर पडली! ही एक सामान्य बाब झाली. अशा आणखी किरकोळ किती तरी बाबींत धौशाची नड सोसतां सोसतां मराठे अगदीं त्रासून गेले होते. कोणी म्हणेल कीं, धौशास मागें ठेवून मराठ्यानीं शत्रूचा पिच्छा पुरविण्यास कोणची हरकत होती? याचें उत्तर असें कीं, तसें करणें फार धोक्याचें होतें! एक तर फौजेंतला फितूर यामागें उघडकीस आल्या दिवसापासून त्या फौजेचा भरंवसा धरून शत्रूशीं गांठ घालावयास मराठे सरदार नाखुष होते आणि यद्यपि त्यांची तशी इच्छा असती तरी धौशास मागें टाकणें म्हणजे निजामअल्लीशीं पूर्वी

केलेला तह मोडणें असा अर्थ होता. तेंच निमित्त करून तो हैदरअल्लीस मिळाला असता आणि मग त्यांत कदाचित् इंग्रजही सामील झाले असते ! या थरास गोष्टी न याव्या म्हणून तर हरीपंत तात्या व परशुरामभाऊ यांस धौशाची पायधरणी करावी लागत होती ! असो; शेवटीं सिंगटाळूरच्या उतारानें नदीपार होण्याचा मराठ्यांचा बेत सिद्धीस गेला नाहीं तो नाहींच ! ते अगदीं जवळ जवळ आले तों धौशा म्हणूं लागला कीं, येथें नदीपार होण्याची आपली सोय नाहीं ! हा प्रदेश आमच्या राज्यास दूर आहे. प्रसंग पडला तर आमच्या राज्यांतून मला सैन्याची वगैरे मदत मिळण्यास मुष्कील पडेल. तुम्ही उत्तरतीरास रहात असाल तर पाहिजे तितके दिवस मी तुम्हांबरोबर आहें. परंतु सिंगटाळूरास नदीपार होण्याचा तुमचा आग्रहच असेल तर हा मी परत आपल्या मुलुखास चाललों ! तुम्हांस नदी उतरणेंच असेल तर परत फिरून मुष्टूरच्या उतारास जाऊं या. तो उतार आमच्या सरहद्दीवर असून आम्हांस सोईचा आहे. या बोलण्यावर मराठे काय उत्तर करितात ! ते त्याच्या म्हणण्याप्रमाणें मागें फिरून परत कोपाळास आले. वाटेंत गजेंद्रगडकर घोरपडयांचा एक

मार्च. गांव होता त्याजवळ धौशा अद्वातद्वा खंडणी मागूं लागला व ती मिळेना म्हणून त्यानें त्या गांवास तोफा लाविल्या ! हरीपंत व परशुरामभाऊ यांनीं त्याची पुष्कळ कानउघाडणी केली तरी त्यानें जुमानिलें नाहीं ! पूर्वी कनकगिरी संस्थानापासून अशीच त्यानें मराठ्यांचें न ऐकतां खंडणी घेण्याचा यत्न केला होता. हल्लीं हा घोरपडयांवर झालेला जुलूम पाहून आजपर्यंत मराठे सरदारांच्या मनांत धुमसत असलेलें वैषम्य आतां थोडथोडें उघडकीस येऊं लागलें. धौशा यास हैदरअल्लीनें आंतून अनुकूळ करून घेतलें आहे असा त्यांस या पूर्वीच संशय येऊन चुकला होता.

कोणी कोणी तर धौशाचा धनी निजामअल्ली हा हैदरअल्लीकडून गुप्तपणें द्रव्य घेऊन याप्रमाणें मराठ्यांच्या मोहिमेची नासाडी करीत आहे असेंही म्हणण्यास मागें पुढें पहात नसत ! अदवानीकर शत्रूस प्रथमपासून राजरोसपणेंच अनुकूल होत. हल्लीं त्यांचेच मार्फत त्याजकडून निजामअल्लीस पसतीस लक्ष रूपये पोंचते झाल्याचीं बाजारीं वर्तमानें या वेळीं उठलीं होतीं ! कांहीं असो, धौशाचें नेहमीं आणीबाणीच्या वेळीं सुद्धां दिरंगाईचें वर्तन, मराठ्यांच्या हिताहिताकडे व इच्छेकडे दुर्लक्ष करून निवळ स्वार्थ साधण्याकडे त्याची प्रवृत्ति, नदी उतरण्याविषयीं त्याची टाळाटाळ, या गोष्टींचा विचार करितां धौशाची हैदरअल्लीनें गुप्तपणें लांच देऊन कांहीं तरी समजूत काढिली असावी यांत संशय नाहीं. कर्नल विल्क, लुई राईस व ग्रांटडफ हे इंग्रज इतिहासकार तर ही गोष्ट अगदीं स्पष्टपणें लिहितात ! धौशाची ही बेंयाद पुणें दरबारानें आपण होऊन आमच्या सोबतीस म्हणून पाठविली हें मनांत येऊन परशुरामभाऊंच्या मनाची किती तडफड होत असेल ! ते एका पत्रांत लिहितात, " धौशा नव्हता तेव्हां आम्ही कांहीं तरी स्वाधीन होतों. आतां (त्याची) गांठ पडल्यापासोन दोन महिने तुंगा उतरतों ! असे दिवस जातात ! दुष्टाशीं गांठ पडली. उपाय नाहीं ! "

अनागोंदीचा संस्थानिक शत्रूस मिळालेला असल्यामुळें मराठ्यांस खंडणी देण्याची चाळवाचाळव आज दोन महिने त्यानें चालविली होती. आतां नदी उतरण्यापूर्वी त्यापासून मराठ्यांस सक्तीनें खंडणी वसूल करणें प्राप्त झालें होतें. त्याकरितां ते कोपळाहून निघून अनागोंदीकरांचें गंगावती नांवाचें जबरदस्त ठाणें होतें तें घेण्यासाठीं गेले. त्यावेळीं त्यांबरोबर धौशानें कूच केलें नाहीं. तो मागें राहिला.

यानीं जाऊन गंगावतीस मोर्चे दिले. एक दोन दिवस होतात न होतात तों अनागोंदीकरानें आगाऊच शत्रूंशीं संकेत केला होता त्याप्रमाणें दहा हजार कवाइती पायदळ, सहा हजार स्वार, व आठ तोफा असें सामान घेऊन त्याजकडून महंमदअल्ली कुमदान निघाला तो हंपीजवळ नदी उतरून अनागोंदीकर संस्थानिकाच्या माहितगारीनें डोंगरांतून आडवाटेनें गंगावतीकडे येऊं लागला. हें वर्तमान कळतांच मराठ्यांनीं मोर्चेबंदीचा बेत तसाच टाकून हल्ला करून तें ठाणें घेतलें व आंतील लोक कापून काढिले ! या दहशतीमुळें त्याच दिवशीं त्या संस्थानिकाचीं जतगांव, अयोध्या, कंपली, वगैरे दुसरीं ठाणीं मराठ्यांच्या स्वाधीन झालीं. तें पहातांच त्या त्या संस्थानिकानें त्यांजकडे वकील पाठवून खंडणीचा तह ठरवन घेतला.

मार्च.

इतकें होई तों मार्च महिन्याच्या अखेरीचे दिवस आले. शत्रूच्या पारिपत्याची कांहीं तजवीज करणें असेल तर ती पुढच्या दोन महिन्यांत झालीच पाहिजे. न होईल तर यंदांचें साल गतवर्षाप्रमाणेंच फुकट जाणार ! असा विचार करून हरीपंत व परशुरामभाऊ यांनीं मसलत योजिली कीं, येथूनच नदीपार होऊन चित्रदुर्गास जावें; आणि तेथील संस्थानिकास बरोबर घेऊन पुन्हां बल्लारी तालुक्यांत येऊन बल्लारी, गुत्ती, रायदुर्ग हीं मातबर स्थळें घ्यावीं म्हणजे हैदरअल्लीनें डोंगराळ जंगलाचा आश्रय केला आहे तो सोडून मैदानांत येऊन आपल्याशीं लढाई करणें त्यास भाग पडेल; आणि त्यायोगानें धारवाड प्रांताचा बचाव होऊन लढाईमुळें मुलुखाची तुडवणूक व्हावयाची ती त्याच्या राज्याची होईल !

अशी मसलत योजून फडके व पटवर्धन यांनी धौशास कोपळाहून कूच करून येण्यास सांगून पाठविलें. तेव्हां त्यानें साफ उत्तर दिलें कीं, नदी उतरण्याविषयीं आपणास नबाब निजाम अल्ली यांचा

हुकूम नाहीं ! ! ! हें उत्तर झाल्यावर एक दोन दिवस मराठे सरदारांचीं त्याशीं आणखी उत्तरें प्रत्युत्तरें झालीं. तो अगदींच ऐकेना. तेव्हां यांनीं निकरावर येऊन त्यास जबाब विचारिला कीं, तुम्ही आम्हाबरोबर येणार कीं न येणार ? न याल तर तुम्हास शत्रु असें समजून तत्काळ तसें वागावें लागेल ! हा प्रश्न होतांच शुद्धीवर येऊन निमूटपणें धौशा मराठी लष्करास येऊन मिळाला.

इतकें होई तों कुमदान पिछाडीस डोंगर होते त्यांत येऊन बसला. त्याच्या मनांत रात्री लष्करावर येऊन छापा घालावयाचा होता. परंतु मराठे सावध असल्यामुळें त्याचा कांहीं लाग साधला नाहीं. दुसरे दिवशीं लष्कर कूच करून नदीपलीकडे मुक्कामास गेलें. आपलीं तीन पथकें व बाबा फडके यांजबरोबर पांच हजार हुजुरात अशी फौज घेऊन परशुरामभाऊ मुद्दाम मागें राहिले होते. ते लष्करास जाऊन मिळण्याकरितां निघणार तों सायंकाळच्या प्रहर दिवसास बातमी आली कीं, कुमदान शेजारच्या बारींत आतांच येऊन लपून राहिला आहे व कहींवर हुलड करण्याची त्याची मसलत आहे. ही बातमी येतांच भाऊंनीं दोनशें स्वार त्या बारीकडे पाठविले व मागून लगेच आपणही तयार होऊन गेले. ती जागा अडचणीची असून घोडेस्वारांचा तेथें लाग नव्हता. तथापि पढें गेलेल्या स्वारांनीं बारीच्या तोंडीं दरवाजा होता तेथपर्यंत घोडीं घातलीं. तेथें थोडीशी झटपट होऊन शत्रूचीं दहा पांच घोडीं इकडच्या स्वारांनीं पाडाव करून आणिलीं व दहा वीस माणूस जायां जखमी केले. यांचेंही कांहीं माणूस याच मानानें जायां जखमी झालें. परशुरामभाऊंचा अंतोबा शिराळेकर म्हणून शागर्दि होता तो एकटाच चालून जाऊन शत्रूची फळी फोडून आंत शिरला ! तेथून मारामार करीत परत येत असतां शत्रूंनीं

२४ मार्च.

त्यास अगदीं घेरिलें होतें. तो धरिला जावा इतक्यांत वोलेकर शिंद्यांची टोळी त्याच्या मदतीस आली व तिनें त्यास मोठ्या प्रयासानें काढून आणिलें. निघतां निघतां ऐन वेळीं शत्रूपैकीं कोणी अंतोबाच्या घोडीच्या मागच्या पायांवर तलवारीचा वार केला त्यानें पायाची ढोणशीर तुटली असतांही ती घोडी तशीच स्वारास पाठीवर घेऊन आपले लोकांत आली आणि मरून पडली ! जेथें शागीर्द सुद्धां इतके शूर, तेथें घोडींसुद्धां इतकीं इमानी असल्यास त्यांत नवल तें काय ? भाऊंचा अंबाजी म्हणून दुसरा एक शागीर्द होता. त्यानेंही या वेळीं असाच पराक्रम केला. वर सांगितलेले वोलेकर शिंदे हे जातीनें धनगर असून कडवेपणाबद्दल व शूरपणाबद्दल पटवर्धनांच्या फौजेंत पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत. इतकें होईतों दोन घटका दिवस राहिला. लढाई करण्याची ती जागा नव्हे असें समजून स्वारांची टोळी परत आणवून व बुणगें लादून परशुरामभाऊ नदी उतरावयास चालले. तों शत्रूची आणखी एक चारशें स्वारांची टोळी पिछाडीस येऊन बिलगली. पुन्हां झटपट सुरू होऊन दहा पांच माणूस इकडचें तिकडचें ठार व जखमी झालें. ती टोळी मागें हटून उभी राहिली आणि परशुरामभाऊ नदी उतरून लष्करास येऊन मिळाले.

याप्रमाणें इतका विश्व–प्रयत्न करून ता. २४ मार्च रोजीं मराठ्यांचें लष्कर तुंगभद्रा उतरून शत्रूच्या राज्यांत शिरलें. यंदां नदी उतरण्याचा हा त्याचा दुसरा प्रसंग होय. पहिल्या खेपेस लष्करांत जबरदस्त फितूर झाल्यामुळें रारावी येथें शत्रूची गांठ पडली. तेव्हां मराठ्यांस मागें हटून नदी अलीकडे यावें लागलें. पुन्हा अडीच महिन्यांनीं हे नदीपार झाले. पार होऊन दहा बारा दिवस झाले नाहींत तों पुन्हा मागें परतून येणें त्यांच्या नशिबीं आलें ! ! याही

खेपेस मागें हटण्याचें कारण फितूर हेंच होतें. पण या खेपेचा फितूर लष्करांतल्या आडदांड शिलेदारांनीं केलेला नसून तो पुण्यांत मोरोबा दादा फडनवीस यानीं केलेला होता ! पहिल्या खेपेच्या फितुरानें लष्कराची धूळधाण झाली असती पण या खेपेच्या फितुरामुळें सर्व मराठी साम्राज्याची धूळधाण होण्याचा प्रसंग आला होता. मोरोबादादानीं चिंतो विठ्ठल, बजाबा पुरंदरे आणि मुख्यत्वें राज्याचे मुख्य कारभारी सखारामबापू यांस मिळवून घेऊन व तुकोजी होळकरांस सामील करून घेऊन मुंबईहून दादासाहेबांस आणून त्यांची पेशवाईच्या गादीवर स्थापना करण्याचें कारस्थान उभें केलें ! ! ! ती सर्व बातमी नानाफडनवीस यांनीं लष्करांत हरीपंत व परशुरामभाऊ यांस पत्रें लिहून कळविली. तीं पत्रें तात्या व भाऊ यांस ता० ५ एप्रिल रोजीं पोंचलीं, यामुळें मोहिमेची सर्व मसलत तशीच टाकून दुसरे दिवशीं धौशासह लष्कराचें कूच करून ते परत फिरले.

याप्रमाणें ही हैदरअल्लीवरच्या पांचव्या स्वारीची हकीकत आहे. या स्वारींतले सर्व प्रसंग व हालचाली तुंगभद्रेच्या दक्षिण व उत्तर तीरीं झालेल्या आहेत. या स्वारी–प्रकरणीं ज्यांचा उल्लेख झालेला आहे तीं सर्व स्थळें त्या नदीपासून पंधरा वीस मैलांच्या अंतरांतलीं आहेत. हैदर अल्ली व त्याचा पुत्र टिपूसुलतान यांस मराठ्यांच्या सामर्थ्या. विषयीं जो आदर वाटत होता तो या स्वारींत बराच कमी झाला. व आतां आपण मराठ्यांपेक्षांही प्रबळ झालों अहों हें त्यांस एव्हांपासून कळूं लागलें !

श. १६९९ हैदरअल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७७

नं. २१९५. श्री. (मार्ग० शु०–दिसेंबर प० पं०)

विज्ञापना. सटवोजी भोंसले याच्या उपद्रवाचा विस्तार लिहिला तो कळला. त्याजवरून श्रीमंत राजश्री नानांस विनंति केली. तेव्हां राजश्री बाळाराव यांस इकडून सांगितलें कीं तुमचे " आडमुद्दे होते ते आह्मी मान्य केले. आतां लढा कोणता ? " त्याजवरून त्याणीं उत्तर केलें कीं, " आतां सरंकारांत गुंता तिळमात्र राहिला नाहीं. पाटीलबावा बाहेर निघाले आहेत. फौज जमा व्हावयास आठ पंधरा दिवस लागतील त्यास इलाज नाहीं. परंतु आतां दिवसगत लागावयाची नाहीं. आह्मी निकडीचीं पत्रें पाठवितों " म्हणोन बोलिले. व मिरज प्रांतास उपद्रव लागों नये येविशींचा बंदोबस्त करावा म्हणोन बाळाराव यांस सांगितलें. व पाटीलबावांस पत्र मिरज प्रांताविशीं द्यावें म्हणोन सांगितलेवरून श्रीमंत राजश्री नाना बोलिले कीं, ते पुढें चार मजली गेले म्हणजे मुजरद पत्र देतों. रवाना करावें. न्हावीच्या घांटाच्या सुमारें गेले म्हणजे जासूद मुजरद रवाना करितों. आपला त्यांचा शिलशिला कागदींपत्रीं आहेच. त्यांजकडे कारकूनही पाठवावा. या वेळेपासून कारकून असल्यास उत्तमच आहे. लष्कराहून कंपलीच्या मुक्कामचीं पत्रें श्रीमंत राजश्री भाऊंचीं आलीं. हैदरखान पाठीवर मागाहून येत आहे, आह्मी सडे होतों, " म्हणोन लिहिलें आहे. व " किंचित् समाधान नाहीं, आतां आरोग्य आहे. " असें लिहिलें आहे. वराता साडेतीन लक्षांच्या पाठविल्या आहेत. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २१९६. (मार्ग. शुद्ध २–१ दिसेंबर.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद. उपरी. माल.

---

१ शिवाजी बाबाजीचें पत्र पुण्याहून मिरजेस गंगाधरराव यांस. २ हरीपंतांनीं लष्करांतून पुण्यास कारभाऱ्यांकडे पाठविल्या. ३ पत्र परशुरामभाऊंचें.

वणाहून एका ब्राह्मणाच्या घरचें पत्र आलें त्यांत " श्रीमंत राजश्री दादासाहेब मालवणास येणार. मंडप घातले आहेत. तेथें आल्यावर करवीरास येणार म्हणोन लिहिलें आहे. शिवाजीपंताचीं पत्रें आलीं त्यांत " कलकत्याहून व मुंबईस विलायतेहून इंग्रजांचीं पत्रें आलीं कीं दादासाहेबांस एकंदर आसरा न देणें, कुमक न करणें, निरोप देणें अशीं पत्रें आलीं आहेत. " ह्मणोन; त्यांतील भावही विस्तारेंकरून लिहिला तो कळला. " जलमार्गेकडून हैदरखानाकडे जातील. या उपर दुसरी जागा राहिली नाहीं " म्हणोन लिहिलें, त्यास विलायतेहून आसरा न देणेंविशीं निक्षून पत्रें आलीं, तेव्हां याउपर इंग्रजांचा आसरा तुटला. मालवणास येतील तर न कळे. परंतु करवीरास येतील हें तर घडणार नाहीं. आतां जागा हैदरखानाशिवाय त्यांस राहिली नाहीं. परंतु तिकड जातील न जातील पहावें. अलीकडे मालवणाकडील वर्तमान आलें असेल तें लिहावें. तुम्ही मालवणचें वर्तमान ऐकून पुरंधरास लिहोन पाठविलें, उत्तम केलें. वसईत फितवा जाहला होता;परंतु राजश्री विसाजी केशव यांस वर्तमान कळल्यानंतर बंदोबस्त केला म्हणोन लिहिलें तें कळलें. हें वर्तमान शिवाजी पंतांनीं आह्मासही लिहिलें आहे. होळकराकडे राजश्री विसाजीपंत जाणार होते, गेले न गेले, अद्याप उभयतां सरदारांची समजूत जाहली न जाहली, हे लिहावें. कालानुरूप सर्व गोष्टी तशाच घडतात ! भोंसले नागपूर सोडून निघाले म्हणोन शिवाजीपंतांनीं लिहिलें आहे. येतील तेव्हां खरे ! राजश्री आपा बळवंत यांची तर अद्याप रवानगी नाहीं. परिणाम सर्व गोष्टींचा श्रीगजाननानेंच लावावा ! "प्रतिनिधीची फौज, आनंदराव गोपाळ वगैरे, मिळून पांच हजार फौज सुरापुराकडे नेमिली होती, ती धारवाडाकडे रवाना होणार " ह्मणोन लिहिलें तें कळलें. विसाजीपंत आठवले धार-

---

१ बिनीवाले. २ शिंदे-होळकरांची.

वाड तालुक्यांत आहेत. आणखी चार हजार फौज (धारवाडाकडे) रवाना करावी असें सरकारांत येथून लिहिलें होतें त्यावरून रवानगी केली असेल. " हुजरातींत खर्चाची ओढ आहे, यास्तव दोन लक्षांचा ऐवज सावकारांकडून लष्करांत देवविला आहे व याखेरीज पैठणकर वगैरे सावकार लष्करास रवाना केले आहेत " म्हणोन लिहिलें तें कळलें. हरिभक्तीनें दोन लक्षांचा भरणा आम्हांकडे करावा, निकडीस खर्च करावा, असें राजश्री नानांनीं लिहिलें आहे. अद्याप हरिभक्ती सावकार आला नाहीं. येईल. तुंगा जे दिवशीं पार व्हाल ते दिवशीं तो ऐवज घ्यावा असें नानांनीं लिहिलें आहे. त्यास तुंगा पार जाहलों तेव्हां एक रोजमऱ्याचा हवाला घेतला, तेव्हां पार येणें जालें. वरकड इकडील राजकी सविस्तर पुरवणीपत्रावरून कळेल. तुम्ही आपले जागां बहुत सावधपणें रहावें. हे आशीर्वाद. भिकूबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंतांचे हातून कांहीं मजकूर होणें नाहीं. चिंता न करावी. येसाजीरामही येत नाहीं. हे आशीर्वाद.

नं. २११७. **श्रीगणपति.** (१ दिसेंबर.)

सुरूसन समान सबैन.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया इंदुवार मुक्काम तुंगा दक्षिण तीर इटगें ताा कंपली जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष, तुम्हाकडून पत्र अलीकडे बरेच दिवस न येऊन वर्तमान कळत नाहीं, त्यास सविस्तर ल्याहावें. तुंगभद्रा उतरावयाचा निश्चय जाहला, पार होत आहों, असें निरलगी तालुका हावनूर येथील मुक्कामाहून लिहोन पाठविलें आहे तें पत्र पावलेंच असेल. अलीकडील वर्तमान तर कार्तिक वद्य दशमीस गलगनाथाजवळ मुक्काम जाहला पार जालों ते दक्षणतीरींच येऊन मुक्काम केला. तेच दिवशीं हैदर-

खान हरिहराजवळ आला. आम्ही पार जाहल्याची बातमी त्यास नव्हती. हरिहराजवळ उतरून उत्तरतीरास येऊन छापा घालावा या मनसब्यांत होता. आम्ही पार गेलों तसे कांहीं फौज उत्तरतीरास उतरलेली माघारी नेली. आम्हास दुर्गकरांनीं पांच लक्ष रूपये द्यावयाचा करार पुरुषोत्तमपंत यांनीं केला. त्यावरून दुर्गास जावें, रूपये घ्यावे, व संस्थानिकास जमाव सुद्धां सामील करून घ्यावें; म्हणोन दक्षणतीराहून कूच एकादशीस केलें. दुर्गची वाट धरिली तों शत्रूस बातमी लागोन आडवा आला. दुसऱ्या मुक्कामास दगा अकस्मात् करावा हा त्याचा मतलब ! ही बातमी आम्हांस लागतांच दुर्गाचा रोंख सोडून हंपीचा रोंख धरिला. वाट अडचणीची. झाडी, डोंगर, समागमें कातवार लमाण वगैरे भारी. रात बिरात दगा करावा म्हणोन तोही आठ दहा कोसांच्या अंतरानें मागें येत आहे. एखादा मुक्काम करून त्याचा अजमास पहावा तर सोंडूरचे बारीमध्यें अडचणच भारी. याजमुळें दरमजल कालच आलों. खासा हैदरखानच लढाईस आला आहे. परंतु सडा आहे. दहा बारा हजार फौज व पंचवीस तीस हजार बार व पंधरा तोफा वगैरे त्याजबराबर जंगी सामान चांगलें आहे. अडचणीमुळें आजपर्यंत मुक्काम बिक्काम जाहला नाहीं. आतां मैदानांत आलों. चिंता नाहीं. रातबिरात छबिना बातमी राखोन सावधपणें आहों. याउपरही पुढें मैदानांत आलिया खामखा गांठ पडेल. सरकारच्या फौजा इजरातींत वगैरे सामान चांगलें आहे. श्रीमंतांच्या प्रतापेंकरून यशच येईल. शत्रूचा मुकाम हरपनहळ्ळी तालुक्यांत नारायणकऱ्याजवळ होता. तेथून कूच करून पुढें आल्याची बातमी अद्याप आली नाहीं. बातमीस माणसें गेलीं आहेत. बल्लारीकडे येणार अशी आवाई आहे. आज येथें मुक्कामच केला. अद्याप मैदानांतून होऊन दुर्गास जावें हीच मसलत आहे. लष्करासमागमें कातवार भारी, याजकरितां लमाण पेंढार वगैरे यांस मुष्टुराजवळ पार

होऊन जावयाविशीं ताकीद केली आहे. जातील. तदोत्तर शिलेदारी बुणगें कार्याकारण बाजार मात्र राहतो. मग चिंता नाहीं. दुर्गासच्च जात आहों. धौशाकडून साता रोजांचीं पत्रें काल आलीं. कृष्णापार होऊन दक्षणतीरास आला. येथून दहा गांवांवर आहे. लौकर येण्याविशीं पत्रें गेलीं आहेत. सत्वरच येतील. कडपें कर्नोळकरांसही पत्रें पाठविलीं आहेत. पुण्याहून दोन तोफा आलेल्या मुदलावीस होत्या त्या कोपळास आणविल्या. कोपळास येऊन पावल्यावर पत्र आलें. या उपर पुढें आणावयाचा विचार करून आणवावयास येतील. राजश्री आपा बळवंत फौजसुद्धां येणार होते. परंतु अद्याप निघाल्याचें पत्र नाहीं. त्यास कधीं निघणार, होळकरांनीं यावें असें होतें तें ठरलें किंवा नाहीं, करवीरच्या पारिपत्यास शिंदे येणार तेही रहिमतपूर सोडून निघाले न निघाले, हें सविस्तर ल्याहावें. हंपीजवळून परवां कूच करून आलों तेव्हां पिछाडीस शत्रूकडील दोन तीनशें बेदडे मात्र डोंगराच्या आसऱ्यानें आले होते. दुमदारीस (आमची) फौज होतीच. चार घटका उभे राहून माघारे गेले. शत्रूच्या मनांतही एक वेळ तोंड दाखवावें असेंच आहे हांव भरी जाहला आहे. सरकारच्या फौजेंतही दम चांगला आहे. ईश्वरइच्छेनें जे समयीं जें घडेल तें खरें ! आम्हांस मोडशीचा विकार होऊन कार्तिक वद्य नवमीस अंग मोडून आलें. त्यापासून आज सात आठ दिवस ताप येत होता. स्नान नाहीं. चाल मजलींत फारच वाखा होता. वैद्य उपाय केले. श्रीगजाननाचे कृपकरून कालपासोन उपशम आहे. या उपर स्नानही करूं. चिंता न करावी. चिरंजीव राजश्री गणपतराव यास ताप येत होता हें पेशजी लिहिलेंच आहे. अलीकडे चिरंजीवांसही गुण पडला आहे. बरे आहेत. आह्मी या प्रांतें आलों. तिकडे बंकापूरकर लक्ष्मे-

---

१ पिछाडास.

श्वर वगैरे तालुक्यांस उपसर्ग देतील, यास्तव धारवाडच्या लगत्यास राजश्री विसाजीपंत आठवले यांस तीन हजार फौजे-निशीं ठेविले आहेत. याजमुळें बंकापूरकर बलखुद आहेत. तिकडे उपसर्ग किमपि नाहीं. पथकापेकीं हुबळीस शंभर, लक्ष्मेश्वरास चारशें, एकूण पांचशें राऊत महालांत ठेविले आहेत. कळावें. माागहून इक-डील वर्तमान सविस्तर लेहून पाठवितों. माझे शरीरीं समाधान नाहीं. पांच सात दिवस ज्वर येत होता. हल्लीं उपशम आहे, आज नऊ दिवस स्नान नाहीं. दोन चार दिवसांत स्नानही करितों. धौशा जवळ आला आहे, पंधरा दिवसांनीं तुंगभद्रातीरास येतो. गुंता नाहीं. कडपेकर कर्नोळकरही लौकरच येतील. अदवानीकर यांणीं हैदरखान यांजकडे महमदखान जाफराबादी म्हणोन पाठविला होता त्याचें मळमळीतच आहे. कसें होतें तें मागाहून लिहितों. नहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २१९८. (मार्ग० शु० ३–३ दि०).

विठ्ठल कृष्ण दातार यांचें लक्ष्मेश्वराहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. रवाना छ २ जिल्काद. समान सबैन. मार्ग-शीर्ष मास.

" श्रीमंतांच्या फौजा वाळानदीच्या पाण्यावर होत्या तेथून कूच करून तुंगभद्रापार होऊन हरपनहळ्ळी उजवी घालून चित्र-दुर्गकराचे भेटीस गेले. एका दोहों रोजीं भेटी होणार आहेत. बंका-पुरकरांनीं परगण्यास शिलशिला लाविला आहे. त्यांच्या व आमच्या राउतांच्या दर रोज गांठी पडतात. इकडील बंदोबस्तास विसाजीपंत आठवले ठेविले आहेत, त्यांजबरोबर दोन हजार फौज चांगली आहे."

नं. २१९९. (मार्ग० शु०–दिसें० प० पंधरवडा.)

परशुरामभाऊंचें पत्र लष्करांतून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस.

श. १६९९ हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७७

" तुंगापार गलगनाथाजवळ जाल्याचें सविस्तर वर्तमान कंपली नजीक येथील मुक्कामाहून लिहोन पाठविलेंच आहे. अलीकडील वर्तमान तर अनागोंदीची खंडणी झाली पाहिजे यास्तव सखारामपंत पानशे यांस पाठवून कंपलीस तोफा लाविल्या होत्या. त्यास जाबसालास वकील येणार म्हणोन रदबदल जाल्यावरोन तोफा मना केल्या. कनकगिरीकर वकील आले आहेत. कंपलीवरोन कूच करोन छ ६ जिल्कादीं येथें आलों. मार्गीं बलारीकरांचा एक गांव होता तो चढ्या घोडयानिशीं दोन घटकांत हल्ला करोन घेतला, आंत हैदरखानाचे प्यादे होते ते कापून काढिले. हैदरखान बलारीपलीकडे हिरेहाळावर आहे. आह्मी नदीपार जाल्यापासोन रातबिरात दगा करावा या मसलतींत आहे. आह्मी सावध आहों. शत्रूस व आह्मांस चौदा कोसांचें अंतर आहे. धौशा कृष्णापार आला. इकडे लौकर आला तरी त्यास एक महिना लागेल ! अदवानीकर शत्रूच्या सूत्रांत आहेत. इकडील कुमकेस येऊं नये असा भाव त्यांचा आहे. कडपें कर्नोळकर जमावसुद्धां तयार आहेत. त्यांस इकडे निघून येण्याविशीं पत्रें गेलीं आहेत. आह्मी दुर्गकरास सामील करून घेतों म्हणजे चार रुपये मिळते. परंतु (माझ्या) दुखण्यामुळें विलग पडलें. इलाज नाहीं ! "

नं. २२००. (मार्ग० शु० ६–६ डिसेंबर.)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बावाजीचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र मिरजेस—पैा छ ८ जिल्काद.

" शिद्यांचा जहागिरीचा व अशेरी किल्ल्याचा आडमुद्दा होता त्यास भेलसें वगैरे जहागीर हिंदुस्थानांतच दहा लक्षांची द्यावी. इकडील बंदोबस्त जाल्यावर हिंदुस्थानांत जावयास निरोप देतेसमयीं मग अशेरीचा जाबसाल (बोलावा) याप्रमाणें ठराव होऊन त्यांणीं करवीरचे मसलतीस लवकर जावें असें ठरलें. त्यानीं कूच केल्याचें वर्तमानही आलें. होळकराचे समजाविशीस विसाजी कृष्ण गेले आहेत.

अद्यापि समजाविशी नाहीं. भोंसल्यांस हरीपंततात्यांकडे फौज पाठवून खाशांनीं पुरंदरास भेटीस यावें याविशीं पत्रें जातच आहेत व ते वऱ्हाडांत आल्याचीं पत्रेंही आलीं. राजश्री हरीपंततात्या कार्तिक वद्य दशमीस तुंगभद्रापार जाले. हरपनहळ्ळीच्या मुक्कामचीं पत्रें आलीं, राजश्री विसाजी आपाजी अलीकडे येत होते. त्यांजवर हैदराचा छापा येत होता. वर्तमान कळल्यावर विसाजीपंत लक्ष्मेश्वराच्या आसऱ्यास आले. राजश्री हरीपंततात्यांकडील कांहीं फौज आली त्यांची व हैदराचे फौजेची लढाई जाली. त्याजकडील हजार पांचशें घोडे आणिले. याप्रमाणें सांडणीस्वार तात्यांचे लष्करांतून आला तो सांगत होता. कागदींपत्रीं तसेंच कांहीं असल्यास एका दो दिवशीं पत्रें येतील. आपाराव बळवंत यांणीं पंचमीस डेरे बाहेर दिले. प्रतिनिधीचें पथक व बाबूजी नाइकाची पागा व आनंदराव गोपाळ व हुजरातची कांहीं फौज चार दिवसांत निघणार. हैदरखानाकडील वकील येथें बोलून तिकडे गेला होता. त्यास हैदरखानाकडून फिरून आला आहे. वांईस गेला आहे. रास्ते यांस घेऊन येणार. "

नं. २२०१. (मार्ग. शु० ७–७ दिसेंबर.)

पैवस्ती छ ८ जिल्काद. मार्गशीर्ष मास. भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस–

" गृहस्थ ब्राह्मण वैदिक काल मालवणाहून आला त्यानें सांगितलें जे, इंग्रजांचा वकील व कारकून एक मालवणास आला आहे तो श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील आहे. मुंबईहून[1] श्रीमंत आठ चार दिवसांनीं मालवणास येणार. साहित्य होत आहे. मालवणास आलेवर तिकडून करवीराकडे येणार. " म्हणोन वर्तमान लिहिलें तें कळलें. याचप्रमाणें आणखी एक दोन जागांहून वर्तमान आलें आहे. परंतु मुख्य स्थळाहून कांहीं बातमी आली नाहीं. त्यांजकडे पत्रें पाठ-

१ मुंबईहून.

विलीं आहेत व वकिलासही पत्रें गेलीं आहेत. बंदोबस्त होईल. कलकत्याहून (मुंबईकरांस) पत्रें दादासाहेबांस निरोप देण्याविशीं आलीं आहेत. त्या अन्वयें (मुंबईंतून) श्रीमंत जाण्याचा विचार करितीलसें दिसतें. चहोंकडे माणसें बातमीकारितां रवाना जालीं आहेत. "

नं. २२०२. (मार्ग० शु०–दि० प० पंधर०).

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र माहे जिल्कादचें—

" आपण छ ९ जिल्कादचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. " सटवोजी भोंसला आमच्या तालुकियास मनस्वी उपद्रव करीत आहे. महादजी शिंदे तर रहिमतपुरींच स्वस्थ आहेत. त्यांजकडे सरकारांतून करवीरची मसलत सांगितली असून बंदोबस्त होत नाहीं. " म्हणून लिहिलें, त्यास करवीरच्या मसलतीस लवकर जावें याविशीं शिंदे यांस वरचेवर पत्रें जात आहेत. रहिमतपुराहून कूच करून बाहेर राहिले आहेत. लोकांस बोलावणीं गेलीं आहेत. तिकडे यावयाची तयारी होत आहे. " लष्करचें वर्तमान मार्गशीर्ष शु० २ चीं पत्रें आलीं. चित्रदुर्गाकडे (आमचे सरदार) जाणार होते. त्यास हैदरास बातमी कळोन तो आडवा आला. दोन तीन मजली हैदर पाठीमागेंच येत गेला. पुढें मैदान लागलें यास्तव सेंडुराजवळच राहिला. हे कंपलीवरच राहिले. दुर्गाकडे मैदानांतून जावें हीच मसलत आहे " ह्मणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. होळकर याचे समजुतीचा प्रकार अद्यापि निश्चयांत नाहीं. विसाजी कृष्ण यांजकडील कारकून होळकराकडे गेले आहेत. त्यांजकडील जाबसाल गायकवाडांचा व ' शिंद्यांस जहागीर दिली त्या अन्वयें आपणास द्यावी व किल्ला द्यावा. ते आपण सोबती. ' ऐसे आडमुद्याचे जाबसाल आहेत. मोरोबादादा फडणीस मुहूर्तानें येथून निघून कोळें नरसिंगपुरास

जाऊन पंढरपुरास जावें, तेथून (निरा) नरसिंगपुरास जाऊन पुढें गंगेस जावें, याकरितां निघाले आहेत. मुंबईकडील नवल विशेष नाहीं. रोज बातमी येत असते. (तेथें श्रीमंत दादासाहेब) स्वस्थ आहेत. सप्तर्षीकडील वर्तमान श्रीमंत महाराज कैलासवासी जाले. राणी राहिली आहे. त्यास श्रीमंत राजश्री नाना अथवा बापू दुखवटयाचीं वस्त्रें द्यावयास जाणार आहेत. राज्याभिषेक व्हावा त्यास अतिचारा-करितां मुहूर्त नाहीं. वैशाखमासीं होईल. तोंपर्यंत जुने शिक्केच जातील."

नं. २२०३. (मार्ग० शु० १२–११ दिसेंबर.)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून गंगाधरराव गोविंद यांस पत्र मिरजेस रवाना माहे जिल्काद—

"आपण छ ६ जिल्कादचें पत्र पाठविलें तें पावलें. होळ-करांची फौज हिंदुस्थानांत होती ती नजीबखान रोहिला यानें छापा घालून बुडविली याजकरितां होळकर हिंदुस्थानांत जावयास निरोप मागतात व गायकवाडासाठीं रुसव्यांतच आहेत."

नं. २२०४. (मार्ग० व०–दिसें० दु० पंधर०)

शिवाजी बाबाजीचें भिवडी नजीक पुरंदर येथून मिरजेस गंगा-धरराव गोविंद यांस पत्र--

"राजश्री मोरोबादादाकडील ठराव जाला. (त्यांस) शिवनेर किल्ला द्यावा. दीड हजार फौजेचा सरंजाम द्यावा. जसे दोघे कार-भारी तसे हे तिसरे. पुढें फौज घेऊन स्वारीस जाणें तरी त्रिवर्गांचे विचारें ठरल्यास जावें. येणेंप्रमाणें ठरलें. आणशपत यादीबुदी व्हावयाच्या आहेत. होतील. दीड हजार फौजेचा सरंजाम राजश्री नानांसही द्यावा येणेंप्रमाणें ठरलें. राजश्री सखारामपंतांस पहिलाच आहे."

---

१ गोदातीरास. २ साताऱ्याकडील. ३ छत्रपति रामराजे. ४ सती गेली नाहीं. ५ मंगळ आदि पंचग्रह आपापल्या राशीचा भोगकाळ संपण्यापूर्वीच दुसऱ्या राशीस जातात त्यास अतिचार म्हणतात. हा काल राज्याभिषेकास निषिद्ध आहे.

नं. २२०५. (मार्ग० व०–दिसें० दु० पंधर०)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र–

" लष्कर कैंचनगुडाहून कूच करून रारावी परगणे अदवानी हयग्रीवातीरीं सरकारच्या फौजा आहेत. भाऊसाहेबांचे शरीरीं फारच समाधान नव्हतें. प्रस्तुत आरोग्य आहे. धौशास व सरकारचे फौजेस तीन मजलींची तफावत आहे. हैदरखान बल्लारीचे पुढें मुरगोडचे सुमारें आहे " म्हणोन लिहिलें तें कळलें. तात्यांस मिळावयास आपा बळवंताची रवानगी जालीच आहे. जावयाच्या तरतुदेंत आहेत. आनंदराव गोपाळ यांसही निरोप जाला. आपा बळवंत व आनंदराव गोपाळ व प्रतिनिधि मिळून पांच सहा हजार फौज आहे. भोंसल्याकडील वर्तमान तरी मुधोजी व रघोजी भोंसले वऱ्हाडांत आल्याचीं पत्रें आलीं. त्यांजकडील बाबूराव वैद्य पुढें आले आहेत. पांच हजार फौज परभारें हरीपंततात्यांकडे पाठवून खाशानीं पुण्यास यावें याप्रमाणें ठरलें आहे. "

नं. २२०६. (मार्ग० व०–दिसें० दु० पंधर०)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" आपा बळवंत बाहेर निघाले आहेत. ते व आनंदराव गोपाळ मिळून पांच हजार फौजेनिशीं हरीपंततात्यांकडे जातात. धारवाडाकडे सरंजामी फौज ठेविल्यास रोजमुऱ्याचा पेंच नाहीं, याजकरितां प्रतिनिधीचें पथक रहावयास तिकडे जाणार. फत्तेसिंग गायकवाड यानीं अमृतराव आपाजी अहमदाबादेचा सुभा यांस जिवें मारिलें, तेव्हां गोविंदराव गायकवाड यांस पद सेनाखासखेलीचें द्यावयाचें ठरलें. हें होळकराचे मनोगताप्रमाणेंच होईल. आतां (त्यांचे)

समजुतीस गुंता पडत नाहीं. शिंद्यानीं जलदीनें कूच करून करवीराकडे जावें म्हणून बाळाराव यांस रूबरू ताकीद नानानीं केली आहे व शिंदे यांस सरकारचीं पत्रें गेलीं आहेत. शिंदे कूच करून मसुरास गेले. तेथून कूच करून कऱ्हाडास गेले म्हणून वर्तमान आलें आहे. आतां दिवसगत लावणार नाहींतसें दिसतें. "

नं. २२०७. (मार्ग० व०–दिसें० दु० पंधर०)

परशुरामभाऊंचें लष्करांतून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" आम्ही पंचगव्य घेतलें. स्नानसंध्या होत असती परंतु उशीर लावीत नाहीं, थोडक्यांत आटोपीत आहों. फिकीर न करावी. "

नं. २२०८. (मार्ग० व० ३०–२९ दिसें०)

लष्कर मुक्काम रारावी प्रांत अदवानी येथून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. रवाना छ २८ जिल्काद.

" शिंद्यांचे आडमुद्दे सिद्धीस गेले तेव्हां आजला ते रहिमतपूर सोडून बाहेर निघालेच असतील. त्यानीं करवीरकरांचें मनापासून पारिपत्य केल्यास अगाध आहे ऐसें नाहीं. परंतु येसाजी शिंद्यांचें प्राक्तन कैसें आहे न कळे ! " अशेरीसारखा किल्ला श्रीमंतानीं शिंद्यांस दिल्यावर करवीरचें पारिपत्य करून कर्नाटकचे मसलतीस अनुकूळ व्हावें असें जाल्यासच उत्तम; " म्हणून लिहिलें, त्यास येविशीं राा नानांस वारंवार लिहीतच आहों. " जत परगण्यांत आबाजी नाईक एकोडीकर व जोतिबा काटकर हे हैदरखानाकडून ऐवज आणून लोक ठेवीत होते, त्याविशीं राा विनायकपंत अथणीकर यांस (तुम्ही) लिहिलें आहे, त्यास विनायकपंतानीं त्यांचें पारिपत्य केलें असेल. "

श्रीगणपति.

नं. २२०९. (मार्ग० व० ३०–२९ दिसेंबर.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. आमची

---

१ पत्र परशुरामभाऊंचें.

शरीरप्रकृत मुक्काम मजकुरास आल्यावर उतार पडोन मागती बिघडली होती. चार दिवस वाखा होऊन फिरोन गुण पडला. आज आठ दिवस प्रकृत बऱ्यांतच आहे. अद्याप स्नान करीत नाहीं. आणखी आठ चार दिवसांनीं निस्तोष पाहून मग स्नानही करूं. आज पंधरा सतरा मुक्काम येथें पडले याजमुळें ठीक पडलें. हैदरखान प्रस्तुत वडदरोजीजवळ बातेऱ्या बांधोन मजबुतीनें उतरला आहे. आजवर सडाच होता. हल्लीं बुनगेंही आणविलें आहे अशी बातमी आहे. कडपें कर्नोळ व अदवानीकर जमावसुद्धां यावयास मागेंपुढें पहातात. बुनगे कातवार वगैरे डेरे दांडे नदीपलीकडे लावून द्यावे असें होतें, परंतु तूर्त तो मजकूर राहिला, अनेगुंदीकर शत्रूसच मिळाले. इकडे आले नाहींत. कनकगिरीकर इकडील लक्ष राखोन आहेत. त्यांजकडे तावरगिरें परगणा राा रामचंद्रपंत मामाचे सरंजामांतील होता तो त्यानीं मामाचे हवालीं केला. सालाबाद खंडणी आठ हजार येणें तो ऐवज राजश्री दौलतराव हिंदुराव घोरपडे यांच्या सरंजामास लावून दिल्हा आहे. त्याजखेरीज त्यांजपासोन घ्यावें तर संस्थान नातवान. आणि रंगाचा नाईक भला मनुष्य. नेहमीं त्याच्या मुलखांतून रहदारी देशची लागली आहे. बातमी आम्हांस शत्रूची पोहोंचवितो. त्यास ये समयीं दुखविल्यास ठीक नाहीं. याजमुळें त्याजपासोन कांहीं घेतलें नाहीं. शत्रूची फौज दोन वेळां चार हजार पावेतों कनकगिरी तावरगिरें पावेतों धांवली होती. राजश्री दौलतराव यांची फौज परवां लष्करास आली त्यांचे पाळतीवर आले होते. परंतु गांठ पडली नाहीं. यांस बातमी कळली याजमुळें रातवा खोन शिरनुराकडे जावोन चुकवोन आले. दुसऱ्या खेपेचें वर्तमान कोपळास तोफा तूर्त ठेविल्या. दारूगोळा व बाण वगैरे सातशें बैल भरून लष्करास आणविले ते येत होते. कनकगिरीच्या पलकिडे दोन कोसांवर मुक्काम करून राहिले. तों शत्रूची फौज त्यांची

बातमी राखोन आडवी गेली. दुसरे दिवशीं मार्गी गांठ घालांवी तों बैलवाल्यांस वर्तमान रात्रीसच आवशीस कळलें. तेच समयीं लादोन रातोरात गजेंद्रगडास गेले म्हणोन क्षेम जाहलें. एरवीं मोठा दगा जाला होता. सांप्रत बैल गजेंद्रगडासच आहेत. याउपर कांहीं फौज पाठवून आणविणार धौंशाकडे येथून वकील गेले आहेत. त्यांचीं पत्रें तर वरचेवर येतात कीं आह्मी जलद येतों, तोंपर्यंत शत्रूशीं गांठ एकंदर घालों नये, अशीं येतात. परंतु अद्याप कृष्णेअलीकडे उमटत नाहींत ! किमानपक्ष पंधरा दिवस यावयास लागतील असें वाटतें. तोंपर्यंत आह्मी याच तालुक्यांत आहों. धौंशा आल्यावर जो मनसबा ठरेल तो ल्यावयास येईल. अदवानीकरांकडील वकील मेजवानी व वस्त्रें घेऊन आले आहेत. खंडणीचें बोलणें अगदींच बोलत नाहींत. त्यांचीं गांवखेडीं रोखापत्र करून खंडावीं तर नबाब निजाम अल्ली[1] खानाची मर्जी खट्टी होईल. धौंशा येणार त्यास वाईट वाटेल आणि पुढील मातबर काम होणें त्यास हिसका बसेल. यास्तव तूर्त कांहींच उपसर्ग करूं नये असें राजश्री हरीपंततात्यांचें मानस; याजमुळें बोलत नाहीं. धौंशा आलियावर काय घडेल पहावें. खर्चाची ओढ भारी. पैसा तर मिळावयाचें समजलेंच आहे. कसा परिणाम लागेल नकळे. धौंशा भीमातीरास आला आहे. 'लौकर येतों' म्हणोन पत्रें येतात. कनिष्ठ पक्ष एक मास तरी पाहिजे, तोंपावेतों काय घडेल तें पहावें. खर्चाची निकड कांहीं लिहितां पुरवत नाहीं. दोहीं पथकांची अडचण. तसीच हुजरातीचीही चिंता. तेव्हां कसा परिणाम लागेल ? श्रीगजानन परिणाम लावील तो खरा, मजला श्रीकृपेंकरून आरोग्य आहे. कांहीं चिंता न करावी. मजला समाधान नाहींसें जाहलें सबब दुर्गाकडे जावयाचें तेंही राहिलें, परंतु परिणाम खर्चामुळें ठीक नाहीं. काय काय घडतें तें पहावें. लोभ असो दीजे हे आशीर्वाद.

---

[1] कारण कीं अदवानीचा नबाब बसालतजंग हा निजामअल्लीचा भाऊ.

श. १६९९ हैदरअल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२१०. (पौष शु० १–३० दिसेंबर.)

पुण्याहून शिवाजी बाबाजीचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस. रवाना छ २९ जिल्काद.

" श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडील पत्रें केंचनगुड्च्या मुक्कामचीं आलीं. हैदरखान वडदरूजीवर आहे. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांस पंधरा दिवस ज्वर येत आहे. उदकशांत व क्लेशदानें केलीं. उपशम होईल " म्हणून लिहिलें तें कळलें. "

नं. २२११. (जाने० प० पंधर०)

असे आले असोन अद्याप जाबसाल नाहीं. मौजे रेणदाळ हा गांव इनाम घोरपडे यांजकडून असतां हल्लीं हरी बाबाजी याणीं ५० बैल तोफेकडे व पांचशें रुपये मसाला याशिवाय मुदबखाकडे सामानाचे रोखे येऊन गांवांत नानाप्रकारें गांवची खराबी केली. रेणदाळीं कमावीसदार याची बेअब्रू करोन गांवाजवळ दीड हजार रूपये घेतले. गुरें गांवचीं शंभर नेलीं व घोडीं दहा घेतलीं, येणेंप्रमाणें जालें.

शिलेदार वगैरे करवीरकराकडे गुदस्तां तिगस्तां चाकरीस गेले होते त्यांचीं घरें जप्त करोन मुलेमाणसें धरोन पाठवावीं म्हणोन पाटील बावा म्हणतात, ऐशियास गुदस्तां तिगस्तां गेले होते ते सालमजकुरीं हुजरातीस कांहीं चाकरीस गेले नाहींत. याप्रमाणें सांगोन गांवावर स्वारी आणोन गांवची खंडणी पंधरा हजार रूपयेवर करोन गांवचा नागावा करून घोडीं वगैरे नेलें. पंधरा हजार खंडणी. पैकीं वीस बेवीस हजार रूपये गांवाजवळ घेतले ! नागावा माघारा द्यावा तोही दिला नाहीं ! असें असोन आजपावेतों कोणी फिर्यादीस देखील वीस पंचवीस वर्षें आले नसतां हल्लीं पाटील बावाकडील स्वार येऊन पवाराचें कर्ज येणें आहे म्हणोन मसाला रोखा आणिला. ते गांवांत दाणावैरण वगैरे उपद्रव करीत असतां दुसरा रोखा मसाल्यासुद्धां रामचंद्र नीलकंठ याचे नांवचा आला तेही गांवांत उपद्रव करित आहेत. दोन्ही रोखे मिळोन पन्नास रूपये मसाला घेतला. वीस पंचवीस स्वार व

१ हें पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

रीस असतील. कांहीं आम्हाकडे लष्करांत आहेत. कांहीं रास्ते वगैरे यांजकडे गेले आहेत. त्यांची जप्ती केलिया कोणते भिस्तीवर त्यानीं चाकरी करावी ?

शिवाय प्यादे गांवांत उपद्रव करीत बैसले आहेत. पाटील व देसाई यांच्या बायका व जिवाजीपंत कुळकर्णी यांस दोन दिवस कोंडून देवळांत बैसविलें आहे. मनाच्चिठ्ठी-विषयीं लिहिलें असतां मनाच्चिठ्ठी होत नाहीं. गांवकरीच लष्करास पाठवणें म्हणोंन आग्रह आहे.

नं. २२१२. श्री. (पौष शु०—जाने० प० पंधरवडा.)

यांदी राजश्री पाटीलबावांकडून अष्टें व वाळव्यांस पतके आले होते त्याणीं रूपये घेतले. राजश्री बाबूराव.

४५॥ मौजे दुधोंडी.
५० घोगांव.
४५ तुपारी. दुबार पडले.
२१ नागराळें.

१६२॥

सदरहू प्रमाणें रूपये घेतले म्हणून कमावीसदाराचीं पत्रें आलीं आहेत. रोखे दाखवून गांवकरांजवळ दिले नाहींत ! रूपये घेऊन रोखे फाडून टाकिले ! पावतीही दिली नाहीं ! ! !

नं. २२१३. (पौष शु०-जाने० प० पंधर०)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र.

" दादासाहेब मुंबईसच आहेत. वरचेवर बातमी येत असते. होळकराचे समजुतीकारितां विसाजी कृष्ण येथून गेले आहेत. तेथून

---

१ यादी गंगाधरराव गोविंद यांनीं पुणें दरबाराकडे मिरजेहून पाठविली.

बोलून येतील ह्या अन्वयें सखारामबापू अथवा नानां होळकर यांचे भेटीस जाऊन समजाविशीचा ठराव होणें तो होईल. आपाजी गणेश यांचे चिरंजीव अमृतराव अहमदाबादेंत होते त्यांस फत्तेसिंगराव गायकवाड यानीं भेटीस बोलाविलें होतें. जात होते तों वाटेंत एका गाडद्यानें जिवें मारिलें. फत्तेसिंगाकडून सरकारांत पत्रें आलीं जे, हे गोष्ट आपणाकडून घडली नाहीं. परंतु हा त्यांजकडूनच प्रकार (झाला) असें लौकिकांत आहे. पुढें पारिपत्य होणें तेव्हां होईल. परंतु सध्या ब्राह्मण जिवानिशीं गेला. अहमदाबादेंत राजश्री गोविंदराव गायकवाड आहेत व गणेशपंत बेहरे आहेत. दोघानीं शहरचा बंदोबस्त चांगला केला आहे. "

नं. २२१४. **श्री.** (पौष शु०—जाने० प० पंधर०)

श्रीमंत मातुश्रीबाई वडिलांचे सेवेशीं पोष्य महादाजी बल्लाळ. साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल जाणून वडिलीं कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन बहुत संतोष जाहला. ऐसेंच निरंतर पत्र पाठवून आनंदवीत असावें. यानंतर राजश्री महादजी शिंदे यांची स्वारी करवीराकडे गेली याजमुळें आपले तालुक्यास व वतनबाबीस वगैरे उपद्रव लागला; त्यास येविशीं पाटीलबावांस पत्र लिहावें म्हणोन आपण लिहिलें त्याजवरून पाटीलबावांस आम्हीं लिहिलें आहे. व राजश्री बाळाराव गोविंद शिंद्यांचे कारभारी यांचें पत्र पाटीलबावांस घेऊन पाठाविलें आहे. हीं आपण पाटीलबावांकडे पाठवावीं व आपणही लिहावें, म्हणजे बंदोबस्त होईल. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंति.

---

१ पुणें दरबारचे मुत्सद्दी महादजीपंत गुरुजी यांचें अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर यांस पत्र पुण्याहून. अनूबाई ही बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची कन्या.

श. १६९९ हैदरअल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२१५. (पौष शु०—जाने० पं० पंधर०)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र.

" महादजी शिंदे यांजकडून पत्रें आतांच आलीं. पन्हाळ्यापासून पांच कोसांवरून आलीं आहेत. वकिलांचें लिहिलें आलें कीं, " आधीं पन्हाळ्यास जावें. किरकोळ ठाण्यांस लागूं नये. (असें ठरवून पाटीलबावा) त्यांसीं गांठ घालितात. " म्हणोन लिहिलें आलें आहे. शिंद्याकडे आपण कारकून पाठविला आहे, स्नेह राखिला आहे, हें फार उत्तम. ' होळकरांची रवानगी कर्नाटकांत जाल्यास उत्तम ' म्हणोन लिहिलें त्यास त्यांचे समजीकरितां विसाजीपंत बिनीवाले जात होत, परंतु त्यांचे बंधु विठ्ठल कृष्ण निवर्तले यामुळें सुतक फिटल्यानंतर जातील. होळकर वाफगांवींच आहेत. ते शिंद्याशिवाय कर्नाटकांत जात नाहीं म्हणतात. शिंदे तर करवीरच्या मसलतीस गुंतले, तेव्हां होळकर जात नाहींतसें दिसतें. नबाबाकडील लढे होते व धौशाकडील निर्मळच्या चौथाईचे लढे होते ते फडशांत आले. त्यांजकडे पत्रें गेलीं. ते लवकरच सामील होतील. भोंसले वऱ्हाडांत आले आहेत. लवकरच गंगातीरास येऊन फौजा रवाना करोन खासा श्रीमंतांचे भेटीस येणार. राा आनंदराव गोपाळ फौजेंत निरोप घेऊन गेले. आपाबळवंत आज निरोप घेऊन गेले. प्रतिनिधीकडील फौज पुण्याजवळच आहे. आतां लढा नाहीं. तीन पथकें मिळोन फौज पांच सहा हजार आहे. सामान चांगलें आहे. रघुपतराव नारायण व त्रिंबकराव नारायण या उभयतांचा वांटणीचा काजिया होता. उभयतांनीं फौज ठेवून काजिया आरंभिला होता. त्यास दहा लक्ष रुपये उभयतानीं सरकारांत द्यावे आणि निम्मे निम्मे सरंजामाची वांटणी करून घ्यावी याप्रमाणें ठराव जाला. मुंबईहून माष्टीम पुण्यास यावयास

निघाला आहे. लष्करचीं पत्रें छ २५ जिल्कादचीं नजीक अदवानीच्या मुक्कामचीं आलीं. अधिकोत्तर कांहीं नाहीं. "

नं. २२१६. (पौष शु०—जाने० प० पंधर०)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" विसाजी कृष्ण होळकराकडे गेले आहेत. त्यांचे समजुतीचा प्रकार बोलून चालून निश्चयांत आला ह्मणजे लिहून पाठवितों. "

नं. २२१७. श्री. (पौष शु०—जाने० प० पंध०)

सेवेशी शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विनंती. राजश्री महादजी शिंदे यांणीं फौज प्यादे पाठविणेंविशीं व करवीरकरांकडे चाकरीस गेलें लोकांचे निमित्त करून केसोपंतमामाजवळून पांच हजार रुपये घेतले तें वृत्त विस्तारें केदारी जासुदाबरोबर लिहिलें तें कळलें असेल; म्हणून लिहिलें, त्यास " मिरज प्रांतींचे लोक करवीरकरांकडे गेले त्यांची चौकशी करून बंदोबस्त करणें तो मिरजेहून करितील, पांच हजार रुपये घेतले ते माघारे द्यावे, मिरज प्रांतांत कोणेविशीं उपसर्ग न करावा, " ह्मणोन श्रीमंतांचें व श्रीमंत नानाचीं पत्रें परभारें राजश्री महादजी शिंदे यांजकडे पाठविलीं तीं पावलींच असतील. " (तुमच्या) तिहीं पथकांतील फौज (आम्हाकडे चाकरीस) यावी. नाहीं तर आपणास फाज व प्यादे ठेऊन रुपये मिरज प्रांतांत घेणें जरूर " अशीं भाषणें महादजी शिंदे करितात. " आमचे स्थळीं शिंद्यांची दृष्ट यथास्थित दिसत नाहीं. तेव्हां किल्ल्यांतील शिबंदी व स्वार कसे पाठवावे ? नवा जमाव करून पाठवावा तर द्यावयास ऐवज कोणता, याचा पर्याय काय, तो लिहून पाठविणें. " ह्मणोन लिहिलें, त्यास पेशजी सरकारचीं पत्रें व श्रीमंत नानाचीं पाठविलीं त्यांत हा सर्व मजकूर लिहिला आहे. अतःपर फौजेविशीं व प्रांतांत

---

१ पत्र मिरजेस गंगाधरराव यांस पुण्याहून. २ केसो सखदेव हे अष्ट्याचे कमाविसदार.

उपद्रव करणार नाहींत. तोफेचा मजकूर लिहिला, त्यास आह्मी येथें विनंती केली कीं, किल्ल्यांत तोफ मोर्च्याचे कार्याची नाहीं. त्यास राजश्री महादजी शिंदे यांस यानीं लिहिल आहे कीं, " कारकून व गोलंदाज पाठवून तोफा पहाव्या. त्यांत मोर्च्याचे उपयोगी असेल तीं देतील. काम जाहल्यावर त्यांजकडे परत पाठवावी. " असें लिहिलें आहे व आपणांसही लिहिलें आहे कीं, " कारकून व गोलंदाज येईल ते तोफ दाखवितील ते द्यावी. काम जाहल्यावर तुम्हाकडे पाठवितील. " असें लिहिलें आहे. तोफांविशीं आम्ही कारभाऱ्यांस विनंती केलीच आहे. खरें न भासे, याजकरितां आपणास यानीं पत्रें लिहिलीं आहत. त्यास कारकून व गोलंदाज आल्यावरी तोफ ठाण्यास लावावयजोगी असल्यास तयार करून द्यावी. वरकडाविशीं बहुत प्रकारें शिंदे यांस श्रीमंत राजश्री नानानीं आपल्या खासदस्तुरें लिहिलें आहे. हल्लींही पत्रें परभारा पाठविलीं आहेत. त्यांचा गुण येईल तेव्हां खरा ! सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२१८. (पौष शु० ६–४ जानेवारी.)

यादी शिंदेकडे चाकरीस गेले त्यांचीं घरें जप्त. मौजे लोकूर. सुहूसन ११८७ समान सबैन मय्या व अल्लफ. माहे जिल्हेज छ ४ रोज रविवार.

लिंबाजी मुसळे.

५ भांडीं जिन्नस.
२ थाळे.
२ तांब्ये.
१ गुडगुडी पितळेचे कवचाची
—
५

९ चिरगुटें जुनीं.
५ वाकळा.
२ मूठ.
२ गोण्या.
—
९

३ घोडीं जिन्नस.
१ शिंगा चितोडा पंचकल्याण.
२ पैलीकडे गेले ते घोडे, नर.
—
३

---

१ येसाजी शिंदे करवीरकर यांजकडे. २ या यादींत सर्वत्र ' पैलीकडे ' म्हणजे म्हणेपलीकडे करवीरच्या राज्यांत असा अर्थ.

श. १६९९ हैदरअल्लीवर चवी स्वारी इ. स. १७७८

२४ गुरें जिन्नस.
२ गाई.
५ बैल.
१ म्हैस.
२ म्हशींचीं रेंडकें.
१ वासरूं गाईचें.
१ रेडा.
१२ शेरड्या.
२४

१ गल्ला जिन्नस. अदमास.
८॥ सजगुरे कली.
८॥ राळे कैली.
-।४ कित्ता. पेंव जोरीचें अदमास.
१ कापसाचें पेलव. वजन कलम ८८॥-
१९ आउताचें सामान.
२ फांस लोखंडी.
४ कोळप्याचीं पानें.
१ बेडगें लोखंडी.
१ कुदळ लोखंडी
४ विळे लोखंडी.
३ नाडे आउताचे
४ इड्या लोखंडी.
१९

१ जातें धोंडयाचें.
१ मुसळ लांकडाचें
७ माणसें नांवनिशी.
१ पलीकडे गेले रवळोजी चव्हाण.
१ लिंबाजी मुसळे खुद्द.
१ पोमाजी चव्हाण
२ बाईका.
१ आबाई.
१ लक्ष्मी.
२ मुलें दोन वर्षांचीं.
७

१ पैलीकडे गेला पोरगा संताजी गाइकवाड त्याची आई पोट भरावयास गेली बाळाई गायकवाडीण.

७२

१ स्वतंत्र अर्धेलीची घोडी घेऊन **भरमाजी मलवडे** भोंसल्याबराबरी बारगीर होऊन गेले.

२ भांडीं जिन्नस.
१ थाळा.
१ तांब्या.
२
१ बंदुकीचें शिंगट.
१० लोखंडी सामान.
२ विळे.
४ कोळप्याचीं पानें
१ तवा लोखंडी.
१ फांस.
२ इड्या.
१०
५ चिरगुटें जुनीं
५ वाकळा.
१ जोरी अदमासें-।-
४ गुरें जिन्नस.
२ बल.
१ गाई.
१ वासर.
४
१ शेळी.
१ करडें.
३ माणसें नांवनिशीं.
१ भरमाजी सिंदे.
१ आई.
० बायको मेली.
१ सुलताना बारगीरीस गेला आहे.

दरमहा तीन रुपयांची बोली करून घेऊन गेला आहे. स्वतंत्र तटाणी घेऊन गेला आहे. आयनापुरची लिंबोजी खटावकर याची अर्धेलीची.

२९

रवळोजी भोसले.

२ भांडें जिन्नस.
१ तांब्या.
१ वाटी.
२

३ जुनीं चिरगुटें.
१ वाकळ जुनी.
१ रजई जुनी छिटाची.
१ पासोडी जुनी.

५ आउताचें सामान.
१ फांस लोखंडी
१ विळा लोखंडी
२ इडया
१ नाडा.

१ जातें धोंडयाचें.
१ मुसळ लाकडाचें

दाणे जिन्नस. अदमास.
८१२ सजगुरे कैली.
८२ जोरी बीं.
८३ भुईवर पडले ते.
८१ बियाचीं कणसें.

३ घोडीं जिन्नस.
१ नर सिंगा पंचकल्याणी यारीद.
साल दीड.
२ पलीकडे गेलीं घोडीं मादवाना
३

६ गुर जिन्नस.
३ गाई.
३ वासरें.
६

६ माणूस नांवनिशी.
१ बहिरजी भोसले. पलीकडे गेले आहेत.
१ शिवाजी भोसले.
२ बाइका.
२ मुलें पोर दोघे.
१ बहिरजी भोसले याजबरोबर पांढरे मिसी याचा

लेक गेला आहे उंढगा.

२८

जोती पवार.

४ भांडीं जिन्नस.
२ थाळे.
१ तांब्या गुडीचा पितळचा,
१ बोगणें लहान.
४

६ चिरगुटें जुनीं.
४ वाकळा.
१ पासोडी.
१ घोंगडें.
६

१३ आउताचे जिन्नसा
१ फांस लोखंडाचा.
२ कोळप्याचीं पानें.
२ विळे.
२ खुरपीं.
४ नाडे आउताचे
२ इडया.
१३

३ हत्यारें.
१ बंदूक.
१ तरवार.

१ यारीद म्हणजे लहानसर घोडा, तद्भ. अनेकवचन यारीद. स्त्रीलिंग यारदी. अ. व. यारद्या,

१ ढाल.

३

१ गोणी जुनी.

१ मूठ.

दाणे जिन्नस अ-
दमास.

८॥- राळे कैली.

८१॥-जोरी गोणीं.

८।-कणसें बियाचीं

८॥-भुईवरील दाणे

१७ गुरें जिन्नस.

४ गाई

१ कालवड.

५ बैल.

१ म्हस.

५ शेरडें.

१ करडूं.

१७

५ घोडीं जिन्नस.

१ शिंगा वनकुमा-
ईत. साल दीड.

२ चाकरीस गेलीं
ते घाडीं.

१ शिंगी.

१ बोर कुमाईत

२

२ कित्ता घरीं आ-
हेत तीं.

१ जरदी तटाणी.

१ सिंगा जरदा.

५,

१० माणस नांवनिशी.

१ जोर्ती पवार
खुद्द.

१ लिंबाजी पवार
लेक.

१ लहान मल पो-
रगा.

३ बाइका, लेकी,
सूनसुद्धां.

२ बटकी सालीना
४० वर्षांच्या.

२ बटकीचे पोरगे
सालीना १०
वर्षांचे.

१ मुकुंदाबरो-
बरी पली-
कडे घोडया

वरी गेला
आहे.

१ घरीं आहे.

२

६०

एकूण तेरीज जमा
वगैरे वाकळा व लो-
खंडी व दोर दोरकाडी
व गुरें व घोडीं,शेळ्या.
पितळी, कास,कापडी,
हत्यार वगैरे सुमार.

७२ क.

२९ क.

२८ क.

६० क.

१८९

एकशें एकूणनव्वद.

येणेंप्रमाणें आम-
च्या जिमेस असत.
स्वामी ज्याप्रमाणेंआज्ञा
कराल त्याजप्रमाणें
वर्तणूक करूं.

तारीख ५ जिल्हेज
सन समान सबन मय्या
व अल्लफ.

---

१ बटकीचा पोरगा दहा वर्षांचा दोन घोडीं लष्करास गेलीं त्याबरोबर चाकरीस गडी म्हणून गेला. २ ही लोकूरच्या गांवकामगारांनीं मिरज मुभ्याकडे याद लिहून दिली आहे.

श्रीगणराज.

नं. २२१९. (पौष शु० ७–५ जानेवारी.)

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ ५ जिल्हेज पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. छ १ जिल्हेजीं खासा हैदरखान बरोबर सरंजामसुद्धां चालून आला .ं आह्मी गोटांत होतों. वर्तमान कळतांच तीर्थस्वरूपांसुद्धां तयार ह्ाऊन गेलों. मग तो चालून आला. मग आगीच्या मारांतून आमचें हत्यार लागलें नाहीं. घोडीं मात्र शेंपन्नास पावेतों जायां जाहलीं. मग कूच करून रातोरात तुंगभद्रापार जालों. दुसरे दिवशीं कूच केलें. तुंगातीरानेंच येथपावेतों आलों. जे दिवशीं शत्रु आला ते दिवशीं आधीं तलाव्यास राजश्री आनंदराव जिवाजी निा रास्ते व महिमाजी मुसे गेले होते. त्यास शत्रूचे फौजेचें त्यांचें युद्ध आमचे आधींच लागलें होतें. मग आनंदराव जिवाजी यांस जखमा लागल्या. महिमाजी मुसे यांस मांडीस गोळी लागून मांडी उतरली आहे. असें जाहलें. आणखी घोडीं पुढें गेल्यांपैकीं खराबी जाहली. धौशाही कृष्णातीरास आले. त्यांस आह्मास दहा कोसांची तफावत आहे. कांहीं गुंता नाहीं. आमचे लष्करामध्यें कांहीं ताल राहिला नाहीं. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांस चांगलें आरोग्य जाहलें. घोडयावर चांगले बसूं लागले. ईश्वरें मोठा लाभ दिला ! शरीरामध्यें बाकी कांहीं राहिली नव्हती. परंतु ईश्वरें मोठें यश दिलें. येथें आमच्या लष्करामध्यें मानाजी शिंदे वगैरे बखेडेखोर आहेत ते कांहीं सुचूं देत नाहींत ! पैका अगदीं पोटास नाहीं. नालबंदीपैकीं पैका तीन वर्षें नाहीं. अशी गत हुजरातची जाहली लोकांत कांहीं बाकी राहिली नाहीं. सर्व रक्षिता श्रीहार आहे !

---

१ पत्र गंगाधरराव यांस मिरजेस रघुनाथराव नीलकंठ कुरुंदवाडकर यांचें.

श. १६९९ हैदरअल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

आमचा आजचा मुक्काम गणकल तालुका रायचूर येथें आहे. आमित्र येथून पंधरा कोसांवर आहे. वरकड वर्तमान तीर्थस्वरूपांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. सदैव पत्र पाठवून सांभाळ करीत जावा. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २२२०. (पौष शु० ७–५ जानेवारी.)

पैा छ १२ जिल्हेज. सन समान सबैन. पौषमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ ५ जिल्हेज सोमवार मुक्काम नजीक भनू. सडी स्वारी. वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्ही छ २४ जिल्काद गुरूवारचें पत्र पाठविलें तें छ ३ जिल्हेज मंदवारीं प्रविष्ट जाहलें. सप्तऋषीचे यजमान कैलासवासी जाहले व सटवोजी भोसले मार्कंडेश्वरापावेतों बुचाडें व खळीं जाळून गेल्याचा मजकूर व ' अलीकडे पांच सातशें लोक नवे करार केले. शिंदेही कऱ्हाडाजवळ आले. ते लौकर येत नाहींत. आल्यानंतर मग राऊत ठेवीत नाहीं. ' म्हणून लिहिलें तें व ' गांवगन्नाची खराबी फार होऊं लागली याजकरितां कोणी कोणी गांवकरांनीं जाऊन पांच पंचवीस रुपये सटवोजी भोंसल्यास देवून बचाव करून घेतला ' म्हणून लिहिलें तें कळलें. गांवकरांचा अन्याय काय ? शिंदे कराडाकडे आले तेव्हां याजउपर लौकर येतील असें वाटते. आमचे शरीरीं समाधान नव्हतें. उपशम जाहल्यानंतर तुह्माकडे सविस्तर वर्तमान लिहून पाठविलें आहे त्याजवरून कळेल. आमचा मुक्काम रारावीजवळ पंधरा दिवस होता. तेथेंच हैदरखान छ १ जिल्हेजीं गुरूवारीं वापेटी नजीक बल्लारी येथून कूच करून चालोन आला. ते दिवशीं रास्ते यांजकडील पथक

---

१ पत्र गंगाधररावांस मिरजेस.

श. १६९९ हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

राजश्री आनंदराव जिवाजी व गोविंदराव बारवकर वगैरे दोन तीन पथकें कहीस गेलीं होतीं. आदले दिवशीं राजश्री हरीपंततात्याच सडे होऊन लष्करालगतच राहिले होते. शत्रूची गांठ कहीच्या पथकांचीच गांठ पडली. कहीची फौज थोडी. हैदरखानाचीच गांठ पडली, तेव्हां सोशीत सोशीत दोन तीन कोस गांठ तोडीत आले. राजश्री हरीपंततात्याकडे बातमी आली. येतांच तयार होऊन तोंडावर जाऊन उभे राहिले. आनंदराव जिवाजीस तरवारीची जखम आहे. खैर आहे. आणखी त्यांजकडील दहा वीस जायां जखमी जाहले. तसेच हुजरा तींतही दहा वीस जायां जखमी जाहले. कहीचीं घोडीं बहुत दगावलीं. शत्रु हिय्यानेंच यावें म्हणून आला होता; परंतु फौजेची गांठ पडली. गलबल जाहली असें समजोन प्रहर दिवस असतां शत्रु चालोन आला. तेव्हां बुनग्याचें कूच करून तुंगभद्रेवरी लावून देऊन आम्ही तोंडावर उभे राहिलों. तों दिवसही थोडा राहिला. लढाईचे तोंड लावावयाचा लाग अघाडीस आगीच्या माराखालीं साधेना. याजकारितां फौजेचा गोलचा गोल जमून बुनगें पुढें लावून दम खात चालूं लागलों. अस्तमान जाहल्यानंतर आमचे तळावरच येऊन तो राहिला. आमचें बुनगें भारी. याजकारितां तुंगभद्रापार करून भनूकडे लावून दिल्हें. तोही तुंगभद्रेस आला. तूर्त त्याचा मुक्काम तेथेंच आहे. त्याची फौज पांच सात हजार तलाव्यास पुढें येत आहे. तिची बातमी राखून गांठ घालावी असें (मनांत) आहे. आम्ही सडे होऊन बुणगें पाठीमागें देवदुर्ग तालुका व अदवानी तालुका यांची सरद येथें आहे. धौशाही कृष्णेवर आला. दहा कोसांची तफावत आहे. नबाबाचीं पत्रेंही त्यास इकडे यावयाविशीं निकडीचीं येतात. त्याचें जंगी सामान चांगलें आहे. 'पन्नास तोफ रवाना नबाबांनीं केली. लवकर येतों' म्हणून धौशाचीं पत्रें काल आलीं. आतां तेही येतील, आल्यानंतर शत्रूशीं गांठ घालावी

करावें, परंतु नाना प्रकारच्या भिडा ! याजकरितां तिकडे लावून दिले. मानाजी शिंदे याची बायको बागलकोटास पाठवून दिली. लष्करांतील फितूर अद्यापि तुटला नाहीं. मालोजी नाईक निंबाळकर दहीगांवकर यांजकडे मानाजी शिंदे यांजकडून माणसें आलीं होतीं तीं सांपडलीं. त्यांसही शिक्षा केली. मालोजी घोरपडे आले आहेत त्यांजकडेही शंकराजी घोरपडेसुद्धां मानाजीचें राजकारण आहे. सर्वत्रांस यशवंतराव माने मारले यासाठीं वाईट जाहलें. यास्तव महादजी राजे व नीलकंठराव यांचें पारिपत्य येथें केलें नाहीं. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. सर्वही यथास्थित घडेल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणराज.

नं. २२३२. (पौष व० ३–१५ जाने०)

चिरंजिव राजश्री रघुनाथरावदादा यांसीं प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ छ १५ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुह्मीं छ २८ जिल्कादचें पत्र पाठविलें ते पावलें. लिहिला मजकूर कळला. " हयग्रीवातीरीं आमचा मुक्काम आहे. हैदर बल्लारीस आहे. बातमी राखोन छबिन्याची वगैरे सावधगिरी आहे. कडपें कर्नोळकर यांस पत्रें गेलीं आहेत. सत्वरच येतील. " म्हणून लिहिलें तें कळलें. ' ता॥ रा॥ भाऊंस ज्वर येत होता. ईश्वरी कृपेनें आरोग्य जाहलें. ' म्हणून लिहिलें तें कळोन संतोष जाहला. निःशेष आरोग्य जाहल्याचेंही वृत्त कळवावें. अलीकडे हैदराशीं लढाई जाहल्याचेंही वर्तमान ऐकितों. तुमचीं पत्रें आलीं नाहींत तेणेंकरून काळजी लागली आहे, तरी सविस्तर लिहावें, ' कुरुंदवाडचे समाचारांत असावें व सावधतेनें असावें ' म्हणून लिहिलें. त्याप्रमाणें कुरुंदवाड येथील सावधगिरींतच आहों. चिंता नाहीं. महादजी शिंदे येऊन वडगांव, हेरलें, कडोली, आळतें वगैरे ठाणीं

घेऊन टोपेवर गेले आहेत. करवीरकरांकडून संधानाचीही बोली लागली आहे, परंतु शिंदे ऐकत नाहींत. चिकोडी मनोळी सोडितों, लाख रुपये देतों, असें करवीरकर बोलत आहेत. शिंदे करवीरास जाऊन बसलेउपरी आणखीही बोलतील ! प्रस्तुत मिरज प्रांतीं महादजी शिंदे यांचे क्षुल्लक उपद्रव बहुत आहेत. सविस्तर तीर्थ स्वरूपांचे पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें... .....हे आशीर्वाद.

नं. २२३३. (पौष व०–जाने० दु० पंधर०)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" महादजी शिंदे शिगांव कोरेगांवावर आहेत. (त्यांची) वडगांवाजवळ दोन हजार फौज आहे. ' बापूजी शामराज यांसी पाठवून द्यावें. तहाचें बोलणें तुमचे विचारानुरूप करावयास येईल. ' म्हणोन राजश्री महादजी शिंदे यांसी येसाजी शिंद्याचें पत्र आलें. त्यावरून बापू शामराज करवीरास गेले. तेथें येसाजी शिंद्यांशीं बोलून मागती लष्करांत परत आले. " म्हणोन लिहिलें तें कळलें. वडगांवचें ठाणें शिंदे यांनीं घेतलें म्हणोन सरकारांत पत्रें आलीं. आतां करवीराकडे जाणार. करवीरांत वगैरे तिकडे बंदोबस्त करोन शिरोळाकडे येणार. तूर्त शिरोळाकडे येत नाहींत हेंही ठीकच आहे. करवीर घेतल्याशिवाय तह व्हावयाचा नाहीं ! "

नं. २२३४. श्री. (पौष व० ७–१९ जाने०)

विज्ञापना. आपण छ १६ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राा भाऊंकडून पत्रें आलीं त्यांतील मजकूर विस्तारेंकरून लिहिला तो कळला. राजश्री हरीपंततात्यांकडून

---

१ पत्र शिवाजी बाबाजीचें गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस पुरंदराहून.

पत्रें आलीं त्यांपेक्षां आपल्या पत्रांत तपसील गाडद्यांच्या जमातदाराचा व मानाजी फाकडे यांजकडील बाळाजीपंत सांपडल्याचा व मानाजी शिंदे फांकडे यांजकडील निसबतीच्या तीन असामींच्या जप्ती केल्याचा प्रकार व हुजरातींत ऐवज हैदरखान याणें शिंद्याच्या सूत्रेंकरून वांटल्याचा विस्तार होता. याजकारितां उभयतांस पत्रच ऐनजिन्नस दाखविलें, फितुराचें पत्र सांपडलें त्याची नक्कल आपण पाठविली व राजश्री हरीपंतांकडूनही ऐनजिनसी पत्र आलें आहे, अलीकडील वर्तमान धौशाच्या व हरीपंतांच्या भेटी जाहल्या असल्यास मनसब्यास चांगलेंच आहे. धौशाच मागें पुढें पाहूं लागल्यास अवघडच आहे. अलीकडे वर्तमान आलें असल्यास लिहावें. होळकराची समजूत नाहीं. 'हैदरखानाकडील फौज ठेवावयास रास्ते यांच्या तालुक्यांत आले होते त्यांचें ठिकाण युक्तीनें लाविलें. तीनशें होन आणिले. नंतर राजश्री विनायकपंतास लिहून पाठविल्याचा ' मजकूर व त्याणीं उत्तर पाठविल्याचा मजकूर लिहिला तो कळला, तें पत्रच ऐनजिन्नस उभयतांस दाखविलें, त्याजवरून ' राजश्री आनंदरावदादांस पत्र पाठवितों व त्यांजकडील कारकुनास ताकीद करितों ' म्हणोन सांगितलें, होळकराची समजूत नाहीं व आंतील बाहेरील मजकूर व राजश्री हरीपंतांकडील फौजेची रवानगी करावयाची व कितीएक मनसब्याचा विचार कर्तव्य, याजकारितां श्रीमंत राजश्री नाना पुण्याहून किल्ल्यास आले. राजश्री बापूही सासवडाहून आले. मासपक्ष किल्ल्यावरच राहतीलसें दिसतें. दोन हजार रुपयांची चिठी करकंबेवरी पाठविली ती पावली. ' आणखी चिठी द्यावयास येईल, ' म्हणोन लिहिलें त्यास साल गुदस्तांचा खर्च दोन हजार रुपयांचा अदमास जाहला आहे. साल मजकुरीं फेरमुबदला चाललाच आहे, जो ऐवज लागतो, तो राजश्री कचोबा नाईक यांजकडून घेत असतों. आणखी हरकोठें दोन हजार

---

१ कारभारी सखारामबापू व नाना फडनवीस.

श. १६९९ हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

रुपयांची चिठी महिन्यापंधरा दिवसांत पाठविल्यास मागील फडशा जाहलासा होईल. यांत मर्जी आपली ! ब्राह्मणाचा मजकूर लिहिला तो कळला. उत्तम आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२३५. श्री. (पौष वद्य ७–१९ जानेवारी.)

पैा छ २२ जिल्हेज. सन समान सबैन.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल १९ जिल्हेज मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ १२ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. " श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें आलीं. हैदरखान बल्लारीनजीक होता. आपल्या फौजा रारावीवर होत्या. सडे होणार, इतकेंत छ १ जिल्हेजीं हैदरखानच चालोन आला. राजश्री रास्ते यांजकडील फोजा गोविंदराव बारवकर हुजरात वगैरे पथकें कहीस गेलीं होतीं त्यांची गांठ पडली. तेव्हां सोशीत गांठ तोडीत तीन कोस लष्करपावेतों आले. आमचे सरदार बुगगे तुंगभद्रेवर लावून देऊन तयार होऊन तोंडावर उभे राहिले. अस्तमान जाहल्यावर बुणग्यांत आले. हैदर रारावीवर येऊन राहिला. " म्हणोन लिहिलें तें कळलें. ' सुलताना खिजमतगार कलेदारी (?) जासूद याजबरोबर पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें सत्वर पाठविणें ' म्हणोन लिहिलें, त्यास पत्रें पावलींच असतील. ' राजश्री शिंदे यांचा उपद्रव क्षुल्लक कोठपर्यंत त्याहावा ! सरकारचीं पत्रें लौकर पाठवावीं. ' म्हणोन लिहिलें, त्यास शिंदे यांजकडे परभारीं व आपणाकडे राजश्री नानांचीं व सरकारचीं ऐसीं पत्रें घेऊन पाठविलीं आहेत. " त्यांजकडे जमाव न पाठवावा तर गांवगन्ना रोखे करून ऐवज घेतात, प्रांताची खराबी करितात, ऐसा निदान पक्ष जाणोन अडीचशें स्वार व तीनशें

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

प्यादे असा जमाव रवाना केला; परंतु तेवढ्यानें त्यांचें समाधान नाहीं ! निरनिराळा जमाव यावा. किल्ल्यांतील तोफा पाठवाव्या ऐसीं कित्येक बोलणीं बोलून कलागत काढून प्रांतांत उपद्रव करावा ही मसलत त्यांची ! " म्हणोन लिहिलें, त्यास पेशजी सरकारचीं व श्रीमंत राजश्री नानांचीं पत्रें पाठविलीं आहेत त्यांत ' आपल्याकडील फौज कर्नाटकांत मसलतीस गुंतली आहे, जमावाविशीं उपद्रव न द्यावा, ' हाच भाव लिहिला आहे. " राा महादजी शिंदे याणीं वडगांव हेरलें. अळतें, कडोली वगैरे ठाणीं घेऊन टोपेवर आहेत. करवीरावर जाणार. करवीरास चव्हाण, सटवोजी भोंसले, फडतरे आहेत. दीड हजार पायदळ व दीड हजार फौज आहे. राजे पन्हाळ्यास आहेत. येसाजी शिंदा येऊन जाऊन असतो. राणीचा आग्रह पन्हाळ्यास जाऊं नये असा आहे. विवेकाचें बोलणें आहे, परंतु बनावांत येणार नाहीं ऐसें वाटते. " म्हणोन लिहिलें तें कळलें. " राजश्री महादजी शिंदे कराडावर होते तेव्हां करवीरकरानीं मिरजप्रांतींचे गांव होते ते जाळिले. आह्मी पलीकडे जाऊन (त्यांच्या राज्यांत) स्वारी करून गुरें वगैरे आणिलीं. प्रस्तुत अम्मल शिंदे यांचा बसत आहे. गांवास कौल दिले आहेत त्यांचीं गुरें नेलीं आहेत तीं सोडून देणें म्हणोन पत्रें पाठवितात. " म्हणोन लिहिलें, त्यास शिंदे आल्यापूर्वी गुरें ढोरें आणिलीं तीं तर सोडावयाचीं नाहींत हें वाजवीच आहे. आपण शिंद्यांस पत्र पाठवावें. येथून दोन तीन पत्रें पाठविलीं आहेत. एका पत्राचें उत्तर आलें कीं, " आतां आह्मी तिळमात्र उपद्रव लागों देत नाहीं. फौजेचेंही प्रयोजन नाहीं. आतां आपणाजवळ फौज पंचवीस हजार जमा जाहली आहे; " म्हणोन लिहिलें आहे. अष्ट्यांचा पांच हजार रूपयांचा मजकूर त्यानीं लगेटीखालींच दर्शविला जे, राऊत करवीराकडे गेले होते त्यांजपासून ऐवज घेतला असें

---

१ तीन पथकांचे तीन निरनिराळे जमाव.

लिहिलें आहे. दुसरें तिसरें पत्र गेलें त्याचें उत्तर आल्यावर आणखी पत्र पाठवावेंसें जाहल्यास पाठवं. आपणही फौज सामान त्यांजकडे पाठविलेंच आहे.[1] तोफ एक दुसरी ठाण्यास लावावयाजोगी असल्यास मिरजकर देतील म्हणोन पत्रें परभारीं शिंद्यांकडे येथून पाठविलीं आहेत. आह्मी सूचना आपणास लिहिली आहे त्या अन्वयें ठाण्यास लावावयाजोगी एखादी तोफ असल्यास देवावी. नसल्यास कारकून व गोलंदाज माघारा जाईल. अलीकडे लष्कराहून पत्रें आलींच असतील. " मानाजी शिंदे पुरतेपणें फितव्यांतच होते. घातच करावा या विचारांत होते. पत्रच ऐन जिन्नस सांपडलें, तेव्हां त्यांस लुटलें. तो खासा पांच सात राऊतांनिशीं पळोन हैदरखानाकडे गेला. बायको व सासू सांपडलीं. " म्हणोन लिहिलें आहे, आपणाकडे पत्रें आलींच अस. तील. धोशास व आपल्या फौजांस तीन कोसांचें अंतर आहे, म्हणोन लिहिलें आहे. भेटी जाहल्या असतील. आपणाकडे पत्रें आलीं असतील. " खजिना लष्करास पाठविण्याकरितां बागलकोटास गेला जाहे म्हणोन ऐकिलें त्यास खरें किंवा लटकें ? " म्हणोन लिहिलें, त्यास खजिना कोठील जाणार ! पांच लक्ष रुपये लष्करांत श्रीमंत राजश्री भाऊंच्या विद्यमानें ऐवज घेऊन हरीपंततात्यानीं वराता केल्या त्यांसच ऐवज अद्यापि पावला नाहीं ! सरकारांत मोठी ओढ. शागीर्द पेशास देखील रोजमुरा पावत नाहीं असी अवस्था आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२३६. **श्री.** (पौष व० ७–१९ जाने०)

पैा छ २२ जिल्हेज. सन समान सबैन. पौषमास.

विज्ञापना. आपण पत्र श्रीमंत राजश्री नानास पाठविलें तें प्रविष्ट केलें. उत्तराविशीं विनंती केली व राा महादजी शिंदे यांस पत्र द्यावें

---

१ पत्र शिवाजी वाचाजींचें पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव यांस.

म्हणोन विनंती केली. एक दोन दिवस उत्तर न जालें तें सहजांत जालें असेल असें भासत होतें. काल पुरंदरास गेल्यावरी विनंती केली. त्यास बहुतच रागें भरून बोलिले कीं, " तुम्ही कोणास पुसतां ? धनीपणा असेल तिकडे पुसावें ! आम्हांकडे धनीपणा असता, व घराऊ स्नेह चालत आला त्याचा विचार राजश्री गंगाधरराव ध्यानांत आणिते, तरी आम्ही समजतों. तुम्ही लिहिलें तें एकीकडे ठेवितात ! " तेव्हां " काय जालें ? " म्हणोन विनंती केली. त्यास बहुतच रागें भरोन उत्तर केलें कीं, " मळणगांवकर शिंदे यांजविशीं आम्ही लिहितां लिहितां थकलों ! आनंदराव शिंदे मिरजेस जाऊन बसले आहेत त्यांचा फडशा करीत नाहीं व ' वोलेकर आम्ही ठेविले; आपणाजवळ असावे, एकच, ' असें आह्मी पत्र पाठविलें असतां त्यांस गुंतवून पाडिलें ! त्यांजवर निग्रह मांडिला आहे ! मळणगांवकरांचीं शेतें रयतांस लाविलीं त्याची बटाई करून माल घेतला. तो माल घेऊन शिवाय ऐवज द्यावा ह्मणतात त्यापक्षीं आमच्या लिहिण्याची रूचि कोठें राहिली ? तुमच्या विचारास येईल तें तुह्मी करावें ! आम्ही पत्राचें उत्तर देत नाहीं व तुम्हांकडील जाबसाल अथवा शिंद्यांस पत्रें अतःपर देत नाहीं. " म्हणोन बहुतच रागें भरले. आह्मी उतावळी करून उत्तर प्रती उत्तर करावें तरी यांची मर्जी श्रीमंतांपेक्षां नाजूक ! एकदां तुटली म्हणजे फिरोन बोलणार नाहींत. याकरितां विचारें विचारेंच उत्तर प्रती उत्तर केलें. त्यास मर्जी ठिकाणीं नाहीं. ' मळणगांवच आह्माकडे द्यावें लागेल. तुम्हास दुसरा गांव देऊं. ' याप्रमाणें बहुतच राग केला. " करवीरकर प्रांत लुटितात त्यास चिंता नाहीं ! पण आह्मी लिहिली गोष्ट मात्र ऐकूं नये ! असो, तुमच्या विचारास येईल तसें करावें. आम्हांस अतःपर जाबसाल पुसों नये. " असें बोलले. आम्ही उत्तर केलें,

" आपले मर्जीप्रमाणेंच होईल. शिंदे मळणगांवकर यांस किती सोडावें तें सांगावें; म्हणजे लिहून पाठवूं. " म्हणोन विनंति केली. त्यास मर्जीस आलें नाहीं. त्याजवर फिरोन आम्ही जाबसाल केला नाहीं. याजवर दृष्टि द्यावीसी असल्यास आनंदराव शिंदे तेथें आहेत त्यांचा जाबसाल करून त्यांचें पत्र येथें यांस पाठवावें कीं ' आम्ही ते समजलों ' असें पत्र पाठविल्यास यांची मर्जी थंड जाली तर न कळे ! तसेंच वोलेकर यांस चाकरीस निरोप द्यावा म्हणजे पन्नास रावतांनिशीं येथें येतील. सरंजामाचे राऊत लष्करांत चाकरीस आहेतच. त्यांचा भाऊ राणोजी वोलेकर आहेतच. असें जाल्यास करावें. मर्जीस न आल्यास उपाय नाहीं. अतःपर हे आम्हांसी जाबसालच न करीत तरी आम्ही येथें रहावयाचें प्रयोजन नाहीं ! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

नं. २२३७. (पौष व० ८–२० जाने०)

पुरंदराहून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र छ २० जिल्हेजचें–

" फौज तळेगांवाकडे व त्रिंबकाकडे ठेवावयाची यादी तयार जाली. दोहोंकडे फौज ठेवावयाचें कारण काय म्हणाल तर श्रीमंत राजश्री दादासाहेब गंगेस येणार म्हणोन बातमी आहे. एक बातमी तळेगांवास येणार अशी आहे. बातमी येतांच फौजेची नेमणूक केली. माष्टीम मुंबईहून आला त्याची ही लबाडी दिसते. "

नं. २२३८. श्री. (पौष व० ८–२० जाने.)

पैा छ २५ जिल्हेज. सन समान सबैन. पौषमास.

विज्ञापना. आपण पत्रीं लिहिलें कीं, " राजश्री महादजी शिंदे यांजकडे पत्रें सरकारचीं व राजश्री नानांचीं पाठविलीं आहेत. उत्तरें येतील तो मजकूर लिहून पाठवितों. " म्हणोन लिहिलें. उत्तम आहे.

---

१ गोदावरीस्नानास. २ पत्र शिवाजी बाबाजीचें पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव यांस.

शिंद्यांचा मुक्काम आहे तें स्थळ वे युद्ध झाल्याचा मजकूर लिहिला तो कळला. त्यांजकडून पत्रें येत असतात. आपलें पत्र उभयतांस दाखविलें. सरकारांतून तोफ[2] व गरनाळ रवाना होणार ती जाऊन पावली म्हणजे करवीरास मोर्चे बसविणार. करवीरांत मंडळी आहे व आंत सामान आहे त्याचा मजकूर लिहिला तो कळला. आपणाकडे तोफां-करितां पतें घेऊन शिंद्यांचा कारकून व गोलंदाज येईल त्यास आपल्या मर्जीस आल्यास मनोळी बाा (?) तोफ व गरनाळ सरकारची तेथें आहे म्हणोन ऐकिलें ती असल्यास देवावी. न द्यावयाची तोफ असेल तरी कारकून आल्याचे पूर्वीच त्याच्या दृष्टीस न पडेसा बंदोबस्त करून ठेवावा. आम्ही येथें कारभाऱ्यांस सांगितलेंच आहे कीं, पंचरशी तोफा (मिरजेत) लहान आहेत त्या ठाण्याच्या उपयोगी नाहींत. वरकड बांगडी आहेत त्या उतरावयाच्या नाहींत. म्हणोन सांगितलें आहे. तत्राप आपण कारकून आल्यावरी बंदोबस्त करावा. मनोळीची तोफ व गरनाळ सरकारची असल्यास देवावी. तोफाविशींचें पत्र आपण लिहिलें तेंच ऐनजिन्नस उभयतांस दाखविलें. तेव्हां उत्तर त्यानीं केलें कीं, कारकून व गोलंदाज येऊन गेला म्हणजे भ्रांत फिटली! मग शिंदे तरी कशास लिहितील? इतकेंही असोन निकड करूं लागल्यास पत्र देऊं" म्हणोन राजश्री सखारामपंतानीं सांगितलें. श्रीमंत राजश्री नाना म्हणतात कीं, "तुम्हांकडील जाबसाल आम्हांस न पुसावा!" असें उदास बोलतात. याचीं कारणें शेटीबरोबर आपणास तपसीलवार लिहिलेंच आहे. आम्ही विनंती करावयाची ती करीतच असतों. परंतु मर्जी ठीक होतच नाहीं! सटवोजी भोंसले मिरज प्रांतांत आल्यासमयीं उपद्रव जाल्याचा व धर्मशाळेचा व नावेचा वगैरे मजकुराविशींचें निराकरण करून लिहिलें, ऐशीयास त्यांचें सामान

---

१ कारभारी नाना व बापू यांस. २ महाकाळी तोफ. ३ जासुदाचें नांव. ४ सटवोजी भोंसल्याचें.

भारी, आपणाजवळ सामान थोडकें, गांव मोकळ, आपला इलाज नाहीं. सटवोजी भोसले चिकोडी प्रांतास आले ते समयींपासून फौजेची तरतूद केली असती तरी नक्ष राहता. आयत्या समयीं फौजही कसी मिळत्ये ? निमित्त ठेवणारास काय ! न समजणार आहेत ते तसें म्हणतात. जे शहाणे आहेत ते म्हणतात " सामान थोडकें, त्यांचें सामान भारी, त्यास इलाज नाहीं. " असेंच म्हणतात. सेनाखासखेल यांजकडील ऐवजाचा मजकूर लिहिला तो कळला. आपणाजवळ ऐवज आणून ठेविला. उत्तम केलें. श्रीमंत राजश्री नानांचें पत्र शिंद्यांस घेऊन पाठवावें, त्यास मर्जी ठीक नाहीं. ठीक जाल्यावरी पत्र घेऊन पाठवितों. रसद तुह्मी किती दिली म्हणोन लिहिलें, त्यास आठ हजार रुपये पहिले व अलीकडे मिळोन दिले. उगवले ते राजश्री अंताजीपंत मामास ठाऊकच आहेत. पत्र सरकारचें अथवा नानाचें पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२३९. श्री. (पौष वद्य ११–२४ जाने०)

पैा छ २६ जिल्हेज सन समान सबैन. पौषमास.

सेवेशीं अंताजी सखदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. लष्करचीं पत्रें राजश्री विसाजीपंत आठवले फौजसुद्धां धारवाडीं आहेत त्यांस राजश्री हरीपंत तात्याचें पत्र छ १४ जिल्हेजचें आलें. त्यांत लिहिलें आहे जे, " लष्कर रामदुर्गचे मुकामीं आहे. तेथून तलाव्यास फौज रारावीवर गेली तों त्याचे फौजेची गांठ पडोन लढाई जाहली. यांसीं वर्तमान कळतांच तयार होऊन गोटाबाहेर उभे राहिले तों हैदरखान दुसरेकडून तयार होऊन आला. त्याचा यांचा मोकाबला जाहला. एक प्रहर उभे होते. संध्याकाळ जाहला. हैदरखान माघारा गेला. हे माघारे आले. आतां सडे होऊन हैदरखानावर जाणार.

---

१ जमखिंडीहून मिरजेस गंगाधरराव यांस. २ संस्थान सोंडूरपैकीं.

जाबितजंग एक दो दिवशीं येऊन भेटणार. " याप्रमाणें पत्र आलें. सेवेशीं श्रुत होय हें विज्ञापना.

नं. २२४०. श्री. (२४ जाने०).

स्वास्तिश्री राज्याभिषेक शके १०४ हेमलंबीनाम संवत्सरे पौष शुद्ध द्वादशी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति स्वामी याणीं पुण्यशील अनूबाई यांस आज्ञा केली ऐसीजे, स्वामीनीं तुम्हाकरितां मकरसंक्रमणप्रयुक्त तिलशर्करा राणोजी पवार व टेळ्याजी सांवत हुजरे यांजबरोबर पाठविली आहे. घेऊन पावलीयाचें विनंती-पत्र पाठविणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें. बार. सुरू. सूद. बार. बार. संमत. सूद. बार.

नं. २२४१. (माघ शु०—फे० प० पंध०).

लष्करांतून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" तुम्ही छ १५ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ ३० मिनहूस प्रविष्ट जालें. महादजी शिंदे वडगांव, आळतें, कोडोली, सावगांव वगैरे ठाणीं घेऊन करवीराजवळ जाऊन उतरले. तेथें एक लढाई जाली. इकडील सडें माणूस व घोडीं जायां जाली. आंतल्यांचा दम तूर्त भारी आहे. राणी आंत आहे त्यांस पन्हाळ्यास बोलावितात. परंतु (बाई) जात नाहीं. आह्मीं शिंदे यांजकडे दोन अडीचशें स्वार व तीनशें प्यादा असा सरंजाम पाठविला आहे. " म्हणोन लिहिलें तें कळलें.

नं. २२४२. (माघ शु०—फेब्रु० प० पंध०).

लष्करांतून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

---

१ करवीरकर. २ घोरपडे इचलकरंजीकर.

" तुमचीं पत्रें छ २ मोहरमीं प्राविष्ट जालीं. " करवीरकरानीं दबा धरून लढाई दिली. महादजी शिंदे यांचीं घोडीं माणसें जायां नवमी जालीं. शिंदे यानीं करवीरास चौक्या दिल्या आहेत. " म्हणोन लिहिलें तें कळलें. "

श्रीगणपति.

नं. २२४३. (माघ शु० ११–७ फेब्रुवारी.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ८ मोहरम मुकाम नजीक कनकगिरी नवली परगणे तावरगिरें ताा कनकगिरी वर्तमान यथा-स्थित असे. विशेष. जाबितजंग यांच्या भेटी जाहल्या. निखालसतेचें बोलणें जाहलें. हैदरखानाचें पारिपत्य करावें, असें ठरोन कूच करून माघारे फिरल्यानंतर जारादिगरेचें (?) मुक्कामाहून तुम्हाकडे पत्रें रवाना केलीं आहेत त्याजवरून सर्व कळलें असेल. रामचंद्रपंत मामा यांच्या सरंजामांतील कर्डीकल लिंगसूर दोन परगणे. त्यांपैकीं एक पाटील एक गांव बळकावून मामांशी बदलून होता. याजकारितां आम्ही दोन तोफा घेऊन तो गांव मामांस घेऊन द्यावयासाठीं गेलों. गांव मजबूद होता. मुक्कामास गेलों तों रात्रीचे प्यादे पळोन गेले. ठाणें मामांचे हवालीं करून मेदकीनाळ येथें मुक्कामास आलों. तो तावरगिरे परगण्याखालील नाडगौडाचा इनाम गांव. गढी मातबर. मामाचे सरंजामांतील. गुदस्तां जाबितजंगानीं तोफा लावून तीस हजार रुपये घेतले त्याजप्रमाणें सालमजकुरीं रुपये द्यावे म्हणून धौशानीं गांवास तोफा लाविल्या. आमचे मतें दहा पांच हजार रुपयेवर उरकावें असें होतें तें धौशाचे चित्तास न आलें. थोडक्यासाठीं जीद करावी तर मातबर काम तें पुढें नासेल. तुंगापार जाहल्यानंतर मोंगलाशीं निम्मेचा तहही आहे. असें असतां थोडक्यासाठीं जीद करूं नये

म्हणून राहिलों. गांवकर आमचे विद्यमानें बोलत होते. जीद पाहून गांवकर ठाणें टाकून पळोन गेले ! धौशा आम्ही मिळोन माघारी फिरल्याची बातमी कळोन हैदरखान चल्लारी वडदरोजीवरून कूच करून तुंगा दक्षिणतीरानें कामलापूर हंपसागरावरून नारायणदे-वरकेरेंवरून एक दुसरा मुक्काम करून कोपळ तालुक्यांत सडी फौज पाठवून खराबी केली व कोपळ बहादरींबंडेजवळ येऊन झाबडाझाबड केली. कोपळ ताा पैकीं हायगेरें ह्मणून एक गांव ठाणेचा घेऊन ठाणें बसविलें. तुंगा दक्षिणतीरानें हैदरखान हरिहराकडे जावयास गेला. फौज उत्तरतीरानें खराबी करीत गेली ! आह्मास तर यवनाशीं गांठ. लांब मजल होत नाहीं. तीन कोस चार कोसांची मजल ह्मणजे सीमा जाहली ! एक मजल, दोन मुक्काम, अशाशी गांठ पडली ! उपाय नाहीं. त्यांत मोहरमचा महिना. दहा बारा दिवस तर कूच व्हावयाचें नाहीं. मोठ्या भिडेकरितां दोन तीन कुचें जाहलीं. शत्रू तर निघोन झाडीच आसरेस गेला. चित्रदुर्गकरानीं चेनागिरीस हैदरखानाचें बुनगें होतें तें लुटलें. हजार पांचशें माणूस कापलें, म्हणून बातमी आली. चित्रदुर्गकरास अनुकूल करून घेऊन मग कर्तव्य तें करावें असें सर्वांचें मानस. याजकरितां रायदुर्ग तालुक्यांत गेल्यानें दुर्गकरांस जवळ पडेल, वे रायदुर्गकर राजाही मेला सबब, व चार बर्षे तें संस्थान असुदें चार रुपये मिळतील व शत्रूची हालचालही समजेल; याजकरितां तिकडे जावें असें आहे. घडेल तें मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २२४४. (माघ शु० ११–७ फेब्रुवारी.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. हैदर-खान हरिहराकडे गेला ह्मणून पेशजी कानाल (!) चे मुकामीं

१ मोकळें, निर्वेध.

बातमी आली त्याजकरून हरिहराकडे गेला, असें लिहिलें होतें. त्यास हरिहराकडे जात होता तो फिरोन सिंगटाळूर तालुका डंबळ लाख रुपयेस खंडून आपण तुंगा दक्षिणतीरीं राहून फौज उत्तरतीरानें आहे. गांवखेडीं मारून खराब करीत बसला आहे. लक्ष्मेश्वराकडेही (त्याची) सडी फौज गेली आहे. बालेहसूर व हमगी हीं ठाणीं घेतलीं म्हणून कोपळची बातमी आली. कोपळ येथून बारा कोस आहे. पलीकडे शत्रु बारा कोसांवर आहे. मोहरम महिना, आलावे उठल्याशिवाय जाबीतजंग याचें कूच होईना; याजमुळें शत्रूस तेथें मुक्काम करावयाची संधी सांपडली आहे. व कलागत इकडेच पाडावी असें त्याचें मानस. आमचे मतें तुंगभद्रापार होऊन दुर्गकरांस अनुकूल करून मग ठाणीं घ्यावीं ह्मणजे सहजच इकडे येईल, असा मनसबा आहे. त्यांत श्रीसत्ता प्रमाण ! चित्रदुर्गकरानीं पट्टणप्रांतीं बरीच गडबड मांडली आहे. लौकर फौज पार होते तरी तेही सामील होतील. श्रीकृपेकडून घडेल ते खरें ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २२४५. (माघ शु० ११–७ फेब्रुवारी.)

पैा छ १५ मोहरम. सुरुसन समान सबैन. मय्या व अल्लफ.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. आम्ही वें रास्ते वें धायगुडे व धौंशाकडील दोन हजार फौज येणेप्रमाणें लष्करापासोन चार कोस पांच कोस पुढें असावें, कोपळ प्रांतचा हायगेर म्हणून एक गांव (शत्रूनें) घेतला आहे तो घ्यावा, याजकरितां आम्ही पुढें लष्करापासोन दोन कोस काल कूच करून येथें आलों. राजश्री हरीपंततात्या कूच करून येथें आले म्हणजे आम्ही पुढें जाऊं. मोंगलाचे मुक्कामानें फारस काम नासतें. दिवसगत लागती. उपाय नाहीं. धौशाचें सामानही चाळीस तोफा, पंधरा हजार गाडदी, व पंधरा हजार फौज, सामान चांगलें आहे. यशवंतराव माने फितुरांत

१ पत्र परशुरामभाऊंचें.

होते त्यांसही तोफेचे तोंडीं दिलें. तूर्त खेळ कोणाचे नाहींत. उमग-ल्यास पारिपत्यास गुंता नाहीं. राजश्री हरीपंततात्यांस आह्मांस चारी कोसांचें अंतर आहे. एकवेळ तुंगभद्रापार होतों ह्मणजे सडे फौजेनें जाऊन चित्रदुर्गकरांस सामील करून घ्यावयासी येतें. (आतां मोहर-मची) दहावी तारीख पावेतों तर कूच होत नाहीं. त्रयोदशी चतुर्दशीस कूच जाहलें तर पत्र पाठवितों. धौशाचा कारभार निग्रही, केवळ तोडितां येत नाहीं, अशीं संकटें आहेत. त्यांत तोडून जावें तर एक-वेळ मागें सरलों आहों. आतां जाणें तेव्हां मजबुदीनें गेलें पाहिजे. चिरंजीव राजश्री आपा बळवंत देशाहून येणार ती पांच सात हजार फौज आली ह्मणजे आपलेंही अवसान बसेल. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. सर्वही यथास्थित होईल. चिंता नाहीं. माघ मास निम्मे तरी गेला. (मुलुखगिरीचे) दोन महिने राहिले. हुजरातींत व आपले फौजेंत खर्चाची ओढ जी आहे ते कांहीं लिहितां पुरवत नाहीं. परिणाम लागणें श्रीगणोबाचे स्वाधीन ! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २२४६. श्री. (१७ फेब्रु०)

अस्सल पत्र छ २० मोहरमीं शिवाजीपंताकडे पाठविलें.

राजेश्री शिवाजीपंत स्वामी यांस विनंति उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. "श्रीमंत राजश्री व्यंकटरावदादाकडील देशमुखीची घालमेल करावयाचा प्रकार जाहला आहे. सेवेशीं आपणास सूचना करा वयाविशीं कारभारी यांची आज्ञा असे," म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसी-यास वतन आजकालचें नव्हे. सनदा पत्रींच आजमावेतों अनुभवीत आहेत. असें असतां राजश्री उभयतां कारभारी यांनीं त्यांचे वतनाची

---

१ इचलकरंजीकर घोरपडे यांजकडे देशमुखी व सरदेशमुखी मिरजप्रांताची होती ती त्यांजकडून काढण्याचा विचार पुणें दरबारीं चालला होता. त्याबद्दल परशुराम-भाऊनीं पत्र लष्करांतून पुण्यास पाठविलें त्याची ही नक्कल भाऊंचे हातचीच आहे.

घालमेल करावी हें उत्तम नाहीं. चार रुपयेवर नजर देऊन वतनाची घालमेल केल्यास वतनाची कटकट पडेल. वतनही स्वराज्यांतूनच मेळविलें आहे. आम्ही येविशीं सरकारांत रदबदल न केल्यास वाईट दिसेल. रदबदल क्षेपनिक्षेप करावी लागेल. तुम्ही उभयतांस विनंति करावी. रवाना छ १८ मोहरम. श्रीमंत कैलासवासी नानासाहेबानीं कृपा करून चालविलें. श्रीमंतांचे आप्त असें जाणून श्रीमंत महाराज कैलासवासी शाहूमहाराज याणींही पत्रें करून दिलीं. तीर्थस्वरूप कैलासवासी त्रिंबकपंतआपानीं मातुश्रीच्या चाकरींत असतां अंमल बसविला. असें असतां असें करणें परिछिन्न अनुचित ! गुदस्तां त्यांजवर कसाला गुदरला. असें असतां सालमजकुरीं हें नवेंच काढिलें, तेव्हां त्यांचा काल सुगम आला असें वाटतें ! राजश्री नानांचे चित्तांत असें कसें आलें ? श्रीमंतांचें राज्य आहे तोंवर तर त्यांस वतनाविशीं हिसका बसूं नये ! याविशीं परिछिन्न रदबदल करावीच लागेल यांत विचार काय ? तुम्ही ' रदबदल करूं नये ' म्हणून लिहिलें हेंच अपूर्व वाटलें ! कालमहिमेम इलाज नाहीं ! बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २२४७. (११ फेब्रु०)

पुण्याहून शिवाजी बाबाजीचें छ १२ मोहरमचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस —

" श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें छ २४ जिल्हेजचीं आलीं त्यांतील मजकूर " धौशाच्या व आपल्या भेटी जाल्या. निखालसतेचें बोलणें होऊन कृष्णेवरोन कूच करोन सादगिऱ्याच्या मुक्कामास गेले. कडपेंकर कर्नोळकरही सामील होणार. रुकनुद्दौला याचा लेंक

---

१ कारण कीं पटवर्धन हे घोरपडयांचे उपाध्ये, २ पत्र लिहिणाऱ्या भाऊंचे चुलते. ३ अनुवादिच्या. ४ तोतया प्रकरणीं.

पांच हजार फौजेनिशीं आला आहे; " म्हणोन लिहिलें आहे. याच-प्रमाणें हरिपंततात्यांचीं पत्रें येथें आलीं. भाऊंचीं पत्रें आलीं होतीं त्यांत " मानाजी शिंदे हैदरखानाकडे पळून गेले व यशवंतराव माने यास तोफेच्या तोंडीं दिलें. आगखीही फितवेखोर आहेत त्यांचीं पारिपत्यें होतील " म्हणोन लिहिलें आहे. महादजी शिंदे यानीं सर-कारांत लिहोन पाठविलें आहे कीं करवीरकरांकडून तहाचें बोलणें " चिकोडी व मनोळी साहुकारांकडे आहे त्याप्रमाणें असावी. साहु-कारांचा पैका फिटला म्हणजे (पेशवे) सरकारांत ठेवावी. मसलतीस पैका लागला त्यास तीन लाखपावेतों देऊं म्हणतात. त्यास कसें करावें ? " म्हणून लिहिलें आहे. त्यास येथून उत्तर गेलें कीं " चिकोडी मनोळीचा जाबसाल उगवला. बेरीज तीन बोलतात, त्यास जेयवर साधेल तेथवर करोन विल्हे लावावें. " म्हणजे भाव पांचपर्यंत जाल्यास विल्हे लावावें. होळकराची अद्यापि समजूत नाहीं. वाफगांवींचं आहेत. राजश्री हरिपंततात्यांकडे जातों म्हणतात, फौज जमा करि-तात, परंतु चित्तांतील भाव कळत नाहीं ! राजश्री मोरोबादादा-कडील प्रकार बोलण्यांत आला होता. फिरोन बिघडलें. ते श्रीपंढर-पुरास जावया कुटुंबसुद्धां निघोन गेले. जेजुरीस गेले. तेथून पुढें जातात. त्यांचें व होळकराचें सूत्र आहे अशी जनचर्चा आहे. सत्य मिथ्या न कळे ! श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईसच आहेत. इंग्रजांनीं आरमाराची तयारी करोन पाणी भरोन सिद्ध जाले आहेत. कोणीकडे तोंड टाकितील किंवा श्रीमंतांस घेऊन हैदरखानाकडे जातात हें समजत नाहीं. "

नं. २२४८. **श्री.** (१९ फेब्रुवारी.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना दामले स्वामीचे सेवेशीं

पोष्य बाळाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि

येथील कुशल तागायत माघ वद्य अष्टमी गुरूवारपर्यंत यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण कृपा करोन पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राजश्री तात्यासाहेब शत्रूच्या कारागृहीं होतं तेथें शरीरास सावकाश नव्हतें. कार्तिक शु॥ ४ भौमवारीं देवाधीन जाहले म्हणोन फरीद-पट्टणाहून पत्रें श्रीमंत राजश्री श्रीपतरावभाऊ यांचीं घेऊन आला; म्हणोन श्रीमंत राजश्री बाळासाहेबांनीं लिहिलें, त्यावरून श्रम जाहले ते श्रीभगवंत जाणे ! सर्वांस मोकलून गेले. मोठा घात जाला. यजमान आदिकरून बहुतांस दुःखाचे पर्वत जाले. अग्नीचा पर्जन्य वर्षला ! या गोष्टीस उपाय नाहीं. तात्यांकरितां बहुत अनुष्ठानें दैवी मानवी उपाय झाले, वडिलानीं सुकृत बहुत केलें, परंतु तात्यासाहेबांस फल न जालें ! ईश्वरी क्षोभ ! यजमानास अपाय, यामुळें नाना ! आतां बरी गत दिसत नाहीं ! या दुःखाचा परिहार होणें नाहीं. परंतु धणी विवेकी आहेत. तुम्ही सर्व मंडळी सुज्ञ असा. ज्या गोष्टीनें दुःखपरिहार होय तें करावें. होणार भावी त्यास कोणाचा उपाय नाहीं. सदैव पत्र पाठवून राजकीय, स्वकीय व लष्करचें वर्तमान कळवीत जावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

पौ॥ छ १५ मोहरम. सन समान.

नं. २२४९. श्री. (१९ फे०)

सेवेशीं[1] शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागा माघ वद्य अष्टमी गुरूवासरे मुकाम भिवडी जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा करावी. विशेष. आपण पत्र पाठविलें. " पट्टणाहून श्रीमंत राजश्री श्रीपतराव यांचें पत्र आलें. श्रीमंत पांडुरंगरावतात्यांस महिनाभर ज्वराची पीडा होऊन त्यांत वायु

---

१ पत्र पुरंदराहून मिरजेस गंगाधररावांस.

जाहला. औषधउपायही जाहले, परंतु चालले नाहींत. कार्तिक शुद्ध चतुर्थीस कैलासवासी जाहले." ह्मणोन लिहिलें, पत्र वाचून पुतें पहावयास अवसान राहिलें नाहीं! जी गोष्ट कानींमनीं नाहीं ते भगवंतें घडविली! आकाश कोसळलें! दुःखाचे पर्वत जाहले! आजपावेतों आस्था कीं, फौजा तिकडे गेल्या, तह होईल, महिन्यांत सुटतील, दोन महिन्यांत सुटतील, हा भरंवसा होता; त्याची निराशा कसी भगवंतें केली!!! सर्वांस दुःखार्णवीं घातलें.! होणाराम मनुष्याचा उपाय नाहीं. आतां त्यांच्या जागां आपण विवेक करूनच चित्ताचें सांत्वन करून सर्वांचें सांत्वन करावें. सर्वांचें छत्र होतें तें गेलें! सर्वस्वें घरच बुडालें! आम्हामध्यें अवसान राहिलें नाहीं. श्रीमंत राजश्री नानांस पत्र प्रविष्ट केलें. श्रीमंत राजश्री बळवंतरावदादांस पत्र प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविलें आहे. श्रीमंत राजश्री नाना व बापू बहुतच श्रमी जाहले तें पत्रीं कोठवर ल्याहावें! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणराज.

नं. २२५०. (माघ व० ९--२१ फेब्रु०)

चिरंजीव[1] राजश्री सुभेदार यांसी प्रती रघुनाथराव नीलकंठ. अनेक आशीर्वाद. उपरी. येथील वर्तमान ताा छ २२ मोहोरम-पावेतों यथास्थित असे. विशेष-...[2]..... रा. विसाजीपंत आठवले धारवाडास फौजसुद्धां होते, तेथें हैदरखानाकडील टिपू खासा जाऊन रात्रीस छापा घातला. त्यास मशारानिल्हे सावध होते. यास्तव त्यांचें त्यांचें झुंज जाहलें. हैदरखानाकडील दोन तीनशें गाडद कापून काढले. मशारानिल्हेकडीलही दहा वीस माणूस जायाजखमी जाहलें.

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें लष्करांतून धाकटे बंधु शिवराव सुभेदार यांस पत्र. २ टिंबें दिलेल्या ठिकाणचा मजकूर निरुपयोगी सबब गाळला आहे.

हुबळीस फौज होती तेथेंही छापा गेला. तेथील फौज उधळली म्हणोन बातमी आहे. हुबळीसही मोर्चे शत्रूनें लाविले आहेत. याप्रमाणें वर्तमान आलें आहे. करवीरप्रांतीं राा महादजी शिंदे आले आहेत. त्याणीं त्या प्रांतांत बहुत किरकोळ उपद्रव केला आहे व गांवगन्नाही रोखे करितात म्हणोन वर्तमान कळलें. त्यास कुरुंदवाडास रोखा केल्यास परिच्छिन्न गोळी वाजविणें. किरकोळ खेडयास रोखे केले तर मिरज–तासगांवची वाट पडेल त्याप्रमाणें करणें. तीा तात्यांचें वर्तमान छ २० मोहरमीं आम्हास कळलें. त्यावरून बहुत खेद जाला. ईश्वरें घात केला ! बरें ! होणारास उपाय नाहीं !..... ..बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २२५१. (माघ व०-फेब्रु० दु० पंधर०)

येळवंतीची जागा चांगली. गेल्यानंतर घ्यावयास कठीण पडेल. याजकरितां वरचेवर त्यांस लिहीत आहों. धौशानीं मेगदाळ व मेदकिनाळ या नाडगिरी यांचे ठाणीयांस उपद्रव लटकी घसघस लावून मासपक्ष इकडे लाविला. याजमुळें शत्रूस लुटावयास फुरसद पडली. त्यानें सिंगटाळूरची खंडणी लाख होन घेऊन वसूल चालीस लाविला आहे. कोपळ तालुक्याचा हायगेरें म्हणून गांव घेतला होता. रयता नागवून ठाणें टाकून गेले, नंतर कोपळचे प्यादे ठाण्यांत जाऊन ठाणें कायम करून आहेत. कनकगिरीकरांनीं साठ हजार रुपये धौशास कबूल केले. ' प्रांत व कनकगिरी आदिकरून ओस. ऐवजांत लेंकास ओलीस देतों. कूच करून पुढें जावें. मुदतीनें ऐवजाची निशा करूं. ' ऐसें बोलतात. कनकगिरीकरांचा अन्याय नाहीं. ते आमचे लक्षांतील संस्थानिक, मोगलाची खंडणी स्वल्पावर उरकावी, त्यानीं घ्यावी, तें

---

१ हा परशुरामभाऊंनीं लष्करांतून मिरजेस पाठविलेल्या पत्राचा पुढचा बंद मात्र मिळाला. पहिला सांपडला नाहीं.

नसतां जीद करून जमीदाराचे ठाण्यासच तोफा लावाव्या असें धौशानीं योजिलें; तेव्हां संस्थानिक प्रांत ओस करून आपण कनक गिरी टाकून व्यंकटगिरीस डोंगरांत जाऊन बसला आहे ! अनागुंदी-कराची खंडणी नाहीं. त्यांची गत असीच होईल म्हणून त्यानीं शत्रूचा आसरा करून त्याची फौज व गाडदी कंपलीनजीक गंगावती येथें आणिली. व विरूपाक्षाजवळही फौज आहे. कनकगिरी व अनागोंदीचे डोंगर लगत. दोघांचे सोईनें आसरेस शत्रूकडील लोक जमत आहेत. नदीपार जाहलों तर तिकडेच येतील. नाहीं तर कलागत तुंगाअली-कडेच पडेल कीं काय न कळे ! कोपळाहून दोन तोफा सरकारच्या स्वारींत आणावयाच्या, याजकरितां कोपळास जावयाकरितां सडे होऊन राजश्री हरीपंततात्यांचे चिरंजीव व आम्ही व रास्ते व धायगुडे वगैरे मिळोन पंधरा हजार स्वारांनिशीं येथें मुकामास माघ वद्य ४ स आलों. तों गंगावतीस फौज शत्रूची आली ही बातमी येतांच आम्ही बुनगेचे मध्येंच दोन अडीच कोसांचे तफावतीनें मुक्काम करून आहों. धौशासही कूच करून तुंगापार व्हावयाचा प्रकार करावा म्हणून राजश्री तात्यांस व सरकारचे वकील धौशाजवळ आहेत त्यांस रागें भरून लिहिल्यानंतर धौशानीं दो चौ जागां फौज गांव खंडावयास पाठविली ती सारी आणविली. उद्यां कूच करून पुढें येतों म्हणून त्यांची चिठी आली. धौशाची गांठ पडोन सवा महिना जाहला. रिकामे दिवस घालविले ! त्याचे भिडेसाठीं पुढले मोठ्या कामावर नजर देऊन अदवानीकरांस आमचा पैका पुसिला नाहीं तें एकीकडेच राहिलें ! तावरगिरेचे जमेदार राजश्री रामचंद्रपंतमामा यांचे सरंजामांतील, तसीच कनक-गिरी असतां त्यांचे गांवांस गुंतून धौशानें दिवस घालिवले ! उपाय नाहीं. मुलूखागिरीचे दिवस तर दोन महिने राहिले. काम करितों असें गोड बोलतो. आम्हास निष्ठुरही बोलतां येत नाहीं. असा प्रसंग

पडला आहे. खर्चाची ओढ काय ल्याहावी ! यांत ईश्वरेंच लज्जा रक्षावी ! नहोन दुसरें दिसत नाहीं. करवीरकरांस अद्याप किती दिवस लागतील, देशाहून आपा बळवंत फौजसहित येणार ते कोठें आहेत, हें ल्याहावें. मनसब्याची रीत ठीक दिसत नाहीं. सावनूर तालुका झाडून गेला. धौशासुद्धां आह्मी येथें तोंड पहात बसलों आहों ! उपाय नाहीं. सारांश अर्थ दैवानें आम्हास सोडिलें असें दिसतें. दोन चार लक्ष रुपये पदरचे सावकारी कर्ज पतकरून घेऊन ठीक दिसत नाहीं ! दिवस डोईवर आले आहेत. काळजी कोठवर म्हणून लिहावी ! बरें ! श्रीसत्ता प्रमाण. कांहीं सुचत नाहीं असें आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २२५२. **श्री.** (माघ व० ११–२३ फे०)

चिरंजीव राजश्री व्यंकटरावदादा[1] यांसी प्रती बळवंतराव नागनाथ[2]. कृतानेक आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल तागायत माघ वद्य एकादशी मुक्काम लष्करनजीक कोरेगांव भीमातीर जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. छ २ मोहरमचें पत्र आपण पाठाविलें तें पावलें. पत्रीं आपलें सविस्तर वर्तमान लिहिलें नाहीं, तरी ऐसें नसावें. आपले संतोषाचें वर्तमान लिहीत जावें. आमचें वर्तमान तरी तीर्थरूप बाबा वामोरीस[3] घरींच आहेत. आह्मी सरकार चाकरीस पागा व पथकसुद्धां तीर्थस्वरूप राजश्री रामचंद्रपंततात्याजवळ आहों. राजश्री महादजी पाटील शिंदे यांणीं वडगांवचें ठाणें घेतलें. पुढें करवीराकडे गेले आहेत. क्षेत्र हस्तगत होऊन मसलत फत्ते लवकर व्हावी हें व राजश्री हरीपंततात्याकडील वर्तमान लिहीत जावें. बहुत काय लिहिणें कृपालोभाची वृद्धि करीत जावी हे आशीर्वाद.

चिरंजीव बयाबाई व सगुणाबाईस आशीर्वाद. कोठें आहेत तें लिहावें.

---

१ घोरपडे इचलकरंजीकर. २ वामोरीकर. ३ रामचंद्र गणेश कानडे.

श. १६९९ हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

तीर्थस्वरूप गंगाभागीरथी ताईस साष्टांग नमस्कार. पत्र पाठवून बालकाचा सांभाळ करीत जाणें. हे विज्ञप्ति.

नं. २२५३. श्री. (माघ व० ११–२३ फे०)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २४ मोहरम भौमवासरे मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ ८ मोहरमचें पत्र पाठविलें तें काल छ २३ मिनहूस पावोन लिहिला मजकूर कळला. इकडील सविस्तर जासुदाबरोबर लिहून पाठविलें आहे, तीं पत्रें पावलींच असतील. अलीकडील वर्तमान तर राजश्री मोरोबादादाचे समजाविशीचा मजकूर ठरत होता. त्यांचा मुक्काम जेजुरीस पंधरा दिवस होता. श्रीमंत राजश्री नाना पुण्याहून पुरंदराम आले. बोलणें चालणें होत असतां त्यांजकडील बोलण्यांत स्वच्छता नाहीं. ' जें कर्तव्य तें आपण करूं. त्यास तुम्हीं मान्य असावें ' व आंतील व बाहेरील पेंचपाच पाहतां ऐक प्रकार दिसोन आलें. शेवटीं बनाव बसला नाहीं. ते पंढरपुरास कुटुंबसुद्धां जाणारच होते. कूच करून गेले. तेथून नरसिंगपुरास येऊन कोळें नरसिंगपुरास येऊन गंगास्नानास जाणार. मनांतील भाव अनेक प्रकारचे आहेत. कोणी अनुकूल जाहल्यास मांडी थापटण्यास चुकणार नाहींत ! स्वतः अंगेजणी तरी होणें नाहीं कळतच आहे ! श्रीमंत राजश्री नाना शिवरात्रीसाठीं मेणवलीस गेले. राजश्री बापू सासवडासच आहेत. आविर्भाव कर्नाटकांत जावें याप्रमाणें आणितात. चित्तांतील भाव समजत नाहीं ! बाहेर निघावें, त्यास अपशकूनही जाहले; याजकरितां बाहेर निघाले नाहींत. एक दोन दिवसांत डेऱ्यास दाखल होणार आहेत. मुंबईकडील वर्तमान आहे तेंच आहे. अधिकोत्तर कळत नाहीं. भोस-

---

१ पत्र पुरंदराहून परशुरामभाऊंस लष्करास. २ एक प्रकार = विलक्षण.

ल्यास पत्रें वारंवार जातात. येतील तेव्हां खरें ! वराता आपणाकडून पांच लक्षांच्या आल्या त्यांत हरिभक्तीकडील दोन लाख रुपये जलद (?) याच्या. त्यांपैकीं लाख रुपये गाइकवाडाकडे लावून दिल्हे. लाख राहिले त्यांची सोय करितों ह्मणतात. कलकेरी व दादाकडील मिळोन तीन लाख. त्यांपैकीं लाख रुपये गाइकवाडाकडे लावून दिल्हे. महिन्याची मुदत आहे. तो ऐवज आला म्हणजे हुंडीवाल्यास देवितों. बाकी दोन लाख रुपये राहिले त्यास ऐवज लावून देतों असें कार-भारी म्हणतात. आह्मी विनंति करितों. रागें भरतों. इलाज नाहीं ! मिरजेहून पत्रें आलीं. श्रीमंत तात्या कैदेंत सांपडल्यापासून आपण जिवाकडे न पाहतां जिवाभ्य श्रम सर्व गोष्टींविशीं केले. सुटतील हा भरंवसा सर्वांस होता तो भगवंताच्या चित्तास न आला ! कैदेंत कैलास-वासी जाहले ! सर्वांस शोकार्णवीं घातलें ! मोठा घात जाहला. निरुपाय गोष्ट भगवंतें घडविली. काय करावें ! आम्ही एक दोन दिवसांत मिरजेस येतों. आपणास पत्रें मिरजेहून गेलीं अनतील. सेवशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२५४. श्री. (माघ व० ११–२३ फे०)

पौा छ २९ मोहरम. समान सबैन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं विनंति सेवक तिट्टल[1] कृष्ण. शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ २४ मोहरम मुकाम ठाणें येळवंटी येथें सेवकाचें वर्तमान यथा स्थित असे. विशेष. इकडील वर्तमान बंकापूरकरांचा शिलशिला लागल्यापासून सविस्तर लिहीतच आलों. लष्करासही पत्रें पाठविलीं. परंतु या प्रांतीं फौज येऊन आजवर कुमक पोहोंचली नाहीं. अली-कडे हैदरखान शिंगटाळूराम येऊन उतरला. कोपळ प्रांताचीं तमाम

---

१ कडणीस, परगणे लक्ष्मेश्वर, उपनांव दातार.

खेडीं मारून जाळून फस्त करून दहा पांच ठाणीं घेतलीं. हमगी व इटगेंपर्यंत स्वारी करून गेले. तेव्हां देसाई वगैरे बंकापुराहून बाहेर पडून आमच्या तालुक्यावर धामधूम करूं लागले. त्यांजकडे हल्याळ व हरिहराकडून कुमक आली. अमित्राचे लष्कराचा आश्रा धरून हमगी व इटगे व बिदरहळ्ळी वगैरे ठाणीं घेऊन बेमीकटयास[1] आले. तेथील लोक गोळी मारूं लागले तेव्हां हल्ला करून गढी घेऊन आंतील लोकांचे नाक कान कापून सोडिले. त्याजवरून दहशत पडूनच तमाम खेडेंपाडेंचे न ठरतां पळों लागले व येळवंती येथील लोक थोडे बहुत पळाले. किल्लेचें काम, दगा होईल, म्हणोन किरकोळ खेडीं व येळवंती येथील बंदोबस्त करण्याकरितां येथें आलों. दुसरे रोजीं लक्ष्मेश्वरावर येऊन पडले. पेठ धरून किल्लयास मोर्चे लाविले. आह्मी संध्याकाळीं येथून स्वार प्यादे जमावानिशीं जाऊन त्यांजवर पडून मोर्चे उठवून आऊरलावेपर्यंत उधळून लावून दिल्हे. त्यांची आमची लढाई बरीच जाहली. त्यांजकडील दहा बारा ठार, वीस पंचवीस जखमी जाहले व आह्माकडे मकाजी येळे - शिलेदार ठार जाहला. घोडी त्यांजकडे पाडाव गेली. त्यांजकडील आह्मी चार घोडीं पाडाव आणिलीं. इतकें जाहल्यानंतर किल्लयांत जाऊन लोकांस धीर भरंवसा देऊन दारूगोळी सामान घालून येथें आलों. छ ७ मोहरम दुसरे दिवशीं प्रातःकाळीं लोक अवसान टाकून ठाणें मोकळें सोडून पळोन आले! त्याजवरून गांवकर त्यांजकडे जाऊन देसाई यास बोलावून आणिलें. ठाणें त्याजकडे जाहलें. सिंगट्टाळूराजवळ हैदरखान खासा आजपर्यंत मुक्काम करून राहिला आहे त्याजमुळें बंकापुरकरांची भरती पडून (आमचे) लोक अवसान धरून टिकेनासे जाहले. लक्ष्मेश्वर ठाणें पडलें. तेच दिवशीं आह्मांस चिठी

---

१ अथवा 'बनीकोपास' असेंही होईल.

श. १६९९ हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

देखील न लिहितां श्रीमंतगडचें ठाणें सोडून राजश्री बाबूराव त्रिमल पळोन गेला तो मुळगुंदचे पलीकडे जाऊन राहिला. तसेच बाले-हसूरकरही पळाले. येळवंतीचे लोक पहिलेच गच्छ केले होते ! आह्मी येथें राहिलों ह्मणोन बंदोबस्त जाहला. अलीकडे देसाई यांणीं फौज आणावयाकरितां शत्रूच्या लष्करास कारकून पाठविला होता. तद-नंतर खुद्द टिपूमिय्या सात आठ हजार सडी फौज घेऊन लक्ष्मेश्वरास आला. आह्मीं लक्ष्मेश्वरावर राजकारण करावें या अर्थें राजश्री विसाजी-पंतबापू यांजकडील चारशें राऊत आणविले होते. दोन तीन वेळां स्वारी केली. झूजही जाहलें. परंतु कांहीं कार्यावर पडलें नाहीं ! आठवडा द्यावयाचा करार करून आणविले होते. टिपू आल्याचें वर्तमान ऐकून तेच दिवशीं संध्याकाळीं निघून धारवाडास गेले. त्याजवरून तो लक्ष्मेश्वरांत मुक्काम न करितां रात्रौ फौजसुद्धां येऊन तेथें मसलत करून रातोरात धारवाडासच जाऊन राजश्री विसाजीपंतबापू यांच्या फौजेवर छापा घातला ! त्यांस बातमी कळली नव्हती त्याजमुळें ठासून उभे राहून झुजले नाहींत. खासे मंडळीसह किल्लयांत गेले. तमाम फौज लुटली. बुणगें, धारवाडची पेठ, टंकसाळ, तमाम लुटलें. हांडीभांड्यास हात लाविले नाहीं. पांच सातशें खासे घोडीं सांपडलीं. दणाण होऊन कांहीं फौज सौंदत्तीकडे गेली. राजश्री त्रिंबकराव-अण्णाचें बजिन्नस पत्र आलें. अण्णाचें सारें सामान उंटें वगैरे तमाम गेलें. बसावयास घोडी नाहीं ! याप्रकारें जाहलें. खराबी फार जाहली. तेच माघारी हुबळीस येऊन उतरला. नवे हुबळीकर अवसान सोडिलें तेव्हां ठाणें घालोन कुंदगोळावरून नीट लक्ष्मेश्वरास आला. तेथें मुक्काम केला नाहीं. दोन दिवस ठेवून घ्यावें म्हणोन देसाई यांणीं फार सांगून घेतलें; परंतु न ऐकतां लष्करास जावयाबद्दल निघून गेला.

---

१ हा धारवाडचा सुभेदार येसाजीराम याचा मुलगा.

बनीकोपपर्यंत गेल्याची बातमी आली. तेथून जाऊन लष्करास मिळाले असतील. गेला म्हणोन त्याचा विश्वास धरितां नये. दगेखोर आहे. आजपर्यंत सात आठ झुजें बंकापुरकराबरोबर झुजलों. कोणी उपराळा केला नाहीं. तूर्त येळवंतासि झुंज आहे. तमाम मामलेदार नरगुंदपार जाले. आम्ही परदेशीं आहों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२५५. श्री. (माघ व० ११–२३ फे०)

विज्ञापना[1]. " राजश्री महादजी शिंदे फौजसुद्धां करवीरास दाखल जाहल्यास आज तागायत प्रथम दिवस आहे. अद्यापि मोर्चे-बंदी नाहीं. शहराभोंवत्या फौजेच्या चौक्या मात्र आहेत. खासा करवीरापासून कोसावरी आहेत. तोफांची मारागिरी चित्तास येईल ते दिवशीं मात्र करितात. अद्यापि संधानाचें पक्केपणें कोणी येत नाहीं. असें असोन कोणी संधानाचें बोलणें बोलावयासी आला तर ते दिवशीं तोफांची मारगिरी होत नाहीं. सरकारांतून महाकाळी तोफ आणविली आहे तिची वाट पाहतात. ती तोफ आल्यावरी निकड केली तरी नकळे ! मसलत लांबणीवर घातली. कृष्णेपलीकडील तमाम प्रांतांत घास दाण्याचे रोखे केले आहेत व करवीरकरांकडून ज्यां ज्यांकडे इनाम गांव वैगरे आहेत त्यांजपासून एकसाली ऐवज घेतात. कुरुंदवाड, रेणदाळ दोन गांव चिरंजीव राजश्री राघोबादादाकडे आहेत, त्यास रेणदाळास पांचशें रुपये मसाला करून व स्वार येऊन अनिवार प्रकार केला. गांवचे बैल व गुरें शंभरपावेतों नेलीं. आठ दहा घोडीं नेलीं. कमाविसदार यास धरून नेऊन डोकीवर दगड देऊन बेअब्रू केली. चिकोडी, बागेवाडी या प्रांतांत घासदाण्याचे रोखे केले. जमखिंडी परगण्यांत रोखे करणार. नानाप्रकारचे उपद्रव करितात. सांगोन पाठविल्यास ऐकत नाहींत. सर-

---

१ पत्र शिवाजी बाघाजीचें पुरंदराहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

कारांत मनस्वी आमच्या फिर्यादी लिहितात." येविशींचा मजकूर विस्तारें आपण लिहिला तो कळला. लिहिले अन्वयें सर्व श्रीमंत राजश्री नानांच्या कानावरी घातला. नाना शिवरात्रीकरितां मेणवलीस गेले आहेत. आह्मी मिरजेस येणार. येथें राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे आहेत. नाना आल्यावर शिंद्यांस पत्रें घेऊन पाठवितील. सरकारांतून महाकाळी तोफ शिंद्यांकडे रवाना जाली. सवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २२५६. (माघ व० १३–२५ फे०)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. टिपू व कुमदान दहा हजार गाडदी व दहा हजार फौज घेऊन धारवाडा-कडे दंग्यास गेला ह्मणून आज बुधवारीं अडीच प्रहर दिवसास नवल-गुंद व गदग येथून वर्तमान आलें कीं, धारवाडची पेठ मारिली. 'राजश्री विसाजीपंत किल्लेजवळ उतरले होते. राजश्री त्रिंबकराव-अण्णा आपले वाडयांत होते. पेठ लुटून वाणी उदमी धरिले. यांत कोण सांपडले, काय गत जाहली, हें कांहीं कळलें नाहीं;' ह्मणून उडपीराव यांचे पत्रांत आहे. चिरंजीव राजश्री बापूही हुबळीहून जाऊन धारवाडींच राहिले होते. काय दंगा जाहला होता हें कांहींच कळत नाहीं. आज सकाळ आणखी वर्तमान येईल तेव्हां कळेल. काय ईश्वरें योजिलें आहे नकळे ! आह्मास तर यवनाची सोबत पडली आहे. उपाय नाहीं. आह्मी उद्यां सडे कोपळास जातों. कोण कसें गेल्यानंतर वर्तमान येईल तें मागाहून लिहून पाठवूं. आह्मी उद्यां कोपळास जातों. तेथें गेल्यानंतर पत्र पाठवूं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस.

श. १६९९ हैदर अल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२५७. (२६ फे०)

भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—रवाना छ २७ मोहरम.

" भाऊसाहेबांकडील पत्रें छ ८ मोहरमचीं आलीं होतीं. त्यांतील अन्वय—मोहरमचा महिना आंवधाचे सणाचा याजमुळें धौशाचा दहा दिवस मुक्काम जाला. हैदरखान तुंगभद्रा दक्षिणतीरानें हरिहरचे रोंखें फौजसुद्धां जात आहे. तीर्थस्वरूप राजश्री भाऊ सडे होऊन अघाडीस चार कोसांच्या अंतरानें धोशा व हरीपंत यांस मागें टाकून पुढें फौजेनिशीं आहेत. दहा वीस मुक्काम एक जागां जाहले याजमुळें शत्रु शेर जाला. बंकापुरचे रानांतच यंदां मसलत पाडावी असा त्याचा मनसबा आहे. " ह्मणोन लिहिलें तें कळलें. " अमित्राची फौज बंकापुरास होती. तेथें शिरटीकर देसाई होता त्यानें तेथील फौज नेऊन लक्ष्मेश्वर घेतलें व परगण्यांतलीं दुसरीं लहान मोठीं ठाणीं घेतलीं. आपणाकडील फौजेचा उपराळा नाहीं याजमुळें बारीपलीकडचीं ठाणीं टिकत नाहींत, विसाजीपंत आठवले धारवाडाकडे होते त्यांजवर हैदरचा छापा आला; " ह्मणोन लिहिलें तें कळलें, व सरकारांतही याच अन्वयें पत्रें आलीं आहेत. "

नं. २२५८. (२८ फे०)

शिवाजी बाबाजीचें भिवडीनजीक पुरंदर येथून पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—पैा छ २९ मोहरम समान सबैन मय्या व अल्फ.

" तीा भाऊसाहेबांकडून पत्रें आलीं. सडी स्वारीबरोबर रास्ते व धायगुडे वगैरे मिळोन पंचवीस हजार फौजेनिशीं भाऊसाहेब अघाडीस आले आहेत. उदईक कोपळास येतों ह्मणून लिहिलें होतें. हैदर सडा होऊन सिंगटाळूरावर आहे. काव्या डावांत आहे.

थोडीबहुत त्याची फौज गलगनायाकडे आली म्हणून वर्तमान आहे. " म्हणोन लिहिलें तें कळलें.

नं. २२५९. (फा० शु० १०–८ मार्च.)

लष्कर मुक्काम नजीक कोपळ येथून परशुरामभाऊंचें छ ८ सफरचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" राजश्री तुळजोजी घाटगे देशमुख परगणे कागल यांची कन्या करवीरवासी महाराजांस दिली याजमुळें राजश्री महादजी शिंदे याणीं त्यांच्या गांवखेडयांस फारच उपसर्ग दिला आहे. त्यास राजश्री बाळोजीराव पाटणकर यांचे ही मशारनिल्हे सासरे. हे येथें आम्हांजवळ आहेत. सरकारांत चाकरीस आहेत. यांजविशींचा संशय किमपि नाहीं. याजकरितां तुळजोजी घाटगे व बाळोजीराव पाटणकर आपलीं मुलें माणसें मिरजेंत आणून ठेवीत आहेत. त्यांचा परामर्ष उत्तम रीतीनें होय तें जाहलें पाहिजे. "

श्रीगणराज.

नं. २२६०. (फा० शु० १४–१२ मार्च.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ १२ सफर गुरुवार मुक्काम नजीक कनकगिरी वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मीं छ १२ मोहरमचीं पत्रें पाा तीं छ २६ मिनहूस प्रविष्ट जाहलीं. " अद्याप करवीरचा प्रथम दिवस आहे. राजश्री महादजी शिंदे यांच्या स्नेहांत विपर्यास येऊं नये म्हणून रक्षिल्यास स्नेह जाणत नाहींत. मनाचिट्ठया कारकुनास देतात ते कारकूनही त्यांचें ऐकत नाहींत ! राजश्री विसाजीपंत आठवले याजवर छापा पडला. म्हणून ऐकतों. येविशींचें सविस्तर पत्र लिहावें. " म्हणून लिहिलें तें कळलें. राजश्री महादजी शिंदे यानीं या प्रांतीं मोठें अरिष्टच मांडिलें आहे. करवीरची मसलत कधीं शेवटास जाती न कळे. शेवटास लाकरच

गेल्यास उत्तम. नाहीं तर प्रांताची बाकी रहात नाहीं हें वाजवी. श्रीसत्ता प्रमाण! उपाय नाहीं. विसाजीपंत यांजवर शिंगटाळुरावरून शत्रूनें सडे फौजेनिशीं जाऊन छापा घातला. मशारनिल्हेस बातमी कळोन सावध जाहले नाहींत याजमुळें फार खराबी जाहली. तीन चारशें घोडें व उंटें बाड बिशात लोकांची फार गेली. तत्राप किल्लेकरानीं किल्लेवरून मार चांगला दिला म्हणून निभावलें. नाहीं तर बाकी राहिली नव्हती. तेथून निघोन मशारनिल्हे येथें आले. ज्या ज्या काळीं जें होणें तें चुकत नाहीं! पेशजी हें सविस्तर तुह्मांस लिहिलें आहे त्याजवरून कळलेंच असेल. टिपू मिय्या धारवाडाहून येतांना हुबळीस मुकाम केला. तोफा व पायींचें माणूस त्याजजवळ नव्हतें, सडे स्वारीचें सामान, परंतु सलाबतीनेंच ठाणें हुबळीचें दिलें. चिरंजीव राजश्री बापू अगोदरच धारवाडीं होते. तेथून मनोळीस गेले. तुम्हाकडे जावयाविशीं येथून पत्र पाठविलें आहे. तुम्हाकडे येतील. श्रीमंत गड कसबा (?) लक्ष्मेश्वर आदिकरून ठाणीं गेलीं. एक येळवंती राहिली, राजश्री विठ्ठलपंतही दम धरून राहिले, आह्मीं येथूनही गाडदी पाठवून ठाणेंची मजबुदी चांगली केली आहे. गंगाराम ह्मणून शत्रूकडील गाडदी बंकापुराहून चार हजार वार व दोन हजार राऊत घेऊन येळवंतीस चौकी बसवून मुळगुंदचे पेठेवर जाऊन हल्ला केला. तों गांवांत गाडदी व प्यादे चांगलेच होते त्यानीं मारून काढिले. पेठ थोडीशी झाबडून निघाले. येळवंतीकरानींही चांगला मार दिला. आह्मी व मोगलाची फौज मिळोन सडे पंचवीस हजार फौजेनिशीं तलाव्यास सिंगटाळूराकडे गेलों तेच दिवशीं मुळगुंद व येळवंतीस मोर्चे बसल्याची बातमी तुंगातीरीं येतांच तसेच आह्मी दहा बारा हजार सडे फौजेनिशीं डोणीनजीक डंबळ येथें गेलों. तों ते लोक बंकापुरास निघोन गेल्याची बातमी

---

१ विसाजीपंत आठवले.

आली म्हणून फिरोन लष्करास आलों. देशाहून दोन तोफा कोपळास व एक अठरा शेर गोळ्याची बदामीस आली होती. तिनी तोफा दिवालतोडीच्या, त्या आणिल्याशिवाय पुढें जाऊं नये असी धौशाची मोठी आड होती. याजकारितां तिनी तोफा लष्करांत आणल्या. मुष्ठुराजवळ नदी उतरावी असें ठरोन इकडे आलों. येथून घांट उतरावयाचा सात कोस आहे. हैदरखान तर गलगनाथावरून कूच करून गेला तो मैराळनजीक हावनूर येथें आहे. हरिहराकडे जाणार. सावनूर व हावनूर यांजवळन पैका घेणार. आह्मी तो रोंख मोडून इकडे आल्यानंतर मग त्यानें पैका कां सोडावा ? धौशा नव्हता तों आह्मी कांहीं तरी स्वाधीन होतों. आतां त्याची गांठ पडल्यापासोन दोन महिने तुंगा उतरतों ! असे दिवस जातात. दुष्टांशीं गांठ पडली. उपाय नाहीं. चित्रदुर्गकर आज पावेतों आमची वाट पहात दम धरून आहे. त्यास अनुकूल करावा हा यत्न करितों. घडेल तेव्हां खरें ! चिरंजीव राजश्री आपाची व गणपतरायाची रवानगी करून आज तीन दिवस जाहले. इकडील सविस्तर चिरंजीव सांगतील त्याजवरून कळेल. येथील मनसब्यावा रंग सुधा दिसत नाहीं. जाबीतजंग नदी उतरोन पलीकडे जातात असें दिसत नाहीं. हुजरातींत पोटाचा गवगवा. एक आठवडा पौष मासीं जाहला होता त्या अलीकडे कांहीं नाहीं. आज पूर्णिमेच्या रोजमुऱ्यास द्यावयाचीही अनुकूलता नाहीं. तेव्हां या लोकांचा गवगवा पाहून महिन्या पंधरा दिवसांनीं [1]तो नदी उतरावी ह्मणोन कदाचित् म्हणों लागल्यास या फौजेची अवस्था गुदस्तां जाहली तसीच होईल यांत संदेह नाहीं ! मी येथें चार पांच लक्षांस गुंतलों त्यास ठिकाण नाहीं. पुण्याहून बेगमी होणें तोही विचार नीट दिसत नाहीं ! श्रीनें काय योजिलें आहे नकळे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ धौशा.

श. १६९९ हैदरअल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२६१. (फा० व० १–१५ मार्च.)

लष्करांतून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र—

" विसाजीपंत आठवले लष्करास आले. धारवाडाकडे फौज नाहीं. राहिलीं ठाणीं त्यांचा तरी बचाव जाला पाहिजे. याजकरितां गोविंदपंतमामा यांस हजार राऊत देऊन धारवाडाकडे पाठविलें. धारवाडकरांचे राऊत चार पांचशें आहेत ते व हे मिळोन एक जागां रहावें याप्रमाणें रामचंद्रपंतमामाची व गोविंदपंतमामाची गांठ घालून ' एक जागां राहूं नये, फिरते असावें, ' याप्रमाणें सांगावयाचे प्रकार सांगून रवाना केले आहेत. बंकापुरास हजार पांचशें राऊत, दोन तीन हजार पाईंचें माणूस, स्वारीस फिरतें त्यांस या राउतांची इभ्रत बसोन ते ठाण्यांस (वेढा घालून) बसणार नाहींत. मोठया अरिष्टास उपाय नाहीं ! आह्मी तुंगा उतरून जातों. शत्रु आम्हाकडेच आला तर मग सावनूर तालुक्यांत बंकापूरकरांचे वस्तु ठाण्यांचे गळां पडवणार नाहीं. महालांत ठाणीं बसलीं होतीं. अखेरसालपावेतों मागें पुढें दोन महिने वोढीत जातों तरी पोटाची बेगमी केली होती. ठाणीं गेलीं याजमुळें कांहीं सुचेनासें जालें आहे. काय करावें ! अहो ! चिंता कोणती म्हणून करावी ! आजच मामा व रामचंद्रपंत ऐसे गेले. लिहावयास कांहीं सुचत नाहीं ! "

नं. २२६२. (फाल्गुन व०–मार्च दु० पंधर०)

लष्करांतून परशुरामभाऊंचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" तुह्मी छ ९ सफरचें पत्र पाठविलें तें छ १७ मिनहूस प्रविष्ट जाहलें. आह्मी आज महिनाभर बुनगें मागें ठेवून फौजसद्धां एक कोसाचे अंतरानें अघाडीस असतों. "

श. १६९९ हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

श्रीगणपति.

नं. २२६३. (फाल्गुन व०१–१५ मार्च.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद. उपरी. फौजेस आज दोन तीन महिने रोजमुरा नाहीं. पैसा पावत नाहीं यामुळें धणीपणाचा दाब अगदीं नाहीं. चित्रदुर्गापावेतों जावयाचा प्रकारही दुस्तर दिसतो ! जाबितजंग काल आमचे डेऱ्यास आले होते. खामखा चित्रदुर्गापावेतों जावें असें बोलिले. त्यास सरकारचे फौजेस रोजमुरा नाहीं. चित्रदुर्गास गेलों ह्मणून जातांच संस्थानिक रूपये देतो असें नाहीं. त्याजवरही कसाला गुदरला. त्यांत आम्ही चार रूपये मागणार. तेव्हां छावणीस आम्ही धौशासहीत राहतों असें वचन देऊं तेव्हां तेही जीवनमाफक तें देतील. तोंपावेतों लोकांस कोणी द्यावें ? लोक कसी गुदराणी करितात ? धौशा छावणीस राहत नाहीं. हुजरात आजच पोटास नाहीं म्हणोन पाऊल पुढें टाकीत नाहींत. धौशास टाळा द्यावयास जागा होती. शत्रूस दैव अनुकूल म्हणून शिवशाई व मोंगलाई मिळोन त्याजवर काट चालिला नाहीं ! ! ! श्वासत्तेपुढें इलाज नाहीं. ज्या ज्या काळीं जें जें होणें तें चुकत नाहीं. होईक दिसलें तें लिहिलें आहे. मागाहून ठरेल तें लिहून पाठवूं. कांहीं ल्याहावयासीं सुचत नाहीं. हे आशीर्वाद.

हेच पत्रीं अंताजी विठ्ठल. आशीर्वाद. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. कित्तुरास[3] भास्करपंतास पाठवावयाविशीं आज्ञा केली, बहुत उत्तम जाहलें. आपल्या पत्रावरून त्याजकडे लिहून पाठविलें आहे. कित्तुरास जातील. आपले आज्ञेनुरूप वर्ततील. सरकारच्या फौजेंत खिसारा फार पडला आहे. सांवर बसत नाहीं. शत्रूचें पारिपत्य नाहीं. श्रीमंताचे दवानुरूप घडेल तें प्रमाण ! हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ पटवर्धन यादवाडकर. ३ हें मिरजमळा संस्थानांतलें खेडें कृष्णातीरीं आहे. संस्थान कित्तूर तें हें नव्हे.

श. १६९९ हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२६४. श्री. (फाल्गुन व० १–१५ मार्च.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेबांस आशीर्वाद उपरी. येथील मजकूर तर जाबितजंग याची भेट जाहली. एक कूच, चार आठ मुक्काम ! नित्य हिसके. काम कवडीचें नाहीं. त्यानें आमची भेट जाहल्यापासून दोन तीन लाख रुपये मेळविले. मसलतीस मात्र ठिकाण नाहीं. पुढें नदी उतरावयाचा रंगही त्याचा दिसत नाहीं. मग नबाबाकडून आहे, किंवा याजकडूनच अनमान आहे, किंवा शत्रूकडून कांहीं भेद आहे, हें समजत नाहीं ! श्रीसत्तेकडून घडेल तें खरें ! सारांश मसलत नासली. फौजेंत खर्चाची मोठी ओढ, आज तीन महिने पोटास नाहीं. लोकांचा तरी अन्याय काय आहे ! फौज म्हणावी तर फारच मिळाली आहे; परंतु चालते पोटाचें जेथें संकट, तेथें करणारांनीं तरी काय करावें ! गुदस्तां पर्जन्यकाल तरी समीप आला. नद्यांस पाणी हे परत फिरतांच आलें, त्याजमुळें आब राहिला ! तेव्हां आमची पत होती. सावनूरकर, राजश्री रामचंद्रपंतमामा यांजकडून द्रव्य घेऊन हरकसें करून कालहरण केलें. तेंही आतां नाहीं ! आतांच पोटाचे गवगव्यामुळें लोक उठोन चालले तर तूर्तच हें बिघडावयाचा सुमार दिसतो. चिरंजीव राजश्री कृष्णरावआपाची (पुण्याहून) रवानगी आज तीन महिने होत आहे. महादेवाजवळ आले म्हणोन बातमी आहे. पुढें कधीं येतील तें कळत नाहीं. शिंदे होळकर उभयतां देशीं आहेत ते तर इकडे येतां दिसत नाहींत. शिंदे करवीरावर घालून बसले आहेत. होळकर रुसवा करून बसला, तेव्हां त्यांचें येणें ईश्वराधीन आहे ! मग शत्रु इकडे आल्यावर काय करितील तें करोत ! सारांश शत्रूचें उदितभाग्य दिसतें. यांत श्रीमंतांचे प्रतापेंकडून घडेल तें खरें ! कांहीं सुचत नाहीं. येथील आपलें पथकाची अडचणही

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ आपा बळवंत. ३ तुमचे म्हणजे मिरजकरांचे.

त्याच रीतीची जाहली आहे. कोठें पैसा मिळत नाहीं. चार रूपये महालांत मिळतील म्हणोन केलें तेंही गेलें ! येथें लोकांचे चार चार रोजमुरे तटले. पुढें द्यावयासी ठिकाण नाहीं. अशी अवस्था आहे. चिरंजीव राजश्री श्रीपतराव याचा ऐवज येथें कनकगिरीकरांकडील उगवला होता त्यास येथें मागेंच घेऊन आपणावरी चिठी केली आहे. याशिवाय माझ्या गुजारतीचे चार हजार होन घेतले आहेत त्याची चिठी केली आहे. परिणाम सुधा दिसत नाहीं. श्रीइच्छा प्रमाण ! प्रांत दिसत नाहीं. बहुत काय लिहिणें. राजश्री संकराजी घोरपडेही तयार होऊन आले आहेत. या लष्करांत येऊन दाखल जाहले. हें एक खूळच आहे ! श्रीसत्ता प्रमाण ! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २२६५. **श्री.** (१५ मार्च.)

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं. अपत्यें जिऊबानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन वद्य प्रतिपदा भानुवासरे मुक्काम कनकगिरी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. संतोष जाहला. याच प्रकारें सदैव पत्रीं संभाळ करावा. " राजश्री महादजी शिंदे यानीं करवीरास मोर्चे दिले आहेत. रेणदाळ इचलकंर्जी वैगरे गांवांवर रोखे करितात; " ह्मणोन लिहिलें, व ' अद्याप कुरुंदवाडावर[1] रोखा जाहला नाहीं, परंतु होईल असें दिसतें; ' ह्मणोन लिहिलें तें कळलें. आपली फौज आपल्याच परगण्यावर रोखे करिते, तेव्हां शत्रु येऊन गांव घेतो हें कांहीं अपूर्व नाहीं ! कोणी सरकारांतून करवीरकरांचे पारिपत्यास आला म्हणजे आमचे परगण्यांची खराबी करितो ! राज्यास धनी नाहीं तेव्हां शब्द कोणास लावावा ? लक्ष्मेश्वर परगण्याचीं ठाणीं देसाई याणें घातलीं.

---

१ जिवाजीपंत पोतनीस यांचें पत्र चुलते विष्णु कृष्ण यांस लष्करांतून कुरुंदवाडास.

श. १६९९ **हैदर अल्लीवर पांचवी स्वारी** इ. स. १७७८

ठाणीं म्हणावयास राहिलीं असीं हिरेवडवट्टी, व येळवंती, कुंदगोळ, मुळगुंद, बेहट्टी, देसगत इतकीं मात्र राहिलीं आहेत. ही फौज मोगल-सुद्धां तुंगभद्रा सिंगटाळुराजवळ उतरावयास जाणार होते तों ठाणें-दारांस अवसान होतें कीं कुमक येईल. तों मोगलानें फार आग्रह केला कीं, माघारे मुष्टुराजवळ उतरायास जावें. फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस पार व्हावें असा करार जाहला असतां दोन मजली कोपळाकडून माघारे आलों. तों मोगलानें दौलतराव घोरपडयांचे गांवास तोफा लावून खंडणी घ्यावयास लागला. बहुत प्रकारें हरीपंततात्यानीं सांगितलें परंतु ऐकत नाहीं. आमचे लष्करचें घोडें गुरूं त्याचे लष्करांत चुकोन गेलें तर सोडून देत नाहीं. जबरदस्तीच्या गोष्टी सांगतो. हैदरखाना-कडून मोगलास ऐवज अदवानीहून पस्तीस लक्षांचा आला म्हणोन बाजारी वर्तमान आहे. धौशाचें कर्तृत्व पाहतां ऐवज आला हा खराच असें वाटतें. सन्मुख युद्धास जाऊन युद्ध होत नाहीं. जे समयीं कोपळा-पासून इकडे यावयास लागलों तेव्हां धौशास राजश्री हरीपंततात्या व तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांणीं फार प्रकारें सांगितलें कीं, सिंगटाळूरास पार होऊन दुर्गकरांस सामील करोन घ्यावें. धौशा बोलला कीं, ' तुम्ही सिंगटाळूराजवळ नदी उतरावयास गेलां तर आपण माघारे देशास जातों ! ' याप्रमाणें स्पष्ट बोलला तेव्हां यांस इकडे येणें प्राप्त जाहलें. इतकें असोन पार लौकर होत नाहीं. फौजा कोपळानजीक होत्या तों येळवंती वगैरे ठाणें-तील लोकांस भरंवसा होता. आतां इकडून कुमक होणें कळतच आहे व शत्रूचें पारिपत्य होणें कळतच आहे ! आणि तुंगभद्रापार होण्याचा सुमार दिसत नाहीं. व्यर्थ खर्च खात बसले आहेत. आमचे फौजेंतलि चार रोजमुरे लोकांचे राहिले आहेत. पैशाची प्राप्ति कोठील दिसत नाहीं. सालमजकुरा सर्वस्व दिलें तरी लोकांचे शिबंदींतून पार

पडणें कठीण आहे. तशांत छावणी झाली तर लोक कोणी रहात नाहीं. मनसबा पाहतां फजीती दिसती. काल येथील मुक्कामाहून येळवंती वगैरे ठाण्यांच्या कुमकेस राजश्री गोविंदपंतमामा यांजबरोबर हजार स्वार देऊन पाठविले आहेत. विसाजी आपाजी आठवले तीन हजार फौजेनिशीं धारवाडाजवळ असतां शत्रूनें येऊन छापा घातला; तेव्हां (या) हजार स्वारांचा निभाव होणें कळतच आहे. येळवंतीस राजश्री विठ्ठलपंत दातार यांस मीं बहुत प्रकारें लिहिलें; परंतु त्यांचा आग्रह कीं खामखा ठाणेंत राहणार. मीं त्यांस लिहिलें होतें कीं, ' कोनापास ठेवणें. तुह्मी नरगुंदचे सुमारें असावें आणि वरचेवर माणसें पाठवून बंदोबस्त करीत जाणें. ' ती गोष्ट त्यांचे मनास न आली आणि आपणच राहिले आहेत. येथून दोनशें गाडदी पाठविले आहेत. प्रस्तुत देसाई लक्ष्मेश्वरीं आहे. कोकणांत तीर्थस्वरूप सौभाग्यवती काकूकडे माणूस पाठविला होता. सुखरूप आहे म्हणोन चिरंजीव राघोबानें लिहिलें होतें. कळोन संतोष पावलों. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों द्यावा हे विज्ञापना.

नं. २२६६. (फाल्गुन व०—मार्च दु० पंधर०)

गोविंद सखदेव यांचें पत्र मनोळीहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस—

" औरंगाबादेहून गाडदी व पठाण येत होते त्यांजवळ दस्तक व कौल नाहीं यास्तव पुरंदराहून फौज पाठवून अमदाबाद घोडनदीचे तीरीं लुटिले. गाडदी मारिले. शंभर घोडे सरकारांत पाडाव आले. करवीरास मोर्चेबंदी होऊन तोफांची मारगिरी बहुत निकडीनें होत आहे. मोर्चे गांवांत गेले आहेत. बाहेरून आंत पाणी जावयाचें बंद जालें. त्यावरून तहाची बोली लागली आहे. शिंदे पंधरा लक्ष रुपये बोलत आहेत " म्हणोन लिहिलें तें कळलें. "

श. १६९९ हैदरअल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२६७. श्रीव्यंकटेश. (२३ मार्च.)

तीर्थस्वरूप मातुश्री आई वडिलांचे सेवेशीं. अपत्यें दादानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन वद्य १० इंदुवार तीन प्रहर मुकाम लष्कर पावेतों क्षेम असों विशेष. इकडील वर्तमान तर लष्करचे मोर्चे चोहोंकडून अगदीं जवळ गेले. तोफा चांगल्या लागू होतात. आंतील नाश बहुत होतो. तहाचें बोलणें लागलें आहे. वीस लक्षपर्यंत बोलणें आहे. सारांश आठ चौं रोजीं उलगडा होतो. इतकेउपरी गुंता पडणार नाहींसें दिसतें. यानंतर राजश्री येसाजी शिंदे यानीं तहाचे कामीं लाट, रांगोळी, या दोन्ही गांवचा आड घातला आहे. याजकरितां श्रीमंत राजश्री नानांचीं ताकीदपत्रें राजश्री पाटीलबावांस पाहिजेत. याजकारितां तीर्थस्वरूप राजश्री बाळाजी नाईक भिडे[२] यांस आह्मी पत्रें लिहिलीं आहेत. तीं पत्रें आपणाकडे पाठविलीं आहेत. तीं पाहून त्याअन्वयें आपले नांवें पत्रें राजश्री बाळाजी नाईक भिडे यांसी द्यावीं. आणि आपणापाशीं जलद चालणार असेल त्याजबराबरी पाठवून उत्तर लवकर येई तें करावें. आपणाजवळ चालणार नसलेस कृष्णाजी जासूद नांदणीस पाठविला आहे त्यास आणवून पुणेंस रवाना करणें. श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २२६८. (फाल्गुन व० १२–२९ मार्च.)

पोा छ ४ रबिलावल. सुरूसन समान सबैन मय्या व अल्लफ. चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ २५ सफर मुक्काम तुंगा

---

१ व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर यांचें पत्र महादजी शिंदे करवीरास वेढा घालून बसले होते तेथून इचलकरंजीस आपल्या मातोश्रीस ह्मणजे लक्ष्मीबाईस. २ पत्र लिहिणाराचे श्वशुर प्रसिद्ध सावकार. वास्तव्य पुणें.

दक्षिणतीरनजीक कंपली वर्तमान यथास्थित असे. विशेष. गंगावती ताा अनागोंदी हा गांव हल्ला करून घेतल्यानंतर तासगांवचे प्यादे-समागमें तुम्हांस सविस्तर लेहून पत्रें पाठविलीं आहेत, त्याजवरून कळलें असेल. गंगावतीस आणखी दोन दिवस बसतों तर शत्रूकडील सामान येऊन पोहोंचत होतें; हें समजोनच मोर्चे न देतां हल्ला करून –गांव मजबूद, मातबर ठाणें,–असतां निकडीनें घेतला; म्हणून दशहत बसोन जतगांव, अयोध्या, कंपली, आदिकरून ठाणीं टाकून प्यादे पळोन गेले. गांव सुटले; खराबी जाहली; तेव्हां संस्थानिकाकडून कारकून बोलावयास आला. बोलोन फिरोन अनागोंदीस गेला. तों कुमदान दहा हजार वार, पांच सहा हजार फौज, आठ तोफा घेऊन हंपीजवळ नदी उतरून डोंगरांतून येऊन दगा करावा म्हणून अना-गुंदीकरांचे माहितगारीचे वाटेनें येतो; आला; हें कळोन आम्ही साव-धच होतों. छ २१ सफरीं सोमवारीं आम्ही फौजसुद्धां बारीचे तोंडीं गेलों. पुढें लोक थोडे बहुत पाठविले. तेथें झटापट जाहली. शत्रूचीं दहा पांच घोडीं पाडाव आणिलीं. दहा पांच तिकडील व इकडील जायां जखमी जाहले. घोडयांचा लाग नाहीं. बारीचे तोंडीं दरवाजा तेथ-पावेतों घोडीं घातलीं. तेथें पाईंचें माणूस दाट होतें. अस्तमानही जाहला, याजकरितां माघारे आलों. लढाई द्यावयाची जागा नव्हे असें समजोन निघोन माघारे गोटास आलों. गंगावतीहून कूच करून पुढें बुनगें लावून देऊन सडे तळावर होतों तेव्हां शत्रूकडील राऊत तीन चारशें पुढें आले. राऊताराउतांची गांठ पडली हें कळोन आम्ही गेलों. थोडीबहुत चकमक जाहली. तेही आवळून राहिले, अस्तमान जाहल्या-नंतर आम्ही मुक्कामास आलों. अंतोबा शिराळे व अंबाजी आमचा शागीर्द गुदस्तां होता–दोघांनीं जाऊन त्याचे लोकांत शिरून मारा-मार करून संभाळून निघाले. अंबाजीचे घोडीस गोळी लागली. खैर आहे. निभावून आली. अंतोबाचे घोडीस मागील पायावर वार लागला,

ढोणशीर तुटली, सबब घोडी राहिली. ती तेथेंच राहिली नाहीं. अलीकडे येऊन राहिली. लक्ष्मण आठवला तेथें' असतां बसत होता. कर्डी काठेवाडी ती अंतोबास बसायास दिली होती. घोडी चांगली होती; परंतु कामावर आली. छ २१ सफर भौमवार एकादशीस कूच करून तुंगादक्षणतीरनजीक मुक्कामास आलों. आतां चित्रदुर्गकरांस अनुकूल करून घेऊन मग जें कर्तव्य तें करावें असें आहे. आह्मी नदी उतरून आलों याजकारितां कुमदानही कमलापुराजवळ आला. तेथून नदरूजीस येणार म्हणून बातमी आली. नदरूजी कमलापुर हंपीस लांब नाहीं. त्याचे लगत रान झाडीचा आसराच आहे. हैदर-खान हावनुराजवळ मैराळावर आहे. हावनूरची खंडणी पस्तीस हजार होनावर जाहली. देसाई यास भेटीस नेऊन चौकी दिल्ही आहे. साव-नूरचें अद्याप विल्हेस लागलें नाहीं. आह्मी तुंगा उतरलों. आतां शत्रु कोणीकडे येतो पहावें. शिवशाई व मोगलाई एक जागां जाहली आहे. पैसा नाहीं म्हणून विलग. तत्राप लोक पोटास मागतात. रोजमुरेची तरतूद होणें कठीण पडतें. लोकांवर शब्द ठेवण्यास जागा नाहीं. सर-कारांतही ऐवज नाहीं. असी अडचण. असो. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें सर्वही नीट होईल. राजश्री अप्पा बळवंत पंढरपुरास आले. त्यांसही येणेंविशीं पत्रें (येथून) गेलीं. त्यांचींही येतों म्हणोन आलीं. येतील. करवीरचें उरकतें म्हणजे ती फौज मोकळी होती. तें उरकेना ! लांबणीवर पडलें. हरिसत्तेकडून घडेल तें प्रमाण. वरचेवर पत्र पाठवीत जावें. प्रस्तुत शिंदे कोठें आहेत त्याचें वर्तमान लिहिणें. राजश्री शिवाजी-पंत म्हैसकर पुरंदराहून आले, मिरजेस आहेत, त्यांसी फिरोन लौकर तेथें पाठवावें म्हणजे वर्तमान कळेल. दरबारांत असिलेच पाहिजेत. त्यांची रवानगी लौकर करावी. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ मिरजेस.

श. १६९९ हैदर ाविर पांचवी स्वारी इ. स. १७७८

श्रीगणपति.

नं. २२६९. (फा० व० १२–२५ मार्च.)

पैा छ ४ रबिलावल. सुरतन समान सबैन. चैत्र मास.

चिरंजीवे राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. जाबीत-जंगाची आमची गांठ पडोन अडीच महिने जाहले. शत्रूचें पारिपत्य करावें असें शपथपुरस्कर बोलणें ठरलें; म्हणोन मातबर तोफा सप्त शकल व राम व फत्तेजंग या पुण्याहून आणिल्या. एक जागां असोन त्यानीं चार रूपये मिळविले तत्राप मोठया मसलतीस पेंच पडेल म्हणून दोन अडीच महिने गम खात दिवस घालविले. गंगावती घेतल्यानंतर नदी उतरावयाचा सिद्धांतच. तेव्हां " नबाबाचा हुकूम नदी उतरावयाचा नाहीं " म्हणून आड खाऊन चार दिवस त्यानीं घालविले. तेव्हां आह्मी सर्वांनीं मिळून " आपली मसलत निक्षन करावी. आतां टाळून गोष्ट सांगूं नये. रेंटून चांगलें सांगावें. तुटक करून हा जाणार, तेव्हां साफ जाबसाल सांगावा " असें ठरोन वकिलास त्याजकडे पाठविलें. जाबितजंगानींही (पेशवे) सरकाराकडून सरळपणें जाबसाल असतां आड खाऊं नये हें पुर्तेपणीं समजोन सरकारचे लक्षांत विपर्यास करूं नये असे परस्परें जाबसाल समर्पक जाहले. नदी उतरावी असें ठरोन तुंगा प्रयासें उतरलों. जाबित-जंगाचा कारभार क्षणभंगुर. आमची ओढ. अशासीं गांठ पडली आहे; उपाय नाहीं ! सामदाम दंड भेद या उपायें दिवस घालवीत आहों. चित्रदुर्गकरास आधीं अनकूल करावा हेंच चित्तापासोन आहे. घडतां घडेल तें खरें ! नदीपार होऊन येमगनुराजवळ मुकामास आज गेलों. ढकलत ढकलत हलके हलके कोठवर जाणें होईल पहावें ! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस.

नं. २२७०. (फाल्गुन व० १३–२६ मार्च.)

छ २६ सफर गुरुवारचें परशुरामभाऊंचें पत्र तुंगादक्षिण-तीरनजीक कंपली येथील मुक्कामाहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" आज येथून कूच करून येळीगनूर तालुके बल्लारी येथील मुक्कामास दोन कोस गेलों. चित्रदुर्गपावेतों जावें असा ठराव जाला आहे. यांत श्रीसत्ता प्रमाण ! हरिसत्तेकडून जाणें कोठवर होतें पहावें. परंतु विचार सुधा दिसत नाहीं ! "

नं. २२७१. (फाल्गुन व० १३–२६ मार्च.)

रामाजी भरमाजी याचें शहापूर येथून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. रवाना फाल्गुन वद्य त्रयोदशी. गुरुवार. समान सबैन.

" हैदरखान हावनुरावर आहे. श्रीमंतांची फौज कंपलीवर आहे. बल्लारीकडे जाणार. कित्तूरकर अद्यापि कुणकुब्यावर आहे. "

नं. २२७२. **श्रीव्यंकटश.** (२६ मार्च.)

तीर्थस्वरूप राजश्री आप्पा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें दादानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २६ सफर मुक्काम करवीर येथें आपले कृपें-करून क्षेम असे. विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्त-मान कळत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें संतोषवीत असावें. यानंतर करवीरकरांचे तहरहाचें बोलणें लागलें आहे. वीस लक्षपर्यंत बोलतात. क्षेत्रासीं चोहोंकडून तोफांचे मारागिरीनें बहुत खराबी जाहली. जेर जालें आहे. आणखी होईल तें वर्तमान मागाहून लेहून पाठवितों. तदनंतर आपला मुक्काम पंढरपुरावरी फौजसुद्धां आहे म्हणून

---

१ व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यांचें आपा बळवंत मेहेंदळे यांस पत्र.
२ दोन्ही.

परस्परें ऐकतों. तरी समीप आम्हाकडील गांव कडलास व पापरी हे दोनी आहेत. त्यास लष्करसंबंधें हरएक उपद्रव होतात. ऐसीयासीं ताकीद देऊन हरदो गांवचें रक्षण होय तो अर्थ केला पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंति.

न. २२७३. श्री. (२६ मार्च.)

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं. अपत्यें जिऊबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा फाल्गुन वद्य त्रयोदशी गुरुवासरे मुक्काम कंपलीनजीक तुंगभद्रादक्षणतीर वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान गंगावतीनजीक कनकागिरी तोफा लावून गांव हल्ला करून घेतला. तदनंतर धौशा निरोप घेऊन जाणार होता, तों सर्वांनीं भीड घालून पार होऊन दुर्गकरांस सामील करून एक वेळ हैदरखानाबरोबर लढाई घ्यावी असा निश्चय करून दक्षण-तीरास आले. बसालतजंग याजकडील दहा तोफा व दोन हजार फिरंगी गाडदी व दोन हजार फौज येथील मुकामीं सामील जाहले. त्यांचे चित्तीं बल्लारी घ्यावी. राजश्री हरीपंततात्यांचे चित्तीं तूर्त बल्लारीस न गुंततां दुर्गकरांस सामील व्हावें. तदोत्तर मग बल्लारीकडे यावें असें म्हणतात. कोणतें घडेल तें पहावें. गंगावतीहून कूच जाहलें ते दिवशीं शत्रूकडील दोन हजार बार पांच हजार फौज दोन तोफा अशी अनागोंदीकडून येऊन बारीजवळ बसले होते. रात्री छापा घालावा या अर्थें किंवा कहीवर यावें या अर्थें आले होते. तों दोन प्रहर दिवसास दशमी इंदुवारीं वर्तमान आलें कीं, येजेंप्रमाणें फौज आली आहे. तेव्हां हे आपले जागां तयार होऊन होते. धौशा व सरकारच्या फौजा पुढें नदीवर मुक्कामास गेल्या. इक-डील तिनी पथकें व राजश्री हरीपंततात्याचे चिरंजीवाबरोबर पांच

---

१ जिवाजीपंत पोतनीस याचें पत्र लष्करांतून कुरुंदवाडास चुलता विष्णु कृष्ण यास. २ दोन्ही.

हजार फौज ऐसी मात्र होती. वर्तमान कळल्यावर पुढें बारीचे सुमारें दोनशें स्वार रवाना केले व खासाही तयार फौजसुद्धां होऊन सवेंच गेले. तों अघाडीच्या लोकांची जागा अडचण, आणि सायंकाळ जाहला, परंतु त्यामध्यें कोणी कोणी घोडीं घातलीं, दोन चार घोडीं पाडाव आणिलीं. राजश्री अंताजीराम शिराळेकर यांणेंही लोकांचे अघाडीस जाऊन कामकाज केलें. त्यांकडे सांपडला होता, परंतु वोलेकरांचे लोकांची गांठ पडली म्हणोन काढून आणिला. अंतोबाची बसती घोडी ठार पडली. अंतोबानें फार चांगली केली. सर्वां-देखतां घोडी चालवून गेला ! वरकड मजकूर अधिकोत्तर ल्याहावा असा नाहीं. कोणीकडे जातील त्यासारखें वर्तमान होईल तें सेवेशीं लिहितों. विदित होय हे विज्ञापना.

नं. २२७४. (फाल्गुन व०–मार्च दु० पंधर०)

मिरजेहून गंगाधरराव गोविंद यांचें लष्करास परशुरामभाऊंस पत्र— पैा छ २८ सफर फाल्गुनमास–

" राजश्री महादजी शिंदे यांस पुरंदराहून पत्रें आलीं अस-ल्यास करवीरचा भेंडा पलसा करून निकाल काढितील. शिंदे श्रीमंत राजश्री बापू व नानाच्या लक्षांत पुरते असल्यास चिंता नाहीं. होळ-कर वगैरे सुद्धां सर्वांस गुंडाळतील. परंतु एकतत्वीं राहतील कीं काय पहावें ! जहागीर व किल्ला द्यावयाचा केला आहे म्हणून मात्र भरं-वसा वाटतो. पिरोजी नाईक यांचे बंधु दोन हजारांनिशीं होळकराकडे गेले. बारामतीवरील पुण्याची वाट बंद जाली. ते फितुरांत पुर्ते आहेत. कर्नाटकची अवस्था तशी, देशची या प्रकारची ! पुढें काय होतें पहावें ! "

---

१ निंबाळकर.

श. १६९९ **हैदरअल्लीवर पांचवी स्वारी** इ. स. १७७८

न. २२७५. श्री. (२७ मार्च.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ फाल्गुन वद्य १४ भृगुवार मुक्काम वालेखंडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आम्ही काल तासगांवाहून भोजनोत्तर निघालों ते मळणगांवास आलों. तेथून दोन प्रहरीं येथें आलों. तों लष्कर येथून पूर्वेस पक्का कोस येथें आलें. आम्ही भोजन करून लष्करास गेलों. राजश्री आपा बळवंत व राजश्री आनंदराव गोपाळ व बाजीपंतअण्णा यांची भेट जाहली. बोलणें जाहलें त्यांतील भाव—पंढरपुरावर असतां श्रीमंत राजश्री नानांचीं पत्रें आलीं होतीं कीं कूच करून हरीपंततात्या-कडे जाणें. त्यावरून बुधवारीं कच करून मांजरीवर आले. तेथून जवळ्यास आले. आज भृगुवारीं येथें आले. तों मागाहून दुसरें पत्र आलें कीं, ' जाणें म्हणून लिहिलें होतें परंतु जेथें मुक्काम असेल तेथेंच राहणें. दुसरें पत्र पाठवूं तेणेंप्रमाणें करणें ' म्हणोन सांडणी-स्वार व मागाहून जासूदजोडी पुण्याहून आली ती बारामतीवरून. त्याणीं नजरेनें पाहूनच आले. राजश्री मोरोबादादानीं मुलेंमाणसें बारामतीच्या वाड्यांत ठेविलीं व बुणगें बारामतीस ठेऊन सडे सात आठशें स्वार व बाबूजी नाईक बारामतीकर यांचे धाकटे पुत्र श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे जांवई येणेंप्रमाणें नवमी टाळून दशमीस पहाटेच्या दीडप्रहर रात्रीस निघोन उजाडतां रविवार निघाले. होळकरा कडे वाफगांवाकडे गेले. श्रीमंत राजश्री नानांचे शंभर राऊत समागमें होते त्यांस अगोदरच बेबळ्यास पागा आहे तेथें कटकट निंबा-ळकरांची जाहली आहे म्हणून बाहणा करून तिकडे पाठविले. बातमी देखील कळों नये याप्रमाणें करोन गेले. राजश्री बजाबा पळसी

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

नगराजवळ आहे तेथें शिमगा करावयासी आले होते ते तेथेंच होते. तेही गेलेच असतील. याप्रमाणें वर्तमान राजश्री मोरोबादादा गेल्याचें पाहून जासूद आले. मागाहून दुसरें वर्तमान आलें जे होळकर वाफगांवाहून कूच करून पारगांवावर आले. यांसी सामील करून घेऊन मनसबा कर्तव्य तो करावा यासाठीं पुढें आले म्हणून वर्तमान आहे. उदईक या मजकुराचें पत्र श्रीमंत राजश्री नानांचें यांस येईल. पत्र येईल त्याप्रमाणें मशारनिल्हे करितील अथवा माघारे बोलाविल्यास जातील. सारांश खूळ मोठेंच उभें राहिलें. हें वर्तमान खरें त्यापक्षीं राजश्री महादजी शिंदे यांसीं पत्रें श्रीमंत राजश्री नानांचीं आलीं असतील. पत्रें आलीं असल्यास वर्तमान फुटलें असल्यास राजश्री तिमराव याणीं आपणास लिहिलें असेल व आपणास पुण्याकडूनही पत्रें आलीं असतील. करवीरचा फडशा जाहला असल्यास उत्तमच जालें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२७६. **श्री.** (चैत्र शु० ५–२ एप्रिल.)

(पैा ६ रबिलावल) ३ रबिलावलचें पंढरपुराहून—

" राजश्री आपा बळवंत यांस माघारें येण्याविसीं पत्रें आला त्यावरून प्रतिपदेस कूच करून पुरंदराकडे गेले."

नं. २२७७. (चैत्र शु० ६–३ एप्रिल.)

परशुरामभाऊंचें लष्करांतून मिरजेस गंगाधरराव गोविंद यास पत्र—

" आज ४ रबिलावलीं कूच करून कॅंचगर येथील मुक्कामास गेलों. दरमजल चित्रदुर्ग पावेतों जावें असें ठरोन कूच केलें."

श्रीगणपति.

नं. २२७८. (चैत्र शु० ६–३ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ ४ रबिलावल मुक्काम

तुंगादक्षणतीर नडवेंनजीक केंचनगुडु वर्तमान यथास्थित असे. विशेष. आह्मी नदी उतरल्यानंतर तुम्हांकडे पत्रें पाठविलीं आहेत त्याजवरून सर्व कळलें असेल. नदी उतरावयाचे वेळेस जाबितजंग यानीं आड खाल्ली होती. तुटकच जाबसाल होतो असें समजतांच नदी उतरले. त्यास आठ दिवस जाहले. अद्याप केंचनगुडाजवळच आहों. सरकारचे फौजेंत पैसा नाहीं याजमुळें बाकी राहिली नाहीं. पोटामुळें फौजेंत गलबल भारी. उपाय नाहीं. त्यांत राजश्री हरीपंत-तात्यांचा कारभार, भीड मुरवत भारी; याजमुळें उपाय नाहीं. " दर मजल चित्रदुर्गास जाऊन संस्थानिकाजवळून चार रूपये घेऊन त्यास अनुकूल करून घेऊन रायदुर्ग व हरपनहळ्ळीची खंडणी घेऊन बल्लारी व गुत्ती तालुका सोडवावा; म्हणजे शत्रूस जरब बसती; " असें बोल-ण्यांत येऊन नदी उतरलों. त्यास अद्याप पाऊल पुढें पडेना, तेव्हां निभाव होणें कठीण ! वडिलांतागायत श्रीमंतांची सेवा केली येथ-पावेतों. आतां नौबत असी उपटली ! आज चार वर्षें श्रम साहस होतात ते श्री जाणे. यांत गुदस्तां जाबितजंगानें असेंच फसविलें म्हणून नाना प्रकार करून छावणी करून आजपावेतों दिवस घाल-विले. होती पत ती भरीस घातली. चित्रदुर्गकराची एक वेळ गांठ पडती म्हणजे कांहीं तरी शत्रूस जरब बसती. काल अनुकूल नाहीं त्यापक्षीं चित्रदुर्गपावेतों जावयास अंदेशा पडला आहे ! दोन महिने मुलखागिरीचे राहिले. या आठ दिवसांत चित्रदुर्गास गेलों तर उत्तम आहे. नाहीं तर ठीक दिसत नाहीं. पैसाच मिळत नाहीं. त्यापक्षीं इकडे राहणें कठीण ! माघारे फिरल्यानंतर मग शत्रु पिछा सोडतो असा प्रकार नाहीं. करवीरचें लौकर विल्हेस लागलें तर राजश्री महादजी शिंदे मोकळे जाहले तर इकडील मनसब्यास फौज आली तर उपयोगी पडेल. हे भाव सर्व कारभारी यांसही लेहून पाठ-

विले आहेत. त्यानीं काय तरतूद केली याचा प्रकार आठ दिवसांत कळेल. आठ दिवसांत दुर्गास जाऊन पोंचलों तर कांहीं मसलतीचा रंग राहील. नाहीं तर कांहीं रहात नाहीं. शत्रु हावनुरानजीक आहे. दोन लाख होनांवर सावनूरची खंडणी उरकली. कुमदान दहा हजार बार व पांच सहा हजार फौजेनिशीं होसपेट कमलापुराजवळ आहे. आतां जसें आमचें पाऊल पडेल तसें तोही करील तें मागाहून लेहून पाठवूं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २२७९. (चैत्र शु० ७–४ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील वर्तमान ताा छ २. रबिलावल मुक्काम रारावी जाणून स्वकीय लेखन करीत असावें. विशेष. काल पत्रें तुम्हाकडे रवाना केलीं. सविस्तर मजकूर लिहिला आहे. मजलीस आलों तों पुण्याहून राजश्री नाना फडणीस यांचीं पत्रें आलीं कीं, " राजश्री मोरोबादादा फडणीस यांची समजावीस होत होती. नवे नवेच खिस्से काढून बारामतीस गेले. चिंतो विठ्ठल पुण्यास होते तेही कुटुंबसुद्धां निघोन तुकोजी होळकर यांजकडे गेले. होळकर यानीं दोन हजार फौज मोरोबादादाकडे पाठविली. आम्हीं शिंद्यांस " पांच हजार फौज करवीरास ठेऊन तुम्हीं लौकर येणें " म्हणोन लिहिलें आहे, राजश्री कृष्णरावआपा व बाजीपंत यांस पुढें न जाणेविशीं लिहिलें आहे. भोंसले यांजकडील पांच हजार फौज माहूरपट्टीस आणविली आहे. तुम्हीं इकडील बातमींत असावें. खेळ उघडे जाहले. " म्हणोन पत्रें आलीं. त्याजवरून बहुत चिंतातुर आहों. श्रीइच्छेस इलाज नाहीं. तुम्हास वर्तमान कळलेंच असेल. शिंदे याणीं काय केलें ? जर निखालस नानाचे पक्षीं आहेत तर या समयास जातील. नाहीं तर मसल-

तीचा बहाणा करून तेथेंच दिवस घालवितील. भरंवसा येत नाहीं ! असो. श्रीइच्छा ! नाना पुरंधरास गेले. ' वृद्धाचेही खेळ आहेत ' असें लिहिण्यांत आहे. मग काय काय घडतें पहावें. आम्ही चित्रदुर्गास जावें, चार रुपये मिळवावे, परंतु दैवीं नाहीं ! याउपर माघारे फिरणें प्राप्त आहे. आज उद्यां दोन मुक्काम आहेत. परवां बागलकोटचे सुमारें पावेंसें आहे. यांत काय घडतें पहावें. श्रीगजाननानें श्रीमंत राजश्री रावसाहेबांचा व नानांचा बचाव करावा; किल्ल्याचा बंदोबस्त असावा; म्हणजे सर्व जोड पावली ! तुम्ही तासगांव, कुरुंदवाड येथील मुलें माणसें आणविलींच असतील. याउपरी तुम्हीं त्या स्थळाचा बंदोबस्त करून सावध असावें. महिमंतगडचा बदोबस्त करावा. मींही तासगांवीं लिहिलें आहे. मंगळवेढें, करकंब वगैरे चहूंकडे हुशारीची सावधता करवावी. मनसबा मातबर दिसतो. कोण्या थरास जातो पहावें. आम्ही इकडे गुंतत नाहीं. त्या रोखें येतों खरें; परंतु शत्रु काय काय कारंतो कळत नाहीं. नबाबही बाहेर निघाले. त्यांचा डौल कसा आहे न कळे. पाऊल नीट दिसत नाहीं. आम्ही माघारे फिरल्यावर जगें काय करितात पहावें. जसें ठरेल तसें लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २२८०. (चैत्र शु० ७–४ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ५ रबिलावल तिसरा प्रहर जाणोन आपलेकडील कुशल वृत्त लिहीत जावें. आज प्रातःकाळीं पुण्याकडील वर्तमान आलें त्यावीं पत्रें तुम्हास सावधतेविशीं गेलींच आहेत. त्याजवर त्याच समया तुमचींही पत्रें व राा शिवाजीपंत यांचीं

---

१ करवीरावर. २ निजामअल्ली. ३ बरोबर असलेला जाफितजंग भौशा.

व बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचीं आलीं तीं तुम्हीं पाठविलीं तीं पावलीं. सविस्तर मजकूर कळला. त्याजवर छ २७ सफरचें राजश्री नानांचें पत्र राजश्री हरीपंततात्यांस आलें कीं, " सर्वत्र मंडळी वाफगांवास मिळोन जमावानिशीं छ २६ सफरीं पुण्यास दाखल जाहले. श्रीमंतांच्या दौलतीचा नाश; ठीक नाहीं; यास्तव बापूच निघोन पुण्यास गेले. काय ठरेल तें मागाहून लिहून पाठवूं. तुम्हीं गलबल न करणें." त्याजवरून सर्व आशा मोडिवली ! श्रीमंत राजश्री दादासाहेबांचा टेंबा उभा राहिला ! श्रीमंतांची व नानांची अवस्था काय होते तें श्रीहरी जाणे. आम्ही या उपरी देशास येतों. येथें फौजेस खर्चास नाहीं तेव्हां विचार कळतच आहे. चहूंकडून श्रीनें संकटीं घातलें. होणार तें चुकत नाहीं. श्रीमंत रावसाहेबांस सलामत असावी म्हणजे बाकी फिकीर करीत नाहीं. असो. सर्व भार श्रीगजाननावर आहे. तुम्हास तिकडील जसें जसें वर्तमान कळलें असेल तसें तसें तुम्ही आम्हास लिहिलेंच असेल. शिंदे गेले किंवा तेथेंच आहेत हें लिहून पाठविणें. मुलें माणसें एकत्र करून बहुत खबरदार राहणें. आम्हीं या उपरी आलों असें समजावें. निभावणार श्रीहरि आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. सरकारचे तीन जोडया कागद राजश्री हरीपंततात्यानीं राजश्री नानाकडे रवाना केले आहेत ते तुम्हांजवळ यतील. तुम्हाजवळ पावल्यानंतर पुढें नानांजवळ पावत असे या माणसांसोबत तिकडे रवाना करणें. हे आशीर्वाद.

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तीर्थस्वरूपानीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. आपण बहुत सावधपणें असावें. सारीं मुलें माणसें एकजागां करावीं. चहूंकडून बातमी राखून सावधपणें रहावें. हे विज्ञापना.

---

१ सवाई माधवराव पेशव्यांस. २ करवीरास. ३ तासगांव व कुरुंदवाडचीं मुद्दा

श. १७०० हैदरअल्लीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२८१. (चैत्र शु० ७–४ एप्रिल.)

लष्करांतून परशुरामभाऊंचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" आम्ही मलप्रभानजीक बागडकोट येथें येतों तों पुण्याहून पत्रें येतात. त्यासारखी कर्तव्यता. दर मजल येत आहों. लांब लांब मजली कराव्या तर तोफा भारी, पाण्याची अडचण, यामुळें पांच कोस सा कोसांची मजल. पाण्याच्या सुमारासारखा मुक्काम करावा लागतो. तूर्त पर्जन्याचा भोग आला आहे ! फौजेंत पैसा नाहीं याजमुळें कैद नाहीं. पुढें परिणाम कोणताही ठीक नाहीं. राजश्री महादजी शिंदे यांचा प्रकार कसा आहे तें लिहावें. चिा राजश्री बळवंतरावदादा[1] व हरबालात्या[2] व तीा मातुश्री कृष्णाबाई[3] व सारीं मंडळें तेथें पुरंदरीं किल्लयावर आहेत. राजश्री नानानीं दम धरिला तर मग जें श्रीमंतांच्या पायांपाशीं होणार तें होऊ ! नाहीं तर तेथील मोठी चिंता लागली. करवीरचा तह तर ठरला. शिंदे तिकडे जातात म्हणोन वकिलांचीं पत्रें आलीं, त्यास गेले किंवा नाहीं हें कांहींच वर्तमान कळत नाहीं. मोठे चिंतार्णवीं पडलों आहों. तिकडील पक्कें वर्तमान कळे तों धौशासुद्धां दरमजल येत आहों. "

नं. २२८२. श्री. (चैत्र शु० ७–४ एप्रिल.)

पैा छ १४ रबिलावल. सन समान सबैन. माघमास.

श्रीमंत राजश्री बाळोसाहेब स्वामीचे सेवेशी.

विनंती सेवक लक्ष्मण कृष्ण व विठ्ठल कृष्ण. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ५ रबिलावलपावेतों सेवकाचें व किल्लेमजकूरचें

---

१ बळवंतराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर. २ हरिहरराव पुरुषोत्तम पटवर्धन मंगळवेढेकर. ३ पुरुषोत्तमराव दाजीची स्त्री. ४ कृष्णाबाईचीं मुलें. ५ गंगाधरराव गोविंद यांस पत्र मिरजेस येळवंती परगणे लक्ष्मेश्वर येथून

वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे स्वामीकडून पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावा. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व हरीपंततात्या कनकगिरीवरून कूच करून गंगावतीस गेले. धौशाचा बेबनाव होऊन तो मागेंच राहिला. हें वर्तमान निजामअल्छीखान यांस कळतांच तेथून ताकीद आली कीं, तुह्मीं व श्रीमंतांकडिल एक विचारेंकरोन सरकार कामकाज करीत जाणें. याप्रमाणें हुकूम येतांच मागती जाऊन श्रीमंतांस मिळाला. गंगावतीस तोफा लावून हल्ला करून गांव घेतला. आंतील लोक कापून काढिले. ते दहशतीमुळें आनेगुंदीकरांचीं गांव ठाणीं सोडून लोक पळाले. त्यांत ठाणीं यानीं बसविलीं. आनेगुंदीकरांचा वकील यांजकडे येऊन खंडणीचा करार करून गेला. तेथील गुंता उरकोन नदीपार होऊन कंपलीस गेले. लष्करा-हून छ २५ सफरचीं पत्रें आलीं त्यांत वर्तमान—कुमदान व टिपू हंपीकडून आनेगुंदीकरांचे माहितीवरून डोंगरांतून गंगावतीचे मुक्कामीं छापा घालावा म्हणोन आला. त्याची बातमी कळतांच सावध जाहले. त्याचा कांहीं कटाव चालला नाहीं. उपरांतिक दुसरे रोजीं बारींत फौज आहे ही बातमी राखोन फौजसुद्धां गेले. त्यांची यांची गांठ पडली. वीस पंचवीस घोडे पाडाव व चाळीस पन्नास ठार जखमी त्यांजकडील जाहलीं, यांचीं दहापांच जखमी जाहलीं. या-प्रमाणें होईतों अस्तमान जाहला. फिरोन गोटास आले. कुमदान हंपीकडून कमलापुराकडून दरोजीकडे गेला. याप्रमाणें पत्र आलें आहे. आज दोन रोज बातमी उठली आहे कीं, टिपूची व यांची गांठ पडोन लढाई मातबर जाहली. अमित्राचे फौजेचा मोड जाहला. हजारबाराशें घोडे पाडाव आले. कुमदानास व टिपूस वेढा दिला आहे. अमित्राचा मुक्काम कुरवतीमण मैराळावर आहे. त्याच्या लष्क-

---

१ ही बातमी पुढें खोटी ठरली. २ हैदरअल्लीचा.

संत नेहमीं बातमीस माणसें ठेविलीं आहेत. त्यानीं यापमाणें सांगितलें. त्याच्या लष्करांत तिकडील जखमी आले तें पाहून बातमीचा माणूस आला. आमित्राचे फौजेंत फार गडबड जाहली आहे. याप्रमाणें सावनूरचीं व हावनूरचीं पत्रें आलीं. आमचीं पत्रें मागें दोन जोडया गेल्या त्या टिपूचे स्वारांस सांपडोन लुटून घेतले. तिकडील मार्ग चालत नाहीं. मागती हें वर्तमान ऐकोन जोडी रवाना केली आहे तेही दो चों रोजीं येईल. आल्यावर सविस्तर कळेल. हावनूरची खंडणी पंचवीस हजार होनांवर जाहली. देसाई यास कैद करून बरोबर ठेविला आहे. अलीकडे त्यास शत्रूनें आज्ञा केली आहे कीं, दोन हजार प्यादे व दोनशें राऊतांनिशीं आह्माबरोबर चाकरी करणें. त्याप्रमाणें देसाई यानें कबूल केलें. सावनूरची खंडणी दोन लक्ष होनांवर खंडेराव यानीं करार करून सावनुरास आला. पैक्याची निशा थोडीबहुत जाहली. बाकी राहिली आहे याजमुळें अद्यापि यवनाचा मुक्काम कुरवतीमण मैराळावर आहे. बाजारबुणगें झाडून हरिहरास गेलें. आपण दहा हजार स्वार व वीस हजार गाडदी सात आठ तोफा जिलिबींत ठेऊन सडा जाहला आहे. एक आवाई टिपूकडे जावें. एक आवाई हरिहराकडून दुर्गाचे सुमारें श्रीमंतांचे फौजेस आडवे व्हावें. असे दोन मतलब केले आहेत. दगेखोर ! विश्वास पुरत नाहीं. आह्मी ठाण्यांचा बंदोबस्त करून खबरदार आहों. गंगाराम याजवर तफावतीचा अन्याय येऊन बंकापुराहून कैद करून नेला. चाळीस हजार होन मागतो. पहाऱ्यांत ठेविला आहे. बंकापुरास आपाजीराम याजकडून कारकून आला आहे. तेथील मामलत मशारनिल्हे यांजकडे सांगितली. कैंचनगोंडा देसाई यास बंकापुरास नेला. लक्ष्मेश्वरांत दोनशें प्यादे व दहा वीस राऊत ठेविले आहेत. अमित्र एक दोन मजल कूच करून पुढें गेला ह्मणजे स्वामीचे पुण्यप्रतापें-

करून ठाणीं घेतों. दोन चार वेळां लक्ष्मेश्वरावर स्वारी केली. एक दिवस रात्रीस जाऊन दरवाज्यांतील प्यादे दहा बारा ठार व वीस पंचवीस जखमी करून येळवंतीस आलों. मागडी व गाजेनूर हल्ला करून दोनी गांव घेतले. आंतील रयत प्यादे धरून आणिले. प्यादे कांहीं जखमी होऊन मेले. कांहीं ठार जाहले. रयतांस कौल करार देऊन ठाण्यांतून आपले प्यादे घालून मागती आपले गांवास पाठविले. त्याचप्रमाणें निठुरकरांची अवस्था केली. निठूर त्यासे नजीक गांव. याजमुळें आमचे प्यादे आंत ठरतना. ठाणेंही मजबूत नाहीं. याजमुळें टाकून आलों. आंतील प्यादे मारले. कांहीं रयता धरून आणल्या आहेत त्यासही कौल करार करून निरोप देतों. माड. हळ्ळीकर रयत मादर ×× पण करून आमचे कहीवर आंतून प्यादे घेऊन रोज येत होते. काल आह्मी दबा धरून कही भरून येते समयीं आंतून प्यादे आले तेव्हां चोहींकडून राऊतानीं उठावणी करून प्यादे सातजणांचीं डोकीं कापलीं. पांच सात जखमी पाडाव आणिले. दहा बारा जखमी होऊन आंत पळोन गेले. तेव्हां गांवावर हल्ला करून गांव घेतला. हुडे राहिले. तेव्हां घरांस आगी देऊन आलों. खर्चाची टंचाई जाहली आहे. कर्ज दोन तीन हजार होन जाहलें आहे. आतां कोणी कर्जही देत नाहीं. हजार दीड हजार होन दरमहा रोजमऱ्यास लागतात. पैशास ठिकाण नाहीं. स्वारी शिकारी करून धन्याचे चरण स्मरोन कालहरण करीत आहों. एकनिष्ठपणें सेवा करीत असलों तर पार पडों! राजश्री जनार्दनपंत मजमदार व रामाजी भगवंत व कोन्यानें गुणानुवाद उधळिले तें परस्परें कळलेंच असेल! मजमदार लष्करास जाऊन श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांस गैरवाका समजावून आह्मीं फिरोन यजमानाकडे जाऊं नये,

---

१ शह्नूस. २ बंकापुरांतून.

मुखावलोकन त्याणीं आमचें पाहूं नये, याप्रमाणें केलें. परंतु श्रीमंत थोर ! कयास पुरता करून आह्माकडे किमपि अंतर नाहीं ऐसें सज्जोन मशारनिल्हेस बुध शिकवावयाचे विचारें सांगोन घरास लावून दिले ते मिरजेस स्वामीकडेही गुण उधळावयास चुकणार नाहींत. याचें सविस्तर पेशजी रामाजी गोविंद याजबरोबर लिहून पाठविलेंच असे. परीक्षा शेवटीं कळेल. आजपर्यंत स्वामीचे पुण्यप्रतापेंकडून ठाणें मजकुरीं दिवस घेतले. लष्कर आमित्राचें दोन चार मजलीं गेलेनंतर तमाम ठाणीं घेतीं. कुमकेस राजश्री गोविंदपंतमामाही आले ते मनोळीस आहेत. अमित्र निघून दूर गेलेवर धारवाडचे रोखें इकडे येणार. वरकड वृत्त मागाहून लिहितों. राजश्री मजमदार व रामाजी भगवंत व कोनापा या त्रिवर्गांनीं आमची बाकी ठेविली नाहीं ! सध्या रामाजी भगवंत लष्करास गेले आहेत. व कोनाप्पा येथें आहे. आह्मी ज्याचे ह्मणविले तेथें हा प्राण गेला तरी साहेब चाकरी सोडून दुसरा प्रकार करणार नाहीं. निदर्शनास येईल. सर्वाविशीं पक्षपाती मायबाप आणि स्वामी आपण समर्थ आहेत. वरकड खासगत जाब साल सर्व स्वस्थता जाहलेवर विचारानुरूप समजाविलें जाईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २२८३. (चैत्र शु० ८–९ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ ६ रबिलावल जाणून आपलेकडील कुशल लिहीत असावें. यानंतर बापू किल्लयाहून पुण्यास गेले म्हणोन राजश्री नानांचें पत्र आलें. त्याजवरून हल्लीं राजश्री नानास पत्र लिहिलें आहे. नाना, श्रीमंत, किल्ला, असें स्वाधीन असल्यास जलद आधीं रवाना करावें. राजश्री हरीपंततात्यानींही लिहिलें

आहे. हीं पत्रें त्यांजजवळ त्यांचे हातीं पावत अशीं जलद रवाना करून उत्तरें येत असें करावें. हे आशीर्वाद.

नं. २२८४. **श्री.** (६ एप्रिल.)

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंतनानास्वामीचें सेवेसीं—

पोष्य बाळाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत चै० शु० १० इंदुवार मुकाम करकंब आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. " कोल्हापुरास मोर्चेबंदी जाली त्यास एक मास जाला. मोर्चे भिंताडापासीं जवळ गेले आहेत. तहाचें बोलणें लागलें आहे. लोकरच फडशा व्हावा असें आहे " म्हणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब फौजसुद्धां तुंगापार चित्रदुर्गच्या सुमारें गेले. धौशा समागमें आहे. अमित्राच्या फौजेस दहा कोसांची तफावत आहे ह्मणोन लिहिलें तें कळलें. सर्व गोष्टी श्रीमंतांच्या प्रतापें घडतील. इकडील नवल विशेष लिहिणें ह्मणोन लिहिलें, त्यास इकडे नवल विशेष ल्याहावयाचा कोणता प्रकार ! सर्व नवल विशेष आपणापासीं आहे. पुण्याकडील वर्तमान अलीकडील जालें तिकडील पत्रें श्रीमंतांस आलीं असतील. वर्तमान कळलें असेल. प्रथम मोरोबादादा बारामतीस आले, तेथून सडे वाफगांवास गेले., तेथून होळकर व बजाबा पुरंदरे वगैरे सर्व मिळोन पुणीयास आले. श्रीमंत मातोश्री पार्वतीबाई यांणीं वस्त्रें दिलीं. शिक्के कटार व्हाही नोबत हत्तीतहित व जरीपटका निशाण दिलें. सर्व अक्तियारी करावी याप्रमाणें करार ठरोन कवडीवरी मुक्काम केला. तेथून सर्व मंडळीसहित कुंभारवळणापासीं

सासवडाजवळ आले. राजश्री बापू येऊन भेटले. श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांची भेटी जाहली. बोलणें जाहलें. सर्वांनीं संतोषें असावें याप्रमाणें करार ठरोन श्रीमंतांच्या भेटी छ ४ रोजीं रबिलावलीं जाहल्या. तूर्त फौज होळकर आदि करून कुंभारवळणावर आहेत. श्रीमंत राजश्री नाना फडणीस पुरंदरीं नारायणानजीक आहेत. बंदोबस्त फार करून जाहला. पुरंदरापासोन बारामतीपावेतों चौक्या जागजागां आहेत. माणसें जाऊं पावत नाहीं. आह्मी माणसें होळकर यांचे लष्करांत पाठविलीं होतीं तीं आजच पत्रें घेऊन आलीं. याप्रमाणें करार ठरला. सर्व काम कारभार करणें तो मुख्यत्वें बापू कारभारी व हे उभयतां फडणीस यांणीं एकमतें करावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस आणावें अशी मसलत होती, परंतु तूर्त राहिली. किंनिमित्त राहिली हें न कळे. प्रस्तुत मातबर घोर उत्पन्न जाहला होता. श्रीभगवंतकृपेनें व श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें निवारण जाला आहे. पुढें काय मसलत ठरेल तें पहावें. तथ्य वर्तमान तिकडे आलेंच असेल. आपणाकडील तथ्य वर्तमान तपसीलवार राजकीय व स्वकीय व स्वकीय अंतस्थ वर्तमान लिहावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

श्रीगणपति.

नं. २२८५. (चैत्र शु १०–६ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी. येथील कुशल तागायत छ ७ रबिलावल सोमवार मुक्काम शिरगोदी तुंगा उत्तर तीर ताा केंचणगुडु वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्ही छ २९ सफरचीं रविवारचीं पत्रें पाठविलीं तीं मंदवारीं सातवे दिवशीं प्रविष्ट जाहलीं. राजश्री शिवाजीपंताचीं व विनायकपंताचीं पत्रें तुम्हास आलेलीं पहावयास पाठविलीं तीं पावलीं.

---

१ हा रास्त्याच्या निसबतीचा अधणीचा मामलेदार.

श. १७०० हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

" राजश्री मोरोबादादा व होळकर व बारामतीकर व बजाबा हे सर्व एक होऊन खूळ निर्माण जाहलें येविशीं राजश्री नानांचें अद्याप कांहीं लिहिलें आलें नाहीं. आपण सावध असावें व करवीरास आलेले गृहस्थ सरकारास अनुकूल असल्यास फारसें खूळ माजणार नाहीं. " म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास " सरदार[1] व लेखक[2] मिळोन पुण्यास आले. त्यांस भेटावयास वृद्धें पुण्यास गेले. रा नाना पुरंधरींच आहेत. हें वर्तमान कळोन फौजेंत गडबंड होईल तर होऊं न देतां सावध असावें; " म्हणून पत्रें सरकारांतून आलीं. त्याजवरून आम्ही जाबित-जंगसहीत नदी उतरून तुंगा उत्तर तीरास आलों. आज सिदनूरचे मुक्कामास येतों. मजल दर मजल गजेंद्रगडचे सुमारें येतों तों आणखी पत्रें येतील तो प्रकार समजेल. तदनुरूप पुढील कर्तव्यता लिहून पाठवूं. तुम्ही सावध असावें ही सूचना कालच तुम्हास लिहून पाठविली आहे. तिकडील बातमी राखोन जलद जलद माणसें रवाना करावीं. शत्रूचें दैव अनुकूल म्हणून देशीं असा प्रकार घडला ! नदी उतरून दुर्गास जावें म्हणून मोठा यत्न करून तुंगापार होऊन एक मजल पुढें गेलों तों फिरोन माधारें उलटावें असें प्राप्त जाहलें ! श्रीसत्तेस इलाज नाहीं. शत्रु हंपजिवळ आहे. याजउपर काय करितो पहावें. राजश्री सखारामपंत भेटीस पुण्यास गेले तेव्हां विवेकच व्हावा असा प्रकार दिसतो. याचें कारण बाजी हातांत नसल्यास जावयाचे नव्हेत. याजकरितां वाटतें. असो. काय असेल तो प्रकार कळेल. राजश्री महादजी शिंदे यांचा प्रकार कसा आहे हें आढळेल तें लिहावें. शिवाजीपंतास पुरंधरास जावयाविशीं लिहिलें, उत्तम आहे. शिवाजी-पंतानीं किल्लयास जाऊन तिकडील वर्तमान लिहावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ महादजी शिंदे. २ होळकर. ३ मोरोबा. ४ सखारामबापू.

श. १७०० हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

नं. २२८६. श्री. (चैत्र शु० ११–७ एप्रिल.)

पैा छ १४ रबिलावल. एन समान सबैन. चैत्रमास.

विनंति सेवक लक्ष्मण कृष्ण व विठ्ठल कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ ८ रबिलावल पावेतों मुक्काम येऊवंती येथें वर्तमान ययास्थित असे. विशेष. हैदरखानाचा मुक्काम करवतीमग मैराळावर होता. तेथून बाजार बुगर्ते झाडून हरिहराकडे लावून दिल्हें. आपण दहा हजार फोज व वीस हजार बार व पांच तोफा जिलबींत ठेवून सडा होऊन छ रबिलावल प्रातःकाळीं कूच करून इटगे पो लक्ष्मेश्वर येथें नदीचे पलीकडे मुक्काम केला. दुसरे रोजीं कूच जाहलें तें नवली-सिंगटाऊरास गेले. तेथील ठाण्यांतील लोक दहशतीमुळें ठाणें सोडून पळून गेले. तेथून कूच होऊन होसपेठेस गेला आहे. आमचे लष्करावर छापा घालावा याअर्थें सडा गेला आहे. आह्मी त्याजकडील बातमी आगावयास पंचवीस माणूस नेहमीं ठेविलें आहे. त्याचें कूच होतांच लष्करास पत्रें पाठविलीं आहेत. श्रीमंतांचे लष्करास व आह्मास तो मध्यें जाहला आहे याजमुळें कागदपत्र वरचेवर जाऊन पोहचत नाहीं. फेरा खाऊन जावें लागतें याजमुळें बातमी वरचेवर पोंहचत नाहीं. एक दोन जोडया त्याचे चोर राउतांस सांपडल्या त्यांस नागवून घेऊन जिवानिशीं सोडून दिलें. मागती वरचेवर माणसें जात आहेत. अदवानीकर दोन तोफा व दोन हजार गाडदी असे येऊन श्रीमंतांस मिळाले. कडपे कर्नोळकरही येणार. आल्यानंतर सर्वत्र एक होऊन दुर्गास जाणार. श्रीमंतांची फोज कुरगोड प्रांत बल्लारी येथें आहे. कुमदान व टिपू कामलापुरावर आहे. अलीकडे मातबर मृज जाहलें म्हणोन चोहोंकडून बातम्या आल्या, परंतु श्रीमंत भाऊसाहेबांचें पत्र आल्याशिवाय खरें वाटत नाहीं. उदन, बेटगिरी, लोकूर वगैरे गांवीं जखमी राऊत घोडीं आलीं व सावनुराहून मुख्याजवळील बातमी या रीतीची आली. विदित होय. परगणे मजकूरचा देसाई

श: १७०० हैदरअलीवर पांचवी स्वारी इ. स. १७७८

यागें हैदरखानाजवळ जाऊन मुत्सद्दी यांजकरवीं सतत रदबदली करून " येळवंतीचें ठाणें घेऊन द्यावें. नाहीं तर परगणा वसत नाहीं. सतरा हजार होन देतों. " म्हणोन फारच आग्रह केला. त्यागें उत्तर दिलें कीं " सर्व ठाणीं सोडून एक ठाणें बळकाविलें. दोन अडीच हजार जमाव आहे. फौज तोफा दिल्यानें लौकर ठाणें येणार नाहीं. असें करून वेढाच दिला तर कुमक त्याची भारी पोहोंचेल. या समयीं उत्तम नाहीं. " त्याजवर इटगें येथून आठ कोसांवर आहे, तेथें रदबदल जाहली. परंतु पुढील मसलत भारी पडली याजमुळें गेला. विदित होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २२८७. (चत्र शु० ११–७ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ८ रबिलावल भोमवार मुक्काम नजीक सिदनूर दोन कोस वर्तमान यथास्थित असे. विशेष. 'पुण्यास लेखकानीं खूळ केलें म्हणून आह्मी माघारें फिरलों.' म्हणून काल तुम्हांकडे पत्रें रवाना केलीं आहेत. वृद्ध होळकराकडे शिष्टाईस गेले म्हणून पुणियाहून पत्रें आलीं. अद्याप ठरावांत गोष्ट आली असीं पत्रें कोणाचीं आलीं नाहींत. वृद्ध कोणते प्रकारावरून गेले याचाही भाव समजत नाहीं. आज उद्यांत पत्रें आलीं तर प्रकार समजेल. करवीरचाही तह उरकला. येसाजी शिंदा भेटीस येणार. तह करूं नका म्हणून नव्या खुळाकडून करवीरकरांस पत्रें येऊन पोहोंचलीं, परंतु आंत पाणी बंद जाहलें; तोफेचे मारानें घोडीं माणसें फार जायां जखमी जाहलीं; त्याजवरून तह जाहला; म्हणून पत्रें करवीराहून आलीं. खंडणी वीस लक्ष रुपयेवर उरकली म्हणून लिहिलें होतें.

---

१ लश्मेश्वरचा मामलेदार (हें पत्र लिहिणार विठ्ठल कृष्ण दातार) हा परगण्यांतलीं सारीं ठाणीं टाकून एक येळवंतीचें ठाणें धरून बसला आहे.

पैका जरब देऊन बराच घेतला. तुह्माकडून तिकडील वर्तमानाचें पत्र कांहींच येत नाहीं. रोज एक जोडी रवाना करावी. पुरंधरापावेतों डाक बसवावयाची सोय असल्यास बसवून वर्तमान ल्याहावें. तुम्ही बहुत सावध रहावें. आह्मी आज बगानूर येथें मुक्कामास येतों. धौशा-सही समागमें घेतला आहे. उद्या मध्यें मुक्काम करून कुष्टगीवरून हणमसागर डावें टाकून कमतीस येतों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे आशीर्वाद.

नं. २२८८. श्री. (चैत्र शु० १२-८ एप्रिल.)

पैा छ १७ रबिलावल. सन समान सबैन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं विनंति सेवक लक्ष्मण कृष्ण व विठ्ठल कृष्ण साा नमस्कार विज्ञापना. तागायत छ १० रबिलावल पावेतों मुकाम येळवंती येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र राजश्री गोविंदपंतमामाकडे पाठविलें छ ५ रबिलावलचें तें छ ९ रबिलावलीं तिसरे प्रहरीं पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. "पुण्याकडे नवें बंड उभें राहिलें. होळकर रुसवा करून वाफगांवास होते. त्यास राजश्री मोरोबादादा पंढरीस जातों म्हणून पुण्याहून निघोन बारामतीस जाऊन बाबूजी नाईक यांचे चिरंजीव समागमें घेऊन वाफगांवास जाऊन होळकरास मिळाले. बजाबाही गेले आणि फाल्गुन अखेरीस दहा बारा हजार फौजेनिशीं पुण्यास येऊन सरकारचा वाडासुद्धां पुण्याचा बंदोबस्त करून वानवडीवर आहेत. चिंतो विठ्ठल व जनार्दन आपाजीही त्याजकडे गेले. राजश्री बापूही नानांशीं बोलोन 'त्यांजकडे समाजाविशीस जातों' म्हणोन त्यांजकडे गेले ते अद्यापि तिकडेच आहेत. राजश्री नाना चार पांच हजार फाजेनिशीं पुरंदराखालीं आहेत. थोरले श्रीमंतांस

---

१ मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस येळवती परगणे लक्ष्मेश्वर येथून पत्र.
२ तुळसीबागवाले.

आणविलें. भोंसलेही येऊन तिकडे मिळणार म्हणोन वदंता आहे " म्हणोन लिहिलें. तें सविस्तर कळलें. ऐशास राज्यास अरिष्ट प्राप्त जाहलें ! एक विसर्जन होतें तों एक उत्पन्न होतें ! यांत ईश्वरें परिहार करावें. विना निभाव नाहीं. आह्मी स्वामींचे चरणाशीं एकनिष्ठपणें सेवा करून ठाण्याचा बंदोबस्त करून खबरदार आहों. श्रीमंत भाऊसाहेबांचीं छ ४ रबिलावलचीं पत्रें मुक्काम जडवें तुंगा दक्षिणतीर येथील आलीं तीं छ ८ रबिलावलीं सायंकाळीं पावलीं. त्यांतील वर्तमान " आजच कूच करून हयग्रीवा नदीचे पाण्यानें दुर्गास जातों. " म्हणोन लिहिलें आहे. टिपू व कुमदान कमलापुरावरच आहेत. श्रीमंतांचे फौजेची व अमित्राचे फौजेची गंगावतीचे मुक्कामीं मात्र गांठ पडोन थोडीबहुत झटपट जाहली. त्या अलीकडे गांठ पडली नाहीं. चहूंकडून वर्तमान मात्र उठलें होतें कीं, ' लढाई होऊन अमित्राचा मोड जाहला ' परंतु श्रीमंतांचे पत्रीं तें कांहीं नाहीं. व माणसानींही सांगितलें कीं, लढाई जाहली नाहीं. लष्करास पत्र जाण्याचें कठीण जाहलें आहे. आपली फौज पलीकडे, अमित्र अलीकडे जाहला. याजमुळें माणसास मार्ग फुटत नाहीं. तशांत हीं माणसें फिरोन रवाना केलीं आहेत. निभाऊन येतील तेव्हां खरीं ! खुद्द हैदरखानाचा मुक्काम कंदकलास येथून चार पांच गांवावर आहे, कोपळ तालुक्याचीं खेडीं दहा पांच मारिलीं, गजेंद्रगडपावेतों स्वारी करून किल्ल्याखालील गुरें व गांव लुटून आणिलें. आणखी पांच हजार फौज व चार तोफा गाडदी कोठें गडप जाहले आहेत. त्यांचा थांग नाहीं, कोणीकडे दगा करितील तें पहावें, मागाहून अधिकोत्तर वर्तमान येईल तें सेवेशीं लिहून पाठवितों, स्वामीचे चरणाशिवाय दुसरा आधार तिलमात्र नाहीं, सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

(चैत्र शु० १२-८ एप्रिल.)

नं. २२८९.

विठ्ठल कृष्ण दातार यांचें छ १० रबिलावलचें पत्र येळवंती परगणे लक्ष्मेश्वर येथून मिरजेस गंगाधराव गोविंद यांस—

" अमित्राचा मुक्काम कपनाळास आहे. तेथून स्वारी पाठवून कोपळचीं खेडीं त्यानें मारिलीं. एक दोन रोजांत कोपळास वेढा देणार. बहादुरबिंडयाची पेठ मारिली. बायकामुलें झाडून धरून नेलीं. पुण्याकडील बातमी या प्रांतीं फार उठली आहे. शत्रूसही वर्तमान कळलें आहे, याजमुळें फार शेर होऊन मागती उपद्रव मांडिला ! श्रीमंतांची फौज चित्रदुर्गचे अलीकडे दहा कोसांवर आहे ती माघारी फिरणार. लक्ष्मेश्वरकर देसाई यानें जमावसुद्धां गाजनुरावर स्वारी केली तेव्हां ती बातमी आम्हास कळतांच आम्ही त्याजवर चालून जाऊन त्यास मोडून उधळून लाविलें. युद्ध मोठेंच जालें. सातशें प्यादे व दोनशें स्वार आम्हाजवळ आहेत. शत्रूची फौज पांच हजार स्वार व सात आठ हजार बार व पांच तोफा याप्रमाणें इकडे आली आहे. डंबठकरांची खंडणी दीड लक्ष होन होईलसें दिसतें. शत्रूच्या फौजेस व आम्हांस सात आठ कोसांची तफावत आहे. "

श्रीगणपति.

नं. २२९०. (चैत्र शु० १५–११ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ १२ रबिलावल मंदवार मुक्काम नजीक मुद्गल वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्ही छ ७ रबिलावलचें पत्र पाठविलें तें छ ११ मिनहूस मुक्काम मजकुरीं प्रविष्ट जाहलें. पुण्याकडील गडबडीचा मजकूर व " करवीरचा तह उरकला तों फिरोन गडबडीची ओढ पाहून करवीरकरांनीं ओढून धरिलें, याजमुळें तोफा सुरू जाहल्या. चिरंजीव राजश्री आप्पा तासगांवाहून आले. तेरदाळपावेतों शिंद्याचा घांसदाण्याचा उपसर्ग लागला आहे " म्हणून लिहिले तें कळलें. तिकडील गडबडीमुळें फौजा माघाऱ्या फिरोन आल्या तों काल भृगुवारीं छ ४ रबिलावलीं राजश्री सखारामपंत व नाना व मोरोबादादा व बजाबा व होळकरांच्या भेटी जाहल्या. पर-

स्परें निखालसता जाहली. ' कर्नाटकची मसलत टाकून फौजेनें येऊं नये ' म्हणून सरकारचीं पत्रें आलीं. मोठी गोष्ट जाहली. तूर्तच्या प्रसंगीं हें उत्तम जाहलें. या उपर देशाहून मातबर सरदार व ऐवजाची बेगमी कसकसी होऊन येती, फौजेनें कोणीकडे जाऊन ठरावें, हें ठरोन सरकारचीं पत्रें येतील तो प्रकार मागाहून लेहून पाठवूं. आम्ही तुंगा उतरोन दुर्गाकडे जावयाचा प्रयत्न केला तो टाकून इकडे आलों याजमुळें मनसबा फिक्का पडला. शत्रु हांवभरी होऊन हाव. नुराहून कूच करून कोपळाजवळ तुंगा दक्षिणतीरीं हणमसागर येथें राहून अलीकडे कोपळ गजेंद्रगडपावेतों तालुका मारून खराब केला. राज्याचा भोग आला तो सुटत नाहीं. त्यांत धौशाशीं गांठ. त्याच्या सोबतीनें चार महिने रिकामे गेले. चित्रदुर्गाकडे जावें असें ठरोन पलीकडे गेलों तों देशची गडबड ऐकोन माघारे आलों. ज्या ज्या काळीं जें जें होणें तें चुकत नाहीं. त्रिवर्ग कारभारी एक जाहले; आतां येथील चिंता नाहीं; याजकरितां आमचे चित्तीं घरास यावें, देवस्थापना करावी. चिरंजीवाचें लग्नकार्य उरकून तीर्थरूप मातुश्रीस व तुह्मांस सर्वांस भेटून फिरोन येणें तर यावें असें मानस आहे. यांत श्रीसत्ता प्रमाग. तुमचे पत्राचीं उत्तरें मागाहून पाठवितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २२९१. (चैत्र शु० १५–११ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. सौरे मंडळीची भेट जाहल्याचें पत्र आल्यानंतर तुह्माकडे जोडी रवाना केली आहे त्याजवरून कळेल. सरकारचे पत्रांत लिहिलें आहे कीं,

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. २ नाना व मोरोबा या उभयपक्षांची मंडळी.

' जेथें आहां तेथेंच असावें. मागाहून लेहून पाठवूं तसें करावें ' असें लिहिलें आहे. त्याजवरून तिकडील पत्राची वाट पहात आहों. मुक्काम करून रहावें तर फौजेंत आज चार महिने रोजमुरा नाहीं. पैसा मिळत नाहीं. सावकाराजवळ रूपये घेऊन सा लक्षांच्या वराता सरकारांत दिल्या त्यांपैकीं दोन लक्ष रूपये अद्याप पावले नाहींत. सावकारांची निकड येथें गडबड पाहून लागली आहे. सावकारांचा अन्यायही नाहीं. मागील ऐवज पावला तर पुढें कोणी देईल. तो प्रकार नाहीं. लोकांनीं काय करावें ? कर्ज मिळेना, कशाचे आधारावर द्यावें अशीं संकटें. देशाहून मातबर सरदार व पैका आला तरच छावणी करून मनसबा शेवटास गेला तर न कळे. येरवीं जाण्याचा नाहीं. सोबती मिळाला त्याचें चांगलें सामान पुरें असें असोन लबाडी करून त्यानें दिवस घालविले. आतां सोबत तोडूं नये म्हटल्यास उपयोग नाहीं. सरकारचा मुलूख मारून खराब ! कामही नाहीं. आतां देशाहून तरतूद होऊन लोकांची समजूत करून फिरोन तुंगभद्रेवर जाणें तूर्तच्या प्रसंगीं गोष्ट घडावयाची नाहीं. कृष्णातीरास येऊन मोगलानें व आम्ही मिळोन आपलाच मुलूख मारून काम नाहीं. याजकरितां जानितजंग यांस निरोप देऊन आम्ही हळू हळू कृष्णातीरास दोन दिवसीं येतों. इतक्यांत सरकारचीं पत्रें कसीं येतात तेंही समजतें, त्याजसारखें राजश्री हरीपंत करितील. आम्हास तर घरास देवस्थापनेविशीं येणें जरूर, हें कालचे पत्रीं तुम्हास सूचना लिहिली आहे. त्याजप्रमाणें चिरंजीव राजश्री दादास येथें ठेऊन आम्ही यावें म्हणतों, यांत घडेल तें प्रमाण. शत्रु हंपसागर तुंगा दक्षिणतीरीं आहे म्हणोन (त्यानें) अलीकडे कोपळ, गजेंद्रगडपावेतों येऊन गांवखेडीं मारून गुरेंढोरें नेऊन बहुत खराबी केली. आम्ही त्याचे दैवानें तुंगा उतरून खामखा

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस.

जावयाचे ते देशांतले गडबडीमुळें माघारे फिरलों ! तसेंच पुढें जावें तर देशीं कसा प्रसंग पडतो न कळे; शत्रूशीं गांठ पडल्यानंतर मग येतां नये; कसा प्रसंग पडेल न कळे; असें समजोन निकाल काढून इकडे आलों. याजमुळें शत्रु शेर जाला. येथपावेतों येऊन कहीचीं तट्टें पाडून नेलीं ! आमची कही अनिवार ! फौजेसमागमें जाऊन यावयाचे नव्हेत ! चहूंकडे जावयाची संवय ! याजमुळें दगावतात. त्याची क्षीत नाहीं; परंतु शत्रूस लाभ होतो; उपाय नाहीं ! अशांत-कारभारी छावणीची तरतूद कसी करितात हें मागाहून लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

मोरोबादादाचें कारस्थान.

पूर्वार्ध.

या कारस्थानप्रकरणीं थोडीं पत्रें मागच्या प्रकरणाच्या अखेरीस आलीं आहेत. बाकीचीं आतां या प्रकरणांत छापीत आहों. या सर्व पत्रांचा सारांश आमच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें येथें द्यावयाचा, परंतु आम्ही तो "अधिकार-योगां"त सांगोपांग रीतीनें एकदां दिलाच आहे. तोच पुन्हां येथें द्यावा तर पुनरुक्ति होणार; याकरितां विशेष माहितीकरितां "अधिकार-योग" वाचण्याची शिफारस करून त्यांतल्या मुख्य मुद्यांच्या गोष्टींचें मात्र आम्ही येथें टिपण देत आहों. या कारस्थानाचे उभारणी, चलती व शेवट असे तीन भाग अधिकार-योगांत केले आहेत. पैकीं उभारणी व चलती या पूर्वार्धांत येतील. उत्तरार्धांत कारस्थानाचा शेवट कसा झाला हें वर्णन करूं.

गेलीं तीन वर्षें मोरोबाच्या समजुतीचें काम पुणें दरबारीं चालू होतें. पुरंदरच्या तहामुळें दादासाहेबांस इंग्रजांचा आश्रय होता तो नाहींसा झाला. पण त्यांस पुण्यास आणून गादीवर स्थापावें या हेतूनें हैदरअल्लीनें कर्नाटकांत लढाई सुरू ठेविली होती व त्याच्या आग्रहा वरून करवीरवासी महाराज यानींही महाराष्ट्रांत धामधूम सुरू केली होती. आणि या दोघांच्याही उत्तेजनार्थ नानाप्रकारचे बखेडे व फितर उत्पन्न करण्याच्या कामीं दादासाहेबांचे अनुयायी राज्यांत होते त्या सर्वांचा अव्याहत उद्योग चालू होता ! या अनुयायी मंडळींत मोरोबा-दादा अलीकडे प्रमुख झाले असून दादासाहेबांच्या स्थापनेकरितां त्यानीं एक मोठेंच कारस्थान मनांत आणिलें होतें. त्या संधीस पुणें-प्रांतीं होळकराखेरीज दुसरे कोणाही सरदाराची फौज नव्हती. फडके-

व पटवर्धन कर्नाटकांत गुंतून बसले व महादजी शिंदे करवीरच्या मोहिमेवर अडकून राहिले. बाजीपंतअण्णा व आपा बळवंत पुण्याच्या आसपास होते ते सुद्धां हरिपंतांस कुमक करण्याकरितां कर्नाटकच्या रोखें निघून गेले होते. ही संधि साधून मोरोबानीं आपल्या कारस्थानाचें एकदम आविष्करण करून त्याचा फारच त्वरेनें फैलाव केला. होळकराचें व मोरोबादादाचें शांतून एक सूत आहे अशी अलीकडे कित्येक दिवस जनचर्चा सुरू असतांही नानांस तिकडे विशेषसें लक्ष देतां आलें नाहीं. आणि त्यानीं लक्ष देऊन कांहीं उपयोगही नव्हता! कारण त्या दोघांचा बंदोबस्त त्या वेळीं त्यांच्या हातून होण्याजोगा नव्हता. शिवाय त्यांस ठाऊक होतें कीं, सखारामबापू जेथपर्यंत आपणास प्रतिकूल झाले नाहींत तेथपर्यंत आपणावर कोणाचें कांहीं चालणार नाहीं. परंतु खुद्द सखारामबापूच मोरोबाचा व होळकरांचा मिलाफ करून देतील इतकेंच नाहीं, तर आपणही त्यांत मिळतील ही अटकळ नानांस न झाल्यामुळें त्यांवर मोठें संकट ओढवलें! तो प्रकार येणेंप्रमाणें:—

स० १७७८ च्या मार्च महिन्याच्या प्रारंभीं नाना फडनवीस शिवरात्रीकरितां मेणवलीस गेले असतां बापूंचा मुक्काम सासवडास व मोरोबाचा मुक्काम जेजुरीस होता. त्या वेळीं मोरोबानीं आपण योजिलेला बेत बापूंस समजून दिला. त्या बेतास बापू अंशेंकरून मान्य झाले व त्यांच्याच संमतीनें मोरोबाचा व होळकराचा मिलाफ पक्का झाला. नानास ही बातमी अर्थांतच कळली नव्हती. ते मेणवलीहून परत येतांच यात्रेस जाण्याच्या मिषानें मोरोबानीं नानांचा निरोप घेतला. संशयी वर्तणुकीच्या मुत्सद्यास मुलें माणसें मागें ओलीस राहूं दिल्याखेरीज दूर परगांवीं जाण्यास निरोप मिळावयाचा नव्हे, सबब मोरोबानीं हें पंढरपूरच्या यात्रेस जाण्याचें ढोंग केलें होतें. कारण कीं, यात्रेस किंवा देवदर्शनास दूर जावयाचें तर सहकुटुंब जावें ही

वहिवाटच आहे. असो. याप्रमाणें मोरोबा नानाचा निरोप घेऊन गेले ते बारामतीस गेले. तेथें दादासाहेबांचे जांवई पांडुरंगराव बारामतीकर यांस अनुकूल करून घेऊन त्यांच्याच वाड्यांत मोरोबानीं आपलीं मुलेंमाणसें ठेविलीं आणि त्यांस बरोबर घेऊन ते वाफगांवास गेले. तेथें होळकर फौज जमवून तयार झालेच होते. व चिंतो विठ्ठल, बजाबा पुरंदरे वगैरे दादासाहेबांचे अनुयायी होळकराजवळ गोळा झालेच होते. मग ही सारी मंडळी बरोबर घेऊन होळकर व मोरोबा पुण्यावर चालून आले. त्यांबरोबर सोळा सतरा हजार फौज होती. ते येतात ही बातमी कळतांच नाना फडनवीस पुण्याहून निघाले ते पुरंदरास आले. त्या किल्ल्याखालीं त्यानीं घाईघाईनें पांच सहा हजार फौज गोळा केली; परंतु तीपैकीं सुमारें चौथाई लोक मात्र त्यांच्या विश्वासाचे होते. बाकीच्या लोकांत मोरोबाचा फितूर पसरला होता. मोरोबादादानीं पुण्यास येतांच शहर व सरकारी वाडा ताब्यांत घेतला. आणि पार्वतीबाईकडून मुतालिकीची शिक्केकटयार हा मुख्य कारभाऱ्याचा, आणि जरीपटका व नौबत हा मुख्य सरदाराचा मरातब घेतला.

नंतर दुसरे दिवशीं पुरंदरावर चालून यावें असा होळकर व मोरोबा यानीं सिद्धांत ठरविला. त्याप्रमाणें घडलें असतें तर पुरंदराखालीं नानाची व त्यांची लढाई झाली असती. त्या लढाईंत पराजित होऊन नाना किल्ल्यावर जाते तर होळकर किल्ल्यास वेढा घालून बसते. ते पळून महादजी शिंद्याकडे अथवा कर्नाटकांत फडके–पटवर्धनांकडे जाण्याचा यत्न करिते तरी सुद्धां होळकरानीं त्यांस धरिलेंच असतें. कदाचित् ते निसटून जाते तरीसुद्धां राज्यांत उघडपणें दुही झाल्यामुळें पूर्वसंकल्पाप्रमाणें मोरोबानीं दादासाहेब व इंग्रज यांस पुण्यास आणिलें असतें. दादासाहेब पुण्यास येतांच झोंटिंगपाच्छाईस खरोखरीचीच सुरूवात झाली असती ! ही अनर्थपरंपरा होऊं द्यावी कीं होऊं देण्याचें तूर्त टाळावें हें नानानीं ठरवावयाचें होतें ! अशा

त्या आणीबाणीच्या वेळीं सखारामबापूनीं होळकर, मोरोबा वगैरे मंडळीशीं समेट करून घेण्याचा सल्ला नानांस दिला व त्यानींही तो वर सांगितलेली अनर्थपरंपरा ध्यानांत आणून मान्य केला. नंतर बापूनीं मध्यस्थ होऊन मोरोबाशीं करार ठरविला कीं, वडीलकीचा मान व मुख्य कारभाऱ्याचा अधिकार आपणाकडे आहे तो तसाच यापुढेंही रहावा. अखत्यारीचा कारभार आजपर्यंत नाना करीत होते तो यापुढें आतां मोरोबानीं करावा; पण नानाच्या संमतीखेरीज त्यानीं वागूं नये. श्रीमंत दादासाहेबांस तूर्त आणूं नये. याप्रमाणें करार होऊन उभयपक्षांचा समेट झाल्यासारखा दिसला. होळकर पुरंदराशेजारीं करा नदीवर फौजेसह येऊन राहिले. अखत्यारीचा सर्व कारभार मोरोबादादा चालवूं लागले. पुरंदरचा किल्ला व श्रीमंत पेशवे यांच्या संरक्षणाचें काम नानाकडेच राहिलें. मख्य कारभार पूर्वीप्रमाणें बापू करीतच होत.

हें सारें ठीक झालें. परंतु याच्यायोगानें नानाच्या मनास स्वस्थता यावी ती न येतां तें चिंताक्रांत होण्यास अधिकाधिक कारणें उद्भवत गेलीं. मोरोबा व त्याची साथीदार मंडळी यांचा बेत आपणास पक्केपणें बुडविण्याचा व दादासाहेबांस पुण्यास आणण्याचा आहे अशी त्यांची खात्री झाली. त्यानीं करवीरची मोहीम तशीच ठेवून ताबडतोब पुण्यास निघून येण्याविषयीं महादजी शिंद्यांस प्रथम पत्रें लिहिलीं होतीं, परंतु शिंदे तर करवीरास वेढा घालून बसले होते. करवीरकर महाराज तर मोरोबाच्या चिथावणीमुळें तह करण्यास कबूल होईनात. असें असतां शिंद्यांची कोल्हापुराहून सुटका कशी होणार ? हें एका अर्थीं नानाच्या मतें बरेंच होत होतें. कारण शिंदे पुण्यास येते तर मुंबईहून इंग्रज व दादासाहेब यांस मोरोबाही तत्काळ आणविते. कसेंतरी करून दोन महिने ढकलावे, पावसाळा एकदां सुरू झाला म्हणजे दादासाहेबांस घेऊन

पलटणें व तोफांसुद्धां इंग्रजांस मुंबईहून पुण्यास येणें चार महिने अशक्य होईल. त्या संधींत दक्षिणेकडून फडके, पटवर्धन व शिंदे यांच्या फौजा आणून होळकर व मोरोबा वगैर बखेडखोरांचा बंदोबस्त करावा अशी नानानीं मसलत योजिली होती.

हरिपंत व परशुरामभाऊ हे आपापल्या फौजांसह कर्नाटकच्या मोहिमेवर गुंतले होते त्यांस पुण्यास झालेली गडबड नानांन्या पत्रावरून समजली तेव्हां ते उभयतां सरदार नानाच्या बोलावण्याची वाट न पहातां कर्नाटकची मोहीम तशीच टाकून परत फिरले होते हें मागच्या प्रकरणीं आलेंच आहे. त्यानीं पुण्याकडे येण्याची तांतड करूं नये म्हणून त्यांस पुण्याहून, मिरजेहून व कोल्हापुराहून महादजी शिंद्यांकडून वारंवार इशारा जात होता. त्यांच्या फौजेंत मोरोबानीं नरसिंगराव धायगुडे या सरदाराच्यामार्फत फितूर केला असल्यामुळें हजारों शिलेदार आपापल्या सरदारांस न विचारतांच घरोघर निघून गेले होते. बाकी राहिले होते त्यांनीं पगाराची बाकी चुकविण्यासाठीं सक्तीचा तगादा बसवून त्या उभयतां सरदारांस हैराण केलें होतें. तुंगभद्रेपलीकडे लष्कर असतां हरीपंत व परशुरामभाऊ यांस पुण्याहून त्रिवर्ग कारभाऱ्यांचें पत्र गेलें होतें, त्यांत आम्ही आपसांत समजलों, आमचें भांडण नाहीं, तुम्ही मोहीम टाकून येऊं नये, तुम्हांस पैक्याचा व फौजेचा पुरवठा करितों, असें लिहून आलें होतें. परंतु त्यावर विश्वास न बसल्यामुळें हरिपंत व परशुरामभाऊ परत निघाले ते धौशास आपले मुलखास जाण्याकरितां निरोप देऊन विजापूर जिल्ह्यांत कृष्णातीरीं गलगलें येथें येऊन राहिले होते. त्या ठिकाणीं त्यांचे दहा बारा मुक्काम झाले. बहुतेक लोक उठून गेल्यामुळें आतां त्यांजवळ फक्त बारा तेरा हजार फौज राहिली होती. त्यांस पुढें न येण्याविषयीं पुण्याहून वगैरे सूचना गेल्या-

मुळें ते एप्रिल अखेरीस पंढरपुराकडे गेले. परंतु त्यांचें सारें लक्ष पुण्यास काय काय चाललें होतें तिकडे वेधून राहिलें होतें.

फडके व पटवर्धन यांचे मनांत प्रथम कोल्हापुरास जाऊन महादजी शिंद्यांस मिळावयाचें होतें. परंतु तसें केल्यास मोरोबा व त्याची मंडळी बिथरून भलतीकडे भडकेल अशी सूचना त्यांस गेल्यावरून तोही त्यांनीं नाद सोडिला. त्यांची ती पोटासाठीं हपापलेली फौज संभाळण्याचें काम फार कठिण होतें. कारण कीं, पुण्यास तीन कारभारी होते त्यांपैकीं जो तीस आधीं द्रव्य देईल त्यास ती अनुकूल होणार हें उघडच होतें. तात्या व भाऊ यांचे मनांत नानानीं द्रव्य पाठवून ही फौज आपलीशी करून घ्यावी असें फार होतें. त्याप्रमाणें नानानीं त्यांकडे द्रव्य पाठवून ती त्यांची फौज आपले लगामीं पक्केपणें लावून घेतली. परंतु मोरोबा, सखारामबापू, इंग्रज व दादासाहेब या सर्वांचे व्यूह विसकटून त्यांस चूप बसविण्याकरितां नानानीं जी वर सांगितलेली मसलत योजिली होती ती तडीस नेण्यास हरीपंत व परशुरामभाऊ यांची ती वर्षभर हलाखी खाऊन देशीं आलेली तेरा हजार फौज केवळ असमर्थ होती. याकरितां नानानीं आपल्या मसलतीचा सर्व भार महादजी शिंद्यांवर टाकिला होता व शिंद्यानींही नानाचें कारस्थान पार पाडण्याचें वचन दिलें होतें. करवीरकरांशीं तह करावयाचा त्याचीं कलमें उभयपक्षीं मंजूर होऊन सुद्धां केवळ मोरोबादादाच्या उत्तेजनावरून करवीकर महाराजानीं आठ पंधरा दिवस चाळवाचाळव चालविली होती. पण शिंद्यानीं पुण्याहून महाकाळी तोफ नेली होती तिच्या भडिमारामुळें कोल्हापूर शहर अगदीं जेरीस आलें होतें. त्यामुळें आतां महाराजांस तह करण्याखेरीज गत्यंतरच राहिलें नव्हतें.

शे. १७०० मोरोबादादाचें कारस्थान इं. स. १७७८

नं. २२९२. श्री. (चैत्र शु० १२–८ एप्रिल.)

सेवशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागा चैत्र शु० १२ बुधवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्र जासुदाबरोबर पाठविलें तें मंगळवेढयाहून निघालों त्या दिवशीं पावलें. छ ३ रबिलावलचें मंगळवेढयाहून श्रीमंत बापूंनीं पाठविलें तें काल दोन प्रहरीं पावोन लिहिला मजकूर कळला. आपणास पुण्याहून पत्रें कोणाकोणाचीं गेलीं त्यांतील भाव लिहिला व करवीरकरांकडील व शिंद्यांचा प्रकार व ठराव जाहल्याचें लिहिलें तें सविस्तर कळलें. आम्ही मंगळवेढयाहून निघालों ते नीट वाटेनें यावें तरी मार्गीं चौक्या बारामतीच्या आसपास. वाट बंद. राजश्री हरीपंततात्याकडील सांडणीस्वार कैद केले. आम्ही तिकडून यावें तरी ठीक नाहीं. याजकरितां फलटणावरून शिरोळावरून किल्ला उजवा घालून श्रीमंत राजश्री नानाजवळ आलों. भेटी जाहली. त्याणीं सविस्तर जाहलें वर्तमान सांगितलें. आम्हास म्हटलें कीं, ' अशा प्रसंगांत नव्हतां ! ' आम्हीं विनंति केली कीं, " आपण आह्मास निरोप दिला. मास पक्ष लागेल असें आम्ही म्हटल्यावर आपण ' उत्तम ' ह्मटलें व हें वृत्त कळतांच राहतों तरी रागें भरावें. राजश्री आंपांच्या लष्करांत गेलों तेव्हां कळतांच मंगळवेढयावरून मात्र आलों. आम्ही समयास नव्हतों. प्रमाण. " ह्मणोन विनंति केली. ' डेऱ्याजवळच राहुटी देतों ' ह्मणोन सांगितलें. तेव्हां बोलिले कीं ' राजश्री बापू भिवडीस आहेत. पहिल्यापासून तुमचें राहणें भिवडीस असतां आतां येथें राहिल्यास

---

१ पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस. २ नजीक पुरंदर. ३ मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन यांनीं. ४ पुरंदर. ५ आपा बळवंत.

चांगलें नाहीं. तुम्ही भिवडीस रहावें ' म्हणोन सांगितलें. तेव्हां निरोप घेतला. भिवडीस आलों. श्रीमंत राजश्री बळवंतरावदादा खालीं आले होते. भेटी जाहली. सविस्तर त्याणीं सांगितलें. आपणाकडे पत्रें पाठविलीं म्हणोन सांगितलें. आम्ही येथें येतांच बापूंच्या भेटीस गेलों. भेटी होऊन दोन घटका बोलणें जाहलें. त्यांतील सर्व अर्थ जागाजागांच्या चौक्या उठल्या म्हणजे लिहून पाठवूं. राजश्री मोरोबादादाच्या समजुतीचें तीन वर्षें होत आहे. राजकारणहीं चालत होतें, परंतु साधलें नाहीं. होळकराकडे राजकारण त्यानीं केलें. त्यांस अनुकूल करणारानीं करून दिल्हें. तेव्हां होळकरानीं ' खर्चास नाहीं ' म्हटलें. ' पांच लक्ष रुपये कर्ज द्यावें तरी फौज जमा करितों ' म्हणोन सांगितलें. पांच लाख कर्ज म्हणोन राजश्री मोरोबादादानीं दिल्हे. राजश्री रघुपतराव नारायण यांस पन्नास हजार रुपये खर्चास दिल्हे. चहूंकडे फौजेचीं साधनें करून ठेविलीं. राजश्री पांडुरंग बाबूराव बारामतीकर अनुकूल करून घेऊन मुलेंमाणसें तेथें ठेऊन वाफगांवास जावयास गेले. नातुरास राजश्री बजाबाची भेटी जाहली. राजश्री रघुपतराव नारायण चार हजार फौज घेऊन राजश्री मोरोबादादास न्यावयास भीमेवर येऊन घेऊन गले. वाफगांवीं (होळकराच्या वगैरे) भेटी जाहल्या. चिंतो विठ्ठल व बाळाजीपंत दामले त्याच दिवशीं पुण्याहून पळोन वाफगावांस गेले. त्याच दिवशीं राजश्री नाना पुण्याहून आले. किल्ल्यावर जाऊन तेथील बंदोबस्त करून स्त्री किल्ल्यावर ठेऊन खालीं फौजेंत आले. राजश्री बापूही आले. बोलणें चालणें जाहलें तों होळकर वगैरे फौज बारा पंधरा हजार पुण्यावर चालून आली. पुढें कांहीं राऊत पाठवून वाडयाचा बंदोबस्त केला. गाडदी नानाकडील वाडयांत होते ते काढिले आणि आपणाकडील ठेविले. शहरांत ताकीद केली. बंदोबस्त जाहला. तदनंतर वाडयांत जाऊन मातुश्री पार्वतीबाईंची भेट

घेतली. राजश्री जनार्दने अप्पाजीकडील शिक्केकटार आणविली. ती घेतली. जरीपटका व हत्तीवरील नौबद घेतली. मागाहून होळकर आले त्यांस वस्त्रें बाईकडून देविलीं आणि पुण्याजवळ राहिले. आणि दुसरे दिवशीं पुरंधरास चालोन यावेंसा मनसबा ठरला. इकडून राजश्री नानांचा व बापूंचा विचार ठरला. " आह्मी थोडके. ते भारी. राजश्री हरीपंत व पटवर्धन लांब. शिंदे शहास गुंतले. लढाई करावी तरी ते आह्मांस घेरतील. किल्ल्यावरी गेल्यास फौज लुटली जाईल. किल्ल्याखालीं बसतील. खूळच जाहल्यावर श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आणतील. याजकरितां भेटावें हें चांगलें दिसतें. " म्हणोन बापू बोलतांच राजश्री नाना बोलले, " या कामांत तुमच्या विश्वासावरून आलों. तोच विश्वास तुमच्या ठायीं आहे. " तेव्हां राजश्री बापू कृष्णराव[1] व माधवराव सदाशिव[2] यांस घेऊन कवडीच्या मुक्कामास गेले. भेटी जाहल्या. " विवेक करावा. नाश दुतर्फा लढोन आहे. " म्हणोन सांगितलें. आणि तहाची यादी केली. " आपणाकडे वडीलपण आहे, ' द्यावें ' करितों, त्याप्रमाणें आह्मी करावें. काम-कारभार राजश्री मोरोबादादानीं येकत्यारीचा करावा. राजश्री नानाचा इतल्ला सर्व काम-काजांत असावा. देशस्थ कोंकणस्थ सुद्धां एकरूप. द्वेष करूं नये. कामकाजावर माणूस लोक यांस वाढवावें. " राजश्री बजाबा व चिंतो विठ्ठल यांचें कांहीं ठरावांत आलें नाहीं. " श्रीमंत राजश्री दादासाहेबांस तूर्त आणूं नये. पुढें विचार पाहोन आणले तरी आणावे. ' येणेंप्रमाणें ठरोन सासवडास आले. ठरावाचें वर्तमान सर्वांस इकडे व तिकडे कळे तों मोठी गडबड जाहली होती. सर्वांस समजल्यावरी स्वस्थ जाहले. तदनंतर होळकराचे भेटीचा प्रकार—राजश्री नाना भिवडीजवळ आले. राजश्री मोरोबादादा आले. भेटी जाहल्या. होळ-

---

१ तुळशीबागवाले. २ काळे बारामतीकर. ३ उपनांव जाधवराव.

करांचे भेटीस पुढें बागेंत घेऊन गेले. तिकडून होळकर आले. भेटी जाहल्या. दुसरे दिवशीं राजश्री मोरोबादादा व बजाबा व चिंतो विठ्ठल व नाना किल्ल्यावर श्रीमंतांच्या भेटीस गेले. भेटी घेऊन श्रीमंतांस खालीं किल्ल्याच्या कमरग्यांत चौक्या आहेत तेथें घेऊन आले. होळकर तेथें येऊन उभाउभी भेटी जाहल्या. श्रीमंत किल्ल्यावर गेले. होळकर गोटास गेले. राजश्री आपा बळवंत आल्यावर होळकरांस संशय जाहला. कुंभारवळणाजवळ होते ते राजश्री मोरोबादादासुद्धां सासवडच्या व कोडीताच्या मध्यें येऊन कऱ्हेच्या पाण्यावर राहिले. राजश्री नाना किल्ल्याखालीं नारायणाजवळ आहेत. राजश्री बापू भिवडीस आमचे शेजारीं आहेत. राजश्री नानाजवळ फौज बरीच जमली; परंतु फितुरी फारच. भरंवसा न पुरे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२९३. श्री. (चैत्र शु० १२–८ एप्रिल.)

विज्ञापना. फौजेंत फितूर. किल्ल्यावर जावें तरी तेंही ठीक नाहीं. फौज लुटली जाईल. निघोन शिंदे आहेत तिकडेच यावें तरी श्रीमंतांस टाकून जातां नये. याजकरितां नानानीं विवेक करून घेतला. नाहीं तरी खूळ भारी होतें. श्रीमंत राजश्री दादांस मोरोबा वगैरे आणणार होते याजकरितां राजश्री बापूनीं कारस्थानीं केली याजवरच मान्य जाहले. दूरदेशीं चित्तांत आणून आपल्यासाठीं राज्याचा नाश व्हावा हें चांगलें नव्हेसें ध्यानांत आणून केलें. दप्तरें मोरोबादादाकडे कारकूनसुद्धां गेलीं. काम कारभार चालीस लागला. जितके फितुरांत होते त्यांचें शीड उभारलें आहे ! मामलती व कोट किल्ल्याच्या घाल-मेली होणार. शिवनेर व दीडहजार फौजेचा सरंजाम राजश्री मोरोबा-दादास द्यावासा पहिलाच करार ठरला आहे त्याप्रमाणें घेणार.

---

१ पत्र भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधररावांस.

राजश्री बापूंचे कारस्थानीस जोडा नाहीं ! मागाहून सावकाशीनें लेहून पाठवूं. आम्ही राजश्री नानांचे विचारें राजश्री मोरोबादादाचे भेटीस जाऊं. मोठेंच खूळ होयसें होतें, परंतु वाईटास बरें ! भलतेसें या समयीं या वेळेस निवारण खुळाचें जाहलें. संशय सर्वत्रांचे आहेत. आपल्या वस्त्राचा देखील विश्वास नाहीं ! या पत्राच्या नकला करून श्रीमंत राजश्री भाऊंकडे पाठवाव्या. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपति.

नं. २२९४. (चैत्र शु० १३–९ एप्रिल.)

आशीर्वाद उपरी. जाबितजंग यांस निरोप दिला. कृष्णेवरून ते फुटोन जातील. सरकारांतून पैसा लोकांस पावत नाहीं, तेव्हां येथें राहून परिणाम नाहीं. याजकरितां करवीरापावेतों यावें, राजश्री महादजी शिंदे यांची भेट घ्यावी, त्याचे विचारें पुढील कर्तव्य. आम्हास देवस्थापनेविशीं जरूर घरास यावयाचें. अनायासें जवळ आलों. चिरंजीव राजश्री दादास[1] येथें ठेऊन जवळ आलों म्हणजे आम्ही मिरजेस येऊनच तासगांवास जाऊं. खर्चावेंचाचा मजकूर तर पत कोठें राहिली नाहीं. पुढें परिणामही नाहीं. यांत श्रीगजाननानें लज्जा रक्षावी ! नहोन दुसरें नाहीं. कारभारी आपापल्यांतच पाय तुडवितात ! ! ! फौजेची फिकीर व शत्रु बळावला ही फिकीर कोणास नाहीं ! ! ! याजमुळें देशास येणें प्राप्त जाहल. शत्रूचें दैव अनुकूल तसें घडत जातें ! लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २२९५. (चैत्र शु० १३–९ एप्रिल.)

छ १० रबिलावलचें पत्र परशुरामभाऊंचें मुक्काम मोसकी येथून मिरजेस गंगाधरराव यांस—

" पुण्याकडील गडबड ऐकल्यानंतर तुम्हांकडे दोन चार पत्रें

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव यांस. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर,

रवाना केलीं आहेत त्यावरून सर्व कळलें असेल. बारा तेरा दिवस फिरून वर्तमान कोणाचेंही आलें नाहीं. तुमचें पत्र यावें तेंही आलें नाहीं, त्यावरून चिंता वाटती. येथें सावकारांजवळ ऐवज घेऊन पुणियास वराता दिल्या त्यांचा अद्यापि ऐवज पावला नाहीं; त्यांत ही गडबड; यामुळें पैसा कोणी देत नाहीं. आम्ही माघारें फिरल्याचें वर्तमान ऐकून शत्रु सावनुराहून कूच करून हंपसागर तुंगा दक्षिणतीर येथें आला. त्याची फौज अलीकडे कोपळाजवळ आली आहे. जालेहाळ गजेंद्रगडपावेतों बेदडे स्वारी करून गेले म्हणून कालच पत्रें आलीं. आम्ही आज मुद्गलानजीक मुक्कामास गेलों. उद्यां मध्यें मुक्काम करून परवां कृष्णातीरास येतों तोंपावेतों सारें समजेल तसें करूं. कृष्णातीरास गेल्यावरही फौज राहत नाहीं. सर्व उठोन जात तोंपावेतों आम्हांसही जातां येत नाहीं. मग आम्ही व राजश्री हरीपंततात्या मिळोन अथणीच्या सुमारें येतों. जंगही तिकडील वर्तमान कळेतों बरोबर आहेत. मग वर्तमान येईल त्यासारखे जातील. "

नं. २२९६. श्री. (११ एप्रिल.)

पैा छ १९ रबिलावल. सन समान सबैन. चैत्रमास.

सेवेशीं शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ताा चैत्र शुद्ध १५ मंदवासरे मुक्काम भिवडी यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आम्ही आल्यानंतर मुजरद जासुदाबरोबर पत्र लिहून पाठविलें आहे. तीं पत्रें पावलींच असतील. अलीकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री नानास विनंति करून आज्ञा घेऊन राजश्री मोरोबादादाचे भेटीस गेलों होतों. भेटी जाहली. बोलणें चालणें जाहलें. घराऊ रीतीनें

---

१ पुण्याकडील. २ पत्र मिरजेस गंगाधरराव यांस.

श्रीमंत कैलासवासी तात्यांचें वर्तमान पुसिलें, श्रीमंत राजश्री भाऊंकडील लष्करचें वगैरे वर्तमान पुसत होते. उत्तर प्रतिउत्तर केलें. दोन घटका बसोन आलों. श्रीमंत राजश्री नानासही जाहलें वर्तमान श्रवण केलें. तदनंतर काल राजश्री मोरोबादादानीं एक दोन वेळां बोलावूं पाठविलें त्याजवरून गेलों. तें बोलिले कीं "श्रीमंतांचे पायाशीं एकनिष्ठता पटवर्धन यांची आहे. त्यांत गुंता नाहीं. आम्ही कार्यभाग श्रीमंत राजश्री माधवरावसाहेबांच्या दौलतीचा करितों. त्यापक्षीं दुसरा विचार राहिला नाहीं. तुम्ही संशय कोणेविशीं धरूं नये. मिरजेस व लष्करांत पत्रें खातरजमेचीं पाठवावीं. आम्ही लष्करांत श्रीमंत राजश्री भाऊंस पत्रें लिहितों व मिरजेस पत्र व कारकून तात्यांचें वर्तमान कळलें याजकरितां समाधानासाठीं पाठवितों." म्हणोन म्हणत होते. जाहला कारभार यासाठीं तर गुंता नाहीं. श्रीमंत राजश्री नानाच्या इतल्याखेरीज (याणीं कांहीं) करूं नये असें ठरलेंच आहे. 'देवावें' नाना करीत होते तें कोणीच करूं नये. 'द्यावें' मात्र बापूनीं करावें. अकत्यारीचा कारभार राजश्री मोरोबादादानीं नानांच्या इतल्यानें करावा, येणेंप्रमाणें ठराव जाहला आहे; तेव्हां घडी बसावयाचा गुंता नाहीं. परंतु श्रीमंत राा दादासाहेबांस आणावें हा पहिला मनसबा जाहलाच होता. इकडील कलह लांबला नाहीं, समेट लौकर जाहला; तेव्हां "सारे एकत्र जाहले. आतां बंदोबस्त करावा. त्यांस आणूं नये;" असें लौकिकांत ठरलें आहे. परंतु दादासाहेबांस आणावें हें अंतःकरणापासून आहे. तेव्हां मसलत काय केली आहे कीं दादासाहेबांस तयारीविशीं लिहिलें होतें—त्याजवरून तयार जाहलेच आहेत. आतां त्यांस न येण्याविशीं पत्रें उघड पाठविलीं आहेत. आंतील भाव त्यानीं यावेंसें आहे, तेव्हां पत्रें आंतून जात असतील. "पहिल्या तयारीवरूनच इंग्रज त्यांस घेऊन आल्यास इलाज नाहीं. काय करावें ?" असें म्हणतात, तेव्हां

---

१ पांडुरंगरावतात्या पटवर्धन श्रीरंगपट्टणांत कैदेंत वारले त्यांचें.

भरंवसा पुरत नाहीं ! आणतील असा भाव दिसतो. ते आल्यावर विचार कळतच आहे ! चैत्र वद्य तृतीयेचा व दशमीचा मुहूर्त श्रीमंत दादासाहेबांनीं मुंबईहून निघावयाचा पाहिला आहे. इंग्रजांचीं चार पलटणें व सतरा तोफा येणेंप्रमाणें सरंजाम त्यांजजवळ तयार आहे म्हणून बातमी जाहे. मागाहून होईल वर्तमान तें लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२९७. श्री. (चैत्र शु० १५–११ एप्रिल.)

विज्ञापना. पहिल्या राजकारणांत श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आणावेसें होतें त्याजवरून त्यांकडे पत्रें गेलीं होतीं. आतां मसलत आटपली, सबब त्यांस न आणावें म्हणतात. त्यानीं तरी यावयाची तयारी केली म्हणोन बातमी आली; याजकारितां न येण्याविशीं सांगोन कारकुनास मुंबईस पाठविणार. काल त्रिवर्ग राजश्री बापूपाशींच राजश्री नाना व राजश्री मोरोबादादा आले होते. त्रिवर्गांनीं मिळून कारभार करावा म्हणतात. नानाचें चित्त प्रशस्त नाहीं: कळावें. चार जासूद जोड्या पाठवाव्या. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २२९८. श्री. (चैत्र व० ३–१३ एप्रिल.)

सेवेशीं[3] गोविंद त्रिमळ चिकोडीकर मुक्काम लष्कर दर जागा करवीर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम तागायत छ १५ माहे रबिलावल रोज सोमवार, पहिला प्रहर, पावेतों आपले दयेकडून वर्तमान यथास्थित असे. यानंतर आज सोमवारीं प्रातःकाळीं राजश्री बाळाराऊ दिवाण[4] मलकापुरास राजश्री प्रतिनिधीचे भेटी-करितां गेले. विशाळगडाहून राजश्री प्रतिनिधी येणार. मलकापुरीं भेट उभयतांची जाहलेवरी मग उभयतां मिळून राा पाटीलबावांचे

---

१ पत्र शिवाजी बाबाजीचें पुरंदराहून मिरजेस गंगाधररावांस. २ मोरोबादादा म्हणतात. ३ मिरजेहून पायदळ व तोफा घेऊन करवीरास महादजी शिंद्याकडे चाकरीस गेलेल्या सरदाराचें हें नांव. त्याचें मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र. ४ महादजी शिंद्यांचे दिवाण.

भेटीस येणार. राजश्री पाटीलबावांची भेट जाहलेनंतर मग पैकेचा निकाल पडलेवरी मग लष्कर कूच करावें; कृष्णेवरी जाऊन उतरावें; दहा लक्षांची निशा साडुकारी करून द्यावी; येणेंप्रमाणें करार जाहला आहे. बंदिवान राजश्री वीरपाण्णा[1] चिकोडीकर व राजश्री जिवाजी[2] गोपाळ—तमाम बंदिवान जितके होते त्यांस विशाळगडास नेलें. सारें बोलणें चालणें तेथें जाहलें आहे. मुख्य गोष्टी पैकेची निकाल पडावी. विदित होय. दर्यावर्दीचे खर्चास नाहीं म्हणून आणखी दहा रूपये राजश्री शंकराजीपंतानीं घेतले. एकून त्यांस एकशें दहा पावले. ...[3] ..... येथील मसलत आणखी अमावास्यापावेतों आहे. तूर्त लोकांस तोफेस निरोप होणें दिसत नाहीं. विदित होय हे विनंति.

नं. २२९९. **श्री.** (१४ एप्रिल.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना• येथील क्षेम ताा चैत्र वद्य तृतीया भौमवारपावेतों मुक्काम भिवडी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ ८ रबिलावलचें पत्र पाठविलें तें छ ११ मिनहून पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. आह्मांस पुरंधरास येऊन आज आठ दिवस जाहले. श्रीमंत राजश्री नानांची व मोरोबादादांची भेट घेतली. दादांचीं आमचीं घरोब्याचीं बोलणीं जाहल्याचा मजकूर पेशजीचें पत्रीं लिहिलाच आहे, त्याजवरून कळेल. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांची समजूत करून आणावे या अर्थें राजश्री गोपाळ नाईक तांबवेकर व मुष्टीम[4] असे

---

१ विरूपाक्ष शामजी चिकोडीकर. यांस करवीरकरानीं सन १७७६ च्या जानेवारींत चिकोडीहून धरून नेलें होतें. (पहा ऐ. ले. सं. नं. १७६५). २ हे कोन्हेरराव व करवीरकर यांमधल्या एका लढाईंत करवीरकराकडे पाडाव सांपडले होते. (पहा ऐ. ले. सं. नं. १७७६). ३ टिंबें दिलेल्या ठिकाणचा मजकूर निरुपयोगी सबब गाळला आहे. ४ पत्र गंगाधरराव यांस मिरजेस. ५ मुंबईकर इंग्रजांचा पुणें दरबारीं असलेला वकील मि. मॉस्टिन. याच नांवाचीं 'मुष्टीम' व 'माष्टीम' हीं दोन्हीं अपभ्रष्ट रूपें शिवाजीपंताच्या लिहिण्यांत आहेत.

मुंबईस जातात. तेथें गेल्यावरी समजूत होऊन येतील किंवा काय होईल पहावें. मार्गीं चौक्या बहुत आहेत. कागदपत्र पाठवाल ते सोईनें पाठवावे. विस्तारें मागाहून लिहून पाठवूं. जिवाजी तोंडजबानी सांगतां कळों येईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३००. श्री. (चैत्र व० ३–१४ एप्रिल.)

सेवेशीं विज्ञापना. राजकारणाचा प्रकार आपणास कळावा, त्यास सुरक्षितपणें पत्रें पावणार नाहींत याजकरितां संकलित मजकूर लिहीत गेलों. राजकारणाचा विषय ह्मणावा तर राजश्री नाना सोभ-त्यांचा विश्वासावर गेले; कीं ते आम्ही एक असतां भलता प्रकार करितील ही गोष्ट होणार नाहीं. असें समजोन स्वस्थ होते. राजश्री मोरोबादादाची समजावीस होत होती त्यासमयीं वृद्धाकडील आप्तानीं सांगितलें कीं, " समजूत जाहल्यास भाऊ भाऊ एक होतील आणि तुम्हांस पटकी देतील. " असें दोन तीन त्यांच्या मायेचे होते त्याणीं समजाविलें. त्यांचें व राजश्री नानांचें नीट नव्हतें. वृद्धानीं छान करावी तर सोबत्यास शपथ पदोपदीं दिली असतां ती गोष्ट न केली. आणि आंतून सूत्रें होळकर व नारो गणेश व रघुपतराव नारायण व बजाबा, चिंतो विठ्ठल याप्रमाणें सूत्रें खेळवून मकारनामकाची गांठ वृद्धानीं घेतली. नकारनामक मेणोलीस गेले होते ते समयीं वृद्ध सास-वडाहून मध्यें गेले. मकारनामक तिकडून आले. बोलणें चालणें आण-शपथा जाहल्या. मेणोलीहून हे येतांच त्याणीं सांगितलें कीं " शिमग्याचा महिना आहे. पंढरपुरास जाऊन येतों. वर्षप्रतिपदेस भेटी होतील. " असें सांगोन कूच करून बारामतीस गेले. तों गाडदी औरंगाबादेहून येत होते ते मारिले. तेव्हां त्यांसं सुचें वृद्धांनीं केलें

---

१ पत्र भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधरराव यांस. २ सखारामबापूच्या. ३ सखारामबापूकडील. ४ मोरोबादादाची. ५ नाना फडनवीस. ६ मोरोबास.

कीं, ' आतां त्वरा करावी. मंत्र फुटला. ' त्याजवरून ते जलदी करून वाफगांवास गेले. नातुरास बजाबा होते त्यांस समागमें घेतलें. रघुपतराव नारायण होळकराची फौज घेऊन न्यावयास भीमातीरास आले होते. वाफगांवास जातांच भेटी जाल्या. दुसरे दिवशीं कूच केलें. श्रीमंत राजश्री नाना पुण्याहून किल्ल्याखालीं आले. वृद्ध सासवडास होते तेथेंच गेले. त्यांचें बोलणें चालणें संकेतावरून होऊं लागलें कीं " ते फार. आम्ही थोडके. शिंदे समयास येत नाहींत. राजश्री कृष्णराव बळवंतही समयास येत नाहींत. झुंजल्यास परिणाम नाहीं. किल्ल्यावरी जावें तरी ते आमची फौज लुटतील. राजश्री दादासाहेबांस आणितील. किल्ल्याखालीं बसतील. तेव्हां काय ? किल्ल्यावर जावें म्हणत असल्यास आम्ही सिद्ध. निघोन जात असल्यासही सिद्ध आहों. परंतु ही मसलत किल्ल्यास पावों देणार नाहीं. त्यांस भेटावें हेंच चांगल दिसतें. असेंच पाहतां नानास नानाचें पथक मात्र आपलें. वरकड कांहीं राहिलें नाहीं ! तेव्हां बोलिले कीं, आमचा विश्वास तुमचे ठायीं पहिल्यापासूनच आहे. चांगलें दिसेल तें करावें. तेव्हां भेटीस जावेंसा सिद्धांत करून बापू गेले. कवडीवर भेटी जाहल्या. मोरोबानीं पुण्यास आल्यावरी शहरची रखवाली केली. श्रीमंत सौ[1] बाईंची भेट घेतली. शिक्के कटार जनार्दन अप्पाजीकडील आणून घेतली. जरीपटका व हत्तीवरील नौबत बाईपासून घेतली. आणि कवडीस आले. तों वृद्ध गेलेच होते. खुणेच्याच गोष्टी होत्या. यादी लिहिली कीं, " सखारामपंतानीं ' द्यावें ' करावें. वडीलपण आहे तसेंच त्यांजकडे असावें. त्यांस पुसिल्याशिवाय काम कारभार मोरोबानीं करूं नये. एकत्यारी मोरोबादादानीं करावी. नानास संमतांत घ्यावें. ' देवावें ' नानानीं करूं नये. सर्वांचें चालवावें. कोंकणस्थ देशस्थ हें चित्तीं आणूं नये. " येणेंप्रमाणें यादी करून घेतली आणि कूच करून सासवडास गेले.

१ पार्वतीबाई.

भेटी जाहल्या.[1] किल्ल्यावरी राजश्री मोरोबादादा, बजाबा, चिंतो विठ्ठल व नाना येणेंप्रमाणें श्रीमंतांस नजर करून भेटले. दुसरे दिवशीं श्रीमंत खालीं आले. होळकरांच्या भेटी जाहल्या. स्वस्थ जाहलें. तदनंतर राजश्री आपा बळवंत आल्यावर संशय जाहला. आणाशपथा पूर्वीच जाहल्या होत्या. तेव्हां यांणीं सांगितलें कीं, शपथ दिली. आतां संशयाचें प्रयोजन नाहीं. राजश्री आपा किकवीजवळ राहिले होते. आग्रहेंकरून आपणाजवळ आणिले आणि लोकांस निरोप देविला. निरोप देतात. राजश्री रामचंद्र गणेश यांचा जरीपटका व नौबद मोरोबानीं आणविली. त्याणीं आणून दिली. व आपल्या लोकांस निरोप दिला. यांजकडील[2] फौजेस तमाम निरोप देवितात. 'शिलक बाकी हिशेब' समजावणें म्हणतात. नाना प्रकारच्या नाकांत काड्या घालितात ! नारायणाजवळ खासपथक व प्रतिनिधीकडील गकार नामसुद्धां नाना आहेत. वरकड आहेत ते दुलग आहेत. श्रीमंत राजश्री रावसाहेब व किल्ला नानांच्या लगामीं हा वेळपावेतों आहे. शिंद्यांचा भरंवसा समजत नाहीं. त्याविशीं खातरजमा असती तरी राजश्री हरीपंततात्या शिंदेसुद्धां आल्यास बाजी फिरवावयास येईल. शिंदे दुलग जाहल्यास मग आतां झालें हेंच बरें ! शिंद्यांकडे राजश्री मोरोबादादानीं बाबूराव केशव यांस पाठवितात. गोपाळशास्त्री जाऊन आले आहेत. तेही[3] इकडील लक्षांत आहेत असें समजल्याशिवाय मन. सबा करावयास येत नाहीं. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस समजूत करून आणावें असें मोरोबा म्हणतात. गोपाळ नाईक यास मुंबईस पाठवितात. समजूत न जाहल्यास कसेंही करून आणावे आणि ज्यांचे ज्यांचे सूड घेणें त्यांचे त्यांचे घ्यावे असा मनसबा दिसतो. ईश्वरइच्छा प्रमाण ! होईल तें खरें. वृद्धानीं असें केलें तेव्हां बंधु बंधु मिळाल्यास तेंही उत्तम. खटपट करून पहातों. होईल तें लिहितों. पत्रें वाचून

---

१ नानानीं. २ नानाकडील, ३ महादजी शिंदे.

नकला श्रीमंत राजश्री भाऊंकडे पाठवावयासही ल्याहावें. कोणास पत्रें कळवूं नयेत. [1]तेथें वृद्धांचे आप्त फार आहेत ! सेवंशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३०१. (१४ एप्रिल.)

परशुरामभाऊंचें पत्र लष्करांतून मिरजेस गंगाधरराव यांस—

" तुम्ही ११ रबिलावलचें पत्र पाठविलें तें छ १४ मिनहूस प्रविष्ठ जालें. " पुण्याकडील सारें मंडळ साताऱ्यास येणार. करवीरकरानीं पंधरा दिवस चाळवाचाळव केली यामुळें फिरून बिघाड जाला आहे. पुण्याकडील गडबड तूर्त वारली. हीं पत्रें पाहून माघारे फिरलां असलां तर उत्तमच जालें. [2]राजा सिंहासनारूढ करून मग पुढील कर्तव्य. श्रीमंतांस पंधरा लक्षांची जहागीर देऊन आनंदवल्लीस ठेवावें व बजाबास साताऱ्याचा अधिकार सांगावा. शिंद्यास सरंजाम दिला तिंतका होळकरांस द्यावा. कोणी देवावें, कोणी मखलाशी वगैरे कामें करावीं, " असें ठरल्याचें व " राजश्री नानानीं उगेच असावें हा संतोष " म्हणून लिहिलें तें कळलें. राजश्री महादजी शिंदे यांचीं पत्रेंही आम्हास आलीं होतीं कीं " मागें फिरावयाचें तें समय पाहून फिरणें. फार जलदीही करूं नये. " अशीं मसलतशीर पत्रें आलीं होतीं. खर्चाची ओढ फार, लोक अबरू ठेवीत नाहींत, याकरितां आम्हांस माघारें फिरणें प्राप्तच जालें. "

---

१ मिरजेस. २ मोरोबाच्या पक्षाची मंडळी. ३ रामराजे वारल्यानंतर त्यांच्या जागीं बसविलेले धाकटे शाहू राजे यांचा राज्याभिषेक अतिचाराकरितां वैशाखापर्यंत थांबला होता. (पहा नं. २२०२). ४ दादासाहेबांस. ५ छत्रपति, त्यांचें संस्थान व सातारा किल्ला संभाळण्याचा अधिकार. ६ दहा लक्षांची जहागीर व अशीरगडासारखा किल्ला.

नं. २३०२. श्री. (चैत्र व०–एप्रि० दु० पंधरवडा.)

सेवेशीं शंकराजी मोरेश्वर. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना–दोन वेळ मिरजेहून दारू आली ही अगदीं वाईट. पेशजीची दारू होती ती नवी. तिनें फारच लौकिक तोफेचा केला. गोळेही चांगले लागू जाले. हल्लीं दारूनें गोळा बंदुकीच्या गोळीप्रमाणें देखील जात नाहीं ! आणि तोफेजवळ राजश्री बाळाराव व राणेखान वगैरे येऊन उभे रहातात आणि शिस्त लागत नाहीं; तेव्हां त्यांजला कांहीं पाटीलबावांकडे जावें लागत नाहीं. पारिपत्यास अरुता आहे. पेशजी दारूमुळें जेथें (नेम) धरावा तेथें काम कारागर होत असे, याजमुळें बहुतच लौकिक जाला. त्याजवरून हल्लीं रुबरू तोफ आणविणार. दारू वाईट. चांगली दारू पाठवावयास आज्ञा असावी. जुनी आहे, केवळच उपयोगी नाहीं, त्यास पुटें देवावीं ह्मणजे चांगली होईल. कागदाचीं पानें कोरीं अगदीं नाहींत. दोन दस्ते पाठविण्यास आज्ञा असावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३०३. (१६ एप्रिल.)

रामाजी भरमाजी, ठाणें शहापुर, यांचें चैत्र व० ५ गुरुवार. रबिलावल. सन समान सबैनचें पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस—

" कित्तूरकर देसाई जमावसुद्धां जांबोटीवर आहे. हजार बाराशें स्वार व दहा हजारपर्यंत प्यादे आहेत. पांच तोफा आहेत. कित्तूरकर आम्हापासून चार कोसांवर आहे. त्याचा विश्वास नाहीं. यास्तव बंदोबस्तीनें आहों. "

---

१ हा मिरजेहून महादजी शिंद्यांच्या लष्करास करवीरच्या वेढ्याकरितां तोफ गेली होती तिजवरचा अधिकारी. यांचें हें गंगाधररावांस मिरजेस पत्र. २ बाळाराव गोविंद हे महादजी शिंद्यांचे दिवाण व राणेखान हे सरदार. ३ नेम. ४ गोलंदाजास शिक्षा करण्याची परवानगी घेण्यास. ५ मोकळीक. ६ महादजी शिंदे तोफ आपणाजवळ आणवून तिची करामत स्वतः पहाणार.

नं. २३०४. श्री. (चैत्र व०.५-१६ एप्रिल.)

राजश्री शंकराजीपंततात्या स्वामीचे सेवेशीं—

विनंति उपरी. होनापा गडकरी याजबरोबर सामान पाठविलें आहे. तपसील. वजन पक्कें खंडी—

·॥३॥७॥	गोळे लोखंडी.		
	·॥८८ दर ८८६ प्रा॥ ६८	एकूण.	
	८१॥१॥ दर ८८२॥ प्रा॥ २६	,,	
	८१॥८ दर ८८३ प्रा॥ २६	,,	
·॥३॥७॥		१२०	
·।·॥·	दारू. बदंरे १०	एकूण.	
८॥·	शिसें. बदंरा. गोळ्या ४३ व तुकडे २		
		४५	
·॥४॥७॥		१७५	

पावणे वीस मण साडे सात शेर एकूण. सुमार पावणे दोनशें घेऊन पावती पाठविणें. छ १७ रबिलावल सन समान सबैन. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. २३०५. (१६ एप्रिल.)

परशुरामभाऊंचें पत्र मिरजेस गंगाधरराव यांस छ १७ रबिलावलचें मुक्काम नागलापूर तालुके गजेंद्रगडनजीक मुद्दल येथून—

" करवीरचा तह जाला. ऐवज आणावयास सरकारचे कारकून गेलें आहेत. अद्याप ऐवज आला नाहीं. पाडाव गेले ते गृहस्थ सोडावे असें ठरलें आहे " म्हणून तुह्मीं लिहिलें तें कळलें."

---

१ पत्र गंगाधररावांचें मिरजेहून करवीरास शिंद्याच्या लष्करांस. २ बुधले. एकवचन बदरा. तें खालच्याच ओळींत आहे. ३ नग. संख्या.

श्रीगणपति.

मं. २३०६. (चैत्र व० ५--१६ एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. तुह्मीं छ १३ रविलावलचें पत्र पाठविलें तें छ १५ मिनहूस प्रविष्ट जाहलें व राजश्री शिवाजीपंत यांचें तुह्मांस आलेलें तुह्मी पहावयास पाठविलें त्याजवरून सर्व अर्थ ध्यानांत आले. कोणतेंही प्रमाणांत आणावें असें नाहीं ! शिवाजीपंतांकडे पत्रें रवाना ओळख्यासमागमें केल्याचें लिहिलें तें कळलें. संलू खिजमतगार याजसमागमें पत्र पाठविलें तें मंदवारीं रवाना केलें तें बुधवारीं दोन प्रहरीं पावलें. " करवीरकर ऐवजाची निशा करीत आहेत. त्यांजकडे कैदेंत होते ते सर्व बंदिवान विशाळ-गडास आले. ऐवजाची निशा होऊन वारणेवर आले नंतर कैदेंतील गृहस्थ यावे. सारांश आपण पुण्याकडे येणेंची त्वरा न करावी. कृष्णेवर तरी रहावें. पुढें आल्यास (मोरोबादादास) काय संशय वाटेल न कळे ! याजकरितां माघारे फिरोन मुक्काम करावे. याउपरही (नाना फडनवीस) फौजेच्या खर्चास न पाठवीत तर उपाय नाहीं ! " म्हणून लिहिलें तें कळलें. खर्चास नाहीं, अब्रू रहावयाचा समय नाहीं असें पाहून फिरलों. देशाहून वर्तमान स्वस्थतेचें यावें म्हणून हलके हलके येतों यास्तव लोकांची कटकट पडती. " उपवासी मरत हलकी मजल कां नेतां ? लांब मजल करून घरास जाऊं ! " ऐसें लोक म्हणतात. पोटास मागावयाचें लोक विसरले ! पैसा सरकारांतन येऊन लोकांस देऊन माघारे फिरणें हें कठीणच आहे. याची काळजी कोठपावेतों

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस. २ करवीरचे मोर्चे उठवून शिंदे परत वारणे-वर गेल्यानंतर. वारणा व कृष्णा या करवीर राज्याच्या उत्तरसीमा होत. पेशव्यां-कडचे लोक कैदेंत घातले होते ते शिंद्यांच्या दपटशामुळें सोडिले असें नाहीं. शिंदे निघून परत राज्याच्या हद्दीबाहर गल्यावर स्वच्छेनःकृपाळूं होऊन ' गुणदोष न पाहतां ' सोडले असा लौकिक व्हावा व छत्रपतीच्या पदाचा बोज रहावा म्हणून ही युक्ति.

करावी ?' माघारे न फिरावें ' म्हणून लिहिलें, त्यास एथील अवस्था आहे ती श्रीजाणें ! तात्यांची गत्त तर कांहीं लिहितां येत नाहीं ! दिव्यांस तेल विडयाचीं पानें बंद, तेथें घरकड अधिकोत्तर काय लिहावें ? गाड-द्यांचे दंगे वगैरे लोकांचे आहेत त्यांत हरिपंतांचा[1] प्राण वांचणें हेंच ईश्वराधीन आहे ! ! ! असो. होणार तसें होईल ! आपले घरची अवस्था तर आपल्या पथकांस चार रोजमरे नाहींत. नित्य खर्चासाठीं गवगवा. आज दोन महिने दोन्ही पागांस निमचंदी. तेही एखादे दिवशीं मिळती ! एखादे दिवशीं तेही नाहीं ! ! सरकारच्या कार-खान्यांस तर आठ आठ दिवस चंदी नाहीं. हत्तींस रतीब आदि-करून नाहींत. तोफांचे बैलांस तर महिनाभर तर अगदींच चंदी नाहीं. मागें कधीं निमचंदी मिळत होती, तेही अलीकडे नाहीं ! तसेंच तोफखान्याचे लोक अडशेरीचे आहेत त्यांस अडशेरी नाहींत. अशा बाबती. त्यांत अद्यापि फितूर तुटले नाहींत; ते एक मोरोबादादा-कडील निराळे, दुसरे हैदरखानाकडील निराळे ! प्रस्तुत शंकराजी घोरपडे यांजकडे हैदरखानाकडील राजकारण लागलें आहे. ऐवज आला असें लोक बोलतात. बारकाईनें पाहतां खरेंच होईल[2]. पारिपत्य म्हणावें तर अशा दिवसांत होणें कळतच आहे ! चौकशीच केल्यास क्षेपनिक्षेप अंगींच लागेल असेंही आहे. इतकें सारें, त्यांत संगतीस मोगलें. त्याजकडेही राजकारण हैदराचें आहे. कांहीं पैका घेतला असी बोलवा आहे. आज चार महिने याचे संगतीस जाहले. कांहीं इलाज चालेना ! तीन महिन्यांत वीस कोस जमीन चालून तुंगभद्रा-पार मात्र जाहलों होतों. परंत दुर्गास जाणें घडतच नव्हतें. अजमासें

---

१ हरीपंततात्यांचा. २ असेल. ३ धौशा.

मागील खुंळाचें वर्तमान ऐकिलें; आपणावरचें निमित्य जातें; 'मागील खूळ जाहलें, पैसा येईना, पुढें मिळेना, यास्तव माघारे फिरलों' म्हणावयासी जागा जाहली ! नाहीं तरी माघारीं फिरणें प्राप्तच होतें. दोन लाख चार लाख रूपयांनीं केवळ फौज माघारी फिरते असा अर्थ नाहीं, परंतु आठ पंधरा दिवस या रानांत घालविले असते. परंतु पुरंधरचें पत्रच येत नाहीं ! राजश्री नानाचें तर कांहींच येत नाहीं ! तेथून याउपर खर्चास येणें हें समजलें ! सुरापूरचें कापड (नानानीं) या फौजेस रवाना केलें होतें तें माघारें आणविलें, तेव्हां सर्वही समजलें ! असो. होणार तसें होईल. येथील विचार पाहतां राजश्री महादजी शिंदे नानाच्या लक्षांत आहेत असें तात्यांचें म्हणणें आहे ते पक्षीं महादजी शिंदे यांजकडे जावें; त्यांचे विद्यमानें पुरंधरास जाऊन (मोरोबास) भेटावें ! दुसरा अर्थ किमपि नाहीं. फौज तर उठोन जातच आहे. कांहीं दोन चार हजार राहील तितक्यानिशीं जावें. त्यावांचून यांस तेथें जावयासीं दम पुरत नाहीं यास्तव त्यांच रोखें येत आहेत. मोंगलासही निरोप दिल्हा. तोही जाईल. हे महादजी शिंदे यांजवळ जाऊन पोहोंचत तों आह्मी आपला जमाव फोडूं नये, तेथूनही हे माघारे पुण्यास गेल्यावर लोकांस निरोप द्यावा, असें योजिलें आहे. आज तोफखानेवाले पुढें होनगुंद्याचे सुमारें गेले. फार करून निकाल काढून जातात. कांहीं राहतील ते तेथें येतील असें आहे. " महादजी शिंदे यांचीं पत्रें आपणाकडे गेलीं म्हणोन बातमी आहे " म्हणोन लिहिलें, त्यास त्यांचें पत्र आलें होतें जे 'तुह्मी कोठें आहां ! काय मनसबा ?' त्याचें उत्तर आह्मी दिलें जे, 'देशीं खूळ जाहलें आहे. तुह्मी श्रीमंतांचे पदरीं एकनिष्ठ. राजश्री नानाचे ठायीं तुमचें लक्ष.

---

१ पुण्यास मोरोबादादानीं कारस्थान केल्याचें. २ नानाकडून. ३ करवीरच्या. ४ सखारामपंत पानशे.

त्यापक्षीं सर्वांनीं मिळोन खूळ मोडावें. ' असें लिहिलें आहे. त्याचें उत्तर कांहींच आलें नाहीं ! आह्मी माघारे फिरलों म्हणोन पुणियाकडे पत्रें गेलीं आहेत त्याचीं उत्तरें आलीं नाहींत. एक दोन दिवसांत येतील. तदोत्तर होईल मजकूर तो लिहितों. मी येथून दोन चार दिवसांत निरोप घेऊन येतों. आमच्या दारीं येथें काल धरणें देऊन गाडदी बसले होत. त्यांस हरकसें करून निकाल काढून निरोप दिला. कांहीं बाकी राहिली नाहीं ! श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३०७. (चैत्र व० ५–१६ एप्रिल.)

छ १८ रबिलावलचें पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस—

" काल सरकारचीं पतें आलीं कीं, " उभय मंडळीच्या भेटी जाहल्या. मागाहून लिहूं तसें करणें. " त्यास सर्वत्र एक जाले. याउपरी काय लिहिलें येतें न कळे. खर्चाची ओढ कांहीं लिहितां पुरवत नाहीं. आज येथून कूच करून परवां कृष्णातीरास निडगुंद्याच्या सुमारें येत आहों. पुढें सुरापूर तालुका जवळ आहे. तेथें कांहीं साधेल तर घ्यावें असें जाहे. काय घडेल तें पहावें. आह्मी येथें पांच सात लक्षांस गुंतलों आहों याचा परिणाम दिसत नाहीं ! पुण्याकडील असा प्रकार पाहून सावकार निकड करितात तें कांहीं लिहितां पुरवत नाहीं. दोन्ही फौजांचे रोजमुरे चार चार तटलेले आहेत. कसेंही करून वैशाख राा हरिपंततात्यांच्या संगतीस घालविला पाहिजे. उगेंच उठोनही येतां येत नाहीं. पोटासाठीं तर लोकानीं कांहीं कांहीं बाकी ठेविली नाहीं. चहूंकडन संकटें आलीं आहेत. अजमासें जवळ आलों (म्हणजे) दवालयही तयार झालें आहे, देवस्थापना करावी, हा हेतु आहे.

---

१ नाना व मोरोबा या दोघांच्या बाजूच्या.

त्यास येथील पोटाची बंदोबस्ती जाली म्हणजे चिरंजीव राजश्री बळवंतराव[1] व रघुनाथराव व जनोबा सुभेदार या त्रिवर्गांची गांठ घालून द्यावी, महिनाभर कसाही घालवावा, मग (लष्करास परत) यावें, असें मानस आहे. परंतु येथें चहूंकडे गुंता व फौजेच्या खर्चाचें कसें होईल या संकटांत आहों ! कोठें पैशाची पत चालत नाहीं. माझी मुक्तता कशी होते ? मोठे संकटांत पडलों आहों. यांत परिणाम श्रीहरी करील तर न कळे ! असो. फौजेच्या खर्चाची बंदोबस्ती जाली तर येतों. नाहीं तरी याउपरी ईश्वर वाट देईल तिकडे जावें ! दुसरा विचार नाहीं. परिणाम लावणार गजानन आहे. "

नं. २३०८. (१८ एप्रिल.)

१९ रबिलावल गुरुवारचें मुक्काम भिवडीनजीक पुरंदर येथून शिवाजी बाबाजीचें पत्र मिरजेस—

" श्रीमंतांचें पुण्य उभें राहिल्यास सर्व गोष्टी ठीक आहेत. नाहीं तर सुधा विचार दिसत नाहीं ! श्रीमंत राजश्री दादासाहेबांस एक किल्ला व जहागीर द्यावी आणि त्याणीं स्वस्थ बसावें असा ठराव जाहल्यास करावा म्हणोन गोपाळ नाईक व मुष्टीम मुंबईहून आला आहे तो असे उदईक जाणार. समजूत पडल्यास उत्तमच आहे. खंडेराव निंबाजी व नरसो गोविंद ज्याणीं करकंब घेतली होती त्यांस कैदेंतून सोडिलें. सखाराम हरी मात्र सोडावयाचे आहेत. सोडितील. "

नं. २३०९. श्री. (चैत्र व० ६–१८ एप्रिल.)

पो॥ छ २२ रबिलावल सन समान.

विज्ञापना.[2] " सरंजाम श्रीमंत कैलासवासी रावसाहेबानीं अलीकडे ज्यांस ज्यांस दिले ते काढावे. पहिले सरंजाम आहेत[3]

---

१ तिघेही पटवर्धनच. त्यांत बळवंतराव व जनोबा सुभेदार हे यादवाडकर व रघुनाथराव हे कुरुंदवाडकर. २ पुरंदराहून शिवाजीपंताचें पत्र गंगाधररावांस मिरजेस. ३ माधवराव बल्लाळ यांनीं रास्ते व पटवर्धन यांस सरंजाम दिले ते.

ते भारी सरंजाम आणि चाकरीचा उपयोग नाहीं तो[1] सरंजाम काढावा." याप्रमाणें बोलणीं बोलतात[2] !!! 'नबाबास जहागीर दिली आहे ती फार दिली आहे' असेंही बोलणें आहे. सारांश विचार पाहतां अनन्वित आहे ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३१०. **श्री.** (चैत्र व० ८–१८ एप्रिल.)

सेवेशा[3] शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २० रबिलावल मंदवार मुक्काम भिवडी वर्तमानं यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ १४ रबिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं छ १८ मिनहूस पावोन लिहिला मजकूर कळला. पत्रें श्रीमंत राजश्री भाऊंकडे रवाना केलीं, उत्तम आहे. त्यांजकडून पत्रें आलीं तीं पाठविलीं तीं पावलीं. वोलेकराचा मजकूर श्रीमंत राजश्री भाऊनीं धरसोडीचा लिहिला आहे, त्यास आमच्या मतें चहूंकडे रान खवळलें आहे याजकरितां मर्जीस आल्यास ठराव जाहला आहे त्याप्रमाणें विल्हेस लावावें. कृष्णाजीबरोबर सविस्तर लिहून पाठविलें आहे. पत्रें पाठविलीं तीं ज्यांचीं त्यांस प्रविष्ट केलीं. 'उत्तरें द्यावयाचीं नाहींत[4]' येविशींचा अर्थ पहिल्या पत्रीं लिहिलाच आहे. वर्तमान (मात्र) कळावेंसा प्रकार जाहला आहे. करवीराकडील प्रकार लिहिला तो कळला. व राजश्री जिवाजी गोपाळ वगैरे विशालगडकरांचे स्वाधीन केलें म्हणोन लिहिलें, उत्तम गोष्टी जाहली. जासूद जोडया दोन पाठविल्या त्या पावल्या. राा महादजी शिंदे यांजकडे त्रिवर्गांचीं पत्रें देऊन राजश्री बाबूराव केशव यांस पाठविलें. आज जातील. भोसल्याकडे राजश्री बाळकृष्णपंत सफरे

---

१ हें महादजी शिंद्यांच्या जहागिरीस अनुलक्षून. २ मोरोबादादा बोलतात. ३ पत्र मिरजेस गंगाधरराव यांस. ४ पत्रांचीं उत्तरें देऊन नाना फडनवीस दस्तऐवजीं गुंतत नाहींत.

रवाना होणार. श्रीमंत राजश्री दादासाहेब साष्टीस आले. (बरोबर) दोन हजार पायींचें माणूस इंग्रजाकडील आहे. कांहीं अलीकडे माणूस उरणास आलें. सरकारच्या एक दुसरे महालची जप्तीही जाहली. माष्टीम व गोपाळ नाईक एक दोन दिवसांत जाणार. सुधा विचार दिसत नाहीं ! राजश्री रामचंद्र गणेश यांजकडील फौजेस झाडून निरोप जाहला. राजश्री कृष्णरावअप्पाकडील निमेशिमे गेली. राहिली जात आहे. पैसा न देतां निरोप दिल्हा. पागा ज्यांकडे आहेत त्यांस सांगितलें कीं, सा माही खर्च पागांचा द्यावा. पुढें हिशेब पाहून फडशा करूं. येणेंप्रमाणें सांगून पागांची रवानगी केली. काम कारभार झाडून राा मोरोबादादा करितात. पुरंधराभोंवताले वीस पंचवीस कोसीं वैरणी झाडून आणिल्या. आतां घरांचा केमळ आणितात ! लांकडें घरांचीं जाळावयासी आणितात ! फौज वीस हजार पावेतों सारी पुरंधराखालीं आहे. आणखी बहुत दिवस मुक्काम होणार, तेव्हां घरें ओस ! चिंधीचोळा दाणादुणा आणूं लागतील ! सारांश कांहीं बाकी रहात नाहीं असा प्रसंग दिसतो. श्रीमंत राजश्री नाना नारायणाजवळ आहेत. वरकड सारी फौज करेवर आहे. शिंदे आलेखेरीज येथून फौजेचा जथ फुटत नाहींसा दिसतो. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३११. **श्री.** (चैत्र व० ११–२३ एप्रिल.)

यादी. श्रीमंत महाराज राजश्री शिवछत्रपति स्वामींस शिबंदीचे खर्चाकारितां व करारजाबता निभावणीविशीं विनंति माधवराव नारायण पंडित प्रधान विद्यमान महादजी शिंदे गुजारत बाळाराव गोविंद व राणेखान निसबत शिंदे. सुरूसन समान सबैन मय्या व अल्लफ. छ २४ रबिलावल.

---

१ आपा बळवंत. २ देतों.

श. १७०० मोरोबादादाचें कारस्थान इ. स. १७७८

१ ऐन मामलत व शिबंदीचे खर्चाबद्दल रोख रु. १५०००१

तपशील.

४००००१ हल्लीं रोख द्यावे. मग करवीरचे मोर्चे उठतील.

११००००० चार महिन्यानंतर द्यावे.

१५०००००१

१ एकूण पंधरा लक्ष रूपये द्यावयाचे करार केले. पकीं चार लक्ष हल्लीं सावकारी निशा करून देऊं. अकरा लक्ष वाइद्यानें द्यावे.

बितपशील.

४००००१ रोख सावकारी निशा करून देऊं तेव्हां मोर्चे उठवावे.

११००००० चार महिने उपरांत देऊं.

१५०००००१

यासीं निभावणीस सटवोजी भोंसले याचें लेखपत्र करून देऊं. येणेंप्रमाणें करार.

२ पडल्या घोडयांबद्दल व जखमी वगैरेबद्दल द्यावे रूपये ४००००१

२ एकूण चार लक्ष रूपये द्यावे. याचा करार बितपशील.

२००००१ तूर्त सावकारी निशा दिल्यानंतर मोर्चे उठवावे.

२०००० ठाणें वडगांव वगैरे ठाणीं खासगत राजमंडळाचे गांव पैकीं तुह्मी वसूल घेतला असेल त्याजमुळें तुमचा आमचा लढा, त्यासी सदर्हु सावकारी निशा आह्मी देतों. त्यास वसूल

शं. १७०० **उभारणी** इ. स. १७७८

रुजवातीनें ठरेल तो राजमंडळचे गांवचा मजरा देऊन बाकी ऐवज सावकार यांजपासून घ्यावा.

४०००० एकूण चार लक्ष रुपये करार.

३ चोहों महिन्यांचे वायद्यानें ११००००० रुपये द्यावे. सदरहू रुपयेचे उगवणीस मातबर दरम्यान कोणी द्यावा. दरम्यान मातबर द्याल त्याणें चोहों महिन्यांची निशेची चिठी देऊन ऐवजाची निशा करावी. स्वामींनीं मातबराचे चिठीप्रमाणें निभावणी करावी. कलम १.

३ चोहों महिन्यांचे वायद्यानें द्यावे रुपये अकरा लक्ष. त्याचे उगवणीस सटवोजी भोंसले दरम्यान देऊन मशारानिल्हेकडून करारप्रमाणें चोहों महिन्यांची निशा चिठी लिहून देऊन ऐवजाची निभावणी करून देऊं. येणेंप्रमाणें करार.

४ दरबारखर्चाबद्दल रोख द्यावे.

५०००० नि॥ पंतप्रधान.

५०००० नि॥ शिंदे

१००००० [1]

४ एकूण एक लक्ष रुपये सहा महिन्यांचे वायद्यानें सावकारी निशा देऊं. येणेंप्रमाणें करार.

५ पेशजी तीर्थरूप कैलासवासी नारायणराव यांचे वेळेस करार जाबता ठरला आहे त्यापैकीं तालुके चिकोडी व मनोळी व मौजे लाट व रांगोळी यांच्या

५ नारायणराव पंडित कैलासवासी यांच्या कारकीर्दीचा पहिला करार राजश्री सखाराम भगवंत व आपाजी शामजी व जिवाजी भोसले यांचे विद्यमानच्या

१ वजा.

सनदा दरोबस्त अमलाच्या आम्हास द्याव्या. बाकी कलमें कराराजाबत्याप्रमाणें परस्परें निभावर्ण राजमंडळांतील आम्हाकडे लोव आले त्यांस आम्ही वचनें दिलें आहेत त्याप्रमाणें स्वामीनीं निभावावीं. कलम १.

करारापैकीं तुह्मास लाट रांगोळी व चिकोडी मनोळी यांच्या सनदा दरोबस्त द्याव्या. बाकीबद्दल जाबते व अलाहिदा यादी त्याप्रमाणें तुह्मी वर्तोन सरकारांत जरा बाजरा ठाणीं व खेडीं द्यावीं. तुह्मी कराराप्रमाणें वर्तावें. आम्हाकडूनही जाबतेप्रमाणें निभावणी केली जाईल. येणेंप्रमाणें करार.

६ राज्याची अभिवृद्धि व आमचें कल्याण तेंच स्वामींनि करावें.

६ राज्याचें कल्याण व राज्याची अभिवृद्धि होईल तेंच करूं. तुम्ही कराराप्रमाणें निभावणी करावी म्हणजे तुम्हांशींही दुसरा अर्थ घडणार नाहीं.

७ फंदफितूर करूं नये. तीर्थस्वरूप दादा[1] वगैरे राज्यांतील कोणी फितुरी स्वामीकडे येतील त्यांस थांगा देऊं नये. येणेंप्रमाणें निखालसता असावी. कलम १.

७ तुमच्या लक्षाप्रमाणें राजश्री रघुनाथराव पांडित यांजकडे संधान करणार नाहीं. हैदर नाईक याजकडेही सूत लावून फितूर होणार नाहीं. राज्यांतील व परराज्यांतील यांजकडे सूत्र लावून राज्याचें अकल्याण होणार नाहीं. राज्याची अभिवृद्धि व तुमचें कल्याण घडेल. तुम्हांकडून हरएकविशीं फितूर होऊं नये. येणेंप्रमाणें करार.

---

१ रघुनाथरावदादासाहेब.

८ जिवाजी गोपाळ व विरूपाक्ष शामजी—रामचंद्र गणेश व कोन्हेरराव त्रिंबक यांचे लढाईंत वगैरे—आम्हाकडील लहान मोठे धरून नेऊन बंदीस घातले आहेत ते सोडून द्यावे. कलम १.

८ जिवाजी गोपाळ व विरूपाक्ष शामजी व— रामचंद्र गणेश व कोन्हेरराव त्रिंबक यांचे लढाईंत तुम्हाकडील पाडाव सांपडले असतील ते—त्यांचीं खतेंपत्रेसुद्धां (सोडून देऊं.) तुमचा खिजमतगार ठेवणें. त्यांचें खत पन्हाळेहून विशाळगडास पाठवून देऊं. तेथून राजश्री प्रतिनिधिपंत (बंदिवानांस) तुम्हाकडे पोंचवितील, ते तुम्ही कृष्णापार होतांच. येणेंप्रमाणें करार.

९ गोपाळजी आंग्रे व येसनाक वगरे हे आमच्या तालुक्यांत कोंकणपट्टीस वगैरे प्रांतीं चोरी वगैरे उपद्रव करून ब्राह्मणांच्या बायका धरून नेऊन पैका घेतात, ते हरामखोर राज्यांतील, त्यांजला थांगा देऊन पन्हाळ्यास ठेविले आहेत ते आमचे स्वाधीन करावे व पुढें हरामखोरांस थांगा देऊं नये. कलम १.

९ तुमच्या तालुक्यांतील कोंकणप्रांतीं वगैरे चोरी करून आम्हाकडे आले आहेत त्यांचें पारिपत्य आम्ही करूं. त्यांजला सोडणार नाहीं. पुढें तुमच्या तालुक्यांतील वगैरे फितुरी व हराम्खोर येतील त्यांस थांगा देणार नाहीं. राजमंडळाकडील हरकोणी वतनदार वगैरे फितुरी व हरामखोर तुमच्या तालुक्यांत येतील त्यांस तुम्ही थांगा न द्यावा. राजमंडळचे लहान थोर सेवक वतनदार वगैरे फितुरी व हरएक लबाडी करून कोणी तुमच्या तालु-

---

१ बंदिवानांपासून दंडाच्या ऐवजाबद्दल महाराजानीं लिहून घेतलेलीं खतेंपत्रें.

क्यांत येतील त्यांस जागा न देतां सरकारांत स्वाधीन करावे. ज्या जागेस जातील त्यास पत्र जाईल. त्याणीं थांगा दिला तर त्या तालुक्यास उपसर्ग होईल. येविशीं सरकारांतून अंतर पडेल. ऐसें नसावें. येणेंप्रमाणें करार.

१० राणोजी घोरपडे सेनापति हे आमचे आप्तविषयी व स्वामीचे सेवक. यांसी आमचें वचन दिलें आहे. त्याप्रमाणें निभावणी करावी. त्यांचीं ठाणीं व गांव स्वामींनीं सरकारांत घेतले आहेत ते मशारानिल्हेस देवावे. पर्ववतप्रमाणें सेनापतीचें चालवावें. कलम १.

१० राणोजी घोरपडे सेनापति हे राजश्री महादजी शिंदे यांचे आप्त व सरकारचे सेवक. तुम्हांस अगत्य तेंच आम्हास अगत्य. पहिल्याप्रमाणें त्याणीं एकनिष्ठपणें सेवा करावी रुजू होऊन. पहिलेप्रमाणें चालविलें जाईल. त्यांचीं ठाणीं व गांवें घेतलीं तीं देविलीं जातील. येणेंप्रमाणें करार.

११ आम्हाकडे राजमंडळापैकीं लोक आहेत. त्यांस आम्ही वचनें दिलीं आहेत त्याप्रमाणें निभावणी करावी. त्यांचा आकस न धरितां पूर्ववतप्रमाणें चालवावें. कलम १.

११ तुम्ही वचनें सरकारच्यातर्फेच्या लोकांस दिलीं आहेत, त्यांस कैलासवासी आईसाहेब यांचे वेळेस चालत आलें असेल त्याप्रमाणें चालविलें जाईल. त्याणीं एकनिष्ठपणें सेवा करावी. फितवाफांदडा हिल्लाहरकत करूं नये. त्याणीं पर्ववत्प्रमाणें सरकारांत रुजू असावें. येणेंप्रमाणें करार.

---

१ महादजी शिंद्यांचे. २ सवाई माधवराव पेशवे यांस. ३ शंभु छत्रपति (दुसरे) यांची स्त्री जिजीबाई.

१२ पंतप्रतिनिधि व बावडेकर अमात्य व सेनापति घोरपडे यांचें पेशजीप्रमाणें चालवावें व ज्याचे त्याचे हातून कारभार घ्यावा. कलम १.

१२ प्रतिनिधि व अमात्य व सेनापति यांचें पूर्ववत्प्रमाणें चालविलें जाईल. त्याणीं सरकारांत रुजू असावें. व त्याणीं दुष्टबुद्धि धरून हरएकविशीं फितवाफांदडा करूं नये. राजमंडळाचे हरकोणी वतनदार वगरे यांसी त्याणीं आसरा देऊं नये. सरकारांत रुजू असावें. येणेंप्रमाणें करार.

१३ राजश्री रघुनाथराव मंत्री व मिरजेकर व शिराळेकर भोंसले, महिपतराव घोरपडे व थोरात वाळवेकर व व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर वगैरे आमचे सेवक व राजमंडळचे सेवक साताऱ्याकडील-त्यांचा आकस धरून उपद्रव करूं नये व आपले राजमंडळापैकीं मशारनिल्हेकडे इनामी वगैरे गांव व वतनें असतील तीं पूर्ववत् चालवावीं. कलम १.

१३ मिरजकर व रघुनाथराव मंत्री व शिराळेकर भोसले व महिपतराव घोरपडे व व्यंकटराव घोरपडे व थोरात वगैरे तुम्हाकडील व साताऱ्याकडील यांजला उपद्रव होणार नाहीं. त्यांजकडे इनाम वगैरे पूर्ववत्प्रमाणें राजमंडळपैकीं असेल तें चालवूं व आकसही होणार नाहीं. राजमंडळास त्यानीं हरएकांविशीं फितूरफांदडा करूं नये. इकडील कोणी लहानथोर वतनदार व रयत वगैरे गेल्यास त्याणीं जागा देऊं नये. आपण जागा देऊन इकडे चोर

---

१ मिरजकर पटवर्धन. (यांतच इतर ठिकाणचे पटवर्धन आले.) २ 'आह्माकडील सेवक व साताराराजमंडळचे सेवक' असा पेशव्यानीं भेद करण्याचें कारण यांपैकीं फक्त पटवर्धनांची सरदारी मात्र त्यानीं नवीन उत्पन्न केली होती. बाकीचे सर्व सरदार राजपथकी होते. म्हणजे त्यांस सरदारीच्या व वतनाच्या वगैरे सनदा सातारच्या छत्रपतींकडून मिळाल्या होत्या.

श. १७०० **मोरोबादादाचें कारस्थान** इ. स. १७७८

व हरएक उपसर्ग करवूं नये. केल्यास इकडून उपसर्ग होईल येविशीं आपला शब्द नसावा. येणें-प्रमाणें करार.

१४ घाटगे कागलकर हे पुरातन सेवक राजमंडळाचे. यांजकडे पहिल्यापासून कागल आहे. अलीकडे शेषो नारायण यांचे कारकीर्दीस महाराज याणीं सरकारांत घेतलें होतें तें फिरोन आम्ही घेऊन घाटगे यांजकडे दिलें आहे त्याप्रमाणें चालवावें. येविशीं सनद द्यावी व घाटगे यांचीं वतनें आहेत त्याप्रमाणें चालवावीं. आम्हाकडे आले होते म्हणोन आकस करूं नये. क. १

१४ कागलकर पुरातन सरकारचे सेवक. त्याणीं सेवाचाकरी पूर्ववत्प्रमाणें केल्यास कैलासवासी आईसाहेब यांचे वेळेस चालत आलें त्याप्रमाणें कागल वगैरे पूर्ववतप्रमाणें चालविलें जाईल. येणेंप्रमाणें करार.

१५ व्यंकटराव घोरपडे यांजकडे मौजे लाट व रांगोळी आहे त्यास पूर्वापासून घोरपडे यांजकडे इनाम आहे त्याप्रमाणें हल्लीं करार करून सनद करून द्यावी. क. १

१५ ' लाट वं रांगोळी पूर्ववतप्रमाणें तुम्हाकडे करार करून दिली असे. सुखरूप अंमल करून राहणें ' म्हणोन सनद दिली जाईल. येणेंप्रमाणें करार.

१६ तालुके चिकोडी व मनोळी दोन्ही तालुके राजमंडळपैकीं सावकारांस कर्जांत दिले आहेत त्यास " सावकारांचें कर्ज फिटल्यावर सदरहू तालुके तुह्मांस दिले आहेत. तुम्ही अंमल करणें अथवा सावकारांचें कर्ज देऊन

१६ " मनोळी चिकोडी दोन्ही तालुके तुम्हांस द्यावे येविशीं राजश्री महादजी शिंदे याणीं येऊन विनंति केली त्याजवरून दरोबस्त तालुके तुम्हास दिले. " याप्रमाणें सनद देविली जाईल. येणेंप्रमाणें करार.

हल्लींच अंमल करणें " ह्मणोन सनदा दोन्ही तालुक्यांच्या दरोबस्त अंमलाच्या करून द्याव्या.

१७ देवस्थान व ब्राह्मणास वगैरे इनाम गांव करून राजमंडळपैकीं द्यावे.

३००० क्षेत्र करवीर.
२००० श्रीमहालक्ष्मीस गांव.

५०० समस्त ब्राह्मण क्षेत्रस्थांस गांव.
५०० शंकराचार्यांस गांव १.

३०००

३५०० श्रीज्योतीर्लिंगास गांव १.
३५०० श्रीमनसूर साहेब यांस गांव १.

१०००० एकूण दहा हजार रुपयांचे गांव स्वामींनीं कृपा करून देविले पाहिजेत. येविशीं विनंति मान्य केली पाहिजे. कलम १.

१७ तुम्ही गांव द्यावे म्हणोन लिहिलें; त्यास सरकारांतून पेशजी गांव त्यांस दिले आहेत ते सरकारांत घेऊन हल्लीं तुम्ही लिहिले. प्रमाणें देविले जातील. येणेंप्रमाणें करार.

१८ सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन वगैरे मुत्सद्दी यांस पेशजी गांव द्यावयाचा करार केला आहे त्याजप्रमाणें द्यावें. कलम १.

१८ राजश्री सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन वगैरे मुत्सद्दी यांसीं पेशजी यादी करार करून दिली आहे त्याप्रमाणें गांव

इनामपत्रें करून द्यावीं, त्यास चिकोडी मनोळी तुम्हाकडे, तेव्हां पत्रें द्यावीं तीं काय ?

१९ राजमंडळचे गांवाबद्दल व सरंजामी यांजपासून हल्लीं ऐवज घेतला असेल तो मागूं नये. मागितल्यास सटवोजीं भोसले याणीं स्वाऱ्या करून मिरंजप्रांतीं वगरे ऐवज घेतला असेल तो जरा बाजरा द्यावा. आम्ही घेतला असेल तो रुजुवातीअंतीं ठरेल त्याप्रमाणें देऊं. कलम १.

१९ राजमंडळाकडील गांवचा वसूल तुह्मी घेतला आहे तो चार लक्ष रुपयेंत तुह्मी मजरा द्यावे. मिरजप्रांतीं वगैरे येथें राजश्री सटवोजी भोसले याणीं स्वारी शिकारी करून खंडणी घेतली असेल तो ऐवज हल्लीं (आह्मांस) खर्चवेंच भारी पडला याजमुळें द्यावयाचा नाहीं. येणेंप्रमाणें करार.

२० संक्राजी घोरपडे आपले राजमंडळाकडे चाकरीस होते त्यांची तलब न देतां त्यांचीं घोडीं मुधोळाहून येत होतीं तीं घेतलीं व चीजबस्त घेतली ती द्यावी. कलम १.

२० संक्राजी घोरपडे याणीं सरकारांतील जास्ती ऐवज नेला आहे व फरास सामान व उंटें व समया वगैरे नेलें आहे. तें जरा बाजरा सरकारांत त्याणीं दिलें तर घोडीं देविलीं जातील.

२१ वीरभद्र गोसावी मौजे संवदत्ती याजपासून खतेंपत्रें घेतलें असेल तें माघारें द्यावें.

२१ मेहेताबगिरी गोसावी त्यास दरम्यान होता त्यापासीं पत्र दिलें आहे.

कलम १.

श्रीगणपति.

नं. २३१२. (चैत्र व० ८–२० एप्रिल.)

पैा छ २५ रबिलावल. सन समान सबैन. गुरुवार. चैत्रमास आठवा तास.

आशीर्वाद उपरी. आह्मी रारावीच्या तळावरून छ रबिलावलीं माघारे फिरलों तेव्हां सांडणीस्वारासमागमें पुण्यास पत्रें दोन वेळ पाठविलीं त्यांचीं उत्तरें छ १५ मिनहूचीं आमचे नांवें व राजश्री हरी-पंततात्यांचे नांवें श्रीमंतांचीं व राजश्री सखारामपंतांचीं व राजश्री नानाचीं व राजश्री मोरोबादादाचीं आलीं तीं पहावयासी तुह्माकडे पाठविलीं आहेत, त्याजवरून कळेल. आजपर्यंत पत्रांची वाट पहात होतों. पत्रें आलीं नाहींत. तूर्त आलीं त्यांत लिहिलें कीं, ' फौजेस निरोप देऊन तुम्ही पुरंधरास यावें ! ' तेव्हां पुढें मनसबा काय होतो ! फौजेस तीन महिने रोजमुरा नाहीं. आतां नित्य लोकांचीं धरणीं बसतात. कूच होत नाहीं. बुनगें पुढें लावून देऊन लोकांचीं धरणीं तळावर बसतात तेव्हां सायंकाळपर्यंत तळावर जरीपटका घेऊन बसावें लागतें ! एक एक अनर्थ पडतात. पुरंधराहून खर्चास मागितलें त्यास लोकांस अंतस्थ कागद ' उठोन येणें अगर पुढें घालोन घेऊन येणें, ' ऐसे नानाप्रकारचे खिसारे. तेव्हां राहणें हें कळतच आहे. पुरंधरीं राा नाना यांची फौज आहे तेथेंही फोडाफोडी केली ! इतकेही खिसारे सोसण्यास येते, परंतु पोटात्रांचून कांहीं होणें नाहीं. तूर्त गलगलेनजीक आलों. लोक उठोन जाऊन तात्यांस मोकळें केलें तर चांगलें; परंतु तेंही घडतां दिसत नाहीं ! आह्मी आणखी दोन चार रोज आणखी पत्रांचा सुमार पाहून फौजेंतील स्वारांस निरोप देतों. परंतु फौजेचे पांच रोजमरे तटले आहेत ते द्यावे तेव्हां निरोप घेतील ! त्यास निदान पक्ष दहा बारा हजार रूपये पाहिजेत. त्यास येथें तो कर्ज एक पैसा मिळत नाहीं; तेव्हां फौजेस निरोप तरी कैसा होतो ? न द्यावा तर रोजमरा चढतो. त्यास हरतजवीज करून दहा बारा हजार रूपयेची तरतूद करून पाठवावी. तिकडून तरतूद होत

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस. २ पुण्याहून कारभाऱ्यांकडून.

नाहीं. माझा गळा मोकळा होत नाहीं. प्राणाशींच गांठ आहे. नित्य पोटासाठीं खटखटी होऊं नये त्या होतात. तर अगत्य ऐवजाची तरतूद करून पाठवावी. रोजमऱ्याशिवाय नालबंदीचे ऐवजीं राऊतीं दहा पंधरा रुपये तरी दिले पाहिजेत. सालगुदस्त निमे नालबंदी दिली त्याजवर आंजपर्यंत पैसा पावला नाहीं. साल मजकूरची नालबंदी तो पुढेंच देणें आहे. परंतु तूर्त कांहीं दिलें पाहिजे. याची तरतद करून पाठवावी. तुम्ही तरी काय कराल ! जेथवर होईल तेथवर करावें. माझ्या प्राणाशीं संबंध आहे. चहूंकडून पेंच आले आहेत. उठोन जाईन म्हटल्यासही सुटका होईल अशी दिसत नाहीं ! ! ! बरें ! गजानन आहे ! फौजेस निरोप द्यावा म्हणोन कारभाऱ्यांचीं पत्रें आलीं तें फार चांगलें जालें ! तूर्त शिबंदीच्या पेंचांतून निघालों ! वरकड अर्थ कांहीं नाहींत. असो. हरिसत्ता प्रमाण ! हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

नं. २३१३. (चैत्र व० ८–२० एप्रिल.)

पैा छ २३ रबिलावल. सन समानू सबैन चैत्रमास.

आशीर्वाद उपरी. " बाळाजीपंत[3] मिरजेस येऊन खुणेचें पत्र पर्वतास[4] पाठविलें, त्याजवरून खर्चाची चिंठी येईल. आपण चार रोज तिकडेच राहणें. पुढें यावयाची तांतड करूं नये. खर्चास आल्यावर लोकही दम धरून राहतील. पत्रें पावतील तेथें रहावें. करवीराकडे यावयाचें करूं नये. न याल त्यांतच फार काम आहे ! बाळाजीपंत येथून लष्करास जात आहे तो तेथें पावलियावर विचार करावा. यावयाचें न करावें. " म्हणून तुह्मी लिहिलें, त्यास बाळाजीपंत तो आले नाहींत. परंतु तुमच्या लिहिण्याचे अन्वयें कृष्णातीरासच चार मुक्काम जाहले. खर्चाची फार ओढ ! लोक उठों बसों देत

---

१ पत्र परशुरामभाऊंचे गंगाधररावांस. २ सहस्रबुद्धे कारकून निसबत पटवर्धन. ३ पुरंदरास नानाकडे. ४ नानाकडून हुंडीचिठी. ५ गलगलें येथें.

नाहींत ! मुक्काम केल्यास खटखट करितात. कूच केल्यासही मुक्कामास जाऊं देत नाहींत ! सारांश पोटाचा गवगवा. लाख दोन लाख रुपये आले तर आठ चार रोज दम खातां येईल. राा शंकराजी घोरपडे व मालोजी घोरपडे यांचें दोन तीन रोज बोलणें होतें कीं, " आपणास सरंजाम द्यावयाचा करार आहे. त्यास बिळगी परगणा द्यावा. " तो परगणा प्रतिनिधीकडे. ते तूर्त किल्ल्याखालीं श्रीमंतांचे लक्षांत. तेव्हां त्याचे मुबदला तिकोटें व पडसलगी वगैरे पन्नास हजार रुपयांचा सरंजाम द्यावासा ठरला आहे. त्याच्या जप्तीस केसोपंत कारकून पेशजीं आले तेव्हां साहित्याविशीं भास्करपंतमामास आह्मी लिहिलें त्यावरून मामानीं सात हजार रुपये केसोपंतास देऊन पडसलगींत ठाणीं घालून दिलीं. हल्लीं ती पडसलगी संकराजी घोरपडे यांस देणार, तेव्हां मामाचे रुपये बुडतात. याचाही घोळ पडला आहे. तोफखान्याचे सखारामपंत प्रथम विजापुरचे सुभेवर जावें म्हणून कपिलासंगमापासूनच फुटून गेले ते दहा बारा कोसांचे सुमारें गेले आहेत. नरसिंगराव धायगुडे यांजकडे मोरोबादादाचा कारकून वीस जोडया जासुदांच्या घेऊन बातमी लष्करची लिहावयास बसला आहे. त्याची बातमी पुण्यास जातच आहे. धायगुडे यानीं आपले चिरंजीव व लोक यांस निरोप दिला. हलसंगीकडे गेले. खासे चाळीस पन्नास स्वारांनिशीं मात्र आहेत. आणखीही लष्करांत जुजबी कोठें कोठें फितूर आहे. निळकंठराव थोरातास फिरोन पागा द्यावी म्हणून पुरंधराहून राजश्री नानाचीं पत्रें आलीं त्यावरून त्यांस आणून फिरोन पागेंत घातलें. कांहीं लोकही उठोन जात आहेत चिरंजीव राजश्री राघोबादादानींही चारशेंपर्यंत लोकांस निरोप दिला.

---

१ प्रतिनिधीचें पांचशें स्वारांचें पथक घेऊन त्यांचा सरदार गणेश काशी काजे हा पुरंदरास्तालीं नानांचा विश्वासू सोबती व सवाई माधवरावांच्या पक्षाचा ह्मणून राहिला आहे. २ घेतलीं.

खर्चाची बहुत विपत्य आहे. सार मनसबे याजवर ! बरें ! श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें घडतां घडेल तें खरें ! आमच्या खासगत पयकाचे पांच रोजमुरे तटले आहेत. कर्जही मिळत नाहीं. कोठें चिठी करावी हीही जागा नाहीं. मसलतीस गुंतल्यावर मग चलबिचल करतां नये. पोट चालेनासें होईल तेव्हां लोक उठोन जातील. फजिती होईल. मसलत लांबलीयास फार हिसके बसतील. ज्यापक्षीं थोरले श्रीमंत आणावेसा सिद्धांत तेथील आहे तेव्हां फारच वाईट होणार. त्या लक्षांत वृद्ध आहेत त्यांसही विरुद्ध होईलसें वाटतें. सारांश करवीरकर गृहस्थांचे[1] पुर्तेपणें आंतील भाव समजोन या कार्यावर प्रवर्तले पाहिजेत. मी देवस्थापनेस येतों, साहित्य करावें, म्हणून पांच सात पत्रीं लिहिलें त्याजवरून तासगांवास (मातोश्रीनीं) साहित्य करविलें आहे. येथील बंदोबस्त राखून द्वितीया भौमवारीं निघोन तुमची भेट घेऊन तासगांवास जावें, देवस्थापना करावी, आणि तुमच्या विचारासारखें फिरोन मेळवून घ्यावेंसें योजिलें आहे. घडेल तें खरें. हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

न. २३१४. (चैत्र व० ८–२० एप्रिल.)

आशीर्वाद. उपरी. काल आम्हास श्रीमंतांचीं व त्रिवर्ग कारभारी यांचीं पत्रें आलीं कीं, " फौजेस निरोप देऊन सडे यावें म्हणून पेशजी लिहिलें आहे व हल्लीं राजश्री हरीपंत यांस व लोकांस निरनिराळें लिहिलें आहे. तर तुम्ही त्यांस सांगून निरोप देऊन सडे यावें " म्हणून आम्हास व मशारनिल्हेस व लोकांस लिहिलें आहे. लोकांस दिल्यावांचून जात नाहींत. धरणीं होतात. कुचास हिसका बसतो.

---

१ महादजी शिंद्याचे. २ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस.

आम्हीही लोकांचे बोलण्यांत गुंतलों आहों. याजमुळें व सावनूरकरां-जवळ ऐवज घेऊन सरकारांत गुंतलों याजमुळें आम्हासही निरोप घेऊन जातां न ये. असा पेंच, याजकरितां " ऐवजाची तरतूद करून ऐवज पाठविल्याशिवाय लोकांची समजूत पडत नाहीं. ऐवज पाठवावा; " म्हणून त्रिवर्गांसही उत्तर लेहून पाठविलें आहे. लोकांचीं धरणीं होतात. याजउपर ऐवज न आला तर उपाय नाहीं. लोकांस पत्रें आलीं आहेत. मग लोक काय करतात न कळे. खर्चाची ओढ आहे ती श्रीहरि जाणे ! सारांश कांहीं ठीक दिसत नाहीं. मागाहून सवि-स्तर लिहितों. बाळाजीपंतास येऊन पंधरा दिवस जाहले. परंतु दामो-दरपंताचें ठिकाणच नाहीं ! मग कधीं येतील न कळे ! असो. श्रीइच्छा प्रमाण ! हे आशीर्वाद.

श्रीगणपति.

(चैत्र व० ९–२१ एप्रिल.)

नं. २३१५.

चिरंजीव राजश्री बाळासाहेबांस आशीर्वाद. उपरी. तुम्ही छ २० रबिलावल मंदवार संध्याकाळचीं पत्रें नकलांसुद्धां रवाना केलीं तीं आज छ २२ रबिलावलीं भौमवारीं गलगलें येथील मुकामीं पावलीं. नकलांचें व ' यावयाची त्वरा न करावी. विप्र रवाना जाहला आहे तो पावलाच असेल ' म्हणोन लिहिलें तें कळलें. आमचेही विचारें आठ चार दिवस इकडेच घालवावें असें होतें. परंतु खर्चास पैसा नाहीं. लोक केवळ उपाशीं मरतात. किरकोळास खावयास नाहीं अशी अवस्था जाहली. विप्र तर अद्यापि येत नाहीं. नानाचीं पत्रें वाटेंत धरितात तेव्हां त्यांचेंचँ सर्व जाहलें असें दिसतें ! व नाना-सच जपतात. श्रीमंतांस ममईहून आणाविणार हा तर सिद्धान्तच

---

१ नानाकडून फौजेच्या खर्चाकरितां ऐवज येणार त्याचें. २ लष्करांतून परशुरामभाऊंचें पत्र मिरजेस गंगाधररावांस. ३ नानाचा निरोप घेऊन आलेला कारकून. ४ मोरोबाचा सर्वत्र अंमल बसला.

दिसतो; तेव्हां बाकी काय राहणार ! प्राणार्शींच गांठ आहे ! नानास मनसबा करणें असता तर फौजेस खर्चास पाठविते. पत्रें न येत तर विप्र एकामागें एक रवाना करिते. तें नाहीं तेव्हां सर्व कळलेंच आहे! श्रीमंत रावसाहेबांस कसाबाचे हातीं देतील. इतकाच खेद ! ! ! वर-कड ते तर आपले प्राणावर उदारच आहेत ! पुढें पैका कोण खा-णार श्रीहरि जाणे. असो. चांगलें दिसेल तें करितील ! काल आम्हास पत्रें आलीं होतीं तींच पहावयासी पाठविलीं आहेत, त्याज-वरून सविस्तर कळेल. येथील खर्चाचे ओढीमुळें प्राण कसे जगतील ही चिंता, तेथें मनसबे कोठील ? फौजेंत फारसा फितूर नाहीं व खर्चास मिळाल्यास कोठेंही असल्यास संभाळावयासी येईल. परंतु तें नाहीं. यास्तव शुद्ध आहेत ते देखील पोटासाठीं उठोन जाणार असी अवस्था आहे. आम्हास देखील कांहीं सुचत नाहीं. आज चार दिवस नित्य धरणीं पारणीं होतात. (आज) फौजेंतील लोकानीं अद्याप हरिपंततात्यांस मजलीस येऊं दिलें नाहीं. त्यांचे प्राण कसे वांचतील श्रीहरि जाणे ! आजपावेतों शिंद्याकडे जावें असें होतें. काल पुण्याहून पत्रें आल्या-पासून रामतीर्थावरून फौजेस निरोप देऊन पुण्यासच जावें असें योजिलें आहे. श्रीइच्छेनुरूप काय घडेल तें खरें ! विना ज्यानीं राज-कारण केलें त्याहीं शिंद्यांस टाकून केलें असेल असें नाहीं. जेथें होळकर तेथें शिंदे याचा संशयच नाहीं. हरकसेंही करून श्रीमंतांचें व गजश्री नानाचें संरक्षण होतें म्हणजे बरें. यांत हरिसत्ता प्रमाण, आमचे काळजीनें काय होणार ! त्यांचेच पुण्यप्रतापेंकडून घडेल तें खरें ! आमचा तरी गळा कसा मोकळा होतो ? काल लिहिलें आहे त्याप्रमाणें कांहीं तरतूद जाहल्यास बरें आहे. नाहीं तर श्रीहरीची इच्छा प्रमाण ! सर्व प्रकारें बुडालों ! आतां तोंड दाखवावें असें नाहीं. परंतु उपाय नाहीं. कांहीं सुचत नाहीं. सर्व भार श्रीहरीवर आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ पेशवे व त्रिवर्ग कारभारी यांचीं २ हें लिहिणें सखारामबापूस अनुलक्षून.
३ दहा हजार रुपये पाठविण्याची.

अधिकार-योग

अथवा

नाना फडनवीस यांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास.

'खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नाना फडनविसानीं राज्य बुडविणाऱ्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यांवर आलेलीं दुर्धर संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यांनीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति, उज्ज्वल देशाभिमान व अलौकिक चातुर्य यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन वगैरेंच्या लेखांतून जागोजाग भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किं. ८१०, पोस्टेज ८१.

हरिवंशाची बखर

अथवा

पटवर्धन सरदारांच्या हकीकती.

या पुस्तकांत पेशवाईंतील पटवर्धन वगैरे प्रसिद्ध सरदार व गोर थोरें मुत्सद्दी यांचे अद्भुत पराक्रम, चातुर्य, धाडस, स्वाभिमान गुरुजनाविषयीं आदर, मानसिक औदार्य व निस्सीम स्वामिभक्ति वगैरे सद्गुणांचें उत्तम प्रकारें आविष्करण करणाऱ्या आणि वीर, करुण व हास्य या रसांनीं ओथंबिलेल्या आख्यायिका असून लढाईंतले, छावणींतले, दरबारचे व नानाप्रकारचे घरगुती प्रसंग फार मनोरंजक प्रकारें वर्णिले आहेत. किं. ८१०, ट. ख. ८१.

ऐतिहासिक-लेख-संग्रह.

भाग २।३।४।५।६ प्रत्येकीं किंमत ३ रुपये. पांची भाग एकदम घेतल्यास व्ही. पी. नें ११ रुपये. भाग पांचवा व सहावा घेतल्यास व्ही. पी. नें ५ रुपये.

या पुस्तकांत पटवर्धनं सरदारांच्या जुन्या दफ्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाचे अस्सल कागदपत्र प्रसिद्ध होत आहेत. हे कागदपत्र आम्हीं मोठ्या श्रमानें मिळवून यांची सालवारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें छापीत आहों. प्रत्येक पत्रावर तारीख, महिना व सन घालून पत्रांतील मजकुराचे दर पृष्ठावर हेडिंग दिलें आहे व खालीं अर्थाची फोड करण्याकरितां भरपूर टिपाही दिल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरण छापतांना त्यांतील विषयांचें सुसंगत विवेचन करून एक एक प्रस्तावनाही जोडली आहे. पानिपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावीच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या पुस्तकांत येणार असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जाणार आहे ! मराठी इतिहासाची हौस बाळगणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें व महाराष्ट्रांतील प्रत्येक लायब्ररीनें या पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा. या पुस्तकाचे पहिले तीन भाग बारा बारा सुटे अंकांचे असून चवथा, पांचवा व सहावा भाग यांचीं एकत्र बांधलेलीं निरनिरनिराळीं पुस्तकें आहेत. पहिल्या भागाच्या आतां प्रती शिल्लक नाहींत.

याशिवाय आम्हीं केलेली पुस्तकें आम्हांकडे विक्रीस आहेत तीं— **यशवंतराव महाकाव्य**. किं. १ रुपया. **गुणोत्कर्ष नाटक**. किं. ८८. **नाना फडनविसांचें चरित्र**. किं. रु. १।८. **हैदरअल्लीवर पहिली स्वारी**. (ऐ. ले. संग्रहांपैकीं हें प्रकरण फक्त कथानकरूपानें लिहिलेलें असून; यात हैदरअल्लीचें मनोवेधक चरित्रही दिलें आहे.) किं० ८१२

वासुदेवशास्त्री खरे, मिरज.